# अर्धमागधी व्याकरण

डॉ. के. वा. आपटे

विस्तृत

# अर्धमागधी व्याकरण

प्रा. डॉ. के. वा. आपटे

श्रुतभवन संशोधन केन्द्र

| | | |
|---|---|---|
| **ग्रंथनाम** | : | अर्धमागधी व्याकरण |
| **कर्ता** | : | प्रा. डॉ. के. वा. आपटे |
| **विषय** | : | अर्धमागधी व्याकरण |
| **भाषा** | : | मराठी |
| **अनुवाद** | : | प्रा. डॉ. के. वा. आपटे |
| **प्रबंध संपादक** | : | मुनिश्री वैराग्यरतिविजय गणी |
| **आवृत्ति** | : | प्रथम वि.सं. २०७१ (ई.स. २०१५) |
| **प्रकाशक** | : | श्रुतभवन संशोधन केन्द्र, पुणे (शुभाभिलाषा ट्रस्ट) |

**प्राप्तिस्थळ :**

**१) श्रुतभवन संशोधन केन्द्र,**
४७/४८ अचल फार्म,
सच्चाइ माता मंदिरासमोर,
कात्रज, पुणे - ४६
मो. ०७७४४००५७२८ (९.०० ते ५.००)
इ-मेल : shrutbhavan@gmail.com
वेबसाईट : www.shrutbhavan.org

२) **प्रा. डॉ. के. वा. आपटे**
बंगला नंबर ३, विलिंग्डन महाविद्यालय परिसर,
विश्रामबाग, सांगली-४१६४१५
मो. ०९४२०४५१७०५

# प्रकाशकीय

'अर्धमागधी व्याकरण' चा मराठी अनुवाद प्रकाशित करताना आम्हाला आनंद होत आहे. श्रुतभवन संशोधन केंद्राच्या सन्निष्ठ समर्पित सहकारिगणांच्या कठोर परिश्रमाने दुर्गम असे हे कार्य सम्पन्न होत आहे.

या प्रसंगी श्रुतभवन संशोधन केंद्राच्या संशोधन प्रकल्पासाठी दान करणारे दाता मांगरोळ (गुजरात) निवासी **श्रीमती चंद्रकलाबेन सुंदरजी शेठ आणि भाईश्री (इंटरनेशनल जैन फाउंडेशन, मुंबई)** यांचे तसेच श्रुतभवन संशोधन केन्द्रासोबत प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष रूपाने जोडलेल्या सर्व महानुभावांचे आम्ही हार्दिक अभिनन्दन करीत आहोत. या ग्रंथाच्या प्रकाशनाचा अलभ्यलाभ

**श्री आदेश्वर महाराज मंदिर ट्रस्ट (गोटीवाला धडा)** यांनी प्राप्त केला आहे. आपल्या अनुमोदनीय श्रुतभक्तीसाठी आम्ही आपले आभारी आहोत.

**– भरत शाह**
(मानद अध्यक्ष)

✻ लाभार्थी ✻

प.पू. आचार्यदेव श्रीमद् हर्षसागरसूरीश्वरजी म.सा.

च्या पावन प्रेरणेने

आदेश्वर महाराज मंदिर

ट्रस्ट (गोटीवाला धडा)

पंचदशा ओसवाल सिरोहिया

साथ गोटीवाला धडा

शुक्रवार पेठ, पुणे – ४११ ०४२.

ज्ञानद्रव्यातून

# हृद्गत

काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रात पुष्कळ शाळा आणि महाविद्यालये यामध्ये संस्कृत भाषेच्या पेपरला विकल्प म्हणून अर्धमागधी ही भाषा शिकविली जात असे. साहजिकच त्यावेळी विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या सोयीसाठी त्यांना उपयोगी पडावी या उद्देशाने लिहिलेली अर्धमागधीच्या व्याकरणावर लिहिलेली काही पुस्तके उपलब्ध होती. त्या सर्व पुस्तकात मला काही ना काही त्रुटी आढळल्या. तसेच त्यापैकी काही ग्रंथात 'भाषांतरासाठी उतारे' या शीर्षकाखाली अनेक उतारे देऊन पुस्तकांची पृष्ठसंख्या वाढविण्यात आलेली होती. या त्रुटी दूर करुन आणि भाषांतरासाठीचे उतारे काढून टाकून, व्याकरण तसेच वाक्यरचना यासाठी उपयोगी पडेल असे पुस्तक आपण लिहावे, असे मला वाटले. त्याचे दृश्य फल म्हणजे प्रस्तुतचे 'विस्तृत अर्धमागधी व्याकरण' हे पुस्तक होय.

या 'विस्तृत अर्धमागधी व्याकरणा'ची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील:

१) शक्य तेथे मराठीशी संबंध दाखविलेला आहे.

२) जागोजागी प्राकृत वैकरणाची सूत्रे आवर्जून दिलेली आहेत.

३) सर्व ठिकाणी भरपूर उदाहरणे दिली आहेत.

४) प्रयोग बदलातील काही उदाहरणे सोडून इतर सर्व उदाहरणे इ. मूळ ग्रंथातून (स्वत: तयार न करता) घेतलेली आहेत.

५) एका संस्कृत शब्दाची होऊ शकणारी अनेक प्राकृत रूपे व

६) एकाच प्राकृत शब्दाबद्दल येऊ शकणारे अनेक संस्कृत शब्द मुद्दाम दिले आहेत. (हे शब्द सुमारे ६१ व ६६ आहेत.)

७) धातुसाधनिकेत वापरात आढळणारे बहुतेक धातू (सुमारे ३३३) घेतले आहेत व त्यांच्याच जोडीला

८) नेहमी वापरात आढळणारे धात्वादेश (सुमारे ३००) हे सुद्धा घेतले आहेत.

९) अव्ययविचारात अर्धमागधीतील जवळजवळ सर्व अव्ययांचाच अंतर्भाव केला आहे.

१०) पुष्कळदा माहाराष्ट्री प्राकृतमधून आलेली रूपे अर्धमागधीत आढळतात. त्यांची यथायोग्य माहिती व्हावी म्हणून पुरवणीच्या रूपात माहाराष्ट्रातील

नामरूप विचार व सर्व नामरूप विचार दिला आहे.

११) वाक्यविचार हा विभाग अत्यंत सविस्तरपणे अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केलेला आहे.

१२) वाक्प्रचारांच्या (सुमारे १७५) जोडीला वाक्यांश (सुमारे ४०), विशिष्ट वाक्ये (सुमारे ७५), म्हणी (सुमारे ११) व सुभाषिते (सुमारे ४०) यांचा अंतर्भाव केला आहे. या मागील हेतु असा की अर्धमागधीत लिहिताना त्यांचा यथोचित उपयोग व्हावा.

१३) विशिष्ट अव्ययांचे उपयोग हे या ग्रंथाचे मुख्य वैशिष्ट्य आहे. सुमारे ९० अव्ययांचे उपयोग सविस्तर व सोदाहरण दिले आहेत.

या ग्रंथात एकूण ३१ प्रकरणे असून ती पाच भागात विभागून दिलेली आहेत. शेवटी एक परिशिष्ट असून संदर्भग्रंथांची यादी दिलेली आहे. हे पुस्तक अर्धमागधी भाषेच्या अभ्यासकांना उपयोगी पडावे, अशी भूमिका आहे.

हे पुस्तक श्रुतभवन संशोधन केंद्र, कात्रज, पुणे ही संस्था प्रकाशित करीत आहे. त्याबद्दल त्या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे मन:पूर्वक आभार !

**– के. वा. आपटे**

# अनुक्रमणिका

**हृद्गत**

**प्रास्ताविक :**

१) प्राकृत
२) प्राकृत म्हणजे काय ?
३) प्राकृतचा अभ्यास
४) प्राकृत व्याकरण व त्यांचे स्वरूप
५) अर्धमागधी
६) अर्धमागधी या नावाचे स्पष्टीकरण
७) अर्धमागधी व माहाराष्ट्री
८) अर्धमागधी व्याकरणाचे स्वरूप
९) प्रस्तुत व्याकरणातील वर्ण्य विषय

**विभाग पहिला**

**प्रकरण १ : अर्धमागधी वर्णमाला**

१०) वर्णमाला
११) वर्णोच्चार
१२) वर्णांबद्दल सामान्य विचार
१३) अर्धमागधीतील वर्णांबद्दल अधिक विचार
१४) संस्कृत व अर्धमागधी वर्णांचा तौलनिक विचार
१५) अर्धमागधीतील जोडाक्षरे
१६) अर्धमागधीतील जोडाक्षरांविषयी अधिक विचार

**प्रकरण २ : वर्णविकार (शब्दसाधनिका) : प्रास्ताविक**

१७) अर्धमागधी शब्दसाधनिका
१८) अर्धमागधी शब्दसंग्रह
१९) वर्णान्तर

**प्रकरण ३ : स्वरविकार**

२०) स्वरविकारांचे स्वरूप
२१) ऋ, ॠ, लृ, ऐ, औ यांचे विकार
२२) ह्रस्व ऋचे विकार
२३) ह्रस्व ऋ = अ
२४) ह्रस्व ऋ = इ
२५) ह्रस्व ऋ = उ

२६) ह्रस्व ऋ = रि
२७) एकाच शब्दात होणारे ह्रस्व ऋ चे अनेक विकार
२८) धातूंमध्ये होणारे ह्रस्व ऋ चे विकार
२९) ह्रस्व ऋ चे अनियमित विकार
३०) दीर्घ ॠ चे विकार
३१) ह्रस्व ऌ चे विकार
३२) ऐ व औ चे विकार (नियमित)
३३) ऐ = ए
३४) ऐ = अइ
३५) एकाच शब्दात होणारे ऐ चे अनेक विकार
३६) ऐ चे अनियमित विकार
३७) औ = ओ
३८) औ = अउ
३९) औ चे अनियमित विकार
४०) एकाच शब्दात होणारे औ चे अनेक विकार
४१) स्वरांचे अनियमित विकार
४२) अ बद्दल येणारे इतर स्वर
४३) आ बद्दल येणारे इतर स्वर
४४) ह्रस्व इ बद्दल येणारे इतर स्वर
४५) दीर्घ ई बद्दल येणारे इतर स्वर
४६) ह्रस्व उ बद्दल येणारे इतर स्वर
४७) दीर्घ ऊ बद्दल येणारे इतर स्वर
४८) ए बद्दल येणारे इतर स्वर
४९) ओ बद्दल येणारे इतर स्वर
५०) स्वरांचे ह्रस्वीकरण व दीर्घीकरण

**प्रकरण ४ : व्यंजनविकार**

५१) व्यंजनविकार : सामान्य विचार

**प्रकरण ५ : असंयुक्तव्यंजनविकार**

**[(१) आद्य असंयुक्तव्यंजनांचे विकार)]**

५२) आद्य असंयुक्त श् व ष् यांचे विकार
५३) आद्य असंयुक्त श् व ष् आणि स् यांचे अनियमित विकार
५४) आद्य असंयुक्त य् चे विकार
५५) आद्य असंयुक्त न्
५६) आद्य असंयुक्त प्
५७) आद्य असंयुक्त द्

५८) आद्य असंयुक्त व्यंजनांचे अनियमित विकार
५९) समासांत

[(२) मध्य असंयुक्तव्यंजनांचे विकार]
६०) मध्य असंयुक्त क् ग् च् ज् त् द् प् य् व्
६१) मध्य असंयुक्त ख् घ् थ् ध् फ् भ्
६२) मध्य असंयुक्त ट् ठ्
६३) मध्य असंयुक्त ड्
६४) मध्य असंयुक्त न्
६५) मध्य असंयुक्त ब्
६६) मध्य असंयुक्त र्
६७) मध्य असंयुक्त श् ष्
६८) मध्य असंयुक्त स्
६९) मध्य असंयुक्त व्यंजनांचे अनियमित विकार
७०) समासांत
७१) अन्त्य असंयुक्त व्यंजनांचे विकार
७२) अन्त्य असंयुक्त व्यंजनाचा लोप
७३) अन्त्य असंयुक्त व्यंजनाचा अनुस्वार
७४) अन्त्य असंयुक्त व्यंजनात स्वर मिळविणे
७५) अत् प्रत्ययान्त व. का. धा. वि. आणि वत्, मत् प्रत्ययान्त नकारान्त शब्द
७६) अन्ती असंयुक्त व्यंजन असणारे धातु
७७) अन्त्य विसर्गाचे विकार

**प्रकरण ६ : संयुक्तव्यंजनविकार**
७८) प्राथमिक
७९) संस्कृत व अर्धमागधी संयुक्त व्यंजने : तौलनिक विचार
८०) संयुक्तव्यंजनविकारांचे स्वरूप
८१) अर्धमागधीतील जोडाक्षरांची घटना
८२) संयुक्तव्यंजनांचे विकार : भिन्न पद्धति
८३) समानीकरण
८४) कोणत्या अवयवाचा लोप? कोणत्या अवयवाचे द्वित्व?

८५) द्वित्व कसे करावयाचे?
८६) संयुक्तव्यंजनातील अवयवांचे संयोग
८७) स्पर्श + स्पर्श
८८) स्पर्श + अनुनासिक
८९) स्पर्श + ऊष्म
९०) ऊष्म + स्पर्श
९१) स्पर्श + अंतस्थ
९२) अंतस्थ + स्पर्श
९३) अनुनासिक + अनुनासिक
९४) अनुनासिक + अंतस्थ
९५) अंतस्थ + अनुनासिक
९६) ऊष्म + ऊष्म
९७) ऊष्म + अंतस्थ
९८) अंतस्थ + ऊष्म
९९) अंतस्थ + अंतस्थ
१००) इतर संयुक्तव्यंजनांचे विकार
१०१) अनुनासिक + स्पर्श
१०२) अनुनासिक + ऊष्म
१०३) ऊष्म + अनुनासिक
१०४) ह् ची संयुक्तव्यंजने व त्यांचे विकार
१०५) मध्य विसर्गाचे विकार
१०६) मध्य संयुक्तव्यंजनांचे अनियमित विकार
१०७) तीन अवयवी संयुक्तव्यंजनांचे विकार
१०८) आद्य संयुक्तव्यंजनांचे विकार
१०९) आद्य संयुक्तव्यंजन : अनियमित विकार
११०) अन्त्य संयुक्तव्यंजनांचे विकार
१११) तीन अवयवी अन्त्यसंयुक्तव्यंजनांचे विकार
११२) समासांत
११३) संस्कृतमधील जोडाक्षरांची प्राकृतमधील वर्णांतरे
११४) एकाच प्राकृत जोडाक्षरासाठी येणारी अनेक संस्कृत जोडाक्षरे

**प्रकरण ७ : भाषाशास्त्रीय वर्णादेश**

११५) प्राथमिक
११६) स्वरभक्ति
११७) एकाच शब्दात स्वरभक्तीने येणारे अनेक स्वर
११८) सुलभीकरण
११९) द्वित्वागम

१२०) अनुस्वारागम
१२१) अनुस्वारलोप
१२२) आदिवर्णागम
१२३) आदिवर्णलोप
१२४) मध्यवर्णलोप
१२५) अन्त्यवर्णलोप
१२६) वर्णविपर्यय
१२७) संप्रसारण

**पुरवणी १ :** शब्द संग्रहाबद्दल अधिक माहिती

१२८) एका संस्कृत शब्दाची होणारी अनेक वर्णांतरे
१२९) एका प्राकृत शब्दाबद्दल येऊ शकणारे अनेक संस्कृत शब्द
१३०) शब्दादेश

**प्रकरण ८ : (वर्णविकार) धातुसाधनिका**

१३१) धातूंचा स्वतंत्र विचार
१३२) संस्कृतमधील व अर्धमागधीतील धातू
१३३) अकारान्तेतर धातू
१३४) अकारान्त धातू
१३५) संस्कृतमधील एकाच धातूची अनेक वर्णांतरे
१३६) धात्वादेश

**प्रकरण ९ : संधिविचार**

१३७) अर्धमागधीतील संधि
१३८) संधिनिषेध
१३९) सजातीय स्वरांची संधि
१४०) अ, आ + इ, ई, उ, ऊ
१४१) अ, आ + ए, ओ
१४२) पूर्वस्वरलोप
१४३) उत्तरस्वरलोप
१४४) निपात (लघु अव्यये)
१४५) दीर्घ स्वरांपुढे जोडाक्षर आल्यास
१४६) दीर्घ स्वरांवरती अनुस्वार आल्यास
१४७) ह्रस्व स्वरांवरील अनुस्वाराचा लोप झाल्यास
१४८) ह्रस्व स्वरापुढील संयुक्तव्यंजनांचे सुलभीकरण झाल्यास
१४९) संस्कृतमधून वर्णान्तराने आलेली संधि
१५०/१५१) व्यंजनागमसंधि
१५२) वाक्यगत संधि

## विभाग दुसरा

### प्रकरण १० : नामरूपविचार

१५३) शब्दरूपविचार : प्रास्ताविक १५४) नामरूपविचार : प्रास्ताविक
१५५) नामरूपे १५६) अकारान्त पुल्लिंगी 'देव' शब्द
१५७) अकारान्त पुल्लिंगी शब्दांची अधिक रूपे
१५८) अकारान्त नपुंसकलिंगी 'वण' शब्द
१५९) आकारान्त स्त्रीलिंगी 'माला' शब्द
१६०) ह्रस्व इकारान्त पुल्लिंग 'मुणि' शब्द
१६१) अधिक रूपे
१६२) ह्रस्व इकारान्त नपुंसकलिंगी 'दहि' शब्द
१६३) ह्रस्व उकारान्त पुल्लिंगी 'साहु' शब्द
१६४) अधिक रूपे
१६५) ह्रस्व उकारान्त नपुंसकलिंगी 'महु' शब्द
१६६) ह्रस्व व दीर्घ इ, ई, उ, ऊकारान्त स्त्रीलिंगी में
१६७) ह्रस्व इकारान्त स्त्रीलिंगी 'भूमि' शब्द
१६८) ह्रस्व उकारान्त स्त्रीलिंगी 'धेणु' शब्द
१६९) दीर्घ ईकारान्त स्त्रीलिंगी 'मही' शब्द
१७०) दीर्घ ऊकारान्त स्त्रीलिंगी 'वहू' शब्द अनियमित नामरूपविचार
१७१) कर्तृवाचक 'कत्ता' शब्द १७२) अधिक रूपे
१७३) पिया (पितृ) शब्द १७४) अधिक रूपे
१७५) माया (मातृ) शब्द १७६) अधिक रूपे
१७७) राय (राजन्) शब्द
१७८) अप्प (अत्त, आय) (आत्मन्) शब्द
१७९) अधिक रूपे १८०) भगवंत (भगवत्) शब्द
१८१) अधिक रूपे १८२) इतर शब्दांचा रूपविचार
१८३) इतर स्वरान्त शब्द १८४) इतर व्यंजनांत शब्द
**पुरवणी १** लिंगविचार
**पुरवणी २** माहाराष्ट्रीतील नामरूपविचार

**प्रकरण ११ : सर्वनामरूपविचार**

१८५) प्रास्ताविक
१८६) प्रथमपुरुषी ‘अम्ह’ सर्वनाम
१८७) द्वितीय पुरुषी ‘तुम्ह’ हे सर्वनाम
१८८) ‘त’ सर्वनाम : पुल्लिंगी
१८९) पुल्लिंगी ‘त’ ची अधिक रूपे
१९०) ‘त’ सर्वनाम : नपुंसकलिंगी
१९१) ‘त’ सर्वनाम : स्त्रीलिंगी
१९२) स्त्रीलिंगी ‘त’ ची अधिक रूपे
१९३) ‘एय’ सर्वनाम : पुल्लिंगी
१९४) पुल्लिंगी ‘एय’ ची अधिक रूपे
१९५) ‘एय’ सर्वनाम : नपुंसकलिंगी
१९६) ‘एय’ सर्वनाम : स्त्रीलिंगी
१९७) स्त्रीलिंगी ‘एय’ ची अधिक रूपे
१९८) ‘इम’ सर्वनाम : पुल्लिंगी
१९९) पुल्लिंगी ‘इम’ ची अधिक रूपे
२००) ‘इम’ सर्वनाम नपुंसकलिंगी
२०१) नपुंसकलिंगी ‘इम’ ची अधिक रूपे
२०२) ‘इम’ सर्वनाम : स्त्रीलिंगी
२०३) स्त्रीलिंगी ‘इम’ ची अधिक रूपे
२०४) ‘ज’ सर्वनाम : पुल्लिंगी
२०५) पुल्लिंगी ‘ज’ ची अधिक रूपे
२०६) ‘ज’ सर्वनाम : नपुंसकलिंगी
२०७) ‘ज’ सर्वनाम : स्त्रीलिंगी
२०८) स्त्रीलिंगी ‘ज’ ची अधिक रूपे
२०९) ‘क’ सर्वनाम : पुल्लिंगी
२१०) पुल्लिंगी ‘क’ ची अधिक रूपे
२११) ‘क’ सर्वनाम : नपुंसकलिंगी
२१२) ‘क’ सर्वनाम : स्त्रीलिंगी
२१३) स्त्रीलिंगी ‘क’ ची अधिक रूपे
२१४) इतर काही सर्वनामांची रूपे
**पुरवणी :** माहाराष्ट्रीतील सर्वनामरूप विचार

**प्रकरण १२ : विशेषणरूपविचार**

२१५) प्रास्ताविक
२१६) अर्धमागधीतील संख्यावाचक विशेषणे
२१७) एक ते शंभर संख्यावाचके : रूपविचार
२१८) ‘एग’ ची रूपे
२१९) दो, ति, चउ, पंच यांची रूपे
२२०) अधिक रूपे
२२१) सहा ते शंभर पर्यंतची संख्यावाचके : रूपविचार
२२२) शंभरचे पुढील संख्यावाचके व त्यांची रूपे

**पुरवणी १** मोठ्या संख्या साधणे

**पुरवणी २** साधित शब्दात, समासात व सामासिक संख्यावाचकात होणारे संख्यावाचकांचे विकार

**प्रकरण १३ : धातुरूपविचार**

२२३) संस्कृत व अर्धमागधी धातुरूपे : तौलनिक विचार
२२४) अर्धमागधीतील धातूंचे वर्ग २२५) धातुरूपे
२२६) वर्तमानकाळ २२७) वर्तमानकाळ : धातुरूपे
२२८) वर्तमानकाळ : अस् धातूची रूपे
२२९) वर्तमानकाळ : अधिक रूपे २३०) भूतकाळ
२३१) भूतकाळ : धातुरूपे २३२) भूतकाळ : 'अस्' धातुची रूपे
२३३) भूतकाळ : अधिक रूपे २३४) भूतकाळ : अनियमित रूपे
२३५) भविष्यकाळ २३६) भविष्यकाळ : धातुरूपे
२३७) भविष्यकाळ : अधिक रूपे २३८) अनियमित भविष्यकाळ
२३९) भविष्यकाळ : च्छकारान्त अंगे
२४०) भविष्यकाळ : अनियमित रूपे
२४१) आज्ञार्थ २४२) आज्ञार्थ : धातुरूपे
२४३) आज्ञार्थ : अधिक रूपे २४४) विध्यर्थ
२४५) विध्यर्थ : धातुरूपे २४६) विध्यर्थ : अधिक रूपे
२४७) विध्यर्थ : अनियमित रूपे २४८) संकेतार्थ
**पुरवणी :** माहाराष्ट्रीतील धातुरूपविचार

**प्रकरण १४ : अव्ययविचार**

२४९) अव्यय २५०) क्रियाविशेषण अव्यये
२५१) शब्दयोगी अव्यये २५२) उभयान्वयी अव्यये
२५३) केवलप्रयोगी अव्यये २५४) निपात वा लघु अव्यये

**विभाग तिसरा**

**प्रकरण १५ : साधित शब्द : साधित धातू**


२५५) प्रास्ताविक
२५६) साधित धातू
२५७) पौन: पुन्यार्थक वा अतिशयार्थक धातू
२५८) इच्छार्थक धातू
२५९) प्रयोजक धातू
२६०) नामधातू
२६१) च्वि धातू
२६२) कर्मणि धातू
२६३) कर्मणि धातू : अनियमित


**प्रकरण १६ : साधित शब्द : धातुसाधित विशेषणे**


२६४) धातुसाधित शब्द
२६५) वर्तमानकालवाचक कर्तरि धातुसाधित विशेषण
२६६) वर्तमानकालवाचक कर्मणि धातुसाधित विशेषण
२६७) कर्मणिभूतकालवाचक धातुसाधित विशेषण
२६८) अनियमित क. भू. धा. वि.
२६९) कर्तरि भूतकालवाचक धातुसाधित विशेषण
२७०) भविष्यकालवाचक धातुसाधित विशेषण
२७१) विध्यर्थी कर्मणि धातुसाधित विशेषण
२७२) अनियमित वि. क. धा. वि.
२७३) कर्तृवाचक धातुसाधित विशेषण
२७४) ‘इम’ प्रत्ययान्त धातुसाधित विशेषण


**प्रकरण १७ : साधित शब्द : धातुसाधित अव्यये**


२७५) पूर्वकालवाचक धातुसाधित अव्यय : ल्यबन्त
२७६) अनियमित ल्यबन्ते
२७७) हेत्वर्थक धातुसाधित अव्यय : तुमन्त
२७८) अनियमित तुमन्ते
**पुरवणी :** अर्धमागधीतील इतर धातुसाधिते

**प्रकरण १८ : साधित शब्द : तद्धित प्रक्रिया**

२७९) प्रास्ताविक
२८०) भाववाचक नामे
२८१) स्वामित्वदर्शक विशेषणे
२८२) स्वार्थे 'क' प्रत्ययान्त शब्द
२८३) साधित अव्यये
२८४) विशेषणांचा तर-तम-भाव
२८५) संख्यावाचक साधिते
२८६) स्त्रीलिंगी रूपे साधणे
२८७) शब्दांची अकरणरूपे साधणे
**पुरवणी :** अर्धमागधीतील इतर तद्धित शब्द

## विभाग चौथा

**प्रकरण १९ : समासविचार**

२८८) अर्धमागधीतील समासविचार
२८९) समास
२९०) समासाचा विग्रह
२९३) समासाचे प्रकार
२९४) द्वंद्व (दंद)
२९५) तत्पुरुष (तप्पुरिस)
२९६) अव्ययीभाव (अव्वईभाव)
२९७) बहुव्रीही (बहुव्वीहि)
**पुरवणी :** मोठ्या समासांचे विग्रह

## विभाग पाचवा

**प्रकरण २० : प्रयोगविचार**

२९८) प्रयोग
२९९) कर्तरि प्रयोग
३००) कर्मणि प्रयोग
३०१) भावे प्रयोग
३०२) प्रयोगबदल
३०३) प्रयोजक धातूंचा कर्तरि व कर्मणि प्रयोग
३०४) प्रयोजक धातु : प्रयोगबदल

**प्रकरण २१ : नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद यांचे उपयोग**

३०५) नामांचे उपयोग
३०६) सर्वनामांचे उपयोग
३०७) विशेषणांचे उपयोग
३०८) क्रियापदांचे उपयोग

**प्रकरण २२ : अव्ययांचे उपयोग**

३०९) अव्ययांचे उपयोग
३१०) अइ
३११) अंग
३१२) अदु, अदुव, अदुवा
३१३) अम्मो
३१४) अम्हो
३१५) अरे
३१६) अलं
३१७) अलाहि
३१८) अवि, वि, पि (अपि)
३१९) अव्वो
३२०) अह (अथ)
३२१) अहह
३२२) अहो
३२३) आ
३२४) आ (आः)
३२५) आमं
३२६) इइ, इ, इय, ति, त्ति, (इति)
३२७) इव, पिव, मिव, विव, विय, व, व्व (इव)
३२८) उय (उत), उदाहु, उयाहु (उताहो)
३२९) उयरि, उवरि (उपरि)
३३०) एव
३३१) एवं
३३२) ओ
३३३) कत्थ-कत्थ (कुत्र-कुत्र)
३३४) कयं (कृतम्)
३३५) कह, कहं (कथम्)
३३६) कामं
३३७) किं
३३८) किणो, किह, कीस
३३९) किर, किल
३४०) केवलं
३४१) खलु, खु, हु (खलु)
३४२) च, य (च)
३४३) चेव, च्चिय, चिय
३४४) जं (यद्)
३४५) जइ (यदि)
३४६) जओ, जत्तो (यतः)
३४७) जह, जहा (यथा)
३४८) जह-तह, जहा-तहा (यथा-तथा)
३४९) जा, जाव (यावत्)
३५०) जा-ता, जाव-ताव (यावत्-तावत्)
३५१) जे
३५२) ठाणे (स्थाने)
३५३) णवि (नवि)
३५४) णं
३५५) तं (तद्)
३५६) तओ, तत्तो, तो (ततः)

३५७) तह, तहा (तथा)
३५८) ता, ताव (तावत्)
३५९) तु, उ (तु)
३६०) दर
३६१) दिट्ठिया (दिष्ट्या)
३६२) दे
३६३) धिद्धी, धिरत्थु, धी, धीधी
३६४) धुवं (ध्रुवम्)
३६५) न
३६६) नवरं (णवरं, णवर)
३६७) नवरि (णवरि)
३६८) नाइं (णाइं, णाइ)
३६९) नाम, नामं (नाम)
३७०) नु (णु) (नु)
३७१) पाएण, पायं, पायसो (प्रायेण, प्राय:, प्रायश:)
३७२) पुणो, पुण, उण (पुन:)
३७३) पुणरुत्तं
३७४) बाढं
३७५) भो (भो:)
३७६) मणे (मण्णे)
३७७) मुहुं (मुहु:)
३७८) माइ, माइं
३७९) रे
३८०) वरं
३८१) वा, व (वा)
३८२) सक्का
३८३) सक्खं (साक्षात्)
३८४) सव्वहा (सर्वथा)
३८५) साहु (साधु)
३८६) सिया
३८७) हंजे
३८८) हंत
३८९) हंहो
३९०) हंदि
३९१) हंभो
३९२) हद्धि, हद्धी
३९३) हरे
३९४) हला, हले
३९५) हा, हाहा
३९६) हि
३९७) ही, हीही
३९८) हुं
३९९) हे
४००) हो
४०१) इतर काही अव्ययांचे उपयोग

**प्रकरण २३ : वचनांचे उपयोग**

४०२) वचनांचे उपयोग
४०३) एकवचनाचे उपयोग
४०४) अनेकवचनाचे उपयोग

**प्रकरण २४ : विभक्तींचे उपयोग**

४०५) विभक्तींचे उपयोग ४०६) प्रथमा विभक्तीचे उपयोग
४०७) द्वितीया विभक्तीचे उपयोग ४०८) तृतीया विभक्तीचे उपयोग
४०९) चतुर्थी विभक्तींचे उपयोग ४१०) पंचमी विभक्तीचे उपयोग
४११) षष्ठी विभक्तीचे उपयोग ४१२) सप्तमी विभक्तीचे उपयोग
४१३) संबोधन विभक्तीचे उपयोग

**प्रकरण २५ : काळ व अर्थ यांचे उपयोग**

४१४) वर्तमानकाळाचे उपयोग ४१५) भूतकाळाचे उपयोग
४१६) भविष्यकाळाचे उपयोग ४१७) आज्ञार्थाचे उपयोग
४१८) विध्यर्थाचे उपयोग ४१९) संकेतार्थाचे उपयोग

**प्रकरण २६ : काही धातुसाधित विशेषणांचे उपयोग**

४२०) प्रारंभिक ४२१) कर्तरि व. का. धा. वि. चे उपयोग
४२२) कर्मणि व. का. धा. वि. चे उपयोग
४२३) क. भू. धा. वि. चे उपयोग
४२४) कर्तरि भूत. धातु. विशेषणांचे उपयोग
४२५) वि. क. धा. वि. चे उपयोग

**प्रकरण २७ : ल्यबन्त व तुमन्त यांचे उपयोग**

४२६) ल्यबन्ताचे उपयोग ४२७) तुमन्ताचे उपयोग

**प्रकरण २८ : संवादित्व**

४२८) संवादित्व ४२९) उद्देश्य-क्रियापद - संवाद
४३०) उद्देश्य - विधिविशेषण - संवाद
४३१) उद्देश्य - विधिनाम - संवाद ४३२) विशेषण - विशेष्य - संवाद
४३३) नाम-सर्वनाम - संवाद

**प्रकरण २९ : वाक्ये जोडणे**

४३४) वाक्ये जोडणे
४३५) नामवाक्य जोडणे
४३६) विशेषण वाक्य जोडणे
४३७) क्रियाविशेषण वाक्य जोडणे
४३८) समुच्चयदर्शक वाक्ये जोडणे
४३९) विकल्पदर्शक वाक्ये जोडणे
४४०) विरोधदर्शक वाक्ये जोडणे
४४१) कार्यकारणदर्शक वाक्ये जोडणे
४४२) एकत्र ठेवून वाक्ये जोडणे

**प्रकरण ३० : वाक्यातील शब्दक्रम व वाक्यक्रम**

४४३) वाक्यातील शब्दक्रम
४४४) वाक्यक्रम

**प्रकरण ३१ : विरामचिह्ने व लेखनवैशिष्ट्ये**

४४५) विरामचिन्हे
४४६) लेखनवैशिष्ट्ये

**पुरवणी :** विशिष्ट वाक्यप्रयोग, वाक्ये व काही सुभाषिते

**परिशिष्ट १** { इतर काही प्राकृतांची काहीशी वैशिष्ट्ये
उदाहरणासाठी उपयोजिलेले ग्रंथ व त्यांचे संक्षेप }
(पारिभाषिक संज्ञा : मराठी – इंग्रजी)

# प्रास्ताविक

**१) प्राकृत :**

भारतात पूर्वी प्रचलित असलेल्या अनेक भाषांपैकी अर्धमागधी ही एक प्राकृत भाषा होय. 'प्राकृत' या संज्ञेने कोणत्या भाषा निर्दिष्ट होतात याबद्दल भारतीय प्राकृत-वैयाकरणात मतभेद आहेत. माहाराष्ट्री, पैशाची, मागधी व शौरसेनी या प्राकृत असे वररूचि म्हणतो. आर्ष (म्हणजे अर्धमागधी), चूलिका पैशाची व अपभ्रंश या आणखी प्राकृत म्हणून हेमचंद्र मानतो. तथापि माहाराष्ट्री, शौरसेनी, मागधी आणि पैशाची या प्राकृत याबद्दल सर्वांचे एकमत आहे.[१] सामान्यतः 'माहाराष्ट्री, जैन माहाराष्ट्री, अर्धमागधी, मागधी, शौरसेनी, जैन शौरसेनी, पैशाची (उपभाषा-चूलिका पैशाची) अपभ्रंश (उपभाषा-नगर, उपनागर इ.) यांना प्राकृत हे सामान्य नाव दिले[२] जाते. या सर्व प्राकृत भाषात माहाराष्ट्री ही सर्वात महत्त्वाची असल्याने माहाराष्ट्री ही मुख्य[३] प्राकृत मानली जाते.

**२) प्राकृत म्हणजे काय?**

प्राकृत या शब्दाच्या अर्थाबद्दल विद्वानात दोन पक्ष आहेत :

१) काहींच्या मते, प्राकृत म्हणजे लोकांची मूळची (Original) भाषा. प्रकृति म्हणजे मूळ, काही जण समजतात त्याप्रमाणे प्रकृति-शब्दाने संस्कृत भाषा अभिप्रेत नाही. उलट या प्रकृतीवर संस्कार होऊन संस्कृत भाषा झाली. कारण संस्कृत या शब्दाने संस्कार, सुधारणा, सुव्यवस्थितपणा सूचित होतो. संस्कृत हीच लोकांच्या मूळ-प्राकृत-भाषेतून निर्माण[४] झाली. म्हणजेच सर्वसाधारण जनांच्या ज्या बोलीभाषा त्या प्राकृत[५] होत, त्यावर संस्कार होऊन

---

१ *पिशेल, पृ. १-२ पहा*

२ *वैद्य, पृ. ७ पहा*

३ *महाराष्ट्राश्रयां भाषां प्रकृष्टं प्राकृतं विदुः।। दंडीचा काव्यादर्श*

४ *वैद्य, पृ. ७; व वैद्य संपादित प्राकृतप्रकाश, प्रस्तावना, पृ. ३*

५ *पा. स. म. प्रस्तावना, पृ. ८.९*

संस्कृत[१] झाली. या मताचा थोडक्यात निष्कर्ष हा की संस्कृत भाषा ही प्राकृतचे मूळ नव्हे.

२) याउलट, इतर पंडितांच्या मते, प्राकृत हा शब्द प्रकृति या शब्दापासून साधलेला असून प्रकृति शब्दाने संस्कृत भाषा[२] निर्दिष्ट आहे. म्हणजेच प्रकृति संस्कृतमधून निर्माण झालेली ती प्राकृत होय. हेमचंद्र, मार्कंडेय[३] इत्यादी प्राकृत वैयाकरण व इतर काही विद्वान् यांनी या मताचा पुरस्कार केलेला आहे.

**३) प्राकृतचा अभ्यास :**

वरील मतातील कोणतेही मत खरे असो, भारतीय वैयाकरणांनी[४] केल्याप्रमाणे

---

१ *या दृष्टीने प्राकृत शब्दाची पुढील स्पष्टीकरणे पहावी १) प्रकृत्या स्वभावेन सिद्धं प्राकृतम् । २) प्रकृतीनां साधारणजनानाम् इदं प्राकृतम्। ३) सकल जगज्जन्तूनां व्याकरणादिभिः अनाहितसंस्कारः सहजो वचनव्यापारः प्रकृतिः तत्र भवं सा एव वा प्राकृतम्। आरिसवयणे सिद्धं देवाणं अद्धमागहा वाणी इत्यादी वचनात्, वा प्राक् पूर्वं कृतं प्राक्कृतं बालमहिलादिसुबोधं सकलभाषानिबन्धनभूतं वचनम् उच्यते। पाणिन्यादिव्याकरणोदितशब्दलक्षणेन संस्करणात् संस्कृतम् उच्यते । (रूद्रटकृत काव्यालंकार २.१२ वरील नमिसाधूची टीका)*

२ *संस्कृतरूपायाः प्रकृतेरूत्पन्नत्वात् प्राकृतम्। पावगी, पृ. १४*

३ *१) हेमचंद्र : प्रकृतिः संस्कृतम्। तत्र भवं तत आगतं वा प्राकृतम्। (२) मार्कंडेय : प्रकृतिः संस्कृतम् । तत्र भवं प्राकृतम् उच्यते । (३) (दशरूपक २.६० वर) धनिक : प्रकृतेः आगतं प्राकृतम्। प्रकृतिः संस्कृतम्। (४) प्राकृतचंद्रिका : प्रकृतिः संस्कृतम्। तत्र भवत्वात् प्राकृतं स्मृतम्। (५) षड्भाषाचंद्रिका : प्रकृतेः संस्कृतायाः तु विकृतिः प्राकृति मता। (६) प्राकृतसंजीवनी : प्राकृतस्य तु सर्वम् एव संस्कृतं योनिः।*

४ *प्राकृत शब्दाच्या अधिक स्पष्टीकरणासाठी पहा :*
*के. वा. आपटे 'प्राकृत शब्दाचा अर्थ, मराठी संशोधन ९, मराठी संशोधन मंडळ, मुंबई, १९७७*

५ *उपलब्ध असलेले प्राकृत व्याकरण-ग्रंथ हे संस्कृतमध्येच आहेत, हेही लक्षात ठेवण्यासारखे आहे.*

या प्राकृतांचा अभ्यास संस्कृतच्या[१] संदर्भातच करावयास हवा. या प्राकृतांच्या पुढील विकास विस्तारातूनच आधुनिक भारतीय आर्यभाषा[२] मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती इत्यादी निर्माण झाल्या आहेत. साहजिकच संस्कृत व अर्वाचीन भारतीय आर्यभाषा यांना जोडणारा दुवा म्हणजे प्राकृतभाषा होय हे म्हणणे सयुक्तिकच ठरते. अर्थात् संस्कृत आणि अर्वाचीन भारतीय आर्यभाषा[३] यांच्या संदर्भात प्राकृतांचा अभ्यास करणे योग्य होईल.

### ४) प्राकृत व्याकरण व त्यांचे स्वरूप :

सर्व प्राकृतात माहाराष्ट्री ही अत्यंत महत्त्वाची असल्याने प्राकृत वैयाकरण माहाराष्ट्रीला जास्त प्राधान्य[४] देतात. प्रथमत: ते तिच्या संपूर्ण स्वरूपाचा आविष्कार करतात; मग इतर प्राकृतांचे माहाराष्ट्रीहून जे विशिष्ट[५] भेद आहेत तेवढ्यांचाच ते निर्देश करतात.

हेमचंद्राने (१.२) म्हटल्याप्रमाणे प्राकृतव्याकरणाचे एक मुख्य वैशिष्ट्य म्हणजे ते ‘बहुल’ आहे. म्हणजे व्याकरणात सांगितलेले नियम ढोबळमानाने

---

१ *याचे आणखी एक कारण असे देता येईल. प्राकृतमधील ९५ टक्क्यांपेक्षा अधिक शब्दांचे मूळ संस्कृतमध्ये आढळते.*

२ *या शब्दाने द्रविडी भाषासमूहाची व्यावृत्ति होते.*

३ *प्रस्तुत पुस्तकात मराठीशी संबंध दाखविला आहे.*

४ *पहा : तत्र सर्वभाषोपयोगित्वात् माहाराष्ट्री भाषाऽनुशिष्यते । (मार्कं) सर्वासु भाषास्विह हेतुभूतां भाषां महाराष्ट्रभवां पुरस्तात्। निरूपयिष्यामि यथोपदेश श्रीरामशर्माहमिमां प्रयत्नात् । (रामतर्कवागीश) (पावगी, पृ. ७)*

५ *जरी विविध प्राकृतभाषांतील भेद – ज्यायोगे त्यांचा परस्पर भेद दाखविता येतो. वैयाकरणांनी स्पष्ट करून सांगितलेले आहेत, तरी प्रत्यक्ष लेखनात मात्र लेखकांनी या भेदांची फार कटाक्षाने दखल सदा घेतली असे नाही. त्यामुळे वाङ्मयीन प्राकृत ही भिन्न प्राकृतांच्या वैशिष्ट्यांचे एक अवियोज्य परस्पर मिश्रणच झाली आहे. (घाटगे, पृ. ३)*

लागू होतात; त्यांना अनेक अपवाद[१] इत्यादी असतात.

## ५) अर्धमागधी[२] :

श्वेतांबर जैनांच्या आगमग्रंथाची भाषा अर्धमागधी[३] आहे. संस्कृत ही जशी देवांची[४] भाषा मानली जाते. तद्वत् जैन लोकसुद्धा अर्धमागधीला देवांची[५] भाषा मानतात.

श्वेतांबर जैनांचे काही सूत्रग्रंथ सांगतात की भगवान् महावीर हे अर्धमागधी भाषेत धर्मोपदेश[६] करीत असत आणि अर्धमागधी ही इतकी सुलभ असे की ती पशुपक्ष्यादिकांनाही समजत असे. इतकेच नव्हे तर महावीरांचा धर्मोपदेश ऐकण्यास

---

१ *'बहुल' चे स्पष्टीकरण करताना हेमचंद्र (१.२) म्हणतो. क्वचित् प्रवृत्तिः क्वचिद् अप्रवृत्तिः क्वचिद् विभाषा क्वचिद् अन्यदेव भवति ।*

२ *स्थानांग (पसत्था इसिभासिआ) व अनुयोगद्वार (पसत्था इसिभासिता) या जैन सूत्रग्रंथात अर्धमागधीला 'ऋषिभाषिता' म्हटलेले आहे. हेमचंद्र अर्धमागधीला 'आर्ष' हे नामाभिधान देतो.*

३ *जैनागमग्रंथांची अर्धमागधी म्हणजे संस्कृतनाटकात आढळणारी अर्धमागधी नव्हे, हे भिन्नत्व दाखविण्यास हिला 'जैन अर्धमागधी' असेही म्हणतात. (चौक्षी, पृ. १९) या भाषेला याकोबी 'जैन प्राकृत' म्हणतो तर पं. बेचरदास प्राकृत (= माहाराष्ट्री) म्हणतात. पण जैनागमातील वचनांना अनुसरून या भाषेला अर्धमागधी म्हणणे हे योग्य ठरेल.*

४ *संस्कृतं नाम दैवी वागन्वाख्याता महर्षिभिः। दंडीचा काव्यादर्श १.३३*

५ *देवाणं अद्धमागहाए भासाए भासंति । (भगवतीसूत्र) आरिसवयणे सिद्धं देवाणं अद्धमागहा वाणी। (पासम, प्रस्तावना, प. २१)*

६ *भगवं च णं अद्धमागहीए भासाए धम्ममाइक्खइ । (समवायांग) तए णं समणे भगवं महावीरे ... अद्धमागहाए भासाए भासइ । औपपातिक (पासम प्रस्तावना पृ. १९)*

जमलेल्या सर्वांना समजेल अशा त्या त्या भाषेत[१] परिणत होत असे[२]. असेही जैन धर्मग्रंथात सांगितलेले आहे. आता ही जरी अतिशयोक्ति मानली तरी तिच्या बुडाशी काहीतरी सत्य असावे आणि हे ऐतिहासिक सत्य असे असावे. महावीर हे मगधचे रहिवासी असल्याने त्यांची मातृभाषा मागधी असली पाहिजे. पुढे जेव्हा त्यांनी धर्मोपदेशास सुरवात केली, तेव्हा त्यांना कळून आले असावे की सर्वांना समजण्याइतकी मागधी ही सार्वजनीन नाही. त्या काळी भारतात प्रचलित असलेल्या आर्य (प्राकृत) भाषांत फारसा मोठा फरक नसल्याने, भिन्न भाषिकांना सुद्धा आपला धर्मोपदेश समजावा म्हणून महावीरांनी इतर भाषांचीही (काही) वैशिष्ट्ये मागधीत अंतर्भूत केली असावीत[३]. म्हणजेच मगधानजीकच्या देशात प्रचलित असलेल्या विविध भाषांची काही वैशिष्ट्ये मागधीत अंतर्भूत करून, परंतु त्याचवेळी मागधीची बरीचशी वैशिष्ट्ये तशीच कायम ठेऊन महावीराने मागधीला सार्वजनीन करण्याचा प्रयत्न केला असावा आणि मग या भाषेला अर्धमागधी हे नाव[४] मिळाले असावे; कारण ही भाषा संपूर्ण मागधी नव्हती तर अंशतः[५] होती. ***'या मागधी नाम भाषा रसोर्लशौ मागध्यां इत्यादी लक्षणवती***

---

१ *देवेन्द्र या टीकाकाराने उद्धृत केलेला श्लोक पहा.*
*देवा दैवीं नरा नारीं शबराश्चापि शाबरीम्।*
*तिर्यञ्चोऽपि च तैरश्चीं मेनिरे भगवद्गिरम्।।*

२ *सा वि य ण अद्धमागही भासा भासिज्जमाणी तेसिं सव्वेसिं आरियमणारियाणं दुप्पयचउप्पयमित्तपसुपक्खिसरीसिवाणं अप्पप्पणो हियसिवसुहदाय भासत्ताए परिणमइ । (समवायांग) सा वि य णं अद्धमागहि तेसिं सव्वेसिं आरियमणारियाणं अप्पणो सभासाए परिणामेणं परिणमइ (औपपातिक), तसेच सर्वार्धमागधीं सर्वभाषासु परिणामिनीम् (वाग्भट काव्यानुशासन), जयइ जिणिंदाण असेसभासापरिणामिणी वाणी। (हेमचंद्रकृत दे. ना. मा. १.१)*

३ *जैन, पृ. ३९*

४ *'अट्ठारसदेसीभासाणिययं वा अद्धमागहं' हे जिनदासगणीचे वचन या सार्वजनीनत्वाला पुष्टिकारक आहे.*

५ *पटवर्धन, पृ. ६५*

***सा असमाश्रितस्वकीयसमग्रलक्षणा अर्धमागधी इति उच्यते,'*** हे अभयदेवांचे वचन या म्हणणाऱ्या पुष्टिकारक आहे.[१]

### ६) अर्धमागधी या नावाचे स्पष्टीकरण

वरील विवेचनाच्या अनुरोधाने, 'मागधीचे अर्धे स्वरूप जिच्यात आहे.' (अर्धं मागध्याः) ती अर्धमागधी, असे अर्धमागधी या शब्दाचे एक स्पष्टीकरण दिले[२] जाते. ***'अर्धमागधी भाषा यस्यां रसोर्लशौ मागध्यां इत्यादिकं मागधभाषालक्षणं परिपूर्णं नास्ति.'*** हे अभयदेवाचे वचन याला पुष्टिदायक आहे. अर्धमागधी या नावाचे दुसरे एक स्पष्टीकरण असे दिले जाते. 'अर्ध्या मगध देशात प्रचलित असलेली ती अर्धमागधी.'

***'मगहद्धविसयभासाणिबद्धं अद्धमागहं,'*** हे जिनदासगणीचे वचन याला पुष्टीदायक[३] आहे.

### ७) अर्धमागधी व माहाराष्ट्री :

परंतु उपलब्ध जैनागम ग्रंथात अर्धमागधीचे जे स्वरूप दिसते. त्याचे मागधीपेक्षा माहाराष्ट्रीशीच अधिक साधर्म्य आढळते. याची कारणे अशी दिली जातात.

१) इ. स. पूर्वी ३१० च्या सुमारास मगधात १२ वर्षे मोठा दुष्काळ पडला. त्यावेळी बरेच जैन साधु दक्षिणेत आले. यावेळी सूत्रग्रंथाचा अभ्यास अशक्य झाल्याने पुष्कळसा भाग विसरला गेला. पुढे दुष्काळ संपल्यावर पाटलिपुत्रात

---

१ *हेमचंद्रसुध्दा (४.२८७) म्हणतो : यदपि पोराणमद्धमागहभासानिययं हवइ सुत्तं इत्यादिना आर्षस्य अर्धमागधभाषानियतत्त्वं ऑम्नायि वृध्दः तदपि प्रायः अस्यैव विधानात् न वक्ष्यमाणलक्षणस्य।*

२ *मध्य असंयुक्त र् चा ल् होणे, अकारान्त पुल्लिंगी शब्दांचे प्रथमा ए. व. एकारान्त असणे, ह्या अर्धमागधीत आढळणाऱ्या मागधीच्या लक्षणापुरते हे स्पष्टीकरण बरोबर ठरेल.*

३ *महावीरांचे भ्रमण व जैन धर्माचा उत्तरकालीन इतिहास यांची आपणास जी माहिती आहे, त्यावरूनही हे स्पष्टीकरण संभवनीय ठरते.* (घाटगे पृ. ३)

अकरा अंगग्रंथांचे संकलन करण्यात आले. दक्षिणेत आलेल्या साधूंवर इतकेच नव्हे तर त्यांच्या कंठस्थित सूत्रभाषेवरसुद्धा माहाराष्ट्रीचा प्रभाव पडला असावा. यांतील काही साधु पाटलिपुत्राच्या संमेलनात उपस्थित होते. साहजिकच संकलित अंगग्रंथांवर माहाराष्ट्रीचा प्रभाव पडला असावा[१]. २) माहाराष्ट्री ही फार पूर्वीपासून वाङ्मयाची भाषा झालेली होती व तीने इतर देशी (Vernacular) भाषांवर वर्चस्व मिळविले होते. साहजिकच आपली भाषा माहाराष्ट्रीशी जितकी जुळती करता येईल तितकी जुळती करण्याचे कुणीही पसंत केले[२] असते.

कारण काहीही असो अर्धमागधी ही माहाराष्ट्रीला बरीच जवळ आहे यात शंका नाही. 'आपल्या प्राकृत व्याकरणात हेमचंद्र अर्धमागधीचे स्वतंत्रपणे विवेचन करीत नाही, याचेही कारण हेच[३] असावे. एवं च भाषा या दृष्टीने अर्धमागधी ही प्राधान्याने माहाराष्ट्री[४] आहे[५]. तसेच मागधीची अगदी थोडी वैशिष्ट्ये अर्धमागधीत सापडतात[६]. आता अर्धमागधी ही जरी प्रामुख्याने माहाराष्ट्री आहे तरी त्रिविक्रमाने म्हटल्याप्रमाणे (स्वतंत्रत्वाच्च भूयसा।) जे माहाराष्ट्रीत आढळत नाही असे अर्धमागधीचे स्वतःचे असे बरेच आहे[७].

---

*१) पा. स. म., प्रस्तावना, पृ. १९-२०, २७*

*२) जैन, पृ. ४०*

*३) पटवर्धन, पृ. ६६ माहाराष्ट्रीहून अर्धमागधीची जी महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत, तेवढीच हेमचंद्र देतो.*

*४) माहाराष्ट्रीमिश्रा अर्धमागधी । क्रमदीश्वर*

*५) वैद्य, पृ. ८*

*६) वूल्नरच्या मते (पृ. ६) शूरसेन व मगध यामधील प्रदेशातील भाषेवर अर्धमागधी ही आधारलेली आहे. डॉ. गुणे (प. २१६) म्हणतात की अर्धमागधी ही शौरसेनी व मागधी यामधील भाषा असल्याने तिच्यात या दोहोंचीही वैशिष्ट्ये आढळतात.*

*७) प्रस्तुत ग्रंथात डॉ. घाटगे (पृ.४) यांनी केल्याप्रमाणे, अर्धमागधी व जैन माहाराष्ट्री या दोहोंचे स्वरूप एकत्रपणे सांगितले आहे. 'जैन माहाराष्ट्री' या नावाने एखाद्या प्राकृत भाषेचा निर्देश भारतीय प्राकृत-वैयाकरण करीत*

**८) अर्धमागधी व्याकरणाचे स्वरूप :**

प्राकृत व्याकरणाचे 'बहुलत्व' हे जे वैशिष्ट्य परि. ४ मध्ये उल्लेखिले आहे, ते अर्धमागधी व्याकरणालाही लागू पडते. हेमचंद्र सांगतो **'आर्षं प्राकृतं बहुलं भवति।'** (१.३) आणि माहाराष्ट्री-व्याकरणाचे सर्व नियम अर्धमागधीत विकल्पाने लागतात. (आर्षे हि सर्वे विधयो विकल्प्यन्ते। हेम १.३)[१]

---

*नाहीत. परंतु व्याकरण, काव्य, नाटक इत्यादीत माहाराष्ट्रीचे जे स्वरूप दिसते त्याहून श्वेतांबर जैनांच्या प्राकृतभाषेच्या स्वरूपाचे काही भेद लक्षात घेऊन आधुनिक पाश्चात्य विद्वानांनी श्वेतांबर जैनांच्या ग्रंथभाषेला 'जैन माहाराष्ट्री' हे नाव दिले आहे. (पा स. म. प्रस्तावना, पृ. ३२) 'जिला प्राकृत-पंडित जैन माहाराष्ट्री म्हणतात. ती आगम - भाषेचेच (canonical language) अखंडित चलन (Unbroken countinuation) होय. (घाटगे पृ ४) 'प्राकृत व्याकरणात सांगितलेली माहाराष्ट्रीची लक्षणे तसेच अर्धमागधीची काही वैशिष्ट्ये जैन माहाराष्ट्रीत आढळतात (पा स. म. प्रस्तावना, पृ. ३२) तीर्थंकरांची चरित्रे, प्राचीन मुनींची चरित्रे, कथा, दर्शन, तर्क, ज्योतिष, भूगोल इत्यादी विषयांवरील ग्रंथ तसेच निर्युक्ति, भाष्ये, चूर्णी व टीकाग्रंथ हे जैन माहाराष्ट्रीत आहेत. उदा. पउमचरिय, उपदेशमाला, निशीथचूर्णी, धर्मसंग्रहणी, समराइच्चकहा, सुपासनाहचरिअ इ. (पा स. म., प्रस्ता, पृ. ३२ पहा)*

१ *''It (= आर्ष) can not be brought under strict rules and all its rules are only permissive, not compulsory"*
*होएर्न्ले संपादित चंडकृत प्राकृतलक्षण, प्रस्तावना पृ. १८*

*प्राकृत शब्दाचा वापर कसा प्रचारात आला असावा याबद्दल इटलीतील मिलान विद्यापीठाचे एक प्राध्यापक विट्टोर पिसानी (Vittore Pisani) (बेलवलकर फेलिसिटेशन[१] व्हॉल्यूम पृ. १८५-१८९) यांनी पुढील उपपत्ति सुचविली आहे. 'एकाच वेळी अनेक भाषांचा ज्यात उपयोग केला जाई असा वाङ्मयप्रकार फक्त एकच. तो म्हणजे नाटक.*

## ९) प्रस्तुत व्याकरणातील वर्ण्य विषय

सोईसाठी व्याकरणातील वर्ण्य विषयाचे पाच विभाग पाडता येतात. ते असे १) भाषेचा उपयोग बोलणे, लिहिणे व वाचणे यासाठी होतो. या तीनही बाबतीत संपूर्ण अर्थबोध होण्यास वाक्यांची गरज असते. परस्परसंबंधयुक्त अशा अनेक[१] शब्दांनी वाक्य[२] बनते. शब्द हे एक किंवा अनेक[३] अक्षरांच्या एकत्र येण्याने सिद्ध

---

*नाटकात देव, राजे, ब्राह्मण (इत्यादी अ–नीच पात्रे) संस्कृत बोलतात, इतर (नीच) पात्रे (संस्कृतेतर) प्राकृत बोलतात. नाटकात जे जे लोक प्राकृत बोलतात ते सर्व लोक दर्शविण्यास संस्कृत भाषेत एक शब्द आहे तो म्हणजे 'प्रकृति'. प्रकृति शब्दाने राजाचे प्रजाजन, नागरिक इत्यादी तसेच स्त्रिया निर्दिष्ट होतात. 'प्रकृति' मध्ये ब्राह्मण व क्षत्रिय यांचा मात्र अंतर्भाव होत नाही. अशा प्रकारे स्त्रिया, प्रजाजन यांची भाषा 'प्राकृत' या शब्दाने दर्शविली जाऊ लागली.'*

*प्राकृत शब्द कसा प्रचारात आला असावा याबाबत पुढीलप्रमाणे आणखी एक उपपत्ती देता येईल : संस्कृत व प्राकृत हे दोन्ही शब्द उपसर्ग सहित 'कृ' या धातूची क. भू. धा. वि. आहेत. संस्कृत (सं.+कृ) म्हणजे (व्याकरण इत्यादींनी) शुध्द केलेली (भाषा) व प्राकृत (प्र+आ+कृ) म्हणजे फार (प्र.) विरूद्ध (म्हणजे भिन्न) (आ) केलेली भाषा तेव्हा संस्कृतपासून काही भाषांचे भिन्नत्व दाखविण्यास 'प्राकृत' या शब्दाचा वापर सुरू झाला असावा. साहजिकच प्राकृत म्हणजे संस्कृततेतर भाषा हा अर्थ पुढे बराच रूढ झाला.*

१ *कधी एका शब्दानेही वाक्य होऊ शकते. उदा. जा, ये, बैस, पड इ.*

२ *वाक्यं स्याद् योग्यताकाङ्क्षासक्तियुक्तः पदोच्चयः।* ***साहित्यदर्पण***

३ *केवल स्वर किंवा व्यंजनयुक्त स्वर ह्यास अक्षर म्हणतात. मध्ये स्वर नसताना पण अन्ती असता दोन (वा अधिक) व्यंजने एकत्र येऊन संयुक्ताक्षर वा जोडाक्षर होते.*

होतात. या अक्षरांचाही घटक[१] वर्ण आहे. वर्ण दोन प्रकारचे आहे. १) स्वर : ज्यांचा पूर्ण उच्चार करताना इतर कोणत्याही वर्णाचे साहाय्य लागत नाही, त्यांना स्वर म्हणतात. म्हणजेच स्वरांचा उच्चार स्वयंपूर्ण असतो. २) व्यंजन : ज्यांचा पूर्ण उच्चार[२] होण्यास स्वरांची आवश्यकता असते, त्यांना व्यंजन म्हणतात. हे वर्ण कोणते व किती, त्यांचा उच्चार कसा करावयाचा, इत्यादीचा विचार पहिल्या भागात येईल. तसेच कित्येकदा जवळ असणाऱ्या वा आलेल्या वर्णांचा काही विशिष्ट परिस्थितीत संयोग होतो, त्याला संधि म्हणतात. या संधिचाही विचार पहिल्या भागात येईल. आता, अर्धमागधीतील वर्ण वा शब्द संस्कृतमधून येताना कोणते विकार पावून येतात. हे पाहणेही महत्त्वाचे आहे. या वर्णविकारांचा विचारही पहिल्या भागात करावयाचा आहे. २) शब्दांचा वाक्यात उपयोग होत असता काही शब्दात विकार व्हावे लागतात. या शब्दांना विकारी शब्द म्हणतात. हे विकारी शब्द म्हणजे नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद हे होत या विकारी शब्दांची रूपे कशी व कोणती होतात, हा भाग 'रूपविचार' या दुसऱ्या विभागात येईल. ३) भाषेचा शब्दसंग्रह इतर शब्दांवरून आणखी काही शब्द साधून वाढविला जातो. हे साधित शब्द कसे साधिले जातात. हा विचार 'साधितशब्दसिध्दी' या तिसऱ्या विभागात येईल. ४) संस्कृत व प्राकृत भाषांच्या व्याकरणात समासांचा स्वतंत्रपणे विचार करणे आवश्यक आहे. हा 'समासविचार' चौथ्या विभागात केला आहे. ५) पूर्ण अर्थबोध होण्यास वाक्यांची जरूरी असते, असे वर म्हटले आहे. वाक्यातून पूर्ण अर्थबोध होण्यास वाक्यात वापरलेल्या शब्दांचा योग्य तो परस्पर संबंध राखणे आवश्यक असते. तसेच

---

१ *वास्तविक शब्द हे ध्वनिरूप आहेत. म्हणून त्यांचे स्वरूप श्रवणग्राह्य आहे. तथापि, डोळ्यांना दिसणाऱ्या काहीतरी खुणांनी लेखनात त्याचे रूप दाखविले जाते. लेखनातील या ध्वनींच्या खुणा किंवा चिह्न म्हणजेच वर्ण होत.*

२ *केवल व्यंजनाचा उच्चार पूर्ण नसल्याने केवळ व्यंजने लेखनात दर्शविताना त्यांच्याखाली एक – असा तिरका फाटा काढतात (त्याचे पाय मोडतात) उदा. क्, ख् इ. व्यंजनात स्वर मिसळला की हा तिरका फाटा काढून टाकतात. उदा. क्+अ=क, ग्+ई=गी इ.*

विविध विभक्ती, वचन, काळ, अर्थ इत्यादींतील कोणाचा उपयोग केव्हा व कसा करावयाचा हेही जाणून घेतले पाहिजे. त्याचप्रमाणे प्रयोग कोणते व किती, विरामचिन्हे कोणती, व त्याचा कसा उपयोग करावयाचा इत्यादी माहित असणे आवश्यक आहे. या सर्वांचा विचार 'वाक्यविचार' या पाचव्या विभागात केलेला आहे.

प्रकरण १

# अर्धमागधी वर्णमाला

## १० वर्णमाला

अर्धमागधीतील वर्णमाला ही संस्कृतवरुनच घेतलेली आहे. तथापि संस्कृतमधले काही वर्ण अर्धमागधीत नाहीत, तसेच काही नवीन वर्णही अर्धमागधीत आढळतात.

अर्धमागधीतील वर्ण पुढीलप्रमाणे आहेत –

**स्वर**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ह्रस्व | अ | इ | उ | ए | ओ |
| दीर्घ | आ | ई | ऊ | ए | ओ |

**व्यंजने**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| क वर्ग | क् | ख् | ग् | घ् | (ङ्) |
| च वर्ग | च् | छ् | ज् | झ् | (ञ्) |
| ट वर्ग | ट् | ठ् | ड् | ढ् | ण् |
| त वर्ग | त् | थ् | द् | ध् | न् |
| प वर्ग | प् | फ् | ब् | भ् | म् |
| अंतस्थ | य् | र् | ल् | व् | |
| ऊष्म | स् | | | | |
| महाप्राण हकार | ह् | | | | |
| अनुस्वार[1] | —ं— | | | | |

१ अनुनासिक —ँ—

वरील माहिती कोष्टकरूपाने पुढीलप्रमाणे सांगता येईल–

**स्वरकोष्टक**

| | सजातीय | | | संयुक्त | |
|---|---|---|---|---|---|
| ह्रस्व | अ | इ | उ | ए | ओ |
| दीर्घ | आ | ई | ऊ | ए | ओ |

**व्यंजनकोष्टक**

| | वर्ग | व्यंजने | | | | अनुनासिके |
|---|---|---|---|---|---|---|
| स्पर्श वर्ण | क वर्ग | क् | ख् | ग् | घ् | (ङ्) |
| | च वर्ग | च् | छ् | ज् | झ् | (ञ्) |
| | ट वर्ग | ट् | ठ् | ड् | ढ् | ण् |
| | त वर्ग | त् | थ् | द् | ध् | न् |
| | प वर्ग | प् | फ् | ब् | भ् | म् |
| अंतस्थ | | य् | र् | ल् | व् | |
| ऊष्म | | स् | | | | |
| महाप्राण | | ह् | | | | |

## ११ वर्णोच्चार

मानवदेहातील स्वरयंत्राच्या काही विशिष्ट स्थानांतून हे वर्ण उच्चारले जातात. त्या त्या उच्चारस्थानानुसार या वर्णांना काही विशिष्ट संज्ञा दिलेल्या आहेत. कोणते वर्ण कोणत्या स्थानातून उच्चारले जातात व त्यांच्या संज्ञा कोणत्या, ही माहिती पुढील कोष्टकात दिली आहे.

**वर्णोच्चारस्थान – संज्ञादर्शक कोष्टक**

| उच्चारस्थान | वर्ण | संज्ञा |
|---|---|---|
| कंठ | अ, आ, कवर्गीय व्यंजने, ह् | कण्ठ्य |
| तालु | इ, ई, चवर्गीय व्यंजने, य् | तालव्य |
| मूर्धा | टवर्गीय व्यंजने, र् | मूर्धन्य |

| | | |
|---|---|---|
| दंत | तवर्गीय व्यंजने, ल्, स् | दन्त्य |
| ओष्ठ | उ, ऊ, पवर्गीय व्यंजने | ओष्ठ्य |
| कंठतालु | ए | कण्ठतालव्य |
| कंठौष्ठ | ओ | कण्ठौष्ठ्य |
| दंतौष्ठ | व् | दन्तौष्ठ्य |
| नासिका | (ङ् ञ्) ण् न् म् (अनुस्वार) | नासिक्य |

## १२ वर्णांबद्दल सामान्य विचार

(अ) वर्ण उच्चारताना कमी–जास्त जोर वापरावा लागतो. ज्यांचा उच्चार करण्यास कमी जोर लागतो त्यांना अल्पप्राण म्हणतात व ज्यांचा उच्चार करण्यास अधिक जोर लागतो त्यांना महाप्राण म्हणतात. सर्व स्वर, सर्व अंतस्थवर्ण, प्रत्येक वर्गातील पहिली व तिसरी व्यंजने आणि सर्व अनुनासिके ही सर्व अल्पप्राण होत उरलेली व्यंजने महाप्राण[१] होत. (आ) स्वर हे ह्रस्व किंवा दीर्घ असतात. त्यांचा उच्चार करण्यास लागणाऱ्या कमी–जास्त वेळावरुन स्वर ह्रस्व अथवा दीर्घ[२] ठरतात. (इ) प्रत्येक वर्गातील पाचहि व्यंजनांना 'स्पर्श' ही सामान्य संज्ञा आहे व प्रत्येक वर्गातील शेवटच्या पाचव्या व्यंजनाला 'अनुनासिक' अशी विशेष संज्ञा आहे.

## १३ अर्धमागधीतील वर्णांबद्दल अधिक विचार

(१) अर्धमागधीत ए व ओ हे स्वर ह्रस्व तसेच दीर्घ आहेत. ए आणि ओ यांचेपुढे जोडाक्षर असता त्यांचा उच्चार ह्रस्व[३] होतो. (२) ङ् व ञ् ही अनुनासिके स्वरसंयुक्त (म्हणजे ङ, ञ अशी) वा स्वतंत्रपणे (ङ्, ञ् अशी) अर्धमागधीत आढळत नाहीत, पण अनुक्रमे कवर्गीय व चवर्गीय व्यंजनांच्या मागे त्यांना जोडून येऊ शकतात (ङञौ स्ववर्ग्यसंयुक्तौ भवत एव । हेम. १.१) उदा. सिङगार, अङग; अञ्जलि, विञ्झ; इत्यादी. (३) अर्धमागधीत अनुस्वार व अनुनासिक दोन्हीही आहेत. अनुस्वाराने ह्रस्व अक्षर दीर्घ होते. (४) स्वररहित केवळ[६] व्यंजने अर्धमागधीत शब्दांच्या अन्त्यस्थानी राहू शकत नाहीत[७]. (५) ङ्, ञ, ण्, न् यांच्यापुढे व्यंजन (आल्यास वा) असल्यास त्याबद्दल अनुस्वार लिहितात.[८] (६) शब्दातील अन्त्य मकाराचा अनुस्वार केला जातो[९]. (७) 'य' आणि

'यश्रुति'[१०] मुळे लिहिला जाणारा 'य' यातील भेद लेखनात दाखविला जात नाही. (८) अ आणि आ खेरीज इतर कोणत्याही स्वराशी संयुक्त असलेला 'य' न लिहिता नुसता स्वरच[११] लिहिला जातो. उदा. य, या, इ (यि), ई (यी), उ (यु), ऊ (यू), ए (ये), ओ (यो), यं.

---

## तळटीपा

*१) वा. वें. आपटे, पृ. ९ पहा.*

*२) ह्रस्व स्वर वा ह्रस्व स्वरयुक्त व्यंजन यांची एक मात्रा व दीर्घ स्वर अथवा दीर्घस्वरयुक्त व्यंजन यांच्या दोन मात्रा मानतात.*

*३) जेव्हा ए आणि ओ हे स्वर ह्रस्व असतात तेव्हा त्यांच्याबद्दल कधी कधी अनुक्रमे ह्रस्व इ व उ हे स्वर लिहिले जातात. काही मुद्रित पुस्तकात ह्रस्व ए हा ऍ आणि ह्रस्व ओ हा ओ॒ याप्रमाणे दर्शविले गेलेले आढळतात.*

*४) अनुस्वार म्हणजे एखाद्या अक्षरावर दिलेला बिंदू त्या अक्षराच्या उच्चारानंतर अनुस्वाराचा उच्चार होतो.*

*५) विशिष्ट ठिकाणी अनुस्वार आहे की अनुनासिक आहे, हे पद्यपंक्तीच्या आधारे ठरते, म्हणजे जर दीर्घ अक्षर हवे असेल तर सानुस्वार उच्चार करावयाचा; ह्रस्व अक्षर हवे असल्यास सानुनासिक उच्चार करावयाचा.*

*६) अस्वरं व्यञ्जनं.... न भवति / हेम. १.१.*

*७) शब्दान्ती फक्त 'म्' हा अनुस्वाराच्या रूपात राहू शकतो.*

*८) ङञणनो व्यञ्जने । ङ्, ञ्, ण्, न् इत्येतेषां स्थाने व्यञ्जने परे अनुस्वारो भवति । हेम. १.२५*

*९) मोनुस्वार: । अन्त्यमकारस्य अनुस्वारो भवति । हेम. १.२३*

*१०) 'यश्रुति'साठी परि. ६० पहा.*

*११) म : कधी - गाईला, गाईंचा ('गाय' शब्दाची रुपे), 'पाईं-पाईं' (पाय शब्दाचे रूप).*

(९) यश्रुतीने येणाऱ्या य् चा उच्चार लघु प्रयत्नाने उच्चारलेल्या 'य्' प्रमाणे होतो (लघुप्रयत्नतर यकार).

(१०) अर्धमागधीतील इतर वर्णांचा उच्चार संस्कृतमधील वर्णांप्रमाणेच होतो.

## १४ संस्कृत व अर्धमागधी वर्णांचा तौलनिक विचार

(१) संस्कृतमधील ऋ, ॠ, ऌ, ऐ व औ हे स्वर अर्धमागधीत नाहीत. (२) श् व ष् हे दोन ऊष्मवर्ण अर्धमागधीत नाहीत. (३) तसेच [१]विसर्ग (:) ही अर्धमागधीत नाही.

(२) ह्रस्व ए आणि ओ हे दोन स्वर अर्धमागधीत अधिक आहेत. (२) आणि ण्ह, (न्ह), म्ह, ल्ह ही महाप्राण-हकारयुक्त अक्षरे अर्धमागधीत अधिक आहेत.

## १५ अर्धमागधीतील जोडाक्षरे

अन्ती किंवा मध्ये स्वर नसून एकत्र जुळलेल्या व्यंजनांच्या योगास संयुक्त व्यंजन म्हणतात. (उदा. क्क्, ट्ट्, प्प्, ब्ब्, इ.); ह्या संयोगात अन्तीं स्वर मिळाला म्हणजे संयुक्ताक्षर किंवा जोडाक्षर होते. (उदा. क्क, ट्टा, प्पि, ब्बू, इ.)

अर्धमागधीतील जोडाक्षरे काही विशिष्ट[२] पद्धतीनेच सिद्ध केली जातात.

अर्धमागधीतील जोडाक्षरे पुढीलप्रमाणे आहेत -

**अर्धमागधीतील जोडाक्षरांचा तक्ता**

| | अनुनासिकरहित | | | | अनुनासिकसहित | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | क्क | क्ख | ग्ग | ग्घ | ङ्क | ङ्ख | ङ्ग | ङ्घ | x |
| र्गी | च्च | च्छ | ज्ज | ज्झ | ञ्च | ञ्छ | ञ्ज | ञ्झ | x |
| य | ट्ट | ट्ठ | ड्ड | ड्ढ | ण्ट | ण्ठ | ण्ड | ण्ढ | ण्ण |
| व्यंजने | त्त | त्थ | द्द | द्ध | न्त | न्थ | न्द | न्ध | न्न |
| | प्प | प्फ | ब्ब | ब्भ | म्प | म्फ | म्ब | म्भ | म्म |
| अंतस्थ | ल्ल | व्व | | | | | | | |
| ऊष्म | स्स | | | | | | | | |
| हकार | x | | | | ण्ह | (न्ह) | म्ह | ल्ह | |

१. *विसर्ग हा वास्तविक स्वतंत्र असा वर्ण नाहीच. विसर्ग हा स् अथवा र् यांचा एक विकार आहे.*

२. *या पद्धतीची माहिती परि. ८१ मध्ये पहावी.*

## १६ अर्धमागधीतील जोडाक्षरांविषयी अधिक विचार

(१) अर्धमागधीतील जोडाक्षरात फक्त दोनच व्यंजने असतात. संस्कृतप्रमाणे दोनापेक्षा अधिक व्यंजनांची जोडाक्षरे अर्धमागधीत नाहीत. (२) अर्धमागधीत शब्दांच्या आद्य[1] स्थानी जोडाक्षर चालत नाही. (पदादौ द्वित्वं न भवति । चंड. ३.२८). तसेच शब्दांच्या अंतीही (जसे केवळ व्यंजन चालत नाही तसे) स्वररहित संयुक्तव्यंजन चालत नाही. शब्दांच्या मध्यस्थानी तेवढे जोडाक्षर चालते. (३) अर्धमागधीत अनुस्वारापुढे संयुक्त व्यंजन चालत नाही (न दीर्घानुस्वारात् । हेम. २.९२). त्यामुळे विन्ध्य, सन्ध्या इत्यादींचे वर्णविकार झाल्यावर फक्त विंझ, संझा असे शब्द चालतात.

---

१. ''ख घ थ ध फ भ ही सर्व प्राकृतात क् + ह, ग् + ह, त् + ह, द् + ह, प् + ह, ब् + ह याप्रमाणे (हकाराची) संयुक्त व्यंजनेच मानली जातात.'' (वैद्य, पृ. १६). तद्वत् ण्ह (न्ह), म्ह, ल्ह हीहि ण् (न्), म्, ल् यांची हकारयुक्त संयुक्त व्यंजनेच आहेत (साहजिकच त्यांच्यामागे असणारा दीर्घ स्वर ह्रस्व झालेला आढळतो. उदा. आह्लाद – अल्हाय, ग्रीष्म – गिम्ह इ.). तथापि ती अर्धमागधीत शब्दारंभी चालतात. उदा. ण्हाउ (स्नायु), म्हो (स्मः), ल्हसुण (लशुन) तसेच क्वचित् 'ह्व' हेहि शब्दारंभी अर्धमागधीत चालते. (परि. १०४ व तळटीप पहा); असे दिसते.

**प्रकरण २**

# वर्णविकार (शब्दसाधनिका) : प्रास्ताविक

## १७ अर्धमागधी शब्दसाधनिका

वाक्यांचे घटक शब्द होत. अर्धमागधीतील शब्दसाधनिकेचा विचार (वर्णविकार[१]-विचार) म्हणजे संस्कृतमधून अर्धमागधीत शब्द घेतले जात असता त्यात कसेकसे व कोणते विकार होतात याचा विचार करावयाचा. तत्पूर्वी अर्धमागधीतील शब्दसंग्रहाचे स्वरूप काय आहे ते पाहिले पाहिजे.

## १८ अर्धमागधी शब्दसंग्रह

अर्धमागधीतील शब्द तीन प्रकारात विभागता येतात : (१) **देश्य[२] वा देशी शब्द :** ज्यांची व्युत्पत्ति वा मूळ संस्कृतमध्ये सापडत नाही, असे शब्द देशी होत. असे शब्द अर्धमागधीत फार थोडे आहेत. काही देशी[३] शब्द असे : उडिद (उडीद), कोलित्त (कोलीत), खट्टिक्क (खाटीक), गवत्त (गवत), गड्डी (गाडी), कोल्हुअ (कोल्हा), टोल (टोळ), डुंगर (डोंगर), पोट्ट (पोट), बाउल्ली (बाहुली), बप्प (बाप), रंजण (घट, रांजण). (२) **तत्सम (संस्कृतसम) :** पुष्कळ संस्कृत शब्द काही फरक न पावता जसेच्या तसे अर्धमागधीत येऊ शकतात. अशा शब्दांना तत्सम म्हणतात. उदा. कमल, विमल, चित्त, चिंता, देव, देवी, सुर, असुर, नर, पर, जल, इच्छा, फल, मही, राम इ. (३) **तद्भव (संस्कृतभव) :** अर्धमागधीतील बहुसंख्य शब्द संस्कृत शब्दात विकार होऊन सिद्ध झाले आहेत; त्यांना तद्भव म्हणतात. उदा. केस (केश), दहि (दधि), लहु (लघु), सालि (शालि), वड (वट), लिंब (निंब), भाउ (भ्रातृ), बहिर (बधिर), घड (घट) इ.

**१९ वर्णान्तर**

अर्धमागधीतील शब्दसाधनिकेचा विचार करताना देशी व तत्सम शब्दांचा विचार करण्याचे प्रयोजन नाही, पण बहुसंख्य तद्भव शब्दांचा विचार करणे हे अत्यावश्यक आहे.

मूळ संस्कृतशब्दातील वर्णात काहीतरी बदल, फरक, परिवर्तन, विकार होऊन तद्भव शब्द सिद्ध होतात. हे विकार एक वा अनेक स्वर किंवा व्यंजने यामध्ये अथवा स्वर आणि व्यंजने या दोहोंतही घडून येऊ शकतात. साहजिकच वर्णविकारात (१) स्वरविकार व (२) व्यंजनविकार असे दोन मुख्य भाग पडतात.

या दोहोंचा आता क्रमशः विचार केला आहे.

---

**तळटीपा**

१) *वर्णविकारांचा विचार हा प्रामुख्याने भाषेच्या शब्दसंग्रहाला धरून असतो. त्याचा आधार व्युत्पत्ति व त्यायोगे पूर्वस्थितीतून नवस्थितीत येताना ध्वनीत कसकसा बदल, फरक, विकास, विकार झाला हे शोधले जाते. अर्धमागधीतील वर्णविकारांचा विचार म्हणजे पूर्व – संस्कृत – स्थितीतून नव–अर्धमागधी स्थितीत येताना ध्वनि कसे बदलत गेले याचा विचार होय.*

२) *देश्य प्राकृतबद्दल मार्कंडेय म्हणतो – लक्षणैरसिद्धं तत्तद्देशप्रसिद्धं महाकवि प्रयुक्तं लडह–पेट्ट–तोक्ख आदि । यदाह भोजदेवः – देशे देशे नरेन्द्राणां जनानां च स्वके स्वके ।*
*भङ्ग्या प्रवर्तते यस्मात्तस्माद्देश्यं निगद्यते ।। मार्कंडेय १.३ पहा.*
*दे.ना.मा. १.३ मध्ये हेमचंद्र म्हणतो :*
*जे लक्खणे ण सिद्धा ण पसिद्धा सक्कयाहिहाणेसु ।*
*ण य गउणलक्खणासत्तिसंभवा ते इह णिबद्धा ।।*

३) *हे शब्द हेमचंद्रकृत ‘देशीनाममाला’ वरून घेतले आहेत.*

**प्रकरण ३**

# स्वरविकार

## २० स्वरविकारांचे स्वरूप

संस्कृत शब्द अर्धमागधीत येताना त्यातील स्वरात होणाऱ्या विकारांचे दोन मुख्य भाग पडतात : (१) संस्कृत वर्णमालेतील जे स्वर – ऋ, ॠ, ऌ, ऐ व औ – अर्धमागधीत नाहीत अशा स्वरात होणारे विकार. (२) हे स्वर सोडून इतर स्वर – जे अर्धमागधीतही आहेत – संस्कृत शब्दात असताना त्यात होणारे विकार.

याखेरीज, स्वरविकारात आणखी एक प्रकारच्या विकारांची दखल घेतली पाहिजे : कधी ह्रस्व स्वर दीर्घ केले जातात, तर कधी दीर्घ स्वर ह्रस्व केले जातात.

अशाप्रकारे स्वरविकारात तीन प्रकारच्या विकारांचा विचार करावयाचा आहे.

## २१ ऋ, ॠ, ऌ, ऐ, औ यांचे विकार

ऋ, ॠ, ऌ, ऐ व औ हे स्वर अर्धमागधीत नसल्याने ज्या संस्कृत शब्दात हे स्वर आहेत ते शब्द अर्धमागधीत येताना या स्वरात विकार होऊन या स्वरांबद्दल अर्धमागधीत असलेले इतर स्वर वा अक्षरे किंवा स्वर आणि अक्षरे दोन्ही येतात. विशेष म्हणजे एकाच शब्दात एकाच स्वराचे कधी कधी अनेक विकार होतात.

## २२ ह्रस्व ऋ चे विकार : (नियमित)

संस्कृतशब्दातील ह्रस्व ऋ चे स्थानी अ, इ, उ किंवा रि हे वर्ण येतात.

केव्हा कोणता वर्ण येईल याबद्दल निश्चित नियम सांगता येत नाही. वाङ्मयीन प्रयोगावरून ते ठरवावे लागते.

**२३ ह्रस्व[1] ऋ = अ : (ऋतोऽत् । हेम. १.१२६)**

तृण = तण (गवत), वृषभ = वसभ (बैल), ऋण = अण, दृढ = दढ, घृत = घय (तूप), मृत्यु = मच्चु, मृत्तिका = मट्टिया (माती), तृष्णा = तण्हा, भृति = भइ (वेतन), वृक्ष = वच्छ, मृगांक = मयंक (चंद्र).

(अ) ह्रस्व ऋ असलेल्या काही संस्कृत कर्मणि भूतकाल धातु. विशेषणातील ऋ चा अ होतो.

कृत = कय (केलेले), मृत = मय (मेलेला), हृत = हय (हरण केलेले), गृहीत = गहिय (घेतलेले), आहृत = आहड (आणलेले), हृष्ट = हट्ठ (आनंदित), सुकृत = सुकय.

**२४ ह्रस्व[2] ऋ = इ : (इत्कृपादौ । हेम. १-१२८)**

कृपा = किवा, गृह = गिह (घर), वृत्ति = वित्ति (निर्वाह), कृमि = किमि, मृग = मिग (हरिण), समृद्ध = समिद्ध, गृद्धि = गिद्धि (अभिलाष), कृश = किस, दृष्टि = दिट्ठि, शृंग = सिंग (शिंग), वृक = विग (लांडगा), नृप = निव (राजा), ऋषि = इसि, कृपण = किविण, हृदय = हियय.

(अ) समासातील पहिल्या पदाच्या अन्त्य ह्रस्व ऋ चा कधी कधी इ होतो.

मातृ-मरण = माइमरण (आईचे मरण), भ्रातृ-मरण - भाइमरण (भावाचे मरण), मातृ-वध = माइवह (आईचा वध), मातृ-शोक = माइसोय (आईसाठी शोक).

---

१. *म : कृत्ति - (कत्ति) - कात, तृण - तण, मृदु - मउ, कृष्ण - (कण्ह) कान्हा, भ्रातृजाया - भावजय.*

२. *म : कृपा - (किवा) - कीव, हृदय - (हियय) -हिय्या, शृंग - शिंग, दृष्टि - दिठी, मातृ - माइ.*

**२५ ह्रस्व[१] ऋ = उ : (उदृत्वादौ । हेम. १.१३१)**

ऋतु = उउ, मृणाल = मुणाल (कमळाचा देठ वा तंतु), वृत्तांत = वुत्तंत, पृच्छति = पुच्छइ (विचारतो), प्रावृष् = पाउस (पावसाळा), ऋजु = उज्जु (सरळ), पृथ्वी = पुढवी, मृदंग = मुइंग, मृषा = मुसा (खोटे)

(अ) ह्रस्व ऋ असलेल्या काही संस्कृत क. भू. धा. विशेषणांतील ऋ चा उ होतो.

संपरिवृत = संपरिवुड (वेष्टित), निर्वृत - निव्वुय (तृप्त), वृष्ट = वुट्ठ (वर्षिलेले), परामृष्ट = परामुट्ठ (स्पर्शित), परिवृत = परिवुड (परत फिरलेला).

(आ) ह्रस्व ऋकारान्त शब्दांपुढे स्वार्थे क प्रत्यय असता कधी ऋ चा उ होतो.

जामातृ[५] = जामाउ (जावई), नप्तृ-क = नत्तउनातू, भ्रातृ-क = भाउ (भाऊ)

(इ) समासातील पहिल्या पदाच्या अन्त्य ह्रस्व ऋ चा कधी कधी उ होतो **(गौणान्त्यस्य । हेम. १.१३४).**

मातृ-मरण = माउमरण, भ्रातृ-वत्सल = भाउवच्छल (भावाशी वत्सल), मातृ-दुश्चरित = माउदुच्चरिय (आईची वाईट वागणूक), भातृ-स्नेह = भाउसिणेह, मातृ-पितृ-सुजात = माउपिउसुजाय (चांगल्या आईबापांच्या पोटी जन्मलेला).

**२६ ह्रस्व[२] ऋ = रि : (रिः केवलस्य । हेम. १.१४०)**

ऋषि = रिसि, ऋण = रिण, ऋषभ = रिसह (बैल), ऋद्धि = रिद्धि (वैभव), ऋतु = रिउ.

(अ) काही शब्दातील दृ चा रि होतो **(क्वचिद् युक्तस्यापि । प्रा.प्र. १.३१).**

सदृश = सरिस (सारखा), ईदृश = एरिस (असला), कीदृश = केरिस (कसला), तादृश = तारिस (तसला), अस्मादृश = अम्हारिस (आमच्यासारखा),

---

*१. प्रावृष् - पाउस, ऋजु-उजू, भृंग-भुंगा*

*२. (अ) प्राय : शब्दातील आद्य ऱ्हस्व ऋ चा रि होतो. (आ) मराठीत ऋद्धि-रिद्धि.*

युष्मादृश = तुम्हारिस (तुमच्यासारखा), यादृश = जारिस (जसला), एतादृश = एयारिस (ह्यासारखा), मादृश = मारिस (माझ्यासारखा), अन्यादृश = अन्नारिस (दुसऱ्यासारखा).

**२७ एकाच शब्दात होणारे ह्रस्व ऋ चे अनेक विकार पुष्कळदा एकाच शब्दातील ह्रस्व ऋ चे अनेक विकार होतात. असे काही शब्द पुढे दिले आहेत**

ऋषि = इसि, रिसि; ऋद्धि = इड्ढि, रिद्धि; ऋण = अण, रिण; मातृ = माई, माउ; कृष्ण = कण्ह, किण्ह; प्राकृत : पागय, पाइय; पृष्ठ = पिट्ठ, पुट्ठ (पाठ); बृहस्पति = बहस्सइ, बिहस्सइ; मृगांक = मियंक, मयंक; मृग = मय, मिग; ऋक्ष = अच्छ, रिच्छ (अस्वल); भ्रातृ-वत्सल = भाइवच्छल, भाउवच्छल; भ्रातृ-घातक = भाइघायग, भाउघायग (भावाचा घात करणारा), ऋतु = उउ, रिउ; ऋषभ = उसभ, रिसभ; तृण = तण, तिण; वृक = वग, विग; भ्रातृ = भाइ, भाउ; मृत्यु = मच्चु, मिच्चु.

**२८ धातूत होणारे ह्रस्व ऋ चे विकार**

(अ) ह्रस्व ऋकारान्त धातूत ऋचा अर[१] होतो.

मृ = मर (मरणे), कृ = कर (करणे), धृ = धर (धरणे), सृ - सर (सरणे), हृ = हर (हरण करणे)

(आ) ह्रस्व ऋ असलेल्या एकावयवी (एकस्वरी) धातूत ऋ चा अरि झालेला आढळतो.

कृष् = करिस (ओढणे), वृष् = वरिस (वृष्टि करणे), मृष् = मरिस (क्षमा करणे), हृष् = हरिस (आनंदित होणे).

**२९ ह्रस्व ऋ चे अनियमित विकार**

ह्रस्व ऋ चे वर सांगितलेल्या विकाराखेरीज इतर काही विकार होतात, त्यांना अनियमित म्हणण्यास हरकत नाही. हे विकार असे :

---

*१ म. : करणे (कृ), मरणे (मृ), सरणे (सृ), भरणे (भृ), स्मरणे (स्मृ).*

(अ) ऋ = ऊ : मृषा = मूसा

(आ) ऋ = ए : वृत = वेंट (देठ, डेख), गृह्णाति = गेण्हइ (घेतो)

(इ) ऋ = ओ : मृषा = मोसा

(ई) वृ = रु : वृक्ष = रुक्ख

**३० दीर्घ ॠ चे विकार**

(अ) संस्कृतमधील ऋकारान्त शब्दांच्या रूपात येणाऱ्या दीर्घ ॠ चा ई किंवा ऊ होतो[१].

(१) ॠ = ई : मातॄणाम् = माईणं, मातापितॄणाम् = अम्मापिईणं.

(२) ॠ = ऊ : मातापितॄणाम् = अम्मापिऊणं, (माउपिऊणं).

(आ) दीर्घ ॠकारान्त धातूतील ॠ चा अर होतो.[२]

तॄ = तर (तरणे), वॄ = वर (वरणे).

**३१ ह्रस्व लृचे विकार**

संस्कृत शब्दातील ह्रस्व लृ बद्दल इलि होतो.

क्लृप्त = किलित्त (रचलेले), क्लृप्ति = किलित्ति (युक्ति).

**३२ ऐ व औ चे विकार : (नियमित)**

साधारणपणे ऐ बद्दल ए वा अइ आणि औ बद्दल ओ अथवा अउ असे विकार होतात. केव्हा कोणते विकार होतील याबद्दल निश्चित नियम सांगता येत नाही; वाङ्मयीन प्रयोगावरून ते ठरवावे लागते.

**३३ ऐ = ए[३] : (ऐत एत् । हेम. १.१४८)**

वैर = वेर, तैल = तेल्ल, भैरव = भेरव (भयंकर), चैल = चेल (वस्त्र),

---

१ *पिशेल, पृ. ५८ पहा.*

२ *म. : तरणे (तॄ),वरणे (वॄ).*

३. *म. : तैल - तेल, शैवल - शेवाळ*

वैतरणी = वेयरणी (यमलोकाची नदी), वैश्रमण = वेसमण (कुबेर), वैराग्य = वेरग्ग, शैल = सेल (पर्वत), शैवल = सेवल (शेवाळ), वैद्य = वेज्ज, मैत्री = मेत्ती, नैरयिक = नेरइय (नरकातील प्राणी), भैषज्य = भेसज्ज (औषध), ऐश्वर्य = एसज्ज.

### ३४ ऐ = अइ : (अइर्दैत्यादौ च । हेम. १.१५१)

दैत्य = दइच्च, स्वैरम् = सइरं, कैलास = कइलास, दैव = दइव्व, ऐश्वर्य = अइसरिय, वैशाख = वइसाह, दैन्य = दइन्न, वैश्य = वइस्स.

### ३५ एकाच शब्दात होणारे ऐ चे अनेक विकार

कधी एकाच शब्दात ऐ बद्दल ए व अइ असे दोन्हीही विकार होतात[1]. असे काही शब्द पुढीलप्रमाणे : ऐश्वर्य = एसज्ज, अइसरिय; वैर = वेर, वइर; सैन्य = सेन्न, सइन्न.

### ३६ ऐ चे अनियमित विकार

वर सांगितल्याखेरीज ऐ चे बाबतीत आणखी काही विकार होतात. त्यांना अनियमित म्हणण्यास हरकत नाही. हे विकार असे :

ऐ = इ : नैयोगिक : निओइय (नियोजन करणारा).

ऐ = ई : धैर्य = धीर

### ३७ औ[2] = ओ : (औत ओत् । हेम. १.१५९)

द्वौ = दो (दोन), पौराण = पोराण (पुरातन), क्षौम = खोम (रेशमी वस्त्र), गौर = गोर, कौशांबी = कोसंबी (एका नगरीचे नाव), यौवन = जोव्वण, चौर

---

१ *पुढील शब्दांत ऐ चे विकल्पाने ए व अइ होतात :*
*दैवं भैरव-कैरव-चैत्राः कैलास-वैर-जैत्राद्याः । मार्कंडेय १.४४*

२ *म. : गौर - गोरा, द्वौ - दोन, चौर - चोर.*
*हिंदीत - यौवन - जोबन.*

= चोर, गौरी = गोरी, गौतम = गोयम, कौमुदी = कोमुई (चांदणे), लौकिक = लोइय.

**३८ औ = अउ : (अउः पौरादौ च । हेम. १.१६२)**

गौड = गउड (गौड देश), मौलि = मउलि (डोके), पौर = पउर (नागरिक), सौध = सउह (चुनेगच्ची वाडा), कौशल = कउसल, पौत्र = पउत्त, (मुलाचा मुलगा).

**३९ औ चे अनियमित विकार**

वर उल्लेखिलेल्या विकाराखेरीज औ चे इतर काही विकार आढळतात. ते असे :

औ = आ : गौरव = गारव, (नौ = नावा).

औ = उ[१] : दौवारिक - दुवारिय (द्वारपाळ), पौलोमी = पुलोमी (इंद्राची पत्नी), सौवर्णिक = सुवण्णिअ (सोन्याचे).

**४० एकाच शब्दात होणारे औ चे अनेक विकार**

कधी एकाच शब्दात औ चे अनेक विकार होतात. असे काही शब्द पुढीलप्रमाणे : गौरव, गउरव, गारव; पौरुष = पोरिस, पउरिस; रौद्र = रोद्द, रउद्द.

**४१ स्वरांचे अनियमित विकार**

अर्धमागधीत नसलेल्या ऋ, ॠ, ॡ, ऐ व औ या स्वरांचे कोणते विकार होतात हे वर सांगितले आहेच. आता या स्वराखेरीज इतर स्वर जरी अर्धमागधीत

---

१ *सौंदर्य इत्यादी शब्दात औ चा उ होतो असे हेमचंद्राने **(उत्सौंदर्यादौ । १.१६०)** म्हटले आहे. पण काही शब्दात पुढे जोडाक्षर असल्याने औ चा ओ होऊन मग ऱ्हस्व उ झाला आहे, असेही म्हणता येईल. म्हणून वर दिलेले शब्द औ पुढे जोडाक्षर नसलेले असेच दिले आहेत.*

आहेत तरी संस्कृतशब्दातील त्या स्वरांचे स्थानी कधी कधी इतर स्वर येतात. ही माहिती आता पुढे दिली आहे.

### ४२ अ बद्दल येणारे इतर स्वर

अ = आ[१] : **(अतः समृद्ध्यादौ वा । हेम. १.४४)** : समृद्धि = सामिद्धि, प्रमुख = पामोक्ख, चतुरंत = चाउरंत (चार बाजू असलेला), गृहपति = गाहावइ (घरस्वामी), चतुरंगिणी = चाउरंगिणी (सैन्य), चतुर्दशी = चाउद्दसी.

अ = इ : **(इः स्वप्नादौ । हेम. १.४६)** : स्वप्न = सिविण, ईषत् = ईसिं (थोडेसे), पक्क = पिक्क, मध्यम = मज्झिम, उत्तम = उत्तिम, चरम = चरिम (शेवटचा), मज्जा = मिंजा (मगज), मृदंग = मुइंग, अंगार = इंगाल (निखारा), कृपण = किविण.

अ = ई : हर : हीर (शंकर)

अ = उ : श्मशान = सुसाण, म्लेच्छ = मिलक्खु, प्लक्ष = पिलक्खु (पिंपरी), दोषज्ञ[४] = दोसन्नु (दोष जाणणारा), विधिज्ञ = विहिन्नु (विधि जाणणारा), सर्वज्ञ = सव्वन्नु, कृतज्ञ = कयन्नु.

अ = इ : **(एच्छय्यादौ । हेम. १.५७)** : शय्या : सेज्जा, अत्र = एत्थ (येथे), सौंदर्य = सुंदेर

---

*१ (अ) पुढील शब्दात पहिल्या अ चा विकल्पाने आ होतो :*
*समृद्धिः प्रतिसिद्धिश्च प्रसिद्धिः प्रकटं तथा । प्रसुप्तं च प्रतिस्पर्धी मनस्वी प्रतिपत्तथा ।। अभियातिः सदृक्षं च समृद्ध्यादिरयं गणः ।। मार्क. १.३*
*(आ) म. : काय - काया, संप्रदाय-सांप्रदाय, स्तन-थान.*

अ = ओ : परस्पर = परोप्पर, नमस्कार = नमोक्कार, पद्म = पोम्म, पृथक् = पुढो.

**४३ आ बद्दल येणारे इतर स्वर**

आ = अ : **(वाव्ययोत्खातादावदातः ।** अव्ययेषु उत्खातादिषु च शब्देषु आदेराकारस्य अद् वा भवति । हेम. १.६७) : उत्खात = उक्खय (उन्मूलित), कुलाल = कुलल (कुंभार), कुमार = कुमर, अमावास्या = अमावसा, खादित = खइय (खाल्लेले), प्रवाह = पवह, कार्षापण = कहावण (एक प्रकारचे नाणे), पर्याय = पज्जव (पूर्णप्राप्ति, क्रम), वा = व (अथवा), यथा = जह, तथा = तह, अन्यथा = अन्नह.

आ = इ : **(इः सदादौ वा । हेम. १.७२)** :- सदा = सइ (नेहमी), साहाय्य = साहिज्ज, तेषां = तेसिं (त्यांचे), येषां = जेसिं (ज्यांचे), एतासां = एयासिं (ह्यांचे), नमामः = नमिमो (आम्ही नमस्कार करतो).

आ = ई[१] : छाया = छाही, हरिद्रा = हलद्दी (हळद)

आ = ए[२] : ग्राह्य = गेज्झ, मात्र = मेत्त, पश्चात्कर्मन् = पच्छेकम्म (भिक्षेतील एक प्रकारचा दोष).

आ = आ[३] : आर्द्र[४] = ओल्ल, आली - ओली (ओळ).

---

*१) म. : घंटा - घंटी, का - कई, यदा - जई.*

*२) म. : शाल्मली - शेवरी (सांवरी)*

*३) म. : आर्द्र = ओले, आली - ओळ.*

*४) येथे ओ पुढे जोडाक्षर असल्याने ओ बद्दल कधी उ लिहिला जातो. उदा. आर्द्र = ओल्ल, उल्ल.*

**४४ ह्रस्व इ बद्दल येणारे इतर स्वर**

इ = अ[१] : हरिद्रा = हलद्दी, तित्तिरि = तित्तिर (पक्षिविशेष), शकुनि = सउण (पक्षी), शिथिल = सढिल, पथिन् = पह (रस्ता), इति = इय.

इ = उ[२] : इक्षु = उच्छु (ऊस), इषु = उसु (बाण), शिशु = सुसु, शिशुमार = सुसुमार (जलचर प्राणि विशेष), वृश्चिक = विच्छुय.

इ = ए[३] : पिंड = पेंड, सिंदूर - सेंदूर, लिच्छवि = लेच्छइ (एक राजवंश), चिकित्सा = तेइच्छा, आधिपत्य = आहेवच्च.

**४५ दीर्घ ई बद्दल येणारे इतर स्वर**

ई = अ[४] : हरीतकी = हरडई (फलविशेष)

ई = आ : कश्मीर = कम्हार.

ई = इ[५] : **(पानीयादिष्वित् । हेम. १.१०१)** :- पानीय = पाणिय (पाणी), अलीक - अलिय (खोटे), आनीत = आणिय (आणलेले), तृतीय = तइय, अनीक = अणिय (सैन्य), गंभीर = गहिर (खोल), द्वितीय = दुइय, सरीसृप = सरिसिव (प्राणिविशेष)

---

१ *मराठीत अन्त्य इ चा अ झालेला आढळतो. शुद्धि = शुद्ध, प्रीति = प्रीत, मूर्ति - मूर्त, शांति - शांत, राशि - रास, रात्रि - रात्र, रात; नीति - नीत, रीति - रीत, धूलि - धूळ; अग्नि - आग; तसेच पुलिन - पुळण, पूर्णिमा - पुनव, हरिण - हरण, चंडिका - चंडकी, धरिनी - धरती.*

२ *म. : वृश्चिक - विंचु, इक्षु - ऊस. हिंदी : बिंदु - बुंद.*

३ *(अ)* ***इत एद्वा ।*** *- संयोग इति वर्तते । आदेरिकारस्य संयोगे परे एकारो वा भवति । हेम. १.८५. पण कित्येकदा इ पुढे जोडाक्षर नसतानाही इ चा ए झालेला आढळतो*

*(आ) म. : सिंदूर - शेंदूर, पिंड - पेंडी, मिथुन - मेहुण*

४ *म. : वल्ली - वेल, पुष्करिणी - पोखरण, कमलिनी - कमळण, भगिनी -बहीण, सपत्नी - सवत.*

५ *म. : कीट - किडा (कीड), कीलक - खिळा, हिंदी - गंभीर - गहिर.*

ई = उ[१]: जीर्ण = जुण्ण

ई = ऊ : **(ऊर्हीनविहीने वा । हेम. १.१०३)** :- विहीन = विहूण (रहित), विप्रहीन = विप्पहूण (रहित)

ई = ए : कीदृश = केरिस (कसला), ईदृश = एरिस (असला), आपीड = आमेल (तुरा, गुच्छ), नीड - नेड्ड (घरटे), क्रीडा = खेड्डा, बिभीतक = बहेडय (बेहडा)

## ४६ ह्रस्व उ बद्दल येणारे इतर स्वर

उ = अ[२] : **(उतो मुकुलादिष्वत् । हेम. १.१०७)** :- मुकुल = मउल (कळी), मुकुट = मउड, गुरुक = गरुय (मोठा), कुत्र = कत्थ (कोठे), जुगुप्सा = दुगंछा, कुतः = कओ (कोठून), मुकुर = मउर (आरसा).

उ = आ : बाहु = बाहा.

उ = इ : भ्रुकुटि = भिउडि, पुरुष = पुरिस, पौरुषी = पोरिसी (जेव्हा पुरुष परिमाण छाया होते तो काल).

उ=ऊ : मुसल = मूसल (मुसळ), सुभग = सूहव (चांगला)

उ=ओ[३] : तुंड = तोंड, मुद्गर = मोग्गर (शस्त्रविशेष), पुद्गल = पोग्गल (द्रव्य), कुट्टिम = कोट्टिम (फरसबंदी जमीन), पुस्तक = पोत्थग, पुष्करिणी = पोक्खरिणी (तळे), पुंडरीक = पोंडरीय (श्वेतकमल), उदार = ओराल, कुष्ठ = कोढ (कोड), अध्युपपन्न = अज्झोववन्न (अति आसक्त), प्रमुख = पामोक्ख, अनुपम = अणोवम.

---

*१ म. - जीर्ण - जुना*

*२ म :- तंतु = तांत, दयालु - दयाळ, मधु - मध, तुमुल - तुंबळ*

*३ (अ) **ओत् संयोगे ।** हेम. १.११६. पण कधी कधी पुढे जोडाक्षर नसतानाही उ चा ओ होतो.*

*(आ) म. : पुस्तक -पोथी, शुंडा - सोंड, तुंड - तोंड*

**४७ दीर्घ ऊ बद्दल येणारे इतर स्वर**

ऊ = ई : उद्व्यूढ = उव्वीढ (वर धरलेला)

ऊ = उ[1] : कौतूहल = कोउहल्ल, उलूक = उलुय (घुबड)

ऊ = ए : नूपुर = नेउर

ऊ = ओ[2] : तूणीर = तोणीर (भाता), कूर्पर = कोप्पर (कोपर), तांबूल = तंबोल, लांगूल = नंगोल (शेपूट), तूण = तोण (भाता), कूष्मांड = कोहंड (कोहळा), स्थूल = थोर.

**४८ ए बद्दल येणारे इतर स्वर**

ए = इ : वेदना = वियणा, देवर = दियर (दीर)

ए = ओ : द्वेष = दोस, प्रद्वेष = पदोस

**४९ ओ बद्दल येणारे इतर स्वर**

ओ = उ : उताहो = उदाहु (अथवा)

ओ = ए : स्तोक = थेव (थोडा), लोष्ट = लेट्ठु (ढेकूळ)

**५० स्वरांचे ह्रस्वीकरण व दीर्घीकरण**

कित्येकदा शब्दातील ह्रस्व स्वर दीर्घ केले जातात, तर दीर्घ स्वर ह्रस्व केले जातात. पुढे सांगितल्याप्रमाणे हा बदल होतो.

**(अ) दीर्घीकरण**

(१) जोर देताना[3] ह्रस्व स्वर दीर्घ केला जातो.

तणामवि (तणमवि – तृणं अपि), अणुदिसामवि (अणुदिसमवि – उपदिशांत सुद्धा), अन्नयरामवि (अन्नयरमवि); एवामेव (एवमेव), खिप्पमेव – चट्दिशी, तत्काळ), जामेव (जमेव), तामेव (तमेव), संजयामेव (संजयमेव)

---

१ *म. :– चूडक – चूडा, चूर्णक – चुना*

२ *म. :– कूर्पर – कोपर, स्थूल – थोर*

३ *यावेळी प्राय: अवि (अपि) किंवा एव या अव्ययांचा उपयोग असतो.*

(२) कधी आज्ञार्थी रूपातील अन्त्य स्वर दीर्घ केला जातो. पासहा (पासह), कुव्वहा (कुव्वह), संबुज्झहा (संबुज्झह), होऊ णं (होउ णं).

(३) उपसर्गयुक्त धातु व साधितशब्द यात कधी कधी ह्रस्व स्वर दीर्घ केला जातो.

धातु : व्यतिव्रज् = वीईवय (पुढे जाणे)

साधितशब्द : प्रवचन = पावयण, प्रकट = पायड, प्रस्रवण = पासवण (लघ्वी), अभिजित् = अभीइ (नक्षत्रविशेष).

(४) स्वार्थे क प्रत्ययाच्या मागील ह्रस्व स्वर कधी कधी दीर्घ केला जातो. क्षुद्र-क = खुड्डाग, अनादि-क = अणाईय, मुहूर्त-क = मुहुत्ताग, पिटक - पिलाग (पेटी, पेटारा).

(५) 'धिक्' या अव्ययात अन्त्य व्यंजनाचा लोप होऊन मागील स्वर दीर्घ होतो[१] :- धिक् = धी

(६) ह्रस्व स्वरावरील अनुस्वाराचा लोप झाल्यास तो ह्रस्व स्वर दीर्घ होतो. दंष्ट्रा = दाढा, संहरति = साहरइ, सिंह = सीह.

७) ह्रस्व स्वरापुढील संयुक्त व्यंजनात एका अवयवाचा लोप झाल्यास मागील ह्रस्व स्वर दीर्घ होतो (मागील स्वर दीर्घ असल्यास तो तसाच रहातो. सुलभीकरण परि. ११८ पहा).

कश्यप = कासव, स्पर्श = फास; विश्राम = वीसाम; उत्सव = ऊसव.

### (आ) ह्रस्वीकरण

(१) स्वरभक्तीने[२] शब्दात अधिक स्वर आला असता, दीर्घ स्वर ह्रस्व होतो. उदा. :- (आ - अ :-) आचार्य = आयरिय, (ई - इ) :- श्री = सिरि, ह्री = हिरि (लज्जा), ईर्या = इरिया (गमन) (ऊ - उ) :- वैडूर्य = वेरुलिय, सूक्ष्म = सुहुम.

(२) पुढे स्वार्थे क प्रत्यय असता मागील दीर्घ स्वर कधी-कधी ह्रस्व होतो.

---

१ *पिशेल, पृ. ६८ पहा.*

२ *स्वरभक्तिसाठी परि. ११६ पहा*

वधू-का = वहुया; वयंसिया (वयस्य चे स्त्रीलिंग रूप), जीवंतिया (जीवंती)[१]

(३) दीर्घ स्वरापुढे जोडाक्षर असता दीर्घ स्वर ह्रस्व होतो.[२]
राष्ट्र = रट्ठ; तीर्थ = तित्थ; धूर्त = धुत्त; क्षेत्र = खेत्त; मोक्ष = मोक्ख

(४) दीर्घ स्वरावर असलेल्या (वा आलेल्या) अनुस्वाराचा लोप न झाल्यास तो दीर्घ स्वर ह्रस्व होतो.
पांशु = पंशु, मुसा = मुसं, नदीम् = नइं, नेंति = नेंति, होंति = होंति.

**(इ) कधी ह्रस्वीकरण, कधी दीर्घीकरण**

पुढे सांगितल्याप्रमाणे त्याच परिस्थितीत स्वर कधी ह्रस्व तर कधी दीर्घ केले जातात.

(१) पद्यात वृत्ताच्या सोईसाठी ह्रस्व दीर्घ केले जातात. तसेच व्याकरणानुसार शब्दरूपात येणाऱ्या दीर्घ स्वरांचे ह्रस्वीकरण वृत्तासाठी केले जाते.

**(क) ह्रस्वीकरण :** थाणओ (थाणाओ $\sqrt{}$ स्थान), संजमओ (संजमाओ $\sqrt{}$ संयम), कुललओ (कुललाओ $\sqrt{}$ कुलाल), वयस (वयसा); रायहाणिए (रायहाणीए), कोडिओ (कोडीओ), सिरिओ (सिरीओ); हेउहिं[३] (हेऊहिं).

**(ख) दीर्घीकरण :** मईमं (मइमं $\sqrt{}$ मतिमान्), सहई (सहइ $\sqrt{}$ सहते), कयाई $\sqrt{}$ कदाचित्), आयावयाही (0हि), कमाही (0हि), सोणीय (सोणिय $\sqrt{}$ शोणित), करिस्सई (0इ), जाणंती (जाणंति), अणुहोती (0होंति).

(२) समासात पहिल्या पदाचा अन्त्य स्वर ह्रस्व असल्यास कधी दीर्घ केला जातो व दीर्घ असल्यास कधी ह्रस्व केला जातो.[४]

---

१ *कथा पृ. २५*

२ ***ह्रस्वः संयोगे*** । *हेम. १. ८४*

३ *हेउहिं हे रूप संस्कृतवरून (हेतुभिः) घेतले आहे, असेही म्हणता येईल. संस्कृतरूपात उ ऱ्हस्वच आहे.*

४ ***दीर्घह्रस्वौ मिथो वृत्तौ*** । *हेम १.४*

**(अ) ह्रस्वीकरण :** (आ - अ) :- भिक्षाकाल = भिक्खकाल, क्रीडाकर - किड्डकर, मृत्तिका-भांड = मट्टियभंड, मथुरा-नगरी = महुरनयरी, पिपासा-पीडिता = पिवासपीडिया. (ई - इ) :- पृथ्वी-मंडल = पुहविमंडल, पृथ्वी-विख्यात = पुहविविक्खाय, मही-तल = महियल, लक्ष्मी-नाश = लच्छिनास, देवी-प्रभाव = देविपभाव, लक्ष्मी-देवी = लच्छिदेवी. (ऊ-उ) :- वधू-मुख = वहुमुह, वधू-वर = वहुवर, वधू-सहाय - वहुसहिज्ज.

**(आ) दीर्घीकरण :-** (अ-आ):- रजतमय[१] = रययामय (रजताचे), वज्र-मय = वइरामय, सप्तविंशति[२] = सत्तावीसा, परम-धार्मिक = परमाहम्मिय, प्रश्न-व्याकरणानि = पण्हावागरणाइं (एका जैनागमग्रंथाचे नाव). (इ - ई) :- पति-गृह = पईहर, मति-मूढ = मईमूढ, जाति-मरणं = जाईमरणं, जाति-स्मरण = जाईसरण.

---

१ *समासात द्वितीयपदी 'मय' असता प्राय: मागील स्वर दीर्घ होतो.*

२ *संख्यावाचकात प्रथमपदी पंच, छ, सत्त, अट्ठ असता दीर्घीकरणाने त्यांचे पंचा, छा, सत्ता, अट्ठा होतात (पिशेल पृ. ६७ पहा). संख्यावाचके पहा.*

प्रकरण ४

# व्यंजनविकार

## ५१ व्यंजनविकार : सामान्य विचार

संस्कृतशब्द अर्धमागधीत येताना जसे त्यातील स्वरात विकार होतात, तसेच व्यंजनातही होतात. व्यंजने ही संयुक्त वा असंयुक्त असतील; त्यानुसार व्यंजनविकारांचे (१) असंयुक्त-व्यंजन-विकार व (२) संयुक्त-व्यंजन-विकार असे दोन मुख्य भाग पडतात.

ही संयुक्त वा असंयुक्त व्यंजने संस्कृत शब्दात (२) आद्य (२) मध्य अथवा (३) अन्त्य[१] स्थानी असू शकतात. उदा. कर, चन्द्र, सरित्, राजन्, स्कन्द, स्तम्भ, स्पन्द, भास्कर, अर्थ, रक्ष्, मन्त्र, मार्ग इ.

आता, अर्धमागधीत शब्दाच्या अन्त्य स्थानी स्वररहित केवल व्यंजन चालत नसल्याने (१) अन्त्य असंयुक्त तसेच संयुक्त व्यंजनात विकार व्हावे लागतात. (२) आणखी, अर्धमागधीत शब्दाच्या आद्य स्थानी जोडाक्षर चालत नसल्याने त्यातही विकार होणे सयुक्तिक ठरते. (३) त्याचप्रमाणे, अर्धमागधीत जी व्यंजनेच - श्, ष् - नाहीत, ती ज्या शब्दात आहेत त्यातही विकार होणे साहजिकच आहे. (४) तसेच, काही[२] ठराविक प्रकारची जोडाक्षरेच चालत

---

१ *आद्य, मध्य, अन्त्य स्थान ठरविणे: 'राम' शब्दातील वर्ण वेगळे केले तर र् + आ + म् + अ असे होईल येथे र् चा उच्चार प्रथम म्हणून ते आद्य; अ हा शेवटी आहे म्हणून तो अन्त्य; या दोहोंमधील आ, म् हे वर्ण मध्य होत. 'सरित्' शब्दांत स् आद्य, त् अन्त्य, उरलेले मध्य निमन्त्र शब्दांत न् आद्य न्त्र् अन्त्य, उरलेले मध्य.*

२ *परि. १५ मधील जोडाक्षरांचा तक्ता पहा.*

असल्याने त्याखेरीज इतर संयुक्त व्यंजनात योग्य ते बदल होणे, हेही क्रमप्राप्तच ठरते. (५) याखेरीज आद्य व मध्य अशा काही असंयुक्त व्यंजनातही फरक पडतात. (६) आणि शेवटी, अर्धमागधीत असलेल्या काही विशिष्ट व्यंजनांचे जसे स्वरांचे तसे फेरफार होतात. हे फेरफार त्या त्या व्यंजनाच्या[१] आद्य, मध्य वा अन्त्य स्थानानुसार होतात.

व्यंजनविकारातही काही विकार नियमितपणे तर काही अनियमितपणे होतात. हे सर्व व्यंजनविकार पुढीलप्रमाणे दाखविता येतील :-




या सर्व व्यंजनविकारांचा आता क्रमाने विचार केला आहे.

---

१ *विसर्ग हा स् वा र् चा विकार आहे. संस्कृत शब्दात तो मध्य (उदा. दुःख) किंवा अन्त्य (उदा. देवः, मनः) स्थानी असू शकतो. म्हणून विसर्गाचे विकार पुढे मध्य व अन्त्य व्यंजनविकारात अंतर्भूत केलेले आहेत.*

प्रकरण ५

# असंयुक्त–व्यंजन–विकार

## (१)

### (आद्य असंयुक्तव्यंजनांचे विकार)

आद्य असंयुक्तव्यंजनांचे नियमित व अनियमित विकार पुढे सांगितल्या प्रमाणे होतात.

**५२ आद्य असंयुक्त श् व ष् यांचे विकार**

आद्य असंयुक्त श् व ष् यांचा प्राय: स् होतो.

**(अ)** श्=स्[१] : शम=सम (शांति), शरीर=सरीर, शर=सर (बाण), शरण=सरण; शङ्ख=संख, शङ्का=संका; शाला=साला (शाळा), शालि=सालि (साळी), शारीर=सारीर ; शिव=सिव, शिला=सिला; शील=सील, शीतल=सीयल; शुद्ध=सुद्ध, शुभ=सुभ, शुद्धि=सुद्धि; शूर=सूर, शूल=सूल (सूळ); शृङ्ग=सिंग; शैल=सेल, शैवल=सेवल; शोभा=सोहा, शोभन=सोहण; शौंडीर=सोंडीर (गर्विष्ठ), शौच=सोय.

**(आ)** ष्=स् : षष्टि=सट्ठि (साठ), षण्ड=संड (वृक्षसमूह), षोडश=सोलस (सोळा)

**५३ आद्य असंयुक्त श् व ष् आणि स् यांचे अनियमित विकार**

आद्य असंयुक्त श्,ष् आणि स्[२] यांचा कधी कधी छ् होतो.

---

१ *म. :– श्वापद–सावज, शुण्डा–सोंड, शम्भु–सांब, शाल्मली–सांवरी, शृङ्खला–साखळी.*

२ *प्राय: आद्य असंयुक्त स् चा काही विकार होत नाही. उदा. सव्व (सर्व), सयल (सकल), सर (सरस्) सरोवर, समीव (समीप).*

**(अ)** श्=छ् : शरु=छरु (बाण), शाव=छाव (छावा), शिरा=छिरा, शेप=छेप्प (शेपूट).

**(आ)** ष्=छ् : षट्=छ (सहा), षट्पद=छप्पय (भ्रमर), षडस्र=छलंस (सहा बाजू असलेला), षट्क=छक्क (सहांचा समुदाय), षड्जीव=छज्जीव, षट्शत=छस्सय (६००), षष्ठ=छट्ठ, षष्ठी=छट्ठी, षण्मास=छम्मास, षण्मुख=छम्मुह, षड्विंशति=छव्वीस.

**(इ)** स्=छ् : सुधा=छुहा (चुना), सप्तपर्ण=छत्तिवण्ण (वृक्षविशेष)

**५४ आद्य असंयुक्त य् चे विकार**

आद्य असंयुक्त य् चा सामान्यत: ज् होतो.[१]

यम=जम; याग=जाग, याम=जाम (प्रहर), या=जा (जाणे); युग=जुग(जूं), युद्ध=जुद्ध; यूथ=जूह (समुदाय, कळप), यूप=जूव (यज्ञस्तंभ); योग=जोग, योगिन्=जोगि, योध=जोह (योद्धा), यौवन=जोव्वण.

**(अ)** आद्य असंयुक्त य् च्या पूर्वी एखादा उपसर्ग असताही कधी कधी य् चा ज् होतो.[२]

संयोग=संजोग, संयम=संजम, संयुक्त=संजुत्त, संयुत=संजुय, संयत=संजय; अपयशस्=अवजस; वियुक्त=विजुत्त; कुयोनि=कुजोणि

**(आ)** यथा व यावत्[३] हे शब्द समासात प्रथमपदी असता त्याच्या आद्य य् चा कधी कधी ज् होतो, तर कधी त्याचा नुसता लोप होतो.

यथा :-(१) लोप व विकल्पाने ज् : यथासुखम्=अहासुहं, जहासुहं; यथाश्रुतम्=अहासुयं, जहासुयं.

(२) नुसता लोप :- यथाकृत=अहागड, यथाजात=अहाजाय, यथाछंद=अहाछंद, यथासूत्र=अहासुत्त, यथापर्याप्त=अहापज्जत्त.

यावत् :-(१) लोप व विकल्पाने ज् : यावत्कथा=आवकहा, जावकहा.

---

१ *(अ)* ***आदेर्यो जः । १ हेम १.२४५.***

*(आ) म. :- यादव=जाधव, योधपुर=जोधपुर, यात्रा=जत्रा.*

२ ***बहुलाधिकारात् सोपसर्गस्यानादेरपि ।*** *हेम. १.२४५*

३ *'यावत्' या शब्दाच्या काही रूपातही आद्य य् चा लोप होतो. उदा. आवंति।*

(२) नुसता लोप : आवकहं, आवकहाए (यावत्कथा).

**५५ आद्य असंयुक्त न्**

आद्य असंयुक्त न् चा ण् करण्याबद्दल वैयाकरणात थोडा मतभेद आहे. काही वैयाकरण आद्य असंयुक्त न् चा ण् करण्याच्या विरुद्ध आहेत. तर अ-जैन, वैयाकरणांच्या मते न् चा ण् मग तो आद्य असो वा मध्य असो ण होतो[१] पण हेमचंद्रासारखे[२] जैन वैयाकरण आद्य न् चा ण् करण्याविषयी विकल्प देतात.

व्याकरणकारात असा मतभेद असल्याने आद्य न् च्या बाबतीत काहीतरी संकेत पाळणे योग्य ठरेल. डॉ. वैद्यानी (पृ.१७) म्हटल्याप्रमाणे, व्यवस्थित विभाषेने जैनग्रंथात आद्य न् तसाच ठेवावा, त्याचा ण्[३] करू नये.

उदा. नाम, नव, नर, नीइ (नीति) इ.

**५६ आद्य असंयुक्त प्**

आद्य असंयुक्त[४] प् चा कधी कधी फ् होतो.[५]

पाटयति=फालेइ (फाडतो), परिखा=फलिहा (खंदक), परुष=फरुस (कठोर), परशु=फरसु (कुऱ्हाड), परिघ=फलिह (अडसर), पनस=फणस.

**५७ आद्य असंयुक्त द्**

आद्य असंयुक्त[६] द् चा कधी कधी ड् होतो.[७]

---

१ ***नो णः सर्वत्र।*** *प्रा.प्र. २.४२*

२ *असंयुक्तस्य आदौ वर्तमानस्य नस्य णो वा भवति। हेम १.२२९*

३ *(अ) पिशेलही (इं.पृ.१६५) आद्य न् तसाच ठेवावा असे म्हणतो. याला अपवाद एक : णं (ननु).*

४ *आद्य असंयुक्त प् प्रायः तसाच रहतोः पुप्फ (पुष्प), पाव (पाप), पर, परम, पाय (पाद)*

५ *म : पाश=फास, फणस (पनस)*

६ *आद्य असंयुक्त द् प्रायः तसाच रहातो : दर, दास, दाम, दस (दश), दसा (दशा)*

७ *म. :- डाळिंब (दाडिम), डंभ (दम्भ), डोहाळा (दोहद).*

दशति=डसइ (चावतो), दहति=डहइ (जाळतो), दहर=डहर (लहान,तरुण), दण्ड=डंड (हिंदी डंडा), दम्भ=डंभ, दग्ध=डड्ढ, दह्यते=डज्झइ (जाळला जातो), दोहद=डोहल (डोहाळा).

## ५८ आद्य असंयुक्तव्यंजनांचे अनियमित विकार

इतर काही व्यंजने आद्य स्थानी असता त्यांच्यात कधी कधी विकार होतात. त्यांना अनियमित म्हणण्यास हरकत नाही. हे विकार पुढीलप्रमाणे आढळतात.

क = ख[१] : कुब्ज = खुज्ज (खुजा, कुबडा), कील=खील (पाचर,मेख), कंधरा=खंधरा (मान,गळा), कसित=खसिय (खोकला), किङ्किणी=खिंखिणी (लहान घंटा), क्रीडा=खेड्ड, कास=खास (खोकला) (हिंदी-खांसी).

क = ग : कन्दुक=गेंदूय (चेंडू) (म : गेंद)

क = च : किरात=चिलाय, किरातिका=चिलाइया

क = त : कन्दुक=तिंदूस, किरीट=तिरीड

ग = घ[२] : गृह=घर, गृहिणी=घरिणी

च = त : चिकित्सा=तेइच्छा, चिकित्सक=तिगिच्छग (वैद्य)

च = य : च=य (आणि), चापि=यावि (आणि सुद्धा)

ज = झ : जूषित=झूसिय (सेवित, क्षपित)

ज = द : जुगुप्सा=दुगुंछा, जिघत्सा=दिगिच्छा (खाण्याची इच्छा), ज्योत्स्ना=दोसिणा (चांदणे)

त = च : तिष्ठति=चिट्ठइ (उभा राहतो)

द = ध : दुहितृ=धूया (मुलगी)

ध = ढ[३] : ध्वाङ्क्ष=ढंक (पक्षीविशेष)

न = ल : निम्ब=लिंब (म. :- लिंब)

---

*१ म. :- कर्पर = खापर, कीलक=खिळा*

*२ म. :- गुच्छ-घोस, गर्गरिका-घागर, गृह-घर*

*३ म. :- धवल - ढवळा*

न = ण्ह : नापित=ण्हाविअ (म. :- न्हावी)

ब = भ[1] : बिस=भिस (कमलतंतु), बिसिनी=भिसिणी (कमलिनी), बृसिका=भिसिगा (आसन विशेष), बिंबिसार=भिंभिसार (एका राजाचे नाव)

ब = म : ब्राह्मण=माहण

भ = ब : भीषण=बीहण, भीषणक=बीहणग, भगिनी=बहिणी

भ = ह : भू=हो (होणे), भवन्ति=हवंति, भवति=हवइ

म = व : मीमांसा=वीमंसा, मन्मथ=वम्मह (मदन)

य = ल : यष्टि=लट्ठि (म. :- लाठी)

य = त : युष्मादृश=तुम्हारिस

र = ल : रूक्ष=लूह, राठा=लाढा (देशविशेष)

ल = न : लाङ्ग=नंगल (नांगर), लाङ्गुल=नंगुल (शेपूट), ललाट=निडाल, निलाड (म. :- निढळ)

ल = ल्ह : लशुन=ल्हसुण (लसुण)

**५९ समासांत**

समासात उत्तरपदाचे आद्य असंयुक्तव्यंजन हे विकल्पाने आद्य अथवा मध्य मानले जाते. त्यामुळे त्यानुसार त्यात विकार होतात.

आद्य मानून : त्रि-भुवन=तिभुवण, सु-पुरुष=सुपुरिस, मातृ-भक्त=माइभत्त

मध्य मानून : त्रि-भुवन=तिहुयण, सु-पुरुष=सउरिस, विष-धर=विसहर (सर्प)

**(अ)** मागे उपसर्ग असताही वरीलप्रमाणेच विकल्प आहे :-

आद्य मानून : सु-कृत=सुकय

मध्य मानून : प्र-भाव=पहाव, प्रधान=पहाण

**(आ)** 'न जानाति' या वाक्यांशातही ज् हा कधी आद्य तर कधी मध्य मानला जातो. उदा. न जानाति=न जाणइ, न याणइ.

---

१ *म. :- बुस - भुसा,*

## (२)
## (मध्य असंयुक्त व्यंजन विकार)

मध्य असंयुक्त व्यंजनाचे नियमित व अनियमित विकार खाली सांगितल्याप्रमाणे होतात.

### ६0 मध्य असंयुक्त क् ग् च् ज् त् द् प् य् व्[1]

मध्य असंयुक्त क् ग् च् ज् त् द् प् य् व् यांचा प्राय:[2] लोप होतो; ही व्यंजने लुप्त झाल्यावर त्यांच्याशी संयुक्त असणारा जो स्वर उरतो त्याला 'उद्वृत' स्वर

---

१ *मध्य असंयुक्त क् ग् च् ज् त् द् प् य् व् याबद्दल अर्धमागधीत कधी कधी त् येतो (चोक्षी, पृ. २०-२१; पा.स.म., प्रस्ता; पृ. २८-२९; सुत्ता; खंड १ प्रस्ता, पृ. १९) उदा. आराधक=आराहत, अतिग=अतित, नाराच=नारात, ओजस्=ओत, यदा=जता, सामायिक=सामातिक, परिवार=परिताल अशाप्रकारे डॉ. सेठ इत्यादींच्या मते अर्धमागधीत 'तश्रुति' आहे. (काही मुद्रित ग्रंथातही असा तश्रुतीचा वापर आढळतो) पण डॉ. वैद्य (पृ.१६) यांच्या मते ही तश्रुति अर्धमागधीत नाही. ती अर्धमागधीचे वैशिष्ट नसून जैन हस्तालिखित लेखकांचे वैशिष्टय आहे. डॉ. वैद्य पुढे म्हणतात की कोणत्याही प्राकृत - वैयाकरणाने 'तश्रुति' चा निर्देश केलेला नाही. म्हणून तश्रुति ही अनधिकृत, अव्याकरणीय (ungrammatical) म्हणून विरोध्य आहे. (पिशेलचे (इं. पृ. १५०) मतही तश्रुतीला अनुकूल दिसत नाही). हेमचंद्र हा स्वत: जैन होता आणि तो जैनागम व इतर प्राकृत वाङ्मय याशी सुपरिचित होता. तथापि हेमचंद्र तश्रुतीचा उल्लेख करत नाही याचा अर्थ असा की तश्रुति लिहिण्याची प्रथा हेमचंद्रानंतर प्रचारात आली असावी.*

२. ***कगचजतदपयवां प्रायो लोप:*** **।** *प्रा. प्र.२.२ - प्रायो ग्रहणाद् यत्र श्रुतिसुखम् अस्ति तत्र न भवति एव। (प्रा.प्र.२.२ वरील भामहाची टीका) तसेच प्रायो ग्रहणतश्चात्र कैश्चित् प्राकृतको विदै:।*
*यत्र नश्यति सौभाग्यं तत्र लोपो न मन्यते।। (मार्कं. २.२ पहा)*

म्हणतात. हा उद्धृत स्वर अ किंवा आ असल्यास त्यांचा उच्चार लघुप्रयत्नाने उच्चारित 'य' सारखा होतो. असे हेमचंद्र सांगतो[१]. हीच यश्रुति.[२]

(१) क्[३] : सकल : सयल, छेक=छेय (हुशार), नरक=नरय; भूमिका=भूमिया, गणिका=गणिया(वेश्या), सहकार=सहयार; कोकिल=कोइल, लौकिक=लोइय; आकीर्ण=आइण्ण (भरलेले); गोकुल=गोउल (गाईंचा कळप), आकुल=आउल, नकुल=नउल (मुंगूस); प्रकृति=पयइ, प्राकृत=पायय, निकृति=नियडि (कपट, लबाडी)

**(अ)** अर्धमागधीत पुष्कळदा मध्य असंयुक्त क् चा ग् होतो.[४]
फलक = फलग (फळी), आकर=आगर (खाण), एक=एग, दारक=दारग (मुलगा), लोक=लोग, चम्प=चंपग (चाफा), अलक=अलग (केस), वृक=वग (लांडगा), शाक=साग (भाजी); नासिका=नासिगा (नाक); चिकित्सा=तेगिच्छा; प्राकृत=पागय, आकृति=आगइ, अन्तकृत=अंतगड (त्याच जन्मात मुक्त झालेला), सूत्रकृत=सूयगड (एका जैनागमग्रंथाचे नाव)

(२) ग् :- युगल=जुयल (जोडी), मृग=मिय, अनुग=अणुय (सेवक), नगर=नयर, नगरी=नयरी; मृगांक=मियंक, शृगाल=सियाल (कोल्हा); त्यागिन्=चाइ (त्यागी), भगिनी=भइणी; लगुड=लउड (सोटा), द्विगुण=दुउण (दुप्पट); उपगूढ=उवऊढ (आलिंगित).

---

१ *कगचजेत्यादिना लुकि सति शेष: अवर्ण: अवर्णात्परो लघुप्रयत्नतरयकारश्रुति: भवति। हेम. १.१८०*

२ *क् ग् इत्यादींच्या पूर्वी अ, आ हे स्वर असता यश्रुति होते, असे हेमचंद्र म्हणतो. मार्कंडेयाच्या मते अ व इ या स्वरापुढेही यश्रुति होते. जैन हस्तलिखिते तर सर्वच स्वरापुढे यश्रुति लिहितात. याकोबीच्या मते (कल्पसूत्र, प्रस्ता, पृ.२०). लुप्त झालेल्या एका व्यंजनाचा अवशेष या दृष्टीने सर्व स्वरापुढे यश्रुति लिहिणे, हे व्युत्पत्तिदृष्ट्या अधिक सुसंगत आहे.*

३ *हिंदी : रसिक-रसिया*

४ *म. :- सकल-सगळा, बक-बग(ळा), मुकुट-मुगुट, प्रकट-प्रगट, एकदा-एगदा. हिंदी : शाक-साग*

**(अ)** अर्धमागधीत मध्य असंयुक्त ग् पुष्कळदा तसाच रहातो. आगम, जागर, भाग, राग, भोग, जोग (योग), संभोग, संजोग (संयोग)

(३) च् :- कच = कय (केस), लोच=लोय (केस उपटणे), नीच=नीय, अचल=अयल (स्थिर), लोचन=लोयण; आचार=आयार, उपचार=उवयार; रुचि=रुइ, रुचिर=रुइर, शुचि=सुइ; सूची=सूई; प्रचुर= पउर.

**(अ)** अर्धमागधीत मध्य असंयुक्त च् क्वचित् तसाच राहतो.

उपचय=उवचय (वाढ); सचाप=सचाव; अविचल, सचिव, परिचय.

(४) ज्[१] : गज=गय (हत्ती), निज=निय (आपला), भुजंग=भुयंग, भुज=भुय, अज=अय (बोकड), बीज=बीय, भुजंगम=भुमंगम; पूजा=पूया, राजा=राया, प्रजा=पया; पूजित=पूइय, राजि=राइ; राजीव=राईव (कमळ)

**(अ)** अर्धमागधीत मध्य असंयुक्त ज् कधी कधी तसाच रहातो.

विजन=विजण, अश्रुजल=अंसुजल, अपराजित=अपराजिय, अजित=अजिय; विजय=विजय.

(५) त्[२] : गीत=गीय, हित=हिय, चरित=चरिय, दूत=दूय, चूत=चूय (आम्रवृक्ष), सतत=सयय, आतंक=आयंक (रोग), वात=वाय (वारा), रहित=रहिय, नितंब=नियंब; माता=माया, पिता=पिया, लता=लया, देवता=देवया, चिता=चिया; गति=गइ, रति=रइ, पति=पइ, नीति=नीइ; अतीव=अईव, दूती=दूई; हेतु=हेउ, धातु=धाउ, आतुर=आउर; कौतूहल=कोऊहल; कृते=कए (साठी); आतोद्य=आओज्ज (वाद्य) परितोष=परिओस.

**(अ)** अर्धमागधीत मध्य असंयुक्त त् कधी तसाच राहतो.

वितथ=वितह, तितिक्षति=तितिक्खइ.

**(आ)** कधी कधी मध्य असंयुक्त त् चा द् होतो.

उताहो=उदाहु (अथवा)

---

१ *म. :- राजन्-राय, राया; राजि=राई*

२ *म. :- घात-घाय, दलपति - (दलवइ) दळवी*

**(इ)** 'प्रति'[१] मधील त् चा कित्येकदा ड्[२] होतो: (**प्रत्यादौ डः।** हेम. १.२०६)
प्रतिमा = पडिमा, प्रतिपन्न=पडिवन्न (स्वीकृत), प्रतिपक्ष=पडिवक्ख, प्रतिवचन=पडिवयण (उत्तर), प्रतिबुद्ध=पडिबुद्ध, प्रतिहार=पडिहार (द्वारपाल), प्रतिबद्ध= पडिबद्ध (बांधलेला)

**(ई)** ह्रस्व ऋ असलेल्या कित्येक संस्कृत क. भू. धा. विशेषणातील त् चा ड्[३] होतो.

कृत=कड, मृत=मड, प्रावृत=पाउड (आच्छादित), हृत=हड, परिवृत=परिवुड (वेष्टित), दुष्कृत=दुक्कड, यथाकृत=अहागड (नेहमीच्या क्रमाने केलेले अन्न इ.), क्रीतकृत=कीयगड (एक प्रकारचा भिक्षा दोष), आहृत=आहड, विकृत=विगड, वियड; व्यापृत=वावड.

**(उ)** इतर काही शब्दातही मध्य असंयुक्त त् चा ड्[४] होतो.
पतति=पडइ (पडतो), पतित=पडिय, पताका=पडाया, निकृति= नियडि, संस्कृति=संखडि (ओदनपाक), प्रकृति=पयडि, पतन=पडण, वेतस=वेडिस, अवतंसक=वडिंसग (तुरा).

(६) द्[५] : पाद=पाय, वेद=वेय, खेद=खेय, मोद=मोय; सदा=सया, यदा=जया, तदा=तया, कदा=कया; यदि=जइ(जर), आदि=आइ; नदी=नई, कौमुदी=कोमुई, मदीय=मईय (माझा); मृदु=मिउ, पादुका=पाउया; उपदेश=उवएस, आदेश=आएस, विदेश=विएस.

**(अ)** अर्धमागधीत मध्य असंयुक्त द् पुष्कळदा तसाच राहतो.
उदधि=उदहि; उदर, भेद, उदार; उदक=उदग, आदान=आदाण, विदित=विदिय.

---

१ *'प्रति' मधील त् चा कधी कधी लोपही होतो । प्रति=पइ, प्रतिष्ठा=पइट्ठा, सम्प्रति=संपइ, प्रतिज्ञा=पइन्ना, प्रतिष्ठान=पइट्ठाण, प्रतिष्ठित=पइट्ठिय, प्रतिदिनं=पइदिणं.*

२ *म. :- प्रतिछाया-पडछाया, प्रतिशब्द-पडसाद, प्रतिपद्-पाडवा.*

३ *म. :- मृत-मडे.*

४ *म. :- पत्-पडणे, बिभीतक-बेहडा*

५ *म. :- पाद-पाय, मृदु-मउ, प्रसाद-पसाय.*

(आ) मध्य असंयुक्त द् चा कधी कधी ल् झालेला आढळतो

कदंब=कलंब (कळंब), प्रदीपयति=पलीवेइ (पेटवितो), द्वादश=दुवालस, दोहद=दोहल, प्रदीप्त=पलित्त.

(इ) मध्य असंयुक्त द् चा कधी कधी र् झालेला[१] दिसतो.

उदार=उराल, औदारिक=ओरालिय (शरीर विशेष), एकादश[२]=एयारह, द्वादश=बारस, सप्तदश=सत्तरस, गद्गद=गग्गर

(७) प् : रिपु=रिउ, विपुल=विउल, निपुण=निउण, नूपुर=नेउर, कापुरुष=काउरिस (वाईट, भित्रा मनुष्य), आर्यपुत्र= अज्जउत्त, सुपुरुष=सुउरिस, अञ्जलिपुट=अंजलिउड (ओंजळीची पोकळी), शङ्खपुर=संखउर; अपूर्व=अउव्व, आपूरित=आऊरिय.

(अ) अर्धमागधीत मध्य असंयुक्त प् कधी कधी तसाच राहतो.

अपोह, विपुल, समुपेक्खमाण.

(आ) मध्य असंयुक्त प् चा पुष्कळदा[३] व् होतो. (**पो वः।** हेम १.२३१)

कोप=कोव, दीप=दीव, रूप=रूव, समीप=समीव, पाप=पाव, ताप=ताव, उपमा=उवमा, चाप=चाव, चपल=चवल; गोपाल=गोवाल, उपाय=उवाय, कृपा= किवा, विपाक=विवाग; शापित=साविय; चपेटा=चवेडा (चापटी); प्रपौत्र=पवोत्त ([मुलाकडून] पणतू).

(८) य् : अ,आ या स्वराशी संयुक्त असलेला य् तसाच राहतो; इतर स्वराशी संयुक्त असलेल्या य् चा लोप होतो.

काय (देह), नयण (नयन), पिय (प्रिय), अभय, आलय, विलय, पायस; माया, जाया, दया, आयाम (लांबी), पिया (प्रिया)

नैरयिक=नेरइय (नरकवासी प्राणी), दायिक=दाइय (हिस्सेदार, समगोत्री), दयिता=दइया (प्रिया), नैयायिक=नेयाउय (न्यायशास्त्रज्ञ); वायु=वाउ,

---

१ *म. :- गद्गद - घोगरा, एकादश-अकरा, द्वादश - बारा.*

२ ***सङ्ख्यायां च*** *। प्रा.प्र.। २.१४*

३ *म. :- दीपक - दिवा, ताप-ताव, करपत्र-करवत, गोपालक-गोवळा, सपत्नी-सवत, भाद्रपद-भादवा, शिंशप-शिसवा, कृपा-कीव.*

आयुस्=आउ, आयुध=आउह; मयूर=मऊर, केयूर=केऊर (अलंकारविशेष); नियोग=निओय (आज्ञा,अधिकार), वियोग=विओग, प्रयोजन=पओयण.

**(अ)** मध्य असंयुक्त य् चा कित्येकदा ज्ज् होतो.

अङ्गुलीयक=अंगुलिज्जय (अंगठी), कञ्चुकीय=कंचुइज्ज (अंत:पुराचा प्रतीहार), कौशेय=कोसेज्ज (रेशमी वस्त्र), ग्रैवेय=गेवेज्ज (देवविशेष, गळ्याचा दागिना), नामधेय=नामधेज्ज (नाव), उत्तरीय=उत्तरिज्ज.

(९) व् : लावण्य=लायण्ण, दिवस=दियह, जीव=जीय, जिय; विवर=वियर; प्रवृत्त=पयत्त; निवृत्त=नियत्त; दिवा=दिया (दिवसा), परिवार=परियाल; कवि=कइ, सुकवि=सुकइ; प्रवृत्ति=पउत्ति.

**(अ)** मध्य असंयुक्त व् पुष्कळदा तसाच रहातो.

भावणा (भावना), देव, विवर, भवण (भवन), भुवण (भुवन), उववास (उपवास), विभव, विभाव; अहवा (अथवा), विवाह, निवास, आवास; विविह (विविध); देवी; विवेग (विवेक), पवेसमाणी.

## ६१ मध्य असंयुक्त ख् घ् थ् ध् फ् भ्

मध्य असंयुक्त ख् घ् थ् ध् फ् भ् यांच्या स्थानी ह् येतो.[१]

(१) ख्=ह् : मुख=मुह, लेख=लेह, शिखर=सिहर, नख=नह, सुख=सुह, मेखला=मेहला (कमरपट्टा), प्रमुख=पमुह, मयूख=मोह (किरण), मुखर=मुहर; शिखा=सिहा, शाखा=साहा; शिखिन्=सिहि (मोर, अग्नि); सखी=सही.

(२) घ्=ह्[२] : मेघ=मेह, ओघ=ओह, राघव=राहव, अमोघ=अमोह,

---

१ ***खघथधभाम् ।*** *हेम. १.१८७ व* ***फो भहौ।*** *हेम. १.२३६ तसे पाहिले तर ही हकार युक्त व्यंजने आहेत. तेव्हा मागील व्यंजनाचा लोप होऊन ह् राहतो. असे म्हणण्यास हरकत नाही (भांडार. पृ. ३३६ पहा)*

२ *म. :- प्राघुण-पाहुणा, लघु- (लहु)- हलु-हळू.*

जघन=जहण; मघा=महा (नक्षत्रविशेष); रघु=रहु, लघु=लहु, प्राघुण=पाहुण (पाहुणा).

(३) थ्=ह्[१] : वितथ=वितह (असत्य); रथ=रह, नाथ=नाह, कथं=कहं (कसे), यूथ=जूह, अथ=अह (नंतर); यथा=जहा, तथा=तहा, कथा=कहा, गाथा=गाहा; तिथि=तिहि, सारथि=सारहि; मिथुन=मिहुण (जोडी), मथुरा=महुरा; पाथेय=पाहेय.

(४) ध्=ह्[२]: विरोध=विरोह, बुध=बुह, वध=वह, विविध=विविह, अधर=अहर, अधम=अहम; वसुधा= वसुहा, मुधा=मुहा (व्यर्थ); बोधि=बोहि (सद्धर्मप्राप्ति), दधि=दहि, बधिर=बहिर, रुधिर=रुहिर, समाधि=समाहि, निधि=निहि, जलधि=जलहि; स्वाधीन=साहीण; मधु=महु, मधुर=महुर, साधु=साहु, सीधु=सीहु (मद्यविशेष); वधू=वहू; सामिधेय=सामिहेय (काष्ठसमूह); अधोमुख=अहोमुह.

(५) फ्=ह्[३] : रेफ=रेह (र् हा वर्ण) विफल=विहल, सफल=सहल, द्विरेफ=दुरेह, मुक्ताफल=मुत्ताहल (मोती), शिफा=सिहा (वृक्षाचे जटाकार मूल)

(६) भ्=ह्[४] :- लोभ=लोह, लाभ=लाह, आभरण=आहरण, शुभ=सुह, वल्लभ=वल्लह; शोभा=सोहा, सभा=सहा, प्रभा=पहा, प्रभात=पहाय; सुरभि=सुरहि, अभिसिंचति=अहिसिंचइ (अभिषेक करतो); प्रभु=पहु; विभूषण=विहूसण; निभृत=निहुय.

**(अ)** अर्धमागधीत मध्य असंयुक्त भ् कित्येकदा तसाच रहातो.
उभय, पभिइ (प्रभृति), सुलभ, अभिमाण (अभिमान), अभिमुह (अभिमुख), अभिभूय (अभिभूत), विभूइ (विभूति).

---

१ *(अ) थ् चा कधी कधी ढ् होतो : प्रथम=पढम, पृथ्वी=पुढवी, शिथिल=सढिल, क्वथ्=कढ (कढविणे), मेथि=मेढि (आधारस्तंभ म. : मेढा), ग्रथित=गढिय, पृथक्=पुढो. (आ) म. :- (थ्=ह्) :- कथानिका-कहाणी, मिथुन-मेहुण*

१ *(अ) मध्य असंयुक्त ध् चा कधी कधी ढ् होतो : निषध=निसढ (आ) म. :- (ध्=ह्) बधिरक-बहिरा, दधि-दहि.*

२ *पुष्कळदा मध्य असंयुक्त फ् तसाच राहतो : सफल, विफल*

३ *म. :- प्रभात=पहाट*

## ६२ मध्य असंयुक्त ट् ठ्

मध्य असंयुक्त ट् व ठ् चे अनुक्रमे ड्[१]व ढ् होतात.

(१) ट्=ड् : कट=कड (चटई), तट=तड, पट=पड, भट=भड, घट=घड, वट=वड, नट=नड, कूट=कूड (कोडे), पटल=पडल; जटाल=जडाल (जटा असलेला), जटा=जडा; कोटि=कोडि, कुटिल=कुडिल, कार्पटिक=कप्पडिय (कापडी); शाटी=साडी(साडी), नटी=नडी; कुटुम्ब=कुडुंब, पटु=पडु, कटुक=कडुय.

**(अ)** मध्य असंयुक्त ट् चा पुष्कळदा ल् होतो[२].
स्फटिक=फलिह, पिटक=पिलाग (पेटी), कटित्र=कलित्त (कंबरेचे चिलखत), चपेटा=चवेला, पाटयति=फालेइ (फाडतो), कर्कोट=कक्कोल (शाकविशेष), तटाक=तलाग (तलाव)

(२) ठ्=ढ्[३] : शठ=सढ, पठति=पढइ (पढतो), पाठ=पाढ, पिठर=पिढर (भांडे, थाळी), पीठ=पीढ, पादपीठ=पायवीढ; कुठार=कुढार (कुऱ्हाड); कठिन=कढिण

## ६३ मध्य असंयुक्त ड्

मध्य असंयुक्त ड् चा प्राय: ल् होतो[४] (**डो लः ।** हेम १.२०२)
गवेडक=गवेलग (मेंढा), गुड=गुल (गूळ), निगड=निगल (बेडी), एडक=एलग (एडका), गरुड=गरुल, षडस्र=छलंस (सहा बाजू असलेले) षोडश=सोलस, आपीड=आवील (तुरा), वडवा=वलवा (घोडी),

---

१ *(अ) **टो डः ।** हेम. १.१९५, व **ठो ढः ।** हेम. १.१९९ (आ) म : (ट्=ड्):- तट-तड, कटक-कडे, वट-वड, शाटी-साडी, कुटज=कुडा, मर्कट=माकड, कर्पट=कापड, कीट=कीड, कपाट=कवाड, कटु=कडु, घटक-घडा.*

२ *म : तटाक-तलाव*

३ *(अ) मध्य असंयुक्त ठ् चा कधी ह् होतो : कुठार = कुहाड, पिठर=पिहड. (आ) म : (ठ्=ढ्) : पठ्-पढणे, पीठिका-पिढी.*

४ *म : तडाग-तलाव, दाडिम (डालिम) डाळिंब, पीड्-पिळणे.*

ताडन=तालेइ (मारतो), क्रीडन=कीलण (खेळणे), पीडा=पीला, क्रीडा, कीला.

**(अ)** मध्य असंयुक्त ड् कधी कधी तसाच राहतो

निबिड, पीडिय (पीडित), नीड, गउड (गौड)

**(आ)**मध्य असंयुक्त ड् चा कधी कधी र् होतो.

वैडूर्य=वेरुलिय, बिडाल=बिराल (मांजर), बिडाली=बिराली (मांजरी)

**६४ मध्य असंयुक्त न्**

मध्य असंयुक्त न् चा ण् होतो[१] (**नो णः ।** हेम. १.२२८)

दान=दाण, तनय=तणय, आसन=आसण, जिन=जिण, मान=माण, वन=वण, कानन=काणण, अनंत=अणंत, जन=जण, यान=जाण (वाहन), दिन=दिण, पवन=पवण, धन=धण, अनंग=अणंग; सेना=सेणा, अनाथ=अणाह, अधुना=अहुणा (आता); मुनि=मुणि; रजनी=रयणी, मेदिनी=मेइणी, इदानीम् =इयाणिं, जननी=जणणी; अनुराग=अणुराय, अनुकम्पा=अणुकंपा, जानु=जाणु, मनुज=मणुय; अनेक=अणेग; विनोद=विणोय.

**६५ मध्य असंयुक्त ब्**

मध्य असंयुक्त ब् चे पुढीलप्रमाणे विविध विकार होतात.

(अ) कधी कधी ब् चा लोप होतो. उदाः अलाबु=अलाउ, लाउ(भोपळा)

(आ) कधी कधी ब् चा भ् होतो. उदाः बिम्बिसार=भिंभिसार

(इ) कधी कधी ब् चा म् होतो. उदाः कबन्ध=कमंध (धड)

(ई) पुष्कळदा ब् चा व् होतो (**बो व : ।** हेम. १.२३७)

कबन्ध=कवंध, क्लीब=किलीव (नपुंसक), शबर=सवर, स्तबकित=थवइय (गुच्छयुक्त), कबरी=कवरी (केशपाश, वेणी) शबल=सवल (चित्रविचित्र रंगाचे), शिबिर=सिविर, शिबिका=सिविया (पालखी)

---

१ *(अ) तथापि हेमचंद्र आणखी असे म्हणतो की अर्धमागधीत मध्य असंयुक्त न् चा कधी ण् होत नाही. उदा. अनिल, अनल इ. तथापि डॉ. वैद्यानी (पृ.१७) म्हटल्याप्रमाणे मध्य असंयुक्त न् चा ण् करणे हे अयोग्य नाही. (आ) म. :- (न्=ण्) : पानीय-पाणी, कठिन-कढिण, स्वजन-सजणा.*

(उ) कधी कधी ब् तसाच रहातो. उदा: विबुध=विबुह

### ६६ मध्य असंयुक्त र्

मध्य असंयुक्त र् चा ल् होतो.[१]

युधिष्ठिर=जुहिट्ठिल, परिवार=परियाल, चरण=चलण, सुकुमार=सुकुमाल, मुखर=मुहल, रुचिर=रुइल, अङ्गार=इंगाल; किरात=चिलाय; परिखा=फलिहा (खंदक), अन्तरिक्ष=अंतलिक्ख, दरिद्र=दलिद्द, हरिद्रा=हलिद्दा, परिघ=फलिह; करुण=कलुण

(अ) मध्य असंयुक्त र् पुष्कळदा तसाच रहातो.

पर, परम, परसु (परशु), सिरिस (शिरीष), वराय (वराक), दुरिय (दुरित), अरि (शत्रु), उवरोह (उपरोध)

### ६७ मध्य असंयुक्त श् ष्

मध्य असंयुक्त श् व ष् यांचा स् होतो.[२] (**शषोः सः ।** हेम. १.२६०)

(१) श्=स् :- केश=केस, कुश=कुस, कुशल=कुसल, देश=देस, अङ्कुश=अंकुस, वश=वस, कृश=किस; प्रशंसा=पसंसा, साशङ्क=सासंक; निशा=निसा, आशा=आसा; राशि=रासि, शिशिर=सिसिर; काशी=कासी; शिशु=सिसु, अशुचि=असुइ, पशु=पसु, अशुभ=असुभ; विशेष=विसेस, अवशेष=अवसेस. अशोक=असोग.

(२) ष्=स् :- घोष=घोस, विषय= विसय, दोष=दोस, विषम= विसम, रोष=रोस, पुरुष=पुरिस, माष=मास (उडीद); भाषा=भासा, कषाय=कसाय, मृषा=मुसा, विषाद=विषाय, तुषार=तुसार (जलकण, बर्फ), तृषा=तिसा; ऋषि=इसि, विभूषित=विभूसिय; महिषी=महिसी; इषु=इसु (बाण); अभिषेक= अभिसेय.

(अ) मध्य असंयुक्त श् व ष् यांचेबद्दल कधी कधी ह् होतो.

---

१ ***हरिद्रादौ लः।*** *हेम. १.२५४,* ***हरिद्रादीनां रो लः।*** *प्रा.प्र.२.३०*

२ *म. :- श्वशुर-सासरा, पाश-फास, राशि-रास, केश-केस; महिषी-म्हैस, प्रावृष-पाउस, मनुष्य-माणूस*

(१) श्=ह्[१] :- दश=दह, दशमुख=दहमुह, एकादश=एयारह, द्वादश=बारह, दशवदन=दहवयण.

(२) ष्=ह् :- भीषण=बीहण, षष्=छह (सहा), प्रत्यूष=पच्चूह (सकाळ); धनुस=(धनुस्+अ) धणुह, कार्षापण=काहावण, पाषाण=पाहाण.

## ६८ मध्य असंयुक्त स्

(अ) मध्य असंयुक्त स् चा कधी कधी ह् होतो

दिवस=दियह, चतु:सप्तति=चउहत्तरि (७४); पंचहत्तरि[२], सत्तहत्तरि, अट्ठहत्तरि

(आ) मध्य असंयुक्त स् चा क्वचित् व् होतो.

त्रिसप्तति=तेवत्तरि, द्वासप्तति=बावत्तरि (७२)

(इ) मध्य असंयुक्त स् प्राय: तसाच रहातो.

सासण (शासन), तावस (तापस), पिवासा (पिपासा), माणस (मानस), आसण (आसन), अवसाण (अवसान)

## ६९ मध्य असंयुक्त व्यंजनांचे अनियमित विकार

काही मध्य असंयुक्त व्यंजनांचे तुरळकपणे आढळणारे विकार पुढे दिले आहेत. त्यांना अनियमित म्हणण्यास हरकत नाही.

क् = ख् : किङ्किणी=खिंखिणी

क् = घ् : निकष=निघस

क् = भ् : शीकर=सीभर (तुषार, जलकण)

क् = म् : चन्द्रिका=चंदिमा (चांदणे)

क् = व् : यूका=जूवा (ऊ), स्तोक=थोव, द्विकार्ध=दिवड्ढ (दीड)

क् = स् : कन्दुक=तिंदुस

क् = ह् : फलक=फलह, स्फटिक=फलिह, निकष=निहस, शीकर=सीहर

ख् = क् : शृङ्खला=संकला, शृङ्खलित=संकलिय.

---

१ *(अ)* ***दशादिषु हः।*** *प्रा.प्र. २.४४ (आ) म. :- दश-दहा*

२ *संख्यावाचके पहा*

[(ख् = घ् : आख्यापना=आघावणा (सांगणे), आख्यापयति=आघवेइ (सांगतो)]
ग् = घ् : शृङ्गाटक=सिंघाडग (शिंगाडा; त्रिकोणमार्ग)
ग् = व्[१] : युगल=जुवल, दुर्भग=दूहव, सुभग=सूहव
ज् = ग् : निरञ्जन=निरंगण, अभ्यञ्जयति=अब्भंगावेइ, अभ्यञ्जन=अब्भंगण (तेल,उटी इ. लावणे)
ज् = र् : व्यवसृजति=वोसिरइ (त्याग करतो), निसृजति=निसिरइ (बाहेर पडतो)
ट् = ढ् : वट=वढ, चिपिट=चिमिढ (चपटा)
ण् = ल् : वेणु=वेलु (म.वेळू)
त् = ढ् : प्रसृत=पसढ, उत्सृत=ऊसढ, समवसृत=समोसढ
[(त् = ण् : ऐरावत = एरावण)]
त् = र् : सप्तति=सत्तरि (७०); बावत्तरि, तेवत्तरि[२], इ. (म: सत्तर, इ.)
त् = ल् : असित=असिल, सातवाहन=सालवाहण, अतसी=अलसी (अळशी)
त् = व्[३] : प्रद्योतित=पज्जोविय
त् = ह् : भरत=भरह, भारत=भारह, वसति=वसहि, भारती=भारही[४]
द् = ड्[५] : सन्दश= संडास (सांडशी), भिन्दिपाल=भिंडिमाल (शस्त्रविशेष)
द् = व् : रुदति=रोवइ (रडतो)
द् = ह् : ककुद् = (ककुद्+अ) कउह (वशिंड)
प् = भ् : कच्छप= कच्छभ (कासव), कपाल=कभल्ल (कवटी,खापर), स्तूप=थूभ (स्मृतिस्तंभ), विपाशा=विभासा (एका नदीचे नाव)
प् = म् : चिपिट=चिमिढ, नीप=नीम, आपीड=आमेल, कुणप=कुणिम (प्रेत), वनीपक=वणीमग (याचक), विटप=विडिम (फांदी), स्वप्न=सुमिण, भिन्दिपाल=भिंडिमाल

---

*१ म. :- तडाग-तलाव*

*२ संख्यावाचके पहा*

*३ म. :- भ्रातृजाया-भावजय, हरित=हिरवा, अवनत-ओणवा, कातरक=कावरा*

*४ समरा. पृ. ५८०*

*५ म. :- शद्=सडणें*

म्=लोप[१] : यमुना=जउणा
म्=व्[२] : अभिमन्यु=अहिवन्नु, नमस्कार=नवकार
य्=ग् : पर्याय=परियाग
य्=र् : स्नायु=ण्हारु
य्=व्[३] : पर्याय=पज्जव, त्रयस्त्रिंशत्=तावत्तीसा (३३)
य्=ह् : छाया=छाही
र्=ड् : कुठार=कुहाड, पिठर=पिहड
र्=ण् : करवीर=कणवीर (कण्हेर), करवीरदत्त=कणेरदत्त
ल्=र्[४] : किल=किर, शाल्मली=सामरी (म. : सांवरी), स्थूल=थोर
व्=ग् : महानुभाव=महाणुभाग, निह्नव=निण्हग (सत्यापलाप), आस्रव=अण्हग
व्=म् : द्राविडी=दमिली, वैश्रवण=वेसमण.
श्=ड् : कर्कश=कक्खड
ष्=व् : द्वाषष्टि=बावट्ठि (६२), तेवट्ठि, छावट्ठि[५]
ष्=ण्ह् : स्नुषा=सुण्हा
ह्=घ् : संहनन=संघयण (शरीर, समुदाय)
ह्=भ् : निहेलन=निभेलण (घर), वैहार=वेभार (पर्वतविशेष)

### ७० समासांत

समासांत उत्तर पदाच्या आद्य असंयुक्त व्यंजनाला विकल्पाने आद्य वा मध्य मानले जाते. मग त्यानुसार त्यात विकार होतात.

---

१ *म. :- भूमि=भुई*

२ *म. :- जामातृ=जावई, सीमन्=शीव, कुमारी=कुंवार, श्यामल-सावळा, गोस्वामी-गोसावी, आमलक-आवळा, विश्राम-विसावा, ग्राम-गाव, नाम=नाव, सामंत-सावंत, चामर-चवरी, कोमल-कोवळा, दामन्-दावे.*

३ *म. :- माया-माव*

४ *म. :- लांगल-नांगर, शाल्मली-सांवरी, स्थूल-थोर*

५ *संख्यावाचके पहा*

आद्य मानून : सु-पुरुष=सुपुरिस, राज-पुत्र=रायउत्त, दिन-कर=दिणयर.

मध्य मानून :- सु-पुरूष=सुउरिस, राज-पुत्र=रायउत्त, दिन-कर=दिणयर,

आर्यपुत्र=अज्जउत्त, तीर्थकर=तित्थयर, वन-चर=वणयर, स्व-जन= सयण, प्रजापती=पयावइ, धरणी-तल= धरणीयल. जल-धर= जलहर, मधु-कर = महुयर.

(अ) मागे उपसर्ग असताही वरीलप्रमाणेच होते.

आद्य मानून : सुकृत=सुकय, अनु-कम्पा = अणुकंपा

मध्य मानून : अनुकूल=अणुऊल, प्रतिपाल=पडिवाल, परिजन=परियण

## ७१ अन्त्य असंयुक्त व्यंजनांचे विकार

अर्धमागधीत व्यंजनान्त शब्द चालत नसल्याने असे संस्कृत शब्द व्यंजनान्त राहणार नाहीत, असे केले जाते. त्यासाठी मुख्यत: दोन पद्धतींचा अवलंब केला जातो : (१) अन्त्य व्यंजनाचा लोप करणे अथवा (२) अन्त्य व्यंजनात एखादा स्वर मिळवून ते स्वरान्त करणे.

या दोन मुख्य व इतर काही प्रकाराची माहिती पुढे दिली आहे.

## ७२ अन्त्य असंयुक्त व्यंजनाचा लोप

शब्दातील अन्त्य असंयुक्त व्यंजनाचा लोप केला जातो[१].

(अ) यावत्[२]=जाव, तावत्=ताव, पश्चात्=पच्छा, कदाचित्=कयाइ, भोस्=भो, मनाक्=मणा, समन्तात्=समंता, धिक्=धी

(आ) सुहृद्=सुहि, अंगविद्=अङ्गवि (अंगग्रंथ जाणणारा)

(इ) तकारान्त् शब्दांच्या अन्त्य त् चा लोप[३] :

जगत् = जग, विद्युत्=विज्जु, परिषत्=परिसा, तडित्=तडि (वीज)

---

१ *शब्दानां यद् अन्त्यव्यंजनं तस्य लुग् भवति। हेम १.११*

२ *येथे अव्ययातील अन्त्य व्यंजनाचा लोप झाला आहे.*

३ *म. :- जगत् -जग, विद्युत्-वीज.*

(ई) नकारान्त शब्दांच्या अन्त्य न् चा लोप[१] :

(१) जन्मन्=जम्म, दामन्=दाम (माळ, दोरी), नामन्=नाम, कर्मन्=कम्म

(२) शशिन्=ससि, दण्डिन्=दंडि, शिखरिन्=सिहरि, कामिन्=कामि, एकाकिन्=एगागी, विरहिन्=विरहि, रूपिन्=रूवि, प्राणिन्=पाणि

(३) तपस्विन्=तवस्सि, मेधाविन्=मेहावि, ओजस्विन्=ओयंसि, तेजस्विन्=तेयंसि, यशास्विन्=जसंसि.

(उ) सकारान्त शब्दांच्या अन्त्य स् चा लोप[२] :

(१) तमस्= तम, नभस्=नह, शिरस्=सिर, यशस्=जस, तपस्=तउ, उरस्=वर, रजस्=रय.

(२) हविस्=हवि, ज्योतिस्=जोइ, सर्पिस्=सप्पि, अर्चिस्=अच्चि

(३) धनुस्=धणु, चक्षुस्=चक्खु, आयुस्=आउ

### ७३ अन्त्य असंयुक्त व्यंजनाचा अनुस्वार

अन्त्य असंयुक्त न्, म् व इतर[३] काही व्यंजने यांचा अनुस्वार होतो. अशातऱ्हेने अन्त्य असंयुक्त व्यंजन टाळले जाते.

(१) न् : भगवन्=भगवं, अस्मिन्=अस्सिं, पचन्=पयं, कुर्वन्=कुव्वं, राजन्=रायं, आत्मवान्=आयवं, तिष्ठन्=चिट्ठं, ज्ञानवान्=नाणवं.

(२) म्[४]: इदानीम्=इयाणिं, कर्तुम्=काउं, अहम्=अहं, जलम्=जलं, नदीम्=नइं, वत्सम्=वच्छं, फलम्=फलं, गिरिम्=गिरिं.

(३) इतर व्यंजने : मनाक्=मणं (थोडेसे), साक्षात्=सक्खं, सकृत्=सइं (एकदा), सम्यक्=सम्मं, प्रातस्=पायं, ईषत्=ईसिं, विष्वक्=वीसुं (सर्वत्र), यद्=जं,

---

१ *म. :- जन्म, कर्म, दाम; प्राणि, हत्ती (हस्तिन्), पक्षी (पक्षिन्), ज्ञानी (ज्ञानिन्); ओजस्वी, तेजस्वी, यशस्वी; इ.*

२ *म. :- रज, तम, पय, नभ, शिर, यश, तप, उर, तेज, ओज; हवि, ज्योति, चक्षु, आयु.*

३ *ही व्यंजने प्राय: अव्ययांच्या अन्ती असणारी आढळतात.*

४ *अन्त्यमकारस्य अनुस्वारो भवति । हेम. १.२३*

तद्=तं, यावत्=जावं, तावत्=तावं, युगपद्=जुगवं (एकदम), असकृत्=असइं (वारंवार)

(अ) कधी कधी अन्त्य व्यंजनाचा उ होऊन, तो मागील 'अ' या स्वरांत मिळून ओ झालेला आढळतो.

पृथक्=पुढो, पुनर्=पुणो, अन्तर्=अंतो, अधस्=अहो.

**७४ अन्त्य असंयुक्त व्यंजनात स्वर मिळविणे**

असंयुक्त व्यंजनान्त नामात स्वर मिळवून ते स्वरान्त[१] केले जातात: पुल्लिंगी व नपुसकलिंगी नामात 'अ', व स्त्रीलिंगी नामात 'आ' वा 'इ' हे स्वर मिळविले जातात.

(१) अ मिळविणे[२] : शरद्=सरय, भिषज्=भिसय, प्रावृष्=पाउस, मरुत्=मरुय, धनुस्=धणुह, दीर्घायुस्=दीहाउस, साक्षिन्=सक्खिण, कृमिन्=किमिण, बर्हिन्=बरहिण, गर्भिन्=गब्भिण.

(२) आ मिळविणे[३] : सरित्=सरिया, सम्पद्=संपया, दिश्=दिसा, क्षुध्=छुहा, वाच्=वाया, धुर्=धुरा, ककुभ्=कउहा, चिरायुस्=चिराउसा, आशीस्=आसीसा, गिर्=गिरा, प्रतिपद्=पाडिवया, अप्सरस्=अच्छरसा, पुर्=पुरा.

(३) इ मिळविणे : दिश्[४]=दिसि, आपद्=आवइ, विपद्=विवइ.

---

१ *काही अन्नन्त शब्दात अन्त्य न् चा लोप करून व पुन: अन्ती 'आण' मिळवून ते स्वरान्त केलेले आढळतात: मूर्धन्=मुद्धाण, युवन्=जुवाण, श्वन्=साण, अध्वन्=अध्दाण.*

२ *म. :- शरद, पाउस, दंडवत (दंडवत्), आपण (आत्मन्)*

३ *म. :- सरिता, संपदा, दिशा, क्षुधा, वाचा, धुरा, गिरा, प्रतिपदा.*

४ *पा.स.म., पृ. ५७०*

**७५ अत् प्रत्ययान्त व.का.धा.वि. आणि वत् मत् प्रत्ययान्त तकारान्त शब्द**

अत् प्रत्ययान्त व.का.धा.वि., आणि मत् व वत् प्रत्ययान्त शब्द यांचे अंत, मंत, वंत होऊन ते स्वरान्त होतात.

जयंत (यतत्), अरहंत (अर्हत्), गच्छंत (गच्छत्), गायंत (गायत्), रक्खंत (रक्षत्); धीमंत (धीमत्); भगवंत (भगवत्)

**७६ अन्ती असंयुक्त व्यंजन असणारे धातु**

असंयुक्त व्यंजनान्त धातूत प्राय: अ हा स्वर मिळवून ते अकारान्त केले जातात.[२]

वम्=वम, वस्=वस, वह्=वह, चल्=चल, चर्=चर.

**७७ अन्त्य विसर्गाचे विकार**

अन्त्य विसर्गाचे विविध विकार पुढीलप्रमाणे होतात:

(१) अन्त्य विसर्गाच्या पूर्वी अ हा स्वर असल्यास, अवर्णासह विसर्गाचा ओ होतो (**अतो डो विसर्गस्य।** हेम. १.३७).

(अ) देव:=देवो, भवत:=भवओ, तत:=तओ, अत:=अओ, कुत:=कओ, यत:=जओ, अन्त:=अंतो, प्रात:=पाओ, पुन:=पुणो.

(आ) सर्वत[३]:=सव्वओ, अग्रत:=अग्गओ, मार्गत:=मग्गओ, धर्मत:=धम्मओ.

(२) पूर्वी अ असूनही कधी कधी अवर्णासह विसर्गाचा ए होतो.

(अ) पुरुष:= पुरिसे, देव:=देवे, न:=णे.

(आ) काही क्रियाविशेषण अव्ययातही अवर्णासह विसर्गाचा ए होतो. अध:=अहे, पुर:=पुरे, रह:=रहे, श्व:=सवे.

(३) पूर्वी अ असूनही कधी कधी विसर्गाचा नुसता लोप होतो: पुन:=पुण, उण.

---

१ *म. :- संत; श्रीमंत, हनुमंत; भगवंत, धणवंत.*

२ *धातुसाधनिका, परि. १३४ पहा.*

३ *प्राय: तस् प्रत्ययान्त शब्दातील विसर्गाचा मागील अवर्णासह ओ होतो.*

(४) विसर्गाच्या पूर्वी अ खेरीज इतर कोणताही स्वर असता विसर्गाचा लोप होतो, व मागील स्वर ह्रस्व असल्यास तो दीर्घ होतो; मागील स्वर दीर्घ असल्यास तो तसाच राहतो.

(अ) मुनिः=मुणी, गुरुः=गुरू (आ) देवाः= देवा, वधूः=वहू

(५) काही क्रियाविशेषण अव्ययात अन्त्य विसर्गाचा अनुस्वार होतो.

बहिः=बाहिं, मुहुः=मुहुं, प्रादुः=पाउं, अधः=अहं, पुरः=पुरं, प्रातः=पायं.

(६) पुढील शब्दातील अन्त्य विसर्गाचे विकार विशिष्ट आहेत.

उच्चैः[१]=उच्चा, शनैः=सणियं

---

*१. याकोबी, (Erga), पृ. ३०*

**प्रकरण ६**

# संयुक्तव्यंजन–विकार

## ७८ प्राथमिक

जेव्हा दोन (अगर अधिक) व्यंजने मध्ये व अन्ती स्वर न येता एकत्र येतात, तेव्हा संयुक्त व्यंजन[१] होते. उदा. प्स्, क्र्, म्र्, त्र्, त्स्न् इ. संयुक्त व्यंजनातील प्रत्येक व्यंजनाला त्या संयुक्त व्यंजनाचा अवयव म्हणावे. उदा. प्स् हे प् व स् या व्यंजनांनी बनले आहे; म्हणून प् व स् हे प्स् चे अवयव होत; तसेच त्स्न् चे अवयव त्, स्, न् हे होत.

संयुक्त व्यंजनात ज्या व्यंजनाचा उच्चार प्रथम होतो तो अवयव प्रथम होय; याच रीतीने अवयव द्वितीय (तृतीय असे) ठरतात. उदा. क्र् मध्ये क् चा उच्चार प्रथम, नंतर र् चा उच्चार; म्हणून क् हा प्रथम अवयव आणि र् हा दुसरा अवयव. त्स्न् मध्ये त् पहिला, स् दुसरा व न् तिसरा अवयव होय.

## ७९ संस्कृत व अर्धमागधी : संयुक्तव्यंजने : तौलनिक विचार

(१) संस्कुतमध्ये संयुक्तव्यंजन शब्दांच्या आद्य (उदा.स्कन्द, स्तम्भ), मध्य (उदा. चक्र, दर्प), व अन्त्य (उदा. तर्ज्, मस्ज्) स्थानी चालू शकते. अर्धमागधीत शब्दाच्या आद्य व अन्त्य स्थानी संयुक्तव्यंजन चालत नाही; फक्त मध्य स्थानी मात्र ते राहू शकते. (२) संस्कृत मधील संयुक्त व्यंजनात दोहोपेक्षा अधिक व्यंजने चालतात. उदा. क्त्य, क्ष्म, घ्न्य, च्छ्र (तीन अवयव); त्स्न्य, क्ष्र्य (चार अवयव); त्स्न्र्य (पाच अवयव) अर्धमागधीत मात्र संयुक्त व्यंजनात

---

१ *संयुक्त व्यंजनात अन्ती स्वर मिळाला की संयुक्ताक्षर वा जोडाक्षर होते. उदा. प्स, त्र, क्रा, द्ध, प्नो, इ.*

दोनच व्यंजने असतात; दोहोपेक्षा अधिक व्यंजने चालत नाहीत. (३) संस्कृतातील संयुक्त व्यंजने भिन्नभिन्न प्रकारची असू शकतात : सवर्गीय (एकाच वर्गातील व्यजनांची): उदा. उच्च, रज्जु, वञ्चित, मञ्जरी, बद्ध, चण्ड, कुट्टिम, कुक्कुट, तुच्छ, तुण्ड, सज्जन, चित्त, निमित्त, मन्दर, शङ्ख, पाप्मन्; विवर्गीय (भिन्नवर्गीय व्यंजनांची): उदा. रुक्मिणी, अब्धि, शब्द; विजातीय (वर्गीय व्यंजने व इतर उष्म, अंतस्थ-व्यंजने यांच्या संयोगाने झालेली) उदा : शक्य, भास्कर, पुष्कर, मार्ग, तक्र, गुह्य, ब्रह्मन्, पक्व, कार्य, तीव्र, शल्य, मत्स्य, कष्ट, पक्ष, दृश्य, पक्ष्मन्); किंवा सजातीय (अंतस्थ व ऊष्म यांच्या द्वित्वाने बनलेली) उदा : वल्लभ, मल्लिका, निश्शरण, दुश्शासन, निष्षिक्त, इ. अर्धमागधीत विवर्गीय व विजातीय संयुक्त व्यंजने अजिबात चालत[१] नाहीत; सवर्गीयापैकी काही विशिष्ट प्रकारांनी सिद्ध झालेली (उदा. त्त, क्क, च्च, ज्ज, इ.) संयुक्त व्यंजने चालतात. सजातीय ही द्वित्वानेच होत असल्याने (उदा. ल्ल,व्व,स्स) ती अर्धमागधीत चालतात.

### ८० संयुक्तव्यंजन-विकारांचे स्वरूप

साहजिकच संस्कृत शब्दातील संयुक्त व्यंजने अर्धमागधीत येताना त्याच्यात पुढीलप्रमाणे विकार व्हावे लागतात : (१) दोहोपेक्षा अधिक अवयव असलेली संयुक्त व्यंजने द्वि-अवयवी केली जातात. (२) भिन्नवर्गीय व विजातीय संयुक्त व्यंजने अर्धमागधीत चालण्यासारखी करून घेतली जातात; सवर्गीयातही जी चालण्यासारखी नसतील ती चालण्यासारखी करून घ्यावी लागतात; सजातीयापैकी द्वित्वाने बनलेली ल्ल, व्व, स्स एवढींच अर्धमागधीत चालतात. (३) शब्दाचे आद्य व अन्त्य स्थानी अर्धमागधीत संयुक्तव्यंजन चालत नसल्याने त्यांनाही योग्य ते विकार व्हावे लागतात.

आता, संयुक्त व्यंजनांचे कसे व कोणते विकार होतात, हे पाहण्यापूर्वी अर्धमागधीतील संयुक्तव्यंजने कोणत्या विशिष्ट प्रकारांनी बनतात, हे जाणून घेणे आवश्यक आहे.

---

१ *याला अपवाद : वंद्र (समूह)*

**८१ अर्धमागधीतील जोडाक्षरांची घटना**

(१) सवर्गीय व्यंजनांची खालीलप्रकारे सिद्ध झालेली जोडाक्षरेच अर्धमागधीत चालतात, इतर नाही.

(अ) प्रत्येक वर्गातील पहिल्या व तिसऱ्या व्यंजनाची जोडाक्षरे त्याचे द्वित्व होऊन सिद्ध व्हावी लागतात : क्क, ग्ग; च्च, ज्ज; ट्ट, ड्ड; त्त, द्द; प्प, ब्ब.

(आ) प्रत्येक वर्गातील दुसऱ्या व चौथ्या व्यंजनाची जोडाक्षरे स्ववर्गातील अनुक्रमे पहिल्या व तिसऱ्या व्यंजनाशी संयोग पावून सिद्ध व्हावी लागतात; त्यांतही पहिले व तिसरे व्यंजन हे प्रथम अवयवच असले पाहिजे. उदा. क्ख, ग्घ; च्छ, ज्झ; ट्ठ, ड्ढ; त्थ, द्ध; प्फ, ब्भ.

(इ) प्रत्येक वर्गातील पहिल्या चारही व्यंजनांचा स्ववर्गीय अनुनासिकाशी संयोग होऊन जोडाक्षरे सिद्ध होतात; येथे ही अनुनासिक हे प्रथम अवयवच असले पाहिजे. उदा. ङ्क, ङ्ख, ङ्ग, ङ्घ; ञ्च, ञ्छ, ञ्ज, ञ्झ; ण्ट, ण्ठ, ण्ड, ण्ढ; न्त, न्थ, न्द, न्ध; म्प, म्फ, म्ब, म्भ.

(ई) ण्, न्, म् यांचे द्वित्व होऊन ण्ण्, न्न्, म्म् अशी संयुक्तव्यंजने सिद्ध होतात. ङ् चे द्वित्व होत नाही. ञ् च्या द्वित्वाने बनलेले संयुक्तव्यंजन अर्धमागधीत चालत नाही.

वरीलखेरीज इतर कोणत्याही प्रकाराने होणारी वर्गीय व्यंजनाची संयुक्त व्यंजने अर्धमागधीत चालत नाहीत.

(२) अंतस्थांची जोडाक्षरे : अंतस्थांची जोडाक्षरे पुढीलप्रमाणेच व्हावी लागतात[१]: (अ) ल् आणि व् याचे द्वित्व होऊन. उदा. ल्ल् , व्व्.

(३) उष्माची जोडाक्षरे : स् हा एकच उष्मवर्ण अर्धमागधीत आहे. त्याचे द्वित्व

---

१ *(अ) अंतस्थांचा परस्पर संयोग होऊन बनणारी उदा. ल्य, र्य, व्र, व्य) जोडाक्षरे अर्धमागधीत चालत नाहीत. (आ) र् चे द्वित्व होत नसल्याने (रेफहकारयोर्द्वित्वं न भवति । हेम. २.९३) द्वित्व होऊन होणारे र् चे जोडाक्षर अर्धमागधीत नाही. (इ) य् चे द्वित्व होऊन होणारे य्य् हे संयुक्त व्यंजन अर्धमागधीत चालत नाही. पण य् चा ज् होऊन य्य् चा ज्ज् होतो (घाटगे, पृ.५४ पहा).*

होऊन स्स् हे संयुक्तव्यंजन सिद्ध होते.

(४) ह् : महाप्राण ह् हा प्रथम अवयव असता इतर व्यंजनांशी त्याची होणारी जोडाक्षरे (उदा. ह्य, ह्व, ह्न, ह्र, ह्म, ह्ल, ह्ण) अर्धमागधीत चालत[१] नाहीत. तसेच ह् चे द्वित्वही होत नसल्याने द्वित्वाने बनणारे ह् चे जोडाक्षर अर्धमागधीत नाही.[२]

## ८२ संयुक्तव्यंजनांचे विकार[३] : भिन्न पद्धति

संस्कृतशब्दातील संयुक्तव्यंजने अर्धमागधीत घेतली जाताना परि. ८१ मध्ये सांगितलेल्या कोणत्यातरी प्रकारात बसण्यासारखी करून घेतली जातात. त्यासाठी प्राय: 'समानीकरण' या पद्धतीचा उपयोग केला जातो. कधी, समानीकरण झाल्यावर होणाऱ्या द्वित्वातील एका अवयवाचा लोप करून (त्याचवेळी मागील स्वर ऱ्हस्व असल्यास तो दीर्घ करून) जोडाक्षराचेच उच्चाटन केले जाते (सुलभीकरण[४]) केव्हा, जोडाक्षरातील व्यंजनात एखादा जादा स्वर घालून जोडाक्षर नाहीसे करण्यात येते (स्वरभक्ति[४]) कधी, उच्चाराच्या सुलभतेसाठी शब्दातील पहिल्या जोडाक्षरामागे एखादा अधिक वर्ण उच्चारला जातो (आदिवर्णागम[४]).

तथापि संस्कृतमधील जोडाक्षरे अर्धमागधीत चालती करून घेण्याच्या दृष्टीने समानीकरण हे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याचाच आता प्रथम विचार केला आहे.

---

१ *ण्ह (न्ह), म्ह, ल्ह, हीं हकारयुक्त व्यंजने अर्धमागधीत चालतात.*

२ *अर्धमागधीत चालणाऱ्या जोडाक्षरासाठी परि. १५ पहा.*

३ *आता, प्रथम मध्य संयुक्तव्यंजनाचे विकार सांगितले आहेत. कारण तेच आद्य व अन्त्य संयुक्तव्यंजनांना बहुतांशी लागू पडतात. मग, आद्य व अन्त्य संयुक्तव्यंजन विकारांची माहिती दिली आहे.*

४ *सुलभीकरण, स्वरभक्ति, आदिवर्णागम यांचे माहितीसाठी 'भाषाशास्त्रीय वर्णादेश', प्रकरण ७ पहा.*

### ८३ समानीकरण

संस्कृतमधील जी संयुक्त व्यंजने अर्धमागधीत चालत नाहीत ती चालती करून घेताना – म्हणजे अर्धमागधीत चालू शकणाऱ्या एखाद्या संयुक्त व्यंजनासारखी करून घेताना – संयुक्त व्यंजनाच्या दोन[१] अवयवांपैकी एक दुसऱ्या अवयवासमान केला जातो. म्हणजे त्यातील एक व्यंजन दुसऱ्याला आपल्यासारखे[२] करते. यालाच समानीकरण म्हणतात. समानीकरण म्हणजे समान करणे संयुक्तव्यंजनातील एका व्यंजनाचे दुसऱ्याकडून समानीकरण होते म्हणजे ते व्यंजन दुसऱ्याला आपल्यासमान, आपल्यासारखे, आपल्याला चालेल असे करते; त्याचे रूप बदलून त्याला आपल्याला चालेल असे रूप देते. हेच निराळ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास, समानीकरणात कोणत्या तरी एका व्यंजनाचा लोप होऊन उरलेल्याचे द्वित्व होते.

या लोप पावणाऱ्या व्यंजनाच्या स्थानावरून समानीकरणाचे दोन प्रकार करता येतात : (१) जेव्हा पहिला अवयव लोप पावून दुसऱ्याचे द्वित्व होते, तेव्हा त्याला पूर्वगामी समानीकरण म्हणतात. उदा. भक्त=भ+क्+त्+अ = भ+0+त्+अ = भ+त्त्+अ= भत्त;रक्त=रत्त.

(२) जेव्हा दुसरा अवयव लुप्त होऊन पहिल्याचे द्वित्व होते, तेव्हा त्याला पुरोगामी समानीकरण म्हणतात. उदा. पुत्र=पु+त्+र्+अ = पु+त्+0+अ= पु+त्त्+अ= पुत्त; रम्य=रम्म.

### ८४ कोणत्या अवयवाचा लोप? कोणत्या अवयवाचे द्वित्व?

समानीकरणात संयुक्तव्यंजनातील एका अवयवाचा लोप होऊन उरलेल्याचे द्वित्व होते. आता, कोणत्या अवयवाचा लोप होऊन कोणत्या अवयवाचे द्वित्व होते, याबद्दल नियम असा आहे: अधिक बल. असलेला अवयव कमी बलाच्या

---

१ *प्रथम द्वि–अवयवी संयुक्तव्यंजनांच्या विकारांचा विचार केला आहे. दोहोंपेक्षा अधिक अवयवी जोडाक्षरांच्या समानीकरणाचा विचार पुढे केला आहे.*

२ *हकार प्रथम असलेली जोडाक्षरे, अनुनासिक+स्पर्श, इत्यादि काही जोडाक्षरांचे समानीकरण होत नाही. त्यांचा पुढे स्वतंत्र विचार केला आहे.*

अवयवाला स्व-समान करतो; अवयव समान बलाचे असता द्वितीय स्थानचा अवयव प्रथमस्थानीय अवयवाला आपल्या समान करतो. निराळ्या शब्दांत, संयुक्तव्यंजनाचे अवयव असमान बलाचे असता कमी बलवानाचा लोप होऊन उरलेल्या अधिक बलवान अवयवाचे द्वित्व होते; समानबली अवयव असता प्रथमस्थानीय अवयवाचा लोप होऊन द्वितीयस्थानीय अवयवाचे द्वित्व होते.

व्यंजनांचा बलक्रम उतरत्या क्रमाने असा आहे: (१) स्पर्शव्यंजने[१] (प्रत्येक वर्गांतील पहिली चार व्यंजने) (२) अनुनासिके[२] (३) ऊष्मवर्ण (४) ल् व् य् र् गणितांतील चिह्नांनी दाखवावयाचे म्हटल्यास स्पर्श > अनुनासिक > उष्म > ल् > व् > य् > र् किंवा र् < य् < व् < ल् < ऊष्म < अनुनासिक < स्पर्श.

**८५ द्वित्व कसे करावयाचे?**

अर्धमागधीतील व्यंजनांची द्वित्वे पुढीलप्रमाणे होतात: (१) प्रत्येक वर्गातील पहिल्या[३] व तिसऱ्या व्यंजनाचे स्वत:शीच संयोग होऊन द्वित्व होते. उदा. क्क, ग्ग, च्च, ज्ज, ट्ट, ड्ड; त्त, द्द, प्प, ब्ब. (२) प्रत्येक वर्गांतील दुसऱ्या व चौथ्या व्यंजनाचे द्वित्व आपल्याच वर्गातील अनुक्रमे पहिल्या व तिसऱ्या व्यंजनाशी संयोग होऊन होते. येथे पहिली व तिसरी व्यंजने प्रथम अवयवच असावी लागतात[४]. उदा. क्ख, ग्घ; च्छ, ज्झ; ट्ठ, ड्ढ; त्थ, द्ध; प्फ, ब्भ. (३) अनुनासिकापैकी ङ् व ञ् यांचे द्वित्व होत नाही. ण्, न्, म् यांचे स्वसंयोगाने ण्ण्, न्न्, म्म्, असे. द्वित्व होते. (४) स् या ऊष्माचे द्वित्व स्वसंयोगाने स्स् असे होते. (५) अंतस्थापैकी र् चे द्वित्व होत नाही; य् चे द्वित्व ज्ज् असे होते; ल्अ आणि व यांचे स्वसंयोगाने ल्ल् आणि व्व् असे द्वित्व होते (६) महाप्राण ह् चे द्वित्व होत नाही.

---

१ *स्पर्शव्यंजने परस्परात समानबली असतात.*

२ *अनुनासिके परस्परात समानबली असतात.*

३ *संयुक्तव्यंजनात पहिला अवयव ऊष्म असून, त्याचा लोप होऊन उरलेले व्यंजन क् च् ट् त् प् यांतील एखादे असता, त्यांचे द्वित्व कधी क्ख, च्छ, ट्ठ, त्थ, प्फ असे होते; तर कधी वरीलप्रमाणेच होते.*

४ ***वर्गेषु युजः पूर्वः ।*** *प्रा. प्र. ३.५१*

## ८६ संयुक्त व्यंजनातील अवयवांचे संयोग

समानीकरणाचा नियम संयुक्तव्यंजनांना कसा लागतो, हे पाहण्यापूर्वी संयुक्त व्यंजनात अवयवांचे संयोग कसे असू शकतात, हे पाहणे उद्बोधक ठरेल. ह् सोडून[१] स्पर्श, अनुनासिक, ऊष्म व अंतस्थ यांचे परस्पर संयोग पुढीलप्रमाणे असू शकतात:

(अ) प्र.अ.+द्वि.अ.
स्पर्श+स्पर्श
{ स्पर्श+अनुनासिक
अनुनासिक+स्पर्श }
{ स्पर्श+ऊष्म
ऊष्म+स्पर्श }
{ स्पर्श+अंतस्थ
अंतस्थ+स्पर्श }

(आ) प्र.अ.+द्वि.अ.
अनुनासिक+अनुनासिक
{ अनुनासिक+स्पर्श
स्पर्श+अनुनासिक }
{ अनुनासिक+ऊष्म
ऊष्म+अनुनासिक }
{ अनुनासिक+अंतस्थ
अंतस्थ+अनुनासिक }

(इ)
ऊष्म+ऊष्म
ऊष्म+स्पर्श
स्पर्श+उष्म
{ ऊष्म+अनुनासिक
अनुनासिक+ऊष्म }
{ ऊष्म+अंतस्थ
अंतस्थ+ऊष्म }

(ई)
अंतस्थ+अंतस्थ
अंतस्थ+स्पर्श[२]
स्पर्श+अंतस्थ
{ अंतस्थ+अनुनासिक
अनुनासिक+अंतस्थ }
{ अंतस्थ+ऊष्म
ऊष्म+अंतस्थ }

---

१ ह् हा अवयव असलेल्या संयुक्तव्यंजनांचा पुढे स्वतंत्रपणे विचार केला आहे.

२ वैचारिक दृष्ट्या जरी हे संयोग शक्य असले तरी प्रत्यक्षांत मात्र त्यातील काही संयोग आढळत नाहीत. उदा. अंतस्थ+स्पर्श या जोडीत पहिला अवयव य् किंवा व् आढळत नाही. (घाटगे, पृ. ४४ पहा).

वरील २८ जोड्यांतून पुनरावृत्त होणाऱ्या - (१) स्पर्श+अनु॰ व (२) अनु॰+स्पर्श, (३) ऊष्म+स्पर्श व (४) स्पर्श+ऊष्म, (५) अनु॰+ऊष्म आणि (६) ऊष्म+अनु॰ (७) स्पर्श+अंतस्थ आणि (८) अंतस्थ+स्पर्श, (९) अंतस्थ+अनु॰ व (१०) अनु॰+अंतस्थ, (११) ऊष्म+अंतस्थ व (१२) अंतस्थ+ऊष्म एकूण १२ जोड्या सोडल्यास फक्त १६ जोड्या उरतात. यांतील सर्वच जोड्यांना समानीकरणाचा नियम लागतो असे नाही. ज्या जोड्यांना समानीकरणाचा नियम लागतो त्याचा आता प्रथम विचार केला आहे.

**८७ स्पर्श+स्पर्श**

सर्व स्पर्श स्पर्श समानबली (परस्परात) असल्याने प्रथमस्थानीय स्पर्शाचा लोप होऊन, द्वितीयस्थानीय स्पर्शाचे द्वित्व होते.

(१) क्त=त्त : रक्त=रत्त, भक्त=भत्त, शक्ति=सत्ति, भुक्त=भुत्त, मौक्तिक=मोत्तिय. (२) क्थ=त्थ : रिक्थ=रित्थ (द्रव्य), सिक्थ=सित्थ (धान्यकण, घास) (३) क्प=प्प : वाक्पतिराज=वप्पइराअ (एक विशेषनाम) (४) ग्ध=द्ध : मुग्ध=मुद्ध, दुग्ध=दुद्ध (५) ग्भ=ब्भ : प्राग्भार=पब्भार (मोठा भार) (६) ट्क=क्क : षट्क=छक्क, षट्काष्ठक=छक्कट्ठग (ओटा,देवडी) (७) ट्ख=क्ख : षट्खण्ड=छक्खंड (८) ट्च=च्च : षट्च=छच्च (९) ट्त=त्त : षट्तल=छत्तल (१०) ट्प=प्प : षट्पद=छप्पय (११) ट्फ=प्फ : कट्फल=कप्फल (कायफळ) (१२) ड्ग=ग्ग : खड्ग=खग्ग, षड्गुण=छग्गुण (सहापट) (१३) ड्ज=ज्ज : षड्जीव=छज्जीव (१४) ड्द=द्द : षड्दिशं=छद्दिसं, षड्दर्शन=छद्दंसण (१५) ड्भ=ब्भ : षड्भाग=छब्भाग, षड्भोग=छब्भोग (१६) त्क[१]=क्क : उत्कण्ठा=उक्कंठा, बलात्कार=बलक्कार, उत्कट=उक्कड (१७) त्ख=क्ख : उत्खात=उक्खय (१८) त्प=प्प : उत्पल=उप्पल, सत्पुरुष=सप्पुरिस, उत्पन्न=उप्पन्न, तत्पर=तप्पर (१९) त्फ=प्फ : उत्फुल्ल=उप्फुल्ल (२०) द्ग=ग्ग : पुद्गल=पोग्गल, उद्गम=उग्गम, मुद्गर=मोग्गर (२१) द्घ=ग्घ : उद्घुष्ट=उग्घुट्ठ (उद्घोषित), समुद्घात=समुग्घाय (कर्मनिर्जराविशेष) (२२) द्ब=ब्ब : बुद्बुद=बुब्बुय (बुडबुडा) (२३) द्भ=ब्भ

१ *अनुस्वारागम झाल्यास द्वित्वातील पहिल्या अवयवाचा लोप होतो. सनत्कुमार=सणंकुमार*

: सद्भाव=सब्भाव, उद्भव=उब्भव, उद्भिन्न=उब्भिन्न (२४) प्त=त्त : सुप्त=सुत्त, दीप्त=दित्त, समाप्ति=समत्ति. (२५) ब्ज=ज्ज : कुब्ज=खुज्ज, कुब्जा=खुज्जा (२६) ब्द=द्द : शब्द=सद्द (२७) ब्ध=द्ध : आरब्ध=आरद्ध, लब्ध=लद्ध.

### ८८ स्पर्श+अनुनासिक

स्पर्श हे अनुनासिकाहून अधिक बलवान् असल्याने अनुनासिकाचा लोप होऊन स्पर्शाचे द्वित्व होते.

(१) स्पर्श+ण :रुग्ण=रुग्ग

(२) स्पर्श+न : नग्न[१]=नग्ग, अग्नि=अग्गि, सपत्नी=सवत्ती, पत्नी=पत्ती, विघ्न=विग्घ, प्राप्नोति=पप्पोइ, भग्न=भग्ग, यत्न=जत्त

(३) स्पर्श+म : आत्मन्=अत्त, आत्मजा=अत्तया, युग्म=जुग्ग, आत्मज=अत्तय.

अपवाद : (अ) अर्धमागधीत 'ज्ञ' (ज्+न्+अ) चा प्राय: न्न(ण्ण)[२] होतो. उदा. यज्ञ=जन्न, मनोज=मणुन्न, विज्ञान=विन्नाण, प्रतिज्ञा=पइन्ना, प्रज्ञापना=पण्णवणा (एक जैनागम ग्रंथ)

(आ) द्म=म्म : पद्म=पोम्म, छद्म=छम्म

(इ) क्म=प्प : रुक्मिणी=रुप्पिणी, रुक्म=रुप्प (सोने), रुक्मिन्=रुप्पि

(ई) त्म=प्प : आत्मन्=अप्प, अध्यात्म=अज्झप्प, दुरात्मा=दुरप्पा

(उ) ग्म=म्म : युग्म=जुम्म (जोडी), तिग्म=तिम्म (तीक्ष्ण, उग्र)

### ८९ स्पर्श+ऊष्म

स्पर्श+उष्म या संयोगाचे[३] पुढीलप्रमाणे समानीकरण होते :

(अ) त्स[४]=च्छ : संवत्सर=संवच्छर, बीभत्स=बीभच्छ, वत्स=वच्छ,

---

१ *अनुस्वारागमाने : हिंदीत: नग्न=नंगा.*

२ *ज्ञ च्या विकारांत 'ण्ण' व 'न्न' विकल्पाने वापरावेत, उसे प्रा. गांधी (पृ. ४७) म्हणतात.*

३ *या संयोगात समानीकरणाचा नियम सर्वांशी लागत नाही.*

४ *अनुस्वागराम झाल्यास द्वित्वातील पहिल्या अवयवाचा लोप होतो. उदा विचिकित्सा=वितिगिंछा, जिघित्सा=दिगिंछा*

वत्सल=वच्छल, कुत्सित=कुच्छिय, उत्सङ्ग=उच्छंग (मांडी), चिकित्सा=तिगिच्छा, मत्सर=मच्छर.

(आ) प्स[1]=च्छ : जुगुप्सा=दुगुच्छा, लिप्सु=लिच्छु (इच्छिणारा), अप्सरस्=अच्छरा, जुगुप्सति=दुगुच्छइ.

(इ) क्ष (क्ष)=क्ख[2] वा च्छ : (१) क्ष=क्ख : भिक्षा=भिक्खा, शिक्षा=सिक्खा, दक्षिण[3]=दक्खिण, राक्षस=रक्खस, मोक्ष=मोक्ख, यक्ष=जक्ख, अक्षर=अक्खर.

(२) क्ष=च्छ : अक्षि=अच्छि, वृक्ष=वच्छ, वक्षस्= वच्छ, मक्षिका=मच्छिया

(३) क्ष=क्ख च्छ : कधी एकाच शब्दात क्ष चे क्ख व च्छ होतात. प्रेक्षते=पेक्खइ, पेच्छइ; अक्षि=अक्खि, अच्छि; इक्षु=इक्खु, उच्छु; कुक्षि=कुक्खि, कुच्छि; दक्ष=दक्ख, दच्छ; वृक्ष=रुक्ख, वच्छ; ऋक्ष=रिक्ख, अच्छ (अस्वल); कक्ष=कक्ख, कच्छ (म: काख, कास).

(क) कधी कधी स्पर्शाचा लोप होऊन उष्माचे द्वित्व झालेले आढळते.

(१) च्छ,च्छ्व=स्स : उच्छ्रित=उस्सिय (उंच केलेले), उच्छुल्क=उस्सुंक (कररहित), उच्छ्वास=उस्सास.

(२) त्सः स्स : उत्सर्ग=उस्सग्ग (त्याग), उत्सेध=उस्सेह (उंची), उत्सुक=उस्सुय, उत्सव=उस्सव.

(३) ट्श=स्स : षट्शत=छस्सय (६००)

---

१ *अनुस्वारागमाने : जुगुप्सा=दुगंछा*

२ *(अ) अनुस्वारागम झाल्यास द्वित्वातील पहिल्या व्यंजनाचा लोप होतो. उदा. पक्ष=पंख, पक्षिन्=पंखि, पक्षिणी=पंखिणी.*

*(आ) मराठीत च्छ चा स होतो : इक्षु-उच्छु-ऊस; मत्स्य-(मच्छ)-मासा; क्षुरिका-(छुरिया)-सुरी, कच्छप-कासव, क्षण-(च्छण)-सण.*

३ *क्ख चे कधी कधी सुलभीकरण होते (सुलभीकरण पहा) उदा. दक्षिण=दाहिण, प्रदक्षिण=पयाहिण.*

**९० ऊष्म+स्पर्श**

स्पर्श हे ऊष्मापेक्षा बलवान् असल्याने ऊष्माचा लोप होऊन स्पर्शाचे द्वित्व[१] होते.

(अ) श्+स्पर्श : श्च=च्छ : आश्चर्य=अच्छेर, पश्चात्=पच्छा, पश्चिम=पच्छिम, निश्चय=निच्छय, प्रायश्चित्त=पायच्छित्त.

(आ) ष्+स्पर्श : (१) ष्ठ=ट्ठ : काष्ठ=कट्ठ, गोष्टी=गोट्ठी (सभा,समाज), सुष्ठु=सुट्ठु, श्रेष्ठ=सेट्ठ, श्रेष्ठिन्=सेट्ठि

(२) ष्फ=प्फ : निष्फल=निप्फल.

(३) ष्क=क्ख : पुष्कर=पोक्खर (कमळ), निष्क=निक्ख (एकप्रकारचे नाणे), पुष्करिणी=पोक्खरिणी (तळे)

(४) ष्ट=ट्ठ : दुष्ट=दुट्ठ, दृष्टि=दिट्ठि, इष्ट=इट्ठ, मुष्टि=मुट्ठि, विष्टि=वेट्ठि (म : वेठ), तुष्ट=तुट्ठ.

(५) ष्प[२]=प्फ : पुष्प=पुप्फ, निष्पन्न=निप्फन्न, निष्पन्द=निप्फंद.

(इ) स्+स्पर्श : (१) स्ख=क्ख : प्रस्खलित=पक्खलिय, अस्खलित= अक्खलिय

(२) स्थ=त्थ : अवस्था=अवत्था, प्रस्थित=पत्थिय, अगारस्थ=अगारत्थ.

(३) स्फ=प्फ : प्रस्फुरति=पप्फुरइ.

(४) स्क[३]=क्ख : तिरस्कार=तिरक्खार, अमनस्क=अमणक्ख

(५) स्त=त्थ : हस्त=हत्थ, हस्तिन्=हत्थि (हिंदी-हाथी), अस्ति=अत्थि (म: आथी), प्रशस्त=पसत्थ, वस्तु=वत्थु, मस्तक=मत्थय (म. : माथा)

टीप : पुष्कळ शब्दांत क् च् ट् त् प् यांचे द्वित्व क्क् च्च् ट्ट् त्त् प्प् असेच होते. उदा.

---

१ *संयुक्त व्यंजनांतील प्रथम अवयव ऊष्म हा लुप्त झाल्यावर उरलेल व्यंजने क् च् ट् त् प् ही उसतील तर त्याचे द्वित्व कधी क्ख्, च्छ्, ट्ठ, त्थ्, प्फ् असे होते ; तर केव्हा नेहमीप्रमाणे क्क्, च्च्, ट्ट्, त्त्, प्प्, असे होते.*

२ *सुलभीकरण झाल्यास : बाष्प-(बप्फ) -बाह*
*(संस्कृति=संखडि (ओदनपाक)*

३ *मागे अनुस्वार असल्यास द्वित्वांतील पहिल्या व्यंजनाचा लोप होतो.*

(अ) श्+च्=च्च् : निश्चल=निच्चल (म.: नीचळ), दुश्चर=दुच्चर, दुश्चरित=दुच्चरिय, निश्चेष्ट=निच्चेट्ठ, तपश्चरण=तवच्चरण.

(आ) ष्+स्पर्श : (१) ष्क=क्क : दुष्कर=दुक्कर, दुष्कृत=दुक्कड, निष्कारण=निक्कारण, चतुष्क=चउक्क (म. : चौक), शुष्क=सुक्क (म.: सुके)

(२) ष्ट=ट्ट : इष्टका=इट्टगा (वीट), इष्टा=इट्टा (वीट), उष्ट्र=उट्ट (म.: उंट), उष्ट्रिका=उट्टिया (मातीचे भांडे)

(३) ष्प=प्प : निष्पाप=निप्पाव, दुष्प्रेक्ष्य=दुप्पेच्छ, निष्पङ्क =निप्पंक, निष्प्रभ=निप्पह.

(इ) स्+स्पर्श: (१) स्क=क्क : नमस्कार=नमक्कार, तस्कर=तक्कर, संस्कृत=सक्कय

(२) स्त=त्त : समस्त=समत्त, दुस्तर=दुत्तर.

(३) स्प=प्प : परस्पर=परोप्पर.

## ९१ स्पर्श+अंतस्थ

स्पर्श हे अंतस्थापेक्षा अधिक बलवान् असल्याने अंतस्थाचा लोप होऊन स्पर्शाचे द्वित्व होते.

(अ) स्पर्श+य : –

(१) क्य=क्क : वाक्य=वक्क, शाक्य=सक्क, त्रैलोक्य=तेल्लोक्क.

(२) ख्य=क्ख : सौख्य=सोक्ख, व्याख्यान=वक्खाण

(३) ग्य=ग्ग : वैराग्य=वेरग्ग, योग्य=जोग्ग, सौभाग्य=सोहग्ग, दौर्भाग्य=दोहग्ग.

(४) च्य=च्च : अच्युत=अच्चुय, उच्यते=वुच्चइ, मुच्यते=मुच्चइ.

(५) ज्य=ज्ज : राज्य=रज्ज, पूज्य=पुज्ज.

(६) ट्य=ट्ट : नाट्य=नट्ट

(७) ड्य=ड्ड : कुड्य=कुड्ड (भिंत, कूड)

(८) ढ्य=ड्ढ : वैताढ्य=वेयड्ढ (पर्वतविशेष), आढ्य=अड्ढ (श्रीमंत)

(९) प्य=प्प : कुप्यति=कुप्पइ.

(१०) भ्य=ब्भ : इभ्य=इब्भ, अभ्यन्तर=अब्भंतर.

टीप : संयुक्त व्यंजनातील प्रथम अवयव न् खेरीज तगर्वीय व्यंजन असून व्दितीय अवयव य् असता, त्, थ्, द्, ध् बद्दल अनुक्रमे च्, छ्, ज्, झ् येऊन

या नवीन आलेल्या व्यंजनाचे द्वित्व[१] झालेले आढळते. (**त्यथ्यद्यां चछजाः । ध्यह्योर्झः।** प्रा.प्र. ३.२७-२८)

(१) त्य[२]=च्च : सत्य=सच्च, नित्य=निच्च, प्रत्यय=पच्चय, कृत्य=किच्च अत्यन्त=अच्चंत, आदित्य=आइच्च, मृत्यु=मच्चु, अपत्य=अवच्च, अमात्य=अमच्च, भृत्य=भिच्च (सेवक), आधिपत्य=आहेवच्च.

(२) थ्य[३] = च्छ : पथ्य=पच्छ, मिथ्या=मिच्छा, नेपथ्य=नेवच्छ

(३) द्य=ज्ज : अद्य=अज्ज, मद्य=मज्ज, वैद्य=वेज्ज, विद्या=विज्जा; उद्यान=उज्जाण, उद्यत=उज्जय, उद्योत=उज्जोय (प्रकाश)

(४) ध्य[४]=ज्झ : मध्य=मज्झ, वध्य=वज्झ, अयोध्या=अओज्झा, अमेध्य=अमेज्झ (अशुचि), असाध्य=असज्झ, उपाध्याय=उवज्झाय, स्वाध्याय=सज्झाय, अध्यवसाय=अज्झवसाय.

(आ) स्पर्श+र :

(१) क्र[५]=क्क : तक्र=तक्क (म.. ताक), चक्र=चक्क (म.:चाक), विक्रम=विक्कम, शक्र=सक्क (इंद्र)

(२) ग्र=ग्ग : उग्र=उग्ग, न्यग्रोध=नग्गोह (वृक्षविशेष), अग्र=अग्ग, समग्र=समग्ग.

(३) घ्र=ग्घ : व्याघ्र=वग्घ (म.:वाघ), शीघ्र=सिग्घ

(४) च्छ्र=च्छ : कृच्छ्र=किच्छ (संकट)

---

१ *म. : सत्य-साच, नृत्यति-नाचतो; उत्पद्यते-उपजतो, अद्य-आज; वंध्या-वांझ, संध्या-सांज, मध्य-माज (घर)*

२ *त्य=च्च याचे अपवाद : प्रत्येक=पत्तेय, प्रत्येक बुध्द=पत्तेय बुध्द, चैत्य=चइत्त (जिनमंदिर)*

३ *थ्य=च्छ चे अपवाद : पथ्य=पत्थ, नेपथ्य=नेवत्थ (नायासं; पृ. १९,२१) कधी तथ्य चे 'तच्च' असेहि वर्णान्तर होते.*

४ *मागे अनुस्वार असल्यास द्वित्वातील पहिल्या व्यंजनाचा लोप होतो विंध्य=विंझ, संध्या=संझा.*

५ *अनुस्वारागम झाल्यास : वक्र=वंक (म. : बाक, वाकडा)*

(५) ज्र=ज्ज : वज्र=वज्ज.

(६) त्र[1]=त्त : पुत्र=पुत्त (म.: पूत), मित्र=मित्त, चित्र=चित्त, पत्र=पत्त (म.: पान), शत्रु=सत्तु, छत्र=छत्त (म.: छत), यात्रा=जत्ता.

(७) द्र=द्द : शूद्र=सुद्द, भद्र=भद्द, समुद्र=समुद्द, निद्रा=निद्दा (म.: नींद), मुद्रा=मुद्दा.

(८) ध्र=द्ध : गृध्र=गिद्ध (गिधाड)

(९) प्र=प्प : अप्रिय=अप्पिय, विप्र=विप्प, अभिप्राय=अभिप्पाय

(१०) ब्र[2]=ब्ब : अब्रवीत्=अब्बवी (म्हणाला)

(११) भ्र=ब्भ : अभ्र=अब्भ (ढग, आयाश), निभ्रांत=निब्भंत

(इ) स्पर्श+ल : (१) क्ल[3]=क्क : शुक्त=सुक्क, विक्लव=विक्कव (दीन), (२) प्ल=प्प : विप्लव=विप्पव (नाश)

(ई) स्पर्श+व :

(१) क्व=क्क : पक्व=पक्क, पिक्क (म: पक्का, पिकलेला)

(२) ज्व=ज्ज : प्रज्वलित=पज्जलिय, उज्ज्वलित=उज्जलिय (म: उजळ)

(३) त्व=त्त : देवत्व=देवत्त, चत्वारिंशत्=चत्तालीस (चाळीस)

(४) द्व[4]=द्द : जम्बुद्वीप=जंबुद्दीव

(५) ध्व[5]=द्ध : उध्वस्त=उद्धत्थ, अध्वन्=अद्ध (मार्ग)

अपवाद : क्वचित् स्पर्शाचा लोप होऊन व् चे द्वित्व होते.

(१) द्वि=व्व : उद्विग्न=उव्विग्ग, उद्वर्तन=उव्वट्टण (उटणे), उद्वेग=उव्वेग, उद्वहति=उव्वहइ,

(२) ड्व=व्व : षड्विंशति=छव्वीस (२६)

---

१ *(अ) काही क्रियाविशेषण अव्ययात 'त्र' चा 'त्थ' होतो. उदा. कुत्र=कत्थ, यत्र=जत्थ (जेथे), तत्र:=तत्थ (तेथे), सर्वत्र=सव्वत्थ, अत्र=एत्थ (एथे). (आ) कधी त्र चे सुलभीकरण होते : गात्र=गाय, गोत्र=गोय, धात्री=धाई.*

२ *आद्य संयुक्त व्यंजनात : ब्राह्मण=बंभण*

३ *आद्य संयुक्त व्यंजनात : क्लीब=कीव, क्लेश=केस*

४ *आद्य संयुक्त व्यंजनात : द्वार=दार, द्विज=दिय, द्वन्द्व=दंद, द्विगु=दिगु*

५ *ध्व=द्ध चा अपवाद : ऊर्ध्व=उब्भ*

(क) न् खेरीज त् वर्गीय व्यंजने प्रथमस्थानी असून ‘व’ द्वितीयस्थानी असता, तवर्गीय व्यंजनाबद्दल कधी चवर्गीय व्यंजने येऊन, या नवीन आलेल्या व्यंजनांचे द्वित्व झालेले आढळते.

(**त्वथ्वद्वध्वां चछजझाः क्वचित्।** हेम. २.१५

भोच्चा सयलं पिच्छिं विज्जं बुज्झा अणण्णयगामि।

चइऊण तवं काउं संती पत्तो सिवपरमं।।)

(१) त्व=च्च : चत्वर=चच्चर (चव्हाटा), कृत्वा=किच्चा, श्रुत्वा=सोच्चा

(२) थ्व=च्छ : पृथ्वी=पिच्छी

(३) द्वा=ज्ज : विद्वान्=विज्जं

(४) ध्व[1]=ज्झ : साध्वस=सज्झस, इन्द्रध्वज=इंदज्झय, धर्मध्वज=धम्मज्झय, महेन्द्रध्वज=महिंदज्झय

## ९२ अंतस्थ+स्पर्श

कमी बलवान् अंतस्थाचा लोप होऊन अधिक बलवान् स्पर्शाचे द्वित्व होते.

### (अ) र्+स्पर्श :

(१) र्क=क्क : तर्क=तक्क, अर्क=अक्क, शर्करा=सक्करा

(२) र्ख=क्ख : मूर्ख =मुक्ख

(३) र्ग=ग्ग : स्वर्ग=सग्ग, वर्ग=वग्ग, मार्ग=मग्ग, दुर्गम=दुग्गम, दुर्ग=दुग्ग, उपसर्ग=उवसग्ग

(४) र्घ=ग्घ : अर्घ=अग्घ (मूल्य), निर्घोष=निग्घोस (मोठा ध्वनि)

(५) र्च=च्च : अर्चा=अच्चा, कूर्च=कुच्च (कुंचली)

(६) र्च्छ=च्छ: मूर्च्छा=मुच्छा

(७) र्ज[2]=ज्ज : आर्जव=अज्जव, गर्जित=गज्जिय (गर्जना), जर्जर=जज्जर.

---

*१ ध्व=ज्झ चा अपवाद : ऊर्ध्व=उब्भ*

*२ अनुस्वारागम झाल्यास : मार्जार=मंजार (मांजर)*

(८) र्झ=ज्झ : निर्झर=निज्झर

(९) र्त=त्त : मुहूर्त=मुहुत्त, कीर्ति=कित्ति, धूर्त=धुत्त, कर्तरी=कत्तरी (कातरी), मूर्त=मुत्त.

(१०) र्थ=त्थ : अर्थ=अत्थ, तीर्थ=तित्थ, सार्थ=सत्थ, समर्थ=समत्थ, पार्थिव=पत्थिव

(११) र्द=द्द : दर्दुर=दद्दुर (बेडूक), मार्दव=मद्दव

(१२) र्ध=द्ध : मूर्धन्=मुद्ध (डोके), निर्धन=निद्धण, दुर्धर=दुद्धर

(१३) र्प=प्प : सर्प=सप्प, कूर्पर=कोप्पर (कोपर) कर्पूर=कप्पूर (कापूर), कार्पटिक=कप्पडिय (म: कापडी)

(१४) र्ब=ब्ब : कर्बट= कब्बड (लहान गांव), निर्बन्ध=निब्बंध, कर्बुरित=कब्बुरिय (विविधरंगी)

(१५) र्भ=ब्भ : गर्भ=गब्भ (म: गाभ,गाभा), निर्भर=निब्भर, निर्भय=निब्भय, दुर्भिक्ष=दुब्भिक्ख (दुष्काळ)

(क) र् पुढे न् खेरीज तवर्गीय व्यंजन अवयव असता कधी कधी तवर्गीय व्यंजनाबद्दल टवर्गीय व्यंजने येऊन या नवीन आलेल्या व्यंजनांचे द्वित्व झालेले[१] आढळते.

(१) र्त=ट्ट : चक्रवर्तिन्=चक्कवट्टि, वर्तते=वट्टइ, नर्तिका=नट्टिया.

(२) र्थ=ट्ठ : अर्थ=अट्ठ, अनर्थ=अणट्ठ, चतुर्थ=चउट्ठ

(३) र्द=ड्ड : विच्छर्द=विच्छड्ड (वैभव), कपर्द=कवड्ड (कवडी)

(४) र्ध=ड्ढ : अर्ध=अड्ढ, वर्धते=वड्ढइ, अर्धमास=अड्ढमास

(आ) ल्+स्पर्श :

(१) ल्क=क्क : वल्कल=वक्कल (म.:वाकळ), कल्क=कक्क (पाप,मळ), उल्का=उक्का.

(२) ल्ग=ग्ग : वल्गति=वग्गइ, फाल्गुन=फग्गुण, वल्गन=वग्गण.

(३) ल्प[२]=प्प : विकल्प=वियप्प, शिल्प=सिप्प, अल्प=अप्प.

---

*१ म. : कर्त्-काटणे, उद्वर्तन=उटणे; वर्ध-वाढणे, सार्ध-साडे.*

*२ अनुस्वारागम झाल्यास : जल्पति=जंपइ.*

(४) ल्फ=प्फ : गुल्फ=गुप्फ (घोटा)
(५) ल्ब=ब्ब : किल्बिष=किब्बिस
(६) ल्भ=ब्भ : प्रगल्भ=पगब्भ

**९३ अनुनासिक + अनुनासिक**

अनुनासिके परस्परांत समानबली असल्याने प्रथमस्थानीय अनुनासिकाचा लोप होऊन द्वितीयस्थानीय अनुनासिकाचे द्वित्व होते.

(१) ङ्म[१]=म्म : पराङ्मुख=परम्मुह, दिङ्मुख=दिम्मुह
(२) ण्म=म्म : षण्मुख=छम्मुह, षण्मास=छम्मास
(३) न्म=म्म : जन्मन्=जम्म, मन्मथ=वम्मह (मदन), उन्मत्त=उम्मत्त, उन्माद=उम्माय, उन्मुक्त=उम्मुक्क, उन्मार्ग=उम्मग्ग, उन्मुख=उम्मुह.
(४) म्न=न्न : निम्नगा=निन्नगा (नदी), प्रद्युम्न=पज्जुन्न (एक विशेषनाम), निम्न=निन्न (उतार)

**९४ अनुनासिक+अंतस्थ**

कमी बलवान् अंतस्थाचा लोप होऊन अधिक बलवान् अनुनासिकाचे द्वित्व होते.

**(अ) अनुनासिक+य :**

(१) ण्य=ण्ण : पुण्य=पुण्ण, हिरण्य=हिरण्ण, तारूण्य=तारुण्ण
(२) न्य=न्न : अन्य=अन्न, धन्य=धन्न, धान्य=धन्न, शून्य=सुन्न (म : सुना), अन्यदा=अन्नया.

---

१ *द्वितीय अवयव म् असता त्याचे द्वित्व न लिहिता पहिल्या म् चा अनुस्वार लिहिला तरी चालते. उदा. पराङ्मुख=परंमुह, दिङ्मुख=दिंमुह, षण्मास=छंमास, उन्मूल=उंमूल*

(३) म्य=म्म : सौम्य=सोम्म, रम्य=रम्म, सम्यक्=सम्मं

(आ) (१) म्र=म्म : नम्रता= नम्मया

(२) म्ल=म्म : म्लेच्छ=मेच्छ

टीप : कधी कधी म्र व म्ल यांचा म्ब होतो[१]

(१) म्र=म्ब : आम्र=अंब, ताम्र=तंब, आताम्र=आयंब, आम्रातक= अंबाडग (वनस्पतीविशेष)

(२) म्ल=म्ब : आम्ल=अंब

(इ) न्व=न्न : अन्वेषण=अन्नेसण

टीप : न्न व ण्ण लिहिण्या बद्दल :

वररुचि वगैरे प्राकृत वैयाकरण सर्वत्र 'ण्ण' लिहावा असे म्हणतात; तर हेमचंद्र, इत्यादि व्याकरणकार 'न्न' व 'ण्ण' दोन्ही[२]लाही परवानगी देतात. तेव्हा सोईसाठी किंवा एकरूपतेसाठी याकोबीने म्हटल्याप्रमाणे, मूळ संस्कृत शब्दात 'ण्' असल्यास वर्णान्तरांत 'ण्ण' लिहावा; इतर ठिकाणी 'न्न' चा उपयोग करावा.[३]

## ९५ अंतस्थ+अनुनासिक

कमी बलवान् अंतस्थाचा लोप होऊन अधिक बलशाली अनुनासिकाचे द्वित्व होते.

(१) र्ण=ण्ण : सुवर्ण=सुवण्ण, पूर्ण=पुण्ण, चूर्ण=चुण्ण, कर्ण=कण्ण, पर्ण=पण्ण, वर्ण=वण्ण (म. : वाण)

(२) र्म=म्म : धर्म=धम्म, निर्मानुष=निम्माणुस, शर्मन्=सम्म (सुख,कल्याण), कर्मन्=कम्म.

---

१ *म. : आम्र-आंबा, ताम्र-तांबे (रा), आम्ल-आंब (ट), आम्रातक-अंबाडा.*

२ *ज्ञ (ज्+न) च्या वर्णान्तरांत ण्ण वा न्न विकल्पाने वापरावा, असे प्रा.गांधी (प्र.४७) यांचे मत आहे.*

३ *जैन हस्तलिखिते न्न व ण्ण यांचा हवा तसा उपयोग करतात.*

(३) ल्म=म्म : गुल्म=गुम्म (झाडी), वल्मीक=वम्मिय (वारूळ), कुल्माष=कुम्मास (उडीद)

**९६ ऊष्म+ ऊष्म**

ऊष्मवर्ण हे परस्परात समानबली असल्याने प्रथमस्थानीय ऊष्माचा लोप होऊन द्वितीयस्थानीय ऊष्माचें द्वित्व[१] होते.

(१) श्श=स्स : निश्शरण=निस्सरण, दुश्शासन=दुस्सासण, दुश्शील=दुस्सील.
(२) ष्ष=स्स : निष्षिक्त=निस्सित्त
(३) स्स=स्स : निस्सह, दुस्सह

**९७ ऊष्म+अंतस्थ**

कमी बलवान् अंतस्थाचा लोप होऊन अधिकबल असणाऱ्या ऊष्माचे द्वित्व[२] होते.

**(अ) श्+अंतस्थ :**

(१) श्श=स्स : अवश्य= अवस्स, वैश्य=वइस्स, नश्यति=नस्सइ
(२) श्र[३]=स्स : मिश्र=मिस्स, विश्रम्भ=विस्संभ (विश्वास)
(३) श्ल[४]=स्स : श्लाघ्य=सग्घ, श्लक्ष्ण=सण्ह (सूक्ष्म सुंदर)
(४) श्व[५]=स्स : विश्व=विस्स, विश्वास=विस्सास.

**(आ) ष्+अंतस्थ :**

(१) ष्य=स्स : मनुष्य=मणुस्स, आरुष्य=आरुस्स (रागाने), शिष्य=सिस्स,

---

१ *येथील परिणामी द्वित्व हे नेहमीच स्स असते.*

२ *येथीलही परिणामी द्वित्व हे नेहमीच स्स असते.*

३ *आद्य संयुक्तव्यंजनात : श्रेष्ठ=सेट्ठ, श्रेष्ठिन्=सेट्ठि, श्रम=सम.*

४ *श्ल मध्ये कधी कधी ऊष्माचा लोप होतो: श्लिष्यन्ते=लिस्संति (चिकटवले जातात)*

५ *आद्य संयुक्तव्यंजनात : श्वापद=सावय*

भविष्यति=भविस्सइ.

(२) ष्व=स्स : पितृष्वसा=पिउस्सिया, मातृष्वसा=माउस्सिया (मावशी)

**(इ) स्+अंतस्थ :**

(१) स्य=स्स : वयस्य = वयस्स[१], रहस्य = रहस्स, सस्य = सस्स, आलस्य = आलस्स.

(२) स्र=स्स[२] : सहस्र=सहस्स, तमिस्रा=तमिस्सा (नरक विशेष), विस्र=विस्स (कच्च्या मांसाचा वास असलेले)

(३) स्व=स्स[३]: सरस्वती=सरस्सई, तपस्विन्=तवस्सि, सर्वस्व=सव्वस्स.

**९८ अंतस्थ+ऊष्म**

कमी बलवान् अंतस्थाचा लोप होऊन अधिक बलवान् ऊष्माचे द्वित्व होते.[४]

(१) र्श=स्स : दर्शन[५]=दस्सण, स्पर्श=फस्स

(२) र्ष[६]=स्स : हर्षण=हस्सण

---

१ *अनुस्वारागम झाल्यास : वयस्य=वयंस*

२ *अनुस्वारागम झाल्यास : षडस्र=छलंस*

३ *अनुस्वारागम झाल्यास : मनस्विन्=मणंसि, ओजस्विन्=ओयंसि, तेजस्विन्=तेयंसि, ह्रस्व=हंस.*

४ *ऊष्मा+ ऊष्म, ऊष्म+अंतस्थ, अंतस्थ+ऊष्म यांच्या समानीकरणाने होणाऱ्या 'स्स' चे पुष्कळदा सुलभीकरण होते. उदा. : निश्शरण=नीसरण, दुश्शासन=दूसासण; अश्व=आस, विश्वास=वीसास, ईश्वर=ईसर; विश्राम्यति=वीसमइ, मिश्र=मीस; मनुष्य=माणूस, शिष्य=सीस; पश्यति=पासइ; हर्ष=हास, वर्ष=वास, वर्षा=वासा, कार्षापण=काहावण; स्पर्श=फास.*

५ *अनुस्वारागम झाल्यास : दर्शन=दंसण*

६ *(अ) अनुस्वारागम झाल्यास : दुर्धर्ष=दुद्धंस (आ) स्वरभक्ति झाल्यास : हर्ष=हरिस*

## ९९ अंतस्थ+अंतस्थ

अंतस्थांचा ल् > व् > य् > र् असा उतरता बलक्रम आहे. कमी बलवान् अंतस्थाचा लोप होऊन उरलेल्याचे द्वित्व होते. (र् चा नेहमीच लोप होतो)

(१) य्य[१]=ज्ज : शय्या=सेज्जा, साहाय्य=साहेज्ज.

(२) र्य[२]=ज्ज : कार्य=कज्ज (म. : काम), आर्य=अज्ज (म. : आजा), भार्या=भज्जा, पर्याप्त=पज्जत्त (पुरेसे), पर्यवसान=पज्जवसाण.

अपवाद : (१) कधी र्य चा ल्ल होतो. उदा. : पर्याण=पल्लाण (खोगीर), सौकुमार्य=सोगुमल्ल

(२) कधी र्य चा ल्ह होतो : पर्यस्त=पल्हत्थ (क्षित; पालथा)

(३) कधी र्य[३] चा ल होतो : पर्येति=पलेइ (सभोवार जातो)

(४) कधी र्य मधील य् चा लोप होऊन फक्त र् राहतो.
सूर्य=सूर, तूर्य=तूर (वाद्यविशेष), धैर्य=धीर, ब्रह्मचर्य=बंभचेर, आश्चर्य=अच्छेर, सौन्दर्य=सुंदेर, पर्यन्त=पेरंत (हद्द), प्रातिहार्य=पाडिहेर (चमत्कार)

(३) ल्य=ल्ल : कल्य=कल्ल (पहाट), कल्याण=कल्लाण, शल्य=सल्ल, कौशल्य=कोसल्ल, माल्य=मल्ल (माळ)

(४) व्य=व्व : काव्य=कव्व, कर्तव्य=कायव्व, द्रव्य=दव्व

(५) ल्व=ल्ल : पल्वल=पल्लल (डबके, लहान तळे), बिल्व= बिल्ल (बेल), गल्वर्क=गल्लक्क (रत्नविशेष)

(६) र्व=व्व : सर्व=सव्व, पर्वत=पव्वय, गर्व=गव्व, पूर्व=पुव्व, निर्वाण=निव्वाण

(७) व्र[४]=व्व : तीव्र=तिव्व, परिव्राजक=परिव्वायग

(८) र्ल=ल्ल : निर्लज्ज=निल्लज्ज, दुर्लभ=दुल्लह, निर्लेप=निल्लेव

---

१ *य् चा ज् होऊन ज्ज् असे द्वित्व होते.*

२ *(अ) समानीकरणाने य्य् होऊन मग त्याचा ज्ज् होतो.*
*(आ) पुष्कळदा र्य च्या बाबतीत स्वरभक्तीचा अवलंब केला जातो. उदा. आचार्य=आयरिय, भार्या=भारिया, आश्चर्य=अच्छरिय, आर्य=अरिय, अनार्य=अणारिय, वीर्य=वीरिय.*

३ *म. : पर्याय=पाळी, पर्यस्त-पालथा, पालट;*

४ *आद्य संयुक्तव्यंजनात : व्रीहि=वीहि*

## १०० इतर संयुक्तव्यंजनांचे विकार

ज्यांना समानीकरणाचा नियम लागतो अशा संयुक्तव्यंजनांचा विचार वर झाला आहे. आता, इतर संयुक्त व्यंजनांच्या बाबतीत कोणते विकार होतात, ते पहावयाचे आहे.

## १०१ अनुनासिक+स्पर्श

अनुनासिक+स्पर्श असा योग्य असता अनुनासिकाचा अनुस्वार[१] होतो, व तो मागील वर्णाचे डोक्यावर लिहिला जातो.

(१) ङ्+स्पर्श : अङ्ग=अंग, पङ्क्ति=पंति, सङ्केत=संकेय, शङ्ख=संख

(२) ञ्+स्पर्श : चञ्चल=चंचल, सञ्जात=संजाय, लाञ्छन=लंछण

(३) ण्+स्पर्श : कण्ठ=कंठ, घण्टा=घंटा, दण्ड=दंड

(४) न्+स्पर्श : निर्ग्रन्थ=निग्गंथ, अन्ध=अंध, विन्ध्य=विंझ, सन्ध्या=संझा.

(५) म्+स्पर्श : चम्पक=चंपग, आरम्भ=आरंभ

अपवाद : (अ) ज्या संख्यावाचकात[२] 'पंचन्' आहे. तेथे ञ्च चा कधी न्न, तर कधी ण्ण, तर कधी नुसता ण होतो.

ञ्च=न्न : पन्नरस (१५), छप्पन्न (५६)

ञ्च=ण्ण : पणवण्ण (५५), पण्णट्ठि (६५), पण्णत्तरि (७५)

ञ्च=ण : पंचविंशति=पणुवीस (२५)

(आ) कधी ञ्च चा ण्ट झालेला आढळतो.[३]

आकुञ्चन=आउंटण

## १०२ अनुनासिक+ऊष्म

अनुनासिकापुढे[४] ऊष्मवर्ण असता अनुनासिकाचा अनुस्वार होतो.

---

१ *कधी परसवर्ण लिहिला जातो.*

२ *संख्यावाचके पहा.*

३ *आर्षे अन्यदपि दृश्यते। आकुंचनं आउंटणं । अत्र* ***चस्य टत्वम्।*** *हेम. १.१७७*

४ *प्राय: हे अनुनासिक म् असते.*

सम्+शुद्धि=संसुद्धि, सम्+सर्ग=संसग्ग, सम्+सक्त=संसत्त; वंश=वंस, अंशु=अंसु, पांसु=पंसु, मांस=मंस.

## १०३ ऊष्म+अनुनासिक

ऊष्म+अनुनासिक असा योग असता, प्रथम अनुनासिक व ऊष्म यांच्या स्थानांचा परस्पर बदल होतो; मग ऊष्माबद्दल ह् येतो.

उदा. ष्ण्=ष्+ण्=ण्+ष्=ण्+ह् (ऊष्माबद्दल ह्) =ण्ह

(१) श्न=ण्ह (न्ह) : प्रश्न=पण्ह, अश्नाति=अण्हाइ (भोजन करतो)

(२) ष्ण=ण्ह : कृष्ण=कण्ह (म. : कान्हा), उष्ण=उण्ह, विष्णु=विण्हु, वृष्णि=वण्हि (एका वंशाचे नाव), उष्णीष=उण्हीस (शिरोवेष्टन), तृष्णा=तण्हा.

(३) स्न[१]=ण्ह : प्रस्नुत=पण्हुय (क्षरलेला), अस्नान=अण्हाण, ज्योत्स्ना=जोण्हा

(४) श्म=म्ह : कश्मीर=कम्हीर

(५) ष्म=म्ह : ग्रीष्म=गिम्ह, ऊष्मा=उम्हा, युष्मादृश=तुम्हारिस

(६) स्म[२]=म्ह : विस्मय=विम्हय, अस्मादृश=अम्हारिस

अपवाद : (अ) कधी कधी ऊष्माचा लोप होऊन अनुनासिकाचे द्वित्व[३] होते निस्नेह=निन्नेह

(आ) कधी कधी अनुनासिकाचा लोप होऊन ऊष्माचे द्वित्व होते.[४]

रश्मि=रस्सि (दोरी, किरण, हिंदी :रस्सी), भस्मन्=(भस्स)-भास

(इ) कधी 'म्ह' बद्दल 'म्भ' येतो

श्लेष्मन्=सेंभ (कफ), संस्मरति=संभरइ.

---

१ *आद्य संयुक्तव्यंजनात : स्नान=ण्हाण, स्नात=ण्हाय*

२ *आद्य संयुक्तव्यंजनात : स्म: = म्हो*

३ *आद्य संयुक्तव्यंजनात : स्नेह=नेह, नेहालु (स्नेह-वत्)*

४ *(अ) आद्य संयुक्तव्यंजनात : श्मशान=सुसाण*

*(आ) अनुस्वारागम झाल्यास द्वित्वातील पहिल्या अवयवाचा लोप होतो अस्मिन्=अंसि, कस्मिन्=कंसि, यस्मिन्=जंसि, तस्मिन्=तंसि*

(ई) कधी कधी म्ह मधील म् चा लोप होऊन नुसता 'ह' उरतो.
कूष्मण्ड=कूहंड (कोहळा), कूष्माण्डी=कोहंडी, कोहली (कोहाळ्याचे)

**१०४ ह् ची संयुक्तव्यंजने व त्यांचे विकार**

ह् हा अवयव असलेल्या संयुक्तव्यंजनाचे विकार पुढील प्रमाणे होतात.

**(क) ह् हा प्रथम अवयव :**

**(अ) ह्+अनुनासिक :**

(१) ह्[1]+ण्=ण्ह् : गृह्णाति=गेण्हइ, अपराह्ण=अवरह्ण, पूर्वाह्ण=पुव्वण्ह, पूर्वापराह्ण=पुव्वावरह्ण

(२) ह्[1]+ न् = न्ह् (ह्न) : वह्नि = वन्हि(ह्नि), मध्याह्न = (ह्न) चिह्न =चिन्ह, निह्नुते = निह्नवइ

(३) ह्[1]+म्=म्ह् : ब्राह्मण=बम्हण
अपवाद : (१) न्ह चा कधी कधी न्ध होतो : चिह्न=चिंध

(२) म्ह चा कधी कधी म्भ होतो: ब्राह्मण=बंभण, ब्रह्मलोक=बंभलोय, ब्रह्मचर्य=बंभचेर, ब्रह्मचारिन्=बंभयारि, ब्रह्माण्ड=बंभंड

**(ख) ह्+अंतस्थ :**

(१) ह्+य्=ज्झ् : गुह्य=गुज्झ (म. : गूज), ग्राह्य=गेज्झ, सह्य=सज्झ, अनुग्राह्य=अणुगेज्झ, परिगृह्य=परिगिज्झ (स्वीकारून), अभिरुह्य= अभिरुज्झ (चढून).

(२) ह्[2]+र्=ह्र[3] : ह्रद=हद (तळे), ह्रस्व=हस्स (लहान)
टीप : कधी र् चा लोप होऊन नुसता ह रहातो.
ह्रद=हद, ह्रास=हास

---

१ *येथे अवयवांचा स्थान-विपर्यय होतो.*
*ह्न ह्ल ह्मेषु नलमां स्थितिरूर्ध्वम् । प्रा. प्र.३.८*

२ *अर्धमागधीत ह्र चे बाबतीत कित्येकदा स्वरभक्तीचा अवलंब केला जातो. ह्री=हिरि, ह्रस्व=हरस्स*

३ *मराठीत मात्र ह्र चे बाबतीत अवयवांचा स्थान विपर्यय होतो. ह्रस्व=ऱ्हस्व, ह्रास=ऱ्हास.*

*३ अर्धमागधीत कधी कधी ह्र तसाच राहतो असे दिसते. पा.स.म., पृ.११९९ वर ह्रद, ह्रस्स आणि ह्रास असे शब्द देण्यात आले आहेत. 'ह्रस्स' (ह्रस्व) याबद्दल पिशेलने (इं. पृ. २४५) असे म्हटले आहे. हस्तलिखिते व ग्रंथ यात पुष्कळदा ह्रस्स आढळते. ह्र चे बाबतीत मराठीतल्याप्रमाणे अवयवविपर्यय मानला पाहिजे काय? तसे मानल्यास, ऱ्ह बद्दल ह्र ही हस्तलिखिताच्या लेखकाची चूक मानली पाहिजे.*

*हेमचंद्राचे मते* ***'सर्वत्र लबरामवन्द्रे'*** *(२.७९) वन्द्र शब्द सोडून इतर सर्वत्र र् चा लोप होतो. तसेच 'द्रे रो न वा।' हेम. २.८० द्रशद्बे रेफस्य वा लुग् भवति। (द्र मध्ये र् चा विकल्पाने लोप होतो) ह्रदशब्दस्य स्थितिपरिवृत्तौ द्रह इतिरूपम्। तत्र द्रहो दहो। केचिद् लोपं नेच्छन्ति। चंडाचे मतेही(रेफः पूर्वश्च। - सर्वस्मात् व्यंजनात् परः पूर्वस्थश्च रेफो लोपो भवति/३.९) संयुक्तव्यंजनात र् चा सर्वत्र लोप होतो. ३.९ या सूत्राखाली 'ह्रस्वः हस्सो'। हे उदाहरणही आढळते.*

*४ ह्ल मध्ये अवयवांचा स्थान-विपर्यय होतो.*

---

३ ह्+ल्=ह्ल्[४] : आह्लाद=अल्हाय, कह्लार=कल्हार, प्रह्लादनीय=पल्हायणिज्ज, पह्लव=पल्हव, पह्लादनी=पल्हायणी

४ ह्+व्=ब्भ् : जिह्वा[१]=जिब्भा, विह्वल=विब्भल

टीप : कधी कधी व् चा लोप होऊन नुसता ह शिल्लक राहतो. विह्वल-विहल

ह् हा द्वितीय अवयव :

(१) र्+ह् : र्ह् मध्ये कधी कधी ह् चा लोप होऊन र् रहातो.

दशार्ह=दसार

पण प्रायः र्ह् चे बाबतीत स्वरभक्तीचा अवलंब केला जातो.

गर्हा=गरिहा, अर्हति=अरहइ, बर्ह=बरिह

**१०५ मध्य विसर्गाचे विकार**

पुढे सांगितल्याप्रमाणे मध्य विसर्गाचे विविध विकार होतात.

---

*१ कधी कधी ह्व चे सुलभीकरण होते : जिह्वा=जीहा*

(१) विसर्गापुढे कठोर व्यंजन :

(अ) विसर्गापुढे वर्गीय कठोर[1]व्यंजन असता विसर्गाचा लोप होऊन त्या कठोर व्यंजनाचे द्वित्व होते.

अन्तःकरण=अंतक्करण, दुःख=दुक्ख, अन्तःपात=अंतप्पाय (अंतर्भाव)

(आ) विसर्गापुढे वर्गीय कठोर व्यंजन असता मागील स्वरासह विसर्गाचा कधी कधी ए अथवा ओ होतो.

ए : पुर:कर्मन्=पुरेकम्म, अन्त:पुर=अंतेउर

ओ : तप:कर्मन्=तवोकम्म, मिथ:कथा=मिहोकहा, रह:कर्मन्=रहोकम्म, यश:कामी=जसोकामी

(इ) विसर्गापुढे वर्गीय कठोर व्यंजन असता कधी कधी विसर्ग नाही असे मानून सरळ वर्णान्तर होते.

मन:प्रयोग=मणपओग, उर:परिसर्प=उरपरिसप्प, दु:ख=दुह, दु:खिन्=दुहि.

(उ) संस्कृतमध्ये जेथे विसर्गाचा श्, ष्, स् होऊन पुढील कठोर व्यंजनाशी संधि झालेला आहे, तेथे विसर्ग नाही असे मानून कधी कधी वर्णान्तर होते. नमस्कार=नवयार; तपश्चरण=तवचरण, निश्चेष्ट=निचेट्ठ; उरस्तट=उरतड, नभस्तल=नहयल, सरस्तीरे=सरतीरे.

(२) विसर्गापुढे मृदु व्यंजन :

(अ) विसर्गापुढे मृदु व्यंजन[2] येऊन मागील स्वरासह विसर्गाचा संस्कृतमध्ये जेथे ओ झालेला आहे, असे काही शब्द सरळ वर्णान्तराने अर्धमागधीत येतात.

मनोरथ=मणोरह, तपोरत=तवोरय, अधोलोक=अहोलोग, मनोगत=मणोगय, तपोधन=तवोधण, शिरोदु:ख=सिरोदुक्ख, शिरोवेदना=सिरोवेयणा, अधोगत=अहोगय, मनोरम=मणोरम

---

१ *प्रत्येक वर्गातील पहिली दोन व्यंजने - क्, ख्, च्, छ्, ट्, ठ्, त्, थ्, प्, फ्, - ही कठोर होत.*

२ *प्रत्येक वर्गातील तिसरी व चौथी - ग्, घ्, ज्, झ्, ड्, ढ्, द्, ध्, ब्, भ्- व्यंजने, अनुनासिके, अंतस्थ व ह् ही मृदु व्यंजने होत.*

(आ) संस्कृतात विसर्गापुढे मृदु व्यंजन असता (जेथे ओ होतो, तेथे) अर्धमागधीत कधी कधी विसर्गाचा मागील स्वरासह ए होतो.
अधोलोक=अहेलोग

(इ) संस्कृतमध्ये जेथे विसर्गापुढे मृदु व्यंजन येऊन विसर्गाचा र् होतो, तेथे कधी कधी अर्धमागधीत विसर्गाचा मागील स्वरासह ओ होतो.
अन्तर्दुष्ट=अंतोदुट्ठ, अन्तर्जाल=अंतोजाल, अन्तर्निष्क्रान्त=अंतोनिक्खंत, अन्तर्गृहम्=अंतोगिहं (घरात)

(ई) संस्कृतात विसर्गापुढे मृदु व्यंजन असूनही कधी कधी अर्धमागधीत मात्र विसर्ग नाही असे मानून सरळ वर्णान्तर होते.
मनोगुप्त=मणगुत्त, यशोवर्धन=जसवद्धण, तपोलोप=तवलोव, सरोवर=सरवर, मनोहर=मणहर, शिरोरोग=सिररोग, सरोरुह=सररुह (कमळ)

(३) विसर्गापुढे ऊष्म :

(अ) विसर्गापुढे ऊष्म वर्ण असता विसर्गाचा लोप होऊन ऊष्माचे द्वित्व[१] होते.
नि:शङ्क =निस्संक, नि:शेष=निस्सेस, दु:शासन=दुस्सासण, नि:श्वास=निस्सास, मन:शिला=मणस्सिला; दु:सह=दुस्सह, नि:सह=निस्सह.

(आ) विसर्गापुढे ऊष्म असता विसर्गाचा मागील स्वरासह कधी कधी ए किंवा ओ होतो.
ए : अध:शिरस्=अहेसिरं.
ओ : अध:शिरस्=अहोसिरं, अन्त:शल्प=अंतोसल्ल, अन्त:शाला=अंतोसाला, मन:शिला=मणोसिला; अन्त:सुषिर=अंतोज्झुसिर, प्रात:स्नान = पाओसिणाण.

(इ) विसर्गापुढे ऊष्म असता कधी कधी विसर्ग नाही असे समजून सरळ वर्णान्तर होते.
मन:समाधि=मणसमाहि; मन:शिला=मणसिला.

---

१ *(अ) अनुस्वारागम झाल्यास : मन:शिला=मणंसिला*
*(आ) सुलभीकरण झाल्यास : नि:शङ्क =नीसंक, नि:शेष=नीसेस, नि:सह=नीसह*

## १०६ मध्य संयुक्तव्यंजनांचे अनियमित विकार

काही मध्य संयुक्तव्यंजनांचे अनियमित विकार पुढीलप्रमाणे झालेले आढळतात.

क्त= क्क : मुक्त[१]=मुक्क, शक्त=सक्क

क्त=ग्ग : रक्त=रग्ग (हेम. २.१०)

ग्ण=क्क : रुग्ण=लुक्क (हेम. २.२)

ग्ध=ड्ढ : विदग्ध=वियड्ढ, दग्ध=दड्ढ

च्छ=क्ख : म्लेच्छ=मिलक्खु

त्त[२]=ट्ट : वृत्त=वट्ट, प्रवृत्त=पयट्ट, मृत्तिका=मट्टिया

त्थ=ट्ठ : कपित्थ=कविट्ठ (म. : कवठ)

त्य=ट्ट : नृत्य=नट्ट

त्व=क्क : मृदुत्व=माउक्क (हेम. २.२)

द्ध=ज्झ : युद्ध=जुज्झ (म. : झुंज)

द्ध=ड्ढ : ऋद्धि=इड्ढि, वृद्धि=वुड्ढि (म.: वाढ), वृद्ध=वुड्ढ (हिंदी :बुढा)

द्र[३]=ड्ड : क्षुद्रक=खुड्डाग, छिद्र=छिड्ड

र्त=ड्ड : गर्त=गड्ड (खळगा), गर्ता=गड्डा (खळगा)

र्त्म=ट्ट : वर्त्मन्=वट्टा (म. : वाट)

र्ध्व=ब्भ : ऊर्ध्व=उब्भ[४] (म. : उभा)

र्ष=ड्ढ : कर्षण=कड्ढण

न्त=ण्ट : वृन्त=विंट, तालवृन्त=तालविंट (पंखा)

न्थ=ण्ठ : ग्रन्थि = गंठि (म. : गांठ), निर्ग्रन्थ=नियंठ, ग्रन्थिभेद=गंठिभेय

न्द=ण्ड : भिन्दिपाल=भिंडिवाल, भिंडिमाल

---

*१ म. : मुक्त-मोक(ळा)*

*२ म : वृत्त-वाटो(ळे); हिंदी : मृत्तिका-मिट्टी*

*३ हेमचंद्राच्या मते (**द्रे रो न वा ।** - द्र शब्दे रेफस्य वा लुग् भवति। २.८०) द्र मध्ये र् चा विकल्पाने लोप होतो. उदा. चन्द्र-चंद, चंद्र; रुद्र-रुद्द, रुद्र; भद्र=भद्द, भद्र; समुद्र=समुद्द, समुद्र. तसेच ‘वंद्र’ हा शद्बहि असाच राहतो (हेम. २.७९)*

*४ हेम. २.५९*

ष्ट=क्क : दष्ट=डक्क

ष्ट=द्ध : आश्लिष्ट=आलिद्ध (हेम. २.४९)

ष्ट=ड्ढ : कृष्ट=कड्ढ[1] (म : काढलेले)

स्त = ट्ट : पर्यस्त = पल्लट्ट (म. : काढलेले)

स्थ=ट्ठ : अस्थि=अट्ठि, उपस्थित=उवट्ठिय, संस्थित=संठिय, यथास्थित=जहट्ठिय.

## १०७ तीन अवयवी संयुक्तव्यंजनांचे विकार

'सर्वात कमी बलवान् अवयवाचा लोप' हा समानी करणाचा विशेष तीन अवयवी संयुक्तव्यंजनांनाही लागू पडतोच. त्याचा लोप झाल्यावर मग उरलेल्या दोन अवयवी संयुक्त व्यंजनाचे विकार मागे सांगितलेल्यांपैकी कोणत्यातरी एका प्रकाराने होतात.

प्रथम कुणाचा लोप होतो याविषयी अधिक महिती पुढीलप्रमाणे देता येईल.

(१) (अ) पहिला अवयव अंतस्थ असल्यास प्रथम त्याचा लोप होतो. वर्त्मन्=वट्टा, मूर्च्छति=मुच्छइ, पार्ष्णि=पण्हि, निर्भर्त्सना=निब्भच्छणा.

(आ) अन्त्य अवयव अंतस्थ असल्यास प्रथम त्याचा लोप होतो.

(१) य् चा लोप : सापत्न्य = सावत्त, मत्स्य = मच्छ, दुष्पेक्ष्य = दुपेच्छ, अलक्ष्य = अलक्ख, माहात्म = माहप्प

(२) य् चा लोप : शस्त्र=सत्थ, शास्त्र=सत्थ, उद्भ्रान्त=उब्भंत, निष्प्रभ=निप्पह, राष्ट्र=रट्ठ, दुष्प्रतिकार=दुप्पडियार, अस्थ=अत्थ

(३) व् चा लोप : सम्यक्त्व=सम्मत्त, उच्छ्वास=उस्सास, पृथक्त्व=पुहुत्त

(इ) प्रथम आणि अन्त्य या दोन्ही स्थानी अंतस्थ असता प्रथमस्थानीय अंतस्थाचा लोप प्रथम होतो.

मर्त्य=मच्च, सामर्थ्य=सामच्छ, ऊर्ध्व=उड्ढ

(२) पहिला अवयव विसर्ग असल्यास प्रथम त्याचा लोप होतो.

नि:स्थान=निट्ठाण, वक्ष:स्थल=वच्छत्थल, तप:प्रधान=तवप्पहाण,

---

[1] *हेम २.४७*

आयु:क्षय=आउक्खय, नि:श्वास=(निस्सास)-नीसास.

(३) अनुस्वार वा अनुनासिक प्रथमस्थानी असता अनुस्वार राहतो. अर्धमागधीत अनुस्वारापुढे जोडाक्षर चालत नसल्याने उरलेल्या अवयवाचे द्वित्व झाल्यास द्वित्वातील पहिल्या व्यंजनाचा लोप होतो.

(अ) रन्ध्र=रंध, काङ्क्षा=कंखा, विन्ध्य=विंझ, सन्ध्या=संझा, पङ्क्ति=पंति, मुनीन्द्र=मुणिंद, मन्त्र=मंत, तन्त्र=तंत, सङ्क्षेप=संखेव, सम्प्रेक्ष्=संपेह.

(आ) संस्थित=संठिय, संस्थान=संठाण.

(४) काही विशिष्ट तीन अवयवी संयुक्तव्यंजनांचे विकार असे :

(अ) क्ष्ण : (१) कधी कधी पहिल्या स्पर्शाचा लोप होऊन ण्ह होतो.
श्लक्ष्ण=सण्ह, तीक्ष्ण=तिण्ह

(२) कधी कधी अन्त्य ण् चा लोप होऊन क्ख होतो.
तीक्ष्ण=तिक्ख (हिंदी : तीखा)

(आ) क्ष्म : (१) कधी कधी पहिल्या स्पर्शाचा लोप होऊन म्ह होतो.
पक्ष्मन्=पम्ह (पापणीचे केस), पक्ष्मल=पम्हल (केसाळ,लांब केसाचा)

(२) कधी कधी अन्त्य म् चा लोप होऊन क्ष् चा क्ख् वा च्छ् होतो.
लक्ष्मण=लक्खण, लक्ष्मी=लच्छी

(३) कधी क्ष्म चा ण्ह होतो : सूक्ष्म=सण्ह (हेम. २.७५)

(इ) क्त्व, त्क्ष, द्ध्व, त्स्न, त्स्थ मध्ये पहिल्या स्पर्शाचा लोप होऊन मग वर्णान्तर होते.

क्त्व=च्च : भुक्त्वा=भोच्चा

त्क्ष=क्ख : उत्क्षिप्त=उक्खित्त, तत्क्षणम्=तक्खणं

त्क्ष=च्छ : उत्क्षुभ्यति=उच्छुभइ

द्ध्व=ज्झ : बुद्ध्वा=बुज्झा

त्स्थ=ट्ठ : उत्स्थित=उट्ठिय, उत्स्था=उट्ठा

त्स्न=ण्ह : ज्योत्स्ना=जोण्हा

**१०८ आद्य संयुक्तव्यंजनांचे विकार**

द्वित्वाच्या नियमासह मध्य संयुक्तव्यंजनांचे नियम आद्य संयुक्तव्यंजनांना

लागतात. नंतर, अर्धमागधीत शब्दाचे, आद्यस्थानी संयुक्तव्यंजन चालत नसल्याने, समानीकरण होऊन झालेल्या द्वित्वांतील पहिल्या व्यंजनाचा लोप होतो.[१]

क्रम=(क्कम) कम, क्रोध=कोह; ग्राम=(ग्गाम)गाम; ज्ञान=(न्नाण)नाण, ज्ञात=(न्ना) नाय; त्याग=(च्चाय) चाय; त्रिलोक= (त्तिलोय) तिलोय, त्यागिन्= चाइ; युति= (ज्जुइ) जुइ, ध्वज=(ज्झय) झय; न्याय=(न्नाय) नाय; प्रभा=पहा, प्राकार=पायार, प्रकार=पयार; ब्राह्मण=(ब्बंभण) बंभण; व्यसन=(व्वसण) वसण; श्वापद=(स्सावय) सावय, श्वास=सास, श्वेत=सेय; स्तव=(त्थव) थव, स्कन्धावार=खंधावार (सैन्य,छावणी), स्फुट=फुड.

(अ) आद्य क्ष चे पुढीलप्रमाणे भिन्न भिन्न विकार होतात.

(१) क्ष=ख : क्षण=खण, क्षत्रिय=खत्तिय, क्षय=खय, क्षीर=खीर, क्षीण=खीण

(२) क्ष=छ : क्षुधा=छुहा, क्षुभ्=छुह.
एकाच शब्दात ख व छ : क्षण=खण, छण; क्षार=खार, छार; क्षुर=खुर, छुर; क्षमा=खमा, छमा.

(३) क्ष=च : क्षुल्ल=चुल्ल (लहान, तुच्छ), क्षुल्लपिता=चुल्लपिया, क्षुल्लतात=चुल्लताय (म. : चुलता), क्षुल्लहिवत्=चुल्लहिमवंत

(४) क्ष=झ : क्षरति=झरइ (म. : झरणे), क्षाम=झाम, क्षीयते=झिज्जइ. (म : झिजणे); क्षीण[२]=झीण

## १०९ आद्य संयुक्तव्यंजन : अनियमित विकार

आद्य संयुक्तव्यंजनाचे पुढीलप्रमाणे अनियमित विकार आढळतात

द्व=[३] (ब्ब) ब : द्वारवती=बारवई, द्वितीय=बिइय

ब्र=म : ब्राह्मण=माहण

स्त=ख : स्तम्भ[४]=खंभ

---

१ *म. : स्थाली-थाळी, द्वे-बे, त्रीणि-तीन, द्वार-दार, स्तन=थान, प्राकार-पार, ग्राम-गाव, श्वापद-सावज. हिंदी: श्वास-सास.*

२ *हेम. २.३*

३ *म. : द्वितीय -बीज , द्वादश-बारा*

४ *हेम. २.८ काहींच्या मते 'खंभ' हा 'स्कम्भ' या शब्दापासून होतो. (पिशेल, इं पृ. २१७)*

स्त=ठ : स्तब्ध=ठड्ढ

स्थ=ख : स्थाणु=खाणु (खांब)

स्फ=ख : स्फेटक=खेडय (नाश करणारा), स्फेटिक=खेडिय[१] (नश्वर)

### ११० अन्त्य संयुक्तव्यंजनांचे विकार

(अ) संयुक्त व्यंजनान्त शब्दात अन्ती स्वर मिळवून मग वर्णान्तर केले जाते; किंवा अन्त्य संयुक्तव्यंजनांचा लोप केला जातो.

तिर्यञ्च्[२]=तिरिया, तिरिक्ख; सम्यञ्च्=सम्म (सत्य)

(आ)संयुक्तव्यंजनान्त धातूत अन्ती अ मिळवून मग वर्णान्तर[३] होते

तक्ष्=तच्छ(कापणे, तासणे), प्रगल्भ्=पगब्भ (समर्थ होणे), रक्ष्=रक्ख, शिक्ष्=सिक्ख, अर्च्=अच्च.

### १११ तीन अवयवी अन्त्य संयुक्तव्यंजनांचे विकार

तीन अवयवी संयुक्तव्यंजने अन्ती असणारे शब्द बहुतेक धातु आहेत. त्यांच्या अन्ती 'अ' मिळवून मग त्यांचे वर्णान्तर[४] होते.

मन्त्र्,=मंत, निमन्त्र्=निमंत, मूर्च्छ्=मुच्छ, निर्भर्त्स्=निब्भच्छ, काङ्क्ष्=कंख

### ११२ समासांत

समासांत उत्तरपदाच्या आद्य संयुक्तव्यंजनाला आद्य वा मध्य मानले जाते, व त्यानुसार त्यात विकार होतात.[५]

(१) आद्य मानून : अस्थिर=अथिर, कालक्रम=कालकम, व्रतग्रहण=वयगहण, दु:ख-प्रचुर=दुक्खपउर, मातृस्नेह=माइनेह, अध्रुव=अधुव

---

१ *हेम. २.६*

२ *हेम. २.१४३; उवा ; पृ.९१*

३ *धातुसाधनिका, परि. १३४ पहा.*

४ *येथे तीन अवयवी मध्यसंयुक्त व्यंजनांचे नियम लागतात.*

५ ***समासे वा*** *। हेम.२.९७*

(२) मध्य मानून : धर्म ध्यान=धम्मज्झाण, अप्रमत्त=अप्पमत्त, जन-क्षय=जणक्खय, जल-प्रवाह=जलप्पवाह, देह-प्रभा=देहप्पहा, नियमग्रहण=नियमग्गहण, गुरुप्रहार=गुरुप्पहार

(अ) मागे उपसर्ग असताही वरीलप्रमाणेच वर्णान्तर होते.

आद्य मानून : परित्यक्त=परिचत्त, परिश्रम=परिसम

मध्य मानून : अभिप्राय=अहिप्पाय, निष्प्रभ=निप्पह, अनुक्रम=अणुक्कम, प्रक्षिप्त=पक्खित्त.

**११४ संस्कृतमधील जोडाक्षरांची प्राकृतमधील वर्णान्तरे**

संस्कृतमधली जोडाक्षरे अर्धमागधीत येताना त्यात कोणते विकार होतात, हे आत्तापर्यंत सविस्तर सांगितले आहे. त्याचा थोडक्यात आढावा मुद्दाम पुढे दिला आहे.

प्रथम दिलेले व्यंजन हे प्रथम अवयव, मग त्याची संस्कृतातली जोडाक्षरे व त्यांची वर्णान्तरे, हा क्रम येथे अवलंबिला आहे.

(१) क् : क्त=त्त, (क्क,ग्ग); क्थ=त्थ; क्प=प्प; क्य, क्र, क्ल, क्व=क्क; क्ष=क्ख, च्छ

(२) ख् : ख्य=क्ख

(३) ग् = ग्ण=ग्ग, (क्क); ग्ध=द्ध, ड्ढ; ग्न=ग्ग; ग्भ=ब्भ; ग्म=ग्ग, (म्म); ग्य=ग्ग; ग्र=ग्ग

(४) घ् : घ्न=ग्घ; घ्य=ग्घ; घ्र= ग्घ

(५) ङ् : ङ्म=म्म

(६) च् : च्छ=स्स, (क्ख); च्य=च्च

(७) छ् : च्छ्र=च्छ, (स्स); च्छ्व=स्स

(८) ज् : ज्ञ=न्न (ण्ण); ज्य, ज्र, ज्व=ज्ज

(९) ञ् : ञ्च=न्न (ण्ण); ण्ट

(१०) ट् : ट्क=क्क; ट्च=च्च; ट्त=त्त; ट्प=प्प; ट्फ=प्फ; ट्य =ट्ट; ट्श=स्स

(११) ड् : ड्ग=ग्ग; ड्ज=ज्ज; ड्द=द्द; ड्भ=ब्भ; ड्य=ड्ड; ड्व=व्व

(१२) ढ् : ढ्य=ड्ढ; ढ्र=ड्ढ

(१३) ण् : ण्म=म्म; ण्य=ण्ण; (ण्व=ण्ण)

(१४) त् : त्क=क्क; त्ख=क्ख; त्त=त्त, (ट्ट), त्थ=त्थ, ट्ठ; त्न=त्त; त्प=प्प; त्फ=प्फ; त्म=त्त,प्प; त्य=च्च, त्त; त्र=त्त, त्थ; त्व=च्च, त्त,(क्क); त्स=च्छ,स्स.

(१५) थ् : थ्य=च्छ, (च्च); थ्व=च्छ

(१६) द् : द्ग=ग्ग; द्घ=ग्घ; द्ध=ड्ढ, (ज्झ); द्ब=ब्ब; द्भ=ब्भ; द्म=म्म; द्य=ज्ज; द्र=(द्र), द्द,ड्ड; द्व=द्द,(ज्ज), व्व.

(१७) ध् : ध्य=ज्झ; ध्र=द्ध; ध्व=द्ध, ड्ढ, ज्झ, (ब्भ)

(१८) न् : न्त=न्त, (ण्ट); न्थ=न्थ, (ण्ठ); न्द=न्द, (ण्ड); न्म=म्म; न्य, न्व=न्न

(१९) प् : प्त=त्त; प्न=प्प; प्य,प्र, प्ल=प्प; प्स=च्छ

(२०) ब् : ब्ज=ज्ज; ब्द=द्द; ब्ध=द्ध; ब्र=ब्ब

(२१) भ् : भ्य=ब्भ; भ्र=ब्भ

(२२) म् : म्न=न्न; म्य=म्म; म्र=म्ब, (म्म); म्ल=म्ब, (म्म)

(२३) य् : य्य=ज्ज

(२४) र् : र्क=क्क; र्ख=क्ख; र्ग=ग्ग; र्घ=ग्घ; र्च=च्च; र्च्छ=च्छ; र्ज=ज्ज; र्झ=ज्झ; र्ण=ण्ण; र्त=त्त, ट्ट, (ड्ड); र्थ=त्थ, ट्ठ; र्द=द्द, ड्ड; र्ध=द्ध, ड्ढ; र्प=प्प; र्ब=ब्ब; र्भ=ब्भ, र्म=म्म; र्य=ज्ज, (ल्ल,ल्ह); र्ल=ल्ल; र्व=व्व; र्श=स्स; र्ष=स्स, (ड्ढ)

(२५) ल् : ल्क=क्क; ल्ग=ग्ग; ल्प=प्प; ल्फ=प्फ; ल्ब=ब्ब; ल्भ=ब्भ; ल्म=म्म; ल्य=ल्ल; ल्व=ल्ल

(२६) व् : व्य=व्व; व्र=व्व

(२७) श् : श्च=च्च, च्छ;श्न=ण्ह; श्म=म्ह, (स्स,म्म); श्य=स्स; श्र=स्स; श्ल=स्स; श्व=स्स; श्श=स्स

(२८) ष् : ष्क=क्क, क्ख; ष्ट=ट्ट,ट्ठ,(क्क,द्ध); ष्ठ=ट्ठ; ष्ण=ण्ह; ष्प=प्प,प्फ; ष्फ=प्फ; ष्म=म्ह, म्भ; ष्य, ष्व=स्स; ष्ष=स्स

(२९) स् : स्क=क्क, क्ख; स्ख=क्ख; स्ज=ज्ज; स्त=त्त, त्थ,(ट्ठ); स्थ=त्थ,ट्ठ; स्न=न्ह(ण्ह) स्प=प्प, प्फ, स्र; स्फ=प्फ; स्म=म्ह, स्स; स्य, स्र, स्व=स्स

(३०) ह् : ह्ण=ण्ह; ह्न=न्ह(ण्ह), (न्ध); ह्म=म्ह,म्भ; ह्य=ज्झ; ह्ल=ल्ह;
ह्व=ब्भ.

**११४ एकाच प्राकृत जोडाक्षरासाठी येणारी अनेक संस्कृत जोडाक्षरे**

अर्धमागधीत काही ठराविक जोडाक्षरेच चालत असल्याने संस्कृतमधील विविध प्रकारची जोडाक्षरे या ठराविक जोडाक्षरातच बसवावी लागतात. साहजिकच असे होते की अनेक संस्कृत जोडाक्षराबद्दल प्राकृतमध्ये मात्र एकच जोडाक्षर येते ही माहिती आता दिली आहे.

प्रथम प्राकृतमधील जोडाक्षर, त्यासाठी येऊ शकणारी अनेक संस्कृत जोडाक्षरे व प्रत्येकाचे एकेक उदाहरण पुढे दिले आहे

( : ही खूण विसर्गाची आहे)

**(१) क्क :** (१) क्य :- वाक्य=वक्क
(२) क्र :- चक्र=चक्क
(३) क्ल :- शुक्ल=सुक्क
(४) क्व :- पक्व=पिक्क
(५) ट्क :- षट्क=छक्क
(६) ल्क :- वल्कल=वक्कल
(७) र्क :- तर्क=तक्क
(८) ल्क :- वल्कल=वक्कल
(९) :क :- अन्त:करण=अंतक्करण
(१०) क्त :- मुक्त=मुक्क
(११) ष्क :- शुष्क=सुक्क
(१२) स्क :- तस्कर=तक्कर

**(२) क्ख :** (१) क्ष :- पक्ष=पक्ख
(२) ख्य :- सौख्य=सोक्ख
(३) त्ख :- उत्खात=उक्खय
(४) र्ख :- मूर्ख=मुक्ख
(५) ष्क :- पुष्कर=पोक्खर

(६) स्क :- तिरस्कार=तिरक्खार

(७) स्ख :- प्रस्खलित=पक्खलिय

(८) :ख :- दुःख=दुक्ख

(९) क्ष्य :- लक्ष्य=लक्ख

(१०) च्छ :- म्लेच्छ=मिलक्खु

(११) क्ष्ण :- तीक्ष्ण=तिक्ख

(१२) ष्क्र :- निष्क्रान्त=निक्खंत

(१३) त्क्ष :- उत्क्षिप्त=उक्खित्त

(१४) क्ष्म :- लक्ष्मण=लक्खण

**(३) ग्ग :** (१) ग्ण :- रुग्ण=रुग्ग

(२) ग्न :- अग्नि=अग्गि

(३) ग्म :- युग्म=जुग्ग

(४) ग्य :- योग्य=जोग्ग

(५) ग्र :- अग्र=अग्ग

(६) ड्ग :- खड्ग=खग्ग

(७) द्ग :- पुद्गल=पोग्गल

(८) र्ग :- मार्ग=मग्ग

(९) ल्ग :- वल्गति=वग्गइ

(१०) क्त :- रक्त=रग्ग

**(४) ग्घ :** (१) घ्र :- व्याघ्र=वग्घ

(२) द्घ :- समुद्घात=समुग्घाय

(३) र्घ :- अर्घ=अग्घ

(४) घ्न :- विघ्न=विग्घ

(५) र्घ्य :- अर्घ्य=अग्घ

**(५) च्च :** (१) च्य :- वाच्य=वच्च

(२) ट्च :- षट्चक्र=छच्चक्क

(३) त्य :- नित्य=निच्च

(४) र्च :- अर्चा=अच्चा

(५) श्च : निश्चल=निच्चल
(६) त्व : चत्वर=चच्चर
(७) थ्य : तश्य=तच्च
(८) ज्य : व्रज्यते=वच्चइ[१]
(९) क्त्व : भुक्त्वा=भोच्चा

**(६) च्छ :** (१) क्ष : अक्षि=अच्छि
(२) त्स : वत्स=वच्छ
(३) थ्य : मिथ्या=मिच्छा
(४) प्स : अप्सरस्=अच्छरा
(५) र्च्छ : मूर्च्छा=मुच्छा
(६) श्च : पश्चात्=पच्छा
(७) च्छ्र : कृच्छ्र=किच्छ
(८) त्स्य : मत्स्य=मच्छ
(९) श्र : श्रेयस्=छेयं[२]
(१०) ष्व : पितृष्वसा=पिउच्छा
(११) क्ष्म : लक्ष्मी=लच्छी
(१२) क्ष्य : दुष्प्रेक्ष्य=दुप्पेच्छ
(१३) त्क्ष : उत्क्षुभ्यति=[४] उच्छुभइ
(१४) स्त : आस्तरक[५]=अच्छरय

**(७) ज्ज :** (१) ज्य : राज्य=रज्ज
(२) ज्र : वज्र=वज्ज
(३) ज्व : प्रज्वलित=पज्जलिय
(४) ड्ज : षड्जीव=छज्जीव
(५) द्य : मद्य=मज्ज

---

१ *सेन, पृ. २९*
२ *वैद्य, पृ. २६*
३ *सेन, पृ. ३०*
४ *पिशेल, पृ. २२०*
५ *गांधी, पृ. ४२*

(६) ब्ज : कुब्ज=खुज्ज
(७) य्य : शय्या=सेज्जा
(८) र्ज : जर्जर=जज्जर
(९) र्य : आर्य=अज्ज
(१०) र्ज्य : वर्ज्य=वज्ज
(११) द्व : विद्वान्=विज्जं
(१२) ज्ञ : अभिज्ञ[1]=अहिज्ज
(१३) ज्ज्व : उज्ज्वल=उज्जल

**(८) ज्झ :** (१) ध्य : वध्य=वज्झ
(२) र्झ : निर्झर=निज्झर
(३) ह्य : गुह्य=गुज्झ
(४) ध्व : साध्वस=सज्झस
(५) द्ध्व : बुद्ध्वा=बुज्झा
(६) द्ध : युद्ध=जुज्झ
(७) :क्ष : नि:क्षामयाम[2]=निज्झामेमो

**(९) ट्ट :** (१) ट्य : नाट्य=नट्ट
(२) र्त : कीर्तयति=किट्टेइ
(३) त्त : मृत्तिका=मट्टिया
(४) ष्ट : इष्टिका=इट्टिया
(५) ष्ट्र : उष्ट्र=उट्ट
(६) स्त : पर्यस्त=पल्लट्ट

**(१०) ट्ठ :** (१) ष्ट : दुष्ट=दुट्ठ
(२) ष्ठ : गोष्ठी=गोट्ठी
(३) स्थ : अस्थि=अट्ठि
(४) र्थ : अर्थ=अट्ठ
(५) त्थ : कपित्थ=कविट्ठ[3]

---

१ *हेम. १.५६*
२ *पिशेल, पृ. ३३३*
३ *सेन, पृ. ३२*

**(११) ड्ड :** (१) ड्य : कुड्य=कुड्ड
(२) र्त : गर्त=गड्ड
(३) द्र : छिद्र=छिड्ड
(४) र्द : विच्छर्द=विच्छड्ड

**(१२) ड्ढ :** (१) ग्ध : दग्ध=दड्ढ
(२) ढ्य : वैताढ्य=वेयड्ढ
(३) द्ध : ऋद्धि=इड्ढि
(४) र्ध : अर्ध=अड्ढ
(५) र्ध्व : ऊर्ध्व=उड्ढ

**(१३) ण्ट :** (१) न्त : वृन्त=विंट
(२) ञ्च : आकुञ्चन=आउंटण

**(१४) ण्ड :** (१) न्द : भिन्दिपाल=भिंडिवाल

**(१५) ण्ण :** (१) ज्ञ : सञ्ज्ञा–सण्णा
(२) ण्य : पुण्य=पुण्ण
(३) ण्व : कण्व=कण्ण
(४) र्ण : कर्ण=कण्ण
(५) ञ्च : पञ्चषष्टि=पण्णट्ठि (६५)

**(१६) ण्ह :** (१) क्ष्ण : तीक्ष्ण=तिण्ह
(२) श्न : प्रश्न=पण्ह
(३) ष्ण : उष्ण=उण्ह
(४) स्न : प्रस्नव=पण्हव
(५) ह्ण : पूर्वाह्ण=पुव्वण्ह
(६) ह्न : वह्नि=वण्हि

**(१७) त्त :** (१) क्त : सक्त=सत्त
(२) त्न : यत्न=जत्त
(३) त्र : चित्र=चित्त
(४) त्व : सत्वर=सत्तर
(५) प्त : सुप्त=सुत्त

(६) र्त : धूर्त=धुत्त
(७) त्त्व : सत्त्व=सत्त
(८) स्त : दुस्तर=दुत्तर
(९) त्म : आत्मन्=अत्त
(१०) ट्त : षट्तल=छत्तल

**(१८) त्थ :** (१) क्थ : रिक्थ=रित्थ
(२) र्थ : अर्थ=अत्थ
(३) स्त : हस्त=हत्थ
(४) स्थ : प्रस्थित=पत्थिय
(५) त्र : सर्वत्र=सव्वत्थ
(६) स्त्र : शस्त्र=सत्थ

**(१९) द्द :** (१) द्र : निद्रा=निद्दा
(२) व्द : जम्बुद्विप = जंबुद्दीव
(३) ब्द : शब्द=सद्द
(४) र्द : मर्दित=मद्दिम
(५) र्द्र : आर्द्र=अद्द
(६) ड्द : षड्दिशम्=छद्दिसिं

**(२०) द्ध :** (१) ग्ध : दुग्ध=दुद्ध
(२) ध्र : रन्ध्र=रंध
(३) ध्व : विध्वंस=विद्धंस
(४) ब्ध : लब्ध=लद्ध
(५) र्ध : अर्ध=अद्ध
(६) र्ध्व : ऊर्ध्व=उधद्ध

**(२१) न्ध :** (१) ह्न : चिह्न=चिंध

**(२२) न्न :** (१) ज्ञ : सर्वज्ञ=सव्वन्नु
(२) न्य : अन्य=अन्न
(३) न्व : अन्वेषण=अन्नेसण
(४) म्न : निम्न=निन्न

(५) ञ्च : पञ्चदश=पन्नरस
(६) र्न : दुर्निवारता=दुन्निवारया

**(२३) प्प :** (१) क्प : वाक्पतिराज=वप्पइराय
(२) क्म : रुक्म=रुप्प
(३) त्प : तत्पर=तप्पर
(४) प्य : रुप्य=रुप्प
(५) प्र : विप्र=विप्प
(६) प्ल : विप्लव=विप्पव
(७) र्प : अर्पण=अप्पण
(८) ल्प : अल्प=अप्प
(९) :प : अन्त:पात=अंतप्पाय
(१०) त्म : आत्मन्=अप्प
(११) त्म्य : माहात्म्य=माहप्प
(१२) प्न : प्राप्नोति[१]=पप्पोइ
(१३) ष्प : चतुष्पद=चउप्पय
(१४) ट्प : षट्पद=छप्पय
(१५) स्प : परस्पर=परोप्पर

**(२४) प्फ :** (१) त्फ : उत्फुल्ल=उप्फुल्ल
(२) ल्फ : गुल्फ=गुप्फ
(३) ष्प : पुष्प=पुप्फ
(४) स्प : बृहस्पति=बहप्फइ
(५) :फ : दु:फल=दुप्फल
(६) ट्फ : कट्फल=कप्फल
(७) स्फ : आस्फाल्= अप्फाल

**(२५) ब्ब :** (१) ब्र : अब्रवीत्=अब्बवी
(२) र्ब : कर्बट=कब्बड

---

*१ सेन, पृ. ३९*

(३) द्ब : बुद्बुद=बुब्बुय
(४) ल्ब : किल्बिष=किब्बिस

**(२६) ब्भ :** (१) ग्भ : प्राग्भार=पब्भार
(२) द्भ : उद्भव = उब्भव
(३) भ्य : इभ्य=इब्भ
(४) भ्र : अभ्र=अब्भ
(५) र्भ : दर्भ=दब्भ
(६) ल्भ : प्रगल्भ=पगब्भ
(७) ह्व : जिह्वा=जिब्भा
(८) ड्भ : षड्भाग=छब्भाग
(९) र्ध्व : ऊर्ध्व=उब्भ

**(२७) म्ब :** (१) म्र : आम्र=अंब
(२) म्ल : आम्ल=अंब

**(२८) म्भ :** (१) ह्म : ब्राह्मण=बंभण
(२) ष्म : श्लेष्मन्=सेंभ

**(२९) म्म :** (१) न्म : जन्मन्=जम्म
(२) म्य : रम्य : रम्म
(३) म्ल : म्लेच्छ= मेच्छ
(४) र्म : धर्म=धम्म
(५) ल्म : गुल्म=गुम्म
(६) ङ्म : दिङ्मुख=दिम्मुह
(७) ण्म : षण्मुख=छम्मुह
(८) द्म : पद्म=पोम्म
(९) र्म्य : हर्म्य[१]=हम्म
(१०) न्म : उन्मुख=उम्मुह

**(३०) म्ह :** (१) श्म : कश्मीर=कम्हीर
(२) ष्म : ऊष्मा=उम्हा

---

१ *सुत्ता. प्रस्ता. पृ. २९*

(३) स्म : विस्मय=विम्हय

(४) ह्म : जिह्म=जिम्ह

(५) क्ष्म : पक्ष्मन्=पम्ह

**(३१) ल्ल :** (१) र्ल : दुर्लभ=दुल्लह

(२) ल्य : शल्य=सल्ल

(३) ल्व : बिल्व=बिल्ल

(४) र्य : सौकुमार्य=सोगमल्ल

(५) र्द्र : आर्द्र=ओल्ल

(६) द्र : क्षुद्र[1]=चुल्ल

**(३२) ल्ह :** (१) ह्ल : आह्लाद=अल्हाय

(२) र्य : पर्यस्त=पल्हत्थ

(३) ल : लशुन=ल्हसुण

**(३३) व्व :** (१) द्व : उद्विग्न=उव्विग्ग

(२) र्व : सर्व=सव्व

(३) व्र : तीव्र=तिव्व

(४) व्य : काव्य=कव्व

(५) ड्व : षड्विंशति=छव्वीस

**(३४) स्स :** (१) श्म : रश्मि=रस्सि

(२) श्य : विनश्यति=विणस्सइ

(३) ष्य : मनुष्य=मणुस्स

(४) स्य : तस्य = तस्स

(५) श्र : मिश्र=मिस्स

(६) र्श : विमर्श=विमस्स

(७) श्व : विश्वास=विस्सास

(८) ष्व : विष्वक्=(विस्सुं) वीसुं

(९) स्र : सहस्र=सहस्स

(१०) स्व : परस्व=परस्स

---

१ *सेन, पृ. ४४*

(११) श्ल : श्लाघ्य=सग्घ
(१२) र्ष : वर्षा=(वस्सा) वासा
(१३) त्स : उत्सव=उस्सव
(१४) च्छ्र : उच्छ्रित=उस्सिय
(१५) :स : दुःसह=दुस्सह
(१६) स्म : अस्मिन्=अस्सिं
(१७) स्प : बृहस्पति=बहस्सइ

## प्रकरण ७

# भाषाशास्त्रीय वर्णादेश

### ११५ प्राथमिक

परिच्छेद ८२ मध्ये म्हटल्याप्रमाणे संयुक्तव्यंजनाच्या बाबतीत कधी कधी स्वरभक्ति, सुलभीकरण इत्यादींचा अवलंब केला जातो. आता हे व इतर काही वर्णादेश यांचा विचार करावयाचा आहे.

### ११६ स्वरभक्ति

मध्ये स्वर न येता अनेक व्यंजने एकत्र येऊन जोडाक्षर बनलेले असते. आता जर त्या व्यंजनामध्ये एखादा स्वर अधिक घातला तर आपोआपच संयुक्त व्यंजन नाहीसे होईल. उदा. अग्नि = अ+ग्+न्+इ येथे ग् व न् मध्ये अ हा स्वर अधिक घातला अ+ग्+अ+न्+इ तर अगनि–अगणि होऊन संयुक्तव्यंजन लुप्त होईल. अशातऱ्हेने जोडाक्षरातील व्यंजनांच्या मध्ये एखादा स्वर अधिक घालून संयुक्त व्यंजन टाळण्याच्या पध्दतीला स्वरभक्ति[1] असे नाव आहे.

कधी कधी शब्दातील आद्य तर कधी मध्य संयुक्तव्यंजन टाळण्यास स्वरभक्तिचा उपयोग होतो.

संयुक्तव्यंजनातील एक अवयव जेव्हा अनुनासिक (ण्, न्, म्) किंवा अंतस्थ (य्, व्, र्, ल्) असतो तेव्हा प्रायः स्वरभक्तिचा अवलंब केला जातो. तसेच ह्र व र्ह यांचे बाबतीतही बहुधा स्वरभक्ती होते.

स्वरभक्तिने प्रायः इ व पुष्कळदां अ आणि उ हे स्वर येतात क्वचित् इतर स्वरही येतात. केव्हा कोणता स्वर येईल, हे निश्चितपणे सांगता येणार नाही. ते

---

१ *विकर्ष, विप्रकर्ष, विश्लेष या संज्ञानीही स्वरभक्तीचा निर्देश केला जातो.*

वाङ्मयीन प्रयोगावरूनच जाणून घेतले पाहिजे.

१) स्वरभक्तिने येणारी इ :

**(अ)** एक अवयव अंतस्थ असता :

२) य् असता : चैत्य = चेइय, सूर्य = सूरिय, आचार्य = आयरिय, भार्या = भारिया, वीर्य = वीरिय, आश्चर्य = अच्छरिय, त्यक्त = चियत्त, दिष्ट्या = दिट्ठिया

२) र्[1] असता : हर्ष = हरिस, श्री = सिरि, क्रिया = किरिया, स्पर्श = फरिस, वर्षा = वरिसा, सर्षप = सरिसव (मोहरी), वज्र = वइर, ईर्या = इरिया, अमर्ष = अमरिस, श्रीमती = सिरिमई.

३) ल् असता : क्लिन्न = किलिन्न (ओले), क्लेश = किलेस (म. किळस) श्लाक = सिलोग, क्लान्त = किलंत, म्लेच्छ = मिलक्खु, श्लिष्ट = सिलिष्ठ

४) व् असता : भव्य = भविय, व्याघ्र = वियग्घ

**आ)** एक अवयव अनुनासिक असता :

१) ण् असता : कृष्ण = कसिण, उष्ण = उसिण, अत्युष्ण = अच्चुसिण, तूष्णीक = तुसिणीय, पण्य = पणिय (विक्रेय वस्तु)

२) न् असता : नग्न = नगिण, प्रश्न = पसिण, स्नान = सिणाण, स्वप्न = सुमिण, ज्योत्स्ना = दोसिणा

३) म्[2] असता : अम्लान = अमिलाण

इ) (१) र्ह : गर्हा = गरिहा, अर्हत = अरिहा, गर्हामि = गरिहामि

(२) ह : ह्री = हिरि

२) स्वरभक्तिने येणारा[3] अ :

---

*१ अ) 'म्र' मध्ये कधी म्ब होऊन मग स्वरभक्ति होते : आम्र = अंबिर, ताम्र = तंबिर (म् : तांबेरा)*

*आ) म. : धर्म-धरम, ग्रहण-गिरान, प्रेम-पिरेम, प्रीत-पीरत, हर्ष=हरिख*

*२ फ 'म्ल' मध्ये कधी म्ब होऊन मग स्वरभक्ति होते : अम्ल=अंबिल, आचाम्ल = आयंबिल*

*३ म. : रक्त-रगत, हिंदी : सूर्य-सुरज, तीर्थ-तीरथ.*

अ) एक अवयव अंतस्थ असता :

१) र् असता : दीर्घ = दीहर

२) व् असता : पृथ्वी = पुहवी

आ) एक अवयव अनुनासिक असता :

१) ण्[१] असता : अभीक्ष्णम् = अभिक्खणं

२) न् असता : अग्नि = अगणि, रत्न = रयण

३) म् असता : भस्मन् = भसम, सूक्ष्म = सुहम, स्मशान = समसाण

इ) १) र्ह : अर्हत् = अरहा, गर्हा =गरहा

२) ह्र : ह्रद = हरय, ह्रस्व = रहस्स

३) स्वरभक्तीने येणारा[२] उ :

अ) द्वार = दुवार, श्व:= सुवे, द्वादश = दुवालस

आ) पद्म = पउम, छद्म = छउम, स्मरति = सुमरइ, सूक्ष्म = सुहुम

४) स्वरभक्तिने येणारी ई : ज्या = जीया (धनुष्याची दोरी)

५) स्वरभक्तिने येणारा ए : ग्लान्य = गेलन्न (रोग, आजार)

### ११७ एकाच शब्दात स्वरभक्तिने येणारे अनेक स्वर

कधी कधी एकाच शब्दातील संयुक्तव्यंजनात स्वरभक्तिने अनेक स्वर येतात. असे काही शब्द पुढे दिले आहेत.

स्निग्ध = सणिद्ध, सिणिद्ध, कृष्ण = कसण, कसिण, अर्हत् = अरह, अरिह, सूक्ष्म = सुहम, सुहुम, गर्हा = गरहा, गरिहा

### ११८ सुलभीकरण

समानीकरणाने संयुक्तव्यंजनातील एका अवयावाचा लोप होऊन उरलेल्यांचे द्वित्व होते. कधी कधी या द्वित्वातील पहिल्या अवयावाचा लोप करून मागील स्वर ह्रस्व असल्यास[३] दीर्घ केला जातो. मागील स्वर दीर्घ असल्यास तो तसाच

१ *म : स्ना–नहाणे, स्नानगृह – नहाणीघर*

२ *म. : लक्ष्मी–लक्षुमी, लक्ष्मण – लक्षुमण*

३ *मागील ह्रस्व स्वर दीर्घ करण्याने शब्दातील मात्रा कायम ठेवणे या तत्त्वाचे येथे पालन केले जाते.*

ठेवतात. जोडाक्षर नाहीसे करण्याच्या या पध्दतीला सुलभीकरण[१] असे म्हणतात.[२] उदा. मिश्र = मिस्स = मीस.

संयुक्तव्यंजनातील एक अवयव अंतस्थ (य्, व्, र्, ल्) अथवा उष्म (श्, ष्, स्) असता प्रायः सुलभीकरण केलेले आढळते.

अ) एक अवयव अंतस्थ असता :

१) य् असता : गव्यूत = गाऊय (कोस)

२) र् असता : दुर्भग = दूहव, कर्तव्य =कायव्व, निर्णयति = नीणेइ.

३) ल् असता : वल्कल = वागल (म ःवाकळ), फल्गुन = फागुण (फाल्गुन), वल्क = वाग (वल्कल)

४) व् असता : जिह्वा = जीहा

आ) एक अवयव ऊष्म असता :

१) श् असता : मनःशिला = मणासिला, दुश्शासन = दूसासण, निःशङ्क = नीसंक, निःशेष = नीसेस

२) ष् असता : आदक्षिण = आयहिण, दक्षिण = दाहिण, प्रदक्षिण = पयाहिण, निष्षिक्त = नीसित

३) स् असता : उत्सव = ऊसव, भस्मन = भास, निस्सह = नीसह, दुस्सह = दूसह

इ) अंतस्थ व उष्म असा योग असता.[३]

---

१ *काहीजण सुलभीकरणाला ‘केवलीकरण’ म्हणतात.*

२ *मराठीत ण्ण चे सुलभीकरण होऊन न होतो. कर्ण - कान, पर्ण-पान, अरण्य-रान. मराठीतील इतर उदाहरणे : वर्ण-वाण, पुत्र-पूत, गर्भ-गाभा, अद्य-आज, पृष्ठ-पाठ, मुद्ग-मूग, दुग्ध-दूध, तक्र-ताक, चक्र-चाक, जिह्वा-जिब्भा-जीभ, हस्त-हात, अस्ति-अत्थि-आथी, कार्य-काज, श्वश्रू-सासू, कर्तरी-कातरी, पत्र-पात.*

३ ***लुप्तयरवशषसां शषसां दीर्घः।*** *हेम १.४३*

१) श्य असता : पश्यति = पासइ, नश्यति = नासइ, कश्यप = कासव, आवश्यक = आवासय (अवश्य कर्तव्य), क्लिश्यन्ते = कीसंति

२) श्र असता : विश्राम = वीसाम, मिश्र = मीस, उच्छ्रित =ऊसिय

३) श्व असता : अश्व = आस, विश्वास = वीसास, उच्छ्वास = ऊसास, निःश्वास = नीसास, विश्वस्त = वीसत्थ

४) ष्य असता : शिष्य = सीस, मनुष्य = मणूस

५) ष्व असता : विष्वक् = वीसुं

६) स्र असता : विस्रभ्य = वीसंभ, विस्र = वीस

७) र्श असता : स्पर्श = फास, संस्पर्श = संफास

८) र्ष असता : वर्ष = वास, कर्षक = कासय (शेतकरी), वर्षा = वासा, सर्षव = सासव

उ) संयुक्तव्यंजनामागील दीर्घ स्वर[१] सुलभीकरण झाल्यावरही तसाच रहातो.

१) आ : आज्ञापयति = आणवेइ, आज्ञा = आणा, आज्ञाप्ति = आणत्ति, मात्रा = माया (परिमाण), पात्र = पाय, गात्र = गाय, पार्श्व = पास बाष्प = बाह

२) ई : दीर्घ = दीह, ईक्षा = ईहा (दृष्टि), शीर्ष = सीस, ईश्वर = ईसर, ईर्ष्या = ईसा, दीर्घिका = दीहिया (पायऱ्यांची विहीर)

३) ऊ : रूक्ष = लूह, मूत्र = मूय, दूष्य = दूस (वस्त्र)

४) ए : शैक्ष = सेह (नवीन विद्यार्थी), प्रेक्ष् = पेह, प्रेक्षमाण = पेहमाण, वेश्या = वेसा, वैश्वानर = वेसाणर, ऐश्वर्य = एसज्ज

५) ओ : गोत्र = गोय, सौम्य = सोम, योग्य = जोग

ऊ) पुढील काही संयुक्तव्यंजनांचे सुलभीकरण वैशिष्ट्यपूर्ण आहे.

---

१ *म. : मार्ग-माग, धात्री-दाई, कार्य-काज, मूत्र-मूत, सूत्र-सूत, ज्येष्ठ-जेठ, गोत्र-गोत.*

२ *संख्यावाचके पहा*

१) ञ्च = ण : पञ्चविंशति-पणवीस, पञ्चचत्वारिंशत्- पणयालीस, पञ्चत्रिंशत्-पणतीस

२) ष्ट = ढ : वेष्टते = वेढेइ, वेष्ट = वेढ, श्लिष्टि = सेढि (चिकटणे), लोष्ट = लोढ (ढेकुळ), अष्ट = अढ (आठ)

३) ष्ठ = ढ : कुष्ठ = कोढ (कोड)

## ११९ द्वित्वागम

मूळ संस्कृत शब्दात संयुक्तव्यंजन नसतानाही ते शब्द[१] अर्धमागधीत आल्यावर मात्र कित्येकदा त्यांच्यात जोडाक्षर-एखाद्या व्यंजनाचे द्वित्व[२] येते. यालाच द्वित्वागम म्हटले आहे.

मागील स्वर कोणताही असता हे द्वित्व झालेले आढळते. द्वित्वागम झाल्यावर मागील स्वर दीर्घ असल्यास तो ह्रस्व होतो. ह्रस्व असल्यास तो तसाच रहातो.

(अ पुढे) : नख = नक्ख, परवश = परव्वस, अनुवश = अणुव्वस, बहुफल = बहुप्फल, सचित्त = सच्चित्त, पुरुषकार = पुरिसक्कार, अदर्शन = अद्दंसण, कौतूहल = कोउहल्ल, अदीन = अद्दीण.

(आ) पुढे) : खात = खत्त (खणलेले) ध्मात = धत्त (फुंकलेले) कपाल = कभल्ल, आलीन = अल्लिण

(इ पुढे) : भक्तिभर = भत्तिब्भर, जित = जित्त, त्रिकाल = तिक्काल

(ई पुढे) : तूष्णीक = तुण्हिक्क, क्रीडा = किड्डा, व्रीडा = विड्डा, नीड = नेड्ड.

(उ पुढे) : उखा = उक्खा (पात्रविशेष), सुगति = सोग्गइ, साधुकार = साहुक्कार.

(ऊ पुढे) : दुकूल = दुगुल्ल, स्थूल = थुल्ल, भूयस् = भुज्जो, मण्डूक = मंडुक्क

(ऋ पुढे) : ऋजु = उज्जु, व्याहृत = वाहित्त (बोललेले)

(ए पुढे) : प्रेमन् = पेम्म, सेवा = सेव्वा, एक = एक्क, पेय = पेज्ज, प्रेयस् = पेज्ज

---

१ ***तैलादौ*** *।* *हेम २.९८,* ***सेवादौ वा।*** *हेम. २.९९*

२ *बहुधा जोर देण्यास हे द्वित्व होत असावे. उदा. मराठीत : माझं मत्त (मत) अडलय माझं खेट्टर (खेटर), नाकावर टिच्चून (टिचून)*

(ऐ पुढे) : तैल = तेल्ल, दैव = दइव्व, त्रैलोक्य = तेल्लोक्क
(ओ पुढे) : स्रोतस् = सोत्त
(औ पुढे) : यौवन = जोव्वण, गौण = गोण्ण

## १२० अनुस्वारागम

मूळ संस्कृत शब्दात अनुस्वार नसताना हे शब्द जेव्हा अर्धमागधीत येतात तेव्हा त्यामध्ये कधी कधी अनुस्वार येतो. यालाच 'अनुस्वारागम' म्हटले आहे.[१]

पुढील परिस्थितीत हा अनुस्वारागम झालेला आढळतो.

१) संयुक्तव्यंजनात एक अवयव अंतस्थ अथवा उष्म असता[२] :

**अ)** एक अवयव अंतस्थ असता :

१) य् असता : वयस्य = वयंस, नमस्यति = नमंसइ

२) र् असता : मेढ्र = मेंढ (मेंढा, शिस्न), वक्र = वंक, त्र्यस्र = तंस (तीन कोन असणारा) चतुरस्र = चउरंस, षडस्र = छलंस

३) क् असता : शुल्क = सुंक (कर), उच्छुल्क = उस्सुंक (कररहित), जल्प = जंप (बोलणे)

४) व् असता : यशस्विन् = जसंसि, ओजस्विन् = ओयंसि, तेजस्विन् = तेयंसि, वर्चस्विन् = वच्चंसि

**आ)** एक अवयव उष्म असता :

१) श् असता : अश्रु = अंसु (म.ःआसु), श्मश्रु = मंसु, दर्शन = दंसण, स्पर्श = फंस

---

१ ***वक्रादावन्तः।*** *वक्रादिषु यथादर्शनं प्रथमादेः स्वरस्य अन्तागमरूपोऽनुस्वारो भवति। हेम १.२६*

२ *येथे प्रथम समानीकरणाने द्वित्व होते. अनुस्वारागम झाल्यावर द्वित्वातील पहिल्या व्यंजनाचा लोप होतो. किंवा द्वित्वातील पहिल्या व्यंजनाचा लोप होऊन त्याबद्दल अनुस्वार येतो. असे म्हटले तरी चालेल. अनुस्वार हा मागील वर्णावर येतो. ज्यावर अनुस्वार येतो तो स्वर दीर्घ असल्यास ह्रस्व होतो. ह्रस्व असल्यास तो तसाच रहातो.*

२) ष् असता : पक्ष = पंख, पक्षिन् = पंखि, शष्कुलि = संकुलि (करंजी)
३) स् असता : अस्मिन् = अंसि, कस्मिन् = कंसि, तस्मिन् = तंसि, जिघत्सा = दिगिंछा, जुगुप्सा = दुगंछा, विचिकित्सा = वितिगिंछा

२) संयुक्तव्यंजनात एक अवयव अंतस्थ वा उष्म नसताही कधी कधी अनुस्वारागम झालेला आढळतो.[१]
मज्जा = मिंजा, सनत्कुमार = सणंकुमार

३) मूळ संस्कृत शब्दात संयुक्तव्यंजन नसताही त्या शब्दात अनुस्वारागम[२] झालेला आढळतो.
निवसन = नियंसण (वस्त्र), निवसति = नियंसइ, निवसत = नियंसह

४) काही क्रियाविशेषण अव्ययांच्या अन्त्य वर्णावर अनुस्वार येतो. इह = इहं, प्रभृति = पभिइं, उपरि = उवरिं, उप्पिं, तथा = तहं, अद्य = अज्जं, कदाचित् = (कयाइ)[३] कयाइं

५) समासातील दोन पदामध्ये कधी कधी अनुस्वारागम होतो. निरयगामिन् = निरसंगामि, उर्ध्वगौरव = उड्ढागारव, दीर्घगौरव = दीहगारव, ह्रस्वगौरव = रहस्सगारव, उर्ध्वजानु = उड्ढाजाणु, हासकहर (हास्यकारी कौतुक कर्ता)

## १२१ अनुस्वारलोप

मूळ संस्कृत शब्दात असलेल्या अनुस्वाराचा अर्धमागधीत लोप होतो. त्याला अनुस्वारलोप म्हटले आहे.

**अ)** संस्कृत = सक्कय, संस्कार = सक्कार[४]

**आ)** कधी कधी हा अनुस्वारलोप विकल्पाने[५] होतो.

---

१ *म. : भित्ति – भिंत*

२ *म. : मग – मंग, ताराबळ – तारांबळ*

३ *वसु – पृ. ३२४*

४ *उत्तरपदारंभी स्वर असल्यास तो अनुस्वाररूप म् त मिसळतो (संधि पहा) गोणमाई, दीहमध्दा, आहारमाईणि, जोव्वणमुदए (यौवन–उदय), आचारमट्ठा*

५ ***विंशत्यादेर्लुक्।*** *हेम १.२८*

६ ***मांसादेर्वा।*** *हेम १.२९*

मांस = मास, मंस, मांसल = मासल, मंसल, पांसु = पासु, पंसु, कथम् = कह, कहं, इदानीम् = इयाणी, इयाणिं, संमुख = समुह, संमुह

## १२२ आदिवर्णागम

एखाद्या शब्दाच्या आदि- प्रायः उच्चाराच्या सुलभतेसाठी एखाद्या वर्णाचा आगम होतो. त्याला आदिवर्णागम म्हटले आहे.

शब्दाच्या आदि येणारा हा वर्ण स्वर वा व्यंजन असू शकतो.

**(अ)** [१]स्वर : स्त्री = इत्थी, स्त्री-का = इत्थिया

**(आ)** व्यंजन : (१) ज् : एव = जेव

२) प् : इव = पिव

३) म् : इव = मिय

४) व् : इव = विय, विव, उक्त = वुत्त, उच्यते = वुच्चइ, उह्यते = वुब्भइ, ऊढ = वूढ

५) ह् : ओष्ठ = हुट्ठ, अरे[२] = हरे

## १२३ आदिवर्णलोप

शब्दातील आदिवर्णाचा कधी कधी लोप[३] होतो. त्याला आदिवर्ण लोप म्हटले आहे. हा लोप पावणारा आदिवर्ण स्वर[४] वा व्यंजन असू शकतो.

---

१ *अ) येथे शब्दातील आद्य जोडाक्षर उच्चारात टाळून उच्चारसौंदर्य साधले जाते.*

*आ) म. स्कूल-इस्कूल, स्टेशन-इस्टेशन, एक = योक, येक*

२ *अ) पिशेलच्या मते (इं. पृ. २३५) 'हरे' हे अव्यय 'अरे' च्या मागे ह् येऊन झाले आहे.*

*आ) म. ऑफिस-हफिस, अल्फांसो - हपूस, ऑफिसर-हफीसर, हिंदी : ओष्ठ- होठ*

३ *म. शिथिल-ढिला, अमंगल - वंगाळ, उपरि-वर, बुभुक्षा-भूक, अभ्यंतर-भीतर.*

४ *लोप पावणारे हे स्वर प्रायः अ, इ, उ हे आढळतात.*

(अ) स्वर : १) आदि अ चा लोप : अलाबु = लाउ, अगारस्थ = गारत्थ, अतीत = तीय, अवतंसक = वडिंसय, अरण्य = रण्ण (म. रान), अरिष्ट = रिट्ठ, अगार = गार, अगारिन् = गारि, अरघट्ट = रहट्ट (म. रहाट) अपि = पि, वि, अग्नि = गिणि, अतिवर्तते = तिउट्टइ, अपक्रामति = वक्कमइ, अपक्रान्त = वक्कंत

२) आदि इ चा लोप : इति = ति, त्ति, इव = व, व्व

३) आदि उ चा लोप : उदक = दग, उपवसथ = पोसह (उपवास), उपानह् = वाहणा

(आ) व्यंजन १) आदि न् चा लोप : नूनं = णं[1]

२) आदि प् चा लोप : पुनः = उण

## १२४ मध्यवर्णलोप

पुष्कळदा शब्दातील मध्यस्थानीय वर्णाचा लोप[2] होतो. त्याला मध्यवर्णलोप म्हटले आहे. लुप्त होणारा वर्ण स्वर, व्यंजन वा स्वरयुक्तव्यंजन असू शकतो.

अ) १) स्वरलोप : सुरभि =(सुरभि) सुब्भि, दुरभि = दुब्भि (वाईट वासाचा), उपरि = उप्पि, उदूखल = उक्खल (उखळ), भ्रातृजाया = भाऊज्जा

२) व्यंजनलोप : शिबिका = (सिइया) सीमा

३) स्वरयुक्तव्यंजन (अक्षर) : अवट = अड (म. आड), जीवित = जीय, राजकुल = राउल (राजवाडा), देवकुल = देउल, पादपतन = पावडण, पादपीठ = पावीढ, मत्स्यबन्ध = मच्छंध (कोळी), एवमेते = एमेए, एवमादि = एमाइ, निःश्रेयस = निस्सेस (कल्याण, मुक्ति), सूपकार = सूयार (आचारी), पादमुल = पामूल, यावत् = (जाव) जा, तावत् = (ताव) ता.

---

*१ पिशेल पृ. १११*

*२ म. बहीण–भन, म्हणजे–म्हंजे, सुंदरी–सुंद्री, वसति–वस्ती, प्राकार–पार, वेदना–वेणा, देवर–दीर, अमावस्या–आवस, हृदय–हिय्या, बीज–बी, महिषी–म्हैस, गृहवती–गरती, नारिकेल – नारळ, उद्वर्तन – उटणे, वरयात्रा–वरात, पानीय–पाणी, मृत्तिका –माती, मक्षिका–माशी.*

आ) सवर्णलोप :-

मूळ संस्कृत शब्दात अथवा वर्णान्तरित शब्दात एकच वर्ण अनेकदा आल्यास त्यातील एकाचा[१] लोप होतो. याला सवर्णलोप म्हणतात.

१) मूळ संस्कृतशब्दात : एवमेव = एमेव, अपररात्र = अवरत्त

२) वर्णान्तरित शब्दात : हृदय = (हियय) हिय, सिचय = (सियय) सिय, (वस्त्र) अनायतन = (अणाययण) अणायण (वाईट स्थान), दन्तपवन = (दंतववण) दंतवण (दातशुद्धि)

## १२५ अन्त्यवर्णलोप

कधी शब्दातील अन्त्यवर्णाचा[२] लोप होतो. त्याला अन्त्यवर्णलोप म्हटले आहे. लोप होणारा वर्ण प्रायः व्यंजन असतो. क्वचित् स्वरयुक्तव्यंजन (अक्षर) असते.

१) मनाक्-मणा, सुहृद् = सुहि, जगत् = जग, जन्मन् = जम्म, दण्डिन् = दंडि, तमस् = तम, हविस् = हवि, धनुस् = धणु

२) इति[३] = इ

## १२६ वर्णविपर्यय

जेव्हा एखाद्या शब्दातील दोन वर्णांच्या (वा अक्षरांच्या) स्थानांची परस्पर[४] अदलाबदल होते. तेव्हा 'वर्णविपर्यय'[५] होतो.

वाराणसी = वाणारसी (बनारस), उपानह् = (वाणहा) वाहणा, दीर्घ = (दीरह) दीहर, महाराष्ट्र = (महारट्ठ) मरहट्ठ, ललाट = (निलाड) निडाल (म.

---

१ *म. : नववर-नवरा, अपररात्र-अपरात्र, अपरात, दंतावन-दातवण*

२ *अन्त्य असंयुक्तव्यंजन विकार, परि. ७१ पहा*

३ *वैद्य पृ. २१*

४ *म. चिकटणे, चिटकणे, नुकसान, नुसकान, लघु (लहु) हळु, तिलक-टिकली, अनसूया = अनुसया, फलाहार - फराळ.*

५ *वर्णविपर्यय याला स्थितीपरिवृत्ति असेही नाव आहे.*

निढळ), ह्रस्व = (हरस्स) रहस्स, करेणु = कणेरू (हत्तीण), आलान = आणाल (हत्ती बांधण्याचा खांब), अचलपुर = अलचपुर[१]

## १२७ संप्रसारण

शब्दांतील य् आणि व् यांचे जेव्हा अनुक्रमे इ आणि उ होतात, तेव्हा संप्रसारण झाले असे म्हणतात.

(अ) (१) य् = इ : प्रत्यनीक = पडिणीय (शत्रु), व्यतिक्रान्त = वीइक्कंत, न्यग्रोध = निग्गोह , व्यलीक = विलिम (असत्य), व्यजन = वियण (पंखा)

(२) व्[२] = उ : त्वरित = तुरिय, स्वप्न = सुमिण, प्रावरण = पाउरण, विष्वक् = वीसुं, ध्वनि = झुणि. कधी कधी व् = उ = ओ असा विकार झालेला आढळतो. स्वस्तिक = सोत्थिय, श्वपाक = सोवाग, अश्वत्थ = असोत्थ.

(आ) कधी कधी अय् आणि अव् मधील य् आणि व् चे अनुक्रमे इ व उ होऊन ते मागील अ मध्ये मिळून अनुक्रमे ए आणि ओ झालेले आढळतात.

(१) अय्[३] = अइ = ए : लयन = लेण (मःलेणे), त्रयस्त्रिंशत् = तेत्तीस, उज्जयिनी = उज्जेणी, कथयति = कहेइ, नयति = नेइ.

(२) अव्[४] = अउ = ओ : अवधि = ओहि (ज्ञानविशेष), लवण = लोण (म. लोणा), अवम = ओम (अधम, कनिष्ठ), भवति = होइ, यवनिका = जोणिया (पडदा)

---

१ *डॉ. वैद्यांच्या मते (पृ. २२) पुढील शब्दातही वर्णविपर्यय आहे : पर्यन्त = (परयंत-पयरंत-पइरंत) पेरंत, ब्रह्मचर्य = (बंभचरय-बंभचयर-बंभचइर)बंभचेर, आश्चर्य = (अच्छरय-अच्छयर-अच्छइर) अच्छेर*

२ *म. स्वर-सुर, सूर, नव-नउ*

३ *(अ) संस्कृतमधले दशमगणातील धातु, प्रयोजके व तसेच साधिले जाणारे नामधातु यामध्ये बहुधा अय् चा अ इ - ए होतो (पिशेल, पृ. १२०) (आ) म. कदली -(कयली) केळी, रूप्य-रूपे, उदयपुर-उदेपुर.*

४ *म. अवलम्बक-ओळंबा, नवनीत-लोणी.*

(इ) ‘अव’ या उपसर्गाचा पुष्कळदा ओ होतो, तसेच ‘अप’ या उपसर्गाचा (अव होऊन मग) ओ होतो.

(१) अव : अवतरति = ओयरइ, अवकाश = ओगास, अवतीर्ण = ओइण्ण, अवपात = ओवाय (खाली पडणे), अवरोध = ओरोह (अन्तःपुर), अवभुग्न=ओभुग्ग (वाकडा), अवस्वापिनी = ओसोवणी (निद्रा)

(२) अप : अपसरति = ओसरइ (आणणारी विद्या)

---

## पुरवणी १
# शब्दसंग्रहाबद्दल अधिक माहिती

आत्तापर्यंतच्या वर्णविकारांच्या विवेचनावरून दोन गोष्टी प्रामुख्याने लक्षात येतात : १) एकाच संस्कृतशब्दाची अनेक वर्णान्तरित रूपे अर्धमागधीत होऊ शकतात. २) तसेच अनेक संस्कृत शब्दाबद्दल अर्धमागधीत मात्र एकच शब्द येऊ शकतो. या द्विविध प्रकाराचे काही शब्द मुद्दाम पुढे दिले आहेत.

### १२८ एका संस्कृतशब्दाची होणारी अनेक वर्णान्तरे

१) अलाबु = अलाबु, अलाउ, लाउ
२) आत्मन् = अत्त, अप्प, आय (अत्ताण, अप्पाण)
३) आर्द्र = अद्द, ओल्ल, उल्ल
४) आश्चर्य = अच्छेर, अच्छरिय, अच्छेरय, अच्छरिज्ज
५) इक्षु = इक्खु, इच्छु, उच्छु
६) इदानीम् = इदाणिं, इयाणिं, इयाणि
७) ईदृश = ईइस, एरिस, एलिस
८) उदक = उदग, उदय, दग
९) उर्ध्व = उद्ध, उड्ढ, उब्भ

---

१ ***ओद् अवापयोः।*** *प्रा. प्र. ४.२१*

१०) ऋषभ = उसभ, उसह, रिसह
११) एक = एक्क, एग, एय, इक्क
१२) ओष्ठ = ओट्ठ, उट्ठ, हुट्ठ
१३) कपाल = कवल्ल, कभल्ल
१४) कुष्ठिन् = कुट्ठि, कोट्ठि, कोढि
१५) कुष्माण्ड = कुहंड, कूहंड, कोहंड
१६) कृष्ण = कण्ह, किण्ह , कसण, कसिण
१७) क्रीडा = कीडा, किड्डा, कीला, खेड्ड
१८) क्षीण = खीण, छीण, झीण
१९) क्षेत्र = खेत्त, छेत्त, छित्त
२०) चतुर्थ = चउत्थ, चोत्थ, चउट्ठ
२१) चपेटा = चवेडा, चविडा, चविला
२२) चिकित्सा = तेइच्छा, तिगिच्छा, चेइच्छा
२३) जीर्ण = जिण्ण, जुण्ण
२४) जुगुप्सा = दुगुच्छा, दुगुंछा, दुगंछा
२५) तडाग = तलाग, तडाग, तलाय, तलाव
२६) तालवृन्त = तालविंट, तालवेंट, तालियंट
२७) तूष्णीक = तुण्हिक्क, तुण्हिय, तुसिणीय
२८) दष्ट = दट्ठ, डक्क
२९) दीर्घ = दिग्घ, दीह, दीहर
३०) द्वितीय = दुइय, दुइज्ज, बिइय, बीय
३१) नमस्कार = नमोक्कार, नमोयार, नवकार, नवयार
३२) निषध = निसध, निसह, निसढ
३३) नूनम् = नूणं, नूण, णं
३४) पक्व = पक्क, पिक्क
३५) पृथ्वी =पिच्छी, पुहई, पुहवी, पुढवी
३६) पृष्ठ = पिट्ठ, पुट्ठ, पिट्ठि, पुट्ठि
३७) प्राकृत = पाइय, पागय, पायय

३८) प्लक्ष = पिलक्खु, पिलंखु
३९) ब्राह्मण = बंभण, माहण
४०) भार्या = भज्जा, भारिया
४१) भिन्दिपाल = भिंडिवाल, भिंडिमाल
४२) मण्डूक = मंडुक्क, मंडूय
४३) मनःशिला = मणसिला, मणासिला, मणोसिला, मणंसिला
४४) म्लेच्छ = मेच्छ, मिच्छ, मिलिच्छ, मिलक्खु
४५) ललाट = नलाड, नडाल, निडाल, णिलाड,णिडाल
४६) शुनक = सुणग, सुणय, सुणह
४७) शीकर = सीभर, सीयर, सीहर
४८) शुष्क = सुक्ख, सुक्क
४९) श्मशान = मसाण, सुसाण, सीयाण, समसाण
५०) समस्त = समत्त, समत्थ
५१) सरीसृप = सरीसव, सरिसिव, सरीसिव
५२) सुकुमार = सुकुमाल, सुउमाल, सूमाल
५३) सुपुरूष = सुपुरिस, सुउरिस, सूरिस
५४) सूर्य = सुज्ज, सूर, सूरिय
५५) सौकुमार्य = सोउमल्ल, सोऊमल्ल, सोगमल्ल, सोगुमल्ल
५६) स्कन्धावार = खंधावार, खंधवार, खंधार
५७) स्तोक = थोय, थोव, थेव
५८) स्थूल = थूल, थुल्ल, थोर
५९) स्निग्ध = निद्ध, सणिद्ध, सिणिद्ध
६०) स्वप्न = सुमिण, सुविण, सिमिण, सिविण
६१) ह्रस्व = ह्रस्स, हस्स, हंस, रहस्स

**१२९ एका प्राकृतशब्दाबद्दल येऊ शकणारे अनेक संस्कृत शब्द**

१) अंब - आम्र, अम्ल (आंबट रस), आम्ल (आंबट वस्तु)
२) अज्ज - अर्ज (मिळविणे), आर्य, अद्य, आज्य (तूप)

३) अत्त - आत्मन्, आर्त, आप्त (प्राप्त)
४) अत्थ - अस्त, अस्त्र, अर्थ (याचना करणे), अर्थ, अत्र (येथे)
५) अप्प - आत्मन्, अल्प, अर्प (अर्पण करणे)
६) अह - अथ, अहन् (दिवस), अधस् (खाली) अघ (पाप)
७) अहिय - अधिक, अहित (शत्रु), अधीत (अभ्यस्त)
८) आयर - आ + चर्, आकर (खाण), आदर
९) आस- अश्व, आस् (बसणे), आश (भोजन), आस्य (मुख)
१०) कइ - कति (किती), कदा (केव्हा), कपि, कवि
११) कम - क्रम् (चालणे), क्रम (पाय), कम् (इच्छिणे)
१२) खज्ज - खर्ज (वृक्षविशेष), क्षय्य (क्षर), खाद्य
१३) गय - गज (हत्ती) गद (रोग) गत
१४) गाह - ग्राह्य (घेवविणे), गाह् (गाहन करणे), गाध (उतार), ग्राह (मगर)
१५) चय- त्यज्, च्यु (च्युत होणे), चय (समूह), च्यव (च्युत होणे)
१६) चित्त - चित्र, चैत्र, चित्त
१७) जइ - यदि, यति, यदा, जयिन्, (विजयी)
१८) जउ - जतु (लाख), यदु (एक विशेषनाम), यजुस् (यजुर्वेद)
१९) जय - जि (जिंकणे), यज् (यज्ञ करणे), यत् (यत्न करणे) जगत्, जव (वेग), जय
२०) नाय - नाग, नाद, न्याय, नाक (स्वर्ग), ज्ञात
२१) नास - नश्, नाश, न्यास
२२) तत्त - तप्त, तत्र तत्त्व
२३) तत्थ - तत्र, त्रस्त
२४) ताइ - त्यागिन्, तायिन् (रक्षक), तापिन् (तपयुक्त), त्रायिन् (रक्षक)
२५) दोस - द्वेष, दोष
२६) पत्त - पत्र, पात्र, प्राप्त
२७) पय - पच्, पद् (जाणे), पयस्, पद
२८) पाय - पाद, पात, पाक, पात्र
२९) पुट्ठ - स्पृष्ट, पृष्ट, पुष्ट, पृष्ठ

३०) भास - भाष्, भास (प्रकाश), भस्मन्
३१) मग्ग - मार्ग, मग्न, मृग्य, मृग्
३२) मज्ज - मद् (गर्व करणे), मस्ज् (स्नान करणे), मृज् (साफ करणे), मद्य.
३३) मय - मत, मृत, मद, मृग
३४) मास - मास (महिना), माष (उडिद ), मांस
३५) मुक्ख - मूर्ख, मुख्य, मोक्ष
३६) मुत्त - मूत्र, मुक्त, मूर्त
३७) मोह - मोह, मोघ (निष्फळ), मयूख
३८) रय - रज् (रंगविणे), रच्, रत, रजस्, रय (वेग), रव (आवाज)
३९) राय - राज्, राग, रात्र, राजन्
४०) रिउ - रिपु, ऋतु
४१) वक्क - वाक्य, वक्र, वक्त्र
४२) वग्ग - वल्ग्, वर्ग, व्यग्र
४३) वच्छ - वृक्ष, वक्ष्, वत्स
४४) वस - वस् (राहणे), वश, वृष (बैल)
४५) वय - वच्, वद्, व्रज्, वृक, व्रज (समूह), व्यय, वचस्, व्रत, वयस्
४६) वसण - वसन (वस्त्र), व्यसन (संकट)
४७) वाय - वाचय्, वा (वाहणे), वादय्, वात, वाद
४८) वास - वर्ष (वृष्टि), वास (निवास), व्यास (एक ऋषि) वासस्
४९) वियार - विकार, विचार, विदारय्
५०) संत - सत्, श्रान्त, शान्त
५१) सक्क - शक्, शक्त, शक्य, शाक्य, शक्र
५२) सग्ग - स्वर्ग, सर्ग, साग्र
५३) सत्त - शक्त, सक्त, सत्र, सत्त्व, सप्तन्
५४) सत्थ - शस्त्र, शास्त्र, सार्थ, शस्त (प्रशस्त), स्वस्थ, स्वास्थ्य
५५) समण - श्रमण, शमन
५६) सम्म - श्रम्, शम्, शर्मन् (सुख), सम्यञ्च् (सत्य)
५७) सयण - शयन, स्वजन

५८) सर– सृ, स्मृ, शर, स्मर, स्वर, सरस्
५९) सिय – सित, श्रित, शित (तीक्ष्ण धारेचा)
६०) सुइ – श्रुति, शुचि, स्मृति, सृति
६१) सुक्क – शुष्क, शुल्क, शुक्र, शुक्ल
६२) सुत्त – सूत्र, सूक्त, सुप्त, स्रोतस्
६३) सेय – स्वेद, सेक, श्रेयस्, श्वेत
६४) सोय – स्वप्, शुच्, शौच, शोक, स्रोतस्, श्रोत्र
६५) हय – हत, हृत, हय (घोडा)
६६) हिय – हित, हृत, हृदय

**१३० शब्दादेश**

प्राकृत व्याकरण संस्कृतशब्दांचे प्राकृतमधील काही आदेश देतात. नेहमी वापरात आढळणारे असे काही शब्दादेश पुढे दिले आहेत.

क्षिप्त = छूढ, वनिता = विलया, ईषत् = कूर, इदानीम् = एण्हिं, एत्ताहे, मलिन = मइल, शुक्ति = सिप्पि, छुप्त = छिक्क, आरब्ध = आढत्त, बहिः = बाहिरं, अधस् = हेट्ठं[१], भ्रू = भुमआ, गोदावरी = गोला, यावत् = जेत्तिअ, जेद्दट, एतावत् = एत्तिअ, एद्दह, कियत् = केत्तिअ, केद्दह, प्रावरण = पंगुरण, छेक = छइल्ल, श्वश्रू = अत्ता, विदर्भ = विच्छोम, भ्रमर = भसल, प्रगल्भ = तरट्ट, उत्पल = कंदोट्ट[२].

---

१ *हेम. २.१२५–१४४ पहा*

२ *मार्कं ४. ६४ पहा.*

**प्रकरण ८**

# धातुसाधनिका

## १३१ धातूंचा स्वतंत्र विचार

मागे सांगितलेल्या वर्णविकारांत कित्येक स्थळी धातूंचे वर्णविकार तुरळकपणे येऊन गेले आहेत. त्यांचा सविस्तर उलगडा व्हावा म्हणून आता धातूंच्या वर्णविकारांचा स्वतंत्रपणे विचार केला आहे.

## १३२ संस्कृतमधील व अर्धमागधीतील धातु

१) संस्कृतमधील धातु काही स्वरान्त (उदा. या, जि, नी, स्तु गै) तर काही (असंयुक्त वा संयुक्त) व्यंजनान्त आहेत ( उदा. गम्, रम्, युध्, स्कन्द्, मन्त्र्). अर्धमागधीत शब्दान्ती व्यंजन चालत नसल्याने संस्कृतमधून अर्धमागधीत घेतले जाणारे सर्व व्यंजनांत धातु स्वरान्त करून घेतले जातात.[१] २) तसेच ऋ, ॠ, लृ, ऐ व औ हे स्वर अर्धमागधीत नसल्याने ज्या संस्कृत धातूंत हे स्वर (आदि, मध्ये वा अन्ती) आहेत, त्यांचेही वर्णान्तर होते.

संस्कृतमधील स्वरान्त धातूंच्या बाबतीत : अर्धमागधीत धातूंचे अन्ती प्रायः अ, आ, ए अथवा ओ हे स्वर आढळतात. त्यामुळे संस्कृतमधील याखेरीजचे स्वरान्त धातु या चौकटीत बसण्यासारखे करून द्यावे लागतात.

ही सर्व धातुसाधनिका आता पुढे दिली आहे.

## १३३ अकारान्तेतर धातु

**अ)** ओकारान्त : अर्धमागधीत 'हो' हा एकच ओकारान्त धातु आढळतो. व

---

१ *अर्धमागधीतील सर्व धातु स्वरान्त आहेत.*

तो संस्कृत 'भू' धातूवरून गुण[१] होऊन आलेला आहे.

**आ)** एकारान्त धातु : संस्कृत धातूंच्या अन्ती असणाऱ्या ह्रस्व किंवा दीर्घ इ. ई चा गुण होऊन अर्धमागधीतील धातु एकारान्त झालेले आढळतात. उदा–

१) इ = ए (जाणे), जि = जे (जिंकणे), पराजि = पराजे (पराजय करणे), उद् + इ = उदे (उगवणे), अनु + इ = अन्ने.

२) नी = ने (नेणे), विनी = विणे (शिक्षण देणे), आनी–आणे (आणणे), परिणी = परिणे (विवाह करणे), अपनी = अवणे (दूर नेणे) उपनी = उवणे (जवळ नेणे), निर्णी = नीणे (निर्णय करणे), उड्डी = उड्डे (उडणे), विक्री[२] = विक्की

**क)** अनियमित : काही इतर धातु अनियमितपणे एकारान्त झालेले आढळतात दा = दे, ला = ले (घेणे), ब्रू = बे (बोलणे)

**इ)** आकारान्त धातु :

१) संस्कृतमधील आकारान्त धातु वर्णान्ताराने अर्धमागधीत येतात. अभ्युत्था = अब्भुट्ठा (उठून मान देणे), आख्या = अ+खा (सांगणे), आधा = आढा (स्थापणे), उत्स्था = उट्ठा (उठणे), उपस्था = उवट्ठा (जवळ जाणे), निधा = निहा (खाली ठेवणे), निर्या = निज्जा (बाहेर पडणे), प्रत्याख्या = पच्चक्खा (निषेध करणे), या = जा (जाणे), वा = वा (वाहणे), स्था = ठा (उभे रहाणे), स्ना = ण्हा, सिणा (स्नान करणे), हा = जहा (टाकणे)

२) इतर काही धातु अनियमितपणे आकारान्त झालेले आढळतात. गै = गा (गाणे), ध्यै = झा, झिया (ध्यान करणे) म्लै = मिला (म्लान होणे), ग्लै = गिला (थकणे), अश् = अण्हा (खाणे), खाद् = खा (खाणे), जन् = जा (जन्मणे), भी = भा (भिणे)

---

१ *गुण होणे म्हणजे इ, ई, बद्दल ए, व उ, ऊ बद्दल ओ येणे.*

२ *प्रा. प्र. ८.३१*

## १३४ अकारान्त धातु

अर्धमागधीतील बहुसंख्य धातु अकारान्त आहेत. पुढील विविध पद्धतींनी संस्कृत धातु अर्धमागधीत अकारान्त केले जातात.

अ) अकारान्तेतर धातूंचे अकारान्त होणे :

१) आकारान्त धातूंपुढे 'य' येऊन[१] ते कधी कधी आकारान्त होतात. आघ्रा - अग्घा - अग्घाय (हुंगणे), प्रतिभा-पडिहा-पडिहाय (दिसणे), मा-माय (मोजणे), वा- वाय (वाहणे) हा-हाय, या-जा जाय, ध्यै-झा, झिया-झाय, झियाय, गै - गा- गाय, स्था - ठा - ठाय, भी-भा- भाय.

२) संस्कृत धातूंतील अन्त्य ह्रस्व किंवा दीर्घ इ, ई, व उ, ऊ चे अनुक्रमे अय आणि अव[२] होऊन ते अर्धमागधीत अकारान्त होतात.

क) जि-जय, शी-सय (निजणे), विनी = विणय

ख) च्यु = चव (गळणे), प्लु = पव (पोहणे), निह्नु = निह्नव (लपविणे), स्रु = सव (स्रवणे), भू = भव, हव;प्रसू - पसव, प्रभू = पभव, पहव

टीप : कधी कधी धातूंतील अन्त्य उ, ऊ चा उय अथवा उव होतो.

१) स्तु = थुय, हु = हय (होम करणे), धू = धुय (हलविणे)

२) स्तु = थुव, हु[३] = हुव, निह्नु = निह्नव, प्लु = पुव, रू =रूव , लू = लुव (कापणे), धू = धुव[४]

३) धातूंतील अन्त्य ऋ, ॠ चा अर होऊन ते अकारान्त होतात.[५]

क) ह्रस्व ऋ = अर : अनुसृ = अणुसर , अपसृ = ओसर, अपहृ = अवहर, अभ्युद्धृ = अब्भुद्धर, उदाहृ = उदाहर, उद्धृ = उद्धर, उपसंहृ =उवसंहर,

---

१ ***आतोऽद्वा*** ***।*** *- धातोः आकारात् उत्तरे अकारागमो वा स्यात् । मार्कं ७.६० हेमचंद्राच्या मते तर -* ***स्वरादनतो वा।*** *अकारान्तवर्जितात् स्वरान्ताद् धातोरन्ते अकारागमो वा भवति । हेम ३.२४०.*

२ ***उवर्णस्यावः।*** *धातोरन्त्यस्योवर्णस्य अवादेशो भवति । हेम ४.२३३.*

३ *मार्कं ७.६५, ८८, ९३*

४ *मार्कं ७.९१, ९३*

५ ***ऋवर्णस्यारः*** ***।*** *हेम. ४.२३४.*

कृ = कर, जागृ = जागर, धृ = धर, निर्हृ = नीहर (ओढून काढणे), परिहृ = परिहर, प्रतिसंहृ = पडिसंहर, प्रसृ = पसर, भृ = भर, मृ = मर, विहृ विहर, व्यवहृ = ववहर, व्याकृ =वियागर (स्पष्ट करणे), व्याहृ = वाहर, सृ = सर, संहृ = संहर, स्मृ = सर, सुमर, हृ = हर

क) दीर्घ ॠ = अर : अवतॄ ओतूर (उतरणे), उत्तॄ = उत्तर (वर येणे) जॄ = जर (जीर्ण होणे), तॄ = तर (तरणे), प्रत्युतॄ = पच्चुत्तर (पार जाणे), वितॄ = वियर, विवॄ = विवर, वॄ = वर

४) काही स्वरान्त धातूपुढे 'ण' येऊन ते अकारान्त होतात.

१) (आ पुढे) : ज्ञा = जाण, विज्ञा = वियाण, समनुज्ञा = समणुयाण, अनुज्ञा = अणुजाण, निर्मा[१] = निम्माण २) (इ पुढे) : जि = जिण, पराजि = पराजिण, निर्जि = निज्जिण, चि = चिण (गोळा करणे). ३) (ई पुढे) : क्री = किण, विक्री = विक्किण ४) (उ पुढे) : स्तु = थुण, संस्तु = संथुण, अभिस्तु = अभित्थुण, शृ = सुण, निश्रु = निसुण, हु = हुण ५) (ऊ[२] पुढे) : धू = धुण, पू = पुण (पवित्र करणे) ६) (ऋ पुढे) : कृ = कुण

५) इतर काही स्वरान्त धातूही अनियमितपणे अकारान्त झालेले आढळतात. अधि+इ = अहिज्ज (शिकणे), आख्या = आइक्ख (सांगणे), आली = अल्लिय (लपणे), उपली = उवल्लिय (जवळ जाणे), ऋ = रीय (जाणे), कृ = कुव्व, प्रसू = प्रसूय, प्रहा = पयह (त्याग करणे) प्रति + इ = पत्तिय (विश्वास ठेवणे) भी = बिह, बीह, रू = रोव (आवाज करणे), श्रद्धा = सद्दह, संली = समल्लिय (चिकटणे), हा = जह

आ) व्यंजनांत धातूंचे अकारान्त होणे :

व्यंजनांत धातूत सामान्यतः अन्ती अ मिळवून ते अकारान्त केले जातात.[३] यावेळी मूळ धातूतही पुढील विविध विकार होतात.

---

१ *प्रा. प्र. ८.३६*

२ *'ण' मागील दीर्घ स्वर कधी कधी ह्रस्व झालेला आढळतो.*

३ ***व्यंञ्जनाददन्ते ।*** *– व्यंजनान्ताद् धातोरन्ते अकारो भवति । हेम ४. २३९*

व्यंजनान्त धातूत असणाऱ्या ह्रस्व वा दीर्घ इ, ई, उ, ऊ या स्वरांचा गुण होतो[१] व अन्त्य व्यंजनात अ मिसळतो.

**क)** लिख् = लेह (लिहिणे), मिल् = मेल (एकत्र येणे), विध् = वेह (वेधणे), इष् = एस (इच्छिणे), अन्विष् = अन्नेस (शोध करणे), विद् = वेय (जाणणे), खिद् = खेय (खिन्न होणे), ईह् = एह (इच्छिणे)

**का)** रूह् = रोह (वाढणे), आक्रुश् = अक्कोस (शिव्या देणे), नुद् = नोल्ल (ढकलणे), रुद् = रोय, रोव (रडणे), शुच = सोय (शोक करणे), तुल् = तोल (तोलणे), पुष् = पोस (पुष्ट होणे), रुच् = रोय (आवडणे), लुल् = लोल, चुर =; चोर (चोरणे)

२) व्यंजनान्त धातूतील ऋ चा अरि होऊन[२], अन्त्य व्यंजनात अ मिसळतो. कृष् = करिस, वृष् = वरिस, मृत् = मरिस, हृष् = हरिस

३) स्वप् या धातूंत व चे संप्रसारण होते व मग अन्त्य व्यंजनात अ मिसळतो : स्वप् = सुय, सुव

४) व्यंजनान्त धातूत असणाऱ्या संयुक्तव्यंजनात स्वरभक्ति होते व मग अन्त्य व्यंजनात अ मिसळतो.

अर्ह् = अरिह (योग्य असणे), क्लिश् = किलेस (पीडा देणे), गर्ह् = गरह (निंदा करणे), श्लाघ् = सलह (प्रशंसा करणे), श्लिष् = सिलेस

५) व्यंजनान्त धातूतील मूळच्या स्वरात काहीतरी विकार[३] होतो व मग अन्त्य व्यंजनात अ मिसळतो.

घस् = घिस (खाणे, आवाज करणे) धाव् = धुव, धोव (स्वच्छ करणे), पिष् = पीस (वाटणे), भास् = भिस (प्रकाशने), हेल् = हील (अनादर करणे)

६) व्यंजनान्त धातूतील वर्णात अनुस्वारागम होतो व मग अन्त्यव्यंजनात अ मिसळतो.

---

१ ***युवर्णस्य गुणः।*** *हेम ४.२३७*

२ ***वृषादीनामरिः।*** *हेम ४.२३५*

३ ***स्वराणां स्वराः।*** *हेम ४.२३८*

आच्छिद् = अच्छिंद (जबरीने नेणे), आरभ् = आरंभ (आरंभिणे), छिद् = छिंद (तोडणे), नियुज = निउंज (नेमणे), प्रयुज = पउंज (प्रयोग करणे), प्रारभ् = पारंभ, भिद् = भिंद (फोडणे), भुज् = भुंज (भोगणे), युज् = जुंज -जोडणे, रूध् = रूंध (रोधणे), लभ् = लंभ (मिळविणे), विध् = विंध (वेधणे).

७) कधी कधी धातूंच्या अन्त्य व्यंजनाचे द्वित्व होते व मग त्यात अ मिसळतो. उन्मिल् = उम्मिल्ल (उमलणे), कुट् = कुट्ट (कुटणे), चल्ल = चल्ल (हलणे), जिम् = जिम्म (जेवणे), त्रुट् = तुट्ट (तुटणे), निमिल् = निर्मल्ल (झाकणे), प्रमिल् = पमिल्ल (उमलणे), मृग् = मग्ग (शोधणे), युग् = जुज्ज (जोडणे), रुच् = रूच्च (आवडणे), लग् = लग्ग (लागणे), विलग् = विलग्ग (चिकटणे), शक् = सक्क, स्फुट् = फुट्ट (फुटणे)

८) कधी कधी अन्त्य व्यंजनापुढे (एखाद्या स्वरासहित) 'ण' येऊन काही व्यंजनांत धातु अकारांत झालेले आढळतात.
प्राप्-पाउण, शक् = सक्कुण, समर्ज्-समज्जिण

९) अनियमित : विध् = विज्झ (वेधणे), स्वप = सोव (निजणे)

१०) संस्कृतमधील पुष्कळ धातूंच्या[१] अंगांचे वर्णान्तर होऊन व अन्ती (जरूर तेथे) अ येऊन अकारान्तीकरण झालेले[२] आढळते.
अनुमन् - (अनुमन्य) - अणुमन्न (अनुमति देणे), अनुवृत् (अनुवर्त)-अणुवट्ट (अनुसरणे), अपराध् - (अपराध्य) - अवरज्झ (अपराध करणे). अभिसिच्-(अभिसिंच्)-अभिसिंच, अवबुध्-(अवबुध्य)- अवबुज्झ (जाणणे), आगम-(आगच्छ्)-आगच्छ, आप्रच्छ्-(आपृच्छ्)- आपुच्छ (निरोप घेणे), इष्-(इच्छ्)-इच्छ, उत्पद्- (उत्पद्य)-उप्पज (उपजणे),

---

*१ धातूंचे अंग म्हणजे प्रत्ययापूर्वीचे धातूंचे रूप*

*२ कधी कधी धातूंच्या अंगाचे वर्णान्तराने द्वित्व झाल्यावर सुलभीकरण होते व मग (जरूर तेथे) अन्ती अ मिसळतो : तुष् (तुस्स)- तूस, शुष्-(सुस्स) - सूस, दुष (दुस्स) - दूस, रूष (रूस्स) - रूस, पुष -(पुस्स)- पूस, दृश-(पस्स)-पास,*

उपपद् -(उपपद्य)-उववज्ज (योग्य असणे), कुप्-(कुप्य) -कुप्प, कृत् -(कृंत)- कंत (कापणे), क्रुध्-(क्रुध्य)-कुज्झ, गम्-(गच्छ्)-गच्छ, गृध्-(गृध्य)-गिज्झ (इच्छिणे), गुह् (गूह्)-गूह, जन्-(जाय्)-जाय (जन्मणे), तम्-(ताम्य)-तम्म (खिन्न होणे), दीप्-(दीप्य) दिप्प (प्रकाशणे), दृश्-(पश्य्)- पास, पस्स, नश् (नश्य)-नस्स, नृत्-(नृत्य)-नच्च, निसद्-(निसीद्)-निसीय (खाली बसणे), पद् (पद्य)-पज्ज (जाणे), पा-(पिब्)-पिव (पिणे), प्रच्छ्-(पृच्छ्)-पुच्छ, प्रत्यागम्-(प्रत्यागच्छ्)-पच्चागच्छ, प्रवृत- (प्रवर्त्) पउत्त, पयत्त, पयट्ट, बुध् - (बुध्य)-बुज्झ, मद्-(माद्य)-मज्ज (उन्मत्त होणे), मन्-(मन्य)-मन्न (चिंतणे), मुच्- (मुञ्च)-, मुह् (मुत्थ)-मुज्झ, युध्-(युध्य)-जुज्झ, लिप्-(लिम्प) - लिंप, लुप्-(लुम्प्)-लुंप (हिरावुन नेणे), लुभ्-(लुभ्य), लुब्भ (लोभ धरणे), विद्-(विन्द्)-विंद (मिळविणे), विद्-(विद्य)-विज्ज (असणे), विसृज्-(विसृज्य)-विसज्ज, वृर्ज-(वर्ज्)-वज्ज (वर्ज्णे), वृत्-(वर्त्)-वत्त, वट्ट (असणे, होणे), वध्-वर्ध्) - वड्ढ, सद्-(सीद्)-सीय (गळावणे), सिच्-(सिञ्च-सिच, सिध्-(सिध्य) सिज्झ (सिद्धीस जाणे), स्था-तिष्ठ-चिष्ठ.

११) बहुसंख्य व्यंजनांत धातूत अन्ती अ मिळवून ते अकारान्त केले जातात.

क) असंयुक्त व्यंजनान्त धातूंत अ मिळविणे :

१) आरुह्-आरूह (चढणे)
आस्-आस (बसणे)
उज्झ्-उज्झ (टाकणे)
उल्लङ्घ-उल्लंघ (उल्लंघणे)
कम्-कम (इच्छणे)
चर्-चर (जाणे)
निगूह्-निगूह (लपविणे)
पाल्-पाल (पाळणे)
पीड्-पीड (पिडणे)
रम्-रम (रमणे)
रूह्-रूह (वाढणे)
चल्-चल (हलणे)
जीव्-जीव (जगणे)
दम्-दम (दमन करणे)
दह्-दह (जळणे)
दुह्-दुह (दूध काढणे)
नम्-नम (नमस्कार करणे)
वम्-वम (ओकणे)
वस्-वस (रहाणे)
वह्-वह (वाहणे)
विरम्-विरम (थांबणे)
सह्-सह (सहन करणे)

लिह्-लिह (चाटणे) सेव्-सेव (सेवा करणे)
हस्-हस (हसणे)

२) मधील धातूंचा क्रम वरील प्रमाणे आहे

अतिक्रम्-अइक्कम (पलीकडे जाणे) अपक्रम्-अवक्कम (निघून जाणे)
अभिलष्-अभिलस (इच्छणे) अस्तङ्गम्-अत्थंगम (अस्तास जाणे)
आक्रम्-अक्कम (आक्रमण करणे) उद्यम्-उज्जम (प्रयत्न करणे)
उपदिश्-उवदिस (उपदेक्षिणे) उपेक्ष्-उवेक्ख (उपेक्ष्णे)
कथ्-कह (सांगणे) क्रम्-कम (जाणे)
क्रीड्-कील (खेळणे) क्षम्-खम (क्षमा करणे)
क्षिप्-खिव (फेकणे) खन्-खण (खणणे)
खाद्-खाय (खाणे) गवेष्-गवेस (शोधणे)
ग्रस्-गस (खाणे) ज्वल्-जल (जळणे)
ताड्-ताल (ताडणे) त्यज्-चय (त्याग करणे)
दंश्-दंस, डंस (दंश करणे) दह्-डह (जळणे)
दिश्-दिस (सांगणे) निपत्-निवड (खाली पडणे)
निर्दल्-निद्दल (नाश करणे निष्क्रम्-निक्खम (बाहेर पडणे)
पच्-पय (शिजणे) पठ् - पढ (शिकणे)
पत्-पड (पडणे) पराय्-पलाय (पळणे)
पर्युपास्-पज्जुवास (उपासना करणे) पूज्-पूय (पूजा करणे)
प्रक्षि- पक्खिव प्र+नम्-पणम् (वंदन करणे)
प्रलोक्-पलोय (पाहणे) प्रविश्-पविस (प्रवेश करणे)
प्रव्रज्-पव्वय (संन्यास घेणे) प्रशंस्-पसंस (प्रशंसा करणे)
प्राप् - पाव (मिळविणे) प्रेष्-पेस (पाळविणे)
भाष् - भास (बोलणे) भ्रम्-भम (हिंडणे)
मथ्-मह (घुसळणे) मुच्-मुय (सोडणे)
याच्-जाय (याचना करणे) रुद्-रुद, रुव (रडणे)
लप्-लव (बोलणे) लभ्-लह (मिळविणे)

वच्-वय (बोलणे) वद्-वय (बोलणे)
वध्-वह (वध करणे) विलप्-विलव (शोक करणे)
विश्-विस (शिरणे) व्रज्-वय (जाणे)
शम्-सम (शांत होणे) शास्-सास (आज्ञा करणे)
श्रम् - सम (श्रमणे) श्वस्-सस (श्वासोच्छ्वास करणे)
समाचर्-समायर (आचरणे) स्तन्-थण (शब्द करणे)
स्पृश्-फुस (स्पर्श करणे) स्फुर्-फुर (स्फुरणे)
हन्-हण (ठार करणे)

क) संयुक्तव्यंजनान्त धातूत अ मिळविणे

१) कम्प् - कंप (कापणे) २) चिन्त्-चिंत (चिंतणे)
३) दण्ड्-दंड (शिक्षा करणे) ४) निन्द्-निंद (निंदा करणे)
५) लङ्घ्-लंघ (लंघणे) ६) वन्द्-वंद (वंदन करणे)
७) हिण्ड्-हिंड (हिंडणे) ८) हिंस्-हिंस (हिंसा करणे)
९) अभ्यञ्ज-अब्भंग (तेल इ. लावणे) १०) अभ्यर्थ्-अब्भत्थ (याचना करणे)
११) अर्च्-अच्च (पूजा करणे) १२) गर्ज्-गज्ज (गर्जना करणे)
१३) तक्ष्-तच्छ (तासणे) १४) तर्ज्-तज्ज (निर्भर्जत्र्सना करणे)
१५) निर्भर्त्स्-निब्भच्छ १६) परीक्ष्-परिक्ख (परीक्षणे)
१७) प्रगल्भ्-पगब्भ (समर्थ होणे) १८) प्रार्थ्-पत्थ (प्रार्थना करणे)
१९) भक्ष्-भक्ख (खाणे) २०) मन्त्र्-मंत (सल्ला घेणे)
२१) रक्ष्-रक्ख (रक्षणे) २२) वर्ण्-वण्ण (वर्णन करणे)
२३) शिक्ष्-सिक्ख (शिकणे)

## १३५ संस्कृतमधील एकाच धातूची अनेक वर्णान्तरे

संस्कृतमधील एकाच धातूची अर्धमागधीत अनेक वर्णान्तरे होऊ शकतात. असे काही धातु पुढे दिले आहेत.

१) आरभ्-आरभ, आरंभ, आरह २) आख्या-अक्खा, आइक्ख
३) कृ-कर, कुण, कुव्व ४) क्री-किण, कीण
५) गम्-गम, गच्छ ६) जि-जे, जय, जिण

| | |
|---|---|
| ७) जीव्-जीव जिय | ८) दंश्-दंस, डंस, डस |
| ९) दृश्-पस्स, पास | १०) धाव्-धुव, धोव |
| ११) धू-धुव, धुय, धुण | १२) ध्यै-झा, झाय, झिया, झियाय |
| १३) नश्-नस्स, नास | १४) प्रवृत्-पउत्त, पयत्त, पयट्ट |
| १५) प्राप्-पाव, पाउण | १६) प्रेक्ष्-पेक्ख, पेच्छ, पेह |
| १७) भी-भा, भाय, बिह, बीह | १८) भू-भव, हव हो |
| १९) रुद्-रुय, रुव, रोय, रोव | २०) विध्-वेह, विंध, विज्झ |
| २१) शक्-सक्क, सक्कुण | २२) समर्ज्-समज्ज, समज्जिण |
| २३) स्तु-थुव थुय, थुण | २४) स्था-ठा, ठाय, चिट्ठ |
| २५) स्ना-ण्हा, सिणा | २६) स्वप्-सय, सुय, सुव, सोव |
| २७) हा-जह, जहा, हा, हाय | २८) हु-हुव, हुय, हुण |

## १३६ धात्वादेश

संस्कृतातले धातू वर्णान्तराने अर्धमागधीत कसे येतात याचा विचार झाला आहे. त्याखेरीज संस्कृतधातूंच्या ऐवजी येणारे काही धातु 'धात्वादेश' या सदराखाली प्राकृत[१] वैयाकरण नमूद करतात. त्यातील काही धात्वादेश[२] पुढे दिले आहेत.

प्रथम धात्वादेश व मग कंसात संस्कृत धातु या पध्दतीने हे धात्वादेश येथे दिले आहेत.

| | |
|---|---|
| अग्घ (राज्) (शोभणे) | अच्छ (अस्)[३] (असणे) |
| अंच (कृष्) (ओढणे) | उवेल्ल (प्रसृ) (पसरणे) |
| अट्ट (क्कथ्) उकळणे | उव्वेल्ल[४] (उद्वेष्ट्) (वेढणे) |
| अणच्छ (कृष्) | उस्सिक्क (मुच्) (सोडणे) |
| अण्ह (भुज्) (खाणे) | उस्सिक्क (उत्क्षिप्) |

१ *हेम. ४, मार्क ७, प्रा. प्र. ८, त्रिवि. ३.*

२ *बहुतेक धात्वादेश हेमचंद्रांनी दिलेले येथे घेतले आहेत. क्वचित् इतर प्राकृत वैयाकरणांनी दिलेलेही घेतले आहेत. त्यांचे मूळ तळटीपात नमूद केले आहे.*

३ *मार्क. ७.११६*

अब्भिड (सङ्गम) (भेटणे)
अब्भुत्त (प्रदीप) (पेटविणे)
अब्भुत्त (स्ना) (स्नान करणे)
अमंछ (कृष्)
अल्लिअ (उपसृप्)(जवळ जाणे)
अवक्ख (दृश्)(पाहणे)
अरिङ्क्ष (कालं)(इच्छणे)
आइंच[१] (क्रम्) (जाणे)
आइंछ (कृष्)
आउड्ड (मस्ज्) (बुडणे)
आढव (आरभ्) (सुरू करणे)
आरोल (पुंज्)
आलुंघ[२] (स्पृश्)
आसंघ (संभावय्) (मानणे)
उक्खुड (तुड्) (तोडणे)
उग्घुस (मृज्) (साफ करणे)
उंघ (निद्रा) (झोपणे)
उत्थंघ (उन्नामय्) (वर उचलणे)
उत्थंघ (रुध्) (अडवणे)
उत्थंघ (उत्क्षिप्) (वर फेकणे)
उप्पेल (उन्नामय्)
उल्लट्ट[३] (उद्+वृत्) (उलटणे)
उल्लाल (उन्नामय्)
चड (आरुह्) (चढणे)
चड्ड (मृद्) (चुरडणे)
चड्ड (पिंष्) (चूर्ण करणे)

ओग्गाल (रोमन्थ्) (रवंथ करणे)
ओरुम्मा (उद्वा) (वाहणे)
ओहीर (निद्रा) (झोपणे)
कोआस (विकस्) (विकसणे)
कोक्क (व्याहृ) (बोलावणे)
खिर (क्षर्) (क्षरणे)
खुट्ट (तुड्)
खुड (तुड्)
खुप्प (मस्ज्) (बुडी मारणे)
गमेस (गवेष्) (शोधणे)
गलत्थ (क्षिप्) (फेकणे)
गुंज (हस्) (हसणे)
गुम (भ्रम्) (हिंडणे)
गुलल (चाटु कृ) (खुशामत करणे)
घत्त (क्षिप्)
घस[५] (मृज्)
घिस (ग्रस्) (खाणे)
घुम्म (घूर्ण्) (गरगर फिरणे)
घुल (घूर्ण्)
घुसल (मथ्) (घुसळणे)
घोट्ट (पा) (पिणे)
घोल (घूर्ण्)
चक्कम्म (भ्रम्)
जूर (क्रुध्) (रागावणे)
जेम (भुज्)
जोव[७] (दृश्)

---

*१ मार्कं ७.१३४* *२ मार्कं. ७.१४४* *३ मार्कं. ७.१२०*
*४ प्रा. प्र. ८.४१* *५ त्रिवि. ३.१.४८*

चड्डु (भुज्)
चमढ (भुज्)
चय (शक्) (समर्थ असणे)
चव (कथ्) (सांगणे)
चिंच (मण्ड्) (भूषित करणे)
चिंचअ (मण्ड्)
चिंचिल्ल (मण्ड्)
चुक्क (भ्रंश्) (च्युत होणे)
चुलुचुल (स्पन्द्) (हलणे)
चुलुचुल[१] (स्फुर्) (फुरफुरणे)
चूर[२] (चूर्ण्) (चूर्ण करणे)
चोप्पड (भ्रक्ष्) (माखणे)
छज्ज (राज्)
छड्डु (मुच्)
छड्डु[३] (त्यज्) (त्याग करणे)
छिज्ज[४] (क्षि) (नाश पावणे)
छिव (स्पृश्)
छिह (स्पृश्)
जंभाअ[५] (जृभ)
जम्हाय[६] (जृम्भ्) (जांभई देणे)
जम्हाह[६] (जृम्भ्) (जांभई देणे
जिम (भुज्)
जुप्प (युज्) (जोडणे)
जूर (खिद्) (खिन्न होणे)
णिरिणास (गम्)

झड (शद्) (पडणे, झडणे)
झंप[८] (छादय्) (झाकणे)
झर (स्मृ) (आठवणे)
झर (क्षर्)
झूर (स्मृ)
टिरिटिल्ल (भ्रम्)
डंडोल[९] (गवेष्)
डर (त्रस्) (भिणे,त्रस्त होणे)
डल्ल (पा) (पिणे)
डुंडुल्ल[९] (गवेष्)
ढंढोल (गवेष्)
ढुक्क[१०] (प्रविश्) (प्रवेश करणे)
ढुंढुल्ल (गवेष्)
ढुंढुल्ल (भ्रम्)
णिअक्क[११] (दृश्)
णिउड्डु (मस्ज्)
णिच्छल्ल (छिद्) (तोडणे)
णिज्झर (क्षि)
णिज्झोड (छिद्)
णिट्ठुअ (क्षर्) (क्षरणे)
णिम (न्यस्) (ठेवणे)
णिरणास (गम्) (जाणे)
थक्क (स्था (उभे राहणे, स्तब्ध राहणे)
थक्क (फक्क्) (हळू जाणे)
थिप्प[३] (तृप्) (संतुष्ट होणे)

---

*१ मार्क ७.१६६* *२ मार्क ७.१५९* *३ मार्क ७.१०४,*
*४ प्रा. प्र. ८.३७* *५ प्रा. प्र. ८.१४* *६ मार्क ७.३२*
*७ मार्क ७.१०५* *८ मार्क ७.१४१* *९ त्रिवि ३.१.१२१*
*१० मार्क ७.१४९* *११ प्रा. प्र. ८.६९*

णिरिग्घ (निली) (दडून बसणे)
णिलीअ (निली)
णिलुक्क (निली)
णिलुक्क (तुड्)
दक्खव (दर्शय्) (दाखविणे)
णिलुंछ (मुच्)
णिव्वर (छिद्)
णिहोड (निवारय्) (निवारण करणे)
णीलुक्क (गम्)
णीहर (निः सृ) (बाहेर पडणे)
णीहर (आक्रन्द) (आक्रंदणे)
णुम (न्यस्)
णुम (छादय्)
णुमज्ज[1] (शी) (झोपणे)
णोल्ल (क्षिप्)
तड (तन्) (ताणणे, पसरणे)
तड्ड (तन्) (ताणणे, पसरणे)
तड्डव (तन्) (ताणणे, पसरणे)
तिक्खाल[2] (तेजय्)(तीक्ष्ण करणे)
तुट्ट (तुड्)
तेअव (प्रदीप्) (प्रदीप्त करणे)
पलाव (नाशय्) (पळविणे, नाश करणे)
पल्लोट्ट (पर्यस्) (उलटे करणे)
पल्लोट्ट (प्रत्यागम्) (परत येणे)
पल्लट्ट (पर्यस्)

थिप्प (विगल्) (गळणे)
थिंप (तृप्)
दाव (दर्शय्)
दुम (धवलय्) (पांढरे करणे)
दुहाव (छिद्)
दूम (दू-प्रयो) (दुःखी करणे)
देक्ख (दृश्)
धंसाड (मुच्)
धाड (निः सृ)
निअ (दृश्)
निअच्छ (दृश्)
नील (निः सृ)
नूम (छादय्)
पक्खोड (शद्)
पक्खोड (विकोशय्) (उघडणे)
पज्जर (कथ्)
पज्झर (क्षर्)
पट्ट (पा) (पिणे)
पणाम (अर्पय्) (अर्पण करणे)
पन्नाड (मृद्)
परिहट्ट (मृद्)
बुक्क (गर्ज्) (गर्जना करणे)
बुड्ड (मस्ज्)
बोल्ल (कथ्)
भमड (भ्रम्)

---

१. मार्क ७.१३८ २. मार्क ७. १६०

३. प्रा. प्र. ८.२२

पल्हत्थ (पर्यस्)
पल्हत्थ (विरिच्) (रिकामे करणे)
पहल्ल (घूर्ण्)
पहुप्प (प्रभू) (समर्थ असणे)
पार (शक्)
पिज्ज (पा) (पिणे)
पिसुण (कथ्)
पुच्छ (मृज्)
पुंछ (मृज्)
पुलअ (दृश्)
पुलोअ (दृश्)
पुंस् (मृज्)
पुस (मृज)
पेल्ल[1] (क्षिप्)
पेल्ल (प्रेरय्) (प्रेरणा करणे)
पोक्क (व्याहृ)
फिट्ट (भ्रंश्)
फिड (भ्रंश्)
फुट्ट (भ्रंश्)
फुड (भ्रंश्)
फुस (मृज्)
बडबड[2] (विलप्) (रडणे)
रेअव (मुच्)
रेह (राज्)
रोसाण (मृज्)

भमाड (भ्रम्)
भम्मड (भ्रम्)
भर (स्मृ)
भल (स्मृ)
भुल्ल (भ्रंश्)
मज्ज (निसद्) (खाली बसणे)
मड्ड (मृद्)
मढ (मृद्)
मल (मृद्)
मह (काङ्क्ष) (इच्छा करणे)
महमह(गंन्धः प्रसृ)(गध पसरणे)
मुण (ज्ञा) (जाणणे)
मुम्मुर[3] (चूर्ण्)
मेलव (मिश्रय्) (मिश्रित करणे)
मेल्ल (मुच्)
रंप (तक्ष्)(कापणे, तासणे)
रंफ (तक्ष्)(कापणे, तासणे)
रिअ (प्रविश्)
रिग्ग[4] (प्रविश्)
रीर (राज्)
रुंज (रु) (शब्द करणे)
रुंट (रु) (शब्द करणे)
विर (भञ्ज्) (मोडणे)
विर (गुप्) (लपविणे)
विरल्ल (तन्)

---

१. *मार्कं ७.५८*
२. *त्रिवि ३.१.८८*
३. *मार्कं ७.१५९*
४. *त्रवि ३.१.९९*

| | |
|---|---|
| लिक्क (निली) | विप्पगाल (नाशय्) |
| लुक्क (निली) | विरोल (मथ्) |
| लुक्क (तुड्) | विसट्ट (दल्) |
| लुंछ (मृज्) | विसट्ट[३] (विकस्) (विकसणे) |
| लूर (छिद्) | विसूर (खिद्) |
| लोट्ट[१] (स्वप्) (झोपणे) | वीसाल (मिश्रय्) |
| लोट्ट (लुठ्) (लोळणे) | वोल[४] (गम्) |
| ल्हस (स्रंस्) (गळणे) | वोल (क्रम्) |
| ल्हिक्क (निली) | वोसट्ट (विकस्) |
| वग्गोल (रोमन्थ्) | सच्चव[५] (दृश्) |
| वज्ज (त्रस्) | संदुम (प्रदीप्) |
| वज्जर (कथ्) | संदाण (अवष्टंभ) (अवष्टंभ करणे) |
| वडवड (विलप्) | संधुक्क (प्रदीप) |
| वमाल (पुञ्ज) (ढीग करणे) | संनाम (आदृ) (मान देणे) |
| वंफ (कांङ्क्ष) | संवेल्ल[६] (संवेष्ट्) |
| वंफ (वल्) (जाणे, वळणे) | सास[७] (कथ्) |
| वंफ (दल्) (फुटणे) | साह (कथ्) |
| वरहाड (निः सृ) | सीस (कथ्) |
| वलग्ग (आरुह्) | सुप[८] (मृज्) |
| वसुआ (उद्वा) | हुल (क्षिप्) |
| वसुआअ[२] (शुष्) (वाळून जाणे) | हुल (मृज्) |
| विढव (अर्ज्) (मिळविणे) | |

❋❋❋

१. मार्क ७.१२४ २. मार्क ७.१३९ ३. मार्क ७.१७०
४. मार्क ७.१३४ ५. त्रिवि ३.४.१५३ ६. प्रा. प्र. ८.४१
७. त्रिवि ३.१.६९ ८. प्रा. प्र. ८.६७

**प्रकरण ९**

# संधिविचार

## १३७ अर्धमागधीतील संधि

अर्धमागधीतील[1] संधिविचार हा प्रामुख्याने संस्कृत[2]वरून आलेला आहे. तथापि संस्कृतप्रमाणे अर्धमागधीत ''संधि हा आवश्यक व सुसंगत[3] नाही.''

संस्कृतमध्ये एका शब्दात, समासांत किंवा वाक्यातील दोन शब्दात स्वर (व्यंजने, विसर्ग) जवळ आल्यास त्यांचा नेहमी संधि होतो. परंतु अर्धमागधीत मात्र जवळ जवळ असणारे वा आलेले स्वर संधि न होता एकत्र राहू शकतात. हा संधि-अभाव एकाच शब्दात, समासात तसेच वाक्यातील शब्दामध्येही आढळून[4] येतो. याचे कारण एकच की अर्धमागधीत सर्वच संधि वैकल्पिक आहेत.

जरी अर्धमागधीत संधि वैकल्पिक आहेत, तरी जेव्हा जेव्हा संधि होतात तेव्हा ते कसे होतात, हे पाहणे आवश्यकच आहे. प्रथम, प्रायः संधि केव्हा होत नाही, हे सांगितले आहे.

---

१ *अर्धमागधीत विसर्ग नसल्याने विसर्गसंधि नाही, तसेच स्वररहित केवल व्यंजन शब्दान्ती चालत नसल्याने दोन वा अधिक व्यंजने एकत्र येऊन संधि होण्याचा प्रश्न उद्भवत नाही, म्हणजेच व्यंजनसंधिही अर्धमागधीत नाहीत. असे संधि असणारे संस्कृत शब्द प्रायः वर्णविकार होऊन अर्धमागधीत येतात. हे विकार कधी कधी वैशिष्ट्यपूर्ण असतात. त्यांचा विचार परिच्छेद १४९ मध्ये केला आहे.*

२ *संस्कृतोक्तः सन्धिः सर्वः प्राकृते पदयोः व्यवस्थितविभाषया भवति। बहुलाधिकारात् क्वचिद् एकपदेऽपि। हेम १.५*

३ *घाटगे, पृ. ८२*

४ *तरी शब्दात, समासात, वाक्यातील शब्दात, वाक्यांशात प्रायः संधि झालेले वाङ्मयात आढळतात.*

**१३८ संधिनिषेध किंवा संधीचा अभाव :**

पुढील परिस्थितीत प्रायः संधि केला जात नाही.

१) उद्धृत्त[१] स्वराचा इतर स्वराशी प्रायः संधि होत[२] नाही. यति = जइ, मृदुक = मउय, ऋतु = उउ, पति = पइ, स्वादु = साउ (गोड), अतः=अओ, इति= इइ, यदि= जइ, उपदेश = उवएस, आदेश = आएस, आतुर = आउर.

अपवाद[३] : अ) उद्धृत्त स्वर अ, आ, इ, ई, उ, ऊ असल्यास तो त्याच शब्दातील वा समासातील सजातीय स्वरात कधी कधी मिसळतो.

१) शब्दात[४] : (अ, आ) : चक्रवाक = चक्काय, अन्धकारित = अंधारिय, (इ, ई) : द्वितीय = बीय, तृतीय = तीय, शिबिका = सीया, प्रतीचीन = पडीण (पश्चिम), उदीचीन = उदीण (उत्तर), (उ, ऊ) उदुम्बर = उंबर.

२) समासात[५] : सु-पुरूष = सूरिस, सु-कुमार = सूमाल, सार्थवाह = सत्थाह, कुम्भकार = कुंभार, कर्मकार = कम्मार, वर्षाकाल = वरिसाल

**आ)** उद्धृत्त स्वर इ, उ असताना ते कधी कधी मागील अ, आ मध्ये मिसळून अनुक्रमे ए व ओ झालेले आढळतात.[६]

**ए)** : स्थविर = थेर (वृद्ध), स्थविरा = (थेरी)

**ओ)** मयूर = मोर, चतुर्दश = चोद्दस, मयूख = मोह (किरण), चतुर्थ = चोत्थ, चतुर्गुण = चोग्गुण.

---

१ *व्यञ्जनसम्पृक्तः स्वरो व्यञ्जने लुप्ते योऽवशिष्यते स उद्धृत इहोच्यते। हेम १.८. उदा. यति = जइ येथे इ हा उद्धृत स्वर आहे.*

२ ***स्वरस्योद्धृते ।*** *- स्वरस्य उद्धृते स्वरे परे सन्धिर्न भवति। हेम १.८*

३ *बहुलाधिकारात् क्वचिद् विकल्पः। क्वचित् सन्धिरेव। हेम १.८.*

४ *म. : कंटक = काटा, गवय = गवा, भाद्रपद = भादवा, मस्तक = माथा, मातंग = मांग, पारद = पारा, सप्ततारा = सातारा.*

५ *म. : सुवर्णकार = सोनार, चर्मकार = चांभार, कर्मकारी = कामारी.*

६ *म. राष्ट्रकूट = राठोड, चित्रकूट = चितोड.*

२) शब्दांना लागणाऱ्या प्रत्ययात जर फक्त एकच स्वर असेल, तर त्याचा इतर स्वरांशी संधि होत[१] नाही.

देवाओ, मालाए, वणाइं, देवीए, करइ, गच्छउ, दाउं, काउं

अपवाद : कधी कधी क्रियापदांच्या रूपात असा संधि झालेला[२] आढळतो.: भुंजइ = भुंजे, सेवइ = सेवे[३].

३) ह्रस्व अथवा दीर्घ इ, ई, उ, ऊ यांचा पुढील स्वराशी संधि होत[४] नाही.

**इ)** : जाइ-अंध (जात्यन्ध), पगइ-उवसंत, जाइ-आरिय

**ई)** : पुढवी-आउ (पृथ्वी-पाणी), धमणी-अंतरेसु (धमन्यान्त)

**उ)** : बहु-अट्ठिय (पुष्कळ हाडे (बी) असलेले), सु-अलंकिय, बहु-इड्ढि, सु-इसि, चक्खु-इंदिय.

४) ए, ओ यांचा पुढील स्वराशी संधि होत[५] नाही

बे-इंदिय, ते-इंदिय, अहो अच्छरियं, भमरो आवियई

५) धातूंना जे प्रत्यय लागतात त्यांच्या अन्त्य स्वराचा पुढील स्वराशी संधि होत[६] नाही.

होइ इह, इच्छसि आवेउं, करेमो एवं

अपवाद : कधी कधी असे संधि केलेले आढळतात.

लभामि+अहं= लभामहं, तरन्ति+एगे= तरंतेगे

---

१ *म. : जाऊ, येऊ, जाऊन, पिऊ, खाऊन*

२ *कधी कधी धातूंना लागणाऱ्या प्रत्ययातील स्वरातच संधि झालेला आढळतो. उदा. काहिइ-काही, नाहिइ-नाही, होहिइ-होही, दाहिइ-दाही, विणासिहिइ-विणासिही*

३ *पिशेल, पृ. १२४.*

४ ***न युवर्णस्यास्वे।*** *हेम १.६, 'इको यणचि' इति यः संस्कृते यणादेशः सन्धिरूक्तः स प्राकृते न भवति। इवर्णस्य यत्वमुवर्णस्य च वत्वं न भवति इत्यर्थः। त्रिवि. १.२०*

५ ***एदोतोः स्वरे।*** *एकार-ओकारयोः स्वरे परे संधिर्न भवति। हेम १.७*

६ ***त्यादेः ।*** *हेम १.९*

जेव्हा संधि केले जातात तेव्हा प्रायः पुढे दिलेल्या नियमानुसार केले जातात.

## १३९ सजातीय स्वरांचा संधि

सजातीय[१] स्वरांचा संधि दीर्घ होतो[२].

**अ)** अ[३] + अ = आ : लाभ + अलाभ = लाभालाभ, कज्ज + अकज्ज = कज्जाकज्ज, भीसण + अरण्ण =भीसणारण्ण, दीण + अणाह = दीणाणाह, माण + अवमाण = माणावमाण, रोस + अणल = रोसाणल, नर + अधम = नराधम, पर + अहीण = पराहीण, जुत्त + अजुत्त = जुत्ताजुत्त

**आ)** अ + आ = आ : रयण + आगर = रयणागर, दिव्व + आभरण = दिव्वाभरण, परम + आयर = परमायर (परमादर), अद्ध + आसण =अद्धासण, सोग + आउल = सोगाउल (शोकाकुल), मोह + आउर = मोहाउर, परम + आणंद = परमाणंद, कुसुम + आउह = कुसुमाउह, जिण + आगमण = जिणागमण

**इ)** आ + अ = आ : लंका + अहिवई =लंकाहिवई, मिहिला + अहिव = मिहिलाहिव, चंपा + अहिव = चंपाहिव, हिंसा + अभाव =हिंसाभाव, चिया + अल =चियानल

---

१ *अ व आ, इ व ई, उ व ऊ ही प्रत्येक जोडी सजातीय आहे.*

२ *अ) म्हणजे अ + अ, अ + आ, आ + आ, आ + अ = आ, इ + इ, इ + ई, ई + ई, ई + इ = ई, उ + उ, उ + ऊ, ऊ + ऊ, ऊ + उ = ऊ असा संधि होतो.*

*आ) संस्कृतवरून आलेले असे संधि मराठीत आहेतच : नराधम, क्रोधाग्नि, पराधीन, कवीश्वर, कवीन्द्र, देवालय, भानूदय, इ.*

३ *कधी कधी ऊ पुढे अ असता एका अ चा लोप होऊन संधि अ झालेला आढळतो (पिशेल, पृ. १३२ पहा) : जेण + अहं = जेणहं, जत्थ + अगणी = जत्थगणी, जत्थ + अवसप्पति = जत्थवसप्पति, वुड्ढेण + अणुसासिए = वुड्ढेणणुसासिए.*

**ई)** आ + आ = आ : सिविया + आरूढ = सिवियारूढ, नावा + आरूढ = नावारूढ, चिंता + आउर = चिंताउर, कोइला + आलाव = कोइला लाव, लज्जा + आइ = लज्जाइ, परंपरा + आगय = परंपरागय, जाला + आउल = जालाउल (ज्वालाकुल)

**उ)** इ[1], ई + इ, ई = ई : भूमि + ईसर = भूमीसर, सूरि + ईस[2] = सूरीस, कोडि + ईसर = कोडीसर, पुढवी + ईसर = पुढवीसर, मेइणी + ईसर = मेइणीसर

**ऊ)** उ, ऊ + उ, ऊ = ऊ : गुरु + उवएस = गुरूवएस, साहु + उवएस = साहूवएस, बहु + उवसग्ग = बहूवसग्ग, भाणु + उदय = भाणूदय, बहू + उवयार = बहूवयार

**क)** वरीलप्रमाणे संधि होऊन आलेल्या आ, ई, ऊ पुढे संयुक्तव्यंजन वा अनुस्वार असल्यास त्यांचे अनुक्रमे अ, इ, उ, होतात.

आ–अ : कोह + अग्गि = कोहग्गि, देस + अंतर = देसंतर, कोह + अंध = कोहंध.

ई – इ : दूई + इत्थी = दूइत्थी, जइ + इच्छा = जइच्छा, मुणि + इंद = मुणिंद.

ऊ – उ : साहु + उत्त = साहुत्त, बाहु + उद्धरिय = बाहुद्धरिय

**१४० अ, आ पुढे ह्रस्व अथवा दीर्घ इ, ई व उ, ऊ असल्यास त्यांचा संधि अनुक्रमे ए व ओ होतो**[3].

१) अ + इ, ई = ए : राय + इसि = राएसि, वास (व्यास) + इसि = वासेसि, न + इच्छइ = नेच्छइ, मगह + ईस = मगहेस, धण + ईस = धणेस, परम + ईसर = परमेसर, दिण + ईस = दिणेस, जिण + ईसर = जिणेसर, सुर + ईस = सुरेस, तुच्छ + ईहिय = तुच्छेहिय.

---

१ *कधी कधी इ पुढे इ असता एका इ चा लोप होऊन संधि इ झालेला आढळतो.*
*जंसि + इमे = जंसिमे, संति + इमे = संतिमे (पिशेल, पृ. १३२)*

२ *सुर १५.२४८*

३ *संस्कृतमधून आलेले असे संधि मराठीत आहेतच : दिनेश, महेश, उमेश, रमेश, परमेश्वर, शुद्धोदक, धर्मोपदेश, पुण्योदय इ.*

२) आ+इ, ई = ए : महा + इसि = महेसि, माला + इव = मालेव, महा + ईसर = महेसर

३) अ + उ, ऊ = ओ : संगम + उवाय = संगमोवाय, विवाह + उवगरण = विवाहोवगरण, गुण + उदहि = गुणोदहि, पुण्ण + उदय = पुण्णोदय, सुद्ध + उदय = सुद्धोदय, धम्म + उवदेसग = धम्मोवदेसग, करिकर + अरू = करिकरोरू, वर + ऊरू = वरोरू, पीवर + ऊरू = पीवरोरू, दरिसण + ऊसव = दरिसणोसव, हत्थिहत्थ + ऊरू[१] = हत्थिहत्थोरू

४) आ + उ, ऊ = ओ : कला + उवज्झाय = कलोवज्झाय, पूया + उवगरण = पूयोवगरण, महा + उरग = महोरग, जहा + उवइट्ठ = जहोवइट्ठ, महा + उसव = महोसव, रंभा + ऊरू[२] = रंभोरू

**अ)** वरील ठिकाणी इ, ई, उ, ऊ पुढे संयुक्तव्यंजन वा अनुस्वार असल्यास संधि ह्रस्व इ व उ होतो[३].

१) महा + इड्ढि = महिड्ढि, गय + इंद = गइंद, नर + इंद = नरिंद, जिण + इंद = जिणिंद, महा + इंद = महिंद, देव + इंद = देविंद

२) घर + उज्जाण = घरुज्जाण, नयर + उज्जाण = नयरुज्जाण, पुप्फ + उच्चय = पुप्फुच्चय, काय + उस्सग्ग = काउस्सग्ग, नील + उप्पल = नीलुप्पल

**आ)** अ, आ पुढे दीर्घ ई, ऊ असता कधी कधी मागील स्वराचा लोप[४] होतो.

१) तियस + ईस = तियसीस, राय + ईसर = राईसर, विज्जाहर + ईसर = विज्जाहरीसर

२) एग + ऊण = एगूण, विवाह + ऊसव = विवाहूसव, संगम + ऊसुय = संगमूसुय, वसंत + ऊसव = वसंतूसव, दंसण + ऊसुय = दंसणूसुय, महा + ऊसव = महूसव

इ) अ पुढे ह्रस्व इ, उ असता कधी कधी मागील अ चा लोप झालेला आढळतो.

---

१ *पउम. २.१७* २ *सुपास ६०५*

३ *येथे मागील अ, आ चा लोप होतो, असेही म्हणता येईल.*

४ *म. : कर + ईन = करीन, घालीन, मारीन, पाडीन इ. कर + ऊन = करून, घालून, पाडून, मारून इ.*

१) कुणालेण + इमं = कुणालेणिमं, जेण + इमं = जेणिमं, जाव + इमे = जाविमे, तेण + इमं = तेणिमं[१], च + इमेहिं[२] = चिमेहिं

२) मज्झ + उवरि = मज्झुवरि, तेण + उवइट्ठो = तेणुवइट्ठो, भव + उदहि = भवुदहि, जिण + उवएस = जिणुवएस[३], पाव + उवएस = पावुवएस, भोग + उवभोगाण =भोगुवभोगाण, हास + उवहास = हासुवहास[४], सीय + उदग[५] = सीउदग, एत्थ + उवाओ[६] = एत्थुवाओ

**१४१ अ, आ, पुढे ए, ओ आल्यास अ, आ चा लोप होतो[७].**

**अ)** १) इह + एव = इहेव, कमेण + एव = कमेणेव, जेण + एवं = जेणेवं, जाव + एसा = जावेसा, न + एव = नेव, एग + एग = एगेग, तत्थ + एगो = एत्थेगो, कस्स + एसा = कस्सेसा

**२)** तहा + एव = तहेव, दारिगा + एसा = दारिगेसा, जहा + एव = जहेव, तहा + एव = तहेव

**आ)** १) तिमिर + ओह = तिमिरोह, दिव्व + ओसहि = दिव्वोसहि, तुरय + ओह = तुरओह, भव + ओह = भवोह, तेल्ल + ओल्ल = तेल्लोल्ल, परम + ओसह = परमोसह, भमर + ओली = भमरोली

२) महा +ओसहि = महोसहि, महा + ओह = महोह, सक्करा + ओह = सक्करोह, जाला + ओह =जालोह, जाला + ओली =जालोली

**१४२पूर्वस्वरलोप**

संधि होताना कित्येकदा पूर्वस्वराचा लोप झालेला आढळतो[८].

१) पूर्व इ चा लोप : नत्थि+एत्थ = नत्थेत्थ, वयंति + एगे = वयंतेगे, कीलंति + अन्ने = कीलंतन्ने, तरंति + एगे = तरंतेगे, तिन्नि + उदही = तिन्नुदही,

---

१ *सुपास. ५१०, ५३३, ५३७*
२ *समरा पृ. १९९*
३ *कुम्मा. ५७,९८*
४ *सुपास. ५०५, ५१४,५३३*
५ *दस. १०.२*
६ *समरा. पृ. ७०७*
७ *म. : एक + एक=एकेक*
८ *पिशेल. पृ. १३२*

दोन्नि + उदही = दोन्नुदही, दलामि + अहं =दलामहं[१], किंपि + उवायं[२] = **किंपुवायं**

२) पूर्व ओ चा लोप : गुरूणो + अंतिए = गुरूणंतिए

३) अनुस्वारासह पूर्वस्वलोप : चरिस्सं + अहं = चरिस्सहं, पुच्छिस्सं + अहं = पुच्छिस्सहं, पढमं + इत्थ = पढमित्थ, इमं + एयारुवं = इमेयारूवं, इमं + एरिसं = इमेरिसं

४) वि, पि (अपि) मधील इ चा लोप : वि + एगे = वेगे, वि + एए = वेए, पि + एगे = पेगे, पि + एयं = पेयं

## १४३ उत्तरस्वरलोप

**अ)** ए पुढे ए असता पुढील ए चा लोप झालेला आढळतो.
मन्ने + एरिसं[३] = मन्नेरिसं, गामे + एगरायं[४] = गामेगरायं

**आ)** सर्वनाम व अव्यय यांच्या पुढे सर्वनाम व अव्यय आल्यास पुढील सर्वनाम व अव्यय यांच्या आदिस्वराचा लोप होतो[५].
से + एवं =सेवं, तुब्भे + एत्थ = तुब्भेत्थ, इमे + एयारूवे = इमेयारूवे, इमे+एत्थ = इमेत्थ, अम्हे + एत्थ = अम्हेत्थ, सव्वे + एए = सव्वेए

**इ)** इतर उत्तर स्वरांचा लोप :

१) कधी कधी ओ पुढे पुढील ए चा लोप होतो
अकारिणो + एत्थ[६] = अकारिणोत्थ, अन्नो + एत्थ = अन्नोत्थ, एको + एत्थ = एकोत्थ, को + एत्थ = कोत्थ

२) कधी कधी इ पुढे पुढील उ चा लोप होतो.
सिट्ठि + उवरोहेण[७] = सिट्ठिवरोहेण

---

१ *पिशेल पृ. १३२* २ *सुपास ६३९*

३ *पाकमा पृ. ६२.* ४ *समरा. पृ. ५९७*

५ ***त्यदाद्यव्ययात् तत्स्वरस्य लुक्।*** *हेम १.४०*

६ *सुपास ५७४* ७ *समरा पृ. ६५७*

८ *सुपास ५८१*

३) पद्यात :

**अ)** पद्यात पुष्कळदा ए व ओ पुढे पुढील अ चा लोप होतो.[१]

ए पुढे : फासे हियासए (अहि), आसीणे णेलिसं (०अणेलिसं), सीसं से भितावयंति (अभि) से णुतप्पइ (अणु), इमे + अलंकारा = इमेलंकारा, जे + अभिमुहं = जे भिमुंह, लच्छाए + अभिग्गहो[२] =लच्छीए भिग्गहो ओ[४] पुढे : तिप्पमाणो हियासए (अहि) इणमोब्बवी (अब्बबी) बालो वरज्झई (अव), एक्को त्थि (अत्थि), सूरिणो भिमुहं (अभि), सुन्नमणो णुट्ठाणं (अणु) कुणइ[५].

**आ)** पद्यात कधी कधी इतर स्वरापुढेही पुढील अ चा लोप होतो.

आ पुढे : पज्जिज्जमाणाट्टतरं (अट्ट०)

इ पुढे : चिट्ठंति भितप्पमाणा (अभि०), सूलाहि भितावयंति (अभि०) जावंति विज्जापुरिसा (अविज्जा०), चत्तारि भोज्जाइं (अभोज्जाइं०)

ई पुढे : वेयरिणी भिदुग्गा (०अभि०) नदी भिदुग्गा (०अभि०)

उ पुढे : दोसु भिग्गहो (अभि०)

अनुस्वारापुढे : कहं भितावा (अभि०) वेयरणिं भिदुग्गं (अभि०) वयणं भिउंजे

## १४४ निपात (लघु अव्यये)

**अ)** अपि : एखाद्या पदापुढे अपि आल्यास अपि मधील आद्य अ चा लोप विकल्पाने होतो (**पदादपेर्वा।** हेम १.४१)

१) तं पि, किं पि, कहं पि, केण वि.

---

*१ संस्कृतमध्ये ए, ओ, पुढे अ चा लोप होतोच.*

*२ सुपास. ५१०, ५२६, ६२७*

*३ कधी कधी गद्यातही ओ पुढे अ चा लोप झालेला आढळतो : णमो त्थु (अत्थु), 'अत्थओ वगच्छिरूण (अव०), अत्तणो णुग्गहट्ठाए (अणु०), अप्पणो वगाराय (अव०) (अपकाराय), लक्खणओ वगच्छामि (अव०) (समरा, पृ. १९९, ६२५, ७८९, ५४५)*

*४ सुपास. ६३८, ५३९, ५६८*

२) तमवि, किमवि, कहमवि, केणावि

**आ)** इति : एखाद्या पदापुढे इति आल्यास आद्य इ चा लोप होतो. मागे स्वर असल्यास त्ति होतो (**इतेः स्वरात् तश्च द्विः ।** हेम १.४२)

१) किं ति, जं ति, दिट्ठं ति, जुत्तं ति.

२) तह त्ति, पिओ त्ति, आण त्ति, चाइ त्ति, सव्वन्नु त्ति

इ) इव : (क) स्वरापुढे इव चा कधी कधी व्व होतो, तर कधी इव तसाच राहतो.

१) रवि व्व, गिरि व्व, रमणि व्व

२) मेहो[1] इव, किंनरो इव, वम्महो इव

**(का)** अनुस्वारापुढे इव चा कधी कधी व होतो तर कधी कधी इव तसाच रहातो.

१) पुत्तं व , कणगं व

२) मेहं इव, तिणं इव (तृणं इव)

**१४५ दीर्घ स्वरापुढे जोडाक्षर आल्यास (वा असल्यास) तो दीर्घ स्वर ह्रस्व[2] होतो.**

१) आ – अ : विरहाग्नि = विरहग्गि, कार्तिक =कत्तिय, राष्ट्र = रट्ठ, परमार्थ = परमत्थ, स्वाध्याय =सज्झाय, नखाग्र = नहग्ग

२) ई–इ : तीर्थ = तित्थ, दीक्षा = दिक्खा, परीक्षा = परिक्खा, ग्रीष्म = गिम्ह, अवतीर्ण = ओइण्ण

३) ऊ – उ : धूर्त = धुत्त, पूर्व = पुव्व, कूर्म = कुम्म (कासव), मूत्र = मुत्त, पूर्ण = पुण्ण, रूक्ष = लुक्ख, सूत्र = सुत्त

४) ए = ऍ : क्षेत्र = खेत्त, तैल = तेल्ल, म्लेच्छ = मेच्छ, प्रेक्षणीय = पेच्छणिज्ज

टीप : ह्रस्व ए बद्दल कधी कधी इ लिहिली जाते.

शनैश्चर = सणिच्चर, प्रेक्षणीय = पिच्छणिज्ज, शय्या = सिज्जा, हेट्ठा =

---

१ *वसु. पृ. २०७*

२ ***ह्रस्वः संयोगे।*** *हेम १.८४*

हिट्ठा, ज्येष्ठ = जिट्ठ, ग्राह्य = (गेज्झ) – गिज्झ, वैद्य = विज्ज, श्रेष्ठिन् = सिट्ठि, चेष्टा = चिट्ठा, अत्र = (एत्थ) इत्थ, म्लेच्छ = मिच्छ

५) ओ = ओ˘ : मोक्ष = मोक्ख, ओष्ठ = ओट्ठ, यौवन = जोव्वण, सौख्य = सोक्ख

टीप : कधी कधी ह्रस्व ओ बद्दल उ लिहिला जातो.
नीलोत्पल = नीलुप्पल, होज्ज = हुज्ज, ज्योत्स्ना = जुण्हा, मनोज्ञ = मणुन्न, नमस्कार = (नमोक्कार) – नमुक्कार

## १४६ दीर्घ स्वरावर अनुस्वार आल्यास (वा असल्यास) तो दीर्घ स्वर ह्रस्व होतो.

१) आ – अ : (क) पराङ्मुख =परंमुह, वीसा = वीसं, तीसा = तीसं, तिरिया = तिरियं, सम्मा = सम्मं, अट्ठा = अट्ठं, मुसा = मुसं, हेट्ठा = हेट्ठं, आम्र = अंब, ताम्र = तंब

(का) पांशु = पंसु, मांस = मंस, कृतान्त = कयंत, मृगाङ्क = मयंक, भाण्ड = भंड, भाण्डार = भंडार, कान्त = कंत, कान्ता = कंता

२) ई – इ : इदानीम् = इयाणिं, नदीम् = नइं

३) ऊ – उ : वधूम् = वहुं

४) ए[१] – ऍ : नेंति, बेंति, देंति, करेंति

५) ओ[१] – ओ : होंति

## १४७ ह्रस्व स्वरावर असलेल्या (वा आलेल्या) अनुस्वाराचा लोप झाल्यास तो ह्रस्व स्वर दीर्घ होतो[२].

१) दंष्ट्रा =दाढा, संरक्षण = सारक्खण, सन्दंश = संडास (सांडशी), संहृत्य = साहट्टु, संहरति = साहरइ.

---

*१) ह्रस्व ए, ओ बद्दल कधी कधी अनुक्रमे इ, उ लिहिले जातात : निंति, बिंति, नरिंद, हुंति*

*२) दीर्घ स्वरावरील अनुस्वार लुप्त झाल्यास दीर्घ स्वर तसाच रहातो : मांस = मास, मांसल = मासल, कांस्य = कास*

२) विंशत्–वीस, सिंह = सीह, त्रिंशत् = तीसा, सिंहासन = सीहासण

**१४८ ह्रस्व स्वरापुढे असणाऱ्या संयुक्त व्यंजनाचे सुलभीकरण झाल्यास तो ह्रस्व स्वर दीर्घ[१] होतो (सुलभीकरण पहा)**

दक्षिण = दाहिण, अश्व = आस, शिष्य = सीस, मिश्र = मीस, उत्सव =ऊसव, मनुष्य = मणूस

**१४९ संस्कृतमधून वर्णान्तराने आलेले संधि**

संस्कृतमध्ये संधि होऊन एकत्र आलेले शब्द अर्धमागधीत कधी कधी वर्णान्तराने येतात. असे काही संधि पुढीलप्रमाणे :

अ) ह्रस्व इकारान्त व उकारान्त उपसर्गांचे पुढील स्वराशी झालेले संधि अर्धमागधीत वर्णान्तराने[२] आलेले आढळतात[३].

१) अति चे संधि : अत्यन्त =अच्चंत, अत्यद्भुत = अच्चब्भुय, अत्यासन्न = अच्चासन्न, अत्युद्विग्न = अच्चुव्विग्ग, अत्युग्रता = अच्चुग्गया

२) अधि चे संधि : अध्युपपन्न = अज्झोववन्न, अध्यवसान = अज्झवसाण

३) प्रति चे संधि : प्रत्याख्यात = पच्चक्खाय, प्रत्यागत = पच्चागय, प्रत्यक्ष

---

१ *मागील स्वर दीर्घ असल्यास तो तसाच राहतो. : पार्श्व = पास, दीर्घ = दीह, मूत्र = मूय.*

२ *अशा संधीने येणाऱ्या त्य व र्य यांचे बाबतीत कधी कधी स्वरभक्तीचा अवलंब केला जातो. तर कधी संयुक्तव्यंजनातील एका व्यंजनाचा लोप केला जातो. १) लोप : प्रत्युत्पन्न = पडुप्पन्न, प्रत्युपचार = पडोयार, प्रत्युपचारयन्ति = पडोयारेंति २) स्वरभक्ति : अत्यादर = अइयायर, नात्युष्ण = नाइउण्ह, अध्यासयन्ते = अहियासिज्जंति, प्रत्यागत = पडियागय, प्रत्येक = पाडिएक्क, अत्युत्कण्ठित = अइउक्कंठिय, प्रत्युपकार = पडिउवयार, अत्याकुल = अइआउल, अत्युत्कर्ष = अइउक्कस*

३ *संस्कृतमधून आलेले असे मराठीतील संधि : अत्यंत, अध्यवसान, प्रत्यक्ष, अभ्युत्थान, अनन्वित इ.*

= पच्चक्ख, प्रत्युपकार = पच्चुवयार, प्रत्यासन्न = पच्चासन्न, प्रत्युत्तर = पच्चुत्तर, प्रत्युपकारिन् = पच्चुवयारि.

४) परि चे संधि : पर्याप्त = पज्जत्त

५) अभि चे संधि : अभ्युपगत = अब्भुवगय, अभ्युत्थान = अब्भुट्ठाण, अभ्यधिक = अब्भहिय, अभ्युद्गत = अब्भुग्गय

६) अनु चे संधि : अन्वेषण = अन्नेसण, समन्वित = समन्निय, अभिसमन्वागत = अभिसमन्नागय

आ) अपि व इति चे पुढील स्वरांशी होणारे संधि :

१) अपि : अप्येके = अप्पेगे

२) इति[१] : इत्यादी = इच्चाइ, इत्येवम् = इच्चेवं, इत्थर्थम् = इच्चत्थं, इत्येव = इच्चेव, इत्येते = इच्चेए

## १५० व्यंजनागम संधि

अ) संस्कृतमध्ये जे शब्द व्यंजनांत आहेत. त्यांच्या अर्धमागधीतील वर्णान्तरित रूपांपुढे दुसरा शब्द आला असता त्याच्या[२] मूळ अन्त्य[३] व्यंजनाचे कित्येकदा पुनरागमन होते (व मग वर्णान्तर होते) म्हणजे मूळचे व्यंजन[४]

---

१ *म. : इत्यादि, इत्यर्थ*

२ *हे शब्द प्रायः यद्, तद्, सत्, नित, दुर्, धिक्, चतुर्, पुनर्, एर्द्, अन्तर् प्रादुस्, षट्, जगत्, विद्युत्, पश्चात्, तडित्, उद्, यावत् असे आढळतात.*

३ *व्यंजन शब्दाने येथे वर्गाचेही उपलक्षण होते.*

४ *कित्येकदा हे व्यंजन मध्ये येत नाही. असे मानून सरळ दोन्ही शब्द एकत्र आलेले आढळतात : सद्भिक्षु = सभिक्खु, दुर्लभ = दुलह, दुश्चीर्ण = दुचिण्ण, दुर्मुख = दुमुह, दुर्वर्ण = दुवन्न, अतिदुर्गन्ध = अइदुगंध, पश्चात्ताप = पच्छायाव, चतुष्पद = चउपय, एतत्कर्मन् = एयकम्म, एतदवस्था = एयावत्था, एतदनुरूप = एयाणुरूव, विद्युद्विलसित = विज्जुविलसिय, विद्युल्लेखा = विज्जुलेहा, तडित्तडित = तडितडिय, प्रादुष्कुर्यात् = पाउकुज्जा, प्रादुष्करिष्यामि = पाउकरिस्सामि*

मध्ये येते, व मग संधि होतो.[१] आता या नवीन आलेल्या व्यंजनापुढे स्वर असल्यास तो या व्यंजनात मिसळतो[२] (व मग वर्णान्तर होते) पुढे व्यंजनच आल्यास संयुक्तव्यंजनाप्रमाणे विकार होतात[३].

(क) पुढे स्वर आला असता : १) यद् : यदस्ति = जदत्थि २) तद् : तदन्तिके = तयंतिके, तदनंतरम् = तयणंतरं, तदुपरि = तदुवरि, तदनुरक्त = तयणुरत्त, तदध्यवसान = तदज्झवसाण ३) पुनर् : पुनरपि = पुणरवि, पुनरुक्त = पुणरुत्त. ४) अन्तर् : अन्तरात्मन् = अंतरप्पा ५) दुर् : दुरात्मन् = दुरप्पा, दुरतिक्रम = दुरइक्कम, दुरभिगंध, दुरुत्तर, दुरवगाह, दुरनुचर =दुरणुचर, दुरवस्था = दुरवत्था, दुराचार = दुरायार ६) निर् : निरंतर, निरूपम = निरूवम, निरानन्द = निराणंद, निरवशेष = निरवसेस, निरपेक्ष = निरवेक्ख – निरालम्ब, निरीक्षण = निरिक्खण, निराशा = निरासा, निरपराध = निरवराह, निरायुध = निराउह, निरुपसर्ग = निरुवसग्ग, निरुत्साह = निरुच्छाह. ७) प्रादुस् : प्रादुरकार्षीत् = पादुरकासि, प्रादुरासीत् = पाउरासी ८) चतुर् = चतुरङ्ग = चउरंग, चतुरङ्गुल = चडरंगुल, चतुरङ्गिणी = चाउरंगिणी, चतुरिन्द्रिय = चउरिंदिय ९) षट् : षडङ्गवित् = छडंगवि १०) त् : सुचिरात् अपि = सुचिरादवि, तस्मात् अपि = तम्हादवि.

का) पुढे व्यंजन आले असता : १) सत्– सत्पुरूष = सप्पुरिस, सज्जन =सज्जण, सद्भाव = सब्भाव, सन्मान = सम्माण २) प्रादुस् : प्रादुर्भाव = पाउब्भाव ३) एतद् : एतत्प्रधान = एयप्पहाण ४) यावत् : यावज्जीवम् =जावज्जीवं ५) तद् : तन्निवारण, तच्चरण = तच्चलण, तद्दर्शन = तद्दंसण, तत्कर्मन् = तक्कम्म, तत्क्षणम् = तक्खणं, तत्प्रभाव = तप्पभाव, तद्विरह = तव्विरह, तद्वचन = तव्वयण, तच्चित्त, तद्भावना = तब्भावणा ६) निर् : निष्करूण =निक्करूण, निष्प्रभ = निप्पह, निःसह = निस्सह, निःश्वास = निस्सास, निर्भय = निब्भय, निर्विष = निव्विस, निष्कलंक = निक्कलंक , निःसन्देह

---

१ *असे संधि प्रायः सामासिक शब्दात झालेले आढळतात.*

२ *उदा. त + अंतिके = तद् + अन्तिके = तदंतिके = तयंतिके*

३ *चउ + विह = चउ (र्) + विह = चउव्विह*

= निस्संदेह, निर्दिष्ट = निद्दिट्ठ, निष्प्राण = निप्पाण, निर्मल =निम्मल, निष्पङ्क = निप्पंक ७) दुर् : दुश्चरित = दुच्चरिय , दुर्लभ = दुल्लह, दुर्वर्ण = दुव्वण्ण, दुःसह = दुस्सह, दुर्जन = दुज्जण, दुर्गम = दुग्गम, दुर्वचन = दुव्वयण, दुर्धर = दुद्धर, दुर्बल = दुब्बल, दुष्प्रवेश = दुप्पवेस, दुर्निवारता = दुन्निवारया ८) षट् : षट्च = छच्च, षड्जीव = छज्जीव, षड्दर्शन = छद्दंसण, षण्मुख = छम्मुह ९) चतुर् : चतुर्विध = चउव्विह, चतुर्याम = चाउज्जाम, चतुष्प्रकारम् = चउप्पयारं १०) विद्युत् : विद्युत्प्रहार = विज्जुप्पहार ११) उद् : उल्लपति = उल्लवइ, उल्लाप = उल्लाव

**१५१ आ) दोन स्वर जवळ आले असता कधी कधी एखादे अजिबात नवे व्यंजन मध्ये येते (व त्या स्वरांचा परस्परसंधि टाळला जातो.)**

या नवीन आलेल्या व्यंजनात पुढील स्वर मिसळतो. या नवीन येणाऱ्या व्यंजनाला 'संधि-व्यंजन' म्हटले आहे.[१] मध्ये येणारे हे व्यंजन प्रायः म्, कधी य् तर कधी र् असते.

१) [२]म् : एग + एग = एगमेग, अंग + अंग =अंगमंग, एक्क + एक्क = एक्कमेक्क, अन्न + अन्न = अन्नमन्न, गोण + आइ = गोणमाइ, आहार + आईणि = आहारमाईणि, हय + आई = हयआई, सीह + आइणो = सीहमाइणो, आरिय + अणारिय = आरियमणारिय, दीह + अद्धा = दीहमद्धा, जोव्वण + उदए = जोव्वणमुदए, हट्ठतुट्ठचित्त + आणंदिय = हट्ठतुट्ठचित्तमाणंदिय, आचार + अट्ठा = आयारमट्ठा, कारण + उप्पन्ने = कारणमुप्पन्ने, एस + अट्ठे = एसमट्ठे, एस + अग्गी = एसमग्गी, वत्थगंध + अलंकार = वत्थगंधमलंकार

---

१. *व्यंजनागम संधि (अ) व (आ) मधील फरक पुढीलप्रमाणे आहे : (अ) मध्ये मूळ संस्कृतशब्दातील व्यंजनाचे पुनरागमन होते (आ) मध्ये मुळात नसलेले एखादे व्यंजन मध्ये येऊन जवळ आलेल्या दोन स्वरांचा संधि टाळला जातो.*

२. *त्याच स्वरादि शब्दाची द्विरूक्ति असता, पुढील शब्द आइ (आदि) असता व इतर काही ठिकाणी 'म्' आलेले आढळते.*

२) य् : दु + अह = दुयाह, दु + अङ्गुल =दुयंगुल, सु + अक्खाए =सुयक्खाए, चउ + अहेण = चउयाहेण, ति + अहेण = तियाहेण, बहु + अट्ठिय = बहुयट्ठिय, महु + आसव = महुयासव

३) र् : धि + अत्थु =धिरत्थु, सिहि + इव = सिहिरिव, दु + अङ्गुल = दुरंगुल, वाहि+इव = वाहिरिव, अणु (अनु) + आगय (आगत) = अणुरागय

## १५२ वाक्यगत संधि

वाक्यंतील शब्दात प्रायः संधि होत नाही[१], पण जेव्हा असे संधि केलेले आढळतात तेव्हा ते प्राय: केव्हा आढळतात, हे पुढे सांगितले आहे.

१) (वाक्यात) दोन शब्दातील एक शब्द जर सर्वनाम वा अव्यय असेल तर संधि झालेला आढळतो.
पुरा + आसी = पुरासी, जेण आणीया अहं = जेणाणीयाहं, सह + अमच्चेण = सहामच्चेण, तस्स + उवरि = तस्सोवरि, च + एव + इह + आगओ = चेवेहागओ

२) 'न' चा बहुधा पुढील स्वराशी संधि झालेला आढळतो.
न + अत्थि = नत्थि, न + अइदुरे =नाइदूरे, न + एव = नेव, न + अभिजाणइ = नाभिजाणइ

३) अनुस्वाररूपात असणाऱ्या अन्त्य मकारात कधी कधी पुढील स्वर मिसळतो.[२]
धम्मं आइक्खइ = धम्ममाइक्खइ, फलं इच्छइ = फलमिच्छइ, पुत्ताणं उवरि = पुत्ताणमुवरी, जक्खं इमं आराहिउं आढत्ता – जक्खमिममाराहिउमाढत्ता

४) कधी कधी इतर काही शब्दांचेही संधि झालेले आढळतात.
(जाणित्ता + आयरियस्स) जाणित्तायरियस्स (इसिणा + आहारमाईणि)

---

१ *उदा. इह आसि पुरा सेट्ठी ईसरनामा। हंता अत्थि । पासित्ता इमे अज्झत्थिए। दारगस्स अम्मापियरो । बहुजणो अन्नमन्नस्स एवं आइक्खइ।*

२ *अन्त्यमकारस्य स्वरे परेऽनुस्वारो वा भवति। हेम. १.२४*

इसिणाहारमाईणि, (माणूसेसु + उववन्ना) माणूसेसूववन्ना, (सुबुद्धिनामेण + अमच्चेण) - सुबुध्दिनामेणामच्चेण

अ) पद्यात : एसोवरए (एस उवरए), भीमासि (भीमा आसि), तम्हाइविज्जो (तम्हा अइविज्जो), बुध्दाणुसासंति (बुध्दा अणुसासंति).

❋❋❋

# विभाग दुसरा

## प्रकरण १०

## नामरूपविचार

### १५३ शब्दरूपविचार : प्रास्ताविक

वाक्यात उपयोग असताना काही शब्दात फरक पडतात, तर काहीत फरक होत नाहीत. यादृष्टीने शब्दांचे दोन मुख्य भाग पडतात. १) विकारी किंवा सव्यय : वाक्यात उपयोग करताना ज्यांच्यात विकार होतात, ते २) अविकारी किंवा अव्यय : वाक्यात उपयोग असताना ज्यात विकार होत नाही ते.

विकारी व अविकारी शब्दांचे प्रत्येकी चार चार भेद आहेत :

अ) विकारी : १) नाम २) सर्वनाम ३) विशेषण ४) धातु अथवा क्रियापद

आ) अविकारी (अव्यय) १) क्रियाविशेषण २) शब्दयोगी ३) उभयान्वयी ४) केवलप्रयोगी (अव्यये)

आता, विकारी शब्दातच बदल होत असल्याने, रूपविचारात फक्त विकारी रूपांचाच विचार करावयाचा आहे.

### १५४ नामरूपविचार : प्रास्ताविक

**अ)** अर्धमागधीत शब्दान्ती व्यंजन चालत नसल्याने अर्धमागधीतील सर्व नामे स्वरान्त आहेत. अर्धमागधीत शब्दान्ती येणारे स्वर अ, आ, इ, ई, उ, ऊ एवढेच असल्याने शब्दांचे रूप-नमुने अगदी थोडे आहेत.

१) पुल्लिंगी शब्दान्ती अ, इ, वा उ हेच स्वर असतात. २) नपुंसकलिंगी[१] शब्दांच्या अन्ती अ, इ, वा उ हेच स्वर असतात. ३) स्त्रीलिंगी शब्दांच्या अन्ती आ, इ, ई, उ, ऊ हेच स्वर असतात.

---

*१) प्राकृतात (M.I.A.) (वर्णान्तरित ऋकारान्त शब्दांची नपुं. रूपे नाहीत. (सेन. प. ६५)*

या प्रकारच्या सर्व शब्दांची रूपे नियमितपणे होतात. त्यामुळे नियमित चालणाऱ्या शब्दांचे फक्त अकरा नमुने होतात.

**आ)** अर्धमागधीत ऋ, ॠ, लृ, ऐ व औ हे स्वर नसल्याने या स्वरांनी अन्त पावणारे शब्द नाहीत. संस्कृतमधील असे शब्द इतर स्वरान्त केले जातात. तथापि संस्कृतमधील ऋकारान्त शब्दांचे बाबतीत त्यांच्या नियमित रूपाखेरीज संस्कृतमधून वर्णान्तराने आलेली काही रूपे अर्धमागधीत आढळतात. म्हणून अशा शब्दांची रूपे अनियमित म्हणण्यास हरकत नाही. अशा शब्दांचे नमुने फक्त तीन (पिया, माया, भत्ता) आहेत.

**इ)** संस्कृतमधील व्यंजनान्त शब्द अर्धमागधीत स्वरान्त केले जातात.[१] अशा काही शब्दांच्या नियमित रूपाखेरीज, संस्कृतमधून वर्णान्तराने आलेली काही[२] रूपे अर्धमागधीत आढळतात. म्हणून या शब्दांच्या रूपांनाही अनियमित म्हणण्यास हरकत नाही. अशा शब्दांच्या रूपांचे नमुनेही तीनच (राय, अप्प, भगवंत[३]) आहेत.

तसेच एकंदर १७ नमुने आत्मसात केले की अर्धमागधीतील कोणत्याही नामाची रूपे सिद्ध करता येतील.

**१५५ नामरूपे**

नामे ही दोन वचनात, तीन लिंगात व सात विभक्तीत[४] चालतात.

१) एकवचन आणि अनेकवचन ही दोनच वचने अर्धमागधीत आहेत.

---

१ *यासाठी पुढे परिच्छेद १८४ पहा.*

२ *ही रूपे बहुधा तकारान्त, नकारान्त व सकारान्त शब्दांची आढळतात.*

३ *येथे भगवंत शब्द हा अन्त प्रत्ययान्त व. का. धा. वि. व मन्त आणि वन्त प्रत्ययान्त शब्द यांचेही उपलक्षण आहे.*

४ *या पुस्तकात विभक्तीचे प्रत्यय दिलेले नाहीत. प्रत्यय पाठ करून ते लागताना अनेक ठिकाणी कसे विविध विकार होतात इत्यादि गुंतागुंत लक्षांत ठेऊन रूपे सिद्ध करीत बसण्यापेक्षा प्रत्यक्ष रूपेच पाठ करून त्याप्रमाणे इतर शब्द चालविणे, हेच सोपे आहे.*

संस्कृतप्रमाणे द्विवचन[१] मात्र नाही. द्विवचनाचे कार्य अनेकवचनानेच केले जाते.

२) मराठी, संस्कृतप्रमाणेच अर्धमागधीतही नामे पुल्लिंगी, स्त्रीलिंगी अथवा नपुंसकलिंगी असतात[२].

३) प्रथमा, द्वितीया, तृतीया, पंचमी, षष्ठी, सप्तमी व संबोधन अशा सात[३] विभक्ति आहेत.

आपापला अन्त्यस्वर व लिंग यानुसार नामे सात विभक्तीत दोन वचनांत चालतात.

या सर्व नामांचा रूपविचार आता क्रमाने दिला आहे.

(नियमित नामरूपविचार)

**१५६ आकारान्त पुल्लिंगी 'देव' शब्द**

| **विभक्ती** | **ए. व.** | **अ. व.** |
|---|---|---|
| **प्रथमा** | देवो, देवे | देवा |
| **द्वितीया** | देवं | देवे, देवा |
| **तृतीया** | देवेण, देवेणं | देवेहि, देवेहिं |
| **पंचमी** | देवा, देवाओ | देवेहिंतो |
| **षष्ठी** | देवस्स | देवाण, देवाणं |
| **सप्तमी** | देवे, देवंमि, देवंसि | देवेसु, देवेसुं |
| **संबोधन** | देव | देवा |

---

१ *दोन हा विशेष अर्थ सांगावयाचा असल्यास अनेकवचनी रूपाबरोबर 'दो' या संख्यावाचकाच्या रूपांचा उपयोग केला जातो.*

२ *नामांची लिंगे ठरविण्यास नियम असे काही नाहीत. कोशावरून आणि वाङ्मयीन प्रयोगावरून नामांची लिगे जाणून घ्यावी लागतात. नामांच्या लिंगाविषयी सर्वसाधारण माहितीसाठी या प्रकरणाचे शेवटी दिलेली पुरवणी पहा.*

३ *अर्धमागधीत चतुर्थी विभक्तीला स्वतंत्र स्थान नाही, तिचे काम षष्ठीने केले जाते. तथापि अर्धमागधीत काही शब्दांची चतुर्थी एकवचनाची रूपे आढळतात.*

अ) मेह, लोग, वण्ण, वाणर, पवण, समण, अणुग्गह इत्यादि अकारान्त पुल्लिंगी शब्द 'देव' प्रमाणे चालतात.

आ) अन्ती 'य' असणाऱ्या शब्दांची रूपे सिद्ध करताना य व या सोडून इतर सर्वत्र य् चा लोप करून उरलेला स्वर लिहावा उदा.

**लोय**

| **विभक्ती** | **ए. व.** | **अ. व.** |
|---|---|---|
| **प्र.** | लोए, लोओ | लोया |
| **द्वि** | लोयं | लोए, लोया |
| **तृ.** | लोएण, लोएणं | लोएहि, लोएहिं |
| **पं.** | लोया, लोयाओ | लोएहिंतो |
| **ष.** | लोयस्स | लोयाण, लोयाणं |
| **स.** | लोए, लोयंमि, लोयंसि | लोएसु, लोएसुं |
| **सं.** | लोय | लोया |

पाय (पाद), गय (गज), जणय (जनक), आयरिय (आचार्य) इ. यकारान्त शब्दांची रूपे 'लोय' प्रमाणे होतील.

## १५७ अकारान्त पुल्लिंगी शब्दांची अधिक रूपे

१) प्र. अ. व. मध्ये काही शब्दांची आओ प्रत्ययान्त रूपे आढळतात[१]. माणवाओ, तहागओ, हयाओ (हत), समत्थाओ.

२) च. ए. व. ची काही शब्दांची आय व आए प्रत्ययान्त रूपे आढळतात.

अ) आय प्रत्ययान्त : वहाय (वध), गब्भाय (गर्भ), अहियाय (अहित), अइवाया (अतिपात), ताणाय (त्राण), कूडाय (कूट)

आ) आए प्रत्ययान्त : देवाए (देव), ताणाए (त्राण), हियाए (हित), सुहाए (सुख), वहाए (वध), निस्सेयसाए (निःश्रेयस), अट्ठाए (अर्थ), अणट्ठाए (अनर्थ), समणट्ठाए (श्रमण), संकमट्ठाए (संक्रम), पाणट्ठाए (पान) हियट्ठाए

---

१ *पिशेल (इं.) पृ. २५८ पहा*

(हित), देवत्ताए (देवत्व) मूलत्ताए (मूलत्व), कंदत्ताए, पुप्फत्ताए, फलत्ताए, बीयत्ताए, पुरिसत्ताए.

३) पंचमी[१] ए. व. च्या प्रत्ययातील ओ चा कधी कधी उ होतो.
पावाउ (पाप), दुक्खाउ (दुःख), पुत्ताउ (पुत्र) इ.

४) संबोधन ए. व. त कधी कधी आकारान्त, एकारान्त व ओकारान्त[२] रूपेही आढळतात.
वद्धमाणा, पुत्ता, गोयमा, वद्धमाणे, भंते, वद्धमाणो, अज्जो (आर्य), देवो, ताओ (तात), पुरिसो (पुरुष)

क) पुढील शब्दांची तृ. ए. व. ची रूपे अनियमित आहेत.[३]

१) तवसा (तव, तपस्) जससा (जस यशस्), तेयसा (तेय तेजस्), वयसा (वय, वयस्, वचस्)[४] २) कायसा (काय), बलसा (बल), जोगसा (जोग योग), पओगसा (पओग प्रयोग)[५] ३) धम्मुणा (धम्म, धर्म), कम्मुणा (कम्म/कर्मन्)

## १५८ अकारान्त नपुंसकलिंगी 'वण' शब्द

| विभक्ती | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| **प्र.** | वणं | [६]वणाइं, वणाणि |
| **द्वि.** | वणं | वणाइं, वणाणि |
| **सं.** | वण | वणाइं, वणाणि |

---

१ *पंचमी अ. व. त कधी एहिं प्रत्ययान्त रूपे आढळतात, असे पिशेल (इं) पृ. २६१) म्हणतो. उदा. सएहिं गेहेहिंतो, झरेइ रोमकूवेहिं सेओ इ. पण येथे पंचमीऐवजी तृतीयेचा उपयोग आहे, असे म्हणता. येते. परिच्छेद ४०८ पहा.*

२ *सम्बुद्धावोत्वमिच्छंन्ति वादनस्य तु पैंगलाः। मार्क. ५.३४ पहा.*

३ *या शब्दांची नेहमीप्रमाणे रूपेही होतातच उदा. तेएण, तवेण इ.*

४ *ही रूपे संस्कृतरूपांची अर्धमागधीतील वर्णान्तरे आहेत.*

५ *तवसा इत्यादि रूपांच्या अयोग्य सादृश्य कल्पनेने ही रूपे झाली आहेत.*

६ *येथे कधी कधी 'वणाइ' प्रमाणे अनुस्वाररहित, तर कधी 'वणाइँ' प्रमाणे सानुनासिक रूपे आढळतात.*

टीप : तृतीया ते सप्तमीपर्यंतची सर्व रूपे 'देव' प्रमाणे होतात. मण (मनस्), मज्ज (मद्य), उज्जाण (उद्यान), वीरिय (वीर्य), देवउल (देवकुल), रायउल (राजकुल) इत्यादि अकारान्त नपुं. शब्द 'वण' प्रमाणे चालतात.

### १५९ आकारान्त स्त्रीलिंगी 'माला' शब्द

| विभक्ती | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| **प्र.** | माला | माला, मालाओ |
| **द्वि.** | मालं | माला, मालाओ |
| **तृ.** | मालाए | मालाहि, मालाहिं |
| **पं.** | मालाए, मालाओ | मालाहिंतो |
| **ष.** | मालाए | मालाण, मालाणं |
| **स.** | मालाए | मालासु, मालासुं |
| **सं.** | माला, माले | माला, मालाओ |

पूया (पूजा), लया (लता), साहा (शाखा), देवया (देवता), नट्टसाला (नृत्यशाला) इत्यादि आकारान्त स्त्रीलिंगी शब्द 'माला' प्रमाणे चालतात.

टीप : १) प्र. अ. व., द्वि. अ. व., सं. अ. व. आणि पं. ए. व. यातील ओ प्रत्ययाचा कधी कधी उ. होतो. उदा. मालाउ

२) तृ. ए. व. तील ए प्रत्ययाचा कधी कधी इ होतो. उदा. मालाइ

### १६० ह्रस्व इकारान्त पुल्लिंगी 'मुणि' शब्द

| विभक्ती | ए.व. | अ. व. |
|---|---|---|
| **प्र.** | मुणी | मुणी, मुणीओ, मुणिणो |
| **द्वि.** | मुणिं | मुणी, मुणीओ, मुणिणो |
| **तृ.** | मुणिणा | मुणीहि, मुणीहिं |
| **पं.** | मुणिणो, मुणीओ | मुणीहिंतो |
| **ष.** | मुणिणो, मुणिस्स | मुणीण, मुणीणं |
| **स.** | मुणिंमि, मुणिंसि | मुणीसु, मुणीसुं |
| **सं.** | मुणि, मुणी | मुणी, मुणीओ, मुणिणो |

अग्गि (अग्नि), इसि (ऋषि), निहि (निधि), पक्खि, हत्थि इत्यादि ह्रस्व इकारान्त पुल्लिंगी शब्द 'मुणि' प्रमाणे चालतात.

**१६१ अधिक रूपे**

अ) (१) प्र. अ. व. त अग्गओ (अग्गि), रिसओ (रिसि), महरिसओ (महरिसि), भवदत्तादओ (भवदत्तादि), नायओ (ज्ञाति) अशीही रूपे आढळतात.

२) द्वि. अ. व. मध्ये सुद्धा नायओ (ज्ञाति), अग्गओ (अग्गि) इत्यादि रूपे आढळतात.

३) पं. ए. व. त प्रत्ययातील ओ चा कधी कधी उ होतो. उदा. अग्गीउ

आ) इतर काही शब्दांची अधिकरूपे :

तृ. ए. व त अट्ठि (अस्थि) व मुट्ठि (मुष्टि) या शब्दांची अट्ठीण, मुट्ठीण अशीही रूपे आढळतात.

**१६२ ह्रस्व इकारान्त नपुंसकलिंगी 'दहि' शब्द**

| **विभक्ती** | **ए. व.** | **अ. व.** |
|---|---|---|
| **प्र.** | दहिं | दहीइं, दहीणी |
| **द्वि.** | दहिं | दहीइं, दहीणी |
| **सं.** | दहिं | दहीइं, दहीणी |

टीप : तृतीया ते सप्तमी पर्यंतची सर्व रूपे 'मुणि' प्रमाणे होतात.

अच्छि, वारि, सप्पि, इत्यादि ह्रस्व इकारान्त नपुं. शब्द 'दहि' प्रमाणे चालतात.

**१६३ ह्रस्व उकारान्त पुल्लिंगी 'साहु'[१] शब्द**

---

१ *क्वचित् अन्त्य उ चा अव होऊन साहु शब्द अकारान्त केलेला आढळतो. मग तो 'देव' प्रमाणे चालतो. उदा. साहवं (द्वि) साहवेण–णं (तृ.ए.व.) साहवेहि (तृ.अ.व.) साहवे (द्वि. अ. व.), साहव (सं.एव.) (पउमचरिय पहा)*

| **विभक्ति** | **ए. व.** | **अ. व.** |
|---|---|---|
| **प्र.** | साहू | साहू, साहुणो, साहवो |
| **द्वि.** | साहुं | साहू, साहुणो, साहवो |
| **तृ.** | साहुणा | साहहि, साहूहिं |
| **पं.** | साहुणो, साहूओ | साहूहिंतो |
| **ष.** | साहुणो, साहुस्स | साहूण, साहूण |
| **स.** | साहुंमि, साहुंसि | साहूसु, साहूसुं |
| **सं.** | साहु, साहू | साहू, साहूणो, साहवो |

बंधु, बाहु, भिक्खु, रिउ, सत्तु इत्यादि ह्रस्व उकारान्त शब्द 'साहु' प्रमाणे चालतात.

**१६४ अधिक रूपे**

अ) पं. ए. व. त प्रत्ययातील ओ चा कधी उ होतो. उदा. वाऊउ

आ) इतर काही शब्दांची अधिक रूपे

१) प्र. अ. व. त 'बहु' चे 'बहवे' असे रूप आढळते.

२) तृ. ए. व. त 'लेलू' (लेष्टु-मातीचे ढेकूळ) याचे 'लेलू' असे एक रूप आढळते.

**१६५ ह्रस्व उकारान्त नपुसकलिंगी 'महु' शब्द**

| **विभक्ती** | **ए. व.** | **अ. व.** |
|---|---|---|
| **प्र.** | महुं | महूइं, महूणि |
| **द्वि** | महुं | महूइं, महूणि |
| **सं.** | महु | महूइं, महूणि |

टीप : तृतीया ते सप्तमीपर्यंतची सर्व रूपे 'साहु' प्रमाणे होतात.

चक्खु, धणु, वत्थु इत्यादि ह्रस्व उकारान्त नपुं. शब्द 'महु' प्रमाणे चालतात.

**१६६ ह्रस्व व दीर्घ इ, ई, उ, ऊ या स्वरांनी अन्त पावणारी स्त्रीलिंगी नामे**

ह्रस्व व दीर्घ इ, ई, उ, ऊकारान्त स्त्रीलिंगी नामांच्या बाबतीत पुढील गोष्टी लक्षात ठेवण्यासारख्या आहेत.

१) स. ए. व. सोडून इतर सर्व विभक्ती व वचने यात ही स्त्रीलिंगी नामे सारखीच चालतात २) स. ए. व. त ह्रस्व इकारान्त आणि उकारान्त स्त्रालिंगी नामांना 'सि' हा प्रत्यय अधिक लागतो.[१] ३) स. ए. व. त दीर्घ ईकारान्त व ऊकारान्त स्त्रीलिंगी नामांना फक्त 'ए' हा प्रत्यय लागतो.[२]

**१६७ ह्रस्व इकारान्त स्त्रीलिंगी 'भूमि' शब्द**

| विभक्ती | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. | भूमी | भूमी, भूमीओ |
| द्वि | भूमिं | भूमी, भूमीओ |
| तृ. | भूमीए | भूमीहि, भूमीहिं |
| पं. | भूमीए, भूमीओ | भूमीहिंतो |
| ष. | भूमीए | भूमीण, भूमीणं |
| स. | भूमीए, भूमिंसि | भूमीसु, भूमीसुं |
| सं. | भूमि, भूमी | भूमी, भूमीओ |

तुट्ठि, रइ, संति, कंति, अरइ इत्यादि ह्रस्व इकारान्त स्त्रीलिंगी शब्द 'भूमि' प्रमाणे चालतात.

टीप : स. ए. व. त राइ (रात्रि) चे राओ असे एक रूप आढळते.

**१६८ ह्रस्व उकारान्त स्त्रीलिंगी 'धेणु' शब्द**

| विभक्ती | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. | धेणू | धेणू, धेणूओ |
| द्वि. | धेणुं | धेणू, धेणूओ |
| तृ. | धेणूए | धेणूहि, धेणूहिं |

---

१ वैद्य, पृ. ३६ २ घाटगे, पृ. १३८

| | | |
|---|---|---|
| **पं.** | धेणूए, धेणूओ | धेणूहिंतो |
| **ष.** | धेणूए | धेणूण, धेणूणं |
| **स.** | धेणूए, धेणुंसि | धेणूसु, धेणूसुं |
| **सं.** | धेणु, धेणू | धेणू, धेणूओ |

रज्जु, सिंधु इत्यादि ह्रस्व उकारान्त स्त्रीलिंगी शब्द 'धेणु' प्रमाणे चालतात.

## १६९ दीर्घ ईकारान्त स्त्रीलिंगी 'मही' शब्द

| **विभक्ती** | **ए. व.** | **अ. व.** |
|---|---|---|
| **प्र.** | मही | मही, महीओ |
| **द्वि.** | महिं | मही, महीओ |
| **तृ.** | महीए | महीही, महीहिं |
| **पं.** | महीए, महीओ | महीहिंतो |
| **ष.** | महीए | महीण, महीणं |
| **स.** | महीए | महीसु, महीसुं |
| **सं.** | महि, मही | मही, महीओ |

नई, पुहवी, नलिणी इत्यादि दीर्घ ईकारान्त स्त्रीलिंगी शब्द 'मही' प्रमाणे चालतात.

टीप : ष.ए.व.त कधी 'महीए' असेही रूप आढळते.

## १७० दीर्घ ऊकारान्त स्त्रालिंगी 'वहू' शब्द

| **विभक्ती** | **ए. व.** | **अ. व.** |
|---|---|---|
| **प्र.** | वहू | वहू, वहूओ |
| **द्वि.** | वहुं | वहू, वहूओ |
| **तृ.** | वहूए | वहूहि, वहूहिं |
| **पं.** | वहूए, वहूओ | वहूहिंतो |
| **ष.** | वहूए | वहूण, वहूणं |
| **स.** | वहूए | वहूसु, वहूसुं |
| **सं.** | वहु, वहू | वहू, वहूओ |

## अनियमित नामरूपविचार

मागे म्हटल्याप्रमाणे ज्यांची रूपे अनियमित म्हणता येतील, अशा नामांचा रूपविचार[१] आता पुढे दिला आहे.

**१७१ कर्तृवाचक[२] 'कत्ता' शब्द[३]**

| **विभक्ती** | **ए. व.** | **अ. व.** |
|---|---|---|
| **प्र.** | कत्ता | कत्तारो |
| **द्वि.** | कत्तारं | कत्तारो |
| **तृ.** | कत्तारेणं | कत्तारेहिं |
| **पं.** | कत्ताराओ | कत्तारेहिंतो |
| **ष.** | कत्तारस्स, कत्तुणो | कत्ताराणं |
| **स.** | कत्तारे | कत्तारेसुं |
| **सं.** | कत्ता | कत्तारो |

दाया, नेया, नाया (जाणणारा), सत्था (शास्ता), पसत्था (प्रशास्ता), गंता इत्यादि कर्तृवाचक शब्द 'कत्ता' प्रमाणे चालतात.

**१७२ अधिक रूपे**

१) प्र. ए. व. त उदगदायारे, भत्तारे, उवदंसेत्तारे अशी एकारान्त व भत्तारो अशी ओकारान्त रूपेही आढळतात.

२) स. अ. व. त भत्तारेसु, आगंतारेसु अशी रूपेही आढळतात.

३) प्र. अ. व. त कत्ता, भत्ता, गंता अशीही रूपे आढळतात.

**१७३ पिया (पितृ)**

| **विभक्ती** | **ए. व.** | **अ. व.** |
|---|---|---|
| **प्र.** | पिया | पियरो |
| **द्वि.** | पियरं | पियरो |

---

१ *या प्रकरणाचे शेवटी दिलेली 'माहाराष्ट्रीतील रूपविचार' ही पुरवणी पहा.*

२ *असे कर्तृवाचक शब्द अर्धमागधीत कमी प्रमाणात आढळतात.*

३ *कत्रा शब्दाच्या रूपात 'कत्तार' या अंगापासून झालेली ही काही रूपे आहेत, हे स्पष्टच आहे.*

| | | |
|---|---|---|
| **तृ.** | पिउणा | पिईहिं, पिऊहिं |
| **प.** | पिउणो | पिईहिंतो, पिऊहिंतो |
| **ष.** | पिउणो, पिउस्स | पिईणं, पिऊणं |
| **स.** | पियरि | पिईसुं, पिऊसुं. |
| **सं.** | पिया | पियरो |

भाया (भ्रातृ), जामाया (जामातृ), अम्मापिया, मायापिया इत्यादि शब्द 'पिया' प्रमाणे चालतात.

### १७४ अधिक[1] रूपे

१) प्र. अ. व. त भायरा, पिई अशी रूपे आढळतात.

२) द्वि. अ. व. त पियरे, भायरे, अम्मापियरे अशी रूपे आढळतात.

३) ष. ए. व. त अम्मापियरस्स असे रूप आढळते.

### १७५ माया (मातृ) शब्द

| **विभक्ती** | **ए. व.** | **अ. व.** |
|---|---|---|
| **प्र.** | माया | मायरो |
| **द्वि.** | मायरं | मायरो |
| **तृ.** | माऊए | माईहि, माऊहिं |
| **पं.** | माऊए | माईहिंतो, माऊहिंतो |
| **ष.** | माऊए | माईणं, माऊणं |
| **स.** | माऊए | माईसुं, माऊसुं. |
| **सं.** | माया | मायरो |

### १७६ अधिक[2] रूपे

१) तृ. ए. व., ष. ए. व., स. ए. व. यामध्ये 'मायाए' असे रूप आढळते.

२) तृ. अ. व. त 'मायाहिं' असे रूप आढळते.

---

१ *काही रूपे पितृ इत्यादि शब्दातील ऋ चा अर होऊन होणाऱ्या अकारान्त अंगापासून बनलेली आहेत.*

२ *येथेही 'माया' या आकारान्त अंगापासून काही रूपे सिद्ध होतात.*

**१७७ राय[१] (राजन्) शब्द**

| विभक्ती | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. | राया | रायाणो, राइणो |
| द्वि. | रायाणं, रायं | रायाणो |
| तृ. | रन्ना, राइणा, राएण, रायणा[२] | राईहिं |
| पं. | रन्नो, राइणो, | राईहिंतो |
| ष. | रन्नो, राइणो, रायस्स | राईणं, रायाणं |
| स. | रायंसि | राईसु |
| सं. | राय, राया, रायं | रायाणो, राइणो |

**१७८ अप्प (अत्त, आय) (आत्मन्)[३] शब्द**

| विभक्ती | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. | अप्पा, अत्ता, आया | अप्पाणो, अत्ताणो |
| द्वि. | अप्पाणं, अत्ताणं, आयाणं | अप्पाणो अत्ताणो |
| तृ. | अप्पणा, अत्तणा | अप्पाणेहि, अत्ताणेहि |
| पं. | अप्पणो, अत्तणो | |
| | अप्पओ, अत्तओ, आमओ | अप्पाणेहिंतो, अत्ताणेहिंतो |
| ष. | अप्पणो, अत्तणो | अप्पाणं, अत्ताणं |
| | | अप्पाणाणं, अत्ताणाणं |
| स. | अप्पणि, अत्तणि, | अप्पेसुं, अत्तेसुं, |
| | अप्पे, अत्ते, अप्पाणंसि | अप्पाणेसुं, अत्ताणेसुं |
| सं. | अप्प, अप्पा, अत्त, अत्ता | |
| | आय, आया | अप्पाणो, अत्ताणो |

१ *अ) राय च्या रूपात काही रूपे 'राय' या अंगापासून आहेत.*
*आ) समासात अन्ती असणारा राय शब्द संस्कृतप्रमाणे आकारान्त पुल्लिंगी नामासारखा चालतो.*

२ *सुत्ता. खंड १ प्रस्ता पृ. ३७.*

३ *अप्प, मत्त च्या रूपांतहि काही रूपे अप्प, अत्त, अप्पाण, अत्ताणया अकारान्त अंगापासून आहेत.*

अद्धा (अध्वन्), बंभा (ब्रह्मन्), मुद्धा (मूर्धन्) हे शब्द 'अप्प' प्रमाणे चालतात.

### १७९ अधिक रूपें

१) प्र. ए. व. त अप्पाणो, आयाणे अशी रूपे आढळतात.

२) तृ. ए. व. त अप्पेण, अप्पेणं, अप्पाणेण, अप्पाणेणं अशी रूपे आढळतात.

३) ष. ए. व. त अप्पाणस्स असे रूप आढळते.

### १८० भगवंत (भगवत्) शब्द

| **विभक्ती** | **ए. व.** | **अ. व.** |
|---|---|---|
| **प्र.** | भगवंतो, भगवं | भगवंतो |
| **द्वि.** | भगवंतं, भगवं | भगवंते |
| **तृ.** | भगवंतेण, भगवंतेणं, भगवया | भगवंतेहिं |
| **पं.** | भगवओ | भगवंतेहिंतो |
| **ष.** | भगवओ, भगवंतस्स | भगवंताणं |
| **स.** | भगवंते, भगवंतंसि | भगवंतेसु |
| **सं.** | भगवं | भगवंतो |

गायंत, नच्चंत, भासंत, अरहंत, जयंत (यतत्) इत्यादि 'अन्त' प्रत्ययान्त व. का. धा. वि. 'धणवंत' इत्यादि 'वंत' प्रत्ययान्त शब्द आणि 'बुद्धिमंत' इत्यादि 'मंत' प्रत्ययान्त शब्द 'भगवंत' प्रमाणे[१] चालतात.

### १८१ अधिक रूपे

अ) १) प्र. ए. व. त मूलमंते, कंदमंते, विरायंते (विरायंत), चुछ-हिमवंते, अरहंते अशी रूपे आढळतात.

२) सं. ए. व. त आडसो, समणाउसो, भंते अशी रूपे आढळतात.

---

१ *प्रायः या प्रकारच्या शब्दांची रूपे अकारान्त नामाप्रमाणेच होतात. उदा. भगवंतस्स इ. त्यांची अनियमित रूपे मात्र 'भगवंत' प्रमाणे होतात.*

आ) इतर शब्दांची काही अधिक रूपे :

१) प्र. ए. व. त अरहा (अरहंत), अजाणओ (अजाणंत), भगवओ (भगवंत) अशी रूपे आढळतात.

इ) भगवंत प्रमाणे होणारी इतर शब्दांची काही रूपे अधिक समजुतीसाठी पुढे दिली आहेत.

क) प्र. ए. व. : १) जाणं (जानन्), चिट्ठं (तिष्ठन्), महं (महान), पयं (पचन्), अरहं (अरहंत), २) चक्खुमं, दिट्ठिमं ३) आयवं (आत्मवान्), धम्मवं (धर्मवान्)

ख) तृ. ए. व. : जाणया (जाणंत), पासया (पासंत), अरहया (अरहंत), मइमया (मइमंत)

ग) ष. ए. व. : विहरओ (विहरंत) करओ (करंत), हणओ (हणंत), धिईमओ (धिईमंत)

घ) सं. एउ व. : आउसं (आयुष्मन्)

**१८२ इतर शब्दांचा रूपविचार**

वर ज्यांचा रूपविचार येऊन गेला आहे त्याखेरीज संस्कृतमधील इतर स्वरान्त व व्यंजनांत शब्दांची रूपे अर्धमागधीत कशी होतात, याचा विचार आता करावायाचा आहे.

**१८३ इतर स्वरान्त[१] शब्द**

१) दुहितृ : या शब्दाचे ‘धूया’ हे अंग ‘माला’ प्रमाणे चालते. या शब्दांची पुढील रूपे अधिक आढळतात.

द्वि. ए. व. धूयरं तृ. अ. व.– धूयराहिं

---

*१) संस्कृतमधील दीर्घ ईकारान्त व ऊकारान्त शब्द अर्धमागधीत ऱ्हस्व इकारान्त व उकारान्त होतात. उदा. अशोकश्री – असोगसिरि, सयंभुणा (स्वयम्भू) (कथा पृ. १७०)*

*२) सेन. पृ. ६७*

२) स्वसृ : या शब्दाचे प्र. ए. व. चे 'ससा' इवढेच रूप आढळते.

३) ओकारान्त गो : या शब्दाचे पुल्लिंगात 'गव' अथवा 'गोण' आणि स्त्रीलिंगात 'गावी' वा 'गोणी' असे आदेश होतात. व मग ते आपापल्या अन्त्यस्वरानुसार चालतात.

खेरीज 'गो' शब्दाची पुढील रूपे आढळतात.

१) प्र. ए. व. : गो, गवे २) प्र. अ. व. : गाओ, गवा

३) द्वि. अ. व. : गाओ ४) तृ. अ. व. : गोहिं

५) ष. अ. व. : गवं

४) औकारान्त नौ : हा शब्द 'नावा' असा आकारान्त होऊन तो 'माला' प्रमाणे चालतो.

**१८४ इतर व्यंजनान्त शब्द**

अर्धमागधीत व्यंजनान्त शब्द चालत नसल्याने संस्कृतमधील अनेक व्यंजनान्त शब्द स्वरान्त करून अर्धमागधीत उपयोग-योग्य करून घेतले जातात. मग ते आपापला अन्त्य स्वर व लिंग यानुसार चालतात.

अशा शब्दांची माहिती आता दिली आहे. तसेच संस्कृतमधून वर्णान्तराने आलेली अशा शब्दांची रूपेही दिली आहेत.

१) चकारान्त शब्द : 'वाच्' आणि 'त्वच्' या शब्दात अन्ती 'आ' मिळून ते 'वाया', 'तया' असे आकारान्त होतात. मग ते आकारान्त स्त्रीलिंगी नामाप्रमाणे चालतात.

संस्कृतवरून वर्णान्तरित : तृ. ए. व. : वाया, तया

२) जकारान्त शब्द : 'भिषन्' शब्दात अन्ती 'अ' मिळून तो 'भिसय' असा अकारान्त होतो व अकारान्त पुल्लिंगी नामाप्रमाणे चालतो.

३) तकारान्त शब्द : क) अत्, वत्, मत् प्रत्ययान्त शब्द अंत, वंत, मंत यांनी अन्त पावणारे होऊन ते आकारान्त शब्दाप्रमाणे चालतात[१]. त्यांची काही

---

१) 'हनुमत्' चे कधी कधी 'हणुय' (पउम. १.५९) होऊन तो अकारान्त शब्दाप्रमाणे चालतो. उदा. हणुयस्स (पउम. १.८७)

अनियमित रूपे परिच्छेद १८० मध्ये म्हटल्याप्रमाणे 'भगवंत' प्रमाणे होतात.

या शब्दांची अकारान्त शब्दाप्रमाणे जी रूपे होतात त्यातील काही समजुतीसाठी पुढे दिली आहेत.

अ) पुल्लिंगी :

| | | |
|---|---|---|
| **प्र.** | रमंतो, देंतो, महंतो | भासंता, सीलमंता, बुद्धिमंता |
| **द्वि.** | गिण्हंतं, जंपंतं | समारंभते, अरहंते |
| **तृ.** | जंपंतेण, कुणंतेण | जीवंतेहिं, गायंतेहिं, भणंतेहिं |
| **पं.** | चुल्लहिमवंताओ | |
| **ष.** | आउसंतस्स (आयुष्मत्) | |
| | कहंतस्स | संताणं, चरंताणं |
| **स .** | जलंते, संते, अरहंतंसि | कीलंतेसु, गच्छंतेसु |
| सं. | | आउसंता (आयुष्मन्) |

आ) नपुं. : प्र. अ. व. : गंधमंताइं, रसवंताइं, वण्णमंताइं, फासमंताइं संस्कृतवरून वर्णान्तरित : नपुं. प्र. अ. व.: परिग्गहावंति, बलवंति, एयावंति, आवंति, जावंति (यावत्)

का) इतर तकारान्त शब्द :

१) अन्त्य व्यंजनाचा लोप होऊन काही नकारान्त शब्द स्वरान्त होतात. मग ते आपपल्या लिंग व अन्त्य स्वरानुसार चालतात. उदा. जगत्[१] = जग, विद्युत् = विज्जु, वेदवित् = वेयवि, षडङ्गवित् = सडंगवि, प्रसेनजित् = पसेणइ, इन्द्रजित् = इंदइ, अंगवित् = अंगवि

२) अन्त्य 'त्' मध्ये स्वर[२] मिळवून :

---

१ *जगइ' (जगति) हे जगत् चे स. ए. व. चे रूप संस्कृतमधून वर्णान्तराने आलेले आहे.*

२ *पुल्लिंगी, नपुं. शब्दात 'अ' स्त्रीलिंगी शब्दात प्रायः 'आ' (कधी इ) मिळवून व्यंजनांत शब्द स्वरान्त केले जातात. (सेन, पृ. ६७ पहा)*

मरुत् = मरुय, यकृत् = यगय सरित् = सरिया

३) महत् चे महंत होऊन तो अकारान्त नामाप्रमाणे[१] चालतो.

महत् ची संस्कृतवरून वर्णान्तराने आलेली रूपे अशी :

१) प्र. व. द्वि. ए. व. : महं २) तृ. ए. व. : महया

३) ष. ए. व. : महओ

४) दकारान्त शब्द :

अ) अन्त्य द् चा लोप : परिषद् = परिसा, सुहृद् = सुहि

आ) अन्त्य द् मध्ये स्वर मिळवून[२] :

१) शरद् = सरय, हृद् = हिय

२) सम्पद् = संपया, प्रतिपद् = पाडिवया, आपद् = आवया

आपद् = आवइ, विपद् = विवइ

५) धकारान्त शब्द : स्त्रीलिंगी 'क्षुध्' शद्बांत 'आ' मिळून तो 'छुहा, खुहा असा आकारान्त होतो.

६) नकारान्त शब्द :

अ) अन्नन्त शब्द : राजन् व आत्मन् हे शब्द सोडून इतर अन्नन्त शब्द प्रायः १) अन्त्य न् चा लोप होऊन अकारान्त होतात. वा २) काही शब्दात अन्त्य न् चा लोप होऊन व त्यांना 'आण' जोडून ते अकारान्त केलेल आढळतात.

१) अन्त्य न् चा लोप : नामन् = नाम, कर्मन् = कम्म, प्रेमन् = पेम्म, जन्मन् = जम्म, चर्मन् = चम्म, दामन् = दाम, पर्वन् = पव्व, स्थामन् = थाम

२) अन्त्य न् चा लोप, मग 'आण' मूर्धन् = मुद्धाण, युवन् = जुवाण (अ. जवान), श्वन् = साण, अध्वन् = अद्धाण

क्वचित् अन्त्य न् मध्येच अ मिळविला जातो.

जन्मन् = जम्मण

या शब्दांची आपापल्या लिंगानुसार अकारान्त शब्दाप्रमाणे रूपे होतात. अशी काही रूपे समजुतीसाठी पुढे दिली आहेत.

---

१ *उदा. नपुं. प्र. व. द्वि अ. व. महंताइं.*

२ *काही शब्दात विकल्प : मूर्धन् = मुद्ध, मुद्धाण इ.*

अ) अन्त्य न् लुप्त झालेले शब्द :

| | | |
|---|---|---|
| **प्र.** | बंभो, बंभे, जम्मं, कम्मं | बंभा, नामाइं, नामाणि |
| **द्वि.** | मघवं | |
| **तृ.** | नामेण, नामेणं, मद्धेण, कम्मेणं | कम्मेहिं, लोमेहिं, दामेहिं |
| **पं.** | जम्माओ | |
| **ष.** | जम्मस्स, कम्मस्स, बंभस्स | |
| **स.** | जम्मे, कम्मे, कम्मंसि, चम्मंसि | |

वरील काही शब्दांची संस्कृतातून वर्णान्तराने आलेली रूपे अशी :

१) प्र. ए. व. : नाम २) तृ. ए. व. : कम्मणा ३) पं. ए. व. : कम्मणो ४) स. ए. व. : मुद्धि (मूर्ध्नि) ५) म. अ. व. : कम्मसु

'कम्म' ची कम्मुणा (तृ. ए. व.) कम्मुणो (ष. ए. व.), कम्मुणं (ष. अ. व.) ही रूपे वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

आ) अन्त्य न् लुप्त होऊन अन्ती 'आण' आलेले शब्द :

| | | |
|---|---|---|
| **प्र.** | अद्धाणो, जुवाणो, जुवाणे, साणो, साणे | मुद्धाणा, जुवाणा |
| **द्वि.** | मुद्धाणं | |
| **तृ.** | जुवाणेण, मुद्धाणेणं | |
| **ष.** | साणस्स | जुवाणाणं |
| **स.** | अद्धाणे, मुद्धाणंसि | |
| **सं.** | | जुवाणा |

वरील काही शब्दांची संस्कृतमधून वर्णान्तराने आलेली रूपे अशी :

१) प्र. ए. व. : जुवा, जुवं, मुद्धा २) स. ए. व. : मुद्धि

आ) इन्नन्त शब्द :

१) अन्त्य न् चा लोप होऊन हे शब्द ह्रस्व इकारान्त होतात. मग ते ह्रस्व इकारान्त नामाप्रमाणे चालतात.

हस्तिन् = हत्थि, ज्ञानिन् = नाणि, ब्रह्मचारिन् = बंभयारि, पक्षिन् = पक्खि, स्वामिन् = सामि, शशिन् = ससि, चक्रवर्तिन् = चक्कवट्टि, मन्त्रिन् =

मंति, साक्षिन् = सक्खि, श्रेष्ठिन् = सेट्ठि, शिखण्डिन् = सिंहडि, दर्शिन् = दंसि, कामार्थिन् = कामत्थि, रुक्मिन् = रुप्पि, तपस्विन् = तवस्सि, मेधाविन् = मेहावि, ओजस्विन् = ओयंसि, तेजस्विन् = तेयंसि, यशास्विन् = जसंसि

वरील काही शब्दांची इकारान्त शब्दाप्रमाणे होणारी काही रूपे पुढे समजुतीसाठी दिली आहेत.

अ) पुल्लिंगी :

| | | |
|---|---|---|
| **प्र.** | हत्थी, तवस्सी, मेहावी | हत्थी, नाणी, मुणिणो, दंडिणो |
| **द्वि.** | हत्थिं, तवस्सिं | ठाणी (स्थानिन्), पाणिणो |
| **तृ.** | हत्थिणा, सामिणा | पक्खीहिं, मेहावीहिं |
| **पं.** | सिहरीओ | पक्खीहिंतो |
| **ष.** | गिहिणो, जसस्सिणो | पक्खीणं, पाणीणं |
| **स.** | रूप्पिंमि | हत्थीसु, पक्खीसु |
| **सं.** | सामि, सामी | |

आ) नपु. प्र. अ. व. : रायकुलगामिणी, अकालपडिबोहीणि

२) अन्त्य न् मध्ये अ मिळवून काही शब्द अकारान्त केले जातात. साक्षिन् = सक्खिण, कृमिन् = किमिण, बर्हिन् = बरहिण, गर्भिन् = गब्भिण

३) पथिन् चे पंथ, पह असे आदेश[1] होऊन तो अकारान्त होतो. अकारान्त नामाप्रमाणे होणारी त्याची काही रूपे अशी :

१) प्र. ए. व. : पंथा
२) द्वि. ए. व. : पंथं, पहं
३) तृ. ए. व. : पहेण, पहेणं
४) पं. ए. व. : पंथाओ
५) ष. अ. व : पंथाणं
६) स. ए. व.: पंथे, पहे, पहंमि
७) स. अ. व. : पंथेसु

७) भकारान्त शब्द : ककुभ् = कउहा (दिशा)

८) रकारान्त शब्द : धुर् = धुरा, पुर् = पुरा, गिर् = गिरा

---

१. *समासात द्वितीयपदी पथिन् चे ० पंथ, ० वंथ असे विकार होतात.*

९) शकारान्त शब्द : दिश्-दिसा, दिश् = दिसि

१०) षकारान्त शब्द : प्रावृष् = पाउस

११) सकारान्त शब्द :

अ) अन्ती अस् असणाऱ्या शब्दातील अन्त्य स् चा लोप होऊन ते अकारान्त होतात.

मनस् = मण, वचस् = वय, तेजस् = तेय, तपस् = तव, रजस् = रय, चेतस् = चेय, यशस् = जस, उरस् = उर, नभस् = नह, तमस् = तम, शिरसं = सिर, वक्षस् = वच्छ, सरस् = सर, मेदस् = मेय, स्रोतस् = सोय

अप्सरस्[१] = अच्छरा

आपस्[२] = आउ

अस् अन्ती असणाऱ्या काही शब्दांची संस्कृतमधून वर्णान्तराने आलेली रूपे पुढीलप्रमाणे :

१) प्र. ए. व. : सुमणा, दुम्मणा

२) तृ. ए. व. : मणसा, वयसा, तेयसा, मवसा, रयसा, जससा, सिरसा, चेयसा

३) स. ए. व. : उरसि, सिरसि, सरसि, तमसि

आ) अन्ती अस् असणाऱ्या शब्दात कधी कधी स्वर मिळविला जातो.

१) श्रेयस् = सेयंस, कनीमयस् = कणीयस, पापीयस् = पावीयस

२) विद्वस् = विउस

३) अप्सरस्[३] = अच्छरसा

विद्वस् शब्दाची संस्कृतवरून वर्णान्तराने आलेली काही रूपे :

१) प्र. ए. व. : विज्जं २) तृ. ए. व. : विउसा

---

१ *हा शब्द स्त्रीलिंगी असल्याने तो अच्छरा असा आकारान्त होतो.*

२ *आपस् शब्द मात्र उकारान्त झालेला आढळतो.*

३ *हा शब्द स्त्रीलिंगी असल्याने अन्ती आ मिळविलेला आहे.*

इ) (क) अन्ती एस् व उस् असणाऱ्या शब्दात अन्त्य स् चा लोप होऊन ते ह्रस्व इकारान्त व उकारान्त होतात.

१) सर्पिस् = सप्पि, ज्योतिस् = जोइ, अर्चिस् = अच्चि, हविस् = हवि

२) आयुस् = आउ, चक्षुस् = चक्खु, धनुस् = धणु

का) कधी कधी अन्त्य स् मध्ये स्वर मिळविला जातो.

१) धनुस् = धणुह, दीर्घायुस् = दीहाउस

२) चिरायुस् = चिराउसा, आशीस् = आसीसा

वरील काही शब्दांची संस्कृतमधून वर्णान्तराने आलेली रूपे अशी :

१) द्वि. ए. व. : आसीसं २) तृ. ए. व.: चक्खुसा

३) ष. अ. व. : जोइसं (ज्योतिषाम्)

ई) पुंस् चे पुम होते.[१]

१२) हकारान्त शब्द :

स्त्रीलिंगी उपानह् या हकारान्त शब्दातील अन्त्य ह् चा लोप होतो.

उपानह् = पाहणा, वाहणा

१ *समासात पुंस् चे पुम वा पुंस होते : पुमवयण (पुंवचन), नपुंसवेय, पुंसकोइलग (पुंस्कोकिल-क)*

## पुरवणी १

# लिंगविचार

संस्कृत-मराठीतल्या प्रमाणेच अर्धमागधीतही पुल्लिंग, स्त्रीलिंग आणि नपुंसकलिंग अशी तीन लिंगे आहेत. अर्धमागधीतील पुष्कळ शब्दांचे लिंग संस्कृत वा अर्वाचीन भारतीय भाषांतील त्या त्या शब्दाप्रमाणेच असते, असे समजल्यास बराच निर्वाह[१] होईल.

काही संस्कृत शब्दांची लिंगे अर्धमागधीत आल्यावर बदलली[२] आहेत. अशा काही शब्दांची माहिती पुढे दिली आहे.

अ) पुल्लिंग :

१) प्रावृष्, शरद्, तरणि हे शब्द पुल्लिंगांत योजले जातात[३].
उदा. पाउसो, सरओ, तरणी

२) दिश् व आपस् हे शब्दहि कधी पुल्लिगांत वापरलेले आढळतात[४]. उदा. दिसो, आऊ.

३) दामन्, शिरस् व नभस्[५] आणि प्रेमन् व अप्सरस् हे शब्द[६] सोडून इतर सकारान्त व नकारान्त शब्द पुल्लिंगात योजले जातात. उदा. मणो, मणे, तवो, तवे, वओ, वए (वयस्), तमो, तमे, ओए (ओजस्), वच्छे (वक्षस्),

---

१ *याचे कारण असे की शब्दांचे लिंग ठरविण्यास कोश व वाङ्मयीन उपयोग याखेरीज योग्य असे अन्य साधन नाही.*

२ *प्राकृतशब्दांच्या लिंगाबद्दल पुढील विधाने लक्षात ठेवण्यासारखी आहेत. 'प्राकृते हि लिंगव्यभिचारः, यदाह पाणिनीः स्वप्राकृतलक्षणे लिंगं व्यभिचार्यपि' इति। (मलयगिरी राय, पृ. ३२) मलयगिरी आणखी म्हणतो 'प्राकृते हि लिंगमनियतम्।' (राय पृ. १७५)*

३ ***प्रावृट्शरत्तरणय पुंसि ।*** *(हेम १.३१)*

४ *घाटगे, पृ. ११९*

५ ***स्नमदामशिरोनभः ।*** *हेम १.३२*

६ *मार्कं. ४.२७*

सोओ (स्रोतस्), तेऊ (तेजस्), जम्मो, नम्मो (नर्मन्) मम्मो (मर्मन्)[१], वम्मो (वर्मन्), कम्मे

४) डोळावाचक शब्द आणि वचन इत्यादि शब्द विकल्पाने पुल्लिंगांत योजले[२] जातात.

१) अच्छी, अच्छीइं, चक्खू, चक्खूइं, नयणा, नयणाइं.

२) वचन इत्यादि : वयण, विज्जु, कुल, छंद, माहप्प, दुक्ख, भायण

५) संस्कृतमधील काही अकारान्त न. नामांचा उपयोगही अर्धमागधीत कधी कधी पुल्लिंगांत [३]आढळतो.

ठाणे (स्थान), रयणे (रत्न), वीरिए (वीर्य), दंसणे (दर्शन), मरणे (मरण), जीविए (जीवित), बले (बल) इत्यादि

आ) नपुंसकलिंग :

१) गुण वगैरे शब्द विकल्पाने नपुंसकलिंगात योजले[४] जातात. गुणा, गुणाइं, देवा, देवाणि, बिंदुणो, बिंदूइं, खग्गो, खग्गं, मंडलग्गो, मंडलग्गं, कररुहो, कररूहं, रुक्खा, रुक्खाइं (वृक्ष)

२) इतर काही शब्दांचीहि नपुंसकलिंगात वापरलेली रूपे आढळतात. पव्वयाणि[५] (पर्वत), तयाणि (त्वच), पाउमाइं (पादुका), पंतिमाइं (पंक्ती) पसिणाइं (प्रश्न), मासाइं (मांस), फासाइं (स्पर्श), सालीणि (शालि, वीहिणि (व्रीहि हेऊइं (हेतु)[६]

इ) स्त्रीलिंग

१) अंजलि इत्यादि शब्द विकल्पाने स्त्रीलिंगात योजिले[७] जातात.

---

१ *प्रा. प्र. ४.१८*

२ ***वाक्ष्यर्थवचनाद्याः।*** *हेम. १.३३*

३ *घाटगे, पृ. ९५-९६*

४ ***गुणाद्याः क्लीबे वा।*** *हेम. १.३४*

५ *दस. ७.२६*

६ *घाटगे, पृ. १०९, १२७*

७ ***वेमाञ्जल्याद्याः स्त्रियाम् ।*** *हेम.१.३५*

अंजलि वगैरे शब्द : अंजलि, पिट्ठी (पृष्ठ), अच्छि, पण्ह, चोरिया (चौर्य), कुच्छि, बलि, निहि, विहि, रस्सि, गंठि

२) संस्कृतमधील इमन्नन्त शब्दही विकल्पाने स्त्रीलिंगात योजले[१] जातात. गरिमा, महिमा, निल्लज्जिमा, धुत्तिमा

३) इतर काही शब्द स्त्रीलिंगात वापरलेले आढळतात.
अद्धा (अध्वना), सेंभा (श्लेष्मन्) , उम्हा (उष्मन्), गिम्हा (ग्रीष्म), हेमंता (हेमन्त)[२]

ई) तीन लिंगी[३] शब्द :
एग हे संख्यावाचक, गुणविशेषणे, धातुसाधित विशेषणे, अम्ह व तुम्ह सोडून इतर सर्वनामे हे शब्द त्रिलिंगी आहेत. म्हणजे या शब्दांना विशेष्याच्या लिंगाप्रमाणे पुल्लिंग, स्त्री. वा नपुं. होते.

उ) अलिंगी[४] शब्द :
अम्ह व तुम्ह ही सर्वनामे, दो. ति. चउ, पंच[५] ही संख्याविशेषणे हे शब्द अलिंगी आहेत. म्हणजे या शब्दांची तीनही लिंगी रूपे समानच होतात.

---

१ *हेम १.३५*

२ *घाटगे, पृ. ११४*

३ *वा. वें. आपटे, पृ. ४०*

४ *वा. वें आपटे, पृ. ४०*

५ *व पंचप्रमाणे चालणारी इतर संख्याविशेषणे*

## पुरवणी २

# माहाराष्ट्रीतील नामरूपविचार

अर्धमागधीही माहाराष्ट्रीशी अत्यंत जुळती असल्याने माहाराष्ट्रीतील नामरूपविचार[१] येथे सांगणे अयोग्य होणार नाही. कारण त्यामुळे दोहोंमधील रूपविचारातील साम्य व भेद लक्षात येणे सोपे होईल.

**१) अकारान्त पुल्लिंगी वच्छ**

| | | |
|---|---|---|
| **प्र.** | वच्छो | वच्छा |
| **द्वि.** | वच्छं | वच्छे, वच्छा |
| **तृ.** | वच्छेण-णं | वच्छेहि-हिं-हिँ |
| **पं.** | वच्छा, वच्छत्तो, वच्छाओ, वच्छाउ, वच्छाहि वच्छाहिंतो, वच्छासुंतो | वच्छत्तो, वच्छाओ, वच्छाउ वच्छेहि, वच्छाहिंतो, वच्छेहिंतो, वच्छासुंतो, |
| **ष.** | वच्छस्स | वच्छाण-णं |
| **स.** | वच्छे, वच्छंमि | वच्छेसु-सुं |
| **सं.** | वच्छ, वच्छा, वच्छो | वच्छा |

**२) अकारान्त नपुं. वण**

| | | |
|---|---|---|
| **प्र. द्वि** | वणं | वणाणि, वणाइं, वणाइँ |
| **सं.** | वण | वणाणि, वणाइं, वणाइँ |

उरलेली रूपे 'वच्छ' प्रमाणे

**३) आकारान्त स्त्रीलिंगी माला**

| | | |
|---|---|---|
| **प्र.** | माला | माला, मालाओ, मालाउ |
| **द्वि.** | मालं | माला, मालाओ, मालाउ |

---

१ *डॉ. वैद्यसंपादित हेमचंद्राचे प्राकृत व्याकरणावरून ही रूपे दिली आहेत.*

| | | |
|---|---|---|
| **तृ.** | मालाअ-इ-ए | मालत्तो, मालाओ, मालाउ |
| **पं.** | मालाअ-इ-ए-ओ | मालात्तो, मालाओ, मालाउ |
| | मालाहिंतो | मालाहिंतो, मालासुंतो |
| **ष.** | मालाअ-इ-ए | मालाण-णं |
| **स.** | मालाअ-इ-ए | मालासु-सुं |
| **सं.** | माला, माले, माला, | मालाओ, मालाउ |

**४) ह्रस्व इकारान्त पुल्लिंगी गिरि**

| | | |
|---|---|---|
| **प्र.** | गिरी | गिरी, गिरओ, गिरउ, गिरिणो |
| **द्वि.** | गिरिं | गिरी, गिरिणो |
| **तृ.** | गिरिणा | गिरीहि-हिं-हिँ |
| **पं.** | गिरिणो, गिरित्तो, गिरीओ | गिरित्तो, गिरीओ, गिरीउ |
| | गिरीउ, गिरीहिंतो | गिरीहिंतो, गिरीसुंतो |
| **ष.** | गिरिणो, गिरिस्स | गिरीण-णं |
| **स.** | गिरिंमि | गिरीसु-सुं |
| **सं.** | गिरि, गिरी | गिरिणो, गिरओ, गिरउ, गिरी |

**५) ह्रस्व इकारान्त स्त्रीलिंगी बुद्धि**

| | | |
|---|---|---|
| **प्र.** | बुद्धि | बुद्धि, बुद्धिओ, बुद्धिउ |
| **द्वि.** | बुद्धिं | बुद्धि, बुद्धिओ, बुद्धिउ |
| **तृ.** | बुद्धीअ-आ-इ-ए | बुद्धीहि-हिं-हिँ |
| **पं.** | बुद्धीअ-आ-इ-ए-ओ-उ | बुद्धित्तो, बुद्धीओ, बुद्धीउ |
| | बुद्धित्तो, बुध्दिहिंतो | बुद्धिहिंतो, बुद्धीसुंतो |
| **ष.** | बुद्धीअ-आ-इ-ए | बुद्धिण-णं |
| **स.** | बुद्धीअ-आ-इ-ए | बुद्धीसु-सुं |
| **सं.** | बुद्धि, बुद्धी | बुद्धि, बुद्धिओ, बुद्धीउ |

**६) ह्रस्व इकारान्त नपुं. दहि**

| | | |
|---|---|---|
| **प्र. द्वि.** | दहिं | दहीणि, दहीइं, दहीइँ |

| | | |
|---|---|---|
| **सं.** | दहि | दहीणि, दहीइं, दहीइँ |

बाकी रूपे 'गिरि' प्रमाणे

**७) ह्रस्व उकारान्त पुल्लिंगी तरू**

| | | |
|---|---|---|
| **प्र.** | तरू | तरू, तरवो, तरओ, तरउ, तरुणो |
| **व्दि** | तरुं | तरूं, तरूणो |
| **तृ.** | तरूणा | तरूहि-हिं-हिँ |
| **पं.** | तरुणो, तरुत्तो<br>तरूओ, तरूउ,<br>तरूहिंतो | तरुत्तो, तरूओ, तरूउ<br>तरूहिंतो, तरूसुंतो |
| **ष.** | तरुणो, तरुस्स | तरूण-णं |
| **स.** | तरुंमि | तरूसु-सुं |
| सं. | तरु, तरू | तरु, तरुणो, तरवो, तरउ, तरओ |

८) ह्रस्व उकारान्त नपुं. महु दहि प्रमाणे

९) ह्रस्व व दीर्घ ऊकारान्त आणि दीर्घ ईकारान्त स्त्रीलिंगी नामे-धेणु, वहू, सही-हे 'बुद्धि' प्रमाणे

१०) संस्कृतमधील ऋकारान्त शब्द :

प्रथमा, द्वितीया व संबोधन ए. व. सोडून इतर विभक्तीत ऋकारान्त पुल्लिंगी नामांच्या व विशेषणांच्या अन्त्य ऋ चा विकल्पाने उ होतो. नामांच्या अन्त्य ऋ चा अर होतो. तर विशेषणांच्या अन्त्य ऋ चा आर होतो. नामे व विशेषणे यांचे सं. ए. व. 'अ' ने अन्त पावते, नामांचे सं. ए. व. 'अरं' ने अंत पावते. - अर-आर यांनी अन्त पावणारी अंगे अकारान्त पुल्लिंगी नामाप्रमाणे चालतात.

अ) **पिउ, पिअर (पितृ)**

| | | |
|---|---|---|
| **प्र.** | पिआ, पिअरो | पिअरा, पिउणो, पिअवो, पिअओ, पिअउ, पिऊ |
| **द्वि.** | पिअरं | पिअरे, पिअरा, पिउणो, पिऊ |
| **तृ.** | पिअरेण-णं, पिउणा | पिअरेहि-हिं-हिँ, पिऊहि-हिं-हिँ |

..............................................

| | | |
|---|---|---|
| **सं.** | पिअ , पिअरं | (प्रथमेप्रमाणे) |
| | आ) | **दाउ, दायार (दातृ)** |
| **प्र.** | दाआ, दायारो | दायारा, दाउणो, दायवो, दायओ, दायउ, दाऊ |
| **द्वि.** | दायारं | दायारे, दायारा, दाउणो, दाऊ |
| **तृ.** | दायारे-णं दाणणा | दायारेहि-हिं-हिँ, दाऊहि-हिं-हिँ |
| सं. | दाय, दायार | (प्रथमेप्रमाणे) |

इ) मातृ शब्दाची माआ (आई), माअरा (देवी) तसेच माइ व माउ अशी अंगे होतात.

माआ, माअरा ही अंगे 'माला' प्रमाणे चालतात. 'माइ' हे अंग 'बुद्धि' प्रमाणे व माउ हे 'धेणु' प्रमाणे चालते.

**११) राअ (राजन्)**

| | | |
|---|---|---|
| **प्र.** | राया | राया, रायाणो, राइणो |
| **द्वि.** | रायं, राइणं | राए, राया, रायाणो, राइणो |
| **तृ.** | राइणा, रण्णा, | |
| | राएण-णं | राएहि-हिं-हिँ, राईहि-हिं-हिँ |
| **पं.** | रण्णो, राइणो, | |
| | रायत्तो इ. | रायत्तो, इ., राइत्तो इ. |
| **ष.** | रण्णो, राइणो, | |
| | रायस्स | राईण-णं, रायाण-णं |
| **स.** | राए, रायंमि, राइंमि | राईसु-सुं., राएसु-सुं. |
| **सं.** | राय, राया | (प्रथमे प्रमाणे) |

**१२) आत्मन्** : अप्प हे अंग 'राअ' प्रमाणे चालते व अप्पाण हे अंग अकारान्त पुल्लिंगी नामाप्रमाणे चालते.

तृ. ए. व. त अप्पणिआ, अप्पणइआ अशी अधिक रूपे आहेत.

***

प्रकरण ११

# सर्वनामरूपविचार

### १८५ प्रास्ताविक

नामाप्रमाणेच अर्धमागधीतील सर्व सर्वनामे ही स्वरान्तच आहेत. अर्धमागधीतील मुख्य[1] सर्वनामे पुढीलप्रमाणे आहेत.

**(अ)** पुरुषवाचक :

(१) प्रथम पुरुषवाचक : अम्ह (अस्मद्), मी, आम्ही

(२) द्वितीय पुरुषवाचक : तुम्ह (युष्मद्), तू, तुम्ही

(३) तृतीय पुरुषवाचक : त (तद्), तो-ती-ते, ते-त्या-ती.

**(आ)** दर्शक[2] :

(१) एय (एतद्) हा, ही, हे (२) इम (इदम्) हा, ही, हे

(३) त (तद्) तो, ती, ते

**(इ)** प्रश्नार्थक : क (किम्) कोण ?

**(ई)** संबंधी : ज (यद्) जो, जी, जे

सर्वनामे आपापल्या लिंगानुसार संबोधन सोडून सहा विभक्तीत चालतात :- (१) प्रथमपुरुषी व द्वितीयपुरुषी अम्ह व तुम्ह यांची तीनही लिंगात समान रूपे

---

१ *पुढील काही सर्वनामांचाही अर्धमागधीत थोडा फार उपयोग होतो. अन्न (अन्य), अवर (अपर), पर, कयर (कतर), कयम (कतम), सव्व (सर्व), एग वा एक्क (एक), स, सग (स्व, स्वक), इयर (इतर), पुव्व (पूर्व), भवंत (भवत्), अन्नयर (अन्यतर), एगयर इ.*

२ *अमु (अदस्) या दर्शक सर्वनामाचा अर्धमागधीतील उपयोग नाही म्हणण्या इतका तुरळक आहे. तथापि, तत्साधित 'अमुग' याची काही रूपे आढळतात.*

असतात. (२) एग, एक्क हे सर्वनामासारखे असता ते फक्त अनेकवचनात चालते. (३) इतर सर्वनामाची आपापल्या लिंगानुसार सहा विभक्ती व दोन वचने यात रूपे होतात.[३]

सर्वनामांच्या रूपविचारात फक्त पुढील अम्ह, तुम्ह, एय, इम, त, ज, क या सात सर्वनामांच्या रूपांचा विचार करावयाचा आहे.[४]

### १८६ प्रथमपुरुषी 'अम्ह' हे सर्वनाम

| **विभक्ती** | **ए.व.** | **अ.व.** |
|---|---|---|
| **प्र.** | अहं, हं, अहयं | अम्हे, वयं |
| **द्वि.** | ममं, मं, मे | अम्हे, णे |
| **तृ.** | मइ, मए, मे, मया | अम्हेहि, अम्हेहिं |
| **पं.** | ममाओ, ममत्तो, मत्तो ममाहिंतो | अम्हेहिंतो |
| **ष.** | मम, ममं, मह, महं मज्झ, मज्झं, मे | अम्ह, अम्हं, अम्हाण, अम्हाणं, णो |
| **स.** | ममंमि, ममंसि, मइ | अम्हेसु, अम्हेसुं |

### १८७ द्वितीय[१]पुरुषी 'तुम्ह' हे सर्वनाम

| **विभक्ती** | **ए.व.** | **अ.व.** |
|---|---|---|
| **प्र.** | तुमं, तं, तुमे, तुवं | तुम्हे, तुज्झे, तुब्भे |

---

३ *अम्ह व तुम्ह सोडून इतर सर्वनामांच्या रूपविचारात एकरूपतेसाठी ठराविक प्रकारची रूपे देऊन, ज्यांची ज्यांची काही विशिष्ट रूपे होतात ती अधिक रुपे या शीर्षकाखाली दिली आहेत.*

४ *अन्न, अवर, पर, कयर, कयम, सव्व, स, सग इत्यादी 'क' प्रमाणे चालतात. भवंत हे 'भगवंत' प्रमाणे चालते.*

१ *(अ) प्रथमपुरुषी व द्वितीयपुरुषी अम्ह व तुम्ह या सर्वनामांच्या बाबतीत प्राकृतवैयाकरण प्रत्येक विभक्तीत अनेक रूपे देतात. पहा हेम. ३.९०–११६; प्रा. प्र. ६.२६–५३; मार्कं ५.८१–११२ इत्यादी प्राय: वाङ्मयात आढळणारी रूपे वर दिली आहेत.*
*(आ) म :– हं (कार), आम्ही; म्या, मम, माझा; इ. तू, तुम्ही; तुझा इ.*

| | | |
|---|---|---|
| **द्वि** | तुमं, ते | तुम्हे, तुज्झे, तुब्भे, वो, भे |
| **तृ** | तए, तुमए, तुमे, ते | तुम्हेहिं, तुज्झेहिं, तुब्भेहिं, भे |
| **पं.** | तुमाओ, तुमत्तो, तत्तो तुमाहिंतो | तुम्हेहिंतो, (तुज्झेहिंतो), तुब्भेहिंतो |
| **ष.** | तुज्झ, तुज्झं, तुह, तुहं तुब्भ, तुम्ह, तव, ते | तुम्ह, तुम्हं, तुम्हाण, तुम्हाणं तुज्झं, तुब्भं, वो, भे |
| **स.** | तुमम्मि, तुमंसि, तइ | तुम्हेसु, तुम्हेसुं, (तुज्झेसु), तुज्झेसुं, तुब्भेसु, तुब्भेसुं |

**१८८ 'त' हे सर्वनाम : पुल्लिंगी**

| **विभक्ती** | **ए.व.** | **अ.व.** |
|---|---|---|
| **प्र.** | सो, से | ते |
| **द्वि.** | तं | ते |
| **तृ.** | तेण, तेणं | तेहिं |
| **पं.** | ताओ | तेहिंतो |
| **ष.** | तस्स | तेसिं |
| **स.** | तंमि, तंसि | तेसुं |

**१८९ पु. 'त' ची अधिक रूपे**

**(१) प्र.ए.व. :** स
**(२) तृ.ए.व. :** णेण, णेणं
**(२) तृ.अ.व. :** तेहि
**(४) पं.ए.व. :** तम्हा
**(५) पं.अ.व. :** तेब्भो, तओहिंतो
**(६) ष.ए.व. :** से
**(७) ष.अ.व. :** ताण, (ताणं)
**(८) स.अ.व. :** तेसु

**१९० 'त' हे सर्वनाम : नपुंसकलिंगी**

| **विभक्ती** | **ए.व.** | **अ.व.** |
|---|---|---|
| **प्र.** | तं | ताइं, ताणि |
| **द्वि** | तं | ताइं, ताणि |

टीप : तृतीया ते सप्तमीपर्यंतची रूपे पुल्लिंगी 'त' प्रमाणे.

**१९१ 'त' हे सर्वनाम : स्त्रीलिंगी**

| विभक्ती | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्र. | सा | ताओ |
| द्वि. | तं | ताओ |
| तृ. | ताए | ताहिं |
| पं. | ताओ | ताहिंतो |
| ष. | ताए | तासिं |
| स. | ताए | तासुं |

**१९२ स्त्रीलिंगी 'त' ची अधिक रूपे**

**(१) तृ.ए.व. :** तीए **(२) तृ.अ.व. :** ताहि

**(३) ष.ए.व. :** तीए, तीसे **(४) ष.अ.व. :** तासि, ताण, ताणं

**(५) स.ए.व. :** तीए, तीसे **(५) स.अ.व. :** तासु

**१९३ 'एय' हे सर्वनाम : पुल्लिंगी**

| विभक्ती | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्र. | एसो, एसे | एए |
| द्वि. | एयं | एए |
| तृ. | एएण, एएणं | एएहिं |
| प. | एयाओ | एएहिंतो |
| ष. | एयस्स | एएसिं |
| स. | एयंम्मि, एयंसि | एएसुं |

**१९४ पुल्लिंगी 'एय' ची अधिक रूपे**

**(१) प्र.ए.व. :** एस **(२) तृ.ए.व. :** एइणा

**(३) तृ.अ.व. :** एएहि **(४) ष.अ.व. :** एएसि, एयाणं

**(५) स.अ.व. :** एएसु

### १९५ 'एय' सर्वनाम : नपुंसकलिंगी

| **विभक्ती** | **ए.व.** | **अ.व.** |
|---|---|---|
| **प्र.** | एयं | एयाइं, एयाणि |
| **द्वि.** | एयं | एयाइं, एयाणि |

टीप : तृतीया ते सप्तमी पर्यंतची सर्व रूपे पुल्लिंगी 'एय' प्रमाणे.

### १९६ 'एय' सर्वनाम : स्त्रीलिंगी

| **विभक्ती** | **ए.व.** | **अ.व.** |
|---|---|---|
| **प्र.** | एसा | एयाओ |
| **द्वि.** | एयं | एयाओ |
| **तृ.** | एयाए | एयाहिं |
| **पं.** | एयाओ | एयाहिंतो |
| **ष.** | एयाए | एयासिं |
| **स.** | एयाए | एयासु |

### १९७ स्त्रीलिंगी 'एय' ची अधिक रूपे

**(१) प्र.ए.व. :** एया **(२) ष.अ.व. :** एयाणं

**(३) स.ए.व. :** एईए **(४) स.अ.व. :** एयासु

### १९८ 'इम' हे सर्वनाम : पुल्लिंगी

| **विभक्ती** | **ए.व.** | **अ.व.** |
|---|---|---|
| **प्र.** | इमो, इमे | इमे |
| **द्वि.** | इमं | इमे |
| **तृ.** | इमेण, इमेणं | इमेहिं |
| **पं.** | इमाओ | इमेहिंतो |
| **ष.** | इमस्स | इमेसिं |
| **स.** | इमंमि, इमंसि | इमेसुं |

**१९९ पुल्लिंगी 'इम' ची अधिक रूपे**

(१) **प्र.ए.व. :**[१] अयं, इणमो (२) **द्वि.ए.व. :** इणं, णं

(३) **तृ.ए.व. :** अणेण, अणेणं, णेण, णेणं, इमिणा

(४) **तृ.अ.व. :** एहिं, णेहिं

(५) **ष.ए.व. :** अस्स, से (६) **ष.अ.व. :** एसिं

(७) **स.ए.व. :** अस्सिं (८) **स.अ.व. :** एसु, इमेसु

**२०० 'इम' हे सर्वनाम : नपुंसकलिंगी**

| **विभक्ती** | **ए.व.** | **अ.व.** |
|---|---|---|
| **प्र.** | इमं | इमाइं, इमाणि |
| **द्वि** | इमं | इमाइं, इमाणि |

टीप : तृतीया ते सप्तमीमीपर्यंतची सर्व रूपे पुल्लिंगी 'इम' प्रमाणे.

**२०१ नपुं. 'इम' ची अधिक रूपे**

**प्र. व द्वि. ए. व. :** इदं, इणं, इणमो

**२०२ 'इम' सर्वनाम : स्त्रीलिंगी**

| **विभक्ती** | **ए.व.** | **अ.व.** |
|---|---|---|
| **प्र.** | इमा | इमाओ |
| **द्वि.** | इमं | इमाओ |
| **तृ.** | इमाए | इमाहिं |
| **पं.** | इमाओ | इमाहिंतो |
| **ष.** | इमाए | इमासिं |
| **स.** | इमाए | इमासुं |

---

१ *कधी कधी सर्व लिंगात प्र.ए.व.त 'अयं' हे रूप वापरले जाते.*

**२०३ स्त्रीलिंगी 'इम'ची अधिक रूपे**

**(१) प्र.ए.व. :** इयं **(२) द्वि.अ.व. :** इमीओ

**(३) तृ.ए.व. :** इमीए, णाए **(४) तृ.अ.व. :** आहि, णाहिं

**(५) ष.ए.व. :** इमीए, इमीसे, से **(६) स.ए.व. :** इमीए, इमीसे

**२०४ 'ज' हे सर्वनाम : पुल्लिंगी**

| **विभक्ती** | **ए.व.** | **अ.व.** |
|---|---|---|
| **प्र.** | जो, जे | जे |
| **द्वि.** | जं | जे |
| **तृ.** | जेण, जेणं | जेहिं |
| **पं.** | जाओ | जेहिंतो |
| **ष.** | जस्स | जेसिं |
| **स.** | जम्मि, जंसि | जेसुं |

**२०५ पुल्लिंगी 'ज' ची अधिक रूपे**

**(१) पं.ए.व. :** जम्हा **(२) ष.अ.व. :** जेसि, जाण, जाणं

**(३) स.ए.व. :** जस्सिं

**२०६ 'ज' हे सर्वनाम : नपुंसकलिंगी**

| **विभक्ती** | **ए.व.** | **अ.व.** |
|---|---|---|
| **प्र.** | जं | जाइं, जाणि |
| **द्वि.** | जं | जाइं, जाणि |

टीप : तृतीया ते सप्तमीपर्यंतची सर्व रूपे पुल्लिंगी 'ज' प्रमाणे.

**२०७ 'ज' हे सर्वनाम : स्त्रीलिंगी**

| **विभक्ती** | **ए.व.** | **अ.व.** |
|---|---|---|
| **प्र.** | जा | जाओ |
| **द्वि.** | जं | जाओ |

| | | |
|---|---|---|
| **तृ.** | जाए | जाहिं |
| **पं.** | जाओ | जाहिंतो |
| **ष.** | जाए | जासिं |
| **स.** | जाए | जासुं |

**२०८ स्त्रीलिंगी ‘ज’ ची अधिक रूपे**

**(१) तृ.ए.व. :** जीए **(२) ष.ए.व. :** जीसे

**(३) ष.अ.व. :** जासि, जाण, जाणं **(४) स.ए.व. :** जीसे

**२०९ ‘क’ हे सर्वनाम : पुल्लिंगी**

| **विभक्ती** | **ए.व.** | **अ.व.** |
|---|---|---|
| **प्र.** | को, के | के |
| **द्वि.** | कं | के |
| **तृ.** | केण, केणं | केहिं |
| **पं.** | काओ | केहिंतो |
| **ष.** | कस्स | केसिं |
| **स.** | कम्मि, कंसि | केसुं |

**२१० पुल्लिंगी ‘क’ ची अधिक रूपे**

**(१) पं.ए.व. :** कम्हा **(२) स.ए.व. :** कम्हि, कस्सिं

**२११ ‘क’ सर्वनाम : नपुंसकलिंगी**[1]

| **विभक्ती** | **ए.व.** | **अ.व.** |
|---|---|---|
| **प्र.** | किं | काइं, काणि |
| **द्वि.** | किं | काइं, काणि |

टीप : तृतीया ते सप्तमीपर्यंतची सर्व रूपे पुल्लिंगी ‘क’ प्रमाणे.

**२१२ 'क' सर्वनाम : स्त्रीलिंगी**

| **विभक्ती** | **ए.व.** | **अ.व.** |
|---|---|---|
| **प्र.** | का | काओ |
| **द्वि.** | कं | काओ |
| **तृ.** | काए | काहिं |
| **पं.** | काओ | काहिंतो |
| **ष** | काए | कासिं |
| **स.** | काए | कासुं |

**२१३ स्त्रीलिंगी 'क' ची अधिक रूपे**

**(१) ष.ए.व. :** कीसे **(२) स.ए.व. :** कीसे

**२१४ इतर काही सर्वनामांची रूपे**

**(१)** अदस्[२] ची पुढे दिलेली अगदी थोडी रूपे वापरात आढळतात :

**(अ) (१) प्र.ए.व. :** असो **(आ) तृ.ए.व. :** अमुणा

**(२) प्र.अ.व. :** अमी[३]

**(२)** 'एग' ची रूपे अशी : एगे (प्र.), एगे (द्वि.), एगेहिं (तृ.) एगेहिंतो (पं.), एगेसिं (ष.), एगेसुं (स.)

---

**तळटीपा**

*१) 'क' या सर्वनामाच्या नपुं प्रथमा आणि द्वितीया यांच्या एकवचनात 'कं' असे रूप डॉ. वैद्य (पृ. ४३) व प्रा. गांधी (पृ. ६५) यांनी दिले आहे.*

*२) अमु (अदस्) पुढे 'ग' (क) प्रत्यय येऊन झालेली काही रूपे आढळतात.*

***(१) प्र.ए.व. :** अमुगो, अमुगे*

***(२) स.ए.व. :** अमुगंसि*

*३) कुम्मा. १६५*

# पुरवणी
## माहाराष्ट्रीतील सर्वनामरूपविचार[१]

माहाराष्ट्रीतील अकारान्त सर्वनामे ही पुल्लिंगात 'देव' व नपुं. त 'वण' प्रमाणे चालतात.

पुल्लिंगी सर्वनामाच्या रूपात जे भेद आहेत ते असे :

१) प.ए.व.त फक्त ओकारान्त रूप. उदा. सव्वो.

२) प्र.अ.व.त एकारान्त रूप. उदा. सव्वे.

३) ष.अ.व.त सिं हा प्रत्यय अधिक लागतो. उदा. सव्वाण-णं, सव्वेसिं

४) स.ए.व.त ए हा प्रत्यय लागत नाही; म्मि या प्रत्ययाशिवाय त्थ, स्सिं, हिं हे प्रत्यय अधिक लागतात. उदा. सव्वम्मि, सव्वत्थ, सव्वस्सिं, सव्वहिं.

**पुढे पु. 'सव्व'ची सर्व रूपे दिली आहेत :**

| | | |
|---|---|---|
| **प्र.** | सव्वो | सव्वे |
| **द्वि.** | सव्वं | सव्वे, सव्वा |
| **तृ.** | सव्वेण-णं | सव्वेहि-हिं-हिँ |
| **पं.** | सव्वत्तो, सव्वाउ, सव्वाओ सव्वाहि, सव्वा, सव्वाहिंतो | सव्वत्तो, सव्वाउ, सव्वाओ, सव्वाहि, सव्वेहि, सव्वाहिंतो, सव्वासुंतो, सव्वेसुंतो |
| **ष.** | सव्वस्स | सव्वेसिं, सव्वाण-णं |
| **स.** | सव्वंमि, सव्वत्थ सव्वस्सिं, सव्वहिं | सव्वेसु-सुं |

**इतर सर्वनमाांची विशेषरूपे पुढे दिली आहेत :**

**त (पु.)**

| | | |
|---|---|---|
| **प्र.** | स, सो | ते |

१ *पं. बेचरदासकृत प्राकृतव्याकरण पहा.*

| | | |
|---|---|---|
| **तृ.** | तेण-णं, तिणा | |
| **पं.** | तो, तम्हा, तत्तो, ताओ,<br>ताउ, ताहि, ताहिंतो, ता | |
| **ष.** | तस्स, तास, से | ताणं-णं, तास, तेसिं, सिं |
| **स.** | ताहे, ताला, तइआ,<br>तम्मि, तस्सिं, तहिं, तत्थ | तेसु-सुं |

खेरीज प्र.ए.व. सोडून इतर विभक्तीत 'ण' या अंगापासूनची रूपेही असतात. उदा. णेण-णं, णेहि-हिं-हिँ इ.

### ज (पु.)

| | | |
|---|---|---|
| **तृ.** | जेण-णं, जिणा | |
| **पं.** | जम्हा, जत्तो, जाओ, जाउ,<br>जाहि, जाहिंतो, जा | |
| **ष.** | जस्स, जास | जेसिं, जाण-णं |
| **स.** | जम्मि, जस्सिं, जहिं, जत्थ,<br>जाहे, जाला, जइआ | जेसु-सुं |

### क (किम्) (पु.)

| | | |
|---|---|---|
| **तृ.** | केण-णं, किणा | |
| **पं.** | कम्हा, किणो, कीस, कत्तो,<br>काओ, काउ, काहि, का, काहिंतो | |
| **ष.** | कस्स, कास | कास, केसिं, काण-णं |
| **स.** | कंमि, कस्सिं, कहिं, कत्थ<br>काहे, काला, कइआ | केसु-सुं |

### इम (इदम्) (पु.)

| | | |
|---|---|---|
| **प्र.** | अयं, इमो | |
| **द्वि.** | इमं, इणं, णं | इमे, इमा, णे, णा |

| | | |
|---|---|---|
| **तृ.** | इमेण-णं, इमिणा, णेण-णं | इमेहि-हिं-हिँ, णेहि-हिं-हिँ, (एहि-हिं-हिँ) |
| **ष.** | इमस्स, अस्स, से | सिं, इमेसिं, इमाण-णं |
| **स.** | इमम्मि, इमस्सिं, अस्सिं, इह | इमेसु - सुं, (एसु-सुं) |

**एय (एतद्) (पु.)**

| | | |
|---|---|---|
| **प्र.** | एस, एसो, इणं, इणमो | |
| **तृ.** | एएण-णं, एइणा | |
| **पं.** | एत्तो, एत्ताहे, एअत्तो<br>एआउ, एआओ, एआहि,<br>एआ, एआहिंतो | |
| **ष.** | एअस्स, से | सिं, एएसिं, एआण-णं |
| **स.** | एअम्मि, एअस्सिं, एत्थ,<br>अयम्मि, ईअम्मि | एएसु-सुं |

**नपुंसकलिंगी**

| | | |
|---|---|---|
| **प्र., द्वि.** | सव्वं | सव्वाणि, सव्वाइं-इँ |
| **प्र. द्वि.** | तं,णं | ताणि, ताइं-इँ |
| **प्र; द्वि.** | जं | जाणि, जाइं-इँ |
| **प्र. द्वि.** | किं | काणि, काइं - इँ |
| **प्र., द्वि.** | इदं, इणमो, इणं | इमाणि, इमाइं-इँ |
| **प्र.** | (एस), एअं, इणं, इणमो | एआणि, एआइं-इँ |
| **द्वि.** | एअं | एआणि, एआइं-इँ |

बाकी रूपे त्या त्या पुल्लिंगी सर्वनामाप्रमाणे

वरील सर्वनामाची स्त्रीलिंगी अंगे आकारान्त व ईकारान्त होतात व ती आकारान्त व ईकारान्त स्त्रीलिंगी नामाप्रमाणे[१] चालतात.

---

१ *प्र.ए.व., द्वि.ए.व. आणि ष.अ.व. येथे ईकारान्त अंगांची रूपे असत नाहीत.*

**ता, ती, (णा, णी)**

**प्र.** सा

**द्वि.** तं, णं

**ष.** से, तिस्सा, तीसे सिं, ताण-णं

ताअ-इ-ए, तीअ-आ-इ-ए

**जा, जी**

**प्र.** जा

ष. जिस्सा, जीसे, जाअ-इ-ए, जाण-णं

जीअ-आ-इ-ए

**का, की**

**प्र.** का

**ष.** किस्सा, कीसे, काअ -इ-ए, काण-णं

कीअ-आ-इ-ए

**इमा, इमी**

**प्र.** इमा, इमी, इमिआ

**ष.** से, इमाअ - इ-ए सिं, इमाण - णं, इमीण-णं

इमीअ-आ-इ-ए

**एआ, एई**

**प्र.** एसा, (एस, इणं, इणमो)

**ष.** से, एआ अ-इ-ए, सिं, एआण-णं, एईण-णं

एईअ-आ-इ-ए

बाकी रूपे माला व महीप्रमाणे होतात.

**अमु (अदस्)**

अदस् चे तिन्ही लिंगात 'अमु' असे अंग होते व ते तीनही लिंगात उकारान्त नामाप्रमाणे चालते. खेरीज,

सर्व लिंगात प्र.ए.व.त अह

व पुल्लिंगी स.ए.व.त : अयम्मि, इयांम्मि, अमुम्मि

प्रकरण १२

# विशेषणरूपविचार

## २१५ प्रास्ताविक

नाम, सर्वनाम याप्रमाणे अर्धमागधीतील सर्व विशेषणेही स्वरान्तच आहेत.

विशेषणे ही मुख्यत: दोन प्रकारची[१] – गुणवाचक व संख्यावाचक आहेत.

यापैकी गुणविशेषणांचा रूपविचार स्वतंत्रपणे करण्याची जरुरी नाही. कारण ती आपापल्या अन्त्य स्वरानुसार त्या त्या स्वरान्त पुल्लिंगी व नपुंसकलिंगी नामाप्रमाणे चालतात. उदा. सेय (श्वेत), रत्त (रक्त), सुरहि (सुरभि), दुरभि, उज्जु (ऋजु), बहु, साउ (स्वादु) इ. स्त्रीलिंगात ही विशेषणे आ[२], इ, ई, उ, ऊ – कारान्त स्त्रीलिंगी नामाप्रमाणे चालतात.

म्हणून विशेषणरूपविचारात फक्त संख्यावाचक[३] विशेषणांचाच विचार[४]

---

१ *अर्धमागधीतील सर्व धातुसाधित विशेषणे ही अकारान्त आहेत. ती अकारान्त पुल्लिंगी व नपुं. नामाप्रमाणे चालतात. त्यांची स्त्रीलिंगी रूपे अन्ती आ वा ई जोडून होतात, मग ती अंगे आकारान्त व ईकारान्त स्त्रीलिंगी नामाप्रमाणे चालतात.*

२ *अकारान्त गुणविशेषणे, स्त्रीलिंगात आकारान्त अथवा ईकारान्त होतात. 'स्त्रीलिंगरूपसिद्धि', परिच्छेद २८६ पहा.*

३ *कइ (कति) व कइवय (कतिपय) ही अनिश्चित संख्यावाचके आहेत.*

४ *संख्यावाचकापासून जी क्रमवाचक इत्यादी साधित विशेषणे सिद्ध होतात तीही अकारान्तच असतात. त्यांची स्त्रीलिंगी रूपे आकारान्त वा ईकारान्त होतात. मग ती आपापल्या अन्त्यस्वरानुसार त्या त्या स्वरांत नामाप्रमाणे चालतात.*

करावयाचा आहे. त्यासाठी अर्धमागधीत कोणती संख्यावाचक विशेषणे आहेत, हे प्रथम पाहिले पाहिजे.

## २१६ अर्धमागधीतील संख्यावाचक विशेषणे

एक ते शंभर पर्यंतची संख्याविशेषणे[५] पुढीलप्रमाणे :

(१) एग, एक्क (२) दो (३) ति (४) चउ (५) पंच (६) छ (७) सत्त (८) अट्ठ (९) नव (१०) दस, दह (११) एक्कारस, इक्कारस, एगारस, एयारस, एयारह (१२) दुवालस, बारस (१३) तेरस (१४) चउदस, चउद्दस, चोद्दस (१५) पन्नरस (पण्णरस), पंचरह (१६) सोलस (१७) सत्तरस (१८) अट्ठारस (१९) एगूणवीस, अउणवीस, अउणवीसइ (२०) वीस, वीसइ (२१) एक्कवीस, एक्कवीसइ, एगवीस, इगविस, एगवीसा (२२) बावीस (२३) तेवीस (२४) चउवीस, चउव्वीस (२५) पणवीस, पणुवीस, पणवीसइ (२६) छव्वीस (२७) सत्तवीस, सत्तावीस, सत्तावीसइ (२८) अट्ठावीस (२९) अउणतीस, अउणत्तीस (३०) तीस (३१) एक्कतीस, एगतीस (३२) बत्तीस (३३) तेत्तीस, तित्तीस, तायत्तीसा, तावत्तीसा (३४) चोत्तीस (३५) पणतीस (३६) छत्तीस (३७) सत्ततीस (३८) अट्ठतीस, अट्ठत्तीस (३९) एकूणचत्तालीस (४०) चत्तालीस, चायालिस, चालीस (४१) एक्कचत्तालीस, एगचत्तालीस, इगयाल (४२) बायालीस, बायाल (४३) तेयालीस (४४) चउयालीस, चोयालीस, (४५) पणयालीस, पणयाल, (४६) छायालीस (४७) सत्तचत्तालीस, सत्तचालीस, सत्तयालीस, साचालीस, सीयालीस (४८) अट्ठचत्तालीस, अढयालीस, अढयाल (४९) एक्कूणपण्ण, एगूणपन्न, एगूणपन्नास, अउणापन्न (५०) पन्नास (५१) एक्कावन्न, एगावन्न (एगावण्ण) (५२) बावन्न (बावण्ण) (५३) तेवन्न (तेवण्ण) (५४) चउवन्न (चउवण्ण) (५५) पणपन्न, पणवन्न (पणवण्ण) (५६) छव्वन्न, छप्पन्न (छप्पण्ण) (५७) सत्तावन्न (सत्तावण्ण) (५८) अट्ठावन्न (अट्ठावण्ण) (५९) एगूणसट्ठि, अउणट्ठि (६०) सट्ठि (६१) एगसट्ठि, इगसट्ठि, एगट्ठि (६२) बासट्ठि, बावट्ठि (६३) तेसट्ठि, तेवट्ठि (६४) चउवट्ठि, चउसट्ठि, चोसट्ठि (६५) पणसट्ठि, पन्नट्ठि (६६) छावट्ठि (६७) सत्तसट्ठि

५ *यातील पुष्कळशी थोड्याफार फरकाने मराठीतल्या प्रमाणेच आहेत.*

(६८) अट्ठसट्ठि, अढसट्ठि (६९) एगूणसत्तरि, अउणत्तरि (७०) सत्तरि, सयरि (७१) एक्कसत्तरि, एगसत्तरि (७२) बावत्तरि, बिसत्तरि (७३) तेवत्तरी (७४) चउहत्तरि, चोवत्तरि (७५) पंचहत्तरि, पणसयरि, पन्नतरि (पण्णत्तरि) (७६) छावत्तरि (७७) सत्तहत्तरि (७८) अट्ठहत्तरि, अट्ठत्तरि (७९) एगूणासीइ (८०) असीइ (८१) एक्कासीइ, एगासीइ (८२) बासीइ (८३) तेसीइ, तेयासी (८४) चउरासीइ, चोरासी (८५) पंचासीइ (८६) छलसीइ (८७) सत्तासीइ (८८) अट्ठासीइ (८९) एगूणनउइ, एगूणणउइ (९०) नउइ (९१) एक्कणउइ, एक्काणउइ (९२) बाणउइ (९३) तेणइउ (९४) चउणउइ (९५) पंचणउइ, पंचाणउइ (९६) छन्नउइ (छण्णउइ), छन्नवइ (९७) सत्तणउइ, सत्ताणउइ (९८) अट्ठाणउइ (९९) नउणउइ, नवणउइ (१००) सय.

### २१७ एक ते शंभर संख्यावाचके : रूपविचार

(१) यातील काही संख्यावाचके फक्त एकवचनात तर काही फक्त अनेकवचनात चालतात. (२) काहींची तीन लिंगात भिन्नरूपे होतात, तर काहींची तीनही लिंगात रूपे समानच असतात.

एक ते शंभर या संख्यावाचकापैकी एग, दो, ति, चउ आणि पंच यांचा रूपविचार केला की काम होते.

### २१८ 'एग' ची रूपे

एग हे संख्यावाचक फक्त ए.व.त[१] चालते. तीन लिंगात त्याची भिन्न रूपे होतात. ही रूपे[२] पुढीलप्रमाणे.

| विभक्ती | पुल्लिंग | नपुं. | स्त्रीलिंग |
|---|---|---|---|
| प्र. | एगो, एगे | एगं | एगा |
| द्वि. | एगं | एगं | एगं |

१ *एग हे सर्वनामाप्रमाणे असता त्याची अ.व. रूपे होतात; अर्थ 'काही' असा असतो.*

२ *येथेही एकरूपतेसाठी काही रूपे देऊन, इतर रूपे 'अधिक रूपे' या शीर्षकाखाली दिली आहेत.*

| | | | |
|---|---|---|---|
| **तृ.** | एगेण, एगेणं | एगेण, एगेणं | एगाए |
| **पं.** | एगाओ | एगाओ | एगाओ |
| **ष.** | एगस्स | एगस्स | एगाए |
| **स.** | एगंम्मि, एगंसि | एगंमि, एगंसि | एगाए |

## २१८ दो, ति, चउ, पंच यांची रूपे

ही संख्यावाचके फक्त अ.व.त चालतात. तीनही लिंगात त्यांची रूपे समान आहेत. ही रूपे अशी :

| **(अ)** | **दो** | **(आ)** | **ति** |
|---|---|---|---|
| **प्र.** | दो, दुवे, दोन्नि (दोण्णि) | | तओ, (तिन्नि) तिण्णि |
| **द्वि.** | दो, दुवे, दोन्नि (दोण्णि) | | तओ, (तिन्नि) तिण्णि |
| **तृ.** | दोहिं | | तीहिं |
| **पं.** | दोहिंतो | | तीहिंतो |
| **ष.** | दोण्हं | | तिण्हं |
| **स.** | दोसु | | तीसु |

| **(इ)** | **चउ** | **(ई)** | **पंच** |
|---|---|---|---|
| **प्र.** | चत्तारो, चउरो, चत्तारि | | पंच |
| **द्वि.** | चत्तारो, चउरो, चत्तारि | | पंच |
| **तृ.** | चऊहिं | | पंचहिं |
| **पं.** | चऊहिंतो | | पंचहिंतो |
| ष. | चउण्हं | | पंचण्हं |
| **स.** | चऊसु | | पंचसु |

**(उ)** कइ (कति) : कइ, कइ, कइहिं, कइण्हं, कइसु

## २१९ अधिक रूपे

**(अ)** (१) प्र. दुन्नि (२) तृ. : दोहि (३) ष. : दोण्ह, दुण्ह

**(आ)** (१) तृ. : तिहिं (२) ष.[१] : तिण्ह (३) स. : तीसुं

**(इ)** (१) तृ.: चउहिं (२) पं. : चउहिंतो (३) ष.[२] : चउण्ह

(४) स. : चउसु, चऊसुं

**(ई)** (१) ष.[३] : पंचण्ह (२) स. : पंचसुं

**२२० सहा ते शंभर पर्यंतची संख्यावाचके : रूपविचार**

**(अ) सहा ते अठरा :**

सहा ते अठरा पर्यंतची संख्यावाचके 'पंच'प्रमाणे चालतात.

म्हणजेच ती फक्त अ. व. त चालतात आणि तीनही लिंगात रूपे समान असतात. उदा. : छ छ छहिं छण्हं छसु; सत्त, सत्त, सत्तहिं, सत्तण्हं, सत्तसु; अट्ठ, अट्ठ, अट्ठहिं, अट्ठण्हं, अट्ठसु; नव, नव, नवहिं, इ.; दस, दस, दसहिं, दसण्हं, दससु, इ.; बारसहिं, चोद्दसण्हं, पण्णरससु इत्यादी.

**(आ) १९ ते ४८ :**

१९ ते ४८ ही संख्याविशेषणे नेहमी एकवचनात चालतात (मग विशेष्याचे वचन कोणतेही असो). तसेच ही विशेषणे पुल्लिंगात व नपुं. त अकारान्त नामाप्रमाणे आणि स्त्रीलिंगात आकारान्त (वा इकारान्त) नामाप्रमाणे चालतात.

**(इ) ४९ ते ५८ :**

४९ ते ५८ ही संख्यावाचके नेहमी अनेकवचनात चालतात. त्यांची रूपे 'पंच'प्रमाणे होतात.[४]

**(ई) ५९ ते ९९ :**

५९ ते ९९ ही संख्यावाचके फक्त एकवचनात चालतात (मग विशेष्याचे वचन कोणतेही असो). ही विशेषणे, प्रथमेत व द्वितीयेत (इकारान्त) नपुं. नामाप्रमाणे चालतात व पुढील विभक्तीत (इकारान्त) स्त्रीलिंगी नामाप्रमाणे चालतात.

---

*१. गांधी, पृ. ६७* *२. गांधी, पृ. ६७* *३. गांधी, पृ. ६७*

४ *वैद्य. पृ. ४५; जैन, पृ. १९. तसेच प्रथमा व द्वितीया सोडून इतर विभक्तीत ४९–५८ ही विशेषणे कधी कधी स्त्रीलिंगी आकारान्त नामाप्रमाणे चालतात. (जैन. पृ. १९)*

**(उ) शंभर[१] :**

'सय' हे अकारान्त नामाप्रमाणे पुल्लिंगात वा नपुं. त आणि एकवचनात तसेच अनेकवचनात चालते.

**२२१ शंभराचे पुढील संख्यावाचके व त्यांची रूपे**

**(अ)** एक हजार (१०००) : सहस्स, साहस्सी
सहस्स हे अकारान्त नामाप्रमाणे पुल्लिंगात व नपुं. त चालते. साहस्सी हे स्त्रीलिंगात चालते.

**(आ)** दहा हजार (१०,०००) : अजुय (अयुत) : अकारान्त नामाप्रमाणे

**(इ)** एक[२] लक्ष : लक्ख : अकारान्त नामाप्रमाणे

**(ई)** कोटि : कोडि : स्त्रीलिंगात चालते.

**(उ)** कोडाकोडि (एकावर १४ पूज्ये)[३] : हा शब्द स्त्रीलिंगात चालतो.

**(ऊ)** पलिओवम : (एक वा शंभर योजने लांब, रुंद व खोल असलेली विहिर केसांनी इतकी गच्च भरावयाची की एखादी नदी जरी तिच्यावरुन वाहत गेली तरी विहिरीत पाण्याचा एकही थेंब शिरणार नाही. अशा विहिरीतून दर शंभर वर्षांनी एक केस काढून टाकत, सर्व विहिर केसरहित होण्यास जितका काळ लागेल, तितका काळ म्हणजे पलिओवम[४])
'पलिओवम' हे अकारान्त नामाप्रमाणे चालते.

(ए) सागरोवम : (१० कोडाकोडि x पलिओवम)
हेही अकारान्त नामाप्रमाणे चालते.

---

१ *सय ते सागरोवम पर्यंतची संख्यावाचके आपापल्या अन्त्य स्वरानुसार त्या त्या स्वरान्त नामाप्रमाणे, एकवचनात तसेच अनेकवचनातही चालतात. (वैद्य, पृ. ४५)*

२ *दस सया, दस सयाइं सुद्धा*

३ *सयसहस्स, समसाहस्सी सुद्धा*

४ *जैन, पृ. २०*

५ *वैद्य, पृ. ४५*

# पुरवणी १

शंभर ते हजार मधील पूर्ण शतक दाखविणाऱ्या संख्या, मोठ्या संख्या इत्यादी कशा सिद्ध करावयाच्या याची थोडी माहिती पुढे दिली आहे.

(१) शंभर ते हजार मधील पूर्ण शतक दाखविणाऱ्या संख्या :

**(अ)** 'सय' पूर्वी एग, दो, ति यांचा उपयोग करून :
दो सया, दो सयाइं (२००); तिण्णि सयाइं (३००); चत्तारि सयाइं (४००); पंच सया (५००); छ सया, छ सयाइं (६००); इत्यादी.

**(आ)** समासात उपयोग करून
पंचसयाइं तावसाणं (५०० तापस); छस्सया (६००); सिरासयाइं सत्त, नव ण्हारुसया (७०० नाड्या, ९०० स्नायु); अट्ठसयं खत्तियदारगाणं (८०० क्षत्रियदारक)

(२) शंभर ते हजारमधील इतर संख्या :
अट्ठसयं (१०८); सत्तरिसयं (१७०); चत्तारि चउव्वीसे जोयणसए (४२४ योजने); चत्तारि तीसे जोयणसए (४३० योजने); एगूणाइं पंच-माई-सयाइं (४९९ माता); पंचहिं छत्तीसेहिं अणगारसएहिं सद्धिं (५३६ अनगारासह); सत्त तेवीसे जोयणसए (७२३ योजने).

(३) हजार ते दहा हजार मधील पूर्ण सहस्रक दाखविणाऱ्या संख्या :

**(अ)** एक्कारस सया (११००); एक्कारस सयाइं (११००); बारस सया (१२००); इत्यादी.

**(आ)** 'सहस्स'च्या पूर्वी एग, दो इत्यादीचा उपयोग करून दो सहस्साइं, दुवे सहस्से (२०००); तिण्णि सहस्साइं, चत्तारि सहस्साइं, छ सहस्साइं.

(४) नवनउइ[१] सहस्साइं (९९,०००)

---

*१ पउम. ३-२३*

(५) मोठ्या संख्या सिद्ध करणे :

**(क)** **(अ)**[१] सहस्सं जोयणाणं (१००० योजने); अट्ठारस सहस्साइं फलाणं (१८००० फळे); पुत्ताणं सट्ठी सहस्सा (६०,००० पुत्र); 'चउसट्ठि सहस्साइं जुवईणं (६४ हजार तरुणी), बत्तीसं सहस्सा राईणं (३२ हजार राजे)[२]; वीससहस्साइं[३] महिलाण (२० हजार स्त्रिया); दोन्नि सयसहस्सा रहाणं ( २ लाख रथ), मत्त-वर-वारणाणं चउरासीइं सयसहस्साइं (८४ लाख उत्कृष्ट मदोन्मत्त हत्ती); दोन्नि लक्खा ममगलाणं (२ लाख हत्ती); अट्ठहिं लक्खेहिं वरिसाणं[४] (आठ लाख वर्षांनी); पंच अजुयाणि हयाणं (पाच अयुत घोडे); सत्त कोडीओ पयाइजणाणं (७ कोटी पायदळ); अट्ठारस कोडीओ तुरयाणं (१८ कोटी घोडे).

**(आ)** उत्तर शब्दाचा उपयोग करून :

दसुत्तरेण देवीसएण सहिओ[५] (११० राण्यासहित); कन्नाणं अट्ठुत्तरसहस्सं (१००८ कन्या); तिण्णि जोयणसहस्साइं दोण्णि य बत्तीसुत्तरे जोयणसए (३२३२ योजने); बावन्नुत्तरं-जोयणसय-सहस्सं (१ लाख ५२ योजने).

**(इ)** समासात ठेऊन :

एगतीस वाससयाइं (३१०० वर्षे), बत्तीसं वाससयाइं (३२०० वर्षे), चोत्तीसं वाससयाइं (३४०० वर्षे), पणतीसं वाससयाइं (३५०० वर्षे)[६]; चत्तालीसाए अज्जियासाहस्सीहिं (४४००० अज्जिकांनी), अट्ठचत्तालीसं समण साहस्सीओ (४८ हजार श्रमण),पणपन्नं अज्जियासाहसीओ (५५ हजार अज्जिका), चोद्दस समण साहस्सीओ (१४ हजार श्रमण); छत्तीसं अज्जियासाहस्सीओ (३६ हजार अज्जिया); अद्धुट्ठाओ कुमार कोडीओ (३।। कोटि राजपुत्रांना)

एगवीसं[७] वास-कोडि-कोडीओ.

**(ख)** अद्धुट्ठाइं पलिओवमाइं (३ $\frac{१}{२}$ पल्योपमे);

---

१. *विशेष्याची षष्ठी वापरुन*

२. *पउम. ४.५८* ३. *सुर. १५.२३१* ४. *सुर. १५.२१९*

५. *पाकमा पृ. ६८* ६. *विवागसुय पहा* ७. *सुर. ९.६७*

अड्ढाइज्जाइं पलिओवमाइं (२$\frac{१}{२}$ पल्योपमे); पलिओवमाणि[१] अट्ठ (आठ पल्योपमे)

**(ग)** तिण्णि सागरोवमाइं (३ सागरोपमे); सत्त सागरोवमाइं (७ सागरोपमे); अट्ठारस सागरोवमाइं (१८ सागरोपमे); तेत्तीसं सागरोवमाइं (३३ सागरोपमे).

---

# पुरवणी २

## साधित शब्दात, समासात व सामासिक संख्यावाचकात होणारे संख्यावाचकांचे विकार[१]

**(१) एक्क, एग :**

(१) एक्क° (२) एक्का° (३) एग° : (एगिंदिय एक + इन्द्रिय) (४) एगा° (५) इग° (६) एया° : (एयारस, ११)

**(२) दो :**

(१) दो° : (दोमासिय द्वि-मासिक, दोमुह द्विमुख) (२) दु° : (दुगुण द्विगुण, दुपय द्विपद, दुहा द्विधा) (३) दि° : (दिय द्विज) (४) दुवा° : (दुवालस, १२) (५) बा° : (बारस, १२) (६) बे° : (बेइंदिय, बेंदिय द्वि - इन्द्रिय).

**(३) ति :**

(१) ति° : (तिविह तिविध, तियस त्रिदश) (२) ते° : (तेइंदिय, तेंदिय त्रि-इन्द्रिय (३) ताय° : (तायत्तीसा, ३३) (४) ताव° : (तावत्तीसा, ३३)

**(४) चउ :**

(१) चउर्° : (चउरंस, चउरिंदिय) (२) चउर° : (चउरासीइ, ८४)

---

१ *सामासिक संख्यावाचकात होणाऱ्या विकारांची उदाहरणे एक ते शंभर या संख्यावाचकात येऊन गेलेली आहेतच. म्हणून येथे समास व साधित शब्द यातील उदाहरणे मुद्दाम दिली आहेत.*

(३) चउ⁰ : (समानीकरण, नसता) : (चउपय चतुष्पद)

चउ⁰ : (समानीकरण असता) : (चउप्पय, चउम्मुह, चउव्विह)

(४) चउरो⁰ : (चउरोपंचिंदिय चतुष्पञ्चेन्द्रिय)

(५) चाउ⁰ : (समानीकरण असता) : (चाउक्कोण, चाउग्घंट, चाउज्जाम)

(६) चाउर्⁰ : (चाउरंत, चाउरंगिणी) (७) चो⁰ : (चोयालीस, ४४)

(८) चोर⁰ : (चोरासीइ, ८४)

**(५) पंच :**

(१) पंच⁰ (२) पंचा⁰ (३) पण्ण⁰, पन्न⁰ (४) ⁰वण्ण, ⁰वन्न (५) पण⁰

(६) पणु⁰

**(६) छ :**

(१) छ⁰ : (समानीकरण नसता) : (छखंड)

छ⁰ : (समानीकरण असता) : (छप्पय, छत्तल, छम्मास)

(२) छड्⁰ : (छडक्खर) (३) छल्⁰ : (छलंस, छलाययण षडायतन)

(४) छा⁰ : (छायालीस, ४६) (५) सड्⁰ : (सडंगवि षडंगवित्)

**(७) सत्त :**

(१) सत्त⁰(२) सत्ता⁰

**(८) अट्ठ :**

(१) अट्ठ⁰ : (अट्ठविह) (२) अट्ठा⁰ : (अट्ठावय)

(३) अढ⁰ : (अढयाल, ४८)

**(९) दस :**

(१) ⁰दस : (चउद्दस, १४) (२) दह⁰ : (दहमुह)

(३) ⁰रस : (बारस, १२)

**(१०) छट्ठि :**

(१) ⁰सट्ठि (२) ⁰वट्ठि (३) ⁰अट्ठि

**(११) सत्तरि :**

(१) ⁰सत्तरि (२) ⁰अत्तरि (३) ⁰वत्तरि (४) ⁰हत्तरि.

## प्रकरण १३

# धातुरूपविचार

### २२३ संस्कृत व अर्धमागधी धातुरूपे : तौलनिक विचार

संस्कृतप्रमाणे अर्धमागधीतील धातुरूपविचार किचकट व गुंतागुंतीचा नाही. पुढील कारणांनी ही कठिणता कमी झाली आहे.

१) संस्कृतमधले धातु स्वरान्त तसेच व्यंजनान्त आहेत. अर्धमागधीतील सर्वच धातु स्वरान्त असल्याने व्यंजनान्त धातु चालविण्याचा त्रास नाही.

२) अर्धमागधीत द्विवचन नसल्याने धातूंची द्विवचनातील रूपे सिध्द करण्याचा प्रश्नच उरत नाही. अर्धमागधीतील धातु ए. व. आणि अ. व. या फक्त दोनच वचनात चालतात.

३) संस्कृतातल्याप्रमाणे धातूंचे गण, विकरणे इत्यादि सोपस्कारांचा विचार अर्धमागधी धातुरूपविचारात नाही.

४) संस्कृतमधील धातूंचा पदभेद-म्हणजे धातु परस्मैपदी, आत्मनेपदी अथवा उभयपदी-अर्धमागधीत नाही. अर्धमागधीत धातूंना लागणारे प्रत्यय हे संस्कृतमधल्या फक्त परस्मैपदी[१] प्रत्ययावरून प्रायः आलेले आहेत.

५) संस्कृतप्रमाणे भूतकाळ[२] व भविष्यकाळ यांचे अनेक प्रकार अर्धमागधीत नाहीत. अर्धमागधीत फक्त तीन[३] काळ-वर्तमान, भूत, भविष्य-आहेत व त्यांचा प्रत्येकी एकेकच प्रकार आहे.

---

१ *वाङ्मयात कधी कधी धातूंची आत्मनेपदी-प्रत्ययान्त रूपेही आढळतात. त्यांना अनियमित म्हणण्यास हरकत नाही.*

२ *संस्कृतमधील धातूंच्या भूतकाळाच्या काही वर्णान्तरित रूपांचा वापर वाङ्मयात आढळतो. त्यांना अनियमित म्हणण्यास हरकत नाही.*

३ *काळावरून क्रिया केव्हा घडत आहे, याचा बोध होतो.*

६) अर्धमागधीत संकेतार्थाचे स्वतंत्र प्रत्यय नाहीत, आज्ञार्थ आणि विध्यर्थ[१] यांचे तेवढे स्वतंत्र प्रत्यय आहेत.

## २२४ अर्धमागधीतील धातूंचे वर्ग

अर्धमागधीत संस्कृतप्रमाणे धातूंचे गणभेद नाहीत, हे वर सांगितले आहेच. तथापि चालविण्याच्या सोईसाठी (प्रत्ययापूर्वीच्या) धातूंच्या अन्त्य स्वरानुसार जास्तीत जास्त तीन विभागात त्यांची विभागणी करता येते. या विभागांना सोईसाठी 'वर्ग' म्हटले आहे.

१) प्रथम वर्ग : या वर्गात सर्व अकारान्त धातू येतात. उदा.

गच्छ, रम, पड, भण इत्यादि अर्धमागधीतील बहुसंख्य धातू हे अकारान्त असल्याने अर्धमागधीतील बहुसंख्य धातु प्रथम वर्गात येतात. (२) द्वितीय वर्ग : या वर्गातील धातुही अकारान्तच आहेत. परंतु काही प्रत्ययांपूर्वी त्यांच्या अन्त्य अ चा कधी कधी ए होतो.[२] म्हणून सोईसाठी त्यांचा द्वितीय वर्ग मानला[३] आहे. ३) तृतीय वर्ग : अकारान्त खेरीज इतर स्वरान्त - धातु - आकारान्त[४] (मूळचेच) एकारान्त व ओकारान्त धातु - तृतीय वर्गात येतात. उदा. गा, झिया, ने, हो इत्यादि.

---

१ *अर्थावरून आज्ञा, कर्तव्य इत्यादींचा बोध होतो.*

२ *हेमचंद्राने म्हटल्याप्रमाणे (**एच्च क्त्वा-तुम-तव्य-भविष्यत्सु** १३.१५७ व **पंचमी-शतृषु वा।** ३.१५८) वर्तमान, भविष्य, ल्यंबत, तुमंत व वि. क. धा. वि. यांच्या प्रत्ययांपूर्वी अन्त्य अ चा ए होतो, आज्ञार्थ (पंचमी) व व. का. धा. वि. (शतृ) प्रत्ययांपूर्वी विकल्पाने ए होतो.*

३ *प्रथम व द्वितीय वर्गातील धातु हे परस्पर व्यावर्तक म्हणजे एका वर्गातला दुसऱ्या वर्गात जात नाही, असे - नाहीत अकारान्त धातु कधी प्रथमवर्गीय धातूंप्रमाणे, तर कधी अन्त्य अ चा ए करून द्वितीय वर्गीय धातूंप्रमाणे चालविले जातात. हीच तऱ्हा द्वितीय वर्गीय धातूंच्या बाबतीत आहे.*

४ *कधी कधी अकारान्त धातूपुढे 'य' हा आगम येऊन ते अकारान्त होतात. मग ते अकारान्त धातूंप्रमाणेच चालविले जातात.*

## २२५ धातुरूपे[१]

वर्तमान, भूत, भविष्य या तीन काळात आज्ञार्थ आणि विध्यर्थ या दोन अर्थात प्रथम, द्वितीय व तृतीय या तीन पुरूषात आणि ए. व. आणि अ. व. या दोन वचनात धातूंची रूपे होतात[२].

तीन पुरूष[३] व त्यांची वचने अशी :

| पुरूष | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्रथम | मी (अहं, हं) | आम्ही (अम्हे, वयं) |
| द्वितीया | तू (तं, तुम) | तुम्ही (तुम्हे) |
| तृतीय | तो (सो) | ते (ते) |
| | ती (सा) | त्या (ताओ) |
| | ते (तं) | ती (ताणि) |

आता विविध काळांतील व अर्थांतील धातुरूपे क्रमाने पुढे दिली आहेत.

## २२६ वर्तमानकाळ

अ) वर्तमानकाळाचे प्रत्यय पुढीलप्रमाणे आहेत :

| पुरूष | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | मि | मो |
| द्वि. पु. | सि | ह |
| तृ. पु. | इ | अंति |

---

१ *येथेही ज्या प्रत्ययसहित धातूंची रूपे वापरात बरीच आढळतात, ती दिलेली आहेत. कधी कधी आढळणारी रूपे मात्र 'अधिक रूपे' या शीर्षकाखाली दिली आहेत.*

२ *या रूपांचा कर्तरि व कर्मणि या दोन्ही प्रयोगांत उपयोग केला जातो.*

३ *स्वतःबद्दल वक्ता बोलतो तेव्हा प्रथम पुरूषाचा उपयोग केला जातो. वक्ता ज्याच्याशी बोलत आहे तो द्वितीय पुरूष या खेरीज इतर सर्व–म्हणजे मी, आम्ही, तू, तुम्ही सोडून–तृतीय पुरूष*

**आ)** धातूला प्रत्यय जोडण्यापूर्वी होणारे विकार :

१) प्र. पु. ए. व. आणि प्र. पु. अ. व. यांतील प्रत्ययापूर्वी प्रथमवर्गीय अकारान्त धातूंच्या अन्त्य 'अ' चा 'आ' होतो. उदा. हसामि, हसामो

२) प्रथम वर्गातील धातूंचा अन्त्य 'अ' आणि तृ. पु. अ. व. 'अन्ति' प्रत्ययांतील आद्य 'अ' या दोहोंचा मिळून पुढे 'न्ति' हे जोडाक्षर असल्याने 'अ' च राहतो. उदा. हस + अन्ति = हसन्ति

३) द्वितीय वर्गातील अकारान्त धातूंच्या अन्त्यय 'अ' चा सर्व प्रत्ययापूर्वी 'ए' केला जातो. उदा. करेमि, करेह, करेइ इ.

४) द्वितीय वर्गातील धातूंच्या एकारान्त अंगापुढे तृ. पु. अ. व. 'अंति' प्रत्ययातील आद्य 'अ' चा लोप होतो. उदा. करे+अंति = करेंति

५) तृतीय वर्गातील एकारान्त व ओकारान्त धातू पुढे तृ. पु. अ. व. 'अंति' प्रत्ययातील आद्य 'अ' चा लोप होतो. उदा. ने + अंति = नेंति, हो + अंति = होंति[१] इतर प्रत्यय मात्र नुसते जोडावयाचे उदा. नेमि, होमो इ.

६) तृतीय वर्गातील आकारान्त धातु :

**क)** काही आकारान्त धातूंच्या पुढे सर्वच प्रत्ययांपूर्वी 'य' येतो. त्यानंतर ते प्रथमवर्गातील अकारान्त धातूप्रमाणे चालतात. उदा. झिया-झियाय

ख) काही आकारान्त धातूंच्या पुढे फक्त तृ. पु. अ. व. 'अंति'[२] प्रत्ययापूर्वी 'य' येतो[३]. उदा. गा + अंति = गा + य + अंति = गायंति, पण काही आकारान्त धातूंच्या पुढे इतर प्रत्ययापूर्वी तसेच 'अंति' प्रत्ययापूर्वी सुद्धा 'य'[४] येत नाही.

---

१ *या रूपात पुढे 'न्ति' हे जोडाक्षर असल्याने मागील ए, ओ बद्दल कधी अनुक्रमे इ, उ लिहिले जातात.*

२ *मार्कंडेयाच्या मते 'नित्यमन्त्यन्त्वोः। - अन्ति-अन्तोः परमोः धात्वाकारात् अकारो नित्यं स्यात्। मार्कं ७.६१*

३ *ही वस्तुस्थिती काही आकारान्त धातूंच्या पुढे 'अंति' हा प्रत्यय 'यंति' होतो, या शब्दांत डॉ. घाटगे (प. ११५) यांनी व्यक्त केली आहे.*

४ *वाङ्मयीन प्रयोगावरून हा 'य' केव्हा येतो व केव्हा येत नाही, हे जाणून घेतले पाहिजे.*

उदा. उवट्ठा + अंति = उवट्ठंति

७) तृ. पु.ए. व. चा 'इ' हा प्रत्यय प्रायः मागील स्वरांत मिसळत[१] नाही.

टीप : माहाराष्ट्रीत प्र. पु. अ. व. त 'मु.', 'म' असे आणखी दोन प्रत्यय आहेत. हे प्रत्यय लागलेली काही रूपेही अर्धमागधीत आढळतात. या प्रत्ययापूर्वी सुद्धा धातूच्या अन्त्य अ चा प्रायः आ होतो.

**२२७ वर्तमानकाळ : धातुरूपे**

१) प्रथमवर्ग : अकारान्त धातु 'पास'

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | पासामि | पासामो |
| द्वि. पु. | पाससि | पासह |
| तृ. पु. | पासइ | पासंति |

२) द्वितीया वर्ग[२] : अकारान्त धातु कर (प्रत्ययापूर्वी करे)

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | करेमि | करेमो |
| द्वि. पु. | करेसि | करेह |
| तृ. पु. | करेइ | करेंति |

१ *संधि, परिच्छेद १३८ पहा.*

२ *संस्कृतमधले दशम गणातले धातु, प्रयोजक धातु व नाम धातु हे वर्णान्तराने अर्धमागधीत आल्यावर ते प्रायः द्वितीय वर्गातील धातूप्रमाणे चालतात.*

३) तृतीयवर्ग[१] : अ) १) आकारान्त धातु[२] 'उवट्ठा'

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | उवट्ठामि | उवट्ठाम |
| द्वि. पु. | उवट्ठासि | उवट्ठाह |
| तृ. पु. | उवट्ठाइ | उवट्ठंति |

२) आकारान्त धातु 'गा'[३] :-

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | गामि | गामो |
| द्वि. पु. | गासि | गाह |
| तृ. पु. | गाइ | गायंति[४] |

आ) एकारान्त धातु 'ने' :

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | नेमि | नेमो |
| द्वि. पु. | नेसि | नेह |
| तृ. पु. | नेइ | नेंति |

---

१ *आकारान्त धातूपुढे य आल्यास-झिया-झियाम-ते प्रथमवर्गीय अकारान्त धातूप्रमाणे चालतात. उदा.*

| | |
|---|---|
| *झियायामि* | *झियायामो* |
| *झियायसि* | *झियायह* |
| *झियायइ* | *झियायंति* |

*इतर काही धातूंची तृ. पु. ए. व ची रूपे : गायइ, ठायइ, वायइ (वा)*

२ *येथे कोणत्याही प्रत्यापूर्वी धातूपुढे य आलेला नाही. इतर काही धातूंची तृ. पु. अ. व. ची रूपे : ठंति, जंति (जा-या), आयंति (आ-या)*

३ येथे? गा अंति प्रत्ययापूर्वी 'य' आलेला आहे.

४ 'गंति' असेहि रूप श्री. पां. कुमार (पृ. ५) यांनी दिले आहे. म्हणजे त्याचे हे रूप 'उवट्ठंति प्रमाणे झाले आहे. असा अर्थ होतो.

इ) ओकारान्त धातु 'हो':-

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | होमि | होमो |
| द्वि. पु. | होसि | होह |
| तृ. पु. | होइ | होंति |

**२२८ वर्तमानकाळ : अस् धातूची रूपें**

अस् धातु वर्तमानकाळात अनियमित चालतो, त्याची रूपे अशी :

| | |
|---|---|
| अंसि, मि, म्हि | मो, मु (म्हो, म्ह) |
| असि, सि | त्थ |
| अत्थि | संति |

टीप :

१) ह्रस्व स्वरापुढे 'त्थ' चा उपयोग होतो.

२) कित्येकदा 'अत्थि' हे एकच रूप सर्व पुरूषात व सर्व वचनात वापरले जाते.

**२२९ वर्तमानकाळ : अधिक रूपे**

अ) १) प्र. पु. ए. व. - जाणमि, सहमि, हसामि[१], जाणिमि[२]

२) प्र. पु. अ. व. : अच्चिमो, नमिमो, भणिमो, वंदिमो[२], हसामु[३], इच्छामु, अच्चेमु, बूम ( ब्रू), हसाम[४], चिट्ठम्ह[५]

---

*१ येथे 'मि' प्रत्ययापूर्वी धातूच्या अन्त्य 'अ' चा 'आ' झालेला नाही. (मौ वा आदन्ताद्धातोर्मो परे अत आत्त्वं वा भवति । हेम. ३.१५४)*

*२ येथे प्रत्ययापूर्वी धातूच्या अन्त्य 'अ' चा 'इ' झालेला आहे (पहा : इच्च मोमुमे वा। हेम ३.१५५)*

*३ येथे 'मु' हा प्रत्यय लागलेला आहे.*

*४ येथे 'म' हा प्रत्यय लागलेला आहे.*

*५ बंभदत्त पृ. ७१ चिट्ठम्ह येथे 'म्ह' प्रत्यय लागलेला आहे. पिशेलच्या मते (पृ.३३७) 'म्ह' हा आज्ञार्थाचा विशिष्ट प्रत्यय आहे. तो वर्तमानकाळाचा*

३) द्वि. पु. ए. व. : जाणासि[१]

४) तृ. पु. अ. व. : अच्चहि[२], परिजाणाहि

आ) धातूंची आत्मनेपदी-प्रत्ययान्त रूपे :

१) प्र. पु. ए. व. : मन्ने, रमे, जाणे, लहे, वंदे

२) द्वि. पु. ए. व. : पभाससे, अवबुज्झसे

३) तृ. पु. ए. व. : भुंजए, चिंतए, मुच्चए, तीरए, उज्झए

४) तृ. पु. अ. व. : उवलभंते, रीयंते, चिट्ठंते

टीप : तृ. पु. ए. व. आणि तृ. पु. अ. व. यांच्या प्रत्ययातील अन्त्य ह्रस्व 'इ' चा पद्यांत वृत्ताच्या सोईसाठी कधी दीर्घ 'ई' केलेला आढळतो. (परि. पहा) उदा. सहई, भासई, भुंजई, जाणंती, अणुहोंती.

**२३० भूतकाळ**

अ) भूतकाळाचे प्रत्यय पुढीलप्रमाणे आहेत :

| पु. | ए. व. | आ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | इत्था | इंसु |
| द्वि. पु. | इत्था | इंसु |
| तृ. पु. | इत्था | इंसु |

टीप :

१) कधी ए. व. त 'इत्थ' प्रत्यय लागलेला आढळतो.

२) कधी अ. व. त 'अंसु' प्रत्यय लागलेला आढळतो.

आ) प्रत्यय लावण्यापूर्वी होणारे विकार :

१) प्रथमवर्गीय अकारान्त धातूंच्या अन्त्य 'अ' चा प्रत्ययापूर्वी लोप होतो.

---

*मानणे बरोबर नाही (पृ. ३२७) तथापि, वर्तमानकाळात कधी कधी 'म्ह' हा प्रत्यय लागतो असे दिसते.*

१ *'जाणासि' हे रूप संस्कृतवरून वर्णान्तराने आले आहे असे म्हणावे वा 'सि' प्रत्ययापूर्वीही धातूच्या अन्त्य अ चा आ झाला आहे, असे म्हणावे.*

२ *येथे हिं प्रत्यय लागला आहे (पिशेल. पृ. ३२४) अपभ्रंशात 'हि' हा नेहमीचा वर्त. तृ. पु. अ. व. चा प्रत्यय आहे.*

उदा. हस + इत्था = हसित्था, हस + इंसु = हसिंसु

२) द्वितीय वर्गीय धातूंच्या एकारान्त अंगापुढे प्रत्ययांतील आद्य 'इ' चा लोप होतो. उदा. करे + इत्था = करेत्था

३) (क) तृतीयवर्गांतील आकारान्त[१] धातूंचे पुढे प्रत्ययांतील आद्य 'इ' तसाच राहतो. उदा. गाइत्था, गाइंसु

(ख) तृतीयवर्गीय एकारान्त धातूंच्या पुढे प्रत्ययातील आद्य 'इ' तसाच राहतो. उदा. – नेइत्था

(ग) तृतीयवर्गीय ओकारान्त धातूंच्या पुढे प्रत्ययातील आद्य 'इ' चा लोप होतो उदा. होत्था

**२३१ भूतकाळ : धातुरूपे**

१) प्रथमवर्ग : अकारान्त धातु 'पास'

प्र. द्वि. तृ. पु. पासित्था पासिंसु

२) द्वितीय वर्ग : अकारान्त धातु 'कर'[२] (प्रत्ययापूर्वी करे) :–

प्र. द्वि. तृ. पु. करेत्था करेसु

३) तृतीयवर्ग : अ) आकारान्त धातु 'गा'

प्र. द्वि. तृ. पु. गाइत्था गाइंसु

आ) एकारान्त धातु 'ने'[३]

प्र. द्वि. तृ. पु. नेइत्था नेइंसु

---

१ हेमचंद्राच्या मते (स्वरादनतो वा) – अकारान्त वर्जितात् स्वरान्तात् धातोरन्ते अकारागमो वा भवति ४.२४०), अकारान्ताखेरीज इतर कोणत्याही स्वरान्त धातूपुढे 'अ' (य) आगम विकल्पाने होतो. याच्या आधारे, धातूपुढे 'अ' (य) आला म्हणजे प्रत्ययांतील आद्य 'इ' तसाच राहतो, इतरवेळी 'इ' चा लोप होतो, असे म्हणता येईल.

२ *कधी 'पास' प्रमाणे करित्था करिंसु अशी रूपे होतात.*

३ *एकारान्त धातूपुढे प्रत्ययातील आद्य 'इ' चा लोप झाल्यास 'नेत्था नेंसु' (गांधी, पृ. ७७) अशी रूपे होतील.*

इ) ओकारान्त धातु ‘हो’

प्र. द्वि. तृ. पु. होत्था (होंसु)

टीप : कित्येकदा ‘होत्था’ हेच रूप सर्व पुरूषात व सर्व वचनात वापरले जाते.

## २३२ भूतकाळ : ‘अस्’ धातूची रूपें

अस् धातूची भूतकाळाची रूपें अनियमित आहेत. ती अशी

आसि, आसी

टीप : अस् धातूच्या या दोन्ही रूपांचा उपयोग सर्व पुरूषांत व सर्व वचनांत केला जातो[१].

## २३३ भूतकाळ : अधिक रूपे

अ) १) कधी धातूमागे ‘अ’ आगम होऊन मग धातूला ‘इत्था’ प्रत्यय लागलेला आढळतो. उदा. अहोत्था[२]

२) कधी धातूमागे ‘अ’ आगम येऊन मग धातूला ‘इंसु’ प्रत्यय लागलेला आढळतो.

अतरिंसु, अभविंसु, अकरिंसु, अकरेंसु

आ) १) ‘इत्थ’ प्रत्ययान्त रूपे :

सेवित्थ, जावइत्थ ( यापय), पहारेत्थ, हुत्थ

२) ‘अंसु’ प्रत्ययान्त रूपे : आहंसु[३], जाणंसु[४]

## २३४ भूतकाळ : अनियमित रूपे[५]

संस्कृतमधील धातूंच्या काही भूतकालीन रूपावरून भूतकाळाची काही

---

१ *पिशेल, (इं) पृ. ३६३* २ *उत्त. २०:१९*

३ *आहंसुचा उपयोग कधी ए. व. त ही होतोः तओ हं एवं आहंसु।*

४ *सूय १.४.१.२*

५ *आहु, उदाहु, आहंसु, वयासी, अकासि, अकासी, अहोसी, अब्बवी या रूपांचा उपयोग ए. व. आणि अ. व. या दोहोंतही होतो तसेच वयासि, अहेसि या रूपांचाही उपयोग सर्व वचनात होतो.*

*(पहा : पिशेल (इं) ३६३–३६६, घाटगे, पृ. १२१–१२२, उपाध्ये, पृ. १०१ वैद्य पृ. ४९)*

रूपे वर्णान्तराने अर्धमागधीत आलेली आहेत. त्यांना अनियमित म्हणण्यास हरकत नाही. ही रूपे पुढीलप्रमाणे :

अ) १) प्र. पु. ए. व. : अकरिस्सं

२) प्र. पु. अ. व. : वुच्छामु ( वस्-राहणे)

३) द्वि. पु. ए. व. : अकासि, अकासी[1], वयासी

४) तृ. पु. ए. व. : अकासि, अकासी, ठासी, अचारि ( चर्),
अब्बवी, भुवि ( भू), अभू, अहेसि ( भू)

५) तृ. पु. अ. व. : वयासी[2], अद्दक्खु, अद्दक्खु (अद्राक्षु : दृश्), आहु, आहू ( आहुः) उदाहु, उदाहू

आ) अहोसी (हो भू)

## २३५ भविष्यकाळ

अ) भविष्यकाळाचे प्रत्यय दोन[3] प्रकारचे आहेत. ते असे :

| प्रकार १: | पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|---|
| | प्र. पु. | इस्सामि | इस्सामो |
| | द्वि. पु. | इस्ससि | इस्सह |
| | तृ. पु. | इस्सइ | इस्संति |

टीप : प्र. पु. ए. व. त कधी 'इस्सं' असा प्रत्यय[4] लागतो.

| प्रकार २ | पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|---|
| | प्र. पु. | इहिमि | इहिमो |
| | द्वि. पु. | इहिसि | इहिह |
| | तृ. पु. | इहिइ | इहिंति |

---

१ मागे 'मा' हे अव्यय असता 'कासी'

२ 'वयासि' सुध्दा

३ प्रत्यय दोन प्रकारचे असले तरी अर्थात मात्र काही फरक नाही.

४ मेः स्सं : धातोः परो भविष्यति काले म्यादेशस्य स्थाने **स्सं वा प्रयोक्तव्यः** हेम ३.१६९

टीप : १) प्र. पु. ए. व. त कधी 'इहं' असा प्रत्यय लागतो.

२) प्र. पु. ए. व. आणि प्र. पु. अ. व. यामध्ये कधी कधी 'इहामि' व 'इहामो' असे प्रत्यय[1] लागतात.

३) तृ. पु. ए. व. तील 'इहिइ' प्रत्ययांत 'हि' व 'इ' चा संधि होऊन 'इही' होतो. म्हणून 'इही' असा एखादा स्वतंत्र प्रत्यय मानण्याचे कारण नाही.

आ) क) पहिल्या प्रकारच्या प्रत्ययापूर्वी होणारे फेरफार :

१) अकारान्त[2] धातूंच्या अन्त्य 'अ' चा प्रत्ययापूर्वी लोप होतो

पास + इस्सामि = पासिस्सामि

२) आकारान्त[3] धातूपुढे प्रत्ययांतील आद्य 'इ' तसाच राहतो. उदा. ठाइस्सामि, निव्वाइस्सइ ( निर्वा) इ.

३) एकारान्त[4] व ओकारान्त धातूंचे पुढे प्रत्ययांतील आद्य 'इ' चा विकल्पाने लोप होतो[5].

ख) दुसऱ्या प्रकारच्या प्रत्ययापूर्वी होणारे फेरफार :

१) अकारान्त धातूंच्या अन्त्य 'अ' चा सर्व प्रत्ययांपूर्वी लोप होतो

उदा. पासिहिमि इ.

---

१ *क्वचित्तु हा न भवति । हेम : ३. १६७*

२ *भविष्यकाळात द्वितीय वर्गीय अकारान्त धातु प्रथमवर्गीय अकारान्त धातूप्रमाणे वा त्याचे अंग एकारान्त होऊन ते 'ने' प्रमाणे चालत असल्याने, पुढे द्वितीय वर्गीय धातूची नमुन्याची रूपे दिलेली नाहीत.*

३ *भूतकाळ, परि २३०, टीपेतील हेमचंद्राचे मत पहा*

४ *हाच नियम निराळ्या शब्दांत पुढीलप्रमाणे सांगता येईल :*
*एकारान्त व ओकारान्त धातूपुढे प्रत्ययांतील आद्य 'इ' चा लोप होतो. त्याच धातूपुढे 'अ' (य) आगम झाल्यास प्रत्ययापूर्वी या 'अ' चा लोप होतो. भूतकाळ, तळटीपेतील हेमचंद्राचे मत पहा.*

५ *घाटगे पृ. १२७ : प्रत्ययांतील आद्य 'इ' चा लोप होऊन झालेलीच रूपे प्रायः वाङ्मयांत आढळतात. म्हणून पुढे दिलेल्या नमुन्याच्या रूपांत 'इ' चा लोप झालेली रूपेच दिलेली आहेत.*

२) आकारान्त, एकारान्त व ओकारान्त धातूंचे पुढे व्यत्ययांतील आद्य 'इ' चा लोप[१] होतो. उदा. गाहिइ, नेहिमि, होही इत्यादि

## २३६ भविष्यकाळ : धातुरूपे

प्रकार १

१) अकारान्त धातु 'पास'

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | पासिस्सामि | पासिस्सामो |
| द्वि. पु. | पासिस्ससि | पासिस्सह |
| तृ. पु. | पासिस्सइ | पासिस्संति |

२) आकारान्त[२] धातु 'गा'

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | गाइस्सामि | गाइस्सामो |
| द्वि. पु. | गाइस्ससि | गाइस्सह |
| तृ. पु. | गाइस्सइ | गाइस्संति |

३) एकारान्त[३] धातु 'ने'

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | नेस्सामि | नेस्सामो |
| द्वि. पु. | नेस्ससि | नेस्सह |
| तृ. पु. | नेस्सइ | नेस्संति |

४) ओकारान्त धातु 'हो'

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | होस्सामि | होस्सामो |
| द्वि. पु. | होस्ससि | होस्सह |
| तृ. पु. | होस्सइ | होस्संति |

---

१ घाटगे प. १२९

२ इतर काही धातूंची रूपे : जाइस्सामो ( जा), ण्हाइस्सामो ( ण्हा)

३ इतर काही धातूंची रूपे : एस्सामि, एस्संति, देस्सामि, देस्सामो इत्यादी

प्रकार २ :

### १) अकारान्त धातु ‘पास’

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | पासिहिमि | पासिहिमो |
| द्वि. पु. | पासिहिसि | पासिहिह |
| तृ. पु. | पासिहिइ | पासिहिंति |

### २) आकारान्त धातु ‘गा’

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | गाहिमि | गाहिमो |
| द्वि. पु. | गाहिसि | गहिह |
| तृ. पु. | गाहिइ | गाहिंति |

### ३) एकारान्त[1] धातु ‘ने’

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | नेहिमि | नेहिमो |
| द्वि. पु. | नेहिसि | नेहिह |
| तृ. पु. | नेहिइ | नेहिंति |

### ४) ओकारान्त धातु ‘हो’

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | होहिमि | होहिमो |
| द्वि. पु. | होहिसि | होहिह |
| तृ. पु. | होहिइ | होहिंति |

---

१ इतर काही धातूंची रूपे : एहिइ, एहिंति इत्यादि

अ) भविष्यकाळात ‘कर’ चे विकल्पाने ‘का’ असे अंग[१] होते. आणि हे अंग आकारान्त धातूप्रमाणे चालते. उदा.

| | |
|---|---|
| काहिमि | काहिमो |
| काहिसि | कहिह |
| कहिइ | काहिंति |

**२३७ भविष्यकाळ : अधिकरूपे**

अ) १) ‘इस्सं’ प्रत्ययान्त रूपे :

पासिस्सं, करिस्सं, भणिस्सं, चिट्ठीस्सं, जंपिस्सं, चइस्सं, जइस्सं ( यन्), जाणिस्सं, भुजिस्सं, ण्हाइस्सं, अणुजाइस्सं[२] ( अणुजा) करेस्सं, करावेस्सं, परिणेस्सं, अवणिस्सं, नेइस्सं, होस्सं[३]

२) ‘इहामि’ प्रत्ययान्त रूपे :

पासिहामि, वट्ठेहामि, विणासेहामि, दाहामि, काहामि[४], एहामि, होहामि[५]

३) ‘इहं’ प्रत्ययान्त रूपेः

काहं, दाहं, पाहं, होहं[६]

४) ‘इहामो’ प्रत्ययान्त रूपे :

पासिहामो, गच्छिहामो, दाहामो, काहामो, करेहामो, होहामो[७]

५) ‘इही’ प्रत्ययान्त रूपे :

दच्छिही, सिज्झिही, भुंजिही, काही, दाही, नाही, मन्नेही, जणेही, निरारेही, एही, होही[८]

आ) इतर प्रत्यय लागून झालेली रूपे :

१) प्र. पु. अ. व. : चरिस्मामु[९], भविस्सामु[१०]

२) प्र. पु. अ. व : दाहामु[११]

---

१ का नित्यं तिङ्भिूतभविष्यतोः । कृयः स्थाने का भवति । मार्कं ७.११३

२ वसु. पृ. २०३ ३ हेम ३.१६९ ४ सुर ७.२३८

५ सुर १०.५४ ६ सुपास ५५३ ७ हेम ३.१६७

९ उत्त. १४.७ ८ सुपास ६३६ १० उत्त. १४.१७

११ उत्त. १२.११

## २३८ अनियमित भविष्यकाळ

काही धातूंच्या बाबतीत, भविष्यकाळात त्यांचे एक विशिष्ट 'च्छ' कारान्त अंग होते.

अ) या च्छकारान्त अंग होते.

अ) या च्छकारान्त अंगांना वर्तमानकाळाचे[१] प्रत्यय लावून त्यांची भविष्यकाळाची रूपे सिद्ध होतात. उदा. वोच्छ (वय वच्)

| | |
|---|---|
| वोच्छामि[२] | वोच्छामो |
| वोच्छसि | वोच्छह |
| वोच्छइ | वोच्छंति |

टीप : प्र. पु. ए. व. त 'च्छं' असे एक अधिक रूप होते. उदा. सोच्छं, वोच्छं, गच्छं, रोच्छं, दच्छं, वेच्छं, छेच्छं, भेच्छं, भोच्छं[३].

आ) या च्छकारान्त अंगांना भविष्यकाळाचे नेहमीचे दोन्ही प्रकारचे प्रत्यय लावूनही या धातूंची भविष्यकाळाची रूपे होतात. उदा. सोच्छिस्सामि, सोच्छिस्सं, सोच्छिस्सामो इत्यादि सोच्छिहामि, सोच्छिहिसि, सोच्छिहिह इत्यादि दच्छिहिसि[४] इ.

## २३९ भविष्यकाळ : च्छकारान्त अंगे

काही धातूंची ही च्छकारान्त अंगे पुढीलप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| गम-गच्छ | भिंद-भेच्छ | वय-वेच्छ |

---

१ *वर्तमानकाळाचे प्रत्यय नेहमीप्रमाणेच जोडले जातात. तथापि कधी च्छ मधील 'अ' चा सर्व प्रत्ययापूर्वी 'इ' केलेला आढळतो. उदा.*

| | |
|---|---|
| *दच्छामि, दच्छिमि* | *दच्छामो, दच्छिमो* |
| *दच्छसि, दच्छिसि* | *दच्छह, दच्छिह* |
| *दच्छइ, दच्छिइ* | *दच्छंति, दच्छिंति* |

२ *उदा. कुम्मापुत्तचरित्तं वोच्छामि अहं समासेणं । (कुम्मा.१)*

३ *हेम ३.१७१*

४ *वसु. पृ. ३५२*

| | | |
|---|---|---|
| छिंद–छेच्छ | भंज–भोच्छ | विय–वेच्छ (जाणणे) |
| पास – दच्छ | मुय–मोच्छ | सुण–सोच्छ |
| दे–दच्छ | रूय–रोच्छ | |

## २४० भविष्यकाळ : अनियमित रूपे

भविष्यकाळाची पुढीलप्रमाणे काही अनियमित रूपे आढळतात.

१) प्र. पु. ए. व. : होक्खं, होक्खामि

२) प्र. पु. अ. व. : वक्खामो ( वच्)

३) द्वि. पु. अ. व. : दाहित्थ[१]

४) तृ. पु. ए. व. : होक्खइ

## २४१ आज्ञार्थ

अ) आज्ञार्थाचे प्रत्यय पुढीलप्रमाणे आहेत :

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | मु | मो |
| द्वि. पु. | सु, हि | ह |
| तृ. पु. | उ | अंतु |

टीप : १) प्र. पु.अ. व. त कधी 'म्ह' असा प्रत्यय[२] लागतो.

२) द्वि. पु. ए. व. त फक्त अकारान्त धातूंचे कोणतेही प्रत्यय न लागता एक अधिक रूप होते उदा. कुण

अकारान्ताखेरीज इतर स्वरान्त धातूंची मात्र अशी प्रत्ययरहित रूपें द्वि पु. ए. व. त होत नाहीत[४].

आ) प्रत्ययापूर्वी होणारे फेरफार :

१) अकारान्त धातूंच्या अन्त्य 'अ' चा 'मु' 'मो' व 'हि' या प्रत्ययापूर्वी

---

*१ पिशेल पृ. ३६७ २ पिशेल पृ. ३३३*

*३ मध्यमैकवचनस्य अतः उत्तरस्य लोपो वा स्यात्। मार्क ६.३३ तसेच हेम ३.१७५ पहा. ४ हेम ३. १७५*

'आ' होतो. उदा. पासामु, पासामो, पासाहि

२) अकारान्त धातूंतील अन्त्य 'अ' व 'अन्तु' मधील आद्य 'अ' यांचा संधि होऊन 'अ' च रहातो. उदा. पास + अंतु = पासंतु

३) काही आकारान्त धातूंच्या पुढे 'अंतु' प्रत्ययापूर्वी 'य' येतो. उदा. जायंतु, ठायंतु, पण काही आकारान्त धातूंच्या पुढे 'अंतु' प्रत्ययापूर्वी हा 'य' येत नाही. उदा. निज्जंतु (निर्मा), तर काही अकारान्त धातूंच्या पुढे सर्वच प्रत्ययापूर्वी 'य' येतो, मग ते अकारान्त धातूप्रमाणे चालतात.[१]

४) एकारान्त व ओकारान्त धातूंच्या पुढे 'अंतु' प्रत्ययांतील आद्य 'अ' चा लोप होतो. उदा. नेंतु, होंतु

## २४२ आज्ञार्थ : धातुरूपे

१) प्रथमवर्ग : अकारान्त धातु 'पास' :-

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | पासामु | पासामो |
| द्वि. पु. | पास, पाससु, पासाहि | पासह |
| तृ. पु. | पासउ | पासंतु |

२) द्वितीयावर्ग : अकारान्त धातु कर (प्रत्ययापूर्वी करे)

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | करेमु | करेमो |
| द्वि. पु. | कर, करेसु, करेहि | करेह |
| तृ. पु. | करेउ | करेंतु |

---

*१ उदा.*

| | |
|---|---|
| *गायामु* | *गायामो* |
| *गायसु, गायाहि* | *गायह* |
| *गायउ* | *गायंतु* |

*इतर धातूंची रूपे : ठायह ( ठा)*

३) तृतीयवर्ग : क) आकारान्त धातु 'जा'

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | जामु | जामो |
| द्वि. पु. | जासु, जाहि | जाह |
| तृ. पु. | जाउ | जायंतु[१] |

ख) एकारान्त धातु 'ने' :

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | नेमु | नेमो |
| द्वि. पु. | नेसु, नेहि | नेह |
| तृ. पु. | नेउ | नेंतु |

ग) ओकारान्त धातु 'हो'

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | होमु | होमो |
| द्वि. पु. | होसु, होहि | होह |
| तृ. पु. | होउ | होंतु |

## २४३ आज्ञार्थ : अधिक रूपे

१) प्र. पु. अ. व. : भुंजिमो, चिट्ठम्ह, गच्छम्ह

२) द्वि. पु. ए. व. : बूहि ( ब्रू)

३) तृ. पु. ए. व. : अत्थु ( अस्)

## २४४ विध्यर्थ

अ) विध्यर्थाचे प्रत्यय पुढीलप्रमाणे आहेत.

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | एज्जा, एज्जामि | एज्जाम |

१ *पण-निज्जंतु ( निज्जा)*

| | | |
|---|---|---|
| द्वि. पु. | एज्जा, एज्जासि, एज्जाहि | एज्जाह |
| तृ. पु. | एज्जा | एज्जा |

टीप : १) कधी कधी सर्व पुरूषात व सर्व वचनात 'ए' हा एकच प्रत्यय अकारान्त धातूंना[१] लागतो.

२) कधी सर्व पुरूषात व सर्व वचनात 'एज्जा' हा प्रत्यय[२] लागतो.

३) कधी 'एज्जासि' ऐवजी 'एज्जासि', एज्जाह' बद्दल 'एज्जह'[३] आणि 'एज्जा' चे स्थानी 'एज्ज' असे प्रत्यय लागलेले[४] आढळतात.

४) कधी द्वि. पु. ए. व. त 'एज्जसु' असा प्रत्यय[५] लागलेला आढळतो.

आ) प्रत्ययापूर्वी[६] होणारे फेरफार

१) अकारान्त धातूंचा अन्त्य 'अ' व प्रत्ययांतील आद्य 'ए' या दोहोंचा 'ए' होतो[७] उदा. पासेज्जा, पासेज्जाहि इ.

२) आकारान्त धातूंच्या पुढे प्रत्ययांतील आद्य 'ए' तसाच राहतो. उदा. गाएज्जा

३) एकारान्त व ओकारान्त धातूंच्या पुढे प्रत्ययांतील आद्य 'ए' चा लोप होतो. उदा. नेज्जा, होज्जा[८] इ.

---

१ वैद्य, पृ. ५०, जैन पृ. २९
२ सुत्तागम खंड १, प्रस्ता, पृ. ४३
३ पिशेल, पृ. ३२७ पहा
४ *सुत्तागम खंड प्रस्ता. पृ. ४३*
५ *पिशेल, पृ. ३२७ पहा*
६ *विध्यर्थांत द्वितीय वर्गीय धातूंची रूपे प्रथमवर्गीय अकारान्त वा तृतीय वर्गीय एकारान्त धातूप्रमाणे होत असल्याने ती येथे स्वतंत्रपणे दिलेली नाहीत.*
७ *प्रत्ययांत 'ज्जा' हे जोडाक्षर असल्याने मागील धातूच्या अन्त्य ए, ओ बद्दल कधी इ, उ, लिहिले जातात. उदा. पासिज्जा, उदाहरिज्जा, हुज्ज*
८ *हेम ३. १५९ पहा.*

४) जो नुसता 'ए' प्रत्यय आहे तो व धातूंचा अन्त्य 'अ' या दोहोंचा कधी 'ए' च होतो, उदा. गिज्झे ( गृध), हरिसे, कुज्झे, किणे ( क्री), चरे, चिट्ठे, लभे तर कधी 'ए' हा स्वतंत्रपणे राहतो.

उदा. परिक्खए, विणासए इ.

**२४५ विध्यर्थ : धातुरूपे**

१) अकारान्त धातु 'पास'

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | पासेज्जा, पासेज्जामि | पासेज्जाम |
| द्वि. पु. | पासेज्जा, पासेज्जासि, पासेज्जाहि | पासेज्जाह |
| तृ. पु. | पासेज्जा | पासेज्जा |

२) आकारान्त धातु 'गा'

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | गाएज्जा, गाएज्जामि | गाएज्जाम |
| द्वि. पु. | गाएज्जा, गाएज्जासि, गाएज्जाहि | गाएज्जाह |
| तृ. पु. | गाएज्जा | गाएज्जा |

३) एकारान्त धातु 'ने'

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | नेज्जा, नेज्जामि | नेज्जाम |
| द्वि. पु. | नेज्जा, नेज्जासि, नेज्जाहि | नेज्जाह |
| तृ. पु. | नेज्जा | नेज्जा |

४) ओकारान्त धातु 'हो'

| पु. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | होज्जा, होज्जामि | होज्जाम |
| द्वि. पु. | होज्जा, होज्जासि, होज्जाहि | होज्जाह |
| तृ. पु. | होज्जा | होज्जा |

## २४६ विध्यर्थ : अधिक रूपे

१) एज्जासि प्रत्ययान्त : हणेज्जसि, एज्जसि, ववरोवेज्जसि

२) एज्जह प्रत्ययान्त : खमेज्जह, कहेज्जह, देज्जह

३) एज्जसु प्रत्ययान्त : वच्चेज्जसु ( व्रज), भणेज्जसु, करेज्जसु, होज्जसु

४) एज्ज प्रत्ययान्त : सक्केज्ज, करेज्ज, रक्खेज्ज, सेवेज्ज, मुच्चेज्ज, चिट्ठेज्ज, देज्ज, होज्ज

## २४७ विध्यर्थ : अनियमित रूपे

काही धातूंची विध्यर्थाची काही रूपे संस्कृतमधून वर्णान्तराने अर्धमागधीत आलेली आहेत. त्यांना अनियमित म्हणण्यास हरकत नाही ही रूपे[१] अशी :

सिया (स्यात् अस्), कुज्जा (कुर्यात्  कृ) बूया (बूयात् ब्रू). हणिया (हन्यात्  हन्), संधेज्जा (संधेयात्  संधा)

## २४८ संकेतार्थ

संकेतार्थ सिध्द करण्यास अर्धमागधीत  स्वतंत्र असे प्रत्यय नाहीत. प्रायः वर्तमानकालवाचक[२] धातुसाधित विशेषणांचा उपयोग करून संकेतार्थ साधला जातो[३]. उदा.

---

१ *या रूपांचा उपयोग प्रायः तृ. पु. ए. व. त केलेला आढळतो.*

२ *व . का. धा. वि. साठी परिच्छेद २६५ पहा.*

३ *यावेळी जर या अर्थी 'जइ' (यदि) व तर या अर्थी 'ता, तो' इत्यादि शब्दांचा उपयोग केला जातो.*

१) सुरसारियातीरे जइ तइया काऊण धम्मकिच्चाइं । परलोयं साहिंतो म्हि ता धुवं लट्ठयं होंतं।। (महा. पृ. १६७ अ) तेव्हा गंगा-नदीच्या तीरी धर्मकृत्ये करून जर मी परलोक साधला असता तर खरोखरच चांगले झाले असते.

२) एमं वइयरं सक्को कह वि जाणंतो ता को जाणइ तं किं पि पाविंतो । (महा पृ. १५४ अ) ही हकीकत कशी का होईना जर इंद्रला कळली असती तर तुझे काय झाले असते. कुणास ठाऊक!

३) अज्ज माहं गणी होतो. ... जइ हं रमंतो परियाए सामण्णे जिणदोसिए ।। (दस ११.९) जिनोपदिष्ट श्रामण्यस्थितीत जर मी रमलो असतो तर मी आज गणी झालो असतो.

## पुरवणी

माहाराष्ट्रीतील धातुरूपविचार पुढे थोडक्यांत दिला आहे.

### १) वर्तमानकाळ 'प्रत्यय'

| | |
|---|---|
| मि | मो, मु, म |
| सि, से | इत्था, ह |
| इ, ए | न्ति, नो, इरे |

प्रत्ययापूर्वी १) 'से' हा प्रत्यय फक्त अकारान्त धातूंना लागतो. २) 'मि' प्रत्ययापूर्वी धातूच्या अन्त्य अ या विकल्पाने आ होतो. उदा. हसमि, हसामि ३) मो, मु, म प्रत्ययापूर्वी धातूच्या अन्त्य अ चा विकल्पाने आ व इ होतो. उदा. हसमो, हसामो, हसिमो ४) सर्व प्रत्ययापूर्वी अकारान्त धातूंच्या अन्त्य अ चा विकल्पाने ए होतो उदा. हसमि, हसेमि इ.

'अस्' ची वर्त. रूपे

| | |
|---|---|
| म्हि, अत्थि | म्हो, म्ह, अत्थि |
| सि, अत्थि | अत्थि |
| अत्थि | अत्थि |

### २) भूतकाळ

अ) अकारान्त धातूंना ईअ प्रत्यय लावून सर्व पुरूषात व वचनात भूतकाळाची रूपे सिध्द होतात. उदा. हसीअ, करीअ इ.

आ) अकारान्तेतर धातूंना सी, ही, हीअ हे प्रत्यय जोडून सर्व पुरूषात व वचनात भूतकाळाची रूपे सिध्द होतात. उदा.

गासी, गाही, गाहीअ, नेसी, नेही, नेहीअ, होसी, होही, होहीअ.

### ३) भविष्यकाळ : प्रत्यय

| | |
|---|---|
| प्र. पु. स्सं, स्सामि, हामि, हिमि | स्सामो, हामो, हिमो,<br>स्सामु, हामु, हिमु<br>हिस्सा, हित्था |

| | |
|---|---|
| द्वि. पु. हिसि, हिसे | हित्था, हिह |
| तृ. पु. हिइ, हिए | हिंति, हिंते, हिइरे |

प्रत्ययापूर्वी धातूच्या अन्त्य अ चा इ, ए होतो. उदा. भणिस्सं, भणेस्स इं.

**४) आज्ञार्थ : प्रत्यय**

| | |
|---|---|
| मु | मो. |
| ०, सु, हि, इज्जसु, इज्जहि, इज्जे | ह |
| उ | न्तु |

प्रत्ययापूर्वी : १) मु, मो या प्रत्ययापूर्वी धातूच्या अन्त्य य चा विकल्पाने आ व इ होतो. उदा. हसमु, हसामु, हसिमु २) सर्व प्रत्ययापूर्वी धातूच्या अन्त्य अ चा विकल्पाने ए होतो उदा. हसउ, हसेउ ३) अकारान्त धातूंचे द्वि. पु. ए. व. त एक प्रत्यय रहित रूप होते.

**५) विध्यर्थ**

सर्व पुरूषात व वचनात धातूंना 'ज्जइ' प्रत्यय लावून विध्यर्थ सिध्द होते. या प्रत्ययापूर्वी धातूच्या अन्त्य अ चा ए होतो उदा. हसेज्जइ.

टीप : काही व्याकरणांच्या मते ज्ज, ज्जा हे प्रत्यय सर्व पुरूषात व वचनात सर्व काळांत आणि अर्थात धातूंना लागतात. या प्रत्ययापूर्वी धातूच्या अन्त्य अ चा ए होतो.

प्रकरण १४

# अव्यय विचार

## २४९ अव्यय

तीनही लिंगी, सर्व विभक्तींमध्ये आणि सर्व वचनी ज्या शब्दांचे रूप विकार न पावता सारखेच राहते, ते अव्यय[1] होय. निराळ्या शब्दात, वाक्यात उपयोग असता अव्ययात विकार होत नाहीत.

अव्यये[2] हीं मुख्यत: चार[3] प्रकारची आहेत

(१) क्रियाविशेषण :- हे मुख्यत:[4] क्रियेबद्दल विशेष माहिती सांगते.

(२) शब्दयोगी :- ही अव्यये नामांना वा धातूंना जोडून येतात. धातूंना जोडून येणाऱ्यांना उपसर्ग अशी विशेष संज्ञा आहे.

(३) उभयान्वयी :- दोन शब्द अथवा वाक्ये जोडणे, हे कार्य ही अव्यये करतात.

---

१ ***सदृशं त्रिषु लिङ्गेषु सर्वासु च विभक्तिषु।***
***वचनेषु च सर्वेषु यन्न व्येति तदव्ययम्*** *कातन्त्रव्याकरण (वा.वे. आपटे, पृ.४ वर उद्धृत)*

२ *काही अव्यये सिद्ध आहेत, तर काही साधित आहेत. नाम, सर्वनाम, विशेषण व धातु यांच्यापासून अव्यये साधता येतात. या साधित अव्ययांचा स्वतंत्रपणे विचार 'साधितशब्द' या प्रकरणात केला आहे.*

३ *या मुख्य चार प्रकारच्या अव्ययांखेरीज काही निपात वा लघु अव्यये आहेत. उदा. एव, खलु, अपि इ.*

४ *नेसफील्ड (पृ.९३) च्या मते, नाम व सर्वनाम सोडून इतर कोणत्याही शब्दांबद्दल क्रियाविशेषण अधिक माहिती देते. उदा. अईव उवसोभेमाणी; अईव इट्ठाओ (सुर. ११.१९७); अईव बाहा (बाधा)। (कथा पृ. १२०)*

(४) केवल प्रयोगी :- हर्ष, खेद, आश्चर्य इत्यादी मनोविकार दर्शविण्यास या अव्ययांचा उपयोग केला जातो.

अर्थास ही अव्यये अकारानुक्रमाने पुढे दिली आहेत.

**२५० क्रियाविशेषण अव्यये**

**(अ) स्थलवाचक :-**

(१) अग्गओ (अग्रत:), पुढे (२) अग्गे (अग्रे), पुढे (३) अंतरा, (मध्ये) (४) अंतिए (अन्तिके), जवळ (५) अंते,अंतो (अन्तर्), आत (६) अन्नत्थ (अन्यत्र) (७) अभिओ (अभित:), सभोवती (८) अभिमुहं (अभिमुखम्), समोर (९) अब्भासं (अभ्याशम्) जवळ (१०) अहे, अहो (अध:), खाली (११) इओ, एत्तो (इत:), येथून (१२) इओ तओ (इतस्तत:), इकडे तिकडे (१३) इह, इहं, इहयं, इह्इ[१], इहइं (इह), येथे (१४) उड्ढं, उद्धं, उब्भं (ऊर्ध्वम्), वर (१५) उत्तरओ (उत्तरत:), उत्तरेकडे, (१६) उप्पिं, उवरि[२], उवरिं (उपरि), वर (१७) उभयओ (उभयत:), दोहीकडे (१८) एगंतओ (एकान्तत:), एकांतात. (१९) एगत्थ (एकत्र), एकीकडे. (२०) एत्थ, एत्थं[३], इत्थ, इत्थं[४] (अत्र), येथे. (२१) कओ, कत्तो (कुत:), कोठून (२२) कओ वि (कुत: अपि), कोठून तरी (२३) कओ हुत्तं[५] (कोणीकडे) (२४) कत्थ, कहिं (कुत्र), कोठे (२५) कत्थ इ, कत्थ वि (कोठेतरी) (२६) कत्तो वि (कोठून तरी) (२७) कहिं पि, काहिं पि (कुत्रचित्, अपि), कोठेतरी (२८) कुओ (कुत:), कोठून (२९) कुओ वि (कुत: अपि), कोठून तरी (३०) जओ, जत्तो (यत:), जेथून. (३१) जत्थ, जहिं (यत्र), जेथे (३३) तओ, तत्तो (तत:), तेथून (३१) दूरओ (दूरत:), दुरून (३६) पच्छा (पश्चात्), मागे (३७) पाराए (पलीकडील बाजूस) (३८) पुरओ (पुरत:), पुढे (३९) पुरे (पुर:), पुढे (४०) पुरत्था (पुरस्तात्), पुढे (४१) पेच्च (प्रेत्य), परलोकी (४२) बहिद्धा (बहिर्धा), बाहेर (४३) बाहिं, बहिया (बाहेर) (४४) रहे, रहो[६] (रह:), एकान्तात (४५) वीसु (विष्वक्), सर्वत्र (४६) सगासे (सकाशे) जवळ (४७) समंतओ (समन्तत:), सगळीकडून (४८) समंता

---

१ *धर्मो. पृ. २१७*

२ *तसेच **'उवरिम्मि'** (सुपास ५३०)*

३ *पउम. ३.४३*

४ *सुपास. ५३०*

५ *बंभ पृ.२ ६४*

६ *तसेच **'रहम्मि'** (सुपास.५८०)*

(समन्तात्), सगळीकडून (४९) समी, समीवे (जवळ) (५०) समुह, समुहं (समोर) (५१) सवडहुत्त[1], सवडंमुहं[2] (समोर, समोरून) (५२) सव्वओ (सर्वतः), सगळीकडून (५३) सव्वत्थ (सर्वत्र), सगळीकडे (५४) हेट्ठा[3] (अधस्तात्), खाली.

**(आ) कालवाचक :–**

(१) अइरेण, अइरेणं (अचिरेण), लवकर (२) अइरं (अचिरम्), लवकर (३) अओ[4] परं (अत:परम्), यापुढे (४) अकम्हा[5] (अकस्मात्) (५) अचिरा (अचिरात्), लवकर (६) अज्ज, अज्जं (अद्य), आज (७) अज्जप्पभिइं (अद्यप्रभृति), आजपासून (८) अणंतरं (अनन्तरम्), नंतर (९) अदुत्तर[6] (अथोत्तरम्), यापुढे (१०) अन्नया (अन्यदा), एकदा (११) अभिक्खणं (अभीक्ष्णं), वारंवार (१२) अयंडे (अकांडे), अकस्मात् (१३) असइं (असकृत्), वारंवर (१४) अह (अथ), नंतर (१५) अहुणा (अधुना), आता (१६) इदाणिं, इयाणि, एण्हिं, इण्हिं, एत्ताहे (इदानीम्), आता (१७) एक्कासिं (एकदा) (१८) एगया (एकदा) (१९) एत्थंतरे, इत्थंतरे, ताव य (अत्रान्तरे, तावत् च), दरम्यान (२०) कया, कइया, काहे (कदा), केव्हा (२१) कयाइ (कदाचित्), केव्हातरी (२२) कल्लं (काल, उद्या) (२३) चिरं, चिरेण (बऱ्याच काळाने) (२४) जप्पभिइं (यत्प्रभृति), जेव्हापासून (२५) जया, जइया, जाहे (यदा), जेव्हा (२६) जा, जाव, जावं (यावत्), जेव्हा (२७) जुगवं (युगपद्), एकदम (२८) तओ, ता, तो, तत्तो (ततः), त्यानंतर (३१) तया, तइया, ताहे (तदा), तेव्हा (३१अ) तयाणि[7] (तदानीम्) तेव्हा (३२) ता, ताव, तावं (तावत्), तेव्हा (३३) दिया (दिवा), दिवसा (३४) नवरि (नंतर) (३५) निच्चं (नित्य) (३६) पइदिणं (प्रतिदिनम्), दररोज (३७) पच्छा (पश्चात्), नंतर, मागाहून (३८) पाओ (प्रातः), सकाळी (३९) पुण, उण, पुणो (पुनः) (४०) पुणो पुणो (पुनः पुनः) (४१) पुणरवि (पुनरपि) (४२) पुरा, पुव्वं, पुव्विं (पूर्वी) (४३) भिसं

---

*१ पउम. ३३.६२* *२ अगड. ५४*

*३ तसेच हेट्ठं, हेट्ठेण, हेट्ठओ, हेट्ठम्मि* *४ नल. पृ. ४७*

*५ सुपास. ५६९* *६ नाया., टीपा पृ. २१*

*७ नल पृ. ३३*

(भृशम्), वारंवार (४४) भुज्जो (भूयः), भुज्जो भुज्जो (पुनः, पुनः पुनः) (४५) मुहुं (मुहुः), वारंवर; मुहुं मुहं (वारं वारं) (४६) राओ (रात्रौ), रात्री (४७) वारं वारं (वारंवार) (४८) सइ, सया (सदा), नेहमी (४९) सइं (सकृत्), एकदा (५०) सज्जो (सद्यः), आता (५१) संपइ (सम्प्रति), आता (५२) संपयं (साम्प्रतम्), आता (५३) समयं (सततम्), नेहमी (५४) सव्वया (सर्वदा), नेहमी (५५) सायं (संध्याकाळी) (५६) सुइरं (सुचिरम्), बऱ्याच काळाने (५७) सुए, सुवे (श्वः), उद्या

**(इ) रीतिवाचक :–**

(१) अणुपुव्वेणं (क्रमाने) (२) अन्नमन्नं (अन्योन्य) (३) अवस्सं (अवश्य) (४) अवरोप्परं, अवरोप्परओ (परस्पर) (५) अहा (यथा), जसे (६) आहच्च (आहत्य), बलात्काराने (७) इइ, इ, ति, त्ति (इति) असे (८) इत्थं (अशाप्रकारे) (११) एवमेव, एमेव (अशाप्रकारेच) (१२) कमेण (क्रमेण), क्रमाने (१३) कह, कहं (कथम्), कसे (१४) कह वि, कथं पि (कथमपि), कसे तरी, कह कह वि. (१५) किन्ना (कसे) (१६) खिप्प (क्षिप्रम्), लवकर (१७) जमगसमगं (एकदम) (१८) जयं (दक्षतेने) (१९) जह, जहा (यथा), जसे, जहेव, (२०) जहातहेण (खरोखर) (२१) झत्ति (झटदिशी) (२२) तरसा[१] (वेगाने) (२३) तह, तहा (तथा), तसे, तहेव (२४) तुण्हिक्क (तूष्णीकम्), शांतपणे (२५) तुरियं (त्वरित) (२६) दुट्ठु (वाईट) (२७) पच्चक्खं (प्रत्यक्ष) (२८) परोप्पर (परस्पर) (२९) पसज्झ[२] (प्रसह्य), बलात्काराने (३०) पाडिएक्कं (प्रत्येक) (३१) पुढो (पृथक्) (३२) फुडं (स्फुटम्), खात्रीने, उघड (३३) मंदं (मन्दं मन्दम्) मंदपणे (३४) मिच्छा (मिथ्या), खोटे (३५) मिहो (मिथः), आपापसात (३६) मुसा, मूसा, मोसा (मृषा), खोटे (३७) मुहा (मुधा), व्यर्थ, फुकट (३८) लहुं (लघु), हळू (३९) सक्का[३] (शक्य आहे) (४०) सक्खं (साक्षात्) (४१) सणियं (शनैः) हळू, सणिय सणियं (४२) समक्खं (समक्ष) (४३) समगं[४] (एकाचवेळी) (४४) सम्मं (सम्यक्), योग्य प्रकारे (४५) सयं

---

*१ सुपास. ५८२  २ दस. ११.१४  ३ उवा, पृ. ११०*
*४ सुपास. ४९९*

(स्वयम्), स्वतः (४६) सयराहं (लवकर, एकदम, अकस्मात्) (४७) सहसा (एकदम) (४८) सिमा[१] (कदाचित्) (४९) सुट्ठु (सुष्ठु), चांगले (५०) सेयं (श्रेयस्), चांगले (५१) हव्वं (लवकर)

**(ई) नकार[२]दर्शक :–**

(१) न (नाही) (२) नहि, नेव (३) नो (नाही) (४) मा(नको)

**(उ) परिमाणवाचक :–**

(१) अईव (अतीव), अतिशय (२) अच्चत्थं (अत्यर्थम्), अतिशय (३) अलं (पुरे) (४) ईसि, ईसि (ईषत्), थोडेसे (५) उक्कोसेण (जास्तीत जास्त) (६) किंचि (किञ्चित्), थोडेसे (७) दरं (थोडेसे) (८) धणियं (अगदी) (९) णाणा (नाना), पुष्कळ (१०) पज्जत्तं (पर्याप्तम्), पुरेसे (११) पगामं (प्रकामम्), पुरेसे (१२) पाओ, पायं (प्रायः), पायसो (प्रायशः), प्रायः (१३) बाढं (अगदी, पुरेसे) (१५) मणं, मणगं, मणयं, मणा, मणागं (मनाक्), थोडेसे (१४) भिसं (भृशम्), पुष्कळ

**२५१ शब्दयोगी अव्यये**

**(अ)** शब्दयोगी अव्यये जेव्हा नामांना जोडून येतात, तेव्हा त्यांना त्या नामाच्या विशिष्ट विभक्तीची अपेक्षा असते. ही शब्दयोगी अव्यये त्यांचे अर्थ व त्यांना अपेक्षित विभक्ती यांची माहिती पुढीलप्रमाणे :–

**(१) द्वितीयेची अपेक्षा असणारी :–** (१) अंतरेण (विना) (२) जाव (पर्यन्त) (३) पइ (प्रति), कडे (४) मोत्तूण (खेरीज, विना) (५) आदाय, गहाय (सह) (६) विणा (विना) (७) आ (पर्यन्त) (८) पडुच्च (उद्देशून)

**(२) तृतीयेची अपेक्षा असणारी :–** समं, सद्धिं, सह (सह), विणा

**(३) पंचमीची अपेक्षा असणारी :–** आरब्भ (पासून), आ (पासून)

**(४) षष्ठीची अपेक्षा असणारी :–** पुरओ (पुढे), अग्गओ, उवरि, समीवं, हेट्ठा, बाहिं, सगासे, अंतियं, पासं (जवळ), पिट्ठओ (मागे), अहे, अंतिए, संमुहं,

---

*१ दस. २.४*

*२ शब्दामागे अ, अण् ठेऊन अकरणवाचक शब्द होतात. ‘अकरणरूपसिद्धि’ पहा.*

पासम्मि, समक्खं; अट्ठाए, कज्जे, कए (कृते) साठी इत्यादी.

**(आ)** काही शब्दयोगी अव्यये धातू (व धातूसाधिते) यांच्या मागे उपसर्ग म्हणून येतात. असे दोन वा अधिक उपसर्गही एकाच धातूच्या मागे येऊ शकतात. उदा. अणुपविसति, पाडिनिक्खमइ, उवागच्छइ इत्यादी

या उपसर्गांना स्वत:चा असा स्वतंत्र अर्थ असतो :– धातू (वा धातुसाधितां) पूर्वी ते आले असता, ते कधी धातूंचा अर्थ[१] बदलतात, कधी मूळ अर्थ जोरदर्शक (प्रकर्षवाचक)[२] करतात, तर कधी धातूंच्या अर्थात काहीच बदल करीत नाहीत.

हे उपसर्ग संस्कृतमध्ये असे आहेत.[३] प्र, परा, अप, सम्, अनु, अव, निर्, दुर्, अभि, वि, अधि, सु, उत्, अति, नि, प्रति, परि, अपि, उप, आ[४] याखेरीज निस् व दुस् असे आणखी दोन उपसर्ग मानले जातात.[५]

याखेरीज, इतर काही शब्द– ज्यांना संस्कृतमध्ये 'गति' अशी संज्ञा आहे, उपसर्गाप्रमाणे धातूंच्या मागे येतात[६]. उदा. (१) प्रादुस् (पाउ) (२) नमस् (नम, नमो) (३) अस्तं (अत्थं) (४) तिरस् (तिर, तिरो) (५) पुरस् (पुर, पुरो) (६) आविस् (आवि) इ.

खाली प्रत्येक उपसर्गयुक्त धातूंची काही उदाहरणे उपसर्गांच्या काही ठळक अर्थासह दिली आहेत :–

**(१) अइ (अति), पलीकडे :–** अइक्कमइ, अइगच्छइ.

**(२) अणु (अनु), नंतर, मागे, बरोबर :–** अणुकरेइ, अणुजाणइ, अणुगच्छइ.

**(३) अभि, अहि (अभि), कडे :–** अभिगच्छइ, अभिवड्ढइ, (अहिगण).

**(४) अप, अव, ओ (अप), दूर, खाली, वाईट :–** अवरज्झइ, अप्सरइ,

---

१ ***उपसर्गेण धात्वर्थो बलादन्यत्र नीयते।***

२ ***धात्वर्थं बाधते कश्चित् कश्चित्तमनुवर्तते।***
***तमेव विशिनष्ट्यन्योऽनर्थकोऽन्य: प्रयुज्यते।।***

३ *हेच उपसर्ग अर्धमागधीत वर्णान्तराने आलेले आहेत.*

४ ***प्रपरापसमन्ववनिर्दुरभिव्यधिसूदतिनिप्रतिपर्यपय:।***
***उप आङिति विंशतिरेष सखे! उपसर्गगण: कथित: कविना।।*** *कातंत्र व्याकरण*

५ *वा. वे. आपटे, पृ. ५*

६ *काळे, पृ. २२८*

ओसरइ, अवेइ, अवक्कमइ, ओहरइ

**(५) अव, ओ (अव), दूर, खाली :–** अवतरइ, ओगाहइ, अवगच्छइ.

**(६) अभि, अहि (अधि), अधिक, वर :–** अहिगच्छइ, अहिचिट्ठइ.

**(७) आ(आ), पर्यंत, वर :–** आरुहइ, आगच्छइ, आपुच्छइ, आलिंगइ.

**(८) उ (उद्) वर :–** उग्गमेइ, उत्तरइ, उद्दिसइ.

**(९) उव (उप), कडे, जवळ :–** उवकरेइ, उवधारेइ, (उवसग्ग, उवयार)

**(१०) दु,दू (दुर), वाईट, कठिण :–** दुक्करेइ, दूसहेइ, (दुग्गम, दुग्गइ)

**(११) नि, नी (निर्), बाहेर, दूर, निश्चय, आधिक्य, निषेध :–** निग्गमइ, निस्सरइ, नीसरइ, निज्जिणेइ, निरिक्खइ.

**(१२) नि (नि), आत, खाली :–** निमज्जइ, निवडइ.

**(१३) प,प्प (प्र), प्रकर्ष, विशेष, पुढे :–** पयासेइ, विप्पजहइ.

**(१४) परा, पला (परा), उलट, मागे, विरुद्ध, दूर :–** पराजिणइ, पलायइ. (पराभव)

**(१५) परि, पलि (परि), सभोवती :–** परिवट्टइ, परिगणेइ, परिणेइ.

**(१६) परि, पडि, पइ (प्रति), कडे :–** पइजाणइ (प्रति+ज्ञा), पडिभासइ, पडिवालेइ.

**(१७) पि (अपि), कडे, जवळ :–** पिहेइ (पिदधाति), पिहइ, (पिहिऊण, पिहित्ता)

**(१८) वि (वि), दूर, वेगळे, विशेष, नकार, विरोध :–** विक्किणइ, विकुव्वइ, विवरेइ, वियाणेइ, विस्सरइ (वि+स्मृ)

**(१९) सं, सा (सम्), सह, एकत्र :–** संगमइ, संतोसेइ, साहरइ (सम्+हृ)

**(२०) सु (सु), चांगले :–** सुकरेइ, (सुकय)

**(अ) (१) पाउ, पादु (प्रादुस्) :–** पाउकरेइ, पादुरकासि, पाउकुज्जा

**(२) नम, नमो (नमस्) :–** नमोक्कार.

**(३) अत्थं (अस्तम्) :–** अत्थंगमेइ, (अत्थंगय)

**(४) तिरो (तिरस्) :–** तिरोभूय

**(५) पुरो, पुर (पुरस्) :–** पुरक्कार (पुरस्कार)

**(६) आवि (आविस्) :-** आविब्भूय[१]

**२५२ उभयान्वयी अव्यये**

दोन शब्द वा वाक्ये जोडण्यास उभयान्वयी अव्ययांचा उपयोग होतो. विशेषत: वाक्ये जोडण्याचे त्यांचे कार्य महत्त्वाचे आहे.

वाक्यांचे परस्परांशी विविध प्रकारचे- कार्यकारण, विरोध, समुच्चय, विकल्प इत्यादी संबंध असू शकतात. हे संबंध दाखवून वाक्ये जोडण्यास भिन्न भिन्न उभयान्वयी अव्ययांचा उपयोग होतो. वाक्यांचे हे परस्पर संबंध व ते व्यक्त करणारी उभयान्वयी अव्यये पुढीलप्रमाणे आहेत.

**(१) समुच्चय :-**

च, य, न, च, न, य; तदणु, तयणु; इओ य (इतश्च); तहा य, अवि (अपि), अवि य (अपि च), केवलं-अवि, किं पुण, अह (अथ), पुव्वं-तओ (पूर्वं-तत:), अणंतरं, अणंतरं च, तओ य (ततश्च), अन्नं च (अन्यत् च), अवरं च (अपरं च), किं च, यावि (चापि), तयणंतरं; पढमं-पच्छा, तओ परं (तत:परम्).

**(२) विकल्प :-**

व, वा; वा वा; किंवा, अहवा; अदु, अदुव, अदुवा; उय (उत); उदाहु, उयाहु, उदाहो; अन्नहा (अन्यथा), इहरा, इयरहा (इतस्था).

**(३) विरोध :-**

**(अ)** किंतु, तु, उ, परं, परंतु; पुण (पुन:), केवलं.

**(आ)** जइ वि (यद्यपि), (तह वि तथापि)

**(४) कार्यकारण :-**

**(अ)** जं-तं (यद्-तद्), जम्हा-तम्हा (यस्मात्-तस्मात्); ता, तओ, तो (तत:); अओ (अत:); तेण हि; जेण-तेण (येन-तेन)

**(आ)** हि, जहा-तहा (यथा-तथा), इइ (इति), जाव (यावत्)

**(५) संकेत :-**

जइ-तो, ता (यदि-तत:), चे (चेत्), तरिहि[२] (तर्हि), अह (अथ)

---

१ *सुर. १४.२११*

२ *सुर. १.१३२*

**(६) कालदर्शक :-**

जया, जइया, जाहे - तया, तइया, ताहे (यदा-तदा), जया जया-तया तया (यदा यदा - तदा तदा), जाव-ताव (यावत्-तावत्), जाव न - ताव (यावत् न- तावत्), जप्पभिइं -तप्पभिइं

**(७) स्थळदर्शक :-**

जत्थ, जहिं-तत्थ, तहिं (यत्र-तत्र); जत्तो-तत्तो (जेथून-तेथून), जत्थ जत्थ - तत्थ तत्थ

**(८) रीतिदर्शक :-**

इव, जहा-तहा, जहेव-तहेव, जहा-जहा-तहा-तहा

**(९) अपरोक्षवाक्यदर्शक :-**

इइ, इ, ति, त्ति (इति), जहा, जं (यद्), तं जहा (तद् यथा), तहा हि (तथा हि), एवं.

**२५३ केवलप्रयोगी अव्यये**

निरनिराळे मनोविकार व्यक्त करण्यास केवलप्रयोगी अव्ययांचा[१] उपयोग होतो.

**(१) हर्ष :-** हंत (हन्त), दिट्ठिया (दिष्ट्या)

**(२) दु:ख, खेद, त्रास, :-** हंत, हा, हा-हा, अहह, हद्धी, आ (आ:), ही, हीही.

**(३) आश्चर्य :-** अहो, अम्मो, अव्वो

**(४) तिरस्कार, धिक्कार :-** धि, धी, धिद्धी

**(५) अनुताप :-** ओ, हंदि.

**२५४ निपात वा लघु अव्यये**

या अव्ययांनी[२] काय निर्दिष्ट होते हे प्रथम सांगून मग ही अव्यये दिली आहेत:-

---

१ *'अव्ययांचे उपयोग' हे प्रकरण पहा.*

२ *'अव्ययांचे उपयोग' हे प्रकरण पहा.*

**(१) स्वीकार :–** आमं (होय), बाढं[१] (ठीक आहे), तहा (तथा), हंता (हन्त)
**(२) अनुमोदन :–** एवं.
**(३) संबोधन :–** रे, रे–रे, अरे, हरे, अहो, (अंग), भो, हे, हो, हंहो, हला, हले, अइ (अयि), अम्हो, हंजे, हंभो.
**(४) जोर :–** एव, च्चिय, च्चेय, चेय, चेव, च्चेव, केवलं, नवरं.
**(५) खरोखर :–** किल, किर, खलु, खु, हु; नूण, नूणं, णं; नणु (ननु); धुवं.
**(६) नावाचा :–** नाम, नामं, नामेण, नामेणं, नामओ.
**(७) नमस्कार :–** नमो
**(८) सुध्दा :–** अवि, वि, पि (अपि)
**(९) प्रश्न :–** किं; कीस (का), कह, कहं; किन्ना (कसे); किह (कसे). **अनिश्चिततायुक्त प्रश्न :–** णु (नु).
**(१०) जास्त काय सांगावे ? :–** किमंग, किं पुण, किं बहुणा; किमु, किमु य.
**(११) निषेध :–** अलं, कअं (कृतम्), अलाहि, णाइ; माइ, माइं
**(१२) इच्छेप्रमाणे :–** कामं
**(१३) योग्य आहे :–** ठाणे (स्थाने)
**(१४) अधिक बरे :–** वरं, सेयं
**(१५) पादपूरण, वाक्यालंकार :–** णं, जे

---

१ *उदा :– चेल्लएण भणियं – बाढं। धर्मो. पृ. २०३.*

## प्रकरण १५

# साधित शब्द : साधित धातू

### २५५ प्रास्ताविक

नाम, सर्वनाम, विशेषण व धातू असे जे विकारी शब्द आहेत, त्या शब्दांना आणखी प्रत्यय वगैरे जोडून नामे, विशेषणे, धातू वा अव्यये साधिता येतात. अशा साधित शब्दांचा विचार आता करावयाचा आहे.

### २५६ साधित धातू

प्रत्यय लावून काही धातू सिद्ध केले जातात. त्यांना साधित धातू वा प्रत्ययान्त धातू असे म्हणतात.[१] हे साधित धातू (१) धातूसाधित व (२) नामसाधित[२] असे दोन प्रकारचे आहेत. या दोन्ही प्रकारच्या साधित धातूंचा विचार आता केला आहे.

### २५७ पौनः पुन्यार्थक वा अतिशयार्थक धातू

असले धातू साधण्याची स्वतंत्र प्रक्रिया अर्धमागधीत[३] नाही. असे जे काही थोडे धातू अर्धमागधीत आहेत, ते संस्कृतमधून वर्णान्तराने आलेले आहेत आणि त्यांचा वापरही कमीच आहे. उदा. -

(१) जागर, चंकम (क्रम्-भटकणे), लालप्प (लाड करणे), भिब्भिस (भास्-प्रकाशणे)

(२) काही नादानुकारी धातूंची पौनः पुन्यार्थक रूपे अशी आढळतात :-

खणखणखणंति, कणकणकणंति, मडमडमडंति[४].

---

१ *वा. वे. आपटे, पृ. ११२*

२ *येथे 'नाम' हा शब्द सर्वनाम व विशेषण यांचे ही उपलक्षण आहे.*

३ *पं.बेचरदास, पृ. २४९*

४ *खणखण, कणकण, मडमड असा आवाज करणे.*

**(अ) पौन : पुन्यार्थक धातूंच्या धातूसाधितांचाही उपयोग अर्धमागधीत आढळतो:**

(१) खोखुब्भमाण (क्षुभ्), जागरमाण, जागरमाणी, भिब्भिसमाण, भिब्भिसमीण; लालप्पमाण, चंकमियव्व, चंकमंत, रेरिज्जमाण (अतिशय शोभणारे).

(२) किलिकिलिंत, गुमगुमगुमंत, छिमछिमछिमंत, कढकढकढेंत[१]

**२८ इच्छार्थक धातू**

इच्छार्थक धातू साधण्याचीही स्वतंत्र प्रक्रिया अर्धमागधीत नाही. जे काही थोडे इच्छार्थक धातू अर्धमागधीत वापरले[२] जातात, ते संस्कृत वरून वर्णान्तराने आलेले आहेत. उदा.

दुगुच्छ, दुगुंछ, दुउंछ, दुउच्छ, जुगुच्छ; तिगिच्छ (चिकित्सा करणे), वितिगिंछ, वितिगिच्छ; सुस्सूस (श्रु), पिवास (पिपासति)

**(अ) इच्छार्थक धातूंच्या काही साधितांचाही उपयोग आढळतो :-**

दिगिच्छंत (जिघत्सत्-खाउ इच्छिणारा); दुगुंछमाण, दुगंछमाण; दुगंछणिज्ज; तिगिच्छिय, वितिगिच्छिय; सुस्सूसनाण, तिगिच्छिउं.[३]

**२५९ प्रयोजक धातू**

मूळ धातूने दर्शविलेली क्रिया 'दुसऱ्याकरवी करविणे' हा प्रयोजकाचा अर्थ असतो. साहजिकच, मूळचे अकर्मक धातू सुद्धा प्रयोजकात सकर्मक होतात. निराळ्या शब्दांत सर्वच प्रयोजक धातू सकर्मक बनतात.

प्रयोजक धातू हे द्वितीय[४] वर्गीय धातूंप्रमाणे सर्व काळांत[५] व अर्थांत

---

१ *किलकिल, गुमगुम, छिमछिम, कढकढ असा आवाज.*

२ *इच्छार्थक धातूंचा उपयोग अर्धमागधीत तुरळक आहे.*

३ *वसु. पृ. ३१६*

४ *कधी प्रथम वर्गीय धातूंप्रमाणेही चालविले जातात. उदा. मारइ, पाडइ इत्यादी.*

५ *उदा. :- कारेइ, पाडेइ, हसावेइ, जाणावसि, ठवेंति, ठावइ, सिक्खावेइ, उट्ठावेइ (वर्त.); कारित्था, करावित्था, पहारेत्था, गिण्हाविंसु, पट्ठवइंसु, संपाहरिंसु (भूत.) गेण्हावेस्सामि, मारिस्सइ, वद्धावेही, ठविस्सइ, सिक्खावेही, सिक्खावेहिंति, ठाविस्संति (भविष्य.), ण्हावेह, कारेउ, ठवेह, आणावह, आणवेसु, ठवेसु, रक्खावसु, जीवावसु, परिणावसु (आज्ञार्थ); आरंभावेज्जा (विध्यर्थ)*

चालतात; तसेच त्यापासून साधित[१] शब्दही तयार होतात.

प्रयोजक धातू साधण्याचे प्रत्यय पुढील प्रमाणे आहेत :-

**(अ) मूळ धातूंना खालील प्रत्यय[२] जोडून प्रयोजक धातू साधिले जातात.**[३]

(१) अकारान्त धातूंना 'आवे'[४] हा प्रत्यय जोडून

जाण-जाणावे, किण-किणावे, दल-दलावे, वेढ-वेढावे, पिय (पा-पिणे) - पियावे, छिंद-छिंदावे, बंध-बंधावे, हण-हणावे, खण-खणावे, लिह-लिहावे.

(२) आकारान्त धातूंना 'वे' प्रत्यय जोडून.

ठा-ठावे, ण्हा-ण्हावे, जा (या)- जावे, गा-गावे.

**टीप :-** कधी प्रत्ययापूर्वी आकारान्त धातूंतील 'आ' चा 'अ' होतो. ठवे, परिट्ठवे.

(३) एकारान्त व ओकारान्त धातूंना 'यावे' हा प्रत्यय जोडून नेयावे, (होयावे).

**(आ)** (१) काही अकारान्त धातूंना 'ए' हा[५] प्रत्यय लागून प्रयोजक धातू होतात. प्रत्ययापूर्वी धातूंतील 'अ'[६] चा प्राय: 'आ' होतो; धातूंत दीर्घ स्वर असल्यास तो तसाच राहतो.

---

१ *उदा.:- वंचाविंत, किणावेमाण, पच्चक्खावेमाण, आणवेमाण (कर्तरि व.का.धा.वि.); दाविय, संठविय, जाणाविय, तोसिय, कारिय, परिणाविय, ठविय, जीवाविय (क.भू.धा.वि.); ठाएयव्व (वि.क.धा.वि.); कराविऊण, आणाविय, मन्नाविऊण, ठाविऊण, ठविऊणं, सिक्खावित्तु, ण्हविऊण, ठविऊण, आरोविऊण, ठवित्त (ल्यबना); सिक्खविउं, धराविउं, करावेउं (तुमन्त).*

२ ***णेरदेदावावे।*** *(अ,ए,आव,आवे) हेम. ३.१४९; क्वचिदवश्च ।- क्वचिदिति सिद्धप्रयोगानुसाराद् युक्तान्तधातुविषये। मार्कं. ६.४६.*

३ *म. : करणे-करवणे, करविणे; बोलवणे, बोलविणे; सांगवणे, सांगविणे इत्यादी.*

४ *कधी 'आव' तर कधी 'अव' हे प्रत्ययही जोडले जातात उदा. कराव, हसाव, उवसमाव; वड्ढव, पेल्लव.*

५ *यावेळी कधी 'अ' प्रत्ययच जोडला जातो :- हर-हार, पड-पाड, मर-मार* ***(अदेल्लुक्यादेरत आ:।-*** *णेरदेल्लोपेषु कृतेषु आदेरकारस्य आ भवति । हेम.३.१५३)*

६ *कधी हा 'आ' होत नाही :- नम-नमे, अभिनव-अभिनवे, गम-गमे इत्यादी.*

(क) मर–मारे, कर–कारे, पड–पाडे, लभ–लाभे, संचर–संचारे, तव–तावे, गह (ग्रह)–गाहे, वित्तस (वित्रस्) –वित्तासे, खम–खामे, धर–धारे, पसर–पसारे, तर–तारे, हर–हारे, चल–चाले, निवड(निपत्) –निवाडे, पढ–पाढे, नस–नासे, हस–हासे.

(ख) संपाव–संपावे, वेढ–वेढे, किलाम–किलामे, पीण–पीणे, पाल–पाले, पक्खाल–पक्खाले.

(२) कधी धातूंतील इ, उ चा गुण होऊन 'ए' 'ओ' प्रत्यय लागतात.

(क) खिव (क्षिप्)–खेवे, विय (विद्–जाणणे) –वेए, पविस–पवेसे.

(ख) पुस–पोसे, मुय–मोए, कुव (कुप्)–कोवे, तुस (तुष्)–तोसे, रुय (रुच्)–रोए, विसुह (विशुध्)–विसोहे, बोहे (बुध्)

(इ) कधी एकाच धातूला प्रयोजकाचे दोन निरनिराळे प्रत्यय लागून झालेले प्रयोजक धातू आढळतात.

कारावे, भोयावे, खेवावे.

(ई) काही धातूंना 'आड' प्रत्यय लागून प्रयोजक धातू होतात. भम–भमाड, देक्ख–देक्खाड.

(उ) कधी संस्कृतमधील प्रयोजकाचा 'अय' प्रत्यय अर्धमागधीतही तसाच राहिलेला[१] आढळतो.

जणयइ, ठावयइ; जणयंति, तालयंति, निओजयंति

(ऊ) पुढील काही प्रयोजक धातू संस्कृतमधून वर्णान्तराने आले आहेत.

घाएइ (घातयति), पज्जेइ (पाययति), दरिसेइ, दंसेइ (दर्शयति), भेसेइ (भीषयति), उप्पायइ (उत्पादयति), पलीवेइ (प्रदीपयति), सक्कारेइ (सत्कारयति), वाएइ (वादयति), आणवेइ (आज्ञापयति), विन्नवेइ (विज्ञापयति), वावाएइ (व्यापादयति), पूरेइ (पूरयति), पइट्ठावेइ (प्रतिस्थापयति), संजोएइ (संयोजयति), आसासइ (आश्वासयति), ववरोवेइ (व्यपरोपयति), जोएइ (योजयति), छेएइ (छेदयति), दवावे, दावावे (दापयति).

---

१ *प्राय: तृतीय पुरूषी रुपात 'अय' तसाच राहिलेला आढळतो.*

**२६० नामधातू**

नाम, सर्वनाम, विशेषण यांपासून नामधातू[१] साधता येतात. मूळ शब्दांनी व्यक्त होणाऱ्या वस्तूची किंवा व्यक्तीची अभिलाषा करणे अथवा त्याप्रमाणे वागणे किंवा वागविणे ह्या अर्थी नामधातूंचा उपयोग होतो.

कधी मूळ शब्दांचाच धातू प्रमाणे उपयोग केला जातो, तर कधी मूळ शब्दांना प्रत्यय जोडून नामधातू साधले जातात.

नामधातूंचा उपयोग सर्व काळांत[२] व अर्थांत करता येतो.

**(अ) मूळ शब्द धातू प्रमाणे :–**

(१) अप्पिण (अर्पण करणे), जम्म (जन्म घेणे), पच्चप्पिण (परत करणे), कवल (घास घेणे)

(२) सिढिलइ (शिथिल करतो), पीणंति[३] (पीण, पीन), लठ्ठ होतात, तंडवंति[४] (तंडव, तांडव)

**(आ) पुढीलप्रमाणे प्रत्यय लावून नामधातू साधले जातात.**

(१) 'य' हा प्रत्यय[५] जोडून :-

(क) सिंह–सिंहाय, अमर–अमराय, गरुड–गरुडाय, हंस–हंसाय, दमदम (वाद्यविशेष)–दमदमाय, जलण (अग्नि)[६] जलणाय, कंडू–कंडूय, कंडुय[६]

(ख) मम–ममाय (इच्छिणे)

(ग) गुरुय–गुरुयाय

(२) 'ए' हा प्रत्यय जोडून :-

---

१ *म. :– हाताळणे (हात), माणसाळणे (माणूस), ढगाळणे (ढग), पिसाळणे, तावणे (ताव–ताप), दाबणे (दाब) इत्यादी.*

२ *उदा – कलुसेइ (वर्त.); कंडुइस्सामि, जम्मिही (कथा पृ.२१) (भविष्य); चिरावेहि, पयडह, कंडुयह, तरलायह, पवित्तेहि (आज्ञार्थ); मइलेज्ज (विध्यर्थ)*

३,४ *मलयगिरि, (राय.) पृ. २१६*

५ *'य' प्रत्ययापूर्वी शब्दातील अन्त्य 'अ' चा 'आ' होतो.*

६ *उदा.* ***पियविरहे जलणायंनि ससियरा।*** *लीला. ५०८*

७ *तसेच 'विज्जुयायंति' ( विद्युत्) (राय., टीपा, पृ.९)*

(क) आहार-आहारे, फल-फले, उवक्खड-उवक्खडे (शिजविणे), ण्हाण-ण्हाणे, उच्चार-उच्चारे (शौच करणे), पासव-पासवे (लघ्वी करणे), फास-फासे (स्पर्श करणे).

(ख) पयड-पयडे (प्रकट करणे), धवल-धवले (पांढरे करणे), चिर-चिरे (उशिर करणे), मइल-मइले (घाण करणे), वंत-वंते (ओकणे)

(३) 'आवे' हा प्रत्यय जोडून :-

(क) सद्द-सद्दावे (बोलावणे), दुक्ख-दुक्खावे, सच्च (सत्य)-सच्चावे (शपथ घेणे), उक्कंप-उक्कंपावे, सिक्खा (शिक्षा)-सिक्खावे, सुह (सुख)-सुहावे.

(ख) धीर-धीरावे, सिढिल-सिढिलावे, चिर-चिरावे, सीमल (शीतल)-सीयलावे.

**(इ) काही नामधातू संस्कृतमधून वर्णान्तराने आले आहेत.:-** धूनमंसइ (नमस्यति), असूयइ (असूयते)

**(ई) काही नादानुकारी[1] शब्दांचाही उपयोग नामधातूसारखा होतो:-** खलखलेइ, घुरुघुरुंति, थरूथरंति, पतणतणायंति[2] (मोठी गर्जना करतात)

**(उ) नामधातूवरुन साधित शब्दही तयार होतात :-**

(व.का.धा.वि.) :- घुरुघुरायंती, फुरफुरायमाण, कलंहंत, अममाएंत, संगामेमाण, ममायमाण, गुमगुमायंत, गुमगुमंत, गुलुगुलेंत, धगधगंत, धमधमेंत, फुरफुरंत, मघमघंत मिसिमिसंत, मिसिमीसेमाण.

(क.भू.धा.वि.) :- कलंकिय, धीराविय, सद्दाविय, मइलिय, कवलिय, सच्चविय, सिढीलिय, नेवच्छिय, पयडिय.

(वि.क.धा.वि.) :- कलंकियव्व

(ल्यबन्त) :- सद्दाविऊण, अवहत्थिऊण, सद्दावेत्ता, कलहिऊण, कंडुइत्ता.

(तुमन्त) :- धरिविउं (प्रयोजक) :- कंडूयावेइ

**२६१ च्वि धातू**

---

१ *म.:- कुरकुरणे, फुरफुरणे, मुसमुसणे, धगधगणे, थरथरणे, वळवळणे, गरगरणे, डबडबणे, गडगडणे, धडधडणे, तडतडणे, गुरगुरणे, फसफसणे, कुचकुचणे इ.*

२ *राय. पृ. ४९*

हे धातू सिद्ध करण्यास अर्धमागधीत स्वतंत्र[१] प्रक्रिया नाही. संस्कृतमधील च्वि धातू वर्णान्तराने अर्धमागधीत येतात.[२]

मूळ शब्दाने दर्शविलेली स्थिती होणे वा घडवून आणणे हा च्वि-धातूंचा अर्थ असतो.

उदा. - दूरीकरेमि, वसीकरेमि, अंगीकरेइ, विहलीकरेइ, सहलीकरेमि, गोयरीभवंति, थिरीहोइ, आउलीहोंति (वर्त.); खलीकरिउ, सहलीकरेसु (आज्ञार्थ); पयडीहोही (भविष्य.)

**२६२ कर्मणि धातू**

मूळ धातू तसेच साधित धातू यांच्यापासून कर्मणि धातू[३] साधता येतात.

सर्व कर्मणि धातू अकारान्त असल्याने ते प्रथम वर्गीय अकारान्त धातू प्रमाणे चालतात.

सर्व काळांत[४] व अर्थांत कर्मणि धातूंची रुपे होतात. तसेच कर्मणि धातूपासून साधित[५] शब्दही सिद्ध करता येतात.

---

१ *नामांना व विशेषणांना 'ई' (च्वि) जोडून त्यापुढे अकर्मक धातू करताना 'भू' आणि सकर्मक धातू करताना 'कृ' जोडून 'मुळात तसे नसताना तसे होणे किंवा करणे अशा अर्थाचे धातू सिद्ध केले जातात. त्यांना संस्कृतमध्ये 'च्वि धातू' अशी संज्ञा आहे.*

२ *च्वि धातूंपासून साधित शब्दही तयार होतात. उदा. धवलीहूय, अंगीकय, किंकरीकय, आउलीहूय, पच्चक्खीभूय, पिंडीकय, वसीकय, नियडीहूय, (निकट), सहलीकय, उड्डीकय, पयडीभूय, समाउलीभूय, सत्थीकय (स्वस्थ), पबलीभूय, पयडीहूय, पच्चक्खीहूय, निरुत्तरीकय (क.भू.धा.वि.); आसण्णीहूय, अंगीकाऊण, पयडीहोऊण, थिरीकाऊण (ल्यबन्त); पच्चक्खीहोउं, पयडीकाउं (तुमन्त).*

३ *कर्मणि धातूंचा उपयोग कर्मणि व भावे प्रयोगात केला जातो.*

४ *उदा. वण्णिज्जइ, खज्जइ, वुच्चइ (वर्त.); मुच्चिंसु (भूत.); उज्झिहिइ, मुच्चिहिइ (भविष्य.); सुव्वउ, सुमरिज्जउ, मारिज्जउ, पुच्छिज्जंतु (आज्ञार्थ); विणिहम्मेज्जा, मुच्चेज्जा (विध्यर्थ)*

५ *उदा. वारिज्जंत, खन्नमाण, गिण्हिज्जंत, धरिज्जमाण, पेच्छिज्जमाण, पालिज्जंत, नीणेज्जंत, घुम्मंत, आणिज्जमाण, (प्रयोजक कर्मणि धातूंपासून) भुंजाविज्जंत, कारिज्जंत, कराविज्जंत; (नामधातूंचे कर्मणि-धातूंपासून) :- कंचुइज्जंत, धवलिज्जंत, धवलिज्जमाण (व.का.धा.वि.)*

पुढील प्रत्यय[१] लावून कर्मणि धातू सिद्ध होतात.

**(अ) 'इज्ज' हा प्रत्यय प्राय: जोडून :-**

(१) थुण-थुणिज्ज, धर-धरिज्ज, सुमर (स्मृ)-सुमरिज्ज, पूर-पूरिज्ज, पाव-पाविज्ज, कह-कहिज्ज, सलह (श्लाघ्)-सलहिज्ज

गा-गाइज्ज, ने-नेज्ज,[२] उवणे-उवणिज्ज, आणे-आणिज्ज

(२) नामधातूपासून :- धवल-धवलिज्ज, कवल-कवलिज्ज, किसिण (कृष्ण) -किसिणिज्ज, कलुस-कलुसिज्ज, पसिण (प्रश्न) -पसिणिज्ज, सद्दावे-सद्दाविज्ज, मइल-मइलिज्ज.

(३) प्रयोजकापासून :- प्रयोजक धातूंना ' इज्ज' प्रत्यय लागतांना त्यांच्या अन्त्य 'ए' चा लोप होतो, अन्त्य 'वे' असल्यास त्याचा 'व' होतो.[३]

(१) कारे-कारिज्ज, हासे-हासिज्ज, मारे-मारिज्ज

(२) करावे-कराविज्ज, हसावे-हसाविज्ज, आणावे-आणाविज्ज, ण्हावे-ण्हाविज्ज.

**(आ) कधी 'ईय' प्रत्यय जोडून :-**

निवेय-निवेईय, संभाव-संभवीय, पइट्ठा-पइट्ठीय

**२६३ कर्मणि धातू : अनियमित**

अर्धमागधीत काही धातूंची कर्मणि अंगे अनियमित होतात. तसेच संस्कृतमधून वर्णान्तराने अर्धमागधीत आलेल्या कर्मणि धातूंनाही अनियमित म्हणण्यास हरकत नाही. ही अनियमित कर्मणि अंगे अशी :-

(अ) आढप्प (आढव-सुरु करणे), छिप्प (छिव-स्पर्श करणे), छुप्प (छुव-स्पर्श करणे), विढप्प (विढव-मिळविणे)

---

१ ***ईअ-इज्जौ क्यस्य। हेम. ३.१६०***

२ *एकारान्त व ओकारान्त धातूंपुढे **'इज्ज'** प्रत्ययातील आद्य **'इ'** चा लोप होतो. उदा. ने-निज्ज, नेज्ज. पण या धातू पुढे 'य' आला असल्यास 'नेइज्ज, होइज्ज' (पी. कुमार, पृ.१२,१५) अशी रूपे होतील.*

३ ***लुगावीक्तभावकर्मसु। -*** *णे: स्थाने लुक् आवि इत्यादेशौ भवत: क्ते भावकर्मविहिते च प्रत्यये परत:। हेम. ३.१५२*

| | | |
|---|---|---|
| (आ) आरब्भ (आरम्भ) | डज्झ (दह, डह) | मुच्च (मुय, मुञ्च) |
| आहिज्ज (आहा+आधा) | तीर (तर–तॄ) | मुज्झ (मुह, मुज्झ) |
| उवरूज्झ (उवरुन्ध) | | रुब्भ (रुम्भ, रुन्ध) |
| उद्धुव्व[1] (उद्धुण) | थुव्व[1] (थुण–स्तु) | रुव्व[1] (रोय–रुद्) |
| उवगिज्ज (उवगा) | दुज्झ[1], दुब्भ (दुह–दुह्) | लब्भ (लह्) |
| कज्ज, किज्ज, कीर (कर) | दिज्ज (दे–दा) | लिप्प (लिम्प्) |
| किच्च (किंत–कृत्) | धुव्व[1] (धुण–धू) | लिब्भ[1] (लिह) |
| खम्म, खन्न (खण) | निज्ज (ने) | लुव्व[1] (लुण–लू) |
| खज्ज (खा, खाय) | पहुप्प (पभव, पहव–प्र+भु) | लुप्प (लुम्प्) |
| खिप्प (खिव) | दीस (पास–दृश्) | वुच्च[1] (वय–वच्) |
| गम्म (गम, गच्छ) | पिज्ज (पिव–पा–पिणे) | वुब्भ (वह–वह्) |
| गिज्ज (गा) | पिड्ड (पीड) | वाहप्प[1] (वाहर–वि+आ+हृ) |
| गेज्झ, घेप्प[1] (गिण्ह, गेण्ह) | पुव्व (पुण–पू) | सिच्च, सिप्प[1] (सिंच) |
| चिम्म, चिव्व[1] (चिण–चि) | बज्झ (बन्ध) | सुम्म,[1] सुव्व (सुण–श्रु) |
| छिज्ज (छिन्द) | भण्ण (भण) | सुप्प (सुव–स्वप्) |
| जीर (जर–जॄ) | भिज्ज (भिन्द) | हरि (हर–हृ) |
| भज्ज (भंज) | हम्म (हण) | नज्ज (जाण) |
| जिप्प, जिव्व (जिण–जि) | भुज्ज (भुञ्ज) | |

---

१ *यातील काही रूपे ‘थोड्याफार प्रमाणात संस्कृतवरून वर्णान्तराने’ असे म्हणावयास हवे.*

**प्रकरण १६**

# साधित शब्द : धातुसाधित विशेषणे

## २६४ धातुसाधित शब्द

धातूंना निरनिराळे कृत् प्रत्यय लागून (संस्कृतमध्ये) धातुसाधित शब्द सिद्ध होतात; त्यांना कृदन्त म्हणतात. हे धातुसाधित शब्द नाम, विशेषण, अव्यय असे तीन प्रकारचे असू शकतात. यापैकी धातूपासून अव्यये व विशेषणे साधण्याची स्वतंत्र प्रक्रिया अर्धमागधीत आहे.

अर्धमागधीत आढळणारी धातुसाधित विशेषणे व त्यांची साधनिका यांचा पुढे प्रथम विचार केला आहे.

## २६५ वर्तमान कालवाचक कर्तरि धातुसाधित विशेषण

**(अ) खालील प्रत्यय धातूंना लागून ही विशेषणे सिद्ध होतात.**

(१) अकारान्त धातूंना 'अंत' व 'माण' हे प्रत्यय जोडून प्रायः व.का.धा.वि. सिद्ध केली[१] जातात.

**(क) 'अंत'[२] प्रत्यय जोडून :–** चिट्ठ–चिंट्ठत, जल–जलंत, पास–पासंत, किण–किणंत, रम–रमंत, समारंभ–समारंभंत, गिण्ह–गिण्हंत, जंप–जंपंत, सारक्ख (संरक्ष्)–सारक्खंत, कुण–कुणंत, भास–भासंत, पेच्छ–पेच्छंत.

**(ख) 'माण' प्रत्यय जोडून :–** विराय–विरायमाण, अभिलस–अभिलसमाण, जल–जलमाण, पास–पासमाण.

---

१ ***शतृशानयोर्न्तमाणौ।*** *मार्कं. ६.१७*

२ *तसेच 'बुवंत' ब्रू (उत्त.२३.२१)*

(२) एकारान्त व ओकारान्त धातूंच्या पुढे 'अंत' प्रत्ययातील आद्य 'अ' चा लोप होतो. माण प्रत्यय तसाच लागतो.[१]

**(क) 'अंत' प्रत्यय जोडून :–** कर[२]-(करे)-करेंत, पलोय-(पलोए)-पलोएंत, उज्जोय-(उज्जोए)-उज्जोएंत; ने-नेंत, दे-देंत, ए (आ+इ) एंत, बे (ब्रू)-(बेंत)-बिंत, हो-होंत-(हुंत).

**(ख) 'माण' प्रत्यय[३] जोडून :–** कर-करे -करेमाण, फुर-फुरे-फुरेमाण, आहार-आहारे-आहारेमाण, पत्थ-पत्थे-पत्थेमाण.

**(३)** आकारान्त धातूंच्या पुढे 'अंत' व 'माण' प्रत्ययापूर्वी प्राय:[४] 'य' येतो. गा-गाय-गायंत, गायमाण; वा-वाय-वायंत; ठा-ठाय-ठायमाण; झिया-झियाय-झियायमाण, झा-झाय-झायंत.

**(आ)** व.का.धा.वि. सिद्ध करण्याचे 'अंत' व 'माण' हे नेहमीचे प्रत्यय आहेत. त्याखेरीज इतर काही प्रत्यय लागून सिद्ध झालेली व.का.धा.वि. कधी कधी आढळतात.

**(१) 'मीण' प्रत्यय लागून[५] :–** आगम-आगममीण, आढाय-आढायमीण, भिस-भिसमीण, भिब्भिस-भिब्भिसमीण, आसाय-आसाए-आसाएमीण.

**(२) 'आण' प्रत्यय लागून[६] :–** विहम्माण, वक्कमाण[७]

**(३) 'ईण' प्रत्यय लागून :–** आसीण, मेलीण.

**(४) 'अस' धातूची 'संत' व 'समाण'** अशी व.का.धा.वि. होतात.

---

१ *एकारान्त धातूंना अंत व माण हे प्रत्यय लागण्यापूर्वी कधी मध्ये 'य' येतो. उदा. आणेयंती, देयमाण इत्यादी.*

२ *येथे अकारान्त धातूंच्या अन्त्य 'अ' चा प्रत्ययापूर्वी 'ए' झालेला आहे.*

३ *मार्कंडेयाच्या मते (**अत एव माण: स्यात्।** ६.१९), फक्त अकारान्त धातूंनाच 'माण' प्रत्यय जोडला जातो. तथापि, हेमचंद्र (३.१८०) 'होमाण' असे एक रूप देतो.*

४ *कधी हा 'य' येत नाही. उदा. जा-जंत.*

५ *तसेच, अणासायमीण, अममायमीण, अपरिग्गहमीण.*

६ *तसेच 'बुवाण' (ब्रू) (उत्त. २३.३१)*

७ *हे रूप वक्कममाण ऐवजी वापरले जाते.*

**(इ)** काही व.का.धा.वि. ची रूपे संस्कृतमधून वर्णान्तराने अर्धमागधीत आलेली आहेत. पण अर्धमागधीत त्यांचा उपयोग पुष्कळदा क्रियाविशेषण अव्ययाप्रमाणे केलेला आढळतो[१]. उदा. जयं (दक्षतेने), अजयं.

**२६६ वर्तमानकालवाचक कर्मणि धातुसाधित विशेषण**

परिच्छेद २६२ मध्ये म्हटल्याप्रमाणे धातूंची कर्मणि अंगे ही अकारान्त असतात. या अकारान्त कर्मणि धातूंना 'अंत' व 'माण' हे प्रत्यय जोडून वर्तमानकालवाचक कर्मणि धातु. विशेषणे सिद्ध होतात.

ए–एज्ज–एज्जंत, एज्जमाण; पिव–पिज्ज–पिज्जंत, पिज्जमाण; दे–दिज्ज–दिज्जंत, दिज्जमाण; हण–हम्म–हम्मंत, हम्ममाण; पाव–पाविज्ज–पाविज्जंत, पाविज्जमाण; परिघट्ट–परिघट्टिज्ज–परिघट्टिज्जंत, परिघट्टिज्जमाण.

**२६७ कर्मणि भूतकालवाचक धातुसाधित विशेषण**

**(अ)** धातूंना 'इय' हा प्रत्यय जोडून क.भू.धा.वि. सिद्ध होतात. भण–भणिय, चिंत–चिंतिय, पड–पडिय, इच्छ–इच्छिय, समोसर–समोसरिय, तव–तविय, रक्ख–रक्खिय, पुच्छ–पुच्छिय.

**(आ)** प्रयोजक धातूंना 'इय' प्रत्यय लावण्यापूर्वी धातूंच्या अन्त्य 'ए' चा लोप केला जातो.

कारे–कारिय, हासे–हासिय, पाढे–पाढिय; करावे–कराविय, कारावे–काराविय, कहावे–कहाविय, हारावे–(हर√ हृ)–हाराविय, पइट्ठावे–पइट्ठाविय, गवेसावे–गवेसाविय, आणावे–आणाविय, लिहावे–लिहाविय, पिहावे–पिहाविय, सज्जावे (सज्ज) सज्जाविय, घोसावे–घोसाविय, वाहरावे–वाहराविय.

**२६८ अनियमित क.भू.धा.वि.**

अर्धमागधीतील कित्येक क.भू.धा.वि. संस्कृतमधून वर्णान्तराने आलेली आहेत. त्यांना अनियमित म्हणण्यास हरकत नाही. तसेच इतर काही धातूंचीही काही अनियमित क.भू.धा.वि. आढळतात. ती अशी :–

**(अ)**

---

*१ घाटगे, पृ.१३२ व.का.धा.वि.चे उपयोग परिच्छेद ४२१ पहा.*

| | | | |
|---|---|---|---|
| अक्कम | अक्कंत | अणुन्नव | अणुन्नाय |
| अवरज्झ | अवरद्ध | आणव | आणत्त |
| आरभ, आरह, आरंभ } | आरद्ध (आढत्त) | आरुह | आरूढ |
| (आ+सद्) | आसन्न | (आहूत) | आहूय |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| इच्छ | इट्ठ | उत्तर | उत्तिण्ण | उप्पज्ज | उप्पन्न |
| उवदिस | उवदिट्ठ | उववज्ज | उववन्न | ओयर | ओइण्ण |
| कम(कम्) | कंत | कम(क्रम्) | कंत | कर | कय, कड |
| करिस | कड्ढ[1] | किण | कीय | किलम्म | किलंत |
| किलिस | किलिट्ठ | कुज्झ | कुद्ध | खण | खय, खाय[2] |
| खिव | खित्त | खेय, खिज्ज | खिन्न | गम, गच्छ | गय |
| गा(गै) | गीय | (गुप्) | गुत्त | गूह | गूढ |
| चय(त्यज्) | चत्त | चव(च्यु) | चुय | ठा, चिट्ठ | ठिय |
| चिण(चि) | चिय | (छद्) | छन्न | छिंद | छिन्न |
| जर(जृ) | जिण्ण[1],जुण्ण | जा(या) | जाय | (जन्) | जाय |
| जाण(ज्ञा) | नाय | जिण(जि) | जिय[1], जित्त | जुंज(युज्) | जुत्त |
| झा(ध्यै) | झाय | दस, उस | दट्ठ,[1](उक्क) | दह | दड्ढ |
| ण्हा(स्ना) | ण्हाय | तर(तॄ) | तिण्ण | तव(तप्) | तत्त |
| तस(त्रस्) | तत्थ | तुस्स(तुष्) | तुट्ठ | दम(दम्) | दंत |
| दिप्प(दीप्) | दित्त | धुण(धू) | धूय | नम | नय |
| नस्स(नश्) | नट्ठ | निज्जा(निर्+या) | निज्जाय | निहा(नि+धा) | निहिय |
| निसीय(नि+सद्) | निसण्ण | ने | नीय | पउंज | पउत्त |
| पक्खिव | पक्खित्त | पच्चक्खा | पच्चक्खाय | पडिबुज्झ | पडिबुद्ध |
| पडिवज्ज | पडिवन्न | पडिसुण | पडिसुय | पट्ठा(प्र+स्था) | पत्थिय |

---

१ *काही थोड्याफार प्रमाणात संस्कृतवरून.*

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पन्नव | पन्नत्त | पय(पच्) | पक्क, पिक्क[1] | पवज्ज | पवन्न |
| प्रवट्ट (प्र+वृत्) | पयट्ट, पवट्ट, पयत्त, पउत्त | पविस | पविट्ठ | पसव(प्र+सू) | पसूय |
| पहव(प्र+भू)[1] | पहुत्त | पाव | पत्त | पास | दिट्ठ |
| पिव | पीय | पुच्छ | पुट्ठ | बंध | बद्ध |
| बीह | भीय | बुज्झ | बुद्ध | भंज | भग्ग |
| भव(भू) | भूय | भिंद | भिन्न | भुंज | भुत्त |
| मर | मय, मड | मिला | मिलाण | मुय, मुंच | मुत्त, मुक्क[1] |
| मुह, मुज्झ | मूढ | मरिस(मृश्) | मुट्ठ(मृष्ट) | रंज | रत्त |
| रुच्च(रुच्) | रुइय | रुंध | रुद्ध | रूस(रुष्) | रुट्ठ |
| रुह, रोह | रूढ | लग्ग | लग्ग | लह | लद्ध |
| लिह | लीढ | लुभ | लुद्ध | लुंप | लुत्त |
| वट्ट (वृत्) | वट्ट, वत्त, वित्त | वम | वंत | वय(वच्) | वुत्त |
| वरिस | वुट्ठ | वह | वूढ | वा | वाय |
| विज्झ | विद्ध | विन्नव | विन्नत्त | वियर(वि+तॄ) | विइण्ण |
| विहा | विहूण(विहीन) | सम | संत | संदिस | संदिट्ठ |
| संनज्झ | संनद्ध | (सम्+आ+श्वस्) | समासत्थ | (सम्+आ+हृ) | समाहूय |
| समोसर | समोसढ | सर(स्मृ) | सुय | सह | सोढ |
| सिंच | सित्त | सिज्झ | सिद्ध | सीय(सद्) | सन्न |
| सुज्झ(शुध्) | सुद्ध | सुण | सुय | सुव(स्वप्) | सुत्त |
| हण | हय | हर | हय | हा, हाय | हीण |

**(आ)** संस्कृत क.भू.धा.वि. मध्ये 'ऋ' असल्यास क.भू.धा.वि. मधील 'र' चा अर्धमागधीत पुष्कळदा 'ड' होतो.

अभिहर अभिहड      आहर आहड      कर कड

---

१ *काही थोड्याफार प्रमाणात संस्कृतवरून*

| | | |
|---|---|---|
| मर मड | वावर वावड(व्यापृत) | (विकृत) वियड |
| वित्थर वित्थड | हर हड | |

**(इ) संस्कृतप्रमाणे नसणारी क.भू.धा.वि. अशी:–**

| | | |
|---|---|---|
| आलव(आ+लप्) आलत्त | गवेस गविट्ठ | चिण(चि) चिण्ण |
| जय(यज्) जट्ठ | तुट्ट(त्रुट्) तुट्ट | दे(दा) दिन्न |
| नियंस(नि+वस्) नियत्थिय | पवस(प्र+वस्) पउत्थ | पलाय (परा+अय्)पलाण |
| मुस(मुष्) मुट्ठ | रुय(रुद्) रुन्न(रुण्ण) | लस लट्ठ |
| लव(लप्) लत्त | वस(वस्) वुत्थ | संलव संलत्त |

**(ई) इतर काही अनियमित क.भू.धा.वि.:–**

| | | |
|---|---|---|
| छिव–छित्त, | छुह–छूढ, | विढव–विढत्त |

**(उ) आदेश म्हणून येणारी[1] काही क.भू.धा.वि. पुढीलप्रमाणे :–**

| | | |
|---|---|---|
| वोलीण (अतिक्रान्त) | वोसट्ट (विकसित) | अप्फुण्ण (आक्रान्त) |
| ल्हिक्क (नष्ट) | पम्हुट्ठ (प्रमृष्ट, प्रमुषित) | निमिय (स्थापित) |
| चक्खिय (आस्वादित) | जढ (त्यक्त) | |

**२६९ कर्तरि भूतकालवाचक धातुसाधित विशेषण**

धातूंच्या क.भू.धा.वि.ला 'वंत'[2] प्रत्यय जोडून कर्तरि भूतकालवाचक धातु. विशेषण साधिले[3] जाते. उदा.

हसिय–हसियवंत, रक्खिय–रक्खियवंत, कहिय–कहियवंत, पुच्छिय–पुच्छिवंत, हय–हयवंत.

**२७० भविष्यकालवाचक धातुसाधित विशेषण**

भविष्यकालवाचक[4] धातु. विशेषणांची क्वचित् काही रूपे अर्धमागधीत

---

१ *हेम. ४.२५८ पहा.*

२ ***वन्तः स्यात् क्तवतोवन्तोः।*** *मार्क ४.४०*

३ *(अ) कर्तरि भूत. धातु. विशेषणांचा अर्धमागधीतील उपयोग नाही म्हणण्याइतका तुरळक आहे.*

*(आ) पुट्ठवं (स्पृष्टवान्) हे संस्कृतमधून वर्णान्तराने*

४ *घाटगे, पृ.१५४; सेन, पृ.१२३*

आढळतात[१] आणि आढळणारी ही सर्व रूपे कर्तरिच आहेत. उदा. भविस्सं, आगमिस्सं, एसमाण.

**२७१ विध्यर्थी कर्मणि धातुसाधित विशेषण**

पुढील प्रत्ययांच्या साहाय्याने अर्धमागधीत वि.क.धा.वि. सिद्ध केली जातात.

**(१) (अ) अकारान्त धातूंना 'इयव्व' हा प्रत्यय जोडून :-**

चिट्ठ-चिट्ठियव्व, पुच्छ-पुच्छियव्व, पास-पासियव्व, भिंद-भिंदियव्व, भुंज-भुंजियव्व, जाण-जाणियव्व, सुण-सुणियव्व.

**(आ) अकारान्तेतर स्वरान्त धातूंना 'यव्व' हा प्रत्यय लावून :-**

पुच्छ-पुच्छे-पुच्छेयव्व, कह-कहे-कहेयव्व; ठा-ठायव्व, ना-नायव्व, दा-दायव्व; मारे-मारेयव्व, परितावे-परितावेयव्व; ने-नेयव्व; हो-होयव्व.

**(२) अकारान्त धातूंना 'णिज्ज'[२] हा प्रत्यय जोडून :-**

वंद-वंदणिज्ज, अच्च-अच्चणिज्ज, नमंस-नमंसणिज्ज, दरिस-दरिसणिज्ज, पूय-पूयणिज्ज.

**२७२ अनियमित वि.क.धा.वि.**

पुष्कळ धातूंची वि.क.धा.वि. संस्कृतमधून वर्णान्तराने अर्धमागधीत आलेली आहेत. त्यांना अनियमित म्हणण्यास हरकत नाही. त्यातील काही अशी :-

| | | |
|---|---|---|
| **(अ)** कर कज्ज | जिण(जि) जेय | पिव पेज्ज, पेय |
| भुंज भोज्ज | वज्ज वज्ज (वर्ज्य | जाय (जन्) जन्न |
| दुल्लंघ दुल्लंघ | वय(वद्) वज्ज | जाण तेय |
| भव भव्व | आणव आणप्प | वय(वच्) वच्च |
| गिण्ह गेज्झ | खा खज्ज | गुह गुज्झ |
| चय चज्ज | गा गेज्ज | दुह दोज्झ, दुज्झ |

---

१ *भविष्य धातु. वि. सिद्ध करावयाची झाल्यास भविष्यकाळातील धातूंच्या स्सकारान्त अंगांना 'अंत' व 'माण' हे प्रत्यय जोडून सिद्ध करता येतील. उदा. कहिस्संत, कहिस्समाण. इत्यादी. (याकोबी, Erja, पृ. ४७)*

२ *कधी आकारान्त धातू पुढे 'य' येऊन मग 'णिज्ज' प्रत्यय लागतो. उदा. गा-गाय-गायणिज्जफ*

| | | |
|---|---|---|
| ने नेय, नेज्ज | पूय पुज्ज | भिंद भेज्ज |
| वह(वध्) वज्झ | लिह लेज्झ | मा मेय, मेज्ज |
| वेय(विद्) (जाणणे) } वेज्ज | | |
| **(आ)** (दर्शनीय) दंसणीय | वेय(विद्) वेयणीय | |
| **(इ)** सुण सोयव्व | भुंज भोत्तव्व | पास दट्ठव्व |
| वय(वच्) वत्तव्व, वोत्तव्व } | मुय मोत्तव्व | कर कायव्व |
| गच्छ गंतव्व | बुज्झ बोद्धव्व | जिण(जि) जेयव्व |
| भिंद भेत्तव्व | | |
| इतर : रुय रोत्तव्व | गिण्ह घेत्तव्व | |

**२७३ कर्तृवाचक धातुसाधित विशेषण**

धातूंना 'इर' हा प्रत्यय जोडून धातुनिर्दिष्ट क्रिया 'करणारा' या अर्थाची विशेषणे साधली जातात[१].

वेव–वेविर, हस–हसिर, परिसक्क (हिंडणे)–परिसक्किर, भम–भमिर, लज्ज–लज्जिर, जंप–जंपिर, लंब–लंबिर, ''कंख–कंखिर, उल्लव (उल्लप)–उल्लविर, वच्च–वच्चिर, परिसप्प–परिसप्पिर, वस (वस्)–वसिर, अंदोल–अंदोलिर, भण–भणिर, परिभम–परिभमिर, मग्ग (मागणे)–मग्गिर, पज्जल–पज्जलिर[२]'' घोल (चक्राकार फिरणे)–घोलिर.

**२७४ 'इम' प्रत्ययान्त धातुसाधित विशेषण**

धातूला 'इम' असा प्रत्यय जोडून वि.क.धा.वि. प्रमाणे अर्थ असणारी विशेषणे सिद्ध केली जातात.

खाय (खाद्)–खाइम, साय (स्वाद्)–साइम, भज्ज (भाजणे)–भज्जिम, गंथ–गंथिम, वेढ–वेढिम, पूर (भरणे)–पूरिम, उब्भेय (उत्पन्न होणे)–उब्भेइम, संघाय (एकत्र येणे)–संघाइम, निव्वत्त (सिद्ध करणे)–निव्वत्तिम, वंद–वंदिम, पाय(पाचय्)– पाइम, पूय (पूज्) – पूइम, माण (मानय्)–माणिम वेह (विद्ध करणे) – वेहिम

---

१ ***शीलाद्यर्थस्येरः।*** *हेम २.१४५*

२ *सुपास. ५२७, ५७८, ६५५, ६४७, ५६८, ५०४, ५५९, ५९७, ६३८*

**प्रकरण १७**

# साधित शब्द : धातुसाधित अव्यये

## २७५ पूर्वकालवाचक धातूसाधित अव्यय : ल्यबन्त

अर्धमागधीतील पूर्वकालवाचक धातूसाधित अव्यये विविध प्रत्यय जोडून सिद्ध केली जातात.

**(क) ल्यबन्ताचे नेहमीचे प्रत्यय असे :-**

**(१) (अ) अकारान्त धातूंना इऊण, इऊणं हे प्रत्यय जोडून :-**

(१) जाण-जाणिऊण, सिक्ख-सिक्खिऊण, हस-हसिऊण, वंद-वंदिऊण, हण-हणिऊण, पाव-पाविऊण, सुण-सुणिऊण, गेण्ह-गेण्हिऊण, बंध-बंधिऊण.

(२) जाण-जाणिऊणं, पास-पासिऊणं, नम-नमिऊणं, बंध-बंधिऊणं, जंप-जंपिऊणं, छिंद-छिंदिऊणं, परिभम-परिभमिऊणं, उवउंज-उवउंजिऊणं.

**(आ) अकारान्तेतर धातूंना ऊण[1], ऊणं हे प्रत्यय जोडून[2] :-**

(१) ण्हाऊण, दाऊण, ठाऊण, नाऊण, काऊण, पाऊण

(२) काऊणं, नाऊणं, दाऊणं, ठाऊणं

(३) हसेऊण, संमाणेऊण, भेसेऊण; आणेऊण, जेऊण (ज-जि), पराजेऊण, उवणेऊण, नेऊण; होऊण

(४) गहेऊणं, पन्नवेऊणं, भरेऊणं, उट्ठेऊणं; होऊणं.

---

१ ***क्त्वास्यादेर्णस्वोर्वा।*** *(हेम. १.२७) ('ण' वर विकल्पाने अनुस्वार)*

२ *(अ) आकारान्त धातूपुढे 'य' आल्यास ण्हा-ण्हाय-ण्हाइऊण*

*(आ) मराठीत 'ऊन' असा प्रत्यय पूर्व. धातु. अव्ययाचा आहे. उदा. करून, देऊन, घेऊन, जाऊन, येऊन, न्हाऊन, खाऊन, मारून, पाहून.*

**टीप :–** प्रयोजक धातूंना इऊण, इऊणं प्रत्यय लागण्यापूर्वी धातूच्या अन्त्य 'ए' चा लोप होतो. उदा. –ठविऊण, रोविऊण, ठाविऊण, आणाविऊण, कारिऊणं, हसाविऊण; ण्हाविऊणं, उत्तारिऊणं, इत्यादी

**(२) इत्ता, (एत्ता[1]) हे प्रत्यय जोडून :–**

**(अ) (अकारान्त धातूंना) :–** वंद–वंदित्ता, जिण–जिणित्ता, लंघ–लंघित्ता, भुंज–भुंजित्ता, सुण–सुणित्ता, वियाण–वियाणित्ता, किण–किणित्ता, जाण–जाणित्ता, हण–हणित्ता, हस–हसित्ता, चय–चइत्ता[2].

**(आ) (इतर स्वरान्त धातूंना) :–** गाइत्ता, निज्झाइत्ता, ण्हाइत्ता, पच्चक्खाइत्ता; करेत्ता, खवेत्ता, पारेत्ता, आगमेत्ता, मारेत्ता, आमंतेत्ता, सुणेत्ता, नेवच्छेत्ता; उट्ठेत्ता, उवणेत्ता, आणेत्ता, अवणेत्ता.

**टीप :** नामधातू व प्रयोजक धातू यांच्या अन्त्य 'ए' चा कधी लोप होतो, तर कधीं प्रत्ययांतील आद्य 'इ' चा लोप होतो:–

(१) ठवे–ठवित्ता, भुंजावे–भुंजावित्ता, विन्नवे–विन्नवित्ता, जाणावे–जाणावित्ता, ण्हावे–ण्हावित्ता, सद्दावे–सद्दावित्ता.

(२) ठेवत्ता, सिक्खावेत्ता, पडिगाहेत्ता, पाएत्ता (पायय्), मारेत्ता, नेवच्छेत्ता.

(३) इत्ताणं, (एत्ताणं[3]) हे प्रत्यय जोडून :–

**(अ) (अकारान्त धातूंना) :–** भव–भवित्ताणं, वस–वसित्ताणं, चय–चइत्ताणं, विद–विदित्ताणं, झूस–झूसित्ताणं, लह–लहित्ताणं.

**(आ) (अकाराना धातूंना) :–** पासेत्ताणं, लहेत्ताणं, करेत्ताणं

(४) इत्तु, (एत्तु)[3] हे प्रत्यय जोडून :–

**(अ) (अकारान्त धातूंना) :–** निक्खिव–निक्खिवित्तु, लभ–लभित्तु,

---

१ *खरे म्हणजे एत्ता असा स्वतंत्र प्रत्यय मानण्यापेक्षा, अकारान्तेतर धातूपुढे 'इत्ता' प्रत्ययांतील आद्य 'इ' चा लोप होतो, असे म्हणणे उचित होईल. काहींनी 'एत्ता' हा स्वतंत्र प्रत्यय दिला असल्याने वर तो कंसात ठेवला आहे. 'एत्ता' हा स्वतंत्र प्रत्यय मानल्यास एकारान्त धातूपुढे प्रत्ययांतील आद्य 'ए' चा लोप होतो, असे म्हणावे लागेल.*

२ ***प्रयोजकाच्या यकारान्त अंगांना 'इत्ता' प्रत्यय लागून:–*** *दमइत्ता, आगाहइत्ता, चलइत्ता, उत्तासइत्ता, जणइत्ता.*

३ *'एत्ता' वरील मागील तळटीप पहा.*

उक्खिव–उक्खिवित्तु, पविस–पविसित्तु, छिंद–छिंदित्तु, कड्ढ–कड्ढित्तु, उत्तर–उत्तरित्तु, थुण–थुणित्तु.

**(आ) (इतर धातूंना) :–** सहेत्तु, विणएत्तु, आणेत्तु[१], उट्ठेत्तु; ठवित्तु[२]; पयडित्तु.

**(ख) ल्यबन्ताच्या वर सांगितलेल्या नेहमीच्या प्रत्ययाखेरीज इतर काही प्रत्यय लागूनही ल्यबन्ते सिद्ध होतात. हे प्रत्यय असे :–**

**(१) इय, (इया[३]) हे प्रत्यय जोडून :–**

**(अ)** अणुपाल–अणुपालिय, पेच्छ–पेच्छिय, थुण–थुणिय, वियाण–वियाणिय, सुमर–सुमरिय, पास–पासिय, पेक्ख–पेक्खिय, मुण–मुणिय, भुंज–भुंजिय, जाण–जाणिय, गह–गहिय, आरोव–आरोविय, अणुन्नव–अणुन्नविय.

**(आ)** वियाण–वियाणिया, परिजाण–परिजाणिया, पास–पासिया, उट्ठा–उट्ठिया, अणुपस्स–अणुपस्सिया, अणुपाल–अणुपालिया[४]

**(२) इयाण, इयाणं हे प्रत्यय जोडून :–**

**(अ)** लह–लहियाण, घट्ट–घट्टियाण, आरुस–आरूसियाण, परिवज्ज–परिवज्जियाण

**(आ)** तक्क–तक्कियाणं, उस्सिंच–उस्सिंचियाणं, समुपेह–समुपेहियाणं, आरुस–आरुसियाणं, अभिजुंज–अभिजुंजियाणं

**(३) आए, (ए[५]), प्रत्यय जोडून :–**

पेह–पेहाए, अणुपेह–अणुपेहाए, उवेह–उवेहाए, संपेह–संपेहाए. उट्ठाए, परिन्नाए ( प्रति+ज्ञा), समायाए (सम्+आ+दा), आयाए (आ+दा), संखाए (सम्+ख्या), समुट्ठाए.

---

१ *कधी 'आणित्तु' (सुर. १२.२२०)*

२ *प्रयोजक व नामधातू यांना लागते वेळचे विकारासाठी मागील टीप पहा.*

३ *पिशेलने म्हटल्याप्रमाणे (पृ.६९), पद्यांत वृत्ताच्या सोईसाठी 'इय' चा 'इया' होतो.*

४ *तसेच अजाइया (याच्)*

५ *डॉ. वैद्य (पृ.५३) यांनी 'ए' असा प्रत्यय दिला आहे. पण 'ए' प्रत्यय स्वतंत्र मानण्याऐवजी तो 'आए' च मानणे युक्त होईल. (म्हणून वर 'ए' प्रत्यय कंसात ठेवला आहे) व आकारान्त धातूंना लागताना आ+आ=आ असाच संधी होतो. हे म्हणता येईल.*

**(४) 'आय' हा प्रत्यय जोडून :–**

गहाय, जहाय.

**(ग) या खेरीज धातूंच्या अन्ती पुढीलप्रमाणे आदेश होऊन ल्यबन्ते सिद्ध झालेली आढळतात :–**

**(१) न्ता :–** गंता (गम), वंता (वम), हंता (हण), मंता (मन्न).

**(२) न्तूण :–** गंतूण (गम), रंतूण(रम), हंतूण(हण)

**न्तूणं :–** गंतूणं, आगंतूणं(आगम)

(३) ट्टु :– कट्टु (कर), अवहट्टु (अवहर), साहट्टु (साहर), उद्धट्टु (उद्धर), अभिहट्टु (अभिहर), समाहट्टु (समाहर), नीहट्टु (नीहर)

**(४) त्ता :–** चेत्ता (चय), भेत्ता (भिंद)

**(५) त्तूण :–** मोत्तूण( मुय), छेत्तूण (छिंद), भेत्तूण (भिंद), घेत्तूण (गेण्ह), भोत्तूण (भुंज), रोत्तूण (रुय), वोत्तूण (वय वच्)

**त्तूणं :–** घेत्तूणं

**(६) च्चा[१] :–** होच्चा (हो), ठिच्चा (ठा), चिच्चा, चेच्चा (चय), पिच्चा, पेच्चा (पिव), वच्चा, वुच्चा (वय–वच्); हिच्चा, हेच्चा (हा,जहा), सुच्चा, सोच्चा[२] (सुण), अभिसमेच्च (अभिसमे), भोच्चा (भुंज), किच्चा (कर), नच्चा (जाण), दच्चा (दे), पडुच्चा (प्रतीत्य)

**(७) च्चाण :–** हिच्चाण, हेच्चाण (हा,जहा); नच्चाण (जाण), सोच्चाण (सुण), चिच्चाण (चय)

**च्चाणं :–** हिच्चाणं, हेच्चाणं; नच्चाणं, भोच्चाणं.

**२७६ अनियमित ल्यबन्तें**

संस्कृत धातूंच्या ल्यबन्तावरूनही वर्णान्तरानें अर्धमागधीत काही धातूंची ल्यबन्ते आलेली आहेत. त्यांना अनियमित म्हणण्यास हरकत नाही. त्याखेरीज, इतर काही अनियमित ल्यबन्तेही आढळतात.

---

*१ संस्कृतमधील ल्यबन्ताच्या 'त्वा' प्रत्ययाचा 'च्चा' वर्णान्तराने होतो.*

*२ अनुस्वारागम झाल्यास सोच्चं*

**(अ) वर्णान्तरित :-**

| | | | |
|---|---|---|---|
| उवलभ | उवलब्भ | पक्खिव | पक्खिप्प |
| अभिरुह | अभिरुज्झ | पाव | पप्प (प्राप्य) |
| समे | समेच्चसामिच्च | पविस | पविस्स |
| अभिगम | अभिगम्म | समादा | समादाय |
| आदा | आदाय | उट्ठा | उट्ठाय |
| आगम | आगम्म | (अणुचिंत[1]) | अणुवीइ |
| पणिहा | पणिहाय | आरभ | आरब्भ |
| निक्खम | निक्खम्म | समारभ | समारब्भ |
| परिच्चय | परिच्चज्ज | परिगिण्ह | परिगिज्झ |
| आहर | आहच्च | निसम | निसम्म |
| परिन्ना (प्रतिज्ञा) | परिन्नाय | परिट्ठव | परिट्ठप्प |
| अइक्कम | अइक्कम्म | पगिण्ह | पगिज्झ |
| अणुभव | अणुभूय | पडिसंधा | पडिसंधाय |
| विणिकरिस | विणिक्कस्स (विनिकृष्य) | अभिकंख | अभिकंख |
| पडुच्च[2] | प्रतीत्य | | |

**(आ) इतर काही :-**

दट्ठूण, दट्ठूणं, दिस्स, दिस्सा, दिस्सं (पास); पस्स (पास); सोऊण, सोऊणं (सुण); लद्धूण (लभ); थोऊण (थुण), संथोऊण (संथुण)

**२७७ हेत्वर्थक अण्यय तुमन्त :-**

पुढे सांगितल्याप्रमाणे विविध प्रत्यय लावून हेत्वर्थक अव्यये वा तुमन्ते सिद्ध केली जातात.

**(१) (अ) अकारान्त धातूंना 'इउं' हा प्रत्यय जोडून :-**

भास-भासिउं, उज्झ-उज्झिउं, परिहर-परिहरिउं, मर-मरिउं, जिण-जिणिउं, भिंद-भिंदिउं, पास-पासिउं, दह-दहिउं

---

१ *पा.स.म. पृ.४५*

२ *पएसि, टीपा, पृ.९२*

**(आ) अकारान्तेतर[१] स्वरान्त धातूंना 'उं'[२] प्रत्यय जोडून :–**

दाउं, काउं, पाउं, नाउं, गाउं, अग्घाउं (आ+घ्रा), उट्ठाउं; परिकहेउं, मारेउं, परिभाएउं, वारेउं; उट्ठेउं, नेउं, आणेउं, परिणेउं; होउं

**(२) इत्तए, (एत्तए[३]) हे प्रत्यय जोडून :–**

(क) (अ) (अकारान्त धातूंना) :– पास–पासित्तए, पिव–पिवित्तए, पाउब्भव–पाउब्भवित्तए, विहर–विहरित्तए, तर–तरित्तए, चिट्ठ–चिट्ठित्तए, पुच्छ–पुच्छित्तए, उत्तर–उत्तरित्तए, गिण्ह–गिण्हित्तए, धुण–धुणित्तए.

**(आ) (इतर धातूंना) :–** ठाइत्तए, गाइत्तए; नेइत्तए.

**(इ) (प्रयोजक धातूंना) :–** पाडित्तए, धारित्तए, उवसामित्तए, जलइत्तए, परिट्ठावित्तए, अभिसिंचावित्तए, पक्खिवावित्तए.

**(ख) (अ) (अकारान्त धातूंना) :–** कर–करेत्तए, पास–पासेत्तए, सुण–सुणेत्तए.

**(आ) (इतर धातूंना) :–** ठाएत्तए; विणेत्तए, होत्तए

**(इ) (प्रयोजक धातूंना) :–** पाडेत्तए, धारेत्तए.

**२७८ अनियमित तुमन्ते**

काही धातूंच्या तुमन्तांची रुपे संस्कृतमधून वर्णान्तराने अर्धमागधीत आलेली आहेत. त्यांना अनियमित म्हण्यास हरकत नाही. त्याखेरीज इतर काही अनियमित तुमन्ते आढळतात.

**(अ) वर्णान्तरित :–**

| | | | |
|---|---|---|---|
| सुण | सोउं | छिंद | छेत्तुं |
| जिण (जि) | जेउं | पास | दट्ठुं |
| भिंद | भेत्तुं | निद्दिस | निद्देट्ठुं |
| भुंज | भोत्तुं | आहण | आहंतुं |
| हण | हंतुं | मुय | मोत्तुं |
| सुव (स्वप्) | सोत्तुं | उद्धर | उद्धत्तुं |

१ *आकारान्त धातूपुढे 'य' आल्यास :– गा–गाय–गाइउं, वा–वाय–वाइउं.*

२ *मराठीत :– करू, देऊ, घेऊ, नेऊ, जाऊ, येऊ*

३ *मागील 'एत्ता' वरील तळटीप पहा.*

| | | | |
|---|---|---|---|
| लह | लद्धुं | वह(वह्) | वोढुं |
| वय (वच्) | वोत्तुं | रुंध | रोद्धुं |
| चिण (चि) | चेउं | गम | गंतुं |

**(आ) इतर काही अनियमित तुमन्तें :–**

(१) पायए (पिव), भोत्तए (भुंज), वत्थए (वस)

(२) गिण्ह – घेत्तुं रुय रोत्तुं

परिगिण्ह – परिघेत्तुं खण खंतुं

## पुरवणी

## अर्धमागधीतील इतर धातूसाधिते

अर्धमागधीतील इतर धातूसाधिते संस्कृतमधून वर्णान्तराने आलेली आहेत. उदा.

**(अ) नामे :–**

**(१) पुं. :–** काम (कम्), हार (हृ), पाय (पद्), भाव (भू), बोह (बुध्), माण, वाद, आयार (आचार) इत्यादी.

**(२) नपुं. :–** नाण (ज्ञान), नयण, वयण, गमण, करण, दाण, सयण (शयन), पाण, भोयण इत्यादी.

**(३) स्त्री. :–** (क) दया, निंदा, हिंसा, खमा (क्षमा), भासा, सेवा, चिंता, भिक्खा, कहा, पूया इत्यादी.

**(ख)** गइ, ठिइ, भत्ति, बुद्धि, मइ, वुट्ठि, विरइ, रइ इत्यादी.

**(ग)** किरिया, विज्जा, चरिया (चर्या) इत्यादी.

**(आ) अव्यये :–** णमुल् अथवा अम् प्रत्ययान्त धातू अव्यय :– जीवग्गाहं.

**(इ) इतर :–** नेत्त (नेत्र), सोत्त(श्रोत्र), दाया (दातृ), गंता, नेया, भत्ता, भासुर, इत्यादी.

प्रकरण १८

# साधित शब्द : तद्धित प्रक्रिया

## २७९ प्रास्ताविक

नाम, सर्वनाम, विशेषण यांना प्रत्यय लागून नामसाधिते[१] अथवा तद्धिते सिद्ध होतात. हे साधित शब्द नाम, विशेषण, अव्यय असे तीन प्रकारचे असू शकतात. अर्धमागधीतील अशा शब्दांची साधनिका पुढे क्रमाने दिली आहे[२].

## २८० भाववाचक नामे

नाम व विशेषण[३] यांना 'त्त' (त्व), 'त्तण' अथवा 'या' (ता) प्रत्यय जोडून भाववाचक नामे सिद्ध होतात.

**(अ) 'त्त' प्रत्यय जोडून :-**

**(१) नामांना :-** मूल-मूलत्त, देव-देवत्त, कंद-कंदत्त, वाणर (वानर)-वाणरत्त, अगव्व (अगर्व)-अगव्वत्त, दास-दासत्त, फल-फलत्त, पुप्फ-पुप्फत्त, सीह-सीहत्त, मच्छ (मत्स्य)-मच्छत्त, पुरिस-पुरिसत्त.

**(२) विशेषणांना :-** असार-असारत्त, वंक-वंकत्त, धुत्त-धुत्तत्त, कुसल-कुसलत्त, भद्द-भद्दत्त, महुर-महुरत्त; महत्तरग-महत्तरगत्त; मम-ममत्त, निम्मम (निर्मम)-निम्ममत्त.

**(आ) त्तण प्रत्यय जोडून :-**

**(१) नामांना :-** तक्कर-तक्करत्तण, धम्म-धम्मत्तण, सावय (श्रावक)-

---

१ *येथे नाम शब्द, सर्वनाम व विशेषण यांचे उपलक्षण आहे.*

२ *सोईसाठी त्या त्या शीर्षकाखाली ही तद्धिते येथे दिलेली आहेत.*

३ *क्वचित् अव्ययांना :- मिच्छत्त (मिथ्यात्व), नाणत्त (नानात्व)*

सावयत्तण समण (श्रमण)–समणत्तण, बाल–बालत्तण, सवत्ती–सवत्तित्तण, दारग–दारगत्तण, विस–विसत्तण, माणुस–माणुसत्तण.

**(२) विशेषणांना** :– बहिर–बहिरत्तण, धरी–धरीत्तण, सुलभ–सुलभत्तण, विचित्त–विचित्तत्तण, तरल–तरलत्तण, दुज्जय–दुज्जयत्तण, तरुण–तरुणत्तण, परवस–परवसत्तण, गंभीर–गंभीरत्तण, बहुल–बहुलत्तण.

**(इ) या प्रत्यय जोडून :–**

**(१) नामांना** :– अलाभ–अलाभया, अलोभ–अलोभया.

**(२) विशेषणांना :–** सुकुमार–सुकुमारया, सम–समया (समता), असार–असारया, सढसील–सढसीलया (शठशीलता).

### २८१ स्वामित्वदर्शक विशेषणे

पुढील प्रत्यय जोडून स्वामित्वदर्शक विशेषणे सिद्ध केली जातात.[१]

**(१) वंत**[२] :– भगवंत, दयावंत, उच्छाहवंत, धणवंत, गुणवंत

**(२) मंत**[३] :– गंधमंत, फासमंत, मूलमंत, कंदमंत, पत्त[३]मंत, फलमंत, वण्णमंत, रसमंत

**(३) आल**[४] :– जडाल (जडा, जटा) रसाल (रस) सद्दाल (सद्द), धणाल (धण), दाढाल (दाढा, दंष्ट्रा)

**(४) आलु**[५] :– दयालु (दया), ईसालु (ईसा)

---

१ ***(क) आलु–इल्ल–उल्ल–आल–वन्त–मन्तेत्तेरमणा मतोः।*** *हेम २.१५९ डॉ. वैद्यांनी 'इ' व 'सि' असे आणखी दोन प्रत्यय दिलेले आहेत. परंतु ते तसे स्वतंत्र मानण्याचे कारण नाही. मूळ संस्कृतशब्दावरून असे शब्द वर्णान्तराने अर्धमागधीत आले आहेत. उदा.*

*(अ) धणि (धनिन्), हत्थि (हस्तिन्), करि (करिन्), अत्थि (अर्थिन्).*

*(आ) ओयंसि (ओजस्विन्), तेयंसि (तेजस्विन्), जसंसि (यशस्विन्), मणंसि (मनस्विन्) 'नहंसि' (नख) हा शब्द अयोग्य सादृश्याने.*

*(ख) म. :– हत्ती, धनी, मायावी, अर्थी, तेजस्वी, यशस्वी इत्यादी.*

२ *'वंत' प्रत्ययान्त विशेषणांचा वापर अर्धमागधीत बराच कमी आहे. (सेन, पृ. १२४)*

३ *कधी "**क्वचिद् भूम्नि वा मतुप्प्रत्ययः।**" मलयगिरी, राय. पृ. १२.*

४ *म. 'आळ' प्रत्यय :– रसाळ, रवाळ इत्यादी.*

५ *म. 'आळु' प्रत्यय :– दयाळु, मायाळु, कृपाळु, पायाळु, स्नेहाळु, कनवाळु.*

**(५) इल्ल**[१] :– कंटइल्ल (कंटय), माइल्ल (माया), नियडिल्ल (नियडि), सासिल्ल (सास–श्वास), कलंकिल्ल (कलंक), दोसिल्ल (दोस), सोहिल्ल (सोहा), लोभिल्ल (लोभ), उदइल्ल (उदय–उदक)

**(६) उल्ल** :– कच्छुल्ल (कच्छु), पाउल्ल (पाय)

**(७) इर** :– गव्विर (गव्व–गर्व)

**(८) मण** :– उवयारमण[२] (उपचारमत्)

## २८२ स्वार्थे 'क' प्रत्ययान्त शब्द

मूळ शब्दांच्या अर्थात कोणताही फरक न करता स्वार्थे 'य', 'ग' (क) हा प्रत्यय विविध शब्दांना लागलेला आढळतो[३].

**(१) नामांना** :– पुत्त–य, मग्गद–य (मार्गद), चक्खुद–य, भाउ–य (भ्रातृ)

रेणु–य, ऊरु–य, धम्मद–य (धर्मद), सामि–य (स्वामिन्), हत्थ–य, हियय–य, पट्ट–य, भत्तघर–ग, मुहुत्ता–ग (मुहूर्त), सुत्त–ग (सूत्र), सररि–ग (शरीर), जोव्वण–ग, दंड–ग, पुप्फ–ग, जुवाण–ग (युवन्), थेर–ग

**(२) सर्वनामांना** :– अह–यं, त–यं (तं), सय, सग (स्व) अप्प–यं (आत्मन्)

**(३) विशेषणांना** :–

**(अ)** बहु–य, कडु–य, निय–य (निज), अणाइ–य (अनादि), थोव–य (स्तोक), थूल–य (स्थूल), सुद्ध–य (शुद्ध) लहु–य (लघु); रत्त–ग (रक्त), तारिस–ग (तादृश)

**(आ)** लज्जालु–य

**(इ)** (तमवाचके) :– जेट्ठग, कणिट्ठ–य, कणिट्ठ–ग

---

१ *(अ) कधी 'इल्लय' असा प्रत्यय लागतो. उदा. सत्थिल्लय (सार्थ), गोट्ठिल्लिय, रइल्लय (रजोवत्)*

*(आ) तेथे झालेला (तत्र भवे) या अर्थीही कधी 'इल्ल' प्रत्यय लागतो. गामेल्लग (ग्राम)*

*(इ) तसेच स्थानदर्शक विशेषणे :– मज्झिल्ल (मध्य), दाहिणिल्ल (दक्षिण), पुरत्थिमिल्ल (पुरस्तात्), मज्झिमिल्ल (मध्यम), पुव्विल्ल, उत्तरिल्ल; उवरिल्ल, हेट्ठिल्ल.*

*म. ईल प्रत्यय :– खालील, वरील, तेथील, येथील, मधील. (उ) संख्यादर्शकांना :– आदिल्ल (आदि), आदिल्लग, पढमिल्ल (प्रथम), पढमिल्लग. (पिशेल, (इं) पृ. ४०७).*

२ *नायासं, पृ. ३*

३ *उदाहरणात स्वार्थे 'ग', 'य' पूर्वी एक आडवी रेघ दिली आहे.*

**(ई) (व.का.धा.वि)** :– जंपंत–य, पुच्छंत–य, नच्चमाण–य, होंत–य[१]; जीवंत–ग, होंत–ग[२]

**(उ) क.भू.धा.वि.** :– रित्त–य (रिक्त), अलद्धं–य (अलब्ध), लद्ध–य; मय–ग (मृत).

**(उ) (वि.क.धा.वि.)** :– वत्तव्व–य, होयव्व–य.

**(ए) (वंत प्रत्ययान्त शब्द) :–** धणवंत–य

**(४) अव्ययांना :–**

इहयं (इह), समयं (सम).

**(क) अर्धमागधीत कधी कधी पुढील प्रत्यय 'स्वार्थे' लागलेले आढळतात:–**

**(१) आलय[३] (आल–य)** :– महालय (महत्), महालिया (स्त्रीलिंगी), महइमहालय, महइमहालिया.

**(२) इल्ल[४] इल्लग** :– बहिरिल्ल (बाहिर), अंधिल्लग (अंध)

**(३) अल्ल, अल्लय** :– अंधल्ल (अंध), महल्ल[५] (महत्), एकल्लय, एक्कल्लय[६]

## २८३ साधित अव्यये

नाम[७], सर्वनाम, विशेषण यांना प्रत्यय जोडून साधित अव्यये सिद्ध होतात. त्यांची साधनिका पुढीलप्रमाणे

---

१ *समरा. पृ. १७५*

२ *समरा. पृ. १७०*

३ *पिशेल (इं), पृ. ४०६*

४ *पिशेल (इं), पृ. ४०७*

५ *उवा, पृ. १०४ पहा.*

६ *म. आंधळा, एकला इत्यादी.*

७ *नाम व विशेषण यांचे नपुं. द्वि.ए.व. हे क्रियाविशेषण अव्ययाप्रमाणे वापरता येते; कधी कधी तर इतर काही विभक्त्यांचे ए.व. हे ही क्रियाविशेषणाप्रमाणे उपयोजिता येते. (काळे, पृ. २२९) अधिक विचारासाठी नाम व विशेषण यांचे उपयोग हे प्रकरण पहा.*

**(अ) नाम व विशेषण[१] यापासून साधित अव्यये :–**

**(१) 'ओ' (तः) प्रत्यय जोडून :–**

पिट्ठ–ओ, संखेव–ओ, परमत्थ–ओ, कम्म–ओ, समास–ओ, वित्थर–ओ, सहाव–ओ, ससत्ति–ओ (स्वशक्ति), धम्म–ओ दूर–ओ, पढम–ओ, विसेस–ओ, अकंड–ओ.

**(२) कधी 'हा' प्रत्यय जोडून :–**

अणंत–हा, बुह–हा.

**(३) कधी 'खुत्तो' प्रत्यय जोडून :–** अणंतखुत्तो.

**(४) कधी 'सो' (शः) प्रत्यय जोडून :–** कमसो (क्रमशः).

**(५) कधी 'हुत्तं' प्रत्यय जोडून[२] :–** सगिहहुत्तं[३] (आपल्या घराकडे)

**(आ) सर्वनामसाधित अव्यये :–**

सर्वनामांना विविध प्रत्यय लावून अव्यये साधली जातात.

**(१) त्थ (त्र) :–** एत्थ (अत्र), तत्थ (तत्र), जत्थ (यत्र), कत्थ (कुत्र), एगत्थ (एकत्र), अन्नत्थ (अन्यत्र), सव्वत्थ (सर्वत्र), अमुगत्थ (अमुत्र), उभयत्थ (उभयत्र).

**(२) त्तो (तस्) :–** एत्तो, तत्तो, जत्तो, कत्तो, सव्वत्तो, एगत्तो, अन्नत्तो.

**(३) ओ (तस्) :–** इओ, तओ, जओ; कओ, कुओ; सव्वओ, परओ, उभयओ, अवरोप्परओ.

**(४) या (दा) :–** जया, तया, कया, सया, सव्वया, अन्नया, एगया.

**(५) हा (था) :–** जहा, तहा, सव्वहा, अन्नहा, इयरहा, उभयहा.

**(६) ह (था) :–** इह.

**(७) हिं :–** जहिं, तहिं, कहिं.

**(८) हे :–** जाहे, ताहे, काहे.

---

१ *संख्याविशेषण–साधित शब्दांचा पुढे स्वतंत्र विचार केला आहे.*

२ *तसेच 'कओ हुत्तं' (कोणीकडे)*

३ *महा. पृ. २७ ब*

**२८४ विशेषणांचा तर-तम-भाव**

पुढील प्रत्ययांच्या साहाय्याने विशेषणांचा तर-तम-भाव दाखविला जातो.

**(अ) तर-भाव :-**

विशेषणांना तर, यर, तराग, यराग, तराय, यराय हे प्रत्यय जोडून तर भाव सिद्ध होतो.

**(१) 'तर' प्रत्यय जोडून :-**

अणिट्ठ-तर, कंततर, महत्तर, विसुद्धतर, सुंदरतर, थिरतर, उज्जलतर, पहाणतर (प्रधान), अप्पतर (अल्प), उच्चतर, गाढतर.

**(२) 'यर' प्रत्यय जोडून :-**

अप्पयर, दढयर, गाढयर, गरुययर (गुरु), तिक्खयर, नीययर (नीच), करुणयर, सुंदरयर, सोहणयर.

**(३) तराग, तराय प्रत्यय जोडून :-**

पभूयतराग, अमणामतराग; अणिट्ठयराग, कंतयराग.

**(४) तराय, यराय प्रत्यय जोडून :-**

अमणामतराय, असुभतराय, हीणतराय; विसिट्ठयराय, अहिययराय (अधिक).

**टीप** :- संस्कृतमधून वर्णान्तराने आलेली काही तर-वाचके अशी सेयं (श्रेयस्), पावीयंस (पापीयस्), कणीयस (कनीयस्). 'उत्तरतर' या शब्दात दोनदा तर-वाचक प्रत्यय आहे[१].

**(आ) तम-भाव :-**

विशेषणांना तम, यम हे प्रत्यय जोडून तम-भाव सिद्ध होतो.

**(१) 'तम' प्रत्यय जोडून** :- अणिट्ठतम, कंततम, महत्तम.

**(२) 'यम' प्रत्यय जोडून** :- अप्पयम (अल्प), दढयम, पिययम.

**टीप** :- संस्कृतमधून वर्णान्तराने आलेली काही तमवाचके अशी :- सेट्ठ (श्रेष्ठ), जेट्ठ (ज्येष्ठ), कणिट्ठ (कनिष्ठ), पाविट्ठ (पापिष्ठ), दप्पिट्ठ (दर्पिष्ठ), धम्मिट्ठ (धर्मिष्ठ), भूइट्ठ (भूयिष्ठ), गरिट्ठ (गरिष्ठ), वरिट्ठ (वरिष्ठ).

---

१ *पिशेल. पृ. २९२*

इ) संस्कृतमध्ये तर व तम हे प्रत्यय 'इष्ठ' प्रत्ययान्त शब्द व अव्यये यांनाही लागतात[१]. अशी अर्धमागधीतील काही रूपे :-

जेट्ठयर, कणिट्ठयर, पाविट्ठतर[२]; सुट्ठुयर, भुज्जतर.

**२८५ संख्यावाचक साधिते**

संख्यावाचक विशेषणापासून नामे, विशेषणे व अव्यये साधता येतात. ही साधनिका पुढीलप्रमाणे :-

**(अ) क्रमवाचक संख्याविशेषणे :-**

एक, दोन इत्यादी संख्यावाचकांवरून पहिला, दुसरा इत्यादी क्रमदर्शक संख्यावाचके साधिली जातात. त्यातील एक ते सहा पर्यंतची अनियमित आहेत, ती अशी :-

पढम[३]; बीय, बिइय, दुइय, दोच्च, दुच्च, दुइज्ज[४]; तइय, तच्च; चउत्थ[५], चउट्ठ; पंचम; छट्ठ.

सात व सातच्या पुढील संख्यावाचके यांना 'म' हा प्रत्यय जोडून क्रमवाचके सिद्ध केली जातात[६].

सत्तम, अट्ठम, नवम, दसम, एक्कारसम (११वा); बारसम, दुवालसम (१२ वा); तेरसम (१३ वा); चउद्दसम, चोद्दसम (१४ वा); पन्नरसम (१५ वा); सोलसम (१६ वा); सत्तरसम (१७ वा), अट्ठारसम, अढारसम (१८ वा), एगूणवीसम, एगूणवीसइम (१९ वा); वीसइम (२० वा); एगवीसइम (२१ वा); बावीसइम (२२ वा); तेवीसइम (२३ वा); चउवीइम (२४ वा); तीसइम (३० वा); चोत्तीसइम (३४ वा); चत्तालीसइम (४० वा); पण्णासम (५० वा); पन्नपन्नइम (५५ वा); असीइम (८०वा); चउरासीइम (८४); पंचासीइम (८५ वा) इत्यादी.

---

१ वा. वे. आपटे, पृ. ५०     २ कथा. पृ. ११४

३ तसेच पढमिल्ल, पढमिल्लग; आइ (आदि); अग्गिम (अग्रिम) (पहिला)

४ म. :- दुजा

५ तसेच 'तुरिय' (तुर्य), चौथा.

६ कधी कधी हा 'म' प्रत्ययरहित क्रमवाचके सुद्धा आढळतात. उदा. तीस (३० वा); अउणापन्न (४९ वा), वीस (२० वा), चउवीस (२४ वा) इत्यादी.

**शेवटचा :–** अंत[१] (अन्त्य), अंतिम, चरिम.

**(आ) क्रमवाचक क्रियाविशेषण अव्यये :–**

वर सांगितलेली क्रमवाचक विशेषणे नपुं.द्वि.ए.व. त योजिली की ती क्रमवाचक क्रियाविशेषणांचे कार्य करतात.

पढमं (पहिल्यांदा), दोच्चं (दुसऱ्यांदा) इत्यादी.

**(इ) समूहवाचक नामे :–**

अर्धमागधीत पुढील समूहवाचक[२] नामांचा उपयोग आढळतो.

दुग, दुय (द्विक), तिय (त्रिक), चउक्क[३] (चतुष्क), ण्णग[३] (पंचक), छक्क (षट्क), दसग[३] (दशक).

**(ई) प्रकारदर्शक विशेषणे :–**

संख्यावाचकांना 'विह' (विध)[४] हा प्रत्यय जोडून प्रकारदर्शक विशेषणे सिद्ध होतात.

एगविह, दुविह, तिविह; चउविह, चउव्विह; पंचविह, छव्विह, सत्तविह, अट्ठविह, नवविह, दसविह; दुवालसविह (१२ प्रकारचे), सोलसविह, अट्ठावीसइविह, बत्तीसइविह, पणयालीसविह (४५ प्रकारचे) इत्यादी.

**(उ) प्रकारदर्शक अव्यये :–**

संख्यावाचकांना 'हा' (धा)[५] प्रत्यय जोडून प्रकारदर्शक अव्यये होतात.

दुहा, तिहा, चउहा, पंचहा, छहा, सत्तहा, अट्ठहा, नवहा, दसहा; दुवालसहा, बारसहा; सयहा (शत).

**(ऊ) आवृत्तिवाचक अव्यये :–**

क्रिया किती वेळा झाली हे दर्शविणारी आवृत्तिवाचक अव्यये संख्यावाचकांपासून साधिली जातात. त्यातील एक ते तीन पर्यंतची अनियमित आहेत, ती अशी :–

---

१ *पा. स. म., पृ. १०*

२ *ही समूहवाचके संस्कृतमधून वर्णान्तराने आलेली आहेत.*

३ *सुपास, ५३६, ५८०, ५१७.*

४ *तसेच, अणेगविह, नाणाविह, विविह.*

५ *तसेच, बहुहा, अणंतहा.*

सइं, एकस्सिं[१] (एकदा), दोच्चं, दुच्चं[२] (दोनदा) , तच्चं[२] (तीनदा)

इतर संख्यावाचकांना[३] 'खुत्तो' (कृत्वः) हा प्रत्यय[४] जोडून दुखुत्तो, दुक्खुत्तो; तिखुत्तो, तिक्खुत्तो; सत्तखुत्तो, सत्तक्खुत्तो इत्यादी. तिसत्तखुत्तो (३ x ७ दा) अणेगसयसहस्सखुत्तो इत्यादी.

**(ए) वीप्सावाचक अव्यये :-**

संख्यावाचकांना 'सो' (शः) हा प्रत्यय[५] लावून वीप्सावाचक अव्यये सिद्ध होतात. उदा. सयसो, सहस्ससो इत्यादी.

**(ऐ) अर्धपूर्णांकदर्शक शब्द :-**

अर्धा पूर्णांक दर्शविण्यास पुढील क्रमवाचकाला[६] 'अड्ढ' वा[७] 'अद्ध' हा शब्द[८] मागे जोडतात. म्हणजे, समजा ४$\frac{१}{२}$ (अर्धा+चार) हा अपूर्णांक हवा असल्यास चारच्या पुढील पाचचे क्रमवाचक घेऊन त्यामागे 'अद्ध' वा 'अड्ढ' शब्द जोडावयाचा :- अद्धपंचम (४$\frac{१}{२}$) याचाच अर्थ असा की क्रमवाचकाच्या मागे अद्ध वा अड्ढ आल्यास तत्पूर्वीचे लगेचचे संख्यावाचक अधिक अर्धा निर्दिष्ट होतो. उदा. 'अद्धसत्तम' म्हणजे सातच्या लगेच पूर्वीचे संख्यावाचक म्हणजे

---

१ *तसेच, एक्कवारं.*

२ *खुत्तो हा प्रत्यय लावूनही दोन व तीन यापासून अव्यये सिद्ध होतात :- दुखुत्तो, तिखुत्तो.*

३ *तसेच, अणंतखुत्तो*

४ *कधी 'हुत्तं' (हेम. २.१५८) प्रत्यय जोडून :- सयहुत्तं, सहस्सहुत्तं.*

५ *तसेच, अणेगसो, बहुसो.*

६ *सेन, पृ. ९९*

७ *कधी पूर्णांकाच्या पूर्वी 'सड्ढ' (सार्ध) जोडून (यावेळी ज्यासह अर्धा तो पूर्णांक घ्यावा लागतो. उदा. :- सड्ढसत्त (७$\frac{१}{२}$). मराठीत हीच तऱ्हा :- साडेसात, साडेआठ, साडेनऊ, साडेपाच, साडेचार इत्यादी.*

८ *कधी अड्ढ शब्द पुढे जोडला जातो :- दिवड्ढ (१$\frac{१}{२}$). 'दसध्दवण्णाइं कुसुमाइं' (समरा. पृ. ३६९) येथे मात्र 'दसद्ध' म्हणजे पांच.*

सहा अधिक अर्धा म्हणजे $६\frac{१}{२}$ निर्दिष्ट होतो.

उदा. दियड्ढ, दिवड्ढ ($१\frac{१}{२}$) (म. :- दीड), अड्ढाइज्ज ($२\frac{१}{२}$) (अडीच), अद्धुट्ठ ($३\frac{१}{२}$) (म. :- औट), अद्धपंचम ($४\frac{१}{२}$) , अद्धछट्ठ ($५\frac{१}{२}$),

अद्धसत्तम ($६\frac{१}{२}$), अद्धट्ठम ($७\frac{१}{७}$), अद्धनवम ($८\frac{१}{२}$), अद्धतेरस ($१२\frac{१}{२}$).

**(१) अर्धशतके : वरीलप्रमाणेच पुढे 'शत' शब्द ठेवून :-**

अड्ढाइज्जाइं सयाइं (२५०), अद्धुट्ठाइं सयाइं (३५०), अद्धपंचमाइ सयाइं (४५०), अद्धछट्ठेहिं भिक्खासएहिं (५५० भिक्षांनी).

(२) अड्ढतेरस सयसहस्साइं ($१२\frac{१}{२}$ शतसहस्रे) इत्यादी.

**२८६ स्त्रीलिंगी रूपे साधणे**

नाम व विशेषण यापासून जरुर तेथे व तेव्हा त्यांची स्त्रीलिंगी रूपे पुढीलप्रमाणे साधिली जातात.

**नामे व विशेषणे :-**

**(अ) अकारान्त नामांना व विशेषणांना पुढील प्रत्यय जोडून :**

**(१) 'आ' हा प्रत्यय जोडून[१] :-**

**(क) नामांना** - बाल-बाला, वच्छ-वच्छा, कोइल-कोइला,

खुज्ज-खुज्जा, अत्तय-अत्तया, सुय-सुया, एलय (एडक)-एलया,

**(ख) विशेषणांना :-** पाव-पावा, तरुण-तरुणा, मागह-मागहा, मुद्ध-मुद्धा, चिराउस-चिराउसा, परवस-परवसा, पिय (प्रिय)-पिया, साहीण (स्वाधीन)-साहीणा, वर-वरा, साम (श्याम)-सामा, पयंड (प्रचंड)-पयंडा.

**(२) 'इगा' वा 'इया' (इका)[१] हा प्रत्यय जोडून :-**

कुमार-कुमारिगा, सावग-साविगा; अज्ज (आर्य)-अज्जिया, दारय-दारिया, बालय-बालिया, पव्वायय-पव्वाइया.

---

*१ म. :- बाला, प्रिया इत्यादी बालिका, कुमारिका इत्यादी.*

महाल (महत्)–महालिया.

**(३) 'ई' हा प्रत्यय[१] जोडून :–**

**(क) नामांना :–** देव–देवी, गोव–गोवी, कुमार–कुमारी, हरिण–हरिणी, दास–दासी, बंभण–बंभणी, पुत्त–पुत्ती, विज्जाहर–विज्जाहरी, वाणमंतर–वाणमंतरी, पुलिंद –पुलिंदी, सबर–सबरी, समण–समणी, सत्थवाह–सत्थवाही, निग्गंथ–निग्गंथी, माहण–माहणी, साण (श्वन्)–साणी.

**(ख) विशेषणांना :–** गोर–गोरी, निम्माणुस–निम्माणुसी, वराक–वराई, तरुण–तरुणी, वामण–वामणी, एयारिस–एयारिसी, एरिस–एरिसी, परंमुह–परंमुही

**(४) वरील नेहमीच्या प्रत्ययाखेरीज इतर प्रत्यय लागूनही स्त्रीलिंगी रूपे सिद्ध होतात :–**

**(क) 'आणी'[२] हा प्रत्यय जोडून :–**

खत्तिय–खत्तियाणी, इंद–इंदाणी.

जिट्ठ (ज्येष्ठ)[४]–जिट्ठाणी.

**(ख) 'इणी'[५] हा प्रत्यय जोडून[६] :–**

सिस्स–सिस्सिणी, जक्ख–जक्खिणी.

**(आ) इकारान्त व उकारान्त नाम विशेषणांना 'णी'[७] प्रत्यय जोडून :–**

**(क) इकारान्तांना :–** हत्थि–हत्थिणी, गाहावइ–गाहावइणी, सामि (स्वामिन्)–सामिणी, गणि–गणिणी (मुख्य भिक्षुणी), सिट्ठी (श्रेष्ठिन्)–सिट्ठिणी चोरसेणावइ–चोरसेणावइणी, एगागि–एगागिणी, अस्सावि–अस्साविणी, विलासि–विलासिणी.

---

१ *संस्कृतमधून वर्णान्तरित :– गुणवई, बुद्धिमई, भगवई, बंधुमई, वसुमई.*

२ *संस्कृमधील या प्रत्ययासाठी वा. वे. आपटे, पृ. ४९ पहा.*

३ *पउम. ३.९६*

४ *सुपास. ४८७*

५ *सेन, पृ. १३३*

६ *म. त ईण प्रत्यय :– वाघीण, सुतारीण, परटीण, सोनारीण, डॉक्टरीण, वकिलीण, माळीण, कोळीण, मामलेदारीण, जाखीण इत्यादी.*

७ *संस्कृत इन्नन्त शब्दांच्या अन्त्य न् मध्ये येणारा ई त्यावरून हा प्रत्यय.*

८ *सुर. ११.२११ संस्कृतवरून :– गुरु–गुव्विणी .*

**(ख) उकारान्तांना :–** भिक्खु–भिक्खुणी, साहु–साहुणी; गुरु[८]–गुरुणी.

**(इ) (१)** कर्तरि व कर्मणि व. का.धा.वि. ची स्त्रीलिंगी रूपे प्रायः 'ई' प्रत्यय[१] जोडून होतात.

**(१)** गायंती, ण्हायंती, देंती, कहेंती, जंती, निज्जंती, दिज्जंती.

**(२)** समाणी, आहारेमाणी, पेहमाणी, भुंजमाणी, झायमाणी, निवडमाणी; एज्जमाणी, हुज्झमाणी, दिज्जमाणी.

**(२)** कधी 'आ' प्रत्यय लागून होतात.

**(१)** वड्ढंता, पडंता, हुंता[२], होंता[३].

**(२)** निवत्तमाणा, उज्जोएमाणा, जंपमाणा, वसमाणा, कंदमाणा; दिज्जमाणा, भण्णमाणा.

**(ई) क.भू.धा.वि. आणि वि.क.धा.वि. यांची स्त्रीलिंगी रूपे प्रायः 'आ' प्रत्यय[४] जोडून होतात.**

**(१) (क.भू.धा.वि.)** :– मुक्का (मुक्त), चत्ता (त्यक्त), हया (हत) पारद्धा, उवविट्ठा, पसुत्ता, पडिया, नीया, गहिया, पसूया, पत्ता (प्राप्त)

**(२) (वि.क.धा.वि.) :–** वंदणिज्जा, अच्चणिज्जा, पुच्छेयव्वा, भासियव्वा, भणियव्वा.

**(उ) क्रमवाचक विशेषणांची स्त्रीलिंगी रूपे :–**

**(१) पढम, दोच्च, तच्च यांना 'आ' प्रत्यय :–** पढमा, दोच्चा, तच्चा.

**(२) चउत्थ ते अट्ठम पर्यंत 'आ' व 'ई' हे दोन्ही प्रत्यय :–** चउत्था, चउत्थी, चोत्थी; पंचमा, पंचमी; छट्ठा, छट्ठी; सत्तमा, सत्तमी; अट्ठमा, अट्ठमी.

**(३) पुढील क्रमवाचाकांना 'ई' प्रत्यय :–** दसमी इत्यादी

(ऊ) 'इर' प्रत्ययान्त विशेषणांची स्त्रीलिंगी रूपे 'ई' प्रत्यय लागून झालेली

---

१ ***ई च स्त्रियाम्।*** *प्रा. प्र. ७.११*

२ *सुपास. ४९०* ३ *सुर. ८.१८*

४ *क्वचित् ई प्रत्यय लागून :– संजय (संयत)–संजई*

आढळतात.

विलविरी, रोविरी (रडणारी), कंखिरी[1]

**(ए)** 'तर' प्रत्ययान्त विशेषणांची स्त्रीलिंगी रूपे 'आ' व 'ई' हे प्रत्यय जोडून होतात.

(१) वल्लहयरा, सोहणयरा.

(२) तिव्वयरी, अहिययरी (अधिक), इट्ठयरी, गुरुयरी[2]

**(ऐ)** काही शब्दांची स्त्रीलिंगी रूपे पुढीलप्रमाणे अनियमित आहेत :-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पिया | माया | पुम | इत्थी | जुवाण जुवई |
| पइ | पत्ती | पुत्त | कन्ना | पुरिस इत्थी |
| भाया | ससा | ससुर | सस्सू | नर नारी |
| वर | वहू | जामाया | सुण्हा, ण्हुसा } | साण (श्वन्) सुणी |

**२८७ शब्दांची अकरणरूपे साधणे**

स्वरादि शब्दांपूर्वी 'अण्' आणि व्यंजनादि शब्दांपूर्वी 'अ' जोडून त्या त्या शब्दांची अकरणरूपे सिद्ध होतात.

**(१) नामांची :-** (क) अकाल, अधम्म, अहिंसा, अजीव अविणय, अणाह, अकम्म, अरइ, असाहु, अदीण.

**(ख)** अणंग, अणगार, अणसण, अणायरिय (अनार्य), अणट्ठ (अनर्थ), अणंत, अणायार (अनाचार).

**(२) विशेषणांची :-**

**(क) (१)** अप्पिय, असमत्थ, अचवल, अतुरिय, अदूर, असेस, अकुसल, अपंडिय, अलज्जिर, अपवित्त, अमूढ, अविसुद्ध.

**(२)** अणंत, अणिट्ठ, अणाउल (अनाकुल), अणुत्तर, अणेग.

---

*१ कथा. पृ. ११७* *२ कथा. पृ. १०४*

**(ख) व.का.धा.वि. ची :-**

**(१)** असहमाण, अकहंती, अकरिंत, अविकंपमाण, अदिंत

**(२)** अणिच्छमाण, अणालवंती.

**(ग) क.भू.धा.वि. ची :-**

**(१)** अकय, अबुद्ध, अणियय (अनियत), अकंत (अकांत)

**(२)** अणागय, अणुव्विग्ग, अणणुन्नाय, अणुब्भूय (अनुद्भूत)

**(घ) वि.क.धा.वि. ची :-**

**(१)** असज्झ, अकहणिज्ज, अलघणीय, अचिंतणीय, अकराणिज्ज

**(२)** अणइक्कमणिज्ज

**(३) ल्यबन्तांची**[1] **:-**

**(१)** अगच्छित्ता, अदट्ठूण, अकहिऊण, अगणिऊण, अभुंजिऊण.

**(२)** अणापुच्छित्ता, अणवेक्खिऊण, अणापुच्छिऊण, अणालोचिऊण.

---

१ *तुमन्ताच्या बाबतीतही अकरणरूपे वरीलप्रमाणेच होतात :- अचिंतेउं (नाण. १.२२३), इत्यादी. पण यावेळी प्रायः तुमन्तांचा उपयोग ल्यबन्ताप्रमाणे आढळतो.*

**पुरवणी**

**अर्धमागधीतील इतर तद्धित शब्द :–**

**(अ)** अर्धमागधीतील इतर तद्धित शब्द संस्कृतमधून वर्णान्तराने अर्धमागधीत येतात.

**(१) भाववाचक नामे** :– गारव (गौरव), मद्दव (मार्दव), जोव्वण (यौवन), मोण (मौन), सुंदेर (सौंदर्य) इत्यादी.

**(२) अपत्यार्थी** :– वासुदेव, माहेसर (माहेश्वर), माणव, दोवई (द्रौपदी), दोहित्ती (दौहित्री), दाणव (दानव) इत्यादी.

**(३) पित्रर्थी** :– पियामह, मायामह इत्यादी.

**(४) विकार, प्राचुर्य** :– जलमय, अन्नमय.

**(५) त्याचा तेथील या अर्थी** :– वेसालिय (वैशालीचा), अज्झत्थिय (आध्यात्मिक), आरिस (आर्ष), साहाविय, माणसिय, पारलोइय, सारीरिय, पेइय (पैतृक), लोइय (लौकिक) इत्यादी.

**(आ)** काही संस्कृतमधील ताद्धितांची आदेशवजा अनियमित रूपे होतात. यावत्–जेत्तिअ, जेद्दह; एतावत्–एत्तिअ, एद्दह; कियत्–केत्तिअ, केद्दह[1].

---

१ *मार्कं. ४.६४*

## प्रकरण १९

# समासविचार

### २८८ अर्धमागधीतील समासविचार

प्राकृत वैयाकरणांनी प्राकृतमधील समासांचा विचार स्वतंत्रपणे केलेला नाही. कारण प्राकृतमधील[१] समासविचार हा संस्कृतमधील समास[२] विचारावरूनच आलेला[३] आहे. म्हणून संस्कृतातील समासविचाराधारेच अर्धमागधीतील समासविचार पुढे केला आहे.

### २८९ समास

अनेक शब्दांतील परस्पर संबंध दाखविणारे शब्द किंवा त्या शब्दांचा इतर वस्तूंशी संबंध दाखविणारे शब्द अथवा विभक्ति प्रत्यय लुप्त होऊन, अर्थामध्ये बदल न होता त्यांच्या संयोगाने व्याकरणदृष्ट्या जे एक विशिष्ट पद सिध्द होते त्यास सामासिक शब्द वा समास म्हणतात. उदा. चोरभयं, दंडहत्थो इ.

### २९० समासाची सामान्य वैशिष्ट्ये

१) समासात आलेल्या घटक-शब्दांचा परस्पर संबंध वा त्यांचा इतर वस्तूंशी असणारा संबंध समासात प्रत्यक्षपणे व्यक्त झालेला असत नाही तथापि

---

१ *प्राकृतमधील समासांच्या अधिक व थोड्या फार परंपरा-भिन्न माहितीसाठी Nominal Composition in Middle Indo-Aryan by G. V. Davane हा ग्रंथ पहाण्यास हरकत नाही.*

२ *तादृश एवात्र तु समासाः। मार्कं ८.३४*

३ *अर्धमागधीतील समासघटना जरी थोड्याफार प्रमाणात संस्कृतसारखी आहे, तरी समासातील यंदाचा क्रम व समासाचा अन्त या बाबतीत अर्धमागधीतील समासात कधी कधी भिन्नता आढळते. उदा. तडिविमल सरिस (विमलतडिसरिस), पंचासवपरिन्नाया (परिन्नायपंचासवा) परीसह रिऊदंता (दंतपरीसहरिऊ), चउक्कसायावगए (अवगयचउक्कसाए), आइण्णजणमणुस्सा (जणमणुस्साइण्णा)*

हा संबंध व्यक्त करण्याचे सामर्थ्य त्या संपूर्ण समासात असते.

२) असा संबंध असण्यास किमान दोन शब्दांची आवश्यकता असल्याने समासात किमान दोन पदे पाहिजेतच[४].

३) संबंध समासाचा अर्थ हा त्यातील पदांच्या व्यक्तिगत स्वतंत्र अर्थाहून भिन्न असला तरी त्या अर्थाच्या संबंधातूनच निर्माण होणारा जो अर्थ तो त्या संपूर्ण सामासाचा अर्थ होय. उदा. 'भवभय' मध्ये 'भवापासून भय' हा अर्थ जरी भव आणि भय यांच्या व्यक्तिगत अर्थाहून भिन्न आहे. तरी तो त्यांच्या अर्थाच्या संबंधातूनच सिध्द झालेला आहे.

४) अनेक शब्दांचे अर्थदृष्ट्या एकीकरण होऊन समास बनत असल्याने

५) समासात जे अनेक शब्द येतात. त्यांतील शेवटच्या शब्दाखेरीज इतर सर्वांच्या१ विभक्ती नाहीशा होतात. साहजिकच शेवटच्या खेरीज इतर शब्द आपापल्या मूळ स्वरूपात ठेवले जातात.

६) व्याकरणदृष्ट्या वाक्यात समासाचे जे लिंग, वचन, विभक्ति[२] असेल ती सर्व त्या समासातील फक्त अन्त्यपदाला लागू पडतात. उदा. सुहणिसण्णे, जाणगिहेसु, उच्चनीयमज्झिमकुलाइं इत्यादी

**२९१ समासाची पदे**

जे शब्द एकत्र येऊन समास बनतो त्यांना समासाची पदे म्हणतात. पदांच्या समासातील स्थानक्रमावरून त्यांना पूर्वपद, उत्तरपद अशा संज्ञा दिल्या जातात. उदा. 'नीलुप्पल' मध्ये 'नील' हे पूर्वपद व उप्पल हे उत्तरपद होय.

नामे, विशेषणे, धातुसाधिते व अव्यये ही समासात पद म्हणून येऊ शकतात.

**२९२ समासाचा विग्रह**

समासातील पदांचा परस्पर संबंध किंवा त्या पदांचा इतर वस्तूशी असणारा संबंध –जो समासात प्रत्यक्षपणे व्यक्त असत नाही.

---

१ *कधी समासातील पूर्वपदाची विभक्ती तशीच राहते. अशा समासांना 'अलुक समास ' म्हणतात. उदा. अंतेवासि, खेयर, जुहिट्ठिल इत्यादी*

२ *अव्ययीभाव समास हा जरी नपु. द्वि. ए. व त असतो. तरी अर्धमागधीत कधी त्याची इतर विभक्ती आढळते. उदा. जावज्जीवाए, पडिरूवेण इत्यादी*

विभक्ती प्रत्ययांच्या साहाय्याने किंवा इतर योग्य शब्दांच्या साहाय्याने स्पष्ट होईल. अशातऱ्हेने समासाची पदे वेगळी करून दाखविणे याला सामासाचा 'विग्रह करणे' असे[१] म्हणतात. उदा. गगणपडियं-गगणाओ पडियं। (पंचमी विभक्तिचा उपयोग) कमलमुहं-कमल इव मुहं, अथवा मुहं एव कमल। देवदाणवा-देवा य दाणवा य। इत्यादी

## २९३ समासाचे प्रकार

अर्थदृष्ट्या समासांतील पदांना कमी जास्त महत्त्व प्राधान्य असते. उदा. 'रत्तकमलं' मध्ये 'कलम' ह्या उत्तरपदाला महत्त्व आहे. अशा महत्त्वयुक्त पदाला 'प्रधान' पद व उरलेल्या कमी महत्वाच्या पदाला 'गौण' पद म्हणतात.

अर्थदृष्टीने समासात कधी दोन्ही पदांना (उदा. जीवा जीवा) कधी उत्तरपदाला (उदा. विसमरणं), कधी पूर्वपदाला (उत्त. पइदिणं) तर केव्हा दोन्ही पदांनी दर्शित होणाऱ्या अन्यपदाला (उदा. चंदव्यणा) प्राधान्य असते. यावरून समासाचे चार मुख्य प्रकार होतात ते असे :

१) उभयपदप्रधान (द्वंद्व) २) उत्तरपदप्रधान (तरपुरूष) ३) पूर्वपदप्रधान (अव्ययीभाव) व ४) अन्यपदप्रधान (बहुव्रीहि)

या चतुर्विध समासांतील अव्ययीभाव सोडून इतर तिघांचे अनेक पोटभेद आहेत. या समासांची व त्यांच्या पोटभेदांची सामान्य व विशेष लक्षणे विग्रहासह उदाहरणे आता पुढे दिली आहेत

## २९४ द्वंद्व (दंद)

द्वंद्व हा उभयपद प्रधान समास आहे. तो कधी समूहाच्या कल्पनेचा दर्शक असतो तर कधी स्वतंत्रपणे विचारात घेतलेल्या वस्तूंचा निदर्शक[२] असतो.

---

१ *जेव्हां विग्रहवाक्य देता येत नाही वा समासातील पदांचा उपयोग करून विग्रह देता येत नाही तेव्हां 'नित्य समास' होतो (काळे पृ. ११४)*

२ *द्वंद्व समास समूह कल्पनादर्शक (समाहार) वा स्वतंत्र वस्तुदर्शक (इतरेतर) करणे हे अर्थानुरूप बोलणाऱ्यांच्या मर्जीवर अवलंबून असते.*

विग्रहात (अनुस्वारापुढे) 'च' अथवा (स्वरापुढे) 'य' यांचा[१] उपयोग करावा लागतो व पदांची प्रथमा विभक्ति वापरली जाते.

### अ) इतरेतर द्वंद्व

इतरेतर द्वंद्व समासात वस्तु एकेकट्या गणल्या जातात. म्हणजेच त्या स्वतंत्रपणे विचारात घेतल्या जातात. साहजिकच हा समास नेहमी अनेक वचनी असतो. आणि अन्त्य पदाच्या लिंगावरून संपूर्ण समासाचे लिंग ठरते.

उदाहरणे : १) बीयहरियाइं – बीयाणि य हरियाइं च । २) गामनयरेसु– गामा य नयरा य तेसु। ३) हिरीसिरिधिइकित्तिबुध्दिलच्छीओ– हिरी य सिरीय धिई य कित्ती य बुध्दी य लच्छी य ।

### आ) समाहार द्वंद्व

समाहार द्वंद्वात[२] वस्तु समूहदृष्टीने विचारात घेतल्या असल्याने हा समास समुदायवाचक वा एकदी संयुक्त कल्पना दाखविणारा असतो. हा समास प्रायः[३] नपुं. ए. व. त असतो[४].

उदाहरणे : १) मंससोणिय–मंसं य सोणियं च । २) कुथुपिवीलियं – कुंथू य पिवीलिया य तेसिं समाहारो। ३) अन्नपाणं–अन्नं च पाणं च । ४) वहुवरं – वहू य वरो य।

टीप : समास 'इतरेतर' करावा की 'समाहार' करावा हे वक्त्याच्या इच्छेवर रहात असल्याने कधी कधी त्याच पदांचा समास इतरेतर तसाच 'समाहार'

---

१ *कधी 'वा' या विकल्पवाचकाचा विग्रहात उपयोग केला जातो.*

२ *प्रायः शरीर अवयव वाचक शब्द , कीटक वाचक शब्द, स्वाभाविक वैर असणारे प्राणी दाखविणारे शब्द स्वाभाविक विरोध दर्शक शब्द इत्यादींचा समाहार द्वंद्व केलेला आढळतो.*

३ *प्रायः म्हणण्याचे कारण असे की अर्धमागधीत कधी अन्त्यपदाचे जे लिंग तेच समाहार द्वंद्वाचेही लिंग आढळते. उदा. छुहातण्हाए।*

४ *विग्रहात 'च' वा 'य' शिवाय तेसिं समाहारो असे शब्दही वापरले जातात.*

आढळतो. उदा. गंधमल्ले, गंधमल्लं, पाणभूयाइं, पाणभूयं इत्यादी

इ) काही द्वंद्व समास 'वा' चा उपयोग करून सोडविले जातात. १) निंदापसंसासु-निंदाए वा पसंसाए वा। २) लाभालाभे-लाभे वा अलाभे वा।

ई) दोन विशेषणे भिन्न वस्तूंशी संबंधित असतील तर त्यांचा कधी द्वंद्व[१] समास होतो.

१) उच्चावयं-उच्चं च अवयं च । २) उच्चनीयं-उच्चं च नीयं च।

## २९५ तत्पुरूष (तप्पुरिस)

तत्पुरूष समासांत पूर्वपद गौण असून उत्तरपद प्रधान असते आणि पूर्वपदाने उत्तरपदाचा अर्थ मर्यादित होतो.

उत्तरपदाचे जे लिंग व वचन तेच संपूर्ण समासाचे लिंग व वचन असते.

अ) विभक्ती तत्पुरूष

विभक्ती तत्पुरूष समासाच्या विग्रहात पूर्वपद हे द्वितीया ते सप्तमी पर्यंतची कोणतीतरी विभक्ति घेते. त्यावरून द्वितीया तत्पु, तृतीया तत्पु. इत्यादी संज्ञा दिल्या जातात.

१) द्वितीया[२] तत्पुरूष :

१) पुढविनिस्सियं-पुढविं निस्सियं। २) हिययगएण-हिययं गएण। ३) पमोयपत्तो-पमोयं पत्तो। ४) उप्पहपवन्ना - उप्पहं पवन्ना। ५) संसारपवन्नाणं-संसार पवन्नाणं।

२) तृतीया तत्पुरूष :

पुढे सांगितलेल्या परिस्थितीत तृतीया तत्पु होतो.

१) पूर्वपद कर्तृवाचक वा साधनवाचक उत्तरपद क. भू. धा. वि.

१) भुयंगउक्को -भुयंगेण उक्को। २) अन्नकउं-अन्नेण कडं।

---

१ *दोन विशेषणांचा वा धातु विशेषणांचा द्वंद्व समास वैयाकरणांना संमत नाही. असे समास अनियमित द्वंद्व म्हणावे*

२ *श्रित, गत, प्राप्त इत्यादी शब्द उत्तरपदी असता द्वितीया तत्पुरूष समास होतो.*

३) विसलित्तं-विसेण लित्त।

२) पूर्वपद साधनवाचक उत्तरपद परिणामदर्शक

१) भयाउला-भएण आउला। २) मोहाउरो मोहेण आउरो।

३) विओगविहुरा-विओगेण विहुरा। ४) भयकायरा-भएण कायरा।

३) उत्तरपदीं सम, मिश्र इत्यादी शब्द असता :

१) महुकारसमा-महुकारेणं समा। २) विसमिस्सं-विसेणं मिस्सं

४) उत्तरपदीं संपन्न, युक्त, हीन, रहित, सहित इत्यादी शब्द असता :

१) संजमसंजुत्ते - संजमेणं संजुत्ते। २) बहुगुणकलिया-बहुगुणेहिं कलिया। ३) अत्थविहूणो-अत्थेण विहूणो। ४) विणयसंपन्नो विणएणं संपन्नो । ५) जल विरहियं-जलेणं विरहियं। ६) सामंतमंतिसहिओ-सामंत मंतीहीं सहिओ ।

५) इतर काही - जाइअंधे -जाईए अंधे

३) चतुर्थी[1] तत्पुरूष :

१) भिक्खकालो - भिक्खट्ठा कालो २) उदगभवणाणि - उगट्ठा भवणाणि। ३) सुहधम्मे - सुहाए (सुख) धम्मे। ४) वायसपिंडियाओ-वायसट्ठा पिंडियाओ।

४) पंचमी तत्पुरूष :

पुढे सांगितलेल्या परिस्थितीत पंचमी तत्पु होतो.

१) उत्तरपदी भय, भीति वा तदर्थक शब्द असता :

१) मरणभयं - मरणाओ भयं। २) वग्घभएण - वग्घाओ भएण।

---

१ *अर्धमागधीत चतुर्थी विभक्ति स्वतंत्र नसल्याने प्रायः चतुर्थी प्रत्ययान्त रूपाऐवजी शब्दांला जोडून अट्ठा या शब्दाचा उपयोग विग्रहात करतात.*

३) जम्ममरणभीया–जम्ममरणेहिंतो भीया

२) अपादान–दर्शक शब्द उत्तरपदी असता :

१) रूक्खपडणं–रूक्खाओ पडणं। २) धम्मभट्ठो–धम्माओ भट्ठो।

३) भयविमुक्को–भयाओ विमुक्को।

३) निवृत्ति–दर्शक शब्द उत्तरपदी असतां

मज्जप्पमायविरओ – मज्जप्पमाएहिंतो विरओ।

५) षष्ठी तत्पुरूष :

१) कुसग्गे–कुसग्ग अग्गे २) कहावसाणे–कहाए अवसाणे। ३) मूलच्छेएण–मूलस्स छेएण ४) नरिंदो–नराण इंदो । ५) गामसयं–गामाणं सयं। ६) गहवई–गहस्स पई ।

टीप : षष्ठी तत्पु. समासात प्रधानपद पूर्वपदी असता विग्रह पुढीलप्रमाणे होतो :

१) रायमग्गो –मग्गाणं राया। २) रायहंसो – हंसाणं राया। ३) अध्दरज्जं–रज्जस्स अध्दं।

६) सप्तमी तत्पुरूष

पुढील परिस्थितीत सप्तमी तत्पु. होतो.

१) कुशल, निपुण, वर इत्यादी व तदर्थक शब्द उत्तरपदी असता :

१) गाणकुसले–गाणंमि कुसले २) जुज्झनिउणो–जुज्झे निउणो। ३) मुणिवरो –मुणीसुं वरो। ४) सुत्तत्थविसारए–सुत्तत्थंसि विसारए ।

२) पूर्वपद स्थल–काल–दर्शक, उत्तरपद क्रियादर्शक :

१) राइभोयणं–राईए भोसणं २) गिहवासो – गिहंमि वासो ।

३) रत, आसक्त , अनुरक्त, व्यापृत इत्यादी व तदर्थक शब्द उत्तरपदी असता

१) नाणापिंडरया–नाणापिंडेसुं रया। २) धम्मनिरओ–धम्मंमि निरओ ३) रसगिद्धे–रसेसु गिद्धे। ४) झाणवावडो–झाणंसि ५) विसयासत्ता–विसएसु आसत्ता।

४) इतर उदाहारणे : जीवदया – जीवेसु दया।

आ) कर्मधारय (कम्मधारय)

कर्मधारय हा तत्पुरूषाचाच एक पोटभेद मानला जातो. कर्मधारय समासातील पदे पुढे सांगितल्याप्रमाणे भिन्न भिन्न प्रकारची असू शकतात. त्यामुळे विग्रहाच्या पध्दतीही थोड्याफार भिन्न होतात.

१) पूर्वपद विशेषण, उत्तरपद विशेष्य[१] :-

१) उसिणोदगं - उसिणं उदगं । २) दिव्वालंकारा-दिव्वा अलंकारा।

३) मत्तहत्थिं-मत्तं हत्थि। ४) सुण्णागारेसु-सुण्णाइं अगाराइं तेसु।

२) पूर्वपद विशेष्य, उत्तरपद विशेषण :

१) पुरिसुत्तमे-उत्तमे पुरिसे। २) पुप्फसुहुमं-सुहुमं पुप्फं । ३) नराहमो-अहमो नरो । ४) नरिंदाहमो - अहमो नरिंदो।

३) पूर्वपद विशेष्य, उत्तरपद विशेषण (औपम्य अभिप्रेत)) :

१) हिमसीयलं-हिमं इव सीयलं। समुद्दगंभीरो-समुद्दो इव गंभीरो। ३) कुसुमसुकुमारा-कुसुमं इव सुकुमारा। ४) घणनीलो - घणो इव नीलो।

४) दोन्ही पदे (एकाच विशेष्याची विशेषणे :

१) सीउण्हं-सीयं च उण्हं च। २) सेयरत्ते - सेए य रत्ते य ३) दीहुण्हा-दीहा य उण्हा य। ४) रिध्दात्थिमियसमिध्दा-रिध्दा य थिमिया य समिध्दा य। ५) हट्ठतुट्ठे - हट्ठे य तुट्ठे य। ६) मिउसीयलो (पवणो)-मिऊ य सीयलो य ।

५) दोन्ही पदे (एका मागोमाग होणाऱ्या क्रिया दाखविणारी)

क. भू. धा. विशेषणे[१] :

१) कीयगडं - कीयं च कडं च । २) सुत्तजागरिया[२] - पढमं सुत्ता पच्छा

---

*१ कधी विग्रह : नीलुप्पलं-नील च तं उप्पलं च-असाही केला जातो.*

जागरिया। ३) मज्जियजिमिओ -पढमं मज्जिओ पच्छा जिमिओ। ४) सुत्तविडब्धा-पढमं सुत्ता पच्छा विउध्दा ५) ण्हायविलित्तो-पढमं ण्हाओ पच्छा विलित्तो। ६) गहिममुक्का-पढमं गहिया पच्छा मुक्का ७) भुत्तमुत्ता-पढमं भुत्ता पच्छा मुत्ता।

६) दोन्ही पदे विशेष्ये

१) वडपायवस्स -वडो पायवो, तस्स। २) उमादेवी-उमादेवी। ३) गंगानई गंगा नई ४) भारूंडपक्खी-भारूंडो पक्खी ५) नंदणुज्जाणे-नंदणे उज्जाणे

७) पूर्वपद उपमेय, उत्तरपद उपमान :

१) मुहकमलं-मुहं कमलं विय। २) बाहुलया-बाहू लया इव । ३) रायरिसी - राया रिसी इव।

टीप : इंद, वग्घ, पुंगव, रिसह, सीह, सद्दूल इत्यादी शब्द उत्तदपदी असता पुरिसवग्घे-पुरिसे वग्घे-पुरिसे वग्घे इव । या प्रमाणेच पुरिस,सीहे, नरवसभा, वण्हिपुंगव, रायवसभ इत्यादी

८) पूर्वपदं आरोग्य, उत्तरपद आरोपणीय :

१) दयाधम्मो-दया एव धम्मो। २) ईसानलो-ईसा एव अनलो। ३) जररक्खसी-जरा एव रक्खसी। ४) भवसागरो-भवो एव सागरो। ५) हिययगुहा-हिययं एव गुहा ६) भवसमुद्दो-भवो एव समुद्दो।

९) पूर्वपद अव्यय[३] :

१) सुकुलं-सोहणं कुलं । २) कुधम्मो-कुच्छिओ धम्मो ३) सुगुरू-साहू गुरू। ४) दुपुत्तेण-दुट्ठो पुत्तो, तेण। ५) आरत्तं ईसि रत्तं। ६) अंतरप्पा-अंतग्गओ

---

१ *पूर्वपद क. भू. धा. वि. उत्तरपद त्याच क. भू. धा वि. चे अकरण रूप असताही कर्मधारय होतो. उदा. कयाकयं-कयं च अकय च, गयागयं गयं च अगयं च।*

२ *पुष्कळदा विग्रहात 'पढमं व पच्छा यांचा उपयोग केला जातो.*

३ *येथे अव्ययाचा उपयोग विशेषणासारखा असतो. उदा. कु-कुत्सित, सु-शोभन, आ-थोडे से, दुर-दुष्ट इ. विग्रहात अव्ययाचा अर्थ येतो.*

अप्पा। ७) निस्सेयसं निच्छियं सेयं ८) कापुरिसा-कुच्छिया पुरिसा।

१०) पूर्वपद क्रियाविशेषण अव्यय :
परमदुच्चरं - परमं दुच्चरं।

११) 'अंतर' शब्द उत्त्रपदी संपूर्ण समास नपुंसकलिंगी :
१) देसंतरं-अन्नो देसो। २) जम्मंतरं-अन्नो जम्मो ३) गामंतरं-अन्नो गामो। ४) अवत्थंतरं - अन्ना अवत्था।

१२) काही अनियमित कर्मधारय समास असे :
१) अकिंचणो-न विज्जइ किंपि (किंचण) अस्स २) अहमहमिया-अहं अहं ति जीसे किरियाए वुच्चइ।

इ) द्विगु (दिगु)
द्विगु हा कर्मधारयाचा एक पोटभेद मानला जातो. यातील पूर्वपद हे संख्या विशेषण असते. संपूर्ण समास समाहार दर्शवीत असल्याने तो प्रायः नपुं.[१] ए. व. त आढळतो.
उदाहरणे : १) तिहुयणं-तिण्हं भुवणाणं समाहारो। २) तिलोयं- तिण्हं लोयाणं समाहारो। ३) अट्ठमंगल-अट्ठण्हं मंगलाणं समाहारो। ४) सडंगं-छण्हं अंगाणं समाहारो। ५) तिरत्तं[२]-तिण्ह रत्तीणं समाहारो। ६) दोमासं-दोण्हं मासाणं समाहारो ७) चउरंगं-चउण्हं अंगाणं समाहारो। ८) चउद्दससुमिणं-चउद्दसण्हं सुमिणाणं समाहारो।

---

१ *अर्धमागधीत काही द्विगु समासात अन्त्य पदाचेच लिंग आढळते. पंचणमोक्कारो-पंचण्हं नमोक्काराणं समाहारो। छज्जीवणिया- छण्हं जीवणिमायाणं समाहारो।*

२ *तसेच पंचरत्तेणं, सत्तरत्तं, दसरत्तं इत्यादी*

अ) संस्कृतमध्येहि द्विगु समास कधी ईकारान्त[१] स्त्रीलिंगी असतो. तसाच तो प्राकृतातहि आढळतो.

१) पंचवडी–पंचण्हं वडाणं समाहारो। २) तिवई (त्रिपदी)–तिण्हं पयाणं समाहारो। ३) सत्तसई–सत्तण्ह झयाणं समाहारो।

ई) मध्यमपदलोपी तत्पुरूष

मध्यमपदलोपी[२] तत्पुरूष समासात दोन पदांतील संबंध स्पष्ट करण्यास लागणारे पद लुप्त झालेले असते. विग्रहात त्याचा उपयोग केला जातो.

उदाहरणे १) गंधहत्थी–गंधविसिट्ठो (अथवा) गंधप्पहाणो हत्थी २) विसमंसं–विसमिस्सियं मंसं ३) कमलसरोवरं – कमलजुत्तं सरोवरं। ४) नाममुद्दा–नामकित्रा मुद्दा ५) जयहत्थी–जयावहो हत्थी ६) चिंतामणी–चिंतापूरगोमणी ७) कणयकेयणाइं–कणयमयाइं केयणाइं। ८) कुलबालिया–कुलजुत्ता बालिया।

उ) उपपद तत्पुरूष

ज्याचा स्वतंत्रपणे उपयोग करता येत नाही असे एखादे धातुसाधित उपपद तत्पुरूष समासात उत्तरपद[३] असते. साहजिकच त्या उत्तरपदाचा विग्रहात उपयोग करता येत नाही म्हणून विग्रहात मूळ धातु (वा धातु साधित) याचा उपयोग केला जातो.

उदाहरणे : क) १) वणयरो[१] – वणे चरइ त्ति। २) २ सुहदो–सुहं देइ त्ति। ३) सागरंगमा–सागरं गच्छइ त्ति। ४) मुहाजीवी–मुहा जीवइ त्ति ५) निरयंगामी–निरयं गच्छइ त्ति। ६) नाणदंसणधझरे – नाणदंसणाइं धरइ त्ति। ७) उरगो–उरेण गच्छइ त्ति। ८) महीवालो–महिं पालेइ त्ति। ९) लोगपज्जोयगरे३–लोगपज्जोयं करेइ त्ति। १०) दोसन्नू–दोसं जाणइ त्ति। ११) जोव्वणत्थो–जोव्वणे चिट्ठइ त्ति। १२) इंदई–इंदं जयइ त्ति।

---

१ *पूर्वपद नाम, अव्यय असू शकते.*

२ *याप्रमाणेच जलयरा, थलयरा, निसायरो इत्यादी*

३ *याप्रमाणेच अभयदए, मग्गदए, चक्खुदए, सरणदए इत्यादी*

४ *याप्रमाणेच तित्थकरो इत्यादी*

५ *याप्रमाणेच दूरत्थो, गारत्थो इत्यादी*

ख) १) अंड्या–अंडाओ जाय त्ति। २) अत्तओ–अत्तणो जाओ त्ति। ह्व) कुलया–कुलाओ जाय वि।

ग) १) सुलहो–सुहेणं लब्भइ त्ति। २) दुल्लहं–दुक्खेण लब्भइ त्ति । ३) सुयरं–सुहेण कीरइ त्ति। ४) दुत्तरो–दुक्खेणं तीरइ त्ति। ५) दुप्परए–दुक्खेण पूरिज्जइ त्ति

घ) काही अनियमित उपपद तत्पुरूष असे :

१) परंतवो–परं तावेइ त्ति। २) तुरंगमो–तुरेण गच्छइ त्ति। तुरंग, तुरंगम, भुयंग, भुयंगम इत्यादी

ऊ) नञ तत्पुरूष :

नञ तत्पुरूष समासात पूर्वपद[1] नकारदर्शक अव्यय असते. त्या नकारदर्शकाचा[2] स्वरादि शब्दापूर्वी 'अण्' व व्यंजनादि शब्दापूर्वी 'अण्' व व्यंजनादि शब्दापूर्वी अ झालेला असतो. विग्रहात 'न' चा उपयोग केला जातो.

उदाहरणे क) १) अहिंसा – न हिंसा । २) अकालो – न कालो । ३) अणसणं – न असणं ४) अणायारो – न आयारो ५) अणारिया – न आरिया। ६) अपच्छं– न पच्छं ।

ख) १) अदीणो – न दीणो। २) अणवज्जं – न अवज्जं। ३) अणिच्चं – न निच्चं। ४) अविणीयं – न विणीयं ५) असंसत्तं – न संसत्तं । ६) अदिन्नं – न दिन्नं । ७) अणागयं – आगयं ।

---

१ *उत्तरपद नाम, विशेषण*

२ *काही समासात नकारदर्शक 'न' तसाच राहिलेला आढळतो. उदा. : नक्खत्तं–न झरइ त्ति। नउलं–नकुलं अस्स । नमुई–न मुंचइ त्ति नपुंसगो–न पुंसगो।*

ए) अलुक तत्पुरूष[१]

कधी तत्पुरूष समासात पूर्वपदाचा विभक्तिप्रत्यय तसाच राहतो. तेव्हा त्याला अलुक् तत्पुरूष म्हणतात.

उदाहरणे : १) अंतेवासी – अंते वसइ, सो २) खेयको–खे चरइ सो । ३) वणेयरो – वणे चरइ सो ४) जुहिट्ठिलो–जुहि थिरो सो ५) मणसिओ –मणसि जाओ सो। ६) अग्गेसरो – अग्गे सरइ सो।

## २९६ अव्ययीभाव (अव्वईभाव)

अव्ययीभाव समासात पूर्वपद अव्यय असून समास अव्यय रूप होतो. समास अव्ययरूप असल्याने त्याचे रूप प्रायः नपुं.[२] व्दि. ए. व. रूपाप्रमाणे

---

१ *आत्तापर्यंत सांगितलेल्या पोटभेदाखेरीज तत्पुरूषाचे आणखी दोन पोटविभाग संस्कृतमध्ये मानले जातात. ते म्हणजे 'गति' व 'प्रादि' तत्पुरूष. गति तत्पु. संस्कृतमध्ये सत्, असत्, अलं, पुरः, तिरः, इत्यादी शब्दांना काही अर्थी क्रियायोग असता गति अशी संज्ञा आहे. म्हणून या शब्दांचा जो समास तो 'गति' समास होय. हा क्रियायोग प्रायः कृ धातूचा असतो. कधी कधी भू आणि अस् ह्या धातूंचाही असतो. कधी कधी ह्या समासातील उत्तरपद धातुसाधित नामही असते. (वा. वे. आपटे पृ. ६३) उदा. तिरोभूओ, पुरक्कार (पुरस्कार) तिरक्खार (तिरस्कार), सक्कार (सत्कार) इत्यादी प्रादि तत्पु : तत्पुरूषातील पूर्वपद जेव्हा प्र. परा इत्यादी उपसर्ग असते तेव्हा प्रादितत्पुरूष होतो. (काळे पृ. १४२ उदा. अभिमुह (अभिमुख), अइंदिय (अतीन्द्रिय), अइसुहिणो, अहिराय (अधिराज), अइउसिण, अवसद्द, अवगार, पडिपह, अइनिसा, अइमुच्छिओ, अइआउलो इत्यादी*

२ *प्रायः म्हणण्याचे कारण अर्धमागधीत कधी अव्ययीभाव समासाची इतर लिंगी विभक्त्यन्त रूपे आढळतात. उदा. जहक्कमेण, जावज्जीवाए, पडिरूवेण, जहिच्छाए, जहविहिणा (सुर. १३.९२) अहाकम्मेहिं, जावजीवाए, जहसत्तीए, जहाविभवेणं, अहाकमेण, जहाविहीए इत्यादी*

असते. विग्रहात समासातील अव्यय येत नाही. त्या अव्ययाचा अर्थ येतो.

उदाहरणे : १) अणुरूवं–रूवस्स जोग्गं । २) अणुदिणं–दिणे दिणे ३) अणुदियहं दियहे दियहे । ४) पइदिणं – दिणे दिणे ५) अहागडं–जेव्हा कडं सिया तहा। ६) अहासुयं–सुयं अणइक्कम्म ७) जहिच्छं –इच्छाए जोग्गं। ८) जावज्जीवियं – जीवियं जाव। ९) जावज्जीवं – जाव जीवो ताव।

## २९७ बहुव्रीही (बहुव्वीहि)

बहुव्रीही समासातील दोन्हीही पदे गौण असून तिसरेच एखादे पद प्रधान असते. संपूर्ण समास हा समासातील पदे सोडून इतर कोणत्यातरी विशेष्याचे विशेषण असतो पण प्रत्यक्ष समासातील कोणतेही एक पद स्वतंत्रपणे इतर विशेष्याचे विशेषण असत नाही. संपूर्ण समास विशेषण बनत असल्याने ज्या विशेष्याचे विशेषण हा समास असतो. त्या विशेष्याच्या लिंगवचनाप्रमाणे बहु. समासाचे लिंग व वचन असते.

अ) विभक्ति बहुव्रीही

विभक्ती बहुव्रीहीच्या विग्रहात दोन्ही पदे कधी एकाच विभक्तीत तर कधी भिन्न विभक्तीत असतात. १) जेव्हा दोन्ही पदे एक विभक्तिक असतात. तेव्हा त्याला 'समानाधिकरण' बहु म्हणतात. २) जेव्हा दोन्ही पदे भिन्न विभक्तिक असतात. तेव्हा त्याला 'व्यधिकरण' बहु म्हणतात.

विग्रहात 'ज' या सर्वनामाच्या द्वितीया ते सप्मीपर्यंतच्या कोणत्याही विभक्तिचा[१] उपयोग केला जातो. समानाधिकरण बहु मध्ये ज या सर्वनामाच्या व्दितीया ते सप्मीपर्यंतच्या सर्व विभक्ती येऊ शकतात. पण 'व्याधिकरण बुह मध्ये मात्र 'ज' ची फक्त षष्ठी वा सप्तमी येऊ शकते इतर कोणतीही विभक्ति[२] नाही.

उदा. चक्कपाणी–चक्कं पाणिम्मि जस्स सो । नयणविसो–नयणे विसं जस्स सो । पूइकण्णी –पूई कण्णे जीसे सा। अग्गबीया – अग्गंमि बीयं जेसिं ते। इत्यादी

---

*१ यावरून द्वितीया बहु., तृतीया बहु इत्यादी संज्ञा दिल्या जातात.*

*२ काळे , पृ. १५२*

१) द्वितीया बहु - १) पत्तनिव्वाणो-पत्तो निव्वाणो जं सो। २) पत्तमोक्खो-पत्तोमोक्खो जं सो।

२) तृतीया बहु. १) जिइंदिओ - जियाणि इंदियाणि जेण सो।

३) पंचमी बहु. १) गयरागो - गओ रागो जम्हा सो। २) गय भओ - गयं भयं जम्हा सो।

४) षष्ठी बहु. क) (चतुर्थी ऐवजी) : १) दिन्नाहारो - दिन्नो आहारो जस्स सो । २) दत्तमाणो - दत्तो माणो जस्स सो।

ख) मंदपुण्णो - मंद पुण्ण जस्स सो। सुसीला - सोहणं सीलं जीसे सा।

५) सप्तमी बहु. १) जायसड्ढा-जाया सड्ढा जेसुं ते । २) अणेगजीवा - अणेगा जीवा जीए सा।

बहुव्रीहि समासातील पदे विविध प्रकारची असू शकतात. त्यांची माहिती विग्रह-उदाहरणासह[१] पुढे दिली आहे.

१) पूर्वपद विशेषण[२], उत्तरपद विशेष्य :

१) घोरपरक्कमे - घोरे परक्कमे जस्स से। २) सुन्नागारं (गामं) - सुन्नाइं अगाराइं जंमि तं। ३) सुध्दसहावो-सुध्दो सहावो जस्स सो ।

२) पूर्वपद संख्याविशेषण, उत्तरपद विशेष्य :-

१) पंचिंदिए-पंच इंदियाइं जस्स से। २) छम्मुहो- छ मुहाणि जस्स सो। ३) तेइंदिओ-तिन्नि इंदियाणि जस्स सो ।

३) पूर्वपद क. भू. धा. वि. उत्तरपद विशेष्य :

१) जिमकोहे - जिए कोहे जेणं से। २) सुट्ठियप्पा - सुट्ठिए अप्पा जस्स से। ३) पिहियासवा-पिहिया आसवा जेहिं ते ४) अमुणियगुणेण-अमुणिया गुणा

---

*१ यातील उदाहारणे समानाधिकरण व व्याधिकरण बहु. यांचीही असतात.*

*२ बहु. व कर्मधारय यातील भेद १) बुहव्रीहि हा संपूर्ण समास विशेषण असतो. २) कर्म. हा अर्थदृष्ट्या स्वयंपूर्ण असतो. बहु. तसा असत नाही कित्येकदा संदर्भावरून हा भेद ओळखावा लागतो. उदा. चंदवयणं (कर्म0) चंदवयणं बादलयं) (बहु.)*

जेण सो तेण।

अ) कधी अर्धमागधीत विशेष्य हे पूर्व पदी येते

क) संजमुत्तरा - उत्तरो (उत्तम) संजमो जेसिं ते ।

ख) आयरक्खिए - रक्खिए आया जेणं कसे। दीवप्पणट्ठो-पणट्ठो दीवो जंमि सो। परीसहरिऊदंता - दंता परीसहरिऊ जेहिं ते ।

४) आदि, प्रभृति, प्रमुख, प्रधान, द्वितीय इत्यादी शब्द उत्तरपदी

१) इंदाइणो - इंदो आई जेसिं ते। २) चक्कप्पमुहाणी - चक्कं पमुहं जेसिं ताणि ३) गुणप्पहाणा - गुणा पहाणा जेसुं ते ४) अणहगदुइओ-अणहगो (एक विशेषनाम) दुइओ जस्स सो।

५) पूर्वपद विशेष्य, उत्तरपद विशेष्यः-

(एकविभक्तिक) १) धूमकेऊ - धूमो केऊ जस्स सो । २) नियागट्ठो नियागो (मोक्ष) अट्ठो जस्स सो । ३) नम्मयाभिहाणाए-नम्मया अभिहाणं जीसे सा ताए।

(भिन्न विभक्तिक) : गरूडध्दओ-गुरूडो झयंमि जस्स सो ।

६) दोन्ही पदे विशेष्ये : (औपम्यभाव) :

१) कणयसरीरो - कणयं इव सरीरं जस्स सो । २) मयच्छी (मृगाक्षी) - मयस्स (अच्छीइं) इव अच्छीइं जीसे सा। ३) सुवण्णवण्णा-सुवण्णं इव वण्णो जीसे सा।

७) दोन्ही पदे विशेष्ये : आरोप्य-आरोपणीय-भाव) :

१) कम्मकिब्बिसा-कम्मं एव किब्बिसं जेसिं ते । २) खग्गसहाओ खग्गो एव सहाओ जस्स सो।

८) पूर्वपद अव्यय :

१) पुढोसत्ता - पुढो सत्ता जीए सा । २) नाणाविहा-नाणा विहा जेसिं ते। ३) अहोमुही - अहो मुहं जीए सा। ४) दुस्सीला-दुट्ठ सीलं जीसे सा। ५) सुसीला-सोहणं सीलं जीसे सा ६) दुम्मेहा-दुट्ठा मेहा जेसिं ते। ७) कुसीला - कुच्छियं सीलं जेसिं ते। ८) दुरंतो -दुट्ठो अंतो जस्स सो। ९) सुनयणा-सोहणा

नयणा जीसे सा।

आ) सह बुहव्रीहि

सह[१] बहुव्रीहि मध्ये सह या अर्थी 'स' वा 'सह' हा शब्द पूर्वपद असतो. विग्रहांत 'सह', 'सहिय', 'समाण' या शब्दांचा अर्थानुरूप उपयोग केला जातो.

क) १) सपुत्तो – पुत्तेण सह । २) सामरिसो–अमरिसेण सह। ३) सावज्जं–अवज्जेण सह।

ख) १) सदारो–दारेहिं सहिओ । २) ससीयस्स – सीयाए (एक विशेषनाम) सहियस्स । ३) सकलत्तो–कलत्तेण सहिओ । ४) ससोगो–सोगेण सहिओ । ५) सपरियणो–परियणेणं सहिओ।

ग) १) सहोयरो – समाणं उयरं जस्स सो । २) सवण्णो–समाणो वण्णो जस्स सो । ३) सवत्ती–समाणो पई जीसे सा।

इ) नञ् बहुव्रीहि

नञ् बहुव्रीहि मध्ये पूर्वपद हे नकारदर्शक 'अ' वा 'अण्' हे अव्यय असते. विग्रहात 'न विज्जइ' किंवा अविज्जमाण' यांचा उपयोग केला जातो.

क) १) अणगारे – न विज्जइ अगारं जस्स सो। २) अचेलए–न विज्जइ चेलयं जस्स से । ३) अणाई–न विज्जइ आई जस्स सो । ४) अणंतो न विज्जइ अंतो जस्स सो।

ख) १) अपुत्तो–अविज्जमाणो पुत्तो जस्स सो। २) अधणो – अविज्जमाणं धणं जस्स सो ३) अणिमिसाए – अविज्जमाणो निमेसो जीसे सा ताए।

४) अणुत्तरं – अविज्जमाणं उत्तरं जस्स तं।

ई) प्रादि बहुव्रीहि

प्रादि बहुव्रीही मध्ये पूर्वपद हे एकादा उपसर्ग असते.

१) पंजली – पबध्दा अंजली जेण सो २) निध्दणो–निग्गयं धणं जम्हा सो।

---

१ *पुष्कळदा सह बहु समासाचा उपयोग क्रियाविशेषण अव्ययाप्रमाणे केला जातो. उदा. साणंदं, सासंकं, ससंभमं, सविणयं, सहासं, सविब्भमं, सपणयं*

३) निरासो–निग्गया आसा जम्हा सो । ४) निज्जीवं–निग्गओ जीवो जम्हा तं। ५) निग्गंथो – निग्गया गंथी जम्हा सो। ६) उम्मुहो– उड्ढं मुंह जस्स सो ।

उ) संख्या बहुव्रीहि

संख्यावाचकाचा इतर संख्या वाचकांशी होणाऱ्या समासास संख्या बुहव्रीहि म्हणतात.

१) सत्तट्ठ (पयाणि) – सत्त वा अट्ठ वा। २) नवदसहि (बालेहिं) नवहिं वा दसहिं वा।

ऊ) दिग् बुहव्रीहि

यातील दोन्ही पदे दिशावाचक असतात. दोन दिशामधील उपदिशा दाखविण्यास या समासाचा उपयोग होतो.

१) उत्तरपुत्थिमे – उत्तराए पुव्वाए य अंतरालं। २) दक्खिणपुव्वा दक्खिणाए पुव्वाए य अंतरालं।

ए) अनियमित बहुव्रीहि

युध्दात परस्परावर प्रहार करण्याचे जे साधन तद्वाचक दोन सरूप आणि तृतीयान्त पदांचा बहुव्रीहि समास[१] होतो. हा समास अव्ययरूप असतो[२].

उदा. दुमादुमि[३] – दुमेहिं दुमेहिं च पहरिय इमं जुध्दं पवत्तं। याचप्रमाणे तलातलि, चलणाचलणि, सिलासिलि[३].

---

१ *वा. वे. आपटे, पृ. ६०*

२ *काळे पृ. १६०*

३ *उसा. २.५९*

## पुरवणी

मोठ्या समासांचे विग्रह

अनेक समास एकत्र येऊन बनलेला मोठा समास सोडविताना प्रथम तो एकच पद आहे असे मानून त्याच्या अर्थाशी सुसंगत असा विग्रह करून त्याला नाव द्यावे. मग इतर पोटसमासांचे विग्रह करून त्यांना नावे द्यावीत. संपूर्ण समास सोडवून झाल्यावर मूळसमासाचे लिंग, वचन, विभक्ति ही सोईसाठी 'त' या सर्वनामाला जोडून द्यावी. समजुतीसाठी पुढे काही मोठे समास सोडून दाखविले आहेत.

१) चोद्दसमहासुमिणसूइओ - चोद्दसमहासुमिणेणं सुइओ । तृ. तत्पु.।।

महंतो सुमिणो । कर्मणा चोद्दसण्हं महासुमिणाणं समाहारो (द्विगु)

२) वम्मह-सर-ताडिय-सरीरो-वम्महसरेहिं ताडियं सरीरं तस्स सो। ष. बहु. ।। वम्महस्स सरा । ष. तत्पु.।।

३) करूणा-जल-निव्वाविय-मच्छरग्गि-तत्त - जणा - करूणाजलेणं निव्वाविओ मच्छरग्गितत्तजणो जेणं सो (तृ. बहु. ।। करूणा एव जलं।। कर्मणा मच्छरो एव अग्गी । कर्मणा तत्ता जणा। कर्मणा मच्छरग्गिणा तत्ता । तृ. तत्पु.।।

४) विविह-पहरण-किरण-दुगुणिय-दिणमणि-पहा-पसरं-विविह पहरण किरणेहिं दुगुणिओ दिणमणिपहापसरो जेणं तं । तृ. बहु.। विविहाणि पहरणाणि। कर्मणा विविहपहरणाणं किरणा। ष. तत्पु.।। दिणमणिस्स पहा। ष. तत्पु.।। दिणमणिपहाए पसरो। ष. तत्पु.।।

५) वज्जंत-मंगल-तूर-खाऊरिय-समल-दिसा-मंडलो-

वज्जंत मंगल तूरखेण आऊरियाणि सयलदिसामंडलाणि जेण सो। तृ. बहु ।। सयलाओ दिसाओ। कर्म।। सयलदिसाणं मंडलाणि। ष तत्पु.।। तूराणं रवो । ष. तत्पु.।। मंगलातूरा। कर्मणा वज्जंता मंगलतूरा । कर्मणा ।।

प्रकरण २०

# प्रयोगविचार

## २९८ प्रयोग

प्रयोग म्हणजे वाक्यांतील काही शब्दांची विशिष्ट ठेवण वा रचना. ही रचना कर्त्याला, कर्माला वा क्रियेला (भाव) प्राधान्य देऊन करता येते. जेथे कर्त्याला, कर्माला वा क्रियेला (भाव) प्राधान्य देऊन करता येते. जेथे कर्त्याला प्राधान्य येते तेथे कर्तरि प्रयोग, जेथे कर्माला महत्त्व आहे तेथे कर्मणि प्रयोग व जेथे क्रियेला प्रामुख्य आहे तेथे भावे प्रयोग, असे प्रयोग होतात. कर्त्याला किंवा कर्माला प्राधान्य देणे म्हणजे क्रियापदाचे[१] रुप त्याच्या पुरुष-वचनाशी संवादी करणे होय. आणि क्रियेला महत्व देणे म्हणजे क्रियापदाचे[१] रूप कर्ता व कर्म यावर अवलंबून न ठेवता ते नेहमी तृ.पु.ए.व. त ठेवणे.

संस्कृतप्रमाणेच अर्धमागधीत ही कर्तरि, कर्मणि आणि भावे असे तीन प्रयोग आहेत. त्यांचा विचार आता करावयाचा आहे.

## २९९ कर्तरि प्रयोग

कर्तरि प्रयोगातील क्रियापद सकर्मक वा अकर्मक असेल. त्यानुसार प्रयोग सकर्मक कर्तरि अथवा अकर्मक कर्तरि म्हटला जातो.

कर्तरि प्रयोगात कर्तृपद प्रथमा विभक्तीत, कर्म असल्यास व ते उक्त असल्यास

---

१ *कित्येकदा प्रत्यक्ष क्रियापदाऐवजी धातुसाधित विशेषणांचा उपयोग केलेला असतो. अशी धातु विशेषणे म्हणजे कर्तरि व कर्मणि भूत, धातू, विशेषणे आणि वि.क.धा.वि. होत.*

२ *मराठी प्रमाणे अर्धमागधीत कर्त्याच्या लिंगाप्रमाणे क्रियापदाचे रूप बदलत नाही.*

ते द्वितीया विभक्तीत आणि क्रियापदाचे रूप हे कर्त्याच्या पुरुष[२]-वचनाप्रमाणें असते. उदा.

(१) सकर्मक कर्तरि :- (१) सो साहेइ धम्मं महुरवाणीए।
(२) पेच्छंतु दुरायारा (जणा) निय-पाव-पायवस्स फलं।
(३) ते जन्नेसु (यज्ञ) पसू वहिस्संति।

(२) अकर्मक कर्तरि :- (१) संवड्ढइ घरे तस्स दारए से।
(२) दोण्हं पि हाउ जुज्झं।
(३) होही दाणस्स पुण्णफलं।

**३०० कर्मणि[३] प्रयोग**

(अ) क्रियापदाचा उपयोग असता :-

मूळ सकर्मक कर्तरि प्रयोगातील कर्तृपद कर्मणि प्रायोगात तृतीया विभक्तीत, मूळ उक्त कर्म प्रथमा विभक्तीत व क्रियापदाच्या कर्मणि अंगाचे रुप हे आता प्रथमेत आलेल्या कर्माच्या पुरुष-वचनाप्रमाणे असते.

| सकर्मक कर्तरि | कर्मणि |
|---|---|
| (१) कर्तृपद पथमा विभक्तीत | कर्तृपद तृतीया विभक्तीत |
| (२) उक्त कर्म द्वितीया विभक्तीत | उक्त कर्म प्रथमा विभक्तीत |
| (३) क्रियापदाचे रुप प्रथमेतील कर्त्याच्या पुरुष-वचना प्रमाणे | कर्मणि क्रियापदाचे रुप प्रथमेत आलेल्या कर्माच्या पुरुष-वचनाप्रमाणे |

उदाहरणे :-

(१) (तं किं विजयाणंदं वंचइ सिंहलेसो।) सो किं विजयाणंदो वंचिज्जइ सिंहलेसेण। (२) (कयाइ पुरिसो कामभोगे उज्झइ।) कयाइ कामभोगेहिं पुरिसो उज्झिज्जइ। (३) (मोहतरुं उम्मूलंति अप्पमत्ता।) मोहतरु उम्मूलिज्जइ अप्पमत्तेहिं। (४) (तं बालं कोइ वणयरो वावाइस्सइ।) सो बालो केणइ वणयरेण वावाइज्जिस्सइ।

---

१ *सकर्मक कर्तरि प्रयोगात कर्म उक्त असल्यास कर्मणि प्रयोग होतो. पुढील वाक्य कर्म असल्यास भावे प्रयोग होतो.*

(आ) धातुसाधित विशेषणांचा उपयोग[१] असता :-

(क) क.भू.धा.वि. चा उपयोग[२] असता :-

(१) पारध्या धम्मकहा मुणिणा। (२) कहिओ मुणिणा गिहत्थ धम्मो। (३) मुक्का सव्वे सव्वेहिं उग्गरोगेहिं। (४) दोहिं विबलेहिं पारध्दं जुध्दं। (५) रायपुत्तेहिं पाडियाइं फलाइं।

(ख) वि.क.धा.वि. चा उपयोग असता :-

(१) तए स भणियव्वो। (२) इमा (पडिमा) तुमए निच्चं अच्चणिज्जा)

(३) तुमए एयं आसमपयं पालेयव्वं। (४) मए दीहकालं अणुभवियव्वा विसमदसा। (५) घोरं वयणं वज्जणिज्जं सुबुध्दीहिं।

**३०१ भावे प्रयोग**

(अ) क्रियापदाचा उपयोग असता :-

भावे प्रयोगात कर्मणि क्रियापद हे कर्ता व कर्म यापैकी कोणाप्रमाणेच न चालता, ते नेहमी तृ.पु.ए.व.त असते; कर्तरि प्रयोगातील कर्ता यावेळी तृतीया विभक्तीत आलेला असतो. उदा.

(क) क्रियापद अकर्मक असता :-

(१) णच्चिज्जइ ससहरमणिसिलायले घरमऊरेहिं। (लीला. ५५)

(२) गम्मइ संगीयविलयाहिं। (लीला. ५७) (३) तुरियं पियसंगमलालसाहिं सइ (सदा) गम्मइ पियाहिं। (लीला २७९)

(ख) सकर्मक क्रियापद, पण पुढील वाक्य कर्म असता :-

(१) ताहे थेरेणं भण्णइ - किंचि पेच्छसि। (२) सिरिमईए भण्णइ - सव्वं पि घडइ मम भत्तुणो। (३) तीए भण्णइ-गा अधिइं करेहि।

(आ) धातुसाधित विशेषणाचा उपयोग[३] असता :-

(क) क.भू.धा.वि.चा उपयोग असता:-

---

१ *कर्मणि प्रयोगात धातुसाधित विशेषण हे प्रथमेत आलेल्या कर्माच्या लिंग-वचन-विभक्ति प्रमाणे असते.*

२ *क.भू.धा.वि. चा उपयोग असता अर्धमागधीत कधी कर्तरि प्रयोगच वापरलेला आढळतो. क.भू.धा.वि.चे उपयोग, परि. ४२३ पहा.*

३ *भावे प्रयोगात धातुसाधित विशेषण हे नेहमी नपुसकलिंगी कि.ए.व. रुपात असते.*

(१) तो विमलेण भणियं–सव्वं चिय मे तए दिन्नं। (२) मए भणियं– न याणामि।

(ख) वि.क.धा.वि. चा उपयोग असता :–

(१) मए तयन्नेसणनिमित्तं कत्थ गंतव्व। (२) न तए कुप्पियव्वं।

(३) तुब्भेहिं जइयव्वं। (यत्) (४) तए इहेव चिट्ठियव्वं।

**३०२ प्रयोग बदल**

हे प्रयोग परस्पराबद्दल योजावयाचे झाल्यास हे प्रयोग परिवर्तन काही विशिष्ट प्रकारेच होते:– सकर्मक कर्तरि (कर्म उक्त) व कर्मणि ही एक जोडी आहे, अकर्मक कर्तरि व भावे ही दुसरी जोडी आहे. प्रयोग बदल होताना तो एका जोडीतच बदलतो, जोडीबाहेर नाही. म्हणजेच सकर्मक कर्तरीचा (कर्म उक्त) कर्मणि होऊं शकेल आणि कर्मणीचा सकर्मक कर्तरि, तसेच अकर्मक कर्तरीचा भावे व भावे प्रयोगाचा अकर्मक कर्तरि होऊ शकतो. प्रयोगांचा हा परस्पर संबंध पुढील प्रमाणे दाखविता येईल :–

(अ) क्रियापदाचा उपयोग असता :–

| | |
|---|---|
| (१) सकर्मक[१] कर्तरि (कर्म उक्त) | कर्मणि |
| (२) अकर्मक कर्तरि | भावे |

(आ) धातुसाधित विशेषणाचा उपयोग असता:–

(क) क.भू.धा.वि.चा उपयोग असता:–

| | |
|---|---|
| (१) सकर्मक कर्तरि | कर्मणि |
| (२) अकर्मक कर्तरि | कर्तरि |

(ख) वि.क.धा.वि. चा उपयोग असता :

| | |
|---|---|
| (१) सकर्मक कर्तरि | कर्मणि |
| (२) अकर्मक कर्तरि | भावे |

प्रयोग बदलतांना पुढील गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत :–

(१) प्रयोग बदलताना कर्ता व कर्म आणि (असल्यास) त्यांची विशेषणे

---

१ *क्रियापद सकर्मक असून पुढील वाक्य कर्म असल्यास त्या कर्तरीचाही भावे प्रयोगच होतो. परिच्छेद ३०१ पहा.*

यांच्यात फक्त विभक्ती बदल होतो. (२) प्रयोग बदलताना क्रियापदाच्या कर्तरि वा कर्मणि रुपात कर्त्याच्या वा प्रथमेत आलेल्या कर्माच्या पुरुष-वचनाप्रमाणे बदल होतो. (३) प्रयोग बदलताना क्रियापदाचा काळ वा अर्थ बदलावयाचा नाही. (४) एवं च प्रयोग बदलात कर्ता, कर्म व त्यांची विशेषणे आणि क्रियापद (अथवा धातु विशेषण) या खेरीज इतर शब्दांत काहीही बदल होत नाहीत.

क.भू.धा.वि. चा उपयोग असलेल्या कर्मणिचा कर्तरि करताना संस्कृतमध्ये कर्तरि भूत. धातु. विशेषणांचा उपयोग केला जातो तथापि अर्धमागधीत या कर्तरि भूत. धातु. विशेषणांचा उपयोग विरळ असल्याने क्रियापदाचा भूतकाळ वापरण्यास हरकत नसावी तसेच वि.क.धा.वि. चा उपयोग असलेल्या कर्मणिचा कर्तरि करताना क्रियापदांच्या विध्यर्थी रूपांचा उपयोग केला जातो.

अशा प्रयोग बदलाची पुढे काही उदाहरणे दिली आहेत

(१) सकर्मक कर्तरि - कर्मणि :-

(अ) क्रियापदाचा उपयोग असता :-

(१) कहं देवा अपवित्तनरं अवहरंति। कहं देवेहिं अपवित्तनरो अवहीरइ।

(२) को वा से ओसहं देइ। केण वा मे ओसहं दिज्जइ।

(३) न मुंचामि सच्चरियं। न मुच्चइ सच्चरियं।

(४) एयं दुट्ठं अहं हणिस्सामि। एस दुट्ठो मए हाणिज्जिस्सइ।

(५) अहं तव पुत्तं रक्खिस्सामि। मए तव पुत्तो रक्खिज्जिस्सइ।

(६) एवं धम्मं चरिस्सामि। एवं धम्मो चरिज्जिस्सइ।

(७) भुंज माणुस्सए भोए। भुज्जंतु माणुस्सया भोया।

(८) परिच्चयउ देवो विसायं। परिच्चइज्जउ देवेण विसाओ।

(९) तं (ते) मारिउणो सुमिणे वि लहंतु। तं मारिऊहिं सुमिणे विलब्भउ।

(आ) धातु विशेषणाचा उपयोग असता :-

(क) क.भू.धा.वि. चा उपयोग असता :-

(१) (अज्ज तं अहं पासित्था।) - अज्ज सो मए दिट्ठो।

(२) (तत्थ पासित्था साहु णीओ।) - तत्थ दिट्ठाओ साहुणीओ।

(३) (पारंभित्था मंजुलं तओ गीयं।) - पारध्दं मंजुलं तओ गीयं।

(४) (तुमं कुसुमाइं गिण्हित्था।) - तुमए कुसुमाइं गिण्हियाइं।

(५) (पसारित्था करा जिणो।) – पसारिया करा जिणेण।

(६) (देवी पेसित्था फलाइं इमाइं।) – देवीए पेसियाइं फलाइं इमाइं।

(७) (पिवित्था सीया सीयलं सलिलं) – पीयं सीयाए सीयलं सलिलं।

(८) (सिध्दगंधव्वा मुंचिंसु कुसुमवुट्ठिं।) – सिध्दगंधव्वेहिं मुक्का कुसुमवुट्ठी।

(९) (गिण्हित्था मंजरिं राया।) – गहिया मंजरी राइणा।

(ख) वि.क.धा.वि. चा उपयोग असता :-

(१) (अहं तायं आवज्जेज्जामि।) – मए ताओ (वडील) आवज्जणीओ।

(२) (तुम्हे अम्ह घरे भोयणं करेज्जाह।) – तुम्हेहिं अम्ह घरे भोयणं कायव्वं।

(३) (न मुंचेज्जासि तुमं पुव्व पुव्वपणयं।) – न मोत्तव्वो तुमए पुव्वपणओ।

(२) कर्मणि – सकर्मक कर्तरि

(अ) क्रियापदाचा उपयोग असावा:-

(१) तुह उववणं कुमारेहिं हणिज्जह। तुह उववणं कुमारो हणंति।

(२) धणिणो विलुप्पिज्जंति नराहिवेहिं। धणिणो विलुंपंति नराहिवा।

(३) अहं इमिणा वंचिज्जामि। ममं इमो वंचइ।

(४) न मुच्चइ ससी जोण्हाए। न मुंचइ ससि जोण्हा।

(५) डज्झामि विरहाग्गिणा हं। डहइ विरहग्गीमं।

(६) न लब्भइ दविणं विहीणपुण्णेहिं। न लभंति दविणं विहीण पुण्णा।

(७) कम्मं तवसा निज्जरिज्जइ। कम्मं तवो निज्जरइ ।

(८) एस न छिप्पए जोव्वणवियारेहिं न घेप्पए मएण (मद) न मुच्चए अज्जवयाए। एयं न छिवंति जोव्वणवियारा न गेण्हइ मओ न मुंचइ अज्जवया।

(९) सो खलु रोगेहिं मुच्चेही। तं खलु रोगा मुंचिहिंति।

(१०) तो कह डाज्झिहिसि तुमं जलणेण। तो कह डहिहिइ तुमं जलणो।

(११) एसा तेण वेरिणा हीरिही। एयं सो वेरी हरिहिइ।

(१२) सो सत्तुणा दहंमि (तळे) परिक्खिप्पिहिइ। तं सत्तू दहंमि परिक्खिविहिइ।

(१३) दिज्जइ दाणं सव्वजणाणं। देंति दाणं सव्वजणाणं।

(१४) कज्जे मणो दिज्जउ। कज्जे मणं देह (तुम्हे)।

(१५) वेज्जघरे निज्जउ वराई। वेज्जघरे नेंतु वराइं (जणा)।

(१६) दिज्जउ का विहु धूया। देसु कं पिहु धूयं (तुमं)।

(आ) धातु. विशेषणाचा उपयोग असता :-

(क) क.भू.धा.वि. चा उपयोग असतां :-

(१) सा वग्घेण हया। तं वग्घो हणित्था (हयवंतो)।

(२) तेहिं कयं अप्पहियं जेहिउ गहिया महव्वया पंच। ते करिंसु (कमवंता) अप्पहियं जेउ. गिण्हिंसु (गहियवंता) महव्वया पंच।

(३) तेण दिट्ठाणि आउहाणि। सो पासित्था (दिट्ठवंतो) आउहाणि।

(४) कह वाणरेहि बध्दो सेऊ। कह वाणरा बंधिंसु (बध्दवंता) सेउं।

(५) दव्वं विलुत्तं तक्करेहिं। दव्वं विलुंपिंसु (विलुत्तवंता) तक्करा।

(ख) वि.क.धा.वि. चा उपयोग असता :-

(१) न इमं कस्स वि तए कहेयव्वं। न इमं कस्स वि तुमं कहेज्जासि।

(२) सो वि मए चेव हंतव्वो। तमवि अहं चेव हणेज्जामि।

(३) दट्ठव्वा अम्हेहिं सा। पासेज्जाम अम्हे तं।

(४) अप्पमत्तेण (तए) रक्खियव्वो हं। अप्पमत्तो (तं) रक्खेज्जासि ममं।

(५) उज्झियव्वो विसयरागो चिंतियव्वं भवसरुवं वज्जियव्वा कुसंसग्गी सेवियव्वा, साहुणो, उज्झेज्जा, विसयरागं, चितेज्जा, भवसरुवं, वज्जेज्जा, कुसंसग्गिं सेवेज्जा, साहुणो।

(६) सव्वपाणीणं पीडा परिवज्जियव्वा। सव्वपाणीणं पीडं परिवज्जेज्ज।

(३) अकर्मक कर्तरि - भावे

(अ) क्रियापदाचा उपयोग असता :

उदाहरणे मागे परिच्छेद ३.१ मध्ये पहा.

(आ) वि.क.धा.वि. चा उपयोग असता :-

(१) अहं गामंतरं गच्छेज्जामि। मए गामंतरं गंतव्वं।

(२) तुब्भे जएज्जाह (यत्)। तुब्भेहिं जइयव्वं।

(३) नतुमं कुप्पेज्जासि। न तए कुप्पियव्वं।

(इ) क.भू.धा.वि.चा उपयोग असता :-

अकर्मक क्रियापदाच्या क.भू.धा.वि. चा उपयोग असता प्राय: कर्तरि[१] प्रयोगच होतो. म्हणून, कर्ता प्रथमेत व कर्त्याच्या लिंग-वचन-विभक्ति-प्रमाणे क.भू.धा.वि. चे रुप असते. उदा.

(१) पत्तो नियमंदिरे सो वि। (२) तओ सो पहसिओ राया सेणिओ मगहाहिवो। (३) तो गाढयरं राया रुट्ठो। (४) ओइण्णा सुरवरा सव्वे। (५) देवा गया निययाइ ठाणाइं। (६) पडिया य रयणवुट्ठी। (७) विबुध्दा देवी। (८) सो तत्थेव निवसिओ। (९) पज्जलिओ मे मणंमि को वाणलो।

**३०३ प्रयोजक धातूंचा कर्तरि व कर्मणि प्रयोग**

सर्व प्रयोजक धातु हे सकर्मक असतात. प्रयोजक धातूंचा कर्तरि प्रयोग पुढील प्रमाणे होतो :-

(क) प्रयोजक धातूंचा कर्तरि प्रयोग :-

(१) मूळ धातु सकर्मक असता, प्रयोजक कर्तरि रचनेत मूळ क्रियेचा कर्ता तृतीयेत जातो, मूळ कर्म द्वितीयेत जाते व प्रयोजक धातु नवीन कर्त्याच्या पुरुष-वचना प्रमाणे असतो[२]. उदा.

(१) (नेव अन्नो दंडं समारंभेज्जा।) - (भिक्खू) नेव अन्नेहिं दंडं समारंभविज्जा।

(२) (नेव अन्नो अदिन्नं गिण्हेज्जा।) - (भिक्खू) नेव अन्नेहिं अदिन्नं गेण्हावेज्जा।

(३) (पुरिसा दे दत्तं देविं गिण्हंति।) - पूसनंदी राया देवदत्तं देविं पुरिसेहिं गिण्हावेइ।

(४) (पुरिसा दारगं गिण्हंति।) - राया दारगं पुरिसेहिं गिण्हावेइ।

(२) मूळ गत्यर्थक, ज्ञानार्थक, भक्षणार्थक व तदर्थक आणि अकर्मक धातूंच्या प्रयोजक कर्तरि रचनेत मूळ कर्ता द्वितीयेत जातो मूळ कर्म असल्यास द्वितीयेत व प्रयोजक धातु नवीन कर्त्याच्या पुरुष-वचनाप्रमाणे असतो.[३]

---

१ *या वेळी अर्धमागधीत कधी भावे प्रयोग आढळतो. उदा. गाज्जियं मेहेहिं। हसियं राइणा। पणट्ठं पावेणं। वियसियं लोयणेहिं। अधिक उदाहरणासाठी 'क.भू.धा.वि. चे उपयोग, परि. ४२३ पहा.*

२ *आपटे, पृ. २८*

३ *आपटे, पृ. २९*

(अ) (१) (सो हिंडइ।) ते तं हिंडावेंति। (२) (लोहदंडो तवइ।) – देवी (राणी) लोहदंडं तावेइ। (३) (दमयंती नच्चइ।) दमयंति नलो नच्चावेइ। (४) (पीडा उप्पज्जइ।)–भमरा पीडं उप्पायंति। (५) (कालरझे भमइ।) चंदाइच्चबइल्ला कालरहट्टं भमाडेंति। (६) (रयणवुट्ठी पडइ।) पाडेंति रयणवुट्ठिं देवा। (७) (सप्पे कीडंति।) एस सप्पे कीडावेइ।

(आ) (१) (अहं अपुव्वं सुणेमि।) – जो मं अपुव्वं सुणावेइ।

((२) थणगं पियंता दारगो वा कुमारिया।) – थणगं पिज्जएमाणी दारगं वा कुमारियं।)

(ख) प्रयोजक धातूंचा कर्मणि प्रयोग :-

(१) अकर्मक धातु  व ज्या धातूंचे मूळ कर्ते प्रयोजक कर्तरि रचनेत द्वितीयेत जातात त्यांच्या प्रयोजक कर्मणि रचनेत जो शब्द द्वितीयेत असेल – म्हणजे मूळ कर्ता – त्याची प्रथमा[१], प्रयोजक कर्तरि रचनेतील कर्त्याची तृतीया व प्रयोजक कर्मणि क्रियापद प्रथमेतील शब्दाच्या पुरुष–वचनाप्रमाणे असते. उदा.

(अ) (१) (सुरसेलो न कयाइ वि चलइ। पलयपवणा सुरसेलं न कमाइ वि चालेंति।) ण कमाइ वि सुरसेलो चालिज्जइ पलमपवणेहिं।

(२) (एसो मरइ। जक्खो एवं मारेइ।) एसो जक्खेण मारिज्जइ।

(३) (न य भगवं चलइ झाणाओ। न य भगवं चालेइ झाणाओ तिहुयणं पि।) न य भगवं चालिज्जइ झााणओ निहुयणेणावि।

(४) (पाणीणो वहंति। विसयतण्हा पाणिणो वाहेइ।)

पाणिणो वाहिज्जंति विसयतण्हाए।

(५) (पाणिणो भमंति। पाणिणो भमाडेइ कालपरिणई।)

पाणिणो भमाडिज्जंति कालपरिणईए।

(आ) भक्षणार्थक[२], ज्ञानार्थक धातूंच्या बाबतीत वरील प्रमाणेच रचना.

(१) (सप्पिणी छीरं पिवइ। को सप्पिणिं छीरं पाएइ।) केण पाइया सप्पिणी

---

१ *आपटे, पृ. ३२ पहा.*

२ *अर्धमागधीत प्राय: द्वितीयेतील मूळचे कर्तृपदच प्रथमेत आलेले आढळते. (संस्कृतमध्ये दुसरे द्वितीयान्त पदही विकल्पाने प्रथमेत येत असते)*

छीरं। (२) (सो विचित्तं आहारं भुंजित्था। तं विचित्तं आहारं भुंजावित्था।) (सो) भुंजाविओ विचित्तं आहारं।

(२) मूळ धातु सकर्मक असता प्रयोजक कर्मणि रचनेत मूळ कर्म प्रथमेत जाते आणि मूळ कर्ता व प्रयोजक कर्तरि रचनेतील कर्ता हे तृतीयेत[१] जातात. 'कर' (कृ) या धातूच्या बाबतीत मात्र प्रयोजक कर्तरीत मूळ कर्त्याची विकल्पाने द्वितीया असते, म्हणून प्रयोजक कर्मणि रचनेत मूळ कर्ता पुष्कळदा[२] प्रथमेत येतो. प्रयोजय कर्मणि क्रियापद हे प्रथमेतील शब्दाच्या पुरुषवचनाप्रमाणे असते. उदा.

(१) करिओ तेण महरिसी दुध्दपारणयं। (२) मए एयं रायविरुध्दं काराविओ (एसो)। (३) तुब्भेहिं एस रज्जं कारेयव्वो। (४) तीए वि कारविओ (सो) भोयणाईयं। (५) ते जिणवरेण सम्मं मुणिदिक्खं गाहाविया सव्वे। (६) गाहिओ सो पिउणा कलाकलावकोसल्लं। (७) सो गुरुणा गाहिओ जिणिंददिक्खं। (८) अहं किर पुव्वं सिक्खं गाहिओ मंतीहिं। (९) विवाहाविओ (सो) गुरुहिं इब्भ बालियं। (१०) तेण पणामपुव्वं खमाविओ निययावराहं नलो। (११) दिव्वेण (दैव) रज्जब्भंसं लहाविओ नलो। (१२) सो नलेण हाराविओ सव्वं।

**३०४ प्रयोजक धातु : प्रयोग बदल**

प्रयोजक धातूंच्या कर्तरि व कर्मणि प्रयोगबदलाची काही उदाहरणे पुढे दिली आहेत.

(अ) कर्तरि – कर्मणि :–

(क) (१) अरिट्ठनेमी पउमावइं सयमेव पव्वावेइ। अरिट्ठनेमिणा पउमावई सयमेव पव्वाविज्जइ। (२) सुराहिवइणो ण्हवंति जयगुरुं। सुराहिवईहिं ण्हविज्जइ जयगुरु। (३) तं कुमारो नच्चावेइ। सो कुमारेण नच्चाविज्जइ। (४) पंचविहपमाओ जीवं पाडेइ संसारे। पंचविहपमाएण जीवो पाडिज्जइ संसारे।

(ख) (१) विजए चोरसेणावई चिलायं तक्करं बहूओ चोरविज्जओ सिक्खावेइ।

---

१ *संस्कृतमधील हा नियम अर्धमागधीत पाळला गेलेला दिसत नाही: प्रयोजक रचनेतील कर्ता तृतीयेत जातो, पण मूळचे कर्तृपद प्रयोजक कर्मणि रचनेत प्रथमेत गेलेले आढळते.*

२ *'कर' धातूला आदेश ठेऊन अर्धमागधीत सकर्मक क्रियापदांचे प्रयोजक कर्मणि प्रयोग बदललेले दिसतात.*

विजएण चोरसेणावइणा चिलाओ तक्करो बहूओ चोर विज्जाओ सिक्खाविज्जइ।

(आ) कर्मणि – कर्तरि :-

(१) हा कह निग्घिणविहिणा तुह उवरिं पाडिया विज्जू। हा कह निग्घिणविही तुह उवरिं पाडित्था विज्जुं। (२) मोयावियाओ अम्हे तुमे। मोयाविसु अम्हे तुम्हे। (३) काराविया (सा) कह कह वि मया पाणवित्तिं। करावित्था तं (किं वा ताए) कह कह वि गया पाणवित्तिं। कारावित्था तं (किंवा ताए) कह कह वि अहं पाणवित्तिं (४) वाहराविओ (सो) कुलवइणा। वाहरावित्था (तं) कुलवई। (५) तओ व्वाविया सव्वे वि भगवया। तओ पव्वावित्था सव्वे वि भगवंतो। (६) महादेवो अन्नेहिं ण्हाविज्जइ। महादेवं अन्ने ण्हावेंति ।

## प्रकरण २१

# नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद यांचे उपयोग

### ३०५ नामांचे उपयोग

नामांचे उपयोग पुढीलप्रमाणे होतात.

(१) वाक्यात नाम हे कर्ता, कर्म, करण होऊ शकते.

उदा. (१) सुमाणुसत्तं सुकुलं सुरूवं सोहग्गमारुग्गमतुच्छमाउ। रिध्दिं च विध्दिं च पहुत्तकित्ती पुन्नप्पसाएण लहंति सत्ता ।। (सिरि. १८४) (कर्ता, कर्म, करण) चांगला माणूस जन्म, चांगले कुल व रूप, सौभाग्य, आरोग्य, चांगले आयुष्य, ऋध्दि, भरभराट व पुष्कळ किर्ती ही प्राण्यांना पुण्य प्रसादाने लाभतात.

(२) अकर्मक क्रियापदाचे पूरक म्हणून नामांचा उपयोग होतो.

उदा. - (१) मित्तो वि होइ सत्तू पुरिसाणं पुव्व कम्मदोसेणं। (नाण ४.६४) पूर्व कर्म दोषाने माणसाच्या बाबतीत मित्र सुध्दा शत्रु होतो. (२) तं सि नाहो अणाहाणं। (उत्त. २०.५६) तू अनाथांचा नाथ आहेस.

(३) सकर्मक पण अपुरे विधेय असणाऱ्या क्रियापदांचे पूरक म्हणून नामांचा उपयोग होतो. उदा.

(१) दुहं मुणइ सोक्खं। (बंभ पृ. ३६) दु:खाला सुख मानतो. (२) नयरं जाणाहि देहयं। (नाण. १.२३४) देहाला नगर समज.

(४) कधी विधेय म्हणून नामांचा उपयोग होतो. (यावेळी असणे हे क्रियापद अध्याहृत असते). उदा.

जीवदय च्चिय धम्मो। (सुपास. ६२८) जीवदया हाच धर्म.

(५) दुसऱ्या नामांबद्दल अधिक माहिती सांगण्यास नामांचा उपयोग होतो.

(१) मम धम्मायरिए धम्मोवएसए समणे भगवं महावीरे। (अंत. ७६) माझे धर्माचार्य, धर्मोपदेशक, श्रमण, भगवान महावीर (२) तस्स णं नागस्स गाहावइस्स

पुत्ते सुलसाए भारियाए अत्रए अणीयसे नामं कुमारे होत्था। (अंत २१) त्या नाग नावाच्या गृहस्थाचा पुत्र, सुलसा नामक भार्येचा मुलगा अणीयस नावाचा कुमार होता.

(६) कधी नामांचा उपयोग विशेषणाप्रमाणे होतो.

(अ) समासांत पूर्वपद नाम असता कित्येकदा त्याचा उपयोग विशेषणाप्रमाणे असतो. उदा. माइतरं (मातृ–गृहम्), सव्वन्नु – भासियाइं (समरा पृ. १) (सर्वज्ञाची भाषणे), रुद्दक्खमला (समरा पृ.९) (रुद्राक्षमाला)

(आ) षष्ठ्यन्त नाम हे विशेषणाप्रमाणेच असते. उदा.

(१) विस्सनंदिणो महारायस्स अग्गमहिसीए दासचेडीओ। (महा पृ.३१ अ) विस्सनंदि महाराजाच्या पट्टराणीच्या दासी. (२) मह जीवस्स सामिणी देवि तं एक्का। (कथा पृ. ३) हे देवी, माझ्या जीवाची स्वामिनी तू एकटीच आहेस.

(७) नामाच्या द्विरुक्तीने 'प्रत्येक' असा अर्थ होतो.

उदा. (१) गेहे गेहे। (विवाग पृ. ३) घरोघरी. (२) पए पए विसीयंतो। (दस २.१) पावलोपावली विषाद पावणारा. (३) दिणे दिणे एइ मह समीवं। (सुर. ११.६५) दररोज माझ्याजवळ येई.

(८) नामाच्या मागे 'एग' आल्यास अनिश्चिततेचा बोध होतो.

उदा. – (१) पुच्छिओ अपेण एगो पुरिसो। त्याने एका पुरुषाला विचारले. (२) एगंमि नयरे। (कथा पृ ५४) एका नगरात.

(९) काही नामांच्या द्वितीया ते सप्तमीपर्यंतच्या विभक्तींच्या एकवचनी रुपांचा उपयोग क्रियाविशेषण[१] अव्ययाप्रमाणे होतो. उदा.

द्वितीया ए.व. :– सच्चं, सुहं, रुच्छंदं, उक्कोसं (जास्तीत जास्त); तृतीया[२] ए.व. :– सुहेण, समासेणं, छंदेणं, दुहेण (दुःख), उक्कोसेण, कमेण, नियमेण, निच्छएण, विसेसेण, कट्ठेण (कष्ट); चतुर्थी ए.व. :– अट्ठाए (साठी); पंचमी ए.व. :– बला (जोराने), नियमा (नियमाने), चिरकालाओ, षष्ठी ए.व. :– (नादानुकारी शब्द): सरसरस्स, दवदवस्स, तडतडस्स, छडछडस्स, मडमडस्स,

---

१ *काळे, पृ. २२९*

२ *नादानुकारी शब्द : चरचराए, तडतडाए, ढगढगाए, कडकडाए (समरा पृ. २५७)*

धगधगस्स, कडकडस्स, करकरस्स; सप्तमी ए.व. :- राओ(रात्रौ) रात्री.

(१०) काही नामाचे विशेष उपयोग पुढील प्रमाणे होतात :

(१) पाद : नामापुढे आदर, बहुमान दर्शविण्यास :-

(१) साहुनाहपायाणं। (सुपास ५४५) पूज्य साधुनाथांचे (२) आयरियपाया पुणअप्पसन्ना। (दस. ९.१५) पूज्य आचार्य जर अप्रसन्न [असतील]

(२) अज्जउत्त[1] (आर्यपुत्र) :- प्राय: तरुण स्त्रिया पतीला आर्यपुत्र म्हणत. उदा. (१) अज्जउत्त पेच्छ पेच्छा (कथा पृ. ११४) आर्यपुत्रा, पहा पहा. (२) अज्जउत्त न एस अवसरो पच्छ वलियव्वस्स। (बंभ पृ. ६६) आर्यपुत्रा मागे वळण्याची ही वेळ नव्हे.

(३) भट्टारय :- आदरपूर्वक बोलतांना 'भट्टारयं याचा उपयोग केलेला आढळतो.

कत्तो भट्टारया आया। (नाण. ४.८०) महाराज कोठून आहे?

(४) भट्टिणी[2] व भट्टिदारिया :- राणी व राजकन्या यांना उद्देशून प्राय: या शब्दांचा उपयोग केला जातो.

(१) भट्टिणि, भट्टिदारिया :- राणी व राजकन्या यांना उद्देशून प्राय: या शब्दांचा उपयोग केला जातो.

(१) भट्टिणि, भट्टिदारिया विन्नवेइ। (समरा पृ.६२४) राणीसाहेब, राजकन्या विनंति करते. (२) भट्टिणि, पावो खु एस गब्भो। (समरा पृ. १३५) बाईसाहेब हा गर्भ खरोखर पापी आहे.

(५) देव, देवी :- राजा, राणी यांना संबोधण्यास

(१) देव पसत्थं मुहुत्तं। (समरा पृ.२२) महाराज, मुहूर्त प्रशस्त आहे.

(२) नंदाए देवीए अत्तए। (नायासं पृ. ३) नंदा राणीचा पुत्र.

(६) अज्ज (आर्य) :- आदरार्थी बोलताना 'अज्ज' या शब्दाचा उपयोग केलेला आढळतो.

अज्ज सरणागओ म्हि। (समरा पृ. १९८) आर्या शरणागत आहे मी.

---

१ *कधी इतरांकडूनही या शब्दाचा उपयोग केला गेलेला आढळतो.*

२ *कधी आदर दर्शविण्यास या शब्दाचा उपयोग इतरांचे बाबतीतही केला गेलेला आढळतो.*

(७) इंद, वग्घ, पुंगव, वसह, सीह, सद्दूल इत्यादि शब्द कर्मधारय समासात उत्तरपदी असता श्रेष्ठत्व दाखवितात उदा. नरवसह, अणगारसीह, पुरिसवग्घ, इत्यादि.

(८) देशनामाने कधी तद्वासी जनांचा निर्देश होतो :

उदा – (१) लाडाण माउलधूया गम्मा। (धर्मो पृ.१४७) लाटदेशीयांचे बाबतीत मामाची मुलगी विवाह योग्य आहे. (२) अकारण कोवणा कुंकणा। (नल पृ.३) कोंकणवासी अकारण रागाविणारे असतात.

### ३०६ सर्वनामांचे उपयोग

क्रियापद वा शब्दयोगी अव्यये याशी योग असता नामाप्रमाणेच सर्वनामांचाही उपयोग[१] होतो.

उदा – (१) न देइ कोइ कस्स वि सुक्खं दुक्खं च निच्छओ एसो। (सिरि. ३२८) कोणी कुणाला सुख आणि दुःख देत नाही, हे निश्चित आहे. (२) तुमए विणा विणासो सुहस्स मह संपयं जाओ। (नल पृ. ४७) सांप्रत, तुझ्या विना माझ्या सुखाचा नाश झाला आहे. (३) अहमेव दुहभायणं होमि। (नल पृ. १४) मीच दुःखाचे आश्रयस्थान होईन.

खेरीज भिन्न भिन्न सर्वनामांचे उपयोग पुढील प्रमाणे होतात.

(अ) पुरुषवाचक सर्वनामे :–

(१) औपचारिकरीत्या द्वितीय पुरुषात **'भवंत'** चा उपयोग[२] केला जातो. मात्र, 'भवंत' ला क्रियापद मात्र तृतीय पुरुषी लागते. उदा. (१) सुणाउ भोई। (समरा पृ.२८४) बाईसाहेबांनी ऐकावे (२) गच्छउ भवं (समरा पृ.६३९) आपण जा. (३) भो भो पेच्छंतु भवंता। (जिन पृ. ६५) अहो, आपण पहा.

(२) पुरुषवाचक सर्वनामांची जी लघु वा संक्षिप्त रुपे आहेत (उदा. – मे, से इत्यादी) ती वाक्यारंभी व प्रायः संबोधनानंतर वापरली जात नाहीत. उदा :–

(१) जो ते रुच्चइ तं गेण्ह। (चउ प्र. २०) जो तुला आवडेल तो घे.

(२) को भे मोक्खसाहणोवाओ। (कथा पृ.१३७) तुमचा मोक्षसाधन

---

*१ आपटे, पृ. ९०*

*२ 'भवंत' ने नेहमीच आदर दर्शविला जातो, असे मात्र नाही. आपटे, पृ. ९१ पहा.*

म्हणून कोणता उपाय आहे? (३) किं णे समुद्दतरणेणं। (समरा पृ. २०१) आम्हाला समुद्र तरण्याचा काय उपयोग आहे?

(आ) स्वदर्शक सर्वनामांचा[१] उपयोग :-

(अप्प,[२] अत्त, स,[३] सग) :-

(१) पयडह अप्पणो रुवे। (सुपास. ४९२) आपली रूपे प्रकट करा.

(२) अत्तणो हियए। (अगड १४६) स्वत:च्या हृदयात (३) तं अप्पणा न पिबे। (दस ५.१.८०) ते आपण पिऊ नये (४) साओ गिहाओ निग्गच्छइ। (पएसि परि.६) स्वत:च्या घरातून बाहेर पडतो. (५) भायरो मे महाराय सगा जेट्ठ कणिट्ठगा। (उत्त २०.२६) महाराज माझे ज्येष्ठ व कनिष्ठ सक्खे भाऊ.

(इ) दर्शक सर्वनामांचा[४] उपयोग :-

दर्शक सर्वनामांचा उपयोग स्वतंत्रपणे वा नामा सह करता येतो.

उदा. (१) एस मम पुत्तो। (बंभ पृ. ४३) हा माझा पुत्र (२) सा वहू। (बंभ पृ.४३) ती वधू. (नामा सह) (३) चिंतियं च णे । (बंभ पृ.४१) त्याने विचार केला (४) तीए पेसियमियं। (बंभ पृ.५३) तिने हे पाठविले आहे. (स्वतंत्रपणे)

(क) एय (एतद्) :-

(१) वक्त्याच्या अगदी संनिध असणारी वस्तु वा व्यक्ती दर्शविण्यास:-

(१) एए सव्वे सुहेसिणो। (उत्त २२.१६) हे सर्व सुखाची इच्छा करणारे आहेत. (२) एयं मे चरियं। समरा पृ. १०९) हे माझे चरित्र.

(२) कधी 'ज' या संबंधी सर्वनामाबरोबर 'एय' चा उपयोग केला जातो. उदा - (१) पच्चक्खं हि भयवओ एयं

---

१ *पुष्कळदा 'सयं' (स्वयम्) या अव्ययानेच या सर्वनामाचे कार्य केले जाते. उदा. (१) अह से सयमेव लुंचई केसे पंचमुट्ठीहिं। (उत्त. २२.२४) मग त्याने स्वत:च पाच मुठीत केस उपटले. (२) एक्को सयं पच्चणु होइ दुक्खं। उत्त.१३.२३) (त्याला) एकट्यालाच स्वत: दु:ख भोगावे लागते.*

२ *हा शब्द नेहमी पुल्लिंगी ए.व.त वापरला जातो.*

३ *स, सग यांचा प्राय: विशेषणाप्रमाणेच उपयोग होतो.*

४ *इदमस्तु सन्निकृष्टं समीपतरवर्ति चैतदो रूपम्।*
*अदसस्तु विप्रकृष्टं तदिति परोक्षे विजानीयात्।।*

जमहं तु पुच्छिस्सं। (सुर ४.८६) मी आता जे विचारणार आहे ते हे भगवंतांना प्रत्यक्ष (दिसतेच) आहे. (२) का एसा देवया जा नट्टविहिं दाऊण गया। (धर्मो पृ. २२१) नृत्यविधि दाखवून जी गेली (ती) ही देवता कोण?

(३) कधी पूर्वगामी वाक्याबद्दल – त्याचा निर्देश करण्यास– 'एय' चा उपयोग केला जातो. उदा.

(१) इह वंसे जो राया तं सेवामो त्ति एस अम्ह कमो। (नल पृ.११) या वंशात जो राजा, त्याची सेवा करावी, हा आमचा क्रम (२) वेरीणं घरे कुमारो वच्चइ जो राजा, त्याची सेवा करावी हा आमचा क्रम (२) वेरीणं घरे कुमारो वच्चइ न सोहणमेयं। (कथा पृ. ३०) वैऱ्यांच्या घरी कुमार जात आहे, हे चांगले नाही.

(४) जोर देण्यास 'त' या सर्वनामाबरोबर 'एय' चा उपयोग होतो.

(१) एसा सा मह भज्जा। (नाण ४.७०) ही ती माझी भार्या. (२) एसो सो पिययथो मज्झ। (जिन पृ. ३५) हा तो माझा प्रियतम.

(५) पुष्कळदा 'अहं' बरोबरही 'एय' चा उपयोग आढळतो.

(१) एसा सा हं। (सुपास. ५३१) ही ती मी (२ एसो सो हं तव पुत्तो। (कथा पृ.१४) हा तो मी तुझा पुत्र.

(ख) इम (इदम्) :-

(१) वक्त्याच्या संनिधची व्यक्ति वा वस्तु दर्शविण्यास :-

(१) इमे पाणा। (उत्त २२.१६) हे प्राणी (२) इमिणा करवालेण। (समरा पृ. १२९) या तरवारीने.

(२) कधी 'ज' या संबंधी सर्वनामा बरोबर 'इम' चा उपयोग होतो. इमा नो छट्ठिमा जाई अन्नमन्नेण जा विणा। (उत्त.१३.७) ज्यात आपण एकत्र नाही असा हा आपला सहावा जन्म.

(३) कधी वाक्य दर्शविण्यास 'इम' चा उपयोग होतो.

(१) न हि अयं थाणुस्स अवराहो जं अंधो न पस्सइ। (समरा पृ.१७०)

आंधळ्याला दिसत नाही, हा काही खांबाचा अपराध नव्हे. (२) रायसासणमिणं जं ते गेहमवलोइयव्वं। (समरा पृ. ९१) तुझे घर (शोधून) पहायचे, ही राजाची आज्ञा आहे.

(४) जोर देण्यास कधी 'त' या सर्वनामाबराबर 'इम' चा उपयोग होतो. उदा. :- इमे ते खलु बावीसं परीसहा। (उत्त २) हेच ते बावीस परीसह (त्रास)

(५) कधी कधी 'अहं' बरोबर 'इम' चा उपयोग होतो.

उदा - इमो सो हं। (नल पृ.५०) हा तो मी.

(ग) त (तद्) :-

(१) तृतीय पुरुषी सर्वनामाप्रमाणे 'त' चा उपयोग होतो.

(१) चिंतयंतो सो निग्गओ नयराओ। (समरा पृ. २६) विचार करीत तो नगरातून बाहेर पडला. (२) तओ तेण भणियं। (समरा पृ.२९) नंतर त्यानें म्हटले.

(२) नामाबरोबर 'त' चा उपयोग असता निश्चिततेचा बोध होतो.

(१) मूढो खु सो राया। (समरा पृ. २७) तो राजा खरोखर मूर्ख आहे.

(२) तंमि गामे। (बंभ. पृ. ६८) त्या गावात.

(३) प्रसिध्द वस्तुंचा निर्देश करण्यास 'त' चा उपयोग केला जातो.

ते गिरिसिहरा ते पीलुपल्लवा ते करीर कसरवक्का। (वज्जा.

२२१) ती पर्वतशिखरे, ते पीलु वृक्षाचे पल्लव, त्या करीर (नामक) झुडपाच्या कळ्या.

(४) पूर्वगामी नामाबद्दल - त्याचा निर्देश करण्यास - 'त'चा उपयोग होतो. माया पिया.... नालं ते मम ताणा य। (उत्त ६.३) आई, बाप.... ते माझ्या रक्षणास समर्थ नाहीत.

(५) 'ज' या संबंधी सर्वनामबरोबर प्राय: 'त' चा उपयोग होतो

(१) पावाण वि ते पावा महाणुभावाण लेंति जे दोसे। (धर्मो पृ. ६९) जे मोठ्या माणसांचे दोष काढतात ते पाप्यातले पापी होत. (२) जे विसएसु पसत्ता ते अप्पसुहेण वंचिया मूढा। भमिहिंति भवसमुद्दे दुक्ख सहस्साइ पावंता।। (पउम. ३३.३६) जे विषयात आसक्त आहेत ते मूढ अल्पसुखाने वंचित होऊन हजारो दु:खे भोगीत संसार सागरात भ्रमण करतील.

(६) कधी 'एय' बरोबर 'त' चा उपयोग होतो.

सच्चिय एसा अम्हं भगिणी। (सुर ८.१९१) तीच ही आमची बहीण.

(७) कधी 'इम' बरोबर 'त' चा उपयोग होतो.

सो चेव इमो वसहो। (धर्मो पृ. १.२०) तोच हा बैल.

(८) कधी 'अहं' बरोबर 'त' चा उपयोग होतो.

सो य अहं। (चउ पृ.३४) आणि तो मी

(९) कधी 'तुम' बरोबर 'त' चा उपयोग होतो.

(१) स तुमं। (समरा पृ.६५४) तो तू (२) किं सो तुमं। (धर्मो पृ. ४०) तो तू काय?

(१०) 'त' ची द्विरुक्ति केली असता भिन्न भिन्न कित्येक असा[1] अर्थ होतो. (१) तेहिं तेहिं उवाएहिं। (दस. ९.२.२०) त्या त्या उपायांनी (२) तेहिं तेहिं महुरवयमणेहिं। (महा. पृ.९७ अ) त्या त्या मधुर वचनांनी.

(११) तोच या अर्थी जोर देण्यास 'त' चा उपयोग होतो, यावेळी जोरदर्शक अव्यय कधी उक्त तर कधी अनुक्त[2] असते.

(१) ते दुमा ते पव्वया तं च अरण्णं। (नल पृ.१४) तेच वृक्ष, तेच पर्वत आणि तेच अरण्य. (२) सो मित्तो सो सुयणो सो च्चिय परमत्थबंधवो होइ। (जिन पृ. ३०) तोच मित्र, तोच सज्जन, तोच खरा बांधव होतो.

(घ) अदस् :-

अर्धमागधीत 'अदस्' या सर्व नामाचा उपयोग अत्यंत कमी आहे.

(१) दूरची वस्तु दाखविण्यास 'अदस्' चा उपयोग होतो.

असो तत्तमकासी। (सूय. १.१.३.३८) त्याने तत्त्व (निर्माण) केले.

(२) कधी 'हा' ह्या अर्थी 'अदस्' चा उपयोग आढळतो.

भयवं केऽमी चारणसमणा। (कुम्मा. १६५) भगवन्, हे चारणश्रमण कोण?

(३) 'अमुग' चाही थोडा फार उपयोग आढळतो.

(१) अमुगंमि देवयायणे। (जिन पृ.७) अमुक देवळात (२) अमुगंमि गिहे चिट्ठइ। (सुपास. ५३०) अमुक घरात रहात आहे.

(ई) संबंधी सर्वनाम : ज (यद्) :-

(१) प्राय: 'त' च्या जोडीने 'ज' चा उपयोग होत असला, तरी जोडीला

---

*१ काळे. पृ.५०९*

*२ आपटे, पृ. ९२*

‘त’ नसता सुध्दा नुसत्या ‘ज’ चा उपयोग होतो.

(१) नियगरुय पभाव पसंसणेण लज्जंति जे महासत्ता।

(अगड ७९) जे मोठे लोक आहेत ते स्वतःच्या महान् प्रभावाच्या प्रशंसेने लज्जित होतात. (२) गरुयावराहिणं पि हु अणुकंपंतहि जे महासत्ता। (सुपास : ५४३) जे मोठे लोक आहेत ते मोठा अपराध करणाऱ्यावर सुध्दा खरोखर अनुकंपा दाखवितात.

(२) कधी सबंध वाक्याबद्दल[१] ‘ज’ येतो :

(१) सुंदरमेयं जायं जाईसरणं इमीए जं जायं। (सुर ७.११४) हिला (पूर्व) जन्मस्मरण झाले हे चांगले झाले (२) अच्छरियं जं एसो हसइ। (सुपास. ६०९) हा हसतो हे आश्चर्य आहे.

(३) कधी ‘एय’ बरोबर ‘ज’ चा उपयोग होतो.

जा एसा तुह दुहिया सा। (महा पृ. ३०७ ब) जी ही तुझी मुलगी ती

(४) कधी ‘इम’ बरोबर ‘ज’ चा उपयोग होतो.

(१) जे इमे साहुणो वोलीणा। (धर्मो पृ. (२) जे हे साधु गेले.

(५) कधी ‘अहं’ बरोबर ‘ज’चा उपयोग होतो.

जा हं तेण परिचत्ता। (पाकमा पृ. ५) ज्या मला त्याने टाकले.

(६) ‘ज’ च्या द्विरुक्तीने कोणताही, प्रत्येक, सर्व असा अर्थ होतो.

(१) जा जा दच्छिसि नारिओ। (दस. २.९) ज्या ज्या स्त्रिया पहाशील. (२) जा जा वच्चइ रयणी न सा पडिनियत्तई। (उत्त. १४.२५) जी जी रात्र जाते ती परत येत नाही.

(उ) प्रश्नार्थक सर्वनाम : क (किम्) :

(१) प्रश्न विचारताना कोण, कोणता या अर्थी ‘क’ चा उपयोग होतो.

(१) जल बिंदुचंचले जीवियंमि को मन्नइ थिरत्तं। (कुम्मा ५९) पाण्याच्या बिंदूप्रमाणे चंचल असणाऱ्या जीविताचे बाबतीत स्थिरत्व कोण मानील? (२) को सि तुमं। (धर्मो पृ. ७०) तू कोण आहेस?

---

१ *यावेळी ‘ज’ चे रूप अव्ययाप्रमाणे नेहमी नपुं. द्वि.ए.व.त असते. काळे, पृ. ४७४*

(२) 'क' च्या द्विसक्तीने कोणताही प्रत्येक असा अर्थ होतो.

(१) किं किं अहवा मए न कयं। (महा पृ. १४२ अ) अथवा मी काय काय बरे कले नाही? (२) विवरं मुहे विहिंमि किं किं न वा होइ। (महा पृ. ५० अ) अथवा दैव विपरीत झाल्यावर काय काय बरे होत नाही?

(३) 'ज' शी उपयोग असताहि सर्व, प्रत्येक असा अर्थ होतो.

(१) जाणि काणि रयणाणि समुप्पज्जंति सव्वाणि ताणि रायकुलगामीणि। (निरया पृ. २३) जी काही (म्ह.सर्व) रत्ने उत्पन्न होतात ती सर्व राजवंशात जातात. (२) जे केइ पत्थिवा। (उत्त ९.३२) जे कोणी राजे.

(४) 'क' पुढे 'नाम' असता कोण बरे, काय बरे असा अर्थ होतो.

को नाम कुम्मापुत्तो। (कुम्मा. १९) कुम्मापुत्त हा कोण बरे?

(५) 'क' पुढे[१] चि (चित्) अथवा (स्वरापुढे) 'इ' वा 'पि' किंवा 'वि' (अपि) असता कोणीतरी असा अनिश्चिततेचा बोध होतो.

(१) तत्थ कंचि साहुपुरिसं पत्थेमि। (अरी पृ.५) तेथे कोण्यातरी सज्जन माणसाची प्रार्थना करीत. (२) देवाण करेंति केइ पूयाओ। दाणाइ देंति केइ। (समरा पृ. ७३३) कोणी देवांची पूजा करतात. कोणी दाने देतात. (३) का वि देवया एसा। (नल पृ.१६) ही कोणी तरी देवता असावी. (४) संसारे परमत्थेण किं पि नो विज्जए चोज्जं। (महा पृ. २९१ अ) खरे पहाता संसारात आश्चर्य असे कोणतेही नाही.

(अ) 'क' पुढे 'अपि' असता कधी अवर्णनीयता सूचित होते.

(१) केवलमणुभवगम्मो कोइ पमोओ समुप्पन्नो। (महा पृ.२५१ अ) केवल अनुभवगम्य असा काहीतरी (अवर्णनीय) आनंद उत्पन्न झाला.

(२) तं किं पि आसि तइया तेसिं तणयस्स संगमे सोक्खं। (सुर. १५.१७४) त्यावेळी पुत्र संगमाने त्यांना काही अवर्णनीय सुख झाले.

**(ऊ) इतर सर्वनामे:–**

(१) एग, अवर, अन्न ही अनेकवचनात योजिल्यास काही दुसरे असा अर्थ

---

१ *सर्व लिंगात व वचन–विभक्तीत ही अव्यये 'क' पुढे येऊ शकतात.*

होतो. उदा. (१) सीयंति एगे बहुकायरा नरा। (उत्त. २०.३८) काही अती भित्रे नर गलित गात्र[१] होतात (२) अन्ने 'विण्हू पहाणो' त्ति भणंति। (पाकमा पृ.४०) दुसरे 'विष्णु प्रधान (मुख्य) असे म्हणतात. (३) अवरे 'महेसरो उत्तमदेवो' त्ति भणंति (पाकमा पृ. ४०) काही 'महेश्वर हा उत्तम देव' असे म्हणतात.

(२) 'कयर' (कतर) चा 'कोणता' या अर्थी उपयोग होतो.

(१) कयरे ते खलु बावीस परीसहा। (उत्त २) ते बावीस परीसह कोणते? (२) कमरो इमो पएसो। (अगड २७५) हा प्रदेश कोणता?

(३) इयर[२] (इतर) :-

एगे दूसिंति गुणे इयरे दोसे वि छायंति। (जिन पृ.१) काही गुणांना दोष देतात, तर इतर दोष सुध्दा झाकतात.

(४) एगयर :- कोणीही एक :-

एयाणं एगयरं उवभुंजसु नत्थि अन्नहा मोक्खो। (सुप स. ४८७) यातील कोणतेहि एक खा नाहीतर सुटका नाही.

(५) अन्नयर :- कोणीही, कोणताही:-

(१) अन्नयरेणं धम्मेणं। (सूय. २.१.९) कोणत्यातरी धर्माने

(२) अन्नयरेसु देवलोएसु। (सूय. २.२.२४) कोणत्याही देव लोकात.

(६) 'एग' चा[३] कधी 'केवल', असाही अर्थ होतो.

संसारे जीवाणं एक्को नरवर हिओ धम्मो। (जिन पृ.३७) राजा संसारात जीवांना फक्त धर्म हा हितकारक आहे.

(अ) कधी मुख्य, प्रधान असा अर्थ होतो.

कत्थ भुवणेक्कपहुणो चरियं अम्हारिसो कहिं कुकई। (महा पृ. १.२७) कोठे जगाच्या मुख्य स्वामीचे चरित्र आणि कोठे आमच्यासारखा क्षुद्र कवि.

---

१ *याकोबीचे भाषांतर - चुकीच्या मार्गाने जातात.*

२ *एग, अवर प्रमाणे थोडाफार उपयोग होतो.*

३ *'एग' चे अनेक अर्थ असे आहेत :-* ***एकोऽल्पार्थे प्रधाने च प्रथमे केवले तथा। साधारणे समानेऽपि संख्यायां च प्रयुज्यते।।***

(७) अन्न, पर यांच्या द्विरुक्तीने[1] परस्पर संबंध सूचित होतो.

(१) अन्नोन्नं पहरंता। (जिन पृ. २०) परस्परावर प्रहार करणारे.

(२) एवं परोप्परं जुज्झिराण तेसिं। (महा पृ. ५७अ) अशाप्रकारे परस्पर युध्द करणाऱ्या त्यांचे (३) अवरोप्परओ ... पीई। (सुपास . ४११) परस्पर प्रीति.

(८) अन्न-अन्न : एक-दुसरा असा अर्थ होतो.

पिए न एस अम्हाण कुलक्कमो जं अण्णम्मि पुव्वपविट्ठे अण्णो वि पविसइ। (धर्मो पृ. १२५) प्रिये, एक प्रथम प्रविष्ट झाला असता दुसऱ्याने ही तेथे प्रवेश करावा, असा आमचा कुल क्रम नाही.

(९) ज, त आणि क यांच्या काही विभक्तींच्या एकवचनी रुपांचा उपयोग अव्ययाप्रमाणे केला जातो. उदा:- जेण-तेण (ज्याअर्थी - त्याअर्थी), जम्हा-तम्हा, कम्हा (कारण) इत्यादी.

**३०७ विशेषणांचे उपयोग**

(१) नामांबद्दल विशेष माहिती देण्याचे कार्य विशेषणे करतात.

(१) सुंदरधम्मरयाण वि विसमं विहिविलसिमं समावडइ। (सुपास ५१०) चांगल्या धर्मांत रत असणाऱ्यांवर सुध्दा दैवाचा विषम खेळ आदळतो. (२) रागानलपज्जलिओ कज्जाकज्जं न पेच्छए पुरिसो। (धर्मो पृ.१९७) रागरूपी अग्नीने पेटलेला पुरुष कार्याकार्य पहात नाही.

(२) नुसत्या विशेषणाचा कधी विशेष्याप्रमाणे उपयोग होतो.

(१) चउत्थो तत्थेव ठिओ। (अरी पृ.७) चौथा तेथेच राहिला. (२) जाणता विहु अलिय मुहप्पिय चेव जंपंति। (सिरि १०४) जाणते सुध्दा मुखावर प्रिय असे खोटे वचन बोलतात (३) सेसा दुक्खाणि पावंति। (पउम. ३३.४३) उरलेले दु:ख पावतात.

(अ) संख्या विशेषणे कधी नामाप्रमाणे वाक्यात उद्देश म्हणून वापरली जातात.

दो वि मया संता। (बंभ पृ. २६) दोघेही मृत झाले असता.

---

१ *यावेळी त्यांचे ए.व. असते, उपयोग प्राय: क्रियाविशेषण अव्ययाप्रमाणे असतो.*

(३) अकर्मक क्रियापदाचे पूरक म्हणून विशेषणाचा उपयोग होतो.

(१) वसणम्मि अणुव्विग्गा विहवम्मि अगव्विया भये धीरा। होंति अभिण्ण सहावा समम्मि विसमम्मि य समत्था।। (धर्मो पृ. १९८) संकटकाली अनुद्विग्न, वैभवस्थितीत गर्वरहित, भयाचे परिस्थितीत धीर आणि चांगल्या वा वाईट परिस्थितीत समर्थ हे अभिन्न स्वभावी असतात. (२) अइरहस कयकज्जाइं पज्जं तदा तणाइं हवंति। (महा पृ.५० ब) फार घाईने केलेली कामे परिणामी दारुण होतात.

(४) सकर्मक पण अपुरे विधेय असणाऱ्या क्रियापदांचे पूरक म्हणून विशेषणांचा उपयोग होतो.

(१) कुणसु निव्विसं एयं। (पाकमा पृ. २३) याला निर्विष कर. (२) निरत्थयं रज्जं मन्नामि। (धर्मो पृ. १२५) मी राज्य निरर्थक मानतो.

(५) विधेय म्हणून विशेषणाचा उपयोग होतो; यावेळी 'असणे' क्रियापद उक्त वा अनुक्त असते.

(१) दुलहा विसुद्धबंभयारिणो। (धर्मो पृ.३६) विशुद्ध ब्रह्मचारी दुर्लभ आहेत. (२) न य विसयासत्ताण दुल्लहाओ आवयाउ त्ति। (धर्मो पृ.१०३) आणि विषयासक्तांना आपदा दुर्लभ नाहीत.

(६) विशेषणाच्या द्विरुक्तीने आधिक्य, पृथक्त्व यांचा बोध होतो.

(अ) आधिक्य :- (१) मह्या मह्या सद्देण। (विवाग पृ. ७) मोठमोठ्या आवाजाने (२) महामहंतो अक्कंदो। (सुपास ५६४) फार मोठा आक्रंद

(आ) पृथक्त्व : (क) (१) सएहिंतो २ गिहेहिंतो। (विवाग पृ.८) आपापल्या घरातून (२) सएहिं २ काएहिं । (नाया पृ. ६५) आपापल्या देहात (३) नियनिय पुत्ते ठावह नियपए) (कथा पृ. १०) आपापल्या पदी आपापल्या पुत्रांना ठेवा.

(ख) दुवे दुवे। (दोन दोन) याचप्रमाणे चत्तारि २, अट्ठ २, सोलस २, अट्ठट्ठ नाडयाइं। (पउम. २.५१) आठ आठ नाटके.

(७) 'संति य' या विशेषणाचा चा-ची-चे या अर्थी उपयोग केला जातो.

(१) एसा सा मज्झ संति या मुद्दा। (सुर ६.७८) हीच ती माझी मुद्रा.

(२) जं जस्स संति यं दव्वं। (समरा पृ. २२३) जे ज्याचे द्रव्य.

(८) काही विशेषणांच्या द्वितीया ते सप्तमी पर्यंतच्या एकवचनी रुपांचा

उपयोग क्रियाविशेषण अव्ययाप्रमाणे केला जातो. उदा. द्वितीया ए.व. :- लहुं (हळु), खिप्पं (लवकर), मंदं (हळु), फुडं (स्पष्टपणे), सिग्घं (लवकर), निच्चं (नित्य), सययं (सतत), गाढं, निस्संदिद्धं (नि:संदिग्धपणे), सायरं (सादर), अहियं (अधिक), चिरं, अवस्सं (अवश्य), अच्चंतं (अत्यंत) तृतीया ए.व. :- दूरेणं, चिरेण, अचिरेण, चतुर्थी ए.व. :- चिरा, अचिरा, षष्ठी ए.व.:- चिरस्स, सप्तमी ए.व. :- दूरे, अंतिए, समीवे, अग्गे इत्यादी.

(९) तर वाचक विशेषणांचा उपयोग तुलनेत केला जातो त्यांना पंचमी विभक्तीची अपेक्षा असते.

(१) न य इमाओ अन्नं सुंदरयरं। (समरा पृ. ४८९) आणि याहून दुसरे काही अधिक सुंदर नाही. (२) जीवियाओ वि इट्ठयरो। (समरा. पृ. ३६२) जीवितापेक्षा अधिक इष्ट.

(१०) अब्भहिय, अहिय, हीण, ऊण इत्यादी विशेषणांचा तर वाचकांप्रमाणे उपयोग होतो.

(१) जीवियाओ य अब्भहिओ। (समरा पृ.२३२) आणि जीवितापेक्षा अधिक. (२) तुह तिव्व-तव-जणिय-सरीरपीडाओ वि मे अहिया सरीरपीडा। (समरा पृ.२३) तीव्रतपाने होणाऱ्या तुझ्या देहाच्या पीडेपेक्षा माझ्या शरीराची पीडा अधिक आहे. (३) केण उण अहं भवओ ऊणओ। (समरा पृ. ४०९) पण तुझ्यापेक्षा मी कशात बरे कमी आहे? (४) किं अम्हे वि तुज्झ विहीणा। (कथा पृ.८३) आम्हीसुध्दा काय तुझ्यापेक्षा हीन आहोत?

(११) अनेकांतून एकाचे महत्त्व वा कनिष्ठत्व दाखविण्यास तमवाचक विशेषणाचा उपयोग होतो, षष्ठी[१] वा सप्तमी यांची अपेक्षा असते.

(१) सव्वाण वि उत्तमा पुरंधीणं। (नाण ३.१५) सर्व स्त्रियात उत्तम. (२) वणेसु वा नंदणमाहु सेट्ठं। (सूय १.६.१८) वनात नंदनवनाला श्रेष्ठ म्हणतात.

(१२) पवर, पढम यांचा तमवाचक विशेषणाप्रमाणे उपयोग होतो.

(१) सीहे मियाण पवरे। (उत्त ११.२०) सिंह हा पशूंत श्रेष्ठ.

(२) पवरो पउराण। (सुर १.७३) नागरीकांत श्रेष्ठ (३) एसो पंचणमुक्कारो मंगलाणं च सव्वेसिं पढमं हवइ मंगलं। हा पंचनमस्कार सर्व मंगलांत श्रेष्ठ मंगल

१ *षष्ठी व सप्तमी या विभक्तींचे उपयोग पहा.*

आहे. (४) कुलमहिहराण पढमो मेरु। (लीला. २७३) कुल पर्वतांत मेरु श्रेष्ठ.

(१३) काही विशेषणांचे पुढीलप्रमाणे विशिष्ट उपयोग होतात.

(अ) आदरपूर्वक बोलताना प्राय: महाभाग, महाणुभाव, देवाणुप्पिय यांचा उपयोग केला जातो.

(१) कहसु मह महाभाग। (सुर १०.४९) महाभागा! मला सांग.

(२) ता आगच्छउ ताव सो महाणुभावो। (समरा पृ.२३) तेव्हा तो महानुभाव प्रथम येऊ दे (३) अह केवलिणा भणियं-देवाणुपिए निसामेसु। (सुर १५.१९६) मग केवलीने म्हटले - 'देवानुप्रिये, ऐक'.

(आ) भद्द, भद्दमुह यांचा सर्वसाधारणपणे उपयोग केला जातो.

(१) भद्द अलं विसाएण। (समरा पृ. १९८) भल्या माणसा! विषादपुरे

(२) भद्दमुह मा निक्कारणं कुप्पाहि। (कथा पृ.११३) भद्रमुखा! उगीच रागवू नकोस.

(इ) भंत, भगवंत यांचा उपयोग माननीय जनाशी बोलताना केला जातो.

(१) मम भंते कुओ विणासो। (कथा पृ. ८५) महाराज! माझा नाश कोठून? (२) भयवं करेह पसायं। (समरा. पृ. २३) भगवन्! कृपाप्रसाद करा.

(ई) लहानाशी बोलताना 'जाय' चा उपयोग केला जातो.

जाय अज्ज तए इहेव भोत्तव्वं। (समरा पृ. १८७) बाळा! आज तू इथेच भोजन करावेस.

**३०८ क्रियापदांचे उपयोग**

(अ) (१) एकादी वस्तु वा व्यक्ती याबद्दल काहीतरी सांगणारा विधान करणारा-शब्द म्हणजे क्रियापद असल्याने वाक्यात क्रियापद उद्देश्याची स्थिती वा क्रिया दर्शविते.

(१) साहूण दंसणं पि हु नियमा दुरियं पणासेइ। (समरा पृ. ६४१) साधूंचे दर्शनसुध्दा निश्चितपणे दुरिताचा नाश करते. (२) न हि विधुरसहावा हुंति दुत्थे वि धीरा। (नल पृ.१०) दु:स्थितीत सुद्धा धीरांचा स्वभाव विधुर होत नाही.

(२) वाक्यास पूर्णता आणून वक्त्याच्या दृष्टीने अपेक्षित असणारा काळ वा अर्थ याचा बोध क्रियापदावरुन होतो.

(१) कत्तारमेव अणुजाइ कम्मं। (उत्त १२.२३) कर्म कर्त्याच्या मागोमाग

जाते. (२) सारहिं इणमब्बवी। (उत्त २२.१५) सारथ्याला असे म्हणाला. (३) धम्मं काऊण इहं पाविहिसि सुरालए परमसोक्खं। (पउम ३३.४४) धर्म (आचरण) करुन येथे व स्वर्गात परमसौख्य पावशील. (४) पूरेसु मणोरहं मज्झ। (महा पृ. १४३ अ) माझा मनोरथ पूर्ण कर. (५) तं तितिक्खे परीसहं। (उत्त २.१४) ता परीसह (त्रास) सहन करावा.

(आ) (१) काही सकर्मक क्रियापदे दोन कर्मे घेतात.

(१) पभणह तुम्हे निय नायगं इमं वयणं। (सुपास ५७०) तुम्ही आपल्या नायकाला हे वचन सांगा. (२) तओ नमिं रायरिसिं देविंदो इणमब्बवी। (उत्त ९.११) नंतर नमिराजर्षीला देवेंद्र हे (वचन) बोलला.

(२) होणे, असणे, दिसणे इत्यादी अकर्मक[१] क्रियापदांना पूरक लागते. हे पूरक नाम वा विशेषण असू शकते.

(१) मम भत्ता कणयगोरो आसि। (जिन पृ.२७) माझा पति सुवर्णाप्रमाणे गोरा होता. (२) पयईए वि हु पणयवच्छला हुंति सप्पुरिसा। (महा.पृ. १२६ ब) सत्पुरुष हे प्रकृतीनेच खरोखर प्रणतवत्सल असतात. (३) किं आउलो ता य लक्खिज्जसि अज्ज तुमं। (सुपास ५८८) बाबा! तुम्ही आज आकुल कां दिसता?

(३) काही अकर्मक[२] क्रियापदांना सदृश (cognate) कर्म दिलेले आढळते.

(अ) सो तवं तप्पइ। (जिन पृ. ३) तो तप तपतो (करतो)

(आ) अकर्मक क्रियापदाचा क्वचित् सकर्मकाप्रमाणे उपयोग केलेला आढळतो.

(१) ताहे रण्णं परिवसंति। (पउम ३.१४१) मग (ते) वनात राहिले. (२) विहरइ वसुहं संवच्छरं धीरो। (पउम ३.१३९) वर्षभर तो धीर पृथ्वीवर हिंडला.

(४) काही सकर्मक[१] क्रियापदांनाही पूरक लागते.

---

१ *अकर्मक क्रियापदाची क्रिया व तिचे फळ हे कर्त्यावर असतात. खालील अर्थाचे धातु प्राय: अकर्मक आहेत* ***लज्जा–स्थिति जागरणं वृध्दि–क्षय–भय–जीवित–मरणम्। शयन–क्रीडा–रुचि–दिप्त्यर्था धातव एते कर्मविहीना:।।*** *कातंत्र व्याकरण. लाजणे, असणे, रहाणे, जागणे, वाढणे, झिजणे, भिणे, जगणे, मरणे, निजणे, खेळणे, आवडणे आणि प्रकाशणे हे व ह्या अर्थाचे धातु अकर्मक असतात.*

२ *इंग्रजीत – she sighed a deep sigh*

(१) जलहिं मं जाण। (नाण १.२०१) समुद्र तो मी हे जाण (२) मं मन्नसु भत्तारं। (सुपास ५३८) मला पति मान (३) तं धम्मं भणंति बुहा। (सुपास ४९९) त्याला शहाणे धर्म म्हणतात.

(इ) प्रयोजक धातु :-

(१) सर्व प्रयोजक धातु सकर्मक बनतात. क्रिया दुसऱ्याकरवी करविणे हा अर्थ प्रयोजकाने दाखविला जातो.

(१) नेवन्नेहिं मुसं वयावेज्जा। (दस ४) दुसऱ्यांकडून खोटे बोलवू नये. (२) चंदाइच्चबइल्ला कालरहट्टं भमाडेंति। (समरा पृ. २३८) चंद्रसूर्यरुपी बैल कालरुपी रहाट फिरवितात.

(२) कधी मूळ धातूच्या अर्थानेच प्रयोजक धातूचा उपयोग केलेला आढळतो.

(१) आवासिओ बाहिरुज्जाणे। (धर्मो पृ.११९) बाहेरच्या उद्यानात रहिला. (२) समीहियकज्जं सव्वं कारेमि। (अगड. १११) सर्व इच्छित कार्य मी करीन.

(३) कधी मूळ धातूचा उपयोग प्रयोजक धातूसारखा केलेला आढळतो.

(१) पहियाणं दलइ हिययाइं। (सुर २.९१) वाटसरूंची हृदये फोडने (२) कीलामि य जयसेणं तत्थ अहं विविहकीलाहिं। (सुर १.१९२) आणि तेथे मी जयसेणाला विविध क्रीडांनी खेळवीत असे.

(ई) अर्धमागधीत कधी कर्मणि धातु कर्तरि अर्थी वापरलेले आढळतात.

(१) वयं च वित्तिं लब्भामो। (दस ९.४) आणि आम्ही निर्वाहाचे साधन मिळवितो. (२) सव्वजीवा वि इच्छंति जीविउं न मरिज्जिउं। (दस ६.११) सर्व जीव जगण्याची इच्छा करतात मरण्याची नाही. (३) सत्थीकओ वि कुमरो मुच्छिज्जइ। (सुर: १५.९८) स्वस्थ केले तरी कुमार मुर्च्छित झाला.

(उ) जोर देण्यास आज्ञार्थी क्रियापदाची द्विरुक्ति केली जाते.

(१) भो संभूय उवसमसु उवसमसु को वाणलं। (बंभ पृ. ३३) हे संभूता, कोपानल शांत कर शांत कर (२) भो महाभाय पेच्छ पेच्छ। (बंभ पृ. ५७) भल्या माणसा! पहा पहा.

---

१ *ही क्रियापदे अशी :- नाव ठेवणे, म्हणणे, निवडणे, करणे, नेमणे, जाणणे, मानणे वा समजणे इत्यादी*

प्रकरण २२

# अव्ययांचे उपयोग

## ३०९ अव्ययांचे उपयोग

संस्कृतमध्ये काही काही अव्ययांचे विविध उपयोग आढळतात. ते सर्वच अर्धमागधीत आढळतात असे नाही जे आढळतात ते पुढे दिले आहेत. या खेरीज प्राकृतमध्येच आढळणारी अशी काही अव्यये आहेत. त्यांचेही उपयोग पुढे दिले आहेत.

## ३१० अइ[1]

(१) संभावन :- अइ दिअर किं न पेच्छसि। भावोजी! पहात नाही काय? (हेम.)

(२) संबोधन :- पहिय अइ अम्ह पासे भुंजह। (सुपास ५०१) अरे पथिका! आमच्याजवळ (येऊन) जेव.

## ३११ अंग

(१) संबोधन :- दुल्लभे सवणयाए किमंग पुण पासणयाए। (पएसिपरि-२१) ऐकण्यास सुद्धा दुर्लभ, मग अहो पहाण्याच्या बाबतीत काय सांगावे?)

(अ) किमंग[2] :- जास्त काय सांगावे?

(१) देवा वि परिकिलेस भाइणो हवंति किमंग पुण मच्चलोयवासी जणो। (समरा पृ. २०८) देवसुद्धा दुःखभागी होतात मग मर्त्यलोकवासी जनांबद्दल जास्त काय सांगावे? (२) सो देवाण वि पुज्जो किमंग पुण मणुयलोयस्स। (नाण

---

१ ***अइ संभावने।*** *हेम २.२०५*

२ *याबद्दल अभयदेव (नाया (पोथी) पृ.४८ ब) असे म्हणतो :-*
*अंग इति आमंत्रणे, अथवा परिपूर्ण एवायं शब्दः विशेषणार्थः।*

२.९५) तो देवांना सुद्धा पूज्य होतो, मग माणसांच्या बाबतीत जास्त काय बोलावे?

**३१२ अदु, अदुव, अदुवा**

या तीन्हींचाही 'अथवा' या अर्थी उपयोग होतो.

(१) काएण वाया अदु माणसेणं। (दस ११.१८) कायेने, वाचेने अथवा मनाने (२) देवा अदुव माणुसा। (सूय १.११.३) देव वा माणसे (३) इमम्मि लोए अदुवा परत्था। (उत्त ४.५) या लोकात वा परलोकात.

**३१३ अम्मो**[१]

आश्चर्य दर्शविण्यास :- अम्मो एरिसं पि कसिणभंसणं माणुसाणं रूवं होइ। (नल पृ.४) माणसांचे सुद्धा असले काळे व भीषण रूप असते?

**३१४ अम्हो**[२]

(१) संबोधन :- अम्हो बम्हण। (उसा २.७१) अरे ब्राह्मणा!

(२) सूचना :- अम्हो साहसिओ पिओ[३]। (प्रियकर साहसी आहे)

**३१५ अरे**[४]

(१) संबोधन :- अरे दुरायारा। (नल पृ.१६) अरे दुराचाऱ्यानो!

(२) रतिकलह :- अरे मए समं मा करेसु उवहासं। (अरे माझ्याशी उपहास करु नको.)

**३१६ अलं**

(१) निषेध, निवारण, पुरे :- अलं विसाएण विसालणेत्ते। (उसा १.२८) हे विशालनेत्रे, विषाद करु नको.

(१) समर्थ, योग्य :- (१) नालं ते मम ताणाय। (उत्त ६.३) ते माझे रक्षण करण्यास समर्थ नाहीत (२) अलमप्पणो होंति अलं परेसिं। (सुय १.१२.१९) स्वत:चे व दुसऱ्याचे रक्षण करण्यास समर्थ होतात.

---

१ ***अम्मो आश्चर्ये।*** *हेम २.२०५*

२ ***अम्हो दुःखसूचनासम्भाषणेषु.।*** *प्रा.मं. ८.१२*

३ *प्रा. मं. ८.१२*

४ ***रे अरे! संभाषणरतिकलहे।*** *हेम. २.२०१*

### ३१७ अलाहि[१]

निवारण, निषेध :- (१) अलाहि परिहासेण। (महा पृ.२२० अ) परिहास पुरे (२) अलाहि संकाए। (धर्मो पृ. ३९) शंका नको.

### ३१८ अवि[२], वि, पि (अपि)

(१) सुद्धा :- (१) सो वि राया तवं चरे। (उत्त १८.३७) त्या राजाने सुध्दा तप केले. (२) पुरिसुत्तमं पि लच्छी छड्डइ। (महा. २.२०९) पुरुषोत्तमाला सुद्धा लक्ष्मी टाकते.

(२) सुद्धा एकाद्याच्या दृष्टीने :- (१) धणसिरी वि गिहसामिणी जाया। (कथा पृ. २१) धणसिरी सुद्धा गृहस्वामिनी झाली. (२) पउमसिरी वि जाया अग्गमहिसी। (कथा पृ.२१) पउमसिरी सुद्धा पट्टराणी झाली.

(३) प्रश्न विचारताना :- (१) कुमार, अविकुसलं महारायस्स। (समरा पृ.३२८) कुमार! महाराजांचे कुशल आहे (ना)? (२) वच्छ, अवि कुसलं ते तायस्स। (समरा पृ. ५५.३) बाळा! तुझ्या वडलांचे कुशल आहे (ना)?

(४) संशय, अनिश्चितता :- (१) अवि नाम एयमवि एवं हवेज्ज। (समरा पृ. ६२६) हे सुद्धा असे असेल काय बरे? (२) अज्ज, अवि सुमरेसि मं। (समरा पृ. ४३१) आर्या! माझी आठवण आहे?

(५) आशा, अपेक्षा :- यावेळी अवि पुढे प्राय: 'नाम' हा शब्द असतो:- अवि नाम पुज्जंतु से मणोरहा। (समरा पृ. ५६०) (माझी इच्छा आहे की) त्याचे मनोरथ पूर्ण व्हावेत.

(६) 'जरी' या अर्थी विरोध दर्शविण्यास :- (१) गिही वि सो केवली जाओ। (कुम्मा १३९) घरात राहूनसुद्धा तो केवली झाला. (२) न लिप्पए भवमज्झे वि संतो। (उत्त ३२.३४) संसारात असला तरी तो लिप्त होत नाही.

(७) संख्यावाचकानंतर 'अवि' आल्यास सर्व असा अर्थ होतो.

(१) भाउयाण चउण्ह वि दिन्ना विडला भोगा। (कथा पृ. ५०) चारही

---

१ *अलाहि निवारणे. हेम. २.१८९*

२ *अपि संभावना प्रश्न शङ्कागर्हासमुच्चये।*
*तथायुक्तपदार्थेषु कामचार क्रियासु च।।*

भावांना विपुल भोग दिले. (२) राया चउण्ह वि आसमाणं गुरु। (कथा पृ. ११०) राजा चारही आश्रमांचा गुरु आहे.

(८) 'क' या सर्वनामापुढे 'अवि' आल्यास

(अ) कोणीतरी[१], काही, हा अर्थ :- के विसमणा उज्जाणे आगया अज्ज। (संपइ २.७) आज काही श्रमण उद्यानात आले आहेत.

(आ) कधी अनिर्वचनीयता[१] सूचित होते.

(क) अवि य (अपि च) :- समुच्चयदर्शक वाक्ये जोडण्यास उपयोग होतो.[२]

कधी, 'अवि य' ने विरोध दर्शविला जातो. उदा.:- न एवं एएसिं सुहं होइ अवि य अहिययरं दुहं। (समरा पृ. २०३) अशातऱ्हेने यांना सुख होणार नाही, पण अधिक दुःख मात्र होईल.

(ख) तहा वि, तहवि :- दोन विरोधदर्शक वाक्ये जोडण्यास उपयोग[२] होतो.

**३१९ अव्वो[३]**

(१) विस्मय, आश्चर्य :- (१) अव्वो हु अवि तहं तं पिच्छह नेमित्तियस्स सुमइस्स। (सुर ११.१३२) अरेच्चा! सुमति ज्योतिषाचे ते (भविष्य) खरे ठरले! ते पहा (२) अव्वो किं पुण एयागया। (धर्मो पृ. ४८) अरेच्चा! ही पुनः का आली?

(२) आनंद :- अव्वो एयाए मंजूसाए जमित्थ सारभूयं तं हविस्सइ। (धर्मो पृ. १३९) छान! जे येथे मौल्यवान आहे ते या पेटीत असणार।

(३) सूचन :- अव्वो निद्दामोहेणेवं पलवइ। (धर्मो पृ. १४७) अरे!

निद्रामोहाने असे बडबडत आहे.

(४) वितर्क :- अव्वो किं तं अलियं होही इह देवयावयणं। (सुर ४.२२२) काम, ह्या बाबतीत देवतेचे वचन काय खोटे होईल?

---

*१ मागे परिच्छेद ३०६ पहा.*

*२ वाक्ये जोडणे प्रकरण २९ पहा*

*३ अव्वो विस्मयसूचनसम्भाषणखिन्नतानुतापेषु । मार्कं ८.२३; अव्वो सूचना दुःख सम्भाषण-अपराधविस्मय-आनंद-आदर-भयखेदविषादपश्चात्तापे। हेम २.२०४*

(५) अनुताप, पश्चात्ताप :- (१) अव्वो जीए कएण भाया वावाइओ सा वि देवी न जाया। (धर्मो पृ. २१६) अरेरे! जिच्यासाठी भावाला मारले तीही राणी झाली नाही. (२) अव्वो लहुओ वि लहुईओ मए अप्पा। (धर्मो पृ. १५) अरेरे! लघु आत्मा मी आणखीच क्षुद्र केला.

(६) संभाषण, संबोधन :- अव्वो पि असहि पेच्छसु। (अग प्रियसखीपहा)

(७) भय :- (१) अव्वो किं पागफलभक्खणं पिव ण सुंदरा एसा। (धर्मो. पृ. ५२) किं पाग फळाच्या भक्षणाप्रमाणे ही चांगली नाही. (२) नर ओवमं खु दुक्खं अव्वो तिरिएसु सव्वेसु। (धर्मो पृ १५१) सर्व खालच्या प्राण्यांत खरोखर नरकाप्रमाणे दुःख आहे.

(८) खेद, खिन्नता :- छलिओ अहं पि अव्वो। (धर्मो.पृ. ४९) अरेरे! मलाही फसविले.

(९) दुःख :- अव्वो तम्मेसि कसि। (कुमार ४.१४) का त्रास देतोस?

(१०) अपराध :- अव्वो अन्नासत्तो। (कुमार ४.१४) अ.य स्त्रीच्या ठिकाणी आसक्त आहे.

(११) आदर :- अव्वो सो एइ। (कुमार ४.१५) तो येत आहे.

(१२) विषाद :- (१) अव्वो जणओ वि एरिसं कुणइ अवमाणं पुत्ताणं। (सुर २.२०७) अरेरे! बाप सुद्धा पुत्रांचा असला अपमान करतो.

(२) अव्वो अदूसहं समणुभूयं। (सुर १३.१) अरेरे! अति दुःसह अनुभवले.

**३२० अह (अथ)**

(१) आरंभ : अह बिइओ पत्थावो। (महा) आता दुसरा प्रस्ताव (सुरु)

(२) नंतर, त्यानंतर :- (१) अह पुच्छइ गोयमं राया। (पउम ३.७) नंतर राजाने गौतमाला विचारले. (२) अह कुमरेण भणियं। (धर्मो पृ. १०) त्यानंतर कुमाराने म्हटले.

(३) आणि, व :- अत्थ चोरा विलुंपंति उद्दालंति नरेसरा। वंतरा य निगूहंति गेण्हंति अह दाइया।। (चउ पृ. २२) चोर पैसा लुबाडतात, राजे काढून घेतात, व्यंतरदेव लपवितात आणि नातेवाईक (काढून) घेतात.

(४) जर : (१) सुयणो न कुप्पइ च्चिय अह कुप्पइ मंगुलं न चिंतेइ। (वज्जा. ३४) सज्जन रागावतच नाही जर रागावलाच तर वाईट चिंतत नाही.

(२) अह नो एत्तो उवसग्गाओ मुच्चिस्सामि। (अंत ११४) जर या उपसर्गातून माझी सुटका झाली नाही.

(अ) अहव, अहवा (अथवा) :- विकल्प दर्शविण्यास किं जीवइ अहव मुया मह कंता। (नाण ५.८५) माझी कांता जिवंत असेल की मेली असेल?

**३२१ अहह**[१]

(१) आनंद :- अहह मई निम्मला तुज्झ। (महा पृ. ७७ अ) छान! तुझी बुद्धि (किती) निर्मल आहे।

(२) आश्चर्य :- अहह अणब्भा वुट्ठी संजाया अज्ज पुण्णेहिं। (सुपास ६५०) अहा! आभाळ नसता आज पुण्यामुळे वृष्टि झाली.

(३) त्रास, खेद :- (१) अहह अविवेय पसरो। (सुपास ६०३) अरेरे!

(काम हा) अविवेकाचा विस्तार! (२) अहह महापावो हं। (महा पृ.२८१ अ) अरेरे! मी महापापी आहे।

(४) परिक्लेश :- अहह महापावो कहं जिणं पि मिच्छं समीहए काउं। (महा. १५३ ब) अरेरे ! जिनाला सुद्धा खोटे पाडण्याची (हा) महापापी कशी इच्छा करतो?

**३२२ अहो**[२]

(१) संबोधन :- (१) अहो जणा। (समरा पृ. २१५) लोकहो (२) अहो भाय कहसु किं पि अपुव्वं अक्खाणयं। (महा पृ. १०५ अ) अरे भाऊ, कोणते तरी अपूर्व असे आख्यान सांग.

(२) दु:ख, विषाद, शोक :- (१) अहो दुक्खो हु संसारो। (उत्त १९.१५) संसार दु:खरुप आहे। (२) अहो महामंदभागिणो अम्हे। (महा पृ. १३६ अ) अरेरे। आम्ही फार दुर्दैवी आहोत. (३) अहो असोहणं कयं कुमारेहिं। (महा पृ.४६ अ) अरेरे! कुमारांनी वाईट केले.

(३) आनंद :- (१) अहो सुवरियं। (नल पृ. ५) वा! छान निवड केली।

---

१ *अहहेत्यद्भुते खेदे परिक्लेशप्रकर्षयो:।*

२ *अहो धिगर्थे शोके च करुणार्थविषादयो:।*
*सम्बोधने प्रशंसायां विस्मये पादं पूरणे ।।*

(२) अहो अणुरूवो इमाण संजोगो। (सिरि १६०) छान! यांचा संयोग अनुरुप आहे।

(४) आश्चर्य :- (१) अहो जिणधम्मसामत्थं। (चउ पृ. १४) काय हे जिनधर्माचे सामर्थ्य! (२) अहो अउव्वो तक्करो। (समरा पृ. ४९१) अहो! चोर मोठा अपूर्व आहे।

(५) किती : (१) अहो महुरिमा रूवस्स। (नल पृ. २२) रूपाचे किती माधुर्य! (२) अहो उदारया कुमारस्स। (नल पृ ४५) किती (ही) कुमाराची उदारता!

(६) पश्चात्ताप :- (१) अहो दारुणं अकज्जं मए पावकम्मेण अणुचिट्ठियं। (समरा पृ. १५) अरेरे! म्यां पापकर्माने दारुण अकार्य केले।

(२) अहो इह परलोगसुहावहो न मए पावेण कओ गुरूवएसो। (धर्मो पृ. १८१) अरेरे! इह पर लोकी सुखावह असा गुरुपदेश म्या पाप्याने आचरला नाही।

**३२३ आ**

(१) पर्यंत :- (१) आ जम्म दुक्खिया होज्ज एसा। (महा पृ. ९२ अ) ही आजन्म दु:खी होईल. (२) आजाणु कुसुमवुट्ठी निवडइ गयणाओ। (महा पृ. २५१ ब) गुडघ्यापर्यंत (पोचेल इतकी) पुष्पवृष्टि आकाशातून पडली.

(२) पासून :- किं तु न सरेमि किंचिवि अवराहं आ विवाहाओ। (सुपास ६०१) परंतु, विवाह झाल्यापासून (मी) कोणतातरी अपराध (केला आहे हे) मला आठवल नाही.

(३) किंचित् :- (१) आरत्तकरचरणकमला। (नल पृ. ३) किंचित् लाल कर-चरण कमले असणारी. (२) आपंडुर मुहकमला। (सुर ३.१८६) किंचित् पांडुर मुखकमल असणारी.

(४) उपसर्ग[1] असता पर्यंत, वर इत्यादी अर्थ : उदा. आरुहइ, आपुच्छइ, आमंतेइ, आगच्छइ इत्यादी.

**३२४ आ (आ:)**

(१) राग :- (१) आ दुरायारे। (समरा पृ. ५५८) अग दुराचारी स्त्रिये.

---

१ *मागे शब्दयोगी अव्यये, परिच्छेद २५१ पहा.*

(२) एयं पि तए न सुयं आ पावे। (नल पृ. ४५) पापी स्त्रिये, हे सुध्दा तू ऐकलेले नाहीस?

(२) खेद :- (१) आ कहमवज्झो नाम। (समरा पृ.७२४) आ:। कसा बरे अवध्य ? (२) आ कहमणायत्तो नाम। (समरा पृ.७२६) आ:। कसा बरे स्वाधीन नाही?

**३२५ आमं[1] (आम)**

होकार, स्वीकार :- (१) सो भणइ - देव आमं। (सुपास ५२८) तो म्हणतो 'होय, महाराज' (२) भयवया भणियं-आमं। (समरा पृ.३४३) भगवंताने म्हटले ठीक आहे. (३) मए भणियं-आमं। (कथा पृ.१४५) मी होय म्हटले.

**३२६ इइ[2], इ, इय, ति, त्ति (इति)**

(१) ग्रन्थान्त, प्रकरणान्त :- (१) इइ पढमो पत्थावो। (महा पृ.७अ) पहिला प्रस्ताव समाप्त झाला. (२) इय... वद्धमाणचरिए बीय-पत्थावो। (महा पृ.२८अ) महावीरचरित्रातील दुसरा प्रस्ताव समाप्त.

(२) वक्त्याचे प्रत्यक्ष शब्द उद्धृत केल्यावर :- (१) भणियं कुमारेण-किमेयंति। (नल पृ.४५) 'काय हे' असे कुमाराने म्हटले (२) पुच्छिओ इसिणा कुओ भवं आगओ त्ति। (समरा पृ.१०) आपण कोठून आला असे ऋषीने विचारले.

(३) असे, अशाप्रकारे :- (१) उसभो त्ति पइट्ठियं नामं (महा पृ. २.१०) उसभ असे नाव ठेवले. (२) तओ मओ त्ति नाऊण गया ते। (बंभ पृ.५६) मग (तो) मेला असे वाटून ते गेले.

(४) अशा दृष्टीने :- (१) तेण वुत्तं - महारायनलस्स पत्ति त्ति मे पूयणिज्जासि। (नल पृ. १६) त्याने म्हटले ''(तू) महाराज नलाची पत्नी (आहेस), या दृष्टीने (तूं) मला पूज्य आहेस.''

---

१ *आम अभ्युपगमे। हेम २.१७७*

२ *इति स्वरुपे सान्निध्ये विवक्षानियमे मते।*
*हेतौ प्रकारप्रत्यक्षप्रकाशेऽप्यवधारणे।।*
*एवमर्थे समाप्तौ स्यात् ।।*

(४) कारण, हेतु :- (१) गंगा वि जण्हुणा आणीय त्ति तेण जण्हवी जाया। (पाकमा पृ. २८) गंगा ही जण्हुने आणली या कारणाने ती जाह्नवी झाली. (२) एएण... परदव्वावहारो कओ त्ति वावाइज्जइ एसो। (समरा पृ. ४९१) याने परद्रव्यापहार केला या कारणाने याला ठार करण्यात येत आहे.

(५) उद्देश, प्रयोजन : (१) सरीरस्स विणासो न होज्जा इइ मए सरीरं आणीयं। (शरीराचा नाश होऊ नये या उद्देशाने मी शरीर आणले) (२) अहं पि सुणेमि त्ति अलीयपसुत्तं कयं। (चउ पृ. ४१) मी सुद्धा ऐकीन या उद्देशाने झोपेचे सोंग केले.

(६) कधी पादपूरण म्हणून :- तुट्ठेणं नरवइणा दिन्ना कुमरस्स नियधूय त्ति। (अगड १५२) संतुष्ट झालेल्या राजाने आपली कन्या कुमाराला दिली.

**३२७ इव[१], पिव, मिव, विव, विय, व, व्व (इव)**

(१) उपमा, तुलना :- (१) मेरु व्व वाएण अकंपमाणो। (उत्त २१.१९) वाऱ्याने कंप न पावणाऱ्या मेरुप्रमाणे (२) विप्फुरइ जस्स रविमंडलं व नाणं। (महा १.१) ज्याचें ज्ञान सूर्य मंडला प्रमाणे प्रकाशते (३) सागरो इव गंभीरा। (ओव पृ १९) सागराप्रमाणे गंभीर

(२) जणु काही, उत्प्रेक्षावाचक :- (१) जस्स करिनियरघंटारवेण फुट्टइ व बंभंडं। (नल पृ. ४) ज्याच्या हत्ती समुदायावर असणाऱ्या घंटांच्या आवाजाने ब्रह्मांड जणु फुटते (२) रोवंति व दिसाओ। (धार्मो ४ पृ.) जणु दिशा रडत होत्या.

**३२८ उय[२] (उत) उदाह, उयाहु (उताहो)**

(१) विकल्प, किंवा :- (१) एवं किं साहावियरूवं उय कोववसेण कयमेवं। (सुपास ४९३) असे काय स्वाभाविक रूप आहे अथवा रागाने असे केले आहे? (२) संदिसहणं सामी तं दारगं अहं एगं ते उज्झामि उदाहु मा। (निरया पृ. १०) स्वामी त्या मुलाला एकांतांत टाक अथवा नको ते सांगा. (३) सेवं मम करेह उयाहु रज्जाणि मुय (कथा पृ. ५३) माझी सेवा करा अथवा राज्ये सोडा.

(२) प्रश्नात :- (१) तुम्हे किं सरीरबाहिं फेडेह उदाहु कम्मबाहिं। (पाकमा

---

१ *म्मिव-मिव-विआ इवार्थे। प्रा.प्र. ९.१६; मिव पिव विव व्व व विअ इवार्थे वा। हेम २.१८२*

२ *उत प्रश्ने वितर्के स्थादुतात्यर्थविकल्पयोः।*

पृ.७६) तुम्ही शरीराची व्याधी दूर कराल की कर्मरूपी व्याधी?

(२) तुब्भे पउमनाभेणं सद्धिं जुज्झिहह उयाहु पिच्छिहह। (नाया पृ.१९२) तुम्ही पउमनाभाबरोबर युद्ध कराल की नुसते पहाल?

(३) ता किं जुज्झामो उयाहु सेवं करेमो। (कथा पृ.५३) तेव्हा युद्ध करूया की सेवा करूया?

**३२९ उवरि, उवरिं (उपरि)**

(१) वर :- (१) भगवओ उवरि भत्तिबहुमाणो। (समरा पृ.१८) भगवंतावर भक्ति व बहुमान. (२) किं तु तुमए नरिंदस्स उवरिं कोवो न कायव्वो। (समरा पृ.२९) परंतु तू राजावर रागावू नयेस.

(२) नंतर :- (१) पंचण्हं पुत्ताणं उवरिं धूया अहं जाया। (सुर ६.१०९) पाच पुत्रांनंतर मी कन्या (त्यांना) झाले. (२) ताण य चउण्ह पुत्ताणमुवरिं जाया दारिया। (कथा पृ. ९५) आणि त्यांना चार पुत्रानंतर कन्या झाला.

(३) आणखी, यावर, अधिक :- उवरिं किं भणामि। (कथा पृ. १४५) आणखी काय सांगू

**३३० एव**

जोर देण्यास :- (१) अहं तत्थेव चिट्ठामि। (समरा पृ. ३८) मी तेथेच राहिलो. (२) मम समक्खमेव पंचत्तमुवणीओ। (समरा पृ. ३८) माझ्या समक्षच मेला.

**३३१ एवं**[1]

(१) असे, अशा प्रकारे, अशातऱ्हेने :- (१) चंदजसाए विवुत्तं - एवं होउ त्ति। (नल पृ.२६) चंदजसानेही म्हटले 'असे होऊ दे' (२) पुव्वकयकम्मपरिणइ-वसेणं एवं परिकिलेसमइणो जीवा हवंति। (समरा पृ. १०) पूर्वी केलेल्या कर्मांच्या परिणामाने जीव अशाप्रकारे दु:खभागी होतात.

(२) होकार, होय :- कुमारो भणइ - एवं। (बंभ पृ.७३) कुमार म्हणाला ठीक आहे.

---

१ *एवं प्रकारोपभयोरङ्गीकारेऽवधारणे।*

**३३२ ओ**[1]

(१) कोप :- ओ ण भवणं पुणो वच्चसि। (पुन: घरी जाणार नाहीस)

(२) सूचना :- (१) सढो सिओ। (कुमार ४.१३) शठ आहेस तू (२) ओ पेच्छ पेच्छ सुंदरि। (सुर २.९९) सुंदरी पहा पहा.

(३) वितर्क :- (१) कुमरा सामलगोरा ओ एए रामलक्खण व्व दीसंति।

सावळा आणि गोरा असे हे कुमार रामलक्ष्मणाप्रमाणे दिसत आहेत. (२) राआओ पुरिओ इमो। हा पुरुष राजा (असेल)[2]

(४) विस्मय :- ओ भग्गो हरचावो सिसुणा पुत्तेण दहरहस्स[2]। दशरथाच्या लहान मुलाने शिवधनुष्य मोडले।

(५) अनुताप, पश्चात्ताप :- (१) ओ पत्थिया विलासा तव हेउं। (सुपास ५३१) तुझ्यासाठी विलास पाहिजे होते।

(६) पादपूरण :- सिरिगंधवाहणस्स ओ पासंमि गओ अहं तइया

(सुर ४.४६) तेव्हा मी सिरिगंधवाहणाच्या जवळ गेलो.

**३३३ कत्थ-कत्थ (कुत्र-कुत्र)**

दोन वस्तू वा व्यक्तिमधील मोठा फरक दर्शविण्यास :-

(१) कत्थ नलो कत्थ खुज्जओ एसो। (नल पृ. ३०) कोठे नल आणि कोठे हा खुजा ! (२) कत्थ-महागंगा... कत्थ नगरनिद्धमणी। (धर्मो पृ. १९२) कोठे महानदी गंगा आणि कोठे गावातल्या सांडपाण्याचा प्रवाह।

**३३४ कयं (कृतम्)**

निषेध, निवारण, पुरे :- (१) कअं कअं तुज्झ विअत्थणेण। (उसा १.६८) तुझी प्रौढी नको. (२) उसेविसाएण कअं। (उसा. १.७६) उषे, विषादपुरे ३३५ कह,कहं (कथम्) कसे :- (१) कह अप्पा रक्खिओ तुमए। (जिन पृ. २३) तू आपले रक्षण कसे केलेस? (२) कहं चरे कहं चिट्ठे कहं आसे कहं सए। (उत्त ४.७) कसे हिंडावे, कसे उभे रहावे, कसे बसावे, कसे झोपावे? (३) कहं परलोओ चेव नात्थि। (समरा पृ. १७६) परलोकच कसा नाही?

---

१ *ओ सूचनापश्चात्तापे। हेम २.२०३; ओ सूचना वितर्क अनुताप प्रकोप विस्मये। मार्क ८.५*

२ *मार्कंडेय, ८.५*

(अ) कह कह वि :- कसे तरी, मोठ्या कष्टाने :-

(१) कह कह वि आगारसंवरं काऊण। (महा पृ. ४१ ब) कसे तरी इंगित (चेष्टा) लपवून. (२) कह कह वि पयत्तेणं विहिणा वि विणिम्मिया मन्ने। (सुपास ५९०) मला वाटते. ब्रह्मदेवाने सुद्धा प्रयत्नपूर्वक मोठ्या कष्टाने तिला निर्माण केले.

(आ) कहं. पुण :- कसे बरे :- कहं पुण इमए भावत्थो णायव्वो।

(धर्मो पृ. ४७) कसा बरे हिचा भावार्थ जाणावा?

**३३६ कामं[1]**

हे कबूल, असे धरून, हे मान्य करुन :-

कामं तु देवीहि विभूसियाहिं न चाइया खोभइउं तिगुत्ता। तहावि एगंतहियं ति नच्चा विवित्तवासो मुणिणं पसत्थो।। (उत्त ३२.१६) अलंकार धारण करणाऱ्या देवस्त्रिया सुद्धा त्रिगुप्ति पाळणाऱ्या मुनींना क्षुब्ध करण्यास समर्थ होत नाहीत हे मान्य तथापि (तोच) श्रेष्ठ हित असे जाणून मुनींच्या बाबतीत एकातवास हा प्रशस्त आहे.

**३३७ किं**

(१) का, काय, कशास या अर्थी प्रश्न[2] करण्यास

(१) भो भो किं तुब्भेहिं कओ उवद्दवो नायलोयस्स। (पाकमा पृ. १९) अहो, तुम्ही नागलोकाला का उपद्रव दिलात? (२) किं तुज्झ केणावि खंडिया आणा। (सिरि ३४०) तुझी आज्ञा कुणी मोडली काय?

(२) काय उपयोग? - (ज्याचा उपयोग व्हायचा तो शब्द तृतीयेत; ज्याला उपयोग व्हायचा तो शब्द षष्ठीत) :- (१) मे किं रहेण। (नल पृ. ११) मला रथाचा काय उपयोग? (२) रज्जेण किमंधस्स। (संपइ १.५९) आंधळ्याला राज्याचा काय उपयोग?

(३) समासात पूर्वपदी 'किं' असता 'वाईट' असा अर्थ :- काउरिस.

---

*१ इच्छेप्रमाणे, मनाप्रमाणे हा शब्दश : अर्थ*

*२ जेव्हा किं अध्याहृत असते, तेव्हा उच्चारावरुन वाक्य प्रश्नार्थक ठरते : कुसलं मम बहिणीए। (नल पृ. २४) माझ्या बहिणीचे कुशल आहे?*

(अ) किमु[१] :-

(१) जास्त काय सांगावे? :- देवीओ वि न चित्तं हरंति किमु अन्न नारीओ। (कथा पृ. १०८) देवा स्त्रियासुद्धा चित्त हरण करु शकत नाहीत, मग इतर स्त्रियांबद्दल काय सांगावे?

(२) विमर्श :- किमु देवया माणुसी वा होज्ज त्ति। (वसु पृ. २३०) काय, देवता की मानवी स्त्री असेल?

(आ) किमुय (किमुत) :-

जास्त काय सांगावे? :- पुरिसो वि अपहरंतो न खमोवहिउं किमुय अबला। (सुपास ५३८) अपहार करणारा पुरुष सुद्धा वध्य नाही. मग स्त्रीबद्दल काय सांगावे?

(उ) किं बहुणा :-

जास्त काय सांगावे? :-

किं बहुणा धम्मेणं लब्भइ हियइच्छियं सव्वं । (जिन पृ. ३७) जास्त काय सांगावे? धर्माने सर्व इच्छिते प्राप्त होतात.

(ऊ) किंवा :-

विकल्प :- किमेयं तीरं उयाहु दीवं किं वा को वि पव्वयवरो। (कथा पृ. १४५) हा किनारा आहे की द्वीप आहे किंवा कोणता तरी सुंदर पर्वत आहे?

**३३८ किणो[२], किह, कीस**

का, कसे या अर्थी प्रश्न करण्यास :-

(१) कीस तुब्भे पुव्वपुरिसज्जिएणं विहवेणं गव्वं उव्वहह। (समरा पृ. ४०९) वाडवडलांनी मिळविलेल्या धनाच्या जोरावर तुम्ही का गर्व वहाता? (२) किणो हससि। (का हसतोस?) (३) किह तुम्ह वयणं पडिकूलेमि। (कथा पृ.९८) तुमच्या बोलण्यास मी प्रतिकूल कसे बोलीन? (करीन)

**३३९ किर, किल**

(१) असे सांगतात की :- (१) किर रावणस्स भाया महाबलो नाम कुंभकण्णो त्ति। छम्मासं.... सेज्जासु निरंतरं सुयइ।। (पउम. २.१०८) असे

---

१ *किमु संभावनायां स्यात् विमर्शे चापि दृश्यते।*

२ *किह कीस किणो प्रश्ने। मार्कं ८.१६*

सांगतात की– रावणाचा कुंभकर्ण नावाचा महाबलवान् भाऊ सहा महिने सतत शय्येवर झोपून राही. (२) किल गडरीए संभू संझावंदणं करेंतो भणिओ। (कथा पृ. १७०) असे सांगतात की शंकर संध्या वंदन करीत असता त्याला गौरीने म्हटले.

(२) खरोखर, नक्की, खात्रीने :– को किर हारइ कित्तिं इत्तियमित्तेण कज्जेण। (सिरि १३०) एवढ्याशा कार्यासाठी कोण खरोखर किर्ति गमावील?

**३४० केवलं**

अव्ययाप्रमाणे[१] उपयोग : फक्त या अर्थी :–

(१) केवलं भववित्तचित्तो। (समरा पृ. ७०६) फक्त (त्याचे) चित्त संसारात विरक्त झाले आहे. (२) केवलं पहवइ महामोहो। (समरा पृ. ७२७) फक्त महामोह प्रभावी आहे.

(अ) न केवलं – अवि :– एवढेच नव्हे तर :–

न केवलं हरिसियं तमेव पूरं। सविसेसरंजियमणा जाया पायाल सग्गा वि।। (महा पृ. २४६ अ) केवळ तेच नगर आनंदित झाले असे नव्हे तर पाताळ व स्वर्गसुद्धा विशेष आनंदित मनाचे झाले. असे नव्हे तर पाताळ व स्वर्ग सुद्धा विशेष आनंदित झाले.

**३४१ खलु[२], खु, हु (खलु)**

(१) निश्चय, खरोखर ,नक्की ,खात्रीने :–

(१) गुणा हु गोरवं उवजणिंति। (महा पृ. २३६ ब) गुण खरोखर मोठेपणा उत्पन्न करतात. (२) मच्चुपरित्ताणं नत्थि हु भुवणम्मि कस्स वि य। (सुणास ६४०) आणि जगात खरे म्हणजे कुणाचेही, मृत्यूपासून रक्षण करता येत ना

(२) वितर्क :– जलहरो खु धूमवडलो खु। (मेघ की धुराचे पटल?)

(३) विस्मय :– को खु एसो सहस्ससिरो। (हा हजार डोकी असणारा कोण।)

(४) संभावन :– सा खु पीडए। (प्रा.मं. ८.६) ती पीडेल.

---

१ *विशेषणाप्रमाणे सुद्धा उपयोग होतो; अर्थ फक्त :– कडेवरं इणं केवलं। (समरा पृ. ७२९) हे फक्त प्रेत आहे.*

२ *हु खु निश्चय वितर्क संभावन विस्मये। (हेम २. १९८)*

(५) वाक्यालंकार[१], पादपूरण : (१) अप्पा हु खलु दु द्द मो। (उत्त १.१५) आत्मा हा खरे पहाता दमन करण्यास कठिण आहे (२) दो वि हु गच्छंति रायपासम्मि। (सुपास ५६०) दोघेही राजाजवळ गेले. (३) एवं खलु जंबू। (नायासं ३) जंबू, अशा प्रकारे.

**३४२ च[२], य (च)**

(१) आणि, व या अर्थी प्रत्येक शब्द वा विधान यासह अथवा शेवटचा शब्द वा विधान यानंतर एकदा :-

(१) बहवे वेज्जा य वेज्जपुत्ता य। (विवाग पृ. ८) पुष्कळ वैद्य आणि वैद्यपुत्र (२) जम्मणं बालत्तणं कलाओ य। (विवाग पृ. ६४) जन्म, बालपण आणि कला (३) वाणारसीए संखो नाम राया नमुई नामो य से मंती। (बंभ पृ. २७) वाराणसीत शंख नावाचा राजा आणि त्याचा नमुचि नावाचा मंत्री होतो.

(२) तथापि, तरी :- बालो च्चिय अवहिओ तुमं तइया, महिमंडले गविट्ठो ण य लद्धा तुज्झ वत्ता वि। (धर्मो पृ. ९१) तुला तेव्हा लहानपणीच पळविण्यात आले, पृथ्वीवर तुझा शोध केला, तथापि तुझी (काहीच) वार्ता कळली नाही.

(३) वाक्यालंकार, पादपूरण : (१) न य भोयणं च रुच्चइ छट्ठावत्थाए कामिस्स। (अगड ४३) सहाव्या अवस्थेत कामी माणसाला भोजन रुचत नाही. (२) पत्तो य कामदेवो रायदुवारे य। (वसु पृ. २६९) कामदेव राजद्वारात पोचला.

(अ) च-च : समकालीन क्रिया दर्शविण्यास :-

(१) न य पुप्फं किलामेइ सो य पीणेइ अप्पयं। (दस १.२) तो फुलाला तर दुखवीत नाही, (पण) त्याचवेळी स्वत: (रस पिऊन) तृप्त होतो.

(२) वयं च वित्तिं लब्भामो न य कोइ उवहम्मई। (दस. १.४) आपल्याला तर उपजीविकेचे साधन मिळते. त्याचवेळी कोणालाही त्रास मात्र दिला जात नाही.

(आ) न य - न य : हेही नाही - ते ही नाही :-

न य हाणी न य वुड्ढी होइ। (पउम ३.४१) हानी ही होत नाही व वृध्दि ही होत नाही.

---

*१ खलुर्वाक्यालंकारे। अभयदेव (नाया फेथी, पृ. १२ अ)*

*२ च, य हे वाक्यारंभी येत नाहीत.*

### ३४३ चेव, च्चिय[1], चिय

जोर देण्यास :- (१) जेहिं विरहो च्चिय न दिट्ठो। (वज्जा ६५) ज्यांनी विरहच पहिलेला नाही (२) अप्पहियपरहियाणं अप्पहियं चेव कायव्वं। (वज्जा ८३) आत्महित व परहित यातून आत्महितच करावे. (३) सव्वावत्थासुं पिय पभवइ कम्मं चिय जणस्स। (महा पृ. १९९ ब) सर्व अवस्थातही माणसावर कर्म हेच प्रभुत्व गाजवते.

### ३४४ जं (यद्)

(१) प्रत्यक्ष विधान देतांना 'की' या अर्थी :- (१) कहमिमं रायस्स कहिउं पारीयइ जं कुमारा सव्वे एक्कपए पेच्छंताणं चेव अम्ह दड्ढा। (पाकमा पृ.२२) हे राजाला कसे सांगणे कश्य आहे की आमच्या देखत सर्व कुमार एकदम दग्ध झाले. (२) केण तुह निवेइय मेयं जं इह निवडणेणं पियसंपओगो वाहिविगमो पावनासो वा हवेज्ज त्ति। (महा पृ. १६६ अ) तुला हे कोणी सांगितले की येथे (गंगेत) पडल्याने प्रियसंगोग व्याधिनाश वा पापनाश होईल?

(२) ज्यामुळे, ज्याअर्थी कारण :- (१) जाया मे जीवियासा जं तुमं दिट्ठो सि। (बंभ पृ. ५१) तू दिसलाय या कारणाने मला (पुन:) जीविताशा आली. (२) दिट्ठासि जं जियंती तं सुकयं जग्गए अम्ह। (नल पृ. २६) ज्या अर्थी तूं (पुन:) जिवंत दिसलीस, त्या अर्थी आमचे सुकृत जागे आहे.

### ३४५ जइ (यदि)

(१) जर : जइ मे रोगावगमो भविस्सइ तओ सुंदरं चेव। (समरा पृ. २०४) जर माझा रोग दूर होईल, तर चांगलेच झाले. (२) कदाचित्, :- (१) जइ नवरं पाहुण साहू गओ होज्जा। (धर्मो पृ. ७७) कदाचित् पाहुणा आलेला साधु तेवढा गेला असेल. (२) नत्थि कोइ आयंको। परं जइ माणसिओ हवेज्जा। (कथा पृ. ९६) रोग कोणताही नाही; पण कदाचित् मानसिक (रोग) असेल.

(अ) जइ पुण :

कदाचित् :- (१) जइ पुण मे भत्ता भोयणत्थं इत्थागच्छेज्ज।

---

१ *च्चेअ च्चिअ एवार्थे। मार्कं ८.१९*

(नल पृ. २२) कदाचित् माझा पति भोजनासाठी येथे येईल. (२) जइ पुण कोइ कंपि उवायं कहेज्जा। (महा पृ. ३२० ब) कदाचित् कोणी काही उपाय सांगील.

**३४६ जओ, जत्तो (यत:)**

(१) जेथून, ज्या ठिकाणाहून :- जत्तो अहं समायाओ तत्तो किंचि नागयं। (कथा पृ. ७) जेथून मी आलो तेथून (माझ्याबरोबर) काही आले नाही.

(२) कारण : (१) नो सा चएज्ज पुत्तं अवच्च नेहो जओ गरुओ। (महा पृ. १०० अ) ती पुत्राचा त्याग करणारा नाही, कारण अपत्य स्नेह हा दांडगा असतो. (२) एसा हि मज्झ धम्मायरिओ जओ एयाए संमत्तमूलं जिणधम्मं गाहिओ। (चउ पृ. ३४) हीच माझी धर्माचार्य, कारण हिनेच (माझ्याकडून) सम्यक्त्वमूल जिनधर्म घेवविला.

**३४७ जह, जहा (यथा)**

(१) जसे, ज्याप्रमाणे :- जहिच्छा तुम्हाणं। (बंभ पृ. ६५) जशी तुमची इच्छा.

(२) ज्याप्रमाणे (अ) तुलना :- तत्थ मंदा विसीयंति मच्छा अप्पोदए जहा। (सूय. १.३.१.५) थोड्या पाण्यात ज्याप्रमाणे मासे तद्वत् मंद प्राणी तेथे विषण्ण होतात.

(आ) रीति :- जहा सालिभद्देण दिन्नं दाणं तहा दायव्वं। (धर्मो पृ. १००) जसे शालिभद्राने दान दिले तसे द्यावे.

(३) पुढील प्रमाणे, खालील प्रमाणे :- (१) भणिओ सो जह एयं आसं वालेसु भो पहिय। (सुपास ५४६) त्याला असे म्हटले हे पाथिका, या घोड्याला वळव (२) न मुणह जहा दुब्बलस्स वि पंचाणणस्स सिगालसहस्सेहि वि न लंघिज्जइ परक्कमो। (महा पृ. ३९ब) तुम्हाला माहीत नाही की हजारो कोल्ह्यांना दुर्बळ सिंहाच्या सुद्धा पराक्रमावर मात करता येत नाही.

(४) अपरोक्ष विधानापूर्वी :- सो कुलवइणा भणिओ जहा-जहा सुहं चिट्ठह। (बंभ पृ.४७) कुलपतीने त्याला म्हटले 'सुखाने रहा'.

(५) उदाहरणार्थ (१) जहा आगासकुसुमं। (महा पृ. २५६ ब) जसे आकाशपुष्प (२) जहा वालुगाथाए तेल्लं। (समरा पृ१६७) जसे वालुकास्थानात

तेल.

(६) म्हणजे, ज्यामुळे, ज्यायोगे :- कुणह कंपि जहा सा जीवइ देवी सकुल ववत्था य निव्वहइ। (महा ३.३८) काहीतरी करा की ज्यामुळे राणी जिवंत राहील आणि (त्याचवेळी) आपला कुल क्रमही टिकून राहील.

**३४८ जह-तह, जहा-तहा (यथा-तथा)**

(१) जसे-तसे, ज्याप्रमाणे-त्याप्रमाणे : (अ) तुलना :- जह मुद्धमओ मायण्हियाए तिसिओ करेइ जलबुद्धिं। तह निव्विवेयपुरिसो कुणइ अधम्मे वि धम्ममइं।। (सुपास ५००) ज्याप्रमाणे भोळे हरिण तहानेले असता मृगजलाच्या ठिकाणी पाणी मानते, त्याप्रमाणे अविवेकी पुरुष अधर्माच्या ठायी धर्म आहे, अशी बुद्धि धारण करतो.

(आ) रीत :- (१) जहा लाहो तहा लोहो। (उत्त ८.१७) जसा लाभ तसा लोभ (२) जहा चंदो तहा सूरो वि आगओ। (निरया पृ. ३७) जसा चंद्र तसाच सूर्यही आला.

(२) असे - की : (१) अहं णं तहा जत्तिहामि जहा तव देहलस्स संपत्ती भविस्सइ। (निरया पृ. १०) मी असा प्रयत्न करीन की ज्यामुळे तुझा डोहाळा पुरा होईल. (२) तहा करिस्सं जहा तुह समीहियं संपज्जिस्सइ। (बंभ पृ. ६१) असे करीन की ज्यायोगे तुझी इच्छा पुरी होईल.

(३) कारण - म्हणून; ज्याअर्थी- त्याअर्थी :

(१) जह जंपइ अफुडत्थं तह हियए संठियं किं पि। (जिन पृ.८) ज्याअर्थी अस्फुटार्थी बोलत आहे त्याअर्थी हृदयात काहीतरी आहे. (२) जहा वामच्छिभुयाओ फुरंति जहा य जक्खदंसणाओ हरिसाइसओ जाओ तहा तक्केमि संपयं पिएण सह समागमं। (धर्मो पृ.९३) ज्याअर्थी डावा डोळा व बाहु स्फुरत आहेत आणि ज्या अर्थी यक्षदर्शनाने हर्षातिशय झाला आहे, त्या अर्थी प्रियकराशी मीलन होणार, असे मला वाटते.

(४) जितका-तितका; इतका की-तितका :-

तह न तवइ मह वाही जह असमत्ती वयस्स एयस्स। (नाण. ३.४७) या व्रताची असमाप्ति मला जितका ताप देते आहे तितका रोग सुध्दा देत नाही.

(अ) जहा जहा- तहा तहा :- जितका जितका - तितका तितका,

जसजसा – तसतसा :-

(१) जह जह जिणपूयणं तुमं कुणसि। तह तह दालिद्दतरू फलइ तुह गेहे।. (सुपास ५१०) जसजशी तू जिनाची पूजा करीत आहेस, तसतसा तुझ्या घरी दारिद्र्यतरू फळत चालला आहे. (२) जह जह गुंजंति सावया विविहं। तह तह भएण हिययं कंपइ मह तत्थ रन्नंमि।। (सुर १०.२२८) जस जसा श्वापदांचा विविध आवाज होऊ लागला तसतसे तिथे अरण्यात माझे हृदय भयाने कापू लागले.

**३४९ जा, जाव (यावत्)**

(१) पर्यंत, तितका या अर्थी स्थल-काल[1] दर्शविण्यास :-

(१) रज्जलाभं जाव मए वज्जिओ जुवइसंगो। (नल पृ.४९) राज्यलाभ होईपर्यंत मी युवती संग टाकला आहे. (२) नमिराइणो सरीरे छम्मासे जाव दाहो जाओ। (चउ पृ. ३८) नमिराजाच्या शरीरात सहा महिन्यापर्यंत दाह झाला. (१) आता :- जाव तं तहेव जायं। (समरा पृ. ६२८) आता ते तसेच झाले,

(३) तेवढ्यात, दरम्यान :- (१) वच्छ वीसत्थो हवसु जाव ते जणयं पेच्छामि। (धर्मो पृ. ११९) बाळा, शांत हो, तेवढ्यात पहाट झाली.

**३५० जा-ता, जाव-ताव (यावत्-तावत्)**

(१) जोपर्यंत – तोपर्यंत :-

(१) नूणं जाव रिध्दी ताव चेव सोहा। (चउ पृ ४७) खरोखर जोपर्यंत रिध्दी आहे तो पर्यंत शोभा असते. (२) ता दुक्खं जाव संसारो। (कथा पृ.१६८) जो पर्यंत संसार आहे तोपर्यंत दुःख आहे.

(२) जेव्हा-तेव्हा :- जाव (सा) न किंचि जंपइ ताव भणियं सहीए। (बंभ पृ.६१) जेव्हा (ती) काहीच बोलली नाही तेव्हा सखीने म्हटले.

(अ) जाव जाव – ताव ताव :- जसजसा-तससा :-

जाव जावं ... अभिक्कमेइ तावं तावं... महं ते उदए। (सूय २.१.२) जसजसा तो पुढे जाऊं लागला, तसतसे खोल पाणी (लागू लागले)

---

*१ यावेळी द्वितीयेची अपेक्षा असते.*

(आ) जाव न - ताव :- नाही - तोच :-

(१) जाव न कुणइ पणामं अवगूढो ताव सो रन्ना। (अगड ७२) (त्याने) प्रणाम केला नाही तोच राजाने त्याला आलिंगन दिले. (२) जाव य हत्थप्पमाणमेत्तं. तं न खणामि ताव समुट्ठिया महाभुयंगा। (महा पृ.२६ ब) हातभर तो (प्रदेश) मी खपला नाही तोच महाभुजंग (तेथून) बाहेर पडले.

**३५१ जे**[1]

वाक्यालंकार, पादपूरण :-

(१) तहा दुक्करं करेउं जे तारुण्णे समणत्तणं। (उत्त १९.३९) त्याप्रमाणे तारुण्यात दुष्कर श्रमणत्व करण्यास (२) नवरि सयं वरकरणं संपइ उचिंय न काउं जे। (सुर १.१२७) आता स्वयंवर करणे हे फक्त उचित नाही.

**३५२ ठाणे (स्थाने)**

बरोबर-योग्य आहे :- ठाणे उसा कामइ कामणिज्जं कामस्स पुत्तं। (उसा १.४०) कामाच्या कमनीय अशा पुत्राची उषा इच्छा करते, हे योग्यच आहे.

**३५३ णवि**[2] **(नवि)**

वैपरीत्य :- अणुदियहं भुंजंती नाणारुवाइं विसयसोक्खाइं। न वि सा पावइ तित्तिं।। (नाण १.४८) रोज नानाप्रकारची विषयसुखे ती भोगी; पण तिची तृप्ती झाली नाही.

**३५३ णं**[3]

वाक्यालंकार :- तत्थ णं चंपाए नयरीए। (नायासं १) तेथे चंपा नगरीत.

**३५५ तं (तद्)**

म्हणून, परिणामत :- तं नत्थि णं मोग्गरपाणी जक्खे संनिहिए।

(अंत, परि १०५, पृ.३३) म्हणून खरंच येथे जवळ मोग्गरपाणी यक्ष नाही.

(अ) तं जहा (तद् यथा) : खालील प्रमाणे, पुढील प्रमाणे :-

तीसे णं भद्दाए अत्तया दुवे होत्था तं जहा-जिणपालिए य जिणरक्खिए य।

---

१ *हेम. २.२१७*

२ *णवि वैपरीत्ये। हेम. २.१७८*

३ *णं नन्वर्थे। आर्षे वाक्यालङ्कारेऽपि दृश्यते। हेम ४.२८३*

(नाया पृ.१२१) त्या भद्रेचे दोन पुत्र होते, ते असे जिणपालिय व जिणरक्खिय.

**३५६ तओ, तत्तो, तो (ततः)**

(१) तेथून, त्या ठिकाणाहून :- तत्तो चुया समाणा। (पउम २.८४) तेथून च्युत झाले असता.

(२) नंतर, त्यानंतर, मग :- (१) पढमं नाणं तओ दया। (दस ४.१०) प्रथम ज्ञान नंतर दया. (२) खणमेगं गयचेट्ठो ठिओ तओ जंपए एवं।

(सुपास ४९४) एक क्षणभर निश्चेष्ट राहिला; मग असे म्हणाला.

(३) म्हणून, परिणामत :- (१) कुमारमित्तं तमसि जओ तो हणेमि नो सहसा। (सुपास ५०८) तू राजपुत्राचा मित्र आहेस, म्हणून मी तुला एकदम मारीत नाही. (२) एयाइ कओ लहुओ हं तओ वेरिणी एसा। (सिरि १०८) हिने मला क्षुद्र केले, म्हणून ही वैरीण आहे. (३) छज्जीववहाओ कम्मबंधो। तत्तो संसारो। (कथा पृ. १३२) सहा प्रकारच्या जीववधाने कर्मबंध, त्यामुळे संसार.

**३५७ तह, तहा (तथा)**

(१) तसे, त्याप्रमाणे :- (१) मंतीहिं तहा विहियं। (सुपास ५१८) मंत्र्यांनी तसे केले (२) तहा करिस्सं। (सूय १.१४.९) तसे करीन.

(२) आणि, आणि सुद्धा तसेच :- (१) जीवाणं हिंसाए अलिएणं तह परस्स हरणेणं। (चउ पृ.२७) जीवांच्या हिंसेने, असल्याने तसेच परहरणाने (२) तस्स भज्जा दुवे आसी रोहिणी देवई तहा। (उत्त २२.२) रोहिणी व देवकी या त्याच्या दोन भार्या होत्या.

(३) होय, ठीक, बरे :- (१) राइणा 'तह' त्ति भणिए। (अरी पृ.११) राजाने 'ठीक' असे म्हटले असता. (२) तह त्ति पडिवज्जिऊण सव्वमणुट्ठियं। (पाकमा पृ. ५८) ठीक असे म्हणून (श. - स्वीकारुन) सर्व केले.

(अ) तहेव :- 'तसेच' असा जोर देण्यास :-

(१) मंतिणा तहेव कयं। (बंभ पृ. ५३) मंत्र्याने तसेच केले. (२) तेवि तहेव पुट्ठा। (कथा पृ. १३७) त्यांनाही तसेच विचारले.

(आ) तहवि, तहावि (तथापि) :-

'तरी' या अर्थी विरोध दर्शविण्यास :-

जाउ सिरी विहडंतु बंधवा होउ लोय-अवमाणं। तह वि न जिणिंद- पूयं

वज्जि- स्समहं।। (सुपास. ५१०) पैसा जावो, बांधव दूर जावोत, लोकांकडून अपमान होतो, तरी मी जिनेंद्राची पूजा टाळणार नाही.

(इ) तहा[1]हि : उदाहरणार्थ :- तहा हि। केइ भणंति बंभो चेव देवाहिदेवो। (पाकमा. पृ.३७) उदाहरणार्थ काही म्हणाले 'ब्रह्मदेव हाच देवाधिदेव आहे'.

**३५८ ता, ताव (तावत्)**

(१) प्रथम, पहिल्यांदा :- (१) करेसु ताव भोयणं। (महा पृ.१७१अ) प्रथम भोजन कर. (२) ताव अहं एगागी रायाणं पेच्छामि। (कथा पृ. १२०) प्रथम मी एकटाच राजाची गाठ घेईन.

(२) तोवर, दरम्यान, तोपर्यंत :- (१) तए ताव इहेव चिट्ठियव्वं।

(समरा. पृ. ४२.५) तू तोवर येथेच रहावेस (२) ताव सहत च्चिय समायओ तं पएसं झउत्ति खेत्तपालो। (महा पृ. २७अ) दरम्यान अचानकपणे क्षेत्ररक्षक चट्दिशी त्या प्रदेशी आला.

(३) आत्ता :- बाले सि ताव तुमं पुत्ता। (अंत १३१) मुला! तू आत्ता लहान आहेस.

(४) खरोखर, नक्की, या अर्थी जोर देण्यास :-

(१) जयं पि भुंजेइ ताव रयणीए। (सुपास ४९६) जगसुद्धा रात्री जेवतेच (२) देवा चंदसूरतारयपमुहा ताव पच्चक्खदंसणेण नज्जंति। (महा पृ. २५५ ब) चंद्र, सूर्य, तारा इत्यादी देव तर प्रत्यक्ष दर्शनाने जाणले जातातच.

**३५९ तु[2], उ (तु)**

(१) पण, परंतु, तथापि, उलट :- (१) तुमं तु परत्थी परंमुहो। (नल पृ. ५०) पण तू परस्त्री-पराङमुख आहेस. (२) चइज्ज देहं न उ धम्मसासणं। (दस ११.१७) देहत्याग करीन, पण धर्माज्ञा सोडणार नाही.

(२) जोर देण्यास :- खाणी अणंत्थाण उ काम भोगा। (उत्त १४.१३) काम भोग म्हणजे अनर्थांची खाणच.

---

१ *'तहा य' याचा ही उपयोग 'तहाहि' प्रमाणे होतो. तसेच, तहाय व तहाहि यांचा उपयोग अवतरणे उद्धृत करतानाही केला जातो.*

२ *तु, उ हे वाक्यारंभी येत नाहीत.*

(३) वाक्यालंकार, पादपूरण :- (१) बहुयाणि उ वासाणि सामण्णमणुपालिया। (उत्त. १९.९५) पुष्कळ वर्षे श्रमणस्थिति आचरून. (२) पेच्छंति उ चित्तकूडं ते। (पउम ३३.४) त्यानी चित्रकूट (पर्वत) पाहिला.

(अ) किंतु१, परंतु :- विरोधदर्शक वाक्ये जोडण्यास२

**३६० दर३**

थोडे :- (१) दरं जंपिउं। (समरा पृ१९९) थोडें बोलून (२) कयं दरहसियं। (कथा पृ. १२०) किंचित् हास्य केले.

**३६१ दिट्ठिया (दिष्ट्या)**

आनंद दर्शविण्यास :- (१) दिट्ठिआ दिट्ठासि जीवंती। (नल पृ. २४) तू जिवंत दिसलीस, ही आनंदाची गोष्ट आहे. (२) बहूणं दिवसाणं दिट्ठिया खेल्लणगं उवागयं। (महा पृ.१५३अ) पुष्कळ दिवसांनी खेळणे प्राप्त झाले, हे चांगले झाले.

**३६२ दे[४]**

संमुखीकरण : (१) दे पिच्छामो ताव य तुह भगिणिं। (सुर ९.१८९) चल, पाहूया तुझ्या बहिणीला (२) ता दे सामिणीए पणभिक्खं देह। (कथा पृ. ६७) तेव्हा स्वामिनीला प्राणभिक्षा द्या.

**३६३ धिद्धी, धिरत्थु, धी, धी धी**

धिक्कार असो :- (१) धिद्धी मं। (नल पृ.२४) माझा धिक्कार असो. (२) धिरत्थुदेव्वस्स। (समरा पृ.९३) दैवाचा धिक्कार असो. (३) धी मज्झ वरिवित्ती। (जिन पृ.२०) माझ्या वीरवृत्तीचा धिक्कार. (४) धी धी चंचलया जोव्वणस्स। (सुपास ५३१) यौवनाच्या चंचलतेचा धिक्कार.

**३६४ धुवं (ध्रुवम्)**

खरोखर, नक्की, खात्रीने :- (१) सो धुवं चोरो। (सुपास ५२५) तो नक्की चोर आहे. (२) हुंति परकज्जनिरया नियकज्जपरंमुहा धुवं सुयणा। (जिन पृ. १८)

---

*१ किंतु, परंतु, हे वाक्यारंभी येऊं शकतात.*

*२ वाक्ये जोडणे, परिच्छेद ४४० पहा.*

*३* ***दरार्धाल्पे।*** *हेम २.२१५*

*४* ***दे सम्मुखीकरणे च।*** *हेम. २.१९६*

सज्जन हे खरोखर स्वकार्यपराङ्मुख (पण) परकार्यरत असतात.

**३६५ न**

निषेध, नकार :- (१) कस्स विसमदसाविभाओ न होइ। (समरा पृ. १९८) कोणाला वाईट परिस्थिती येत नाही? (२) निव्वाणपत्तस्स य जीवस्स न जम्मो न जरा न मरणं। (समरा पृ.१७७) आणि निर्वाण प्राप्त झालेल्या जीवाला जन्म नाही, जरा नाही, मरण नाही.

(अ) न न : जोराचा होकार :-

(१) न य न याणइ इमं पवंचं एसो। (समरा पृ. ७८८) हा हा प्रपंच जाणीन नाही, असे नाही (२) कालओ णं लोए न कयाइ न आसी न कयाइ न भवइ न कयाइ न भविस्सइ। (अंत ७८) कालदृष्टीने हे जग कधी नव्हते असे नाही, कधी नाही असे नाही, कधी असणार नाही असे नाही.

**३६६ नवरं (णवरं,[१] णवर[२])**

(१) फक्त, केवल :- (१) अम्हे नवरं तव विचित्तं केवलिपन्नत्तं धम्मं परिकहेमो। (निरया. पृ५०) केवलींनी सांगितलेला विचित्र धर्म तेवढा आम्ही तुला सांगू. (२) बालत्तणओ केलिप्पिओ णवरं। (समरा पृ. ७) बालपणापासून त्याला केवळ खेळ आवडत.

(२) नंतर : दट्ठूण य तं दव्वं चिंता मंतिस्स नवरमुप्पन्ना। (समरा पृ. २२५) आणि ते द्रव्य पाहिल्यानंतर मंत्र्याच्या ठिकाणी चिंता उत्पन्न झाली.

**३६७ नवरि (णवरि)**

फक्त[३], केवल :- (१) वारिज्जइ नवरि पुन्नेहिं। (सुर ८.२६)

फक्त पुण्याने वारिला जाईल. (२) लोगंमि नवरि दुल्लहो जणेण जिणदेसिओ धम्मो। (सुपास ५११) जगात जिनाने सांगितलेला धर्म तेवढा जनांना दुर्लभ आहे.

---

१ *णवरं तु केवले स्यात्। (मार्कं ८.११)*

२ ***णवर केवले।** हेम. २.१८७*

३ *मार्कं ८१३; हेमचंद्राच्या मते 'नंतर' असाही अर्थ असतो.*

(अ)१ सो नवरि माणुसाणं देवाणं वि वल्लहो होइ। (वज्जा. ८८) तो केवळ माणसांनाच नव्हे तर देवांनाही प्रिय होतो.

**३६८ नाइं (णाइं[२], णाइ)**

(१) नकार, नाही :- (१) नाइं भुज्जो करणयाए। (उवा परि. ११३) (मी) पुन: असे करणार नाही.

(२) निषेध[३] :- णाइ खले वीसंभसु। (दुष्टावर विश्वास ठेऊं नको)

**३६९ नाम, नामं (नाम)**

(१) नावाचा[४] ची चे :- (१) जंबू नामं अणगारे। (निरया पृ.३) जंबू नावाचा भिक्षु. (२) हरिएसबलो नाम आसि भिक्खू जिइंदिओ। (उत्त १२.१) हरिएसबल नावाचा एक जितेंद्रिय भिक्षु होता.

(२) खरोखर, नक्की, खात्रीने :- (१) नत्थि अकरणिज्जं नाम लोहवसगाणं। (समरा पृ. १४८) लोभवश झालेल्यांना अकरणीय असे खरच काही नाही. (२) ते नाम होंति कण्णा जे जिणवर सासणम्मि सुइपुण्णा। (पउम. १.१९) जे उत्कृष्ट जिन-उपदेशाने श्रुतिपूर्ण आहेत तेच खरे कान.

(३) 'म्हणजे' या अर्थी; स्पष्टीकरण करताना :- (१) तत्थो त्ति नाम पवरो पुरिसत्थो। (महा पृ.१४८ब) अर्थ म्हणजे उत्कृष्ट पुरुषार्थ होय. (२) तत्थ दिव्वं नाम जत्थ केवलमेव देवचरियं वण्णिज्जइ। (समरा पृ.२) त्यातील दिव्य (कथा वस्तु) म्हणजे जेथे फक्त देवाचे चरित्र वर्णिले जाते.

(४) वाक्यालंकार, पादपूरण :- (१) रायपुरं नाम नामेणं। (पउम २.८) रायपुर नावाचे (नगर) (२) रयणवई नाम नामेण। (समरा पृ. ६०९) रयणवई नावाची.

(अ) आज्ञार्थी रुपाबरोबर 'नाम' चा उपयोग असता, असे असेल, असे

---

१ *न केवलं-अपि (परिच्छेद ३४०) च्या धर्तीवर*

२ ***णाइं नञर्थे।*** *हेम २.१९०* ३ *मार्कंडेय ८.३*

४ *या अर्थी कधी नामेण-णं, नामओ, यांचाही उपयोग आढळतो. उदा. (१) निसहो नामेण तत्थ निवो। (नल पृ.१) (२) आसि राया...वसुदेवे त्ति नामेणं। (उत्त २२.१) (३) जयघोसे त्ति नामओ। (उत्त. २५.१)*

होईल, शक्य आहे, असा अर्थ होतो.

जइ एसा परपुरिसेण सह वच्चह वच्चउ णाम। (धर्मो पृ.६१) जर ही पर-पुरुषाबरोबर जात असेल तर खुशाल जाऊ दे तिला.

(आ) किं, कहं बरोबर 'नाम' चा उपयोग असता, शक्यता आहे, मला जाणून घ्यायचे आहे, असा अर्थ होतो.

(१) किं णाम कण्णाविउ बाणणाहं मण्णेसि गिण्णाह मिमं पएसं। (उसा. १.६५) अरे कन्येच्या प्रियकरा, बाप ज्याचा स्वामी आहे अशा या प्रदेशाला तूं स्वामिदहिन समजतोस काय, ते तरी मला कळू दे. (२) किं णाम सोक्खं तुमए विणा मे। (उसा १.७५) तुझ्या विना माझे कसले सुख बरे।

**३७० नु (णु) (नु)**

(१) शंका अनिश्चितता-युक्त प्रश्न :- (१) विसेसे किं नु कारणं। (उत्त. २३.१३) फरकाचे काय कारण बरे? (२) जीवंतयस्स फणिणो को णु मणिं मुट्ठिणा हणइ। (जिन पृ. २७) जिवंत सापाच्या मण्याला कोण बरे मुठीने मारील?

(२) सौम्य[1] निंदा :- कहं नु कुज्जा सामण्णं जो कामे न निवारए। (दस २.१) जो इच्छा दूर करीत नाही, तो श्रामण्य काम बरे करणार?

(अ) किं, कहं बरोबर उपयोग असता, खरोखर, शक्य आहे, या अर्थी उपयोग होतो.

(१) कमल व्व किं नु एसा। (अगड २०) लक्ष्मीप्रमाणे ही कोण बरे? (२) पहवंति किं नु फणिणो गारुडसारं सरंताणं। (जिन पृ. ३२)

गारुडसार स्मरणाऱ्यावर सर्पांचा प्रभाव पडणे शक्य आहे? (३) धम्मजुयाणं कह णु भयं होइ लोयाणं। (नाण ३.१०६) धर्मातरत असणाऱ्यांना भय असू शकेल काय?

(आ) नणु (ननु) : असे नव्हे काय? ; नक्की असे आहे :-

(१) सो नणु कल्लाणमित्तो। (समरा पृ१५) तोच खात्रीने कल्याणकारक मित्र. (२) नणु सुलहमेत्थ निव्वेयकारणं। (समरा पृ.३७) येथे वैराग्याचे कारण

---

१ *अभ्यंकर, दस टीपा, पृ.६*

सुलभ नाही काय?

**३७१ पाएण, पायं, पायसो (प्रायेण, प्राय:, प्रायश:)**

सामान्य विधान, नियम सांगताना, सामान्यत:, प्राय:, या अर्थी :-

(१) पाएण कुपुरिसाणं न सहावो अन्नहा होइ। (नल पृ.२३) प्राय: दुष्टांचा स्वभाव बदलत नाही (२) पायं रसा दित्तिकरा नराणं। (उत्त ३२.१०) प्राय: रस (चांगले अन्न) माणसांना अधिक बलवान करतात. (३) न एस पायसो पडिनियत्तइ वाही। (कथा पृ.१४९) बहुधा हा व्याधी बरा होणार नाही.

**३७२ पुणो, पुण, उण (पुन:)**

(१) आणखी,पुन: :- (१) न पुणो एवं काहामो। (पाकमा. पृ२०) पुन: आम्ही असे करणार नाही. (२) साहुं पुणो पणमिऊणं। (पउम ३.४२) साधूला पुन: प्रणाम करुन.

(२) परंतु, या उलट, या अर्थी विरोध दर्शविण्यास :-

(१) तुह जोग्गा सा कन्ना न उण अन्नस्स। (सुर १२.८१) ती कन्या तुला योग्य आहे, पण इतराला नाही. (२) जे सप्पुरिसा हवंति ते मरणवसणं बहुं मन्नंति न उण इहलोय परलोयविरुध्दं आयरंति। (चउ पृ.२७) जे सत्पुरुष आहेत ते मरणरुपी संकट मान्य करतील, पण इहपरलोक विरुध्द आचरण करणार नाहीत.

(३) एकाद्याच्या दृष्टीने (   ) या अर्थे :-

(१) अहं पुण अन्नत्थ वच्चिस्सं। (नल पृ.१३) मी मात्र दुसरीकडे जाईन. (२) अहं रक्खसो। को पुण तुमं। (नल पृ५०) मी राक्षस आहे, पण तू कोण आहेस?

(अ) पुणो पुणो :- वरचेवर, पुन:पुन :-

(१) पुणो पुणो वंदई सक्को। (उत्त ९.५९) इंद्राने पुन:पुन वंदन केले.

(२) नाणा विहाइ दुक्खाइ अणुहोंति पुणो पुणो। (सूय १.१.१.२६) पुन:पुन: नानाविध दु:खे अनुभवतात.

**३७३ पुणरुत्तं**[१]

केलेले पुन:करणे, वारंवार तेच करणे, या अर्थी :-

एए भमंति जीवा पुणरुत्तं जम्मसायरे भमे। (पउम ३.१२९) भयंकर अशा जन्मरुपी सागरांत हे जीव वारंवार भ्रमण करतात.

**३७४ बाढं**

(१) पुष्कळ, फार, खूप :- (१) तेण भणियं  बाढं जाणामि। (कथा पृ६७) त्याने म्हटले मला पुष्कळ माहीत आहे (२) पिउणा समं बाढं कलहिऊण। (महा पृ. १८५ ब) बापाबरोबर खूप कलह करुन.

(३) बाढमुव्विग्गो धणदेवो। (महा पृ. १५०अ) धणदेव फार उद्विग्न झाला.

(२) होय :- भणियं सूरिणा बाढं। (कथा पृ. १७७) सुरीने 'होय' म्हटले.

**३७५ भो (भो:)**

संबोधन :- भो दूय गच्छ। (नल पृ. ८) हे दूता, तू जा. (अ) भो भो : (१) भो भो विप्पा। (पाकमा पृ.७२) अरे ब्राह्मणांनो

(२) भो भो भूयपिसाया (सुपास ४९२) अरे भूतपिशाचांनो.

**३७६ मणे**[२] **(मण्णे**[३]**)**

विमर्श, संशयुक्त विचार दर्शविण्यास :- (१) किं मण्णे कारणं होज्ज। (वसु पृ. २२१) काय कारण असावे? (२) कत्थ मण्णे पिया गया होज्ज। (वसु पृ.२२४) प्रिया कोठे गेली असेल? (३) सुमिणस्स[४] के मन्ने कल्लाणे फलवित्तिविसेसे भविस्सइ। (नायास, पृ.४) स्वप्नाचे कोणते कल्याणकारक विशेष फळ असेल बरे?

**३७७ मुहु (मुहु:)**

वारंवार :- मुहु मुहु मोहगुणे जयंतं। (उत्त ३.११) वारंवार मोहगुण (मोहाचे परिणाम) जिंकणाऱ्याला.

---

१ *पुणरुत्तं कृतकरणे। हेम २.१७१*

२ *मणे विमर्शे। (हेम २.२०७)* ३ *पा.स.म. ८३१*

४ *इह मन्ये वितर्कार्थ: निपात:। अभयदेव, नाया पोथी पृ.१८ ब.*

**३७८ माइ, माइं**[1]

निषेध, नको :- सप्पं छिव माइ पाएहिं। (सापाला पायाने स्पर्श करु नको)

**३७९ रे**[2]

(१) संबोधन :- (१) रे वरगइंम। (वज्जा १९७) रे गज श्रेष्ठा (२) को रे तुवं। (उत्त. १२.७) कोण रे तू?

(अ) रे रे :- रे रे वरधणू। (बंभ पृ.५५) अरे वरधणू

(२) रतिकलह :- मम हिययं हरिऊणं गओ सि रे किं न जाणिओ तं सि। सच्चं अच्छिनिमीलणमिसेण अंधारयं कुणसि।। (कथा पृ.४८) माझे हृदय हरण करुन तु गेलास हे रे काय माहीत नाही? डोळे झाकण्याच्या मिषाने खरोखर अंधारच (निर्माण) करीत आहेस.

**३८० वरं**

अधिक बरे :- वरमन्न देसगमणं वरं मरणदुक्खं। (महा पृ.८२ अ) अन्यदेशगमन अधिक बरे; मरण दु:ख अधिक बरे.

(अ) वरं - न उण :- हे बरे-पण न :-

वरं एए सुणह पुरिसा न उण अहं पुरिस सुणहो। (समरा पृ.२६८) हे कुत्रे बरे; पण कुत्र्याप्रमाणे असणारा मी मात्र चांगला नाही.

**३८१ वा, व (वा)**

(१) किंवा या अर्थी विकल्प दाखविण्यास, प्रत्येक शब्द वा विधान यासह किंवा शेवटी एकदा :- (१) हत्था वा पाया वा कण्णा वा अच्छी वा नामा वा। (विवाग. पृ.२) हात वा पाय वा कान वा डोळे वा नाक. (२) किं वच्चामि विदेसं किं वा तायस्स अंतियं जामि। (अगड १४) (मी) परदेशी जाऊं वा वडलांच्या जवळ जाऊ ?

(२) आणि, तसेच, या अर्थी समुच्चय दर्शविण्यास :-

(१) का एसा कस्स वा धूया। (नल. पृ ४३) ही कोण आणि कुणाची

---

१ ***माइं मार्थे।*** *हेम २.१९१ ; मार्क ८.३*

२ *'अरे' वरील तळटीप पहा.*

मुलगी? (२) पुत्ति, कासि तुमं कओ वा समागया किं वा सोयकारणं कहिं वा गंतव्वं। (बंभ पृ.७३) मुली, तू कोण? आणि कोठून आलीस? व शोक करण्याचे कारण काय? आणि कुठे जायचे आहे?

(३) पादपूरण[1] :- जुद्धेहिं अज्जियं जं रज्जं तं हारियं व जुएण। (नल पृ.१०) युद्धाने जे राज्य मिळविले ते द्यूतात गमावले.

(अ) अहवा, किं वा :- विकल्प दर्शक वाक्ये जोडण्यास[2]

**३८२ सक्का**

शक्य आहे :- नो खलु सक्का माणुस्सएणं उवाएणं... धारिणीए देवीए अकालडोहलमणोरह संपत्ति करित्तए। (नायास प.१५) धारिणी राणीच्या अकाली (उत्पन्न झालेल्या) डोहाळ्याची मनोरथपूर्त्ती मानवी उपायांनी करता येणे, हे मुळीच शक्य नाही.

**३८३ सक्खं (साक्षात्)**

प्रत्यक्ष :- जइ सि सक्खं पुरंदरो। (उत्त. २२.४१) जरी तू साक्षात् इंद्र असलास.

**३८४ सव्वहा (सर्वथा)**

(१) सर्व प्रकारे :- (१) सव्वहा अणुकूलो। (कथा पृ.१४५) सर्वप्रकारे अनुकूल (२) जं सामिणी भणइ तं सव्वहा करिस्सामि। (कथा पृ.१०९) स्वामिनी जे म्हणेल ते सर्वप्रकारे करीन.

(२) नक्कीच :- (१) सव्वहा धन्ना हं। (महा पृ. १६४ ब) मी नक्कीच धन्य आहे. (२) देवि एवं सव्वहा गब्भाणुभावो। (कथा पृ.१५) राणीसाहेब, हा नक्कीच गर्भाचा प्रभाव!

(अ) सव्वहा न : मुळीच न, अजिबात न :-

(१) इह खलु संसारे न सव्वहा सुहमत्थि। (समरा पृ. १७७) या संसारात मुळीच सुख नाही. (२) सव्वहा न अप्पपुण्णाणं समीहियं संपज्जइ। (समरा

---

१ *गोरे, नलकहा, टीपा, पृ. १६*

२ *वाक्ये जोडणे, परिच्छेद ४३९ पहा.*

पृ.४१४) अल्प पुण्यवानांची इच्छा मुळीच पूर्ण होत नाही.

**३८५ साहु (साधु)**

चांगले, छान :- (१) जणेणं उग्घुट्ठं - साहु साहु साहु त्ति। (पउम ३३.१३४) ‘छान ! छान! छान! असा लोकांनी घोष केला. (२) साहु वच्छ साहु उचिओ ते विवेगो। (समरा पृ.१९) छान! छान! बाळा तुझा विवेक उचित आहे.

**३८६ सिया**

शक्य आहे, कदाचित्, या अर्थी उपयोग केलेला आढळतो.

(१) सिया मणो निस्सरई बहिद्धा। (दस २.४) कदाचित् त्याचे मन बाहेर पडेल. (२) सिया विसं हालहलं न मारे। (दस ९.१.७) हालाहल विष मारणार नाही हे ही (एकवेळ) शक्य आहे.

**३८७ हंजे**

मैत्रीण वा दासी यांना संबोधिताना :-

हंजे! किमेयं। (समरा पृ.६२२) अग, काय हे?

**३८८ हंत**[१]

(१) विस्मय :- (१) समुप्पन्नो य मे विम्हओ हंत किमेयं। (समरा पृ.५००) मला विस्मय वाटला-बापरे! काय हे! (२) हंत कहमणेणाहं वियाणिओ। (धर्मो पृ.१३३) अरेच्चा! याने मला कसे ओळखले?

(२) गोंधळ :- हंत किमेयं। (समरा पृ.५००) अरे! काय हे पृ.

(३) विषाद, खंद, दु:ख :- हंत देव्वविलसियमिणं। (धर्मो प्र.४३) अरेरे! हा दैवाचा खेळ!

(४) हर्ष :- हंत सुणंतु भवंतो[२]। (राय पृ. ५३) छान, अहो तुम्ही ऐका.

(५) वाक्यारंभ :- (१) हंता समणोवासगा। (कथा पृ.९२) श्रमणो-पासका.

---

१ *हन्त हर्षेऽनुकम्पायां वाक्यारम्भविषादयो:।।*
*अभ्युपगमे सत्ये वा। (उवा. परि. ११५)*

२ *मलयगिरि, राय.पृ. ५५*

(२) हंत जीवो वि चित्त-चेयणाइ-धम्माणुहवेण घेप्पइ। (समरा पृ.१७५) जीव सद्धां चित्त, चेतना इत्यादी धर्मांच्या अनुभवाने जाणता येतो.

(६) वितर्क :- हंत कारणेण होयव्वं। (धर्मो पृ.४९) हा! कारण असले पाहिजे.

(७) होकार, होय :- (१) से अट्ठे समट्ठे। हंता अत्थि। (अंत ३८) तो अर्थ बरोबर आहे? होय, आहे. (२) अत्थि णं भंते केइ पुरिसे जाइ-अंधे। हंता अत्थि। (विवाग पृ.३) महाराज, कोणी जात्यंध पुरुष आहे? होय, आहे.

(८) पश्चात्ताप :- हंत असोहणं अणुचिट्ठियं। (समरा पृ.५०५) हा! वाईट केले।

(९) कोमल आमंत्रण :- हंता अत्थे समट्ठे[१]। (नायासं पृ.३५) (महाराज) बरोबर आहे ही गोष्ट!

**३८९ हंहो**

संबोधन :- (१) हंहो पेच्छय लोया। (महा पृ.९५ब) अहो प्रेक्षक लो-कहो। (२) हंहो मियंक। (लीला ५३६) रे चंद्रा।

**३९० हंदि[२]**

(१) विषाद :- (१) हंदि पयत्तो महामोहो। (समरा पृ. ६५०) हा:।

महामोह सुरु झाला. (२) किंवा मह हंदि मणुपजम्मेण। अरेरे! माझ्या मनुष्य जन्माचा काय उपयोग?

(२) विकल्प :- जीवइ हंदि पिआ। (कुमार ४.२) प्रिया जिवंत आहे (की नाही) ?

(३) पश्चात्ताप :- हंदि किं पिआ मुक्का। (कुमार ४.२) प्रियेचा का त्याग केला?

(४) निश्चय :- (१) मह पुण विवेयजुत्तस्स हंदि न हु एरिसं जुत्तं। (सुर २.१९५) विवेकयुक्त अशा मला असले योग्य नाही.

---

१ *हंत इति कोमलामन्त्रणे अभयदेव। नामा (पोथी), पृ. ७१ अ.*

२ ***हंदि विषादविकल्पपश्चात्तापनिश्चयसत्ये।*** *हेम २.१८०*

(२) हंदि... निग्गंथाणं सुणेह मे आयारगोयरं। (दस ६.४)

निर्ग्रंथांचा आचार कसा असतो, ते मी सांगतो, ऐका.

(५) सत्य :- जिणसाहु दंसणाइं हंदि वियारेंति दुरियाइं। (समरा पृ.६६२) जिनसाधूंची दर्शने पापांचा नाश करतात.

(६) आनंद :- सुंदरमणुट्ठियं हंदि मज्झधूयाए। (सुर. ४.१९९) वा:। माझ्या मुलीने चांगले केले.

### ३९१ हंभो[1]

(१) क्रोध :- (१) हंभो अलियपलाविणि। (सुर ११.२३४) अग खोटे बोलणाऱ्या स्त्रिये। (२) हंभो कामदेवा समणे वासया अपत्थिय पत्थिया। (उवा[2], परि ९७) अरे मरणाची इच्छा करणाऱ्या श्रमणोपासक कामदेवा!

(२) आश्चर्य :- हंभो कामदेवा समणोवासया धन्ने सि णं तुमे। (उवा[2]. ११३) अरे श्रमणोपासक कामदेवा, तू खरच धन्य आहेस.

(३) आमंत्रण:- (१) हंभो सोमिलमाहणा। (निरमा, पृ.४.३) अरे सोमिल ब्राह्मणा। (२) हंभो कुंडकोलिया समणोवासया। (उवा[2] १६६) अरे श्रमणोपासक कुंडकोलिया।

(४) अवक्षेपण :- हंभो महासयया... किं णं तुब्भं... धम्मेण वा पुण्णेण वा सग्गेण वा मोक्खेण वा।१ (उवा परि २४६) अरे महासयया, तुला धर्म वा पुण्य वा स्वर्ग वा मोक्ष याचा काय उपयोग?

### ३९२ हद्धि[2], हद्धी

(१) खेद :- (१) अहं हद्धी एगो दुहभायणं जाओ। (सुपास.५८६) हा:। मी एकटाच दु:खाचे आश्रयस्थान झालो. (२) हद्धी वावाइया देवी। (समरा पृ.३५७) अरेरे! राणी मारली गेली.

(२) निर्वेद :- (१) कुमरीए वुत्तं - हद्धि परिसंत म्हि। (नल पृ.४) राजकुमारीने म्हटले 'मी कंटाळले बाई।' (२) हद्धी सव्वं चेव एगाए आयण्णियं। (समरा पृ.३४६) छे। हिने सर्वच ऐकले।

---

१ *क्रोधे आश्चर्ये आमन्त्रणे अवक्षेपणे च।*

२ *होएर्न्ले संपादित 'उवासगदसाओ' पहा.*

(३) अनुताप :- हद्धी मज्झ पमाओ फलिओ। (सुपास ५५८) हाय। माझा प्रमाद (आता) फळाला आला।

**३९३ हरे[1]**

(१) क्षेप :- हरे णिल्लज्ज। (अरे निर्लज्जा!)

(२) रतिकलह :- हरे बहुवल्लह। (अरे पुष्कळ प्रिया असणाऱ्या!)

(३) संभाषण :- (१) हरे वावाएह एयं। (समरा पृ.४६०) अरे, मारा याला (२) हरे गेण्हह दुट्ठवारणं। (समरा पृ.५४८) अरे, पकडा दुष्ट हत्तीला.

**३९४ हला, हले**

मैत्रिणीचे संबोधन :- (१) हला पियंकरिए। (समरा पृ.६४) अग पियंकरिए (२) हला सुंदरिए। (समरा पृ.२६१) गडे सुंदररिए (३) हले सो देवो चउभुओ। (पउ पृ.४२) अग, तो देव चतुर्भुज होता. (४) हले अत्थि महंता अडवी। (चउ पृ.४२) गडे, (एक) मोठे अरण्य होते. हले हले :- हले हले सिग्घं पयच्छसु मे मग्गं। (महा पृ. ३३२ अ) अग अग, मला लवकर वाट दे.

**३९५ हा[2], हाहा**

(१) विषाद :- (१) तए हा हाहा हारिओ जम्मो। (सुपास ४९५) अरेरे! संकट कोसळले (२) हा हा हओ म्हि। (महा पृ.२३९ब) हाय! माझा नाश झाला.

(२) दु:ख, त्रास : (१) हा अच्चाहियं पडियं। (नल.पृ.१४) अरेरे! संकट कोसळले. (२) हा हा विवन्नो मे पिययमो। (समरा.पृ. ७५५) अरेरे! माझा प्रियतम मेला.

(३) जुगुप्सा :- हा मा एवं इह परलोगविरुद्धं जंपसु। (धर्मो पृ.१४७) छे। असे इह पर लोकविरुद्ध बोलू नकोस.

(४) आर्ति :- (१) हा हा अहं अहन्ना। (सुपास ६२७) हा:। मी अधन्य आहे. (२) हा हा अहं अभग्गां। (सुपास ६३१) हा:। मी अभागी आहे.

(५) पश्चात्ताप :- हा किं मए कयं पावं अण्ण जम्मे। (कथा पृ.१७५) अरेरे! मी दुसऱ्या (मागील) जन्मी काय बरे पाप केले?

---

*१ क्षेपे संभाषणरतिकलहयोश्च हरे इति प्रयोक्तव्यम्। हेम. २.२०२*

*२ हा इति विस्मयविषादशुग्जुगुप्सा-आर्तिषु।*

### ३९६ हि[१]

(१) कारण :- साहेसु परपत्थणं मोत्तुण अन्नमुवायं; पत्थणा हि नाम नरस्स जणेइ मरणसमयनिव्विसे सत्तणं। (महा पृ.१६०अ) पर प्रार्थना सोडून अन्य उपाय सांग, कारण प्रार्थना ही माणसाला मरण समयाप्रमाणे (दु:खदायक) आहे.

(२) नक्की, खात्रीने :- (१) एस मण्णे हि उत्तमे। (उत्त २३.६३) हाच मार्ग उत्तम आहे. (२) अचिंतो हि मणिमंतो सहीण पभावो। (समरा पृ.४१३) मणि, मंत्र, औषधी यांचा प्रभाव खरोखर अचिंत्य आहे.

(३) दृष्टांत, उदाहरण :- न हि जीवंतयस्स भुयगाहिवस्स फणारयणं केणावि घेत्तुं पारिज्जइ। (महा पृ.२१०अ) जिवंत सर्वश्रेष्ठाच्या फणेतील रत्न काढून घेणे जसे कोणालाही शक्य होत नाही.

(४) फक्त या अर्थी जोर देण्यास :- (१) पहुचित्ताणुवत्तणं हि सेवगस्स धम्मो। (महा पृ.८२ब) स्वामीच्या मनाप्रमाणे वागणे हाच सेवकाचा धर्म (२) परजीवरक्खणं हि महापुन्नं वुच्चइ। (महा पृ.२४५अ) परजीवरक्षण यालाच महापुण्य म्हणतात.

### ३९७ ही, हीही

(१) वितर्क :- ही एसा का लहुया वहुया दीसेइ मज्झ पुत्तिसमा। (सिरि २६८) माझ्या मुलीसारखी ही कोण बरं लहानशी नवरी दिसते आहे!

(२) खेद, विषाद :- (१) ही संसार सहावो सव्वो खणदिट्ठनट्ठो। (सुपास ६४०) अरेरे! सर्व संसार स्वभाव हा क्षणभर दिसून नाहीसा होणारा आहे. (२) ही ही विहविलसियं विसमं। (सिरि २९७) अरेरे! दैवाचा खेळ विषम आहे।

### ३९८ हु[२]

(१) दान :- हुं गिण्हसु कणयभायणयं। (कुमार ४.१०) हं! सोन्याचे भांडे घे. (२) पृच्छा :- हुं तुह पिओ न आओ। (कुमार ४.११) हू! तुझा प्रियकर आला नाही ?

---

१ *हि पादपूरणे हेतौ विशेषेऽप्यवधारणे।*

२ ***हुं दान पृच्छानिवारणे।*** *हेम २.१९७ ; हुं दान पृच्छानिर्धारणेषु। प्रा.प्र. ९.२,* ***हुं निश्चयवितर्कसम्भावनेषु।*** *प्रा. प्र. ९.६*

(३) निवारण :– (१) हुं पज्जत्तं धम्मवएण। (सुपास ६१७) हं! धर्मासाठी खर्च पुरे. (२) हुं पज्जत्तं बहुणा पत्थुय विग्घावेहण विहलेण। (सुर १.४३) हं! प्रस्तुत विघातक असे हे विफल विवेचन पुरे.

(४) निर्धारण :– (१) हुं नायं। (सुपास ४८९) हूं। कळले. (२) हुं तं पि हु न हु जुत्तं। (सुर २.१९७) हं। ते सुद्धा खरच योग्य नाही.

(५) निश्चय : (१) हुं विन्नायं एयं। (सुपास ५३६) हूं। हे कळले (२) हुं जाणिओ परमत्थो। (जिन पृ.२३) हूं! खरी गोष्ट कळली.

(६) वितर्क :– हुं संकेयठाणं न सूइयं। (धर्मो पृ.४८) हां। संकेतस्थान सुचविले नाही.

(७) होय :– राया भणेइ हुं हुं। (सिरि १५३) राजा 'हूं हूं' (होय) म्हणाला.

३९९ हे

संबोधन :– (१) हे खंद्या। (अंत ७६) अरे खंद्या! (२) हे कुलवइ। (महा पृ.१४७ अ) हे कुलपति!

**४०० हो**

संबोधन :– राइणा भणियं – हो कीस न गेण्हसि। (धर्मो. पृ. १७८) राजाने म्हटले 'अरे! कां घेत नाहीस?'

**४०१ इतर काही अव्ययांचे उपयोग**

(१) काही अव्यये कधी कधी जोडीने वापरली जातात.

इओ तओ (इकडे तिकडे), अन्नया कयाइ (एकदा केव्हां तरी), परंतु, अहवा, किंतु, किं पुण, इत्यादी.

(२) स्थलकालदर्शक अव्ययांच्या व्दिरुक्तीने पुढील अर्थ होतो :–

(अ) जोर दर्शविण्यास :– (क) जत्थ जत्थ – तत्थ तत्थ, जया जया– तया तया

(ख) सणियं सणियं, पुणो पुणो, मंदं मंद, कह कहवि, अभिक्खणं[२].

(आ) कालभिन्नता व स्थलभिन्नता दर्शविण्यास :

काल :– कयाइ :– कयाइ जलकीलं कुणंति। कयाइ दोलं दोलण सुहं अणुहवंति। (नल पृ.७) कधी जलक्रीडा करीत, कधी झोपाळ्यावर बसून झोक्याचे सुख अनुभवीत.

स्थल :- कत्थइ :- कत्थइ सीहवियारिय रुहिरच्छडारुणं भीमं।

कत्थइ सीह भयद्दुय हरिण पलायंत संघायं। (वणं) (पउम ३३.६,८) कुठे सिंहाने फाडलेल्या उत्कृष्ट हतींच्या रक्तांच्या सड्याने लाल व भयंकर दिसणारे, (तर) कुठे सिंहाच्या भयाने जेथे हरणांचे कळप पळत सुटले आहेत असे (वन)

(३) एकीकडे - दुसरीकडे या अर्थी दोन अव्ययांचा उपयोग :-

(१) एगत्त मज्जाया पल्हत्थिज्जइ कुलक्कमपरुढा। अन्नत्तो मरइ पिया। (महा.३.३५) एकीकडे कुलक्रमागत मर्यादा टाकावी लागते, दुसरीकडे प्रिया मरते आहे. (२) एगत्तो गुरुवयणभंगो अन्नत्तो य वयभंगो। (समरा पृ.२४७) एका बाजूला गुरुवचनाचा भंग, तर दुसऱ्या बाजूला व्रताचा भंग.

प्रकरण २३

# वचनांचे उपयोग

## ४०२ वचनांचे उपयोग

अर्धमागधीत एकवचन व अनेकवचन अशी दोन वचने आहेत. द्विवचन[१] नसल्याने द्विवचनाचे कार्य अनेकवचनानेच[२] केले जाते.[३] ए. व. आणि अ. व. यांचे उपयोग पुढीलप्रमाणे होतात[४].

## ४०३ एकवचनाचे उपयोग

१) एक वस्तु, व्यक्ति इत्यादी दर्शविण्यास ए. व. चा उपयोग होतो. उदा. १) धम्मेण कुलपसूई धम्मेण य दिव्वरूवसंपत्ती। धम्मेण धण समिध्दी धम्मेण सुवित्थडा किती ।। (समरा पृ. ४) धर्माने (चांगल्या) कुळांत जन्म, दिव्यरूपाचा लाभ, घनसमृद्धी मोठी कीर्ति (प्राप्त होतात) २) वरजुवइ विलसिएणं गंधव्वेण च एत्थ लोयंमि। जस्स व हीरइ हिययं सो पसुओ अहव पुण देवो ।। (नाण १०.२९४) सुंदर स्त्रियांच्या विलासाने आणि गायनाने ज्याचे हृदय आकृष्ट होत नाही तो पशु अथवा देव होय.

२) ज्या वस्तु एकच आहेत. त्या (प्रायः) ए. व. त ठेवल्या जातात. १) बहुरयणा वसुंधरा। (जिन पृ. १६) बहुरत्ना वसुंधरा २) चंदो धवलेइ महिं। (जिन

---

१ *दो, दुवे, दोन्नि (दोण्णि), (बे) ही द्विवचनी रूपे तेवढी अर्धमागधीत आढळतात.*

२ *द्विवचनस्य बहुवचनम्। हेम ३.१३० उदा. कण्णेसु असुभो मलो । (बंभ पृ. ३७)*

३ *दोन हा विशेष अर्थ सांगावयाचा असल्यास, अनेकवचनामागे दो, दुवे, दोन्नि यांचा उपयोग केला जातो. उदा. आगया दुवे तावसकुमारया। (समरा पृ. १३)*

४ *प्राकृते हि वचनव्यत्ययोऽपि भवति। मलयगिरि (राय) पृ. १७१*

पृ. १८) चंद्र मही धवल करतो ३) सूरस्स पुरो खज्जोयगाण का होइ देहपहा। (महा पृ. १३५ ब) सूर्यापुढे काजव्यांच्या देहाची कसली प्रभा?

३) एकजिनसी, एकप्रकारक, वस्तु दर्शविण्यास ए व चा उपयोग होतो. १) पउरजणं संमाणेऊण। (समरा पृ. १२) पौरजनांचा सन्मान करून २) अत्थरहिओ खु पुररिसो अपुरिसो चेव। (समरा पृ. २०१) अर्थ रहित पुरूष हा पुरूष नव्हेच.

४) अनेकांचा समूह दर्शविण्यास ए. व. चा उपयोग होतो.

१) जणो पहट्ठमणो भणिउमाढत्तो (महा. पृ. १५ ब) ज्यांचे मन आनंदित झाले आहे असे (ते लोक बोलू लागले. २) तरूणी जणो ताण समीवं गओ। (बंभ पृ. २८) तरूण स्त्रिया त्यांच्याजवळ गेल्या.

५) वस्तूंचा वर्ग, जाति दाखविण्यास ए. व. चा उपयोग होतो.

१) मउहो वि मइंदो करिवराण कुंभत्थलं दलइ। (जिन. पृ.६१) सिंहाचा छावा (श. लहान सिंह) सुद्धा गजश्रेष्ठांची गंडस्थळे फोडतो. २) सप्पे वि दिण्णखीरं तं चेव वि सत्तणमुवेइ। (जिन पृ. ६९) सापाला जरी दूध पाजले (श. दिले) तरी त्याचे विषच होते.

६) अनेक वस्तु वा व्यक्ति दर्शविण्यास कधी ए. व. चा उपयोग होतो.

१) सव्वं चिय संसारियं वत्थुं विवागदारूणं। (समरा पृ. १७६) संसारातील सर्वच वस्तु परिणामी दारूण आहेत. २) पाएण लोओ भिन्नरूई। (समरा पृ. ७१५) प्रायः लोक भिन्न रूचीचे असतात.

७) ए. व. चा एक वैशिष्ट्यपूर्ण उपयोग असा आढळतो.

दसद्धवण्णे कुसुमे। (भग; पृ. ३) पंचरंगी फुले.

**४०४ अनेकवचनाचे उपयोग**

१) द्विवचनाच्या ऐवजी अ. व. चा उपयोग केला जातो.

अ) १) कण्णेसु कुंडलाइं भयासु माणिक्ककडयाइं। (पउम ३.९८) कानात कुंडले, बाहूवर कडी २) थरहरंति मे ऊरू। (समरा पृ. ३१९) माझ्या मांड्या कांपत आहेत.

आ) दो चा उपयोग असता :

१) सरियाण दोण्ह मज्झे देवउलं अत्थि रमणीयं। (अगड २२८) दोन

नद्यांच्या मध्ये एक रमणीय देऊळ होते. २) ओट्ठे वि छिंदंति दुवे वि कण्णे । (सूय १.५.१.२२) दोन्ही ओठ व कान कापतात.

२) अनेक वस्तु, व्यक्ति इत्यादी दर्शविण्यास अ. ब. चा उपयोग होतो.

१) सुगेज्झाणि सज्जणहिययाणि । (समरा. पृ. ५४०) सज्जनांची हृदये जिंकणे सोपे असते. २) कम्माणि बलवंति (उत्त. २५.३०) कर्मे बलवंत असतात. ३) विचित्ताणि खु विहिणो विलसियाणि । (समरा पृ. २०३) दैवाचे खेळ विचित्रच असतात.

३) वस्तूंचा वर्ग, जाति दर्शविण्यास अ. व. चा उपयोग होतो.

१) आवयाए वज्जकढिणहियया चेव महापुरिसा हवंति। (समरा. पृ. २०८) मोठे लोक संकटात वज्राप्रमाणे कठिण हृदयाचे होतात. २) खमापहाणा य हुंति सप्पुरिसा। (सुपास. ५१५) सत्पुरूष क्षमाप्रधान असतात.

४) पुढील परिस्थितीत अ. व. चा उपयोग केलेला आढळतो.

१) निसर्गवस्तु[१] : १) थोवंतरेण पणट्ठा वाया। (चउ. पृ. २९) थोड्या वेळाने वारे थांबले २) सोया भणीओ विव विहायंति रमणावलीओ। (समरा. पृ. २१२) विजेप्रमाणे रत्नावली चमकल्या.

२) अमूर्त पदार्थ [२] : १) उत्तमाइं सोक्खाइं। (नाण २.८९) उत्तम सौख्ये २) हियइच्छियाइं लोयम्मि पुण्णेहिं विणा ण हु संपडंति सइ सज्जणाणं पि । (लिला. २२३) जगात सज्जनांच्या बाबतीत सुद्धा मनोवांछिते नेहमीच पुण्याविना पूर्ण होत नाहीत.

३) अमेय[३] पदार्थ : १) पाइओ मि जलंतीओ वसाओ रुहिराणि य। (उत्त. १९.७०) कढत वसा व रक्त मला पाजण्यात आले २) बहुंताण तणाइँ वि हत्थावलंबत्तणमुवेंति। (लिला.१९३) बुडत्याला गवताच्या काडीचा आधार ३)

---

१ *कधी ए. व. चा उपयोग आढळतो : १) अह वाइउं पवत्तो वाओ। (पउम ४.१३) २) वायइ अइसीयलो वाओ । (सुर ७.१८६)*

२ *कधी ए. व. चा उपयोग आढळतो. १) लद्धा कह वि तीए चेयणा । (समरा. पृ. ३०८) २) इयं उज्जाणरिद्धी। (समरा. ३११) ३) अवगया मोहवासणा। (समरा पृ. ७१८)*

३ *कधीं ए. व. चा उपयोग आढळतो. १) पज्जालिया वसाए पईवया। (धर्मो पृ. १८०) २) पक्खित्तं बलीए सह रूहिरं । (धर्मो पृ. १८०) ३) मंसे मज्जे य इत्थिसु पसत्ता। (कथा पृ. २०)*

देह मे कट्ठाणि। (समरा पृ. ४८०) मला काष्ठे द्या ४) ऊरुमंसाणि छेत्तूण । (धर्मो पृ. १९८) मांडीचे मांस तोडून

अ) यावेळी अ. व. ने कधी प्रकार निर्दिष्ट होतो.

निहिं उदएहिं मज्जावेइ । (विवाग पृ. ५४) तीन प्रकारच्या पाण्यांनी स्नान घलतो.

४) देशनामे [१] : करकंडू कलिगेसुं पंचालेसु य दुम्मुहो। नमी राया विदेहेसु गंधारेसु य नग्गई ।। (उत्र १८.४६) कलिंगात करकंडू, पांचालात दुम्मुह, विदेहात नमी राजा व गांधारात नग्गई.

५) ऋतुनामे [२] : आयवयंति गिम्हेसु हेमंतेसु अवा उडा । वासासु पडिसंलीणा।। (दस ३.१२) ग्रीष्मात (स्वतःला) तापवितात. हेमंतात वस्त्ररहित, वर्षा ऋतूत आश्रय घेतलेले.

६) नक्षत्र नामे[३] : १) अह निक्खमई उ चित्ताहिं। (उत्र २२.२३) नंतर चित्रा (नक्षत्र) असता संन्यास घेतला. २) चेत्तबहुलट्ठमीए उत्तरसाढासु अद्धरत्तम्मि.. जाओ सो। (महा. २.७) चैत्र कृष्णाष्टमीचे मध्यरात्री उत्तराषाढा नक्षत्र असता तो जन्मला.

७) मुळात अनेक असणाऱ्या वस्तु दर्शविण्यास अ. व. चा उपयोग होतो. १) पिंगला सीसकेसा । (कथा पृ. ४७) डोक्याचे पिंगट केस २) छज्जंति तीए अलया। (धर्मो पृ. १३) तिचे केस शोभतात.

---

*१ कधीं ए. व. चा उपयोग आढळतो : तेणं कालेणं २ पंचाले जणवए कंपिल्लपुरे नयरे । (नामा पृ. १०८) पुंडो नाम जणवओ। (समरा पृ. २२५) देशनात्तापुढे देश, विषय इत्यादी शब्द असल्यास ए. व. वापरले जाते. उदा. १) अत्थि इह भरहखित्ते कोसलदेसम्मि कोसला नयरी। (नल पृ. १) २) अत्थि अवंतीविसए उज्जेणी पुरवरी रम्मा। (सुपास. ५२९)*

*२ कधी ए. व. चा उपयोग आढळतो. : रेहइ ताराणुगओ सरए संपुन्न चंदो व्व। (धर्मो पृ. २७) ससि व्व सरयम्मि । (धर्मो पृ. २७)*

*३ पुढे नक्षत्र शब्द असता ए. व. चा वापर आढळतो. : फग्गुणबहलेक्कारसीए उत्तरासाढानक्खत्ते ... भगवओ केवलनाणं समुप्पण्णं । (महा पृ. ९ अ)*

८) सामान्य विधानातही अ. व. चा उपयोग[१] आढळतो :

१) बीया ण अग्गिदड्ढाण पुणरवि अंकुरूप्पत्ती न भवइ । (ओव सू. १५५, पृ. ९३) दग्ध बीजांतून पुनरपि अंकुर उत्पत्ति होत नाही २) सव्वे अथिरा संसारे पयत्था। (चउ पृ. २२) संसारातील सर्व पदार्थ अस्थिर आहेत.

४) प्रथम, द्वितीय व तृतीय पुरूषात आदरार्थी अ. व. चा उपयोग आढळतो.

अ) प्र. पु. : एएण कारणेण एएहि न बंदिया अम्हे। (कुम्मा. १८४) या कारणाने त्यांनी आम्हाला (मला) वंदन केले नाही.

आ) द्वि. पु. : १) एवं ताय वियाणह। (उत्त. १४.२३) बाबा, तुम्ही (तू) असे जाणा. २) तुम्हाणं चेव पयपसाएणं। (अगड. १०८) तुमच्या (तुझ्या) पायांच्या प्रसादाने.

इ) तृ. पु. : १) अन्नदियहम्मि सबहुमाणं वाहराविया आयरिया। धर्मो. पृ. ४३) दुसरे दिवशी बहुमानपूर्वक आचार्यांना (ला) बोलविले २) आदिसं तु गुरुणो । (धर्मो पृ. १७१) गुरूंनी (0ने) आदेश द्यावा.

५) विशेषनामांच्या अ. व. ने वंश गोत्र यांचा निर्देश होतो.

तिहुयण-भुवणस्सुवरिं इक्खागूणं न होइ कह वंसो। (महा. २.१३०) इक्ष्वाकूंचा वंश। त्रिभुवनात कसा बरे वर असणार नाही?

६) संस्कृतमध्ये जे शब्द[२] नेहमी अ. व. त वापरले जातात. ते अर्धमागधीतही प्रायः अ. व. त आढळतात[३]. उदा. १) किं धरिएहिं इण्हिं इमेहिं पाणेहिं। (सुर. १४.३) आता प्राण धारण करून काय उपयोग? २) कुमार-उत्तमंगे अक्खए पक्खिवइ। (बंभ. पृ. ४५) कुमाराच्या मस्तकावर अक्षता फेकल्या.

७) अ. व. च्या पुढील वैशिष्टपूर्ण उपयोगात ए. व. ऐवजी अ. व. चा उपयोग आढळतो. - भणइ सुमित्तो निसासु वणमालं (पउम. १२.१९) रात्री सुमित्र वणमालेला म्हणाला.

---

१ *घाडगे, पृ. १८४*

२ *उदा. दाराः, सिकताः, अक्षताः, आपः, प्राणाः, वर्षाः, इत्यादी*

३ *क्वचित् ए. व. चा उपयोग - आउ। (सूय १.१.१.१८) पाणी*

**प्रकरण २४**

# विभक्तींचे उपयोग

## ४०५ विभक्तींचे उपयोग

संस्कृतमधील आठ[१] विभक्तीपैकी[२] चतुर्थी सोडून इतर विभक्तीं अर्धमागधीत आहेतच. त्यांचे उपयोग प्रायः संस्कृतमधील उपयोगाप्रमाणेच होतात हे उपयोग पुढे दिले आहेत.

## ४०६ प्रथमा विभक्तींचे[३] उपयोग

१) कर्तरि प्रयोगात कर्तृपद प्रथमेत असते.

१) को चित्तेइ मउरं गइं च को कुणइ रायहंसाणं । (अगड ७५) मोराला कोण रंगवितो व राजहंसाला गति कोण देतो? २) रक्खिंसु मराहिवा। (महा पृ. ४७ ब) राजांनी रक्षण केले. ३) करिही रज्जं महनंदणो । (संपइ. १.६७) माझा मुलगा राज्य करील. (४) जाणंतु ता इमे समणा। (दस पृ. ५.२.३४) हे श्रमण (असे) जाणू देत. ५) तया तुमं साहं गेण्हेज्जासि । (चउ. पृ. १७) तेव्हा तू फांदी पकडावीस

अ) कर्तृपदाशी 'नाम' ने जोडेलेला शब्द प्रथमेत असतो.

१) बारवई नामं नयरी होत्था । (अंत ५) बारवई नावाची नगरी होती २)

---

१) *येथे कर्ता कर्म च करणं सम्प्रदान तथैव च । अपादानाधिकरणमित्याहुः कारकाणि षट् ।। हे सहा कारक संबंध आहेत. अर्धमागधींत यातील चतुथीचे (सम्प्रदान) कार्य षष्ठीने केले जाते.*

२) *अर्धमागधीत चतुर्थी ए. व. ची जी काही रूपे आढळतात. त्यांचाही कधी कधी उपयोग केलेला आढळतो. पण प्रायः चतुर्थी विभक्तीचे कार्य षष्ठी विभक्तीकडूनच करवून घेतले जाते.*

३) *प्रथमेने लिंगाचाही बोध होतो. उदा. धम्मो, सुहं, जीवदया इत्यादी*

मियग्गामे नामं नयरे होत्था । (विवाग पृ. २) मियग्गाम नावाचे नगर होते.

आ) कर्त्याशी (कर्तृपद उक्त वा अनुक्त असेल ) एक विभक्तीक असणारे शब्द प्रथमेत असतात (कर्तृपद उक्त) : तुह पिया अहं निसहो। (नल पृ. २७)मी तुझा बाप निसह (कर्तृपद अनुक्त) : एगागी गच्छइ गिहाओ । (सुपास ६४१) (तो) एकटा घरांतून गेला.

इ) होणे, असणे, वाढणे, दिसणे इत्यादी अकर्मक क्रियापदांच्या कर्त्यांची पूरके – नामे वा विशेषणे – प्रथमेत असतात.

(नामे) : १) अणाहोमि महाराय नाहो मज्झ न विज्जई । (उत्त २०९) महाराज, मी अनाथ आहे, मला नाश नाही २) तएणं से उदायणे

कुमारे राया जाए । (विवाग. पृ. ३४) मग तो उदायण कुमार राजा झाला. (विशेषणे) : १) जाओ निरामओ हं । (सुपास ५७५) मी निरोगी झालो २) तुमं महप्पभावो लक्खिज्जसि (वसु पृ. ३४८) तू महाप्रभावी दिसतोस ३) तुज्झ विरहे नरनारी संकुलं इमं नयरं अडविसमाणं .. पडिहाइ । (पाइ पृ. ४) तुझ्या विरहांत, स्त्रीपुरूषांनी भरलेले हे नगर अरण्याप्रमाणे भासते.

२) कर्मणि प्रयोगात उक्त कर्म प्रथमा विभक्तीत असते

क) अ) (क्रियापदाचा उपयोग असता) १) सुव्वंनि दारणा सड्डा (उत्त ९.७) दारूण शब्द ऐकले जातात. २) दिज्जंति तंबोलाइं । (पउ पृ. २६) तांबूल दिले जातात.

आ) (क. भू. धा. वि. चा उपयोग असता) : १) दिट्ठो सो तेहि एगागी। (अगड ३०६) त्यांनी त्याला एकटा पाहिले २) सा.. उक्का उरगेण। (अगड. २६६) तिला साप चावला.)

इ) (वि. क. धा. वि. चा उपयोग असता) : १) न हिंसियव्वा पाणिणो न भासियव्वं अलियं। (जिन पृ. ६९) प्राण्यांची हिंसा करू नये, खोटे बोलू नये.

२) धारियव्वाणि पंचमहव्वयाणि। (जिन पृ. ७१) पंच महाव्रते पाळावीत

ख) द्विकर्मक धातूंच्या कर्मणि प्रयोगात व्यक्तिवाचक कर्म प्रथमेत येते : १) कुमरेण मुणी इमं पुट्ठोढो (सुर १५.११२) कुमाराने मुनीला हे विचारले २) गुरूणा सो इमं भणिओ । (धर्मो पृ. १०७) गुरूने त्याला म्हटले.

ग) म्हणणे, करणे, समजणे इत्यादी सकर्मक क्रियापदांच्या कर्मांच्या

पूरकाची–नाम वा विशेषण कर्मणि प्रयोगात प्रथमा असते.

(नाम) : १) संसारो अण्णवो वुत्तो। (उत्र २३.७३) संसाराला सागर म्हटले आहे. २) तं मित्तं कायव्वं। (वज्जा ६८) त्याला मित्र करावे. (विशेषण) : १) से हु चाइ त्ति वुच्चइ । (दस २.३) त्याला त्यागी म्हटले जाते. (२) बहवे इमे असाहू लोए वुच्चंति साहुणो । (दस. ७..४८) जगातील हे पुष्कळ असाधु साधु म्हटले जातात.

३) कर्मापुढे 'इति' शब्दाचा उपयोग केलेला असल्यास ते प्रायः प्रथमेत ठेवतात.

१) सरीरमाहु नाव त्रि । (उत्त. २.३.७३) देहाला नाव म्हणतात २) कडं कडे त्ति भासेज्जा अकडं नो कडे त्ति य । (उत्त १.११) केले असल्यास केले म्हणावे, केले नसल्यास नाही केले असे म्हणावे

४) वस्तूंची यादी देतानाही प्रायः प्रथमेचा उपयोग आढळतो.

सासे कासे जरे दाहे । (विवाग. पृ ७) दमा, खोकला, ज्वर, दाह (इत्यादी रोग)

५) अहो, धी, धिद्धी, धिरत्थु आणि हद्धी या अव्ययांचा उपयोग असता कधी कधी प्रथमेचा उपयोग केलेला आढळतो.

अ) अहो : १) अहो दारूणो संसारवासो । (समरा पृ. ४१) संसारवास दारूण आहे । २) अहो असारया संसारस्स । (समरा पृ. ७२५) संसाराची असारता ।

आ) धी : १) धी संसारो असारो । (महा. पृ. ६८ ब) धिक् संसार असार (आहे)

२) धी संसारो। (समरा पृ. ७५८) संसाराचा धिक्कार असो ।

इ) धिद्धी : धिद्धी धणलवमित्तात्थिणो इमे सव्वे (सिरि १०४) फक्त लवमात्र धनाची इच्छा असणाऱ्या या सर्वांचा धिक्कार !

उ) धिरत्थु : धिरत्थु एयस्स देवसद्दो । (समरा पृ. ३२५) याच्या राजा देव या पदवी (शब्दा) चा धिक्कार असो !

ऊ) हद्धी : हद्धी धिरत्थु पावो । (जिन पृ. २०) (या) पाप्याचा धिक्कार असो.

६) कधी द्वितीये ऐवजी प्रथमेचा उपयोग केलेला[१] आढळतो.

१) चइऊण रायवरलच्छी। (पउम ४.८९) सुंदर राजलक्ष्मी टाकून २) कालेणं कुमारे अहं जीवमाणं पासिज्जा । (निरया पृ. ५)

'काल' कुमाराला मी जिवंत पाहीन? ३) देवउले बोलिअण सा रयणी। अगड २८६) देवळात ती रात्र घालवून.

७) खालील ठिकाणी षष्ठीऐवजी प्रथमेचा उपयोग[२] आढळतो .

समाइ पेहाइ परिव्ययंतो सिया मणो निस्सरई बहिद्धा। (दस ३.४) समदृष्टीने (पहात) हिंडणाऱ्या (भिक्षू) चे मनसुध्दा कदाचित् बाहेर जाईल.

### ४०७ द्वितीया विभक्तीचे उपयोग

१) कर्तरि प्रयोगांत सकर्मक[३] क्रियापदाचे उक्त कर्म द्वितीयेत असते.

१) निव्वाणं पाउणंति ते। (सूय १.११.२१) ते निर्वाण मिळवितात.

२) सुहय अहं निनद इयं वावाइस्मामि तुज्झ पच्चक्खं। (अगड ३१५) भल्या माणसा, तुझ्या देखत मी माझ्या प्रियकराला ठार करीन. ३) दंसेहि तं पएसं। (बंभ पृ. ५५) तो प्रदेश दाखव. ४) गिरं च दुट्ठंढ परिवज्जए सया। (दस

---

*१) डॉ. घाडग्यांच्या मते (पृ. १८६) अशा ठिकाणी प्रथमा नसून द्वितीयेच्या ए. व. च्या रूपांतील अन्त्य अनुस्वार लुप्त होऊन तो स्वर दीर्घ झालेला असतो. हेमचंद्राने (३.१३७) म्हटले आहे की, 'प्रथमाया आणि द्वितीया दृश्यते'। याच्या व्यत्ययाने द्वितीयेऐवजी प्रथमेचा उपयोग होतो, असे म्हणण्यासही हरकत नसावी.*

*२) अभ्यंकर दस. टीपा पृ. ८*

*३) अ) अर्धमागधीत काही अकर्मक क्रियापदे द्वितीयान्त कर्म घेताना आढळतात. १) पुहइं भमंताण। (सुपास ६४७) २) विहरइ वसुहं संवच्छरं धरिते (पउम ३.१३९)*

*आ ) संस्कृतमधील काही अकर्मक क्रियापदे सकर्मकाप्रमाणे वापरलेली आढळतात. रोएमि निग्गंथं पावयणं। (उवा. परि १२) मला निग्गंथ प्रवचन आवडते.*

७.५५) नेहमी दुष्ट वाणी टाळावी.

अ) सकर्मक क्रियापदाचे व का. धा. वि. धातुसाधित नाम, ल्यबन्त आणि तुमन्त यांच्या कर्माची ही द्वितीया विभक्ती असते.

(धातु नाम) : धम्मं आराहगा वयं। (सूय १.१.२.२०) आम्ही धर्माचे आराधक आहोत. (व. का. धा. वि.) : १) पुव्वदुक्कडाइं गरहंतेण। (नल पृ. १९) पूर्व दुष्कृत्यांची निंदा करणाऱ्याने २) जुत्ताजुत्तं अयाणमाणेही । (महा पृ. ५८ अ) युक्तायुक्त न कळणाऱ्या त्यांनी (ल्यबन्त) : १) पुत्तं ठवेत्तु रज्जे। (उत ९.२) पुत्राला राज्यावर ठेवून. २) धम्मं सोऊण । (उत्त १३.२) धर्म ऐकून (तुमन्त) : १) जुत्तं अणसणं काउं। (बंभ पृ. ३४) उपवास करणे योग्य आहे. २) तुब्भे समत्था उध्दत्तुं परमप्पाणमेव य। (उत्त २५.३९) दुसऱ्याचा व स्वतःचा उद्धार करण्यास तुम्ही समर्थ आहात.

आ) द्विकर्मक धातूंची दोन्ही कर्मे द्वितीयेत असतात.

१) जिणेमि रज्जं नलं। (नल पृ. ९) नल (व) राज्य जिंकीन २) तओ नमी रायरिसी देविंद इणमब्बवी । (उत्र ९.८) मग नमी राजर्षि देवेंद्राला हे म्हणाला ३) अन्नं पि देवं जाएमि। (समरा पृ. ६३९) राजाला मी आणखीही काही मागीन

इ) द्विकर्मक धातूंच्या कर्मणि प्रयोगांत व्यक्तिवाचक कर्म द्वितीयेंत असते.

१) मग्गेयव्वो देवो आहरणं। (सुपास ५१८) राजाजवळ अलंकार मागावास २) अहं तए अक्खाणयं पुच्छेयव्वा। (चउ पृ. ४१) तू मला आख्यानाबद्दल विचारावेस

ई) कधी त्याच क्रियापदाच्या नामाचा उपयोग करून ते द्वितीयेत ठेवले[१] जाते

(अकर्मक क्रियापद असता) : १) सकाममरणं मरई। (उत्त. ५.३९) सकाममरण मरतो २) पव्वज्जामि पव्वज्जं। (समरा पृ. १५३) संन्यास घेतो.

(सकर्मक क्रियापद असता) : १) वरसु वरं (महा पृ. १६३ ब) वर माग

२) धम्मज्झाणं झियायई। (उत्त. १८.४) धर्मध्यान करतो.

उ) कर्माशी एकविभत्रिक असणारे शब्द द्वितीयेत असतात. समणं भगवं

---

*१) म. लढाई लढतो, घेणे घेतो, देणे देतो, गाणे गातो इत्यादी*

महावीर तिक्खुत्तो वंदइ (निरया पृ. ६) श्रमण भगवान महावीराला तीनदा वंदन करतो.

ऊ) म्हणणे, करणे, समजणे मानणे इत्यादी सकर्मक धातूंच्या कर्मांची पूरके-नामे वा विशेषणे - द्वितीयेत असतात.

१) तं वयं बूम माहणं। (उत्त. २५.१९) त्याला आम्ही ब्राम्हण म्हणतो. २) गुरूरागग्गह गहिओ अलियं पि वियाणए सच्चं। (सुपास. ५१८) महा रागरूपी ग्रहाने पछाडलेला माणूस खोट्याला सुध्दा खरे मानतो.

ए) द्वितीयान्त कर्म 'इति' पूर्वी आल्यास ते प्रायः[१] प्रथमेत जाते. तर कधी ते द्वितीयेतही आढळते. रिध्दिमंतं ति आलवे। (दस ७.५३) श्रीमंत माणसाला पाहून (त्याला) श्रीमंत म्हणावे.

२) प्रयोजक कर्तरि रचनेत अकर्मक, गत्यर्थक, ज्ञानार्थक, भक्षणार्थक व तदर्थक धातूंचा उपयोग असतां मूळ क्रियेचा कर्ता द्वितीयेत ठेवला जातो.

१) तुह तणयं जीवावइ एसो। (सुपास ५५५) तुझ्या मुलाला हा जिवंत करील २) कोहो पीइं पणासेइ। (दस ८.३८) क्रोध प्रीतीचा नाश करतो. ३) अन्नं न गच्छावेज्जा । (दस.४) दुसऱ्याला जावयास लावू नये. ४) पाएइ नलो सलिलं तं तिसियं। (नल पृ. १३) त्या तृषित (दमयंती) ला नलाने पाणी पाजले)

अ) सकर्मक क्रियापदांच्या प्रयोजक कर्मणि रचनेत अ व्यक्तिवाचक कर्म द्वितीयेत ठेवलेले आढळते.

१) काराविओ पाणिग्गहणं कुमारो। (बंभ पृ. ४६) कुमाराला लग्न करावायास लावले. २) ते जिणवरेण सम्मं मुणि दिक्खं गाहाविया सव्वे ।( महा. २.७०) त्या सर्वांकडून जिनश्रेष्ठाने योग्य प्रकारे मुनिदीक्षा घेवविली.

---

१ *प्रथमा विभक्तीचे उपयोग पहा. 'इति' मागील कर्म प्रथमेत असणारी आणखी इतर उदाहरणे : १) तहेव काणं काणे त्ति पडंग पडंगे त्ति वा । वाहियं वावि रोगि त्ति तेणं चोरे त्ति नो वए ।। (दस. ७. १२) २) न लवे असाहुं साहुत्ति साहुं साहुत्ति आलवे। (दस ७.४८)*

३) गत्यर्थक क्रियापदांचे गंतव्य द्वितीयेत ठेवले[१] जाते.

१) मुणी खिप्पमुवेइ मोक्खं। (उत्त. ४.८) मुनी लवकर मोक्षाला जातो. २) जंति... नरयं घोरं। (पउम २.८९) घोर नरकाला जातात ३) गामं

पविट्ठो (बंभ पृ. ४५) तो गावात शिराला ४) एवं परं पसिद्धिं पत्तो (सुपास ५७६) अशा प्रकारे तो खूप प्रसिद्ध झाला

४) स्थल[२], काल यांची मर्यादा दर्शविण्यास तद्वाचक शब्दांची द्वितीया वापरली जाते.

अ) स्थळ : १) पडपडणाओ पंचवीस जोयणाइं आगओ रहो । (नल पृ. ३२) वस्त्र पडल्यापासून रथ पंचवीस योजने आला आहे. २) तओ खणिऊण चत्तारि अंगुलाणि धरणिं । (धर्मो पृ. ११८) मग चार अंगुले धरणी खणून.

आ) काळ : १) वीसमिऊण मुहुत्तं । (समरा पृ. ९) मुहूर्तभर विश्राती घेऊन. २) चिर कालं भोगे भुंजिऊण । (महा पृ. २३ अ) बराच काळ भोग भोगून ३) ठिओ सत्तरत्तं। (नल पृ. १९) सात रात्री राहिला.

५) काही शब्दयोगी अव्यये व इतर काही अव्यये यांना द्वितीयेची अपेक्षा असते.

अ) शब्दयोगी अव्यये : १) अंतरेण : सिरच्छेयं अंतरेण । (समरा पृ.

---

*१) अर्धमागधीत गंतव्याची कित्येकदा सप्तमी आढळते. : १) गया सरज्जेसु सेसा। (बंभ पृ. ४०) २) दुग्गे पविसइ। (बंभ पृ. ५४) (३) अरण्णपरिसरे गच्छंतेसुं तावसकुमारेसु । (बंध पृ. ४८) ४) अहवा निप्पुन्नाणं न घरे चिंतामणी एइ। (महा पृ. २३३ ब)*

*२) कधी सप्तम्यर्थी काल दर्शविण्यास द्वितीयेचा उपयोग केलेला आढळतो. १) अज्ज कसिणट्ठमीए रत्तिं इच्छामि साहिउं मंतं । ( जिन पृ. १९) आज कृष्णाष्टमीचे रात्री मंत्र साधण्याची माझी इच्छा आहे. २) सो रत्तिं आगओ। (पाकमा पृ. ४२) तो रात्री आला. ३) रत्तिं पज्जलियाण । (राय पृ. ८०) रात्रीं प्रज्वलित केलेल्यांचे (रत्तिं) इति सप्तम्यर्थे द्वितीया प्राकृतत्वात्। मलयगिरी (राय) पृ. ८३*

२७०) शिरश्छेदा विना २) मोत्तूण १) सय. मणुभवणं मोत्तुं कम्माण ण णिज्जरणमत्थि । (महा. पृ. १४५ अ) स्वतः अनुभवल्याशिवाय कर्मक्षय होत नाही. २) मुत्तूणं खुद्दजणं । (सुपास ५४३) क्षुद्र जन सोडून ३) पडुच्च (उद्देशून) : सूरिं पडुच्च । संपइ (२.१२) सूरीला उद्देशून ४) पइ (कडे) १) तं पइ जंपइ जणणी । (सिरि. ३५०) आइ त्याला म्हणाली. २) जवेण तं पइ पहाविओ खुज्जो। (नल पृ. २८) खुजा वेगाने त्याच्याकडे धावला. ५) विणा नलं विणा। (नल पृ. १५) नला विना ६) आ (पर्यंत) : १) आयन्नं आकड्ढिय कोयंऊं (महा पृ. ५७ अ) धनुष्य आकर्ण ओढून २) तंच आकंठं पीयं अणेण । (महा पृ. ३३१ ब) आणि तो ते (पाणी) आकंठ प्याला.

आ) इतर अव्ययें :

१) जाव (पर्यंत) : १) अओ सूरूग्गमं जाव रक्खामि एयं। ( नल पृ. १४) म्हणून सूर्योदयापर्यंत मी हिचे रक्षण करीन २) जाव य ससिसूरगहचक्कं। (पउम १.१७) आणि जोपर्यंत सूर्य, चंद्र, ग्रहगण (आहे)

२) धिद्धी : १) एगे भणंति – धिद्धी रायाणं। (सिरि. १४७) काही म्हणाले राजाचा धिक्कार असो २) धिद्धी ममं गयविवेअं। (सिरि. ३२३) विवेक गेलेल्या माझा धिक्कार असो ।

३) धिरत्थु : धिरत्थु मम जीवियं। (उत्त. २२.२९) माझ्या जीविताचा धिक्कार असो ।

६) क्वचित् षष्ठीऐवजी[१] द्वितीयेचा उपयोग आढळतो.

तं कूडागार सालं अंतो (राय पृ. ११८) त्या कूटागार झालेच्या आत.

### ४०८ तृतीया विभक्तीचे उपयोग

१) सकर्मक क्रियापदांच्या कर्मणि प्रयोगात व भावे प्रयोगात कर्तृपद तृतीयेत जाते.

अ) १) अहं पराजिओ मोहमहामल्लेणं। (महा पृ. १५ ब) मोहरूपी महामल्लाने माझा पराभव केला. २) सरसा वि दुमा दावाणलेण उज्झंति । (वज्जा

---

*१) द्वितीया षष्ठ्यर्थि (मलमगिरी (राय), पृ. १२४*

६३) ओले वृक्ष सुद्धा दावाग्नीकडून जाळले जातात. ३) मुणिणा वि अप्पमाओ कायव्वो । (धर्मो पृ. २२६) मुनीने सुद्धा प्रमाद करू नये.

आ) १) राइणा भणियं। (समरा पृ. ३०) राजाने म्हटले २) कुलवइणा चिंतियं। (समरा पृ. ३२) कुलपतीने विचार केला.

इ) १) व तुमए संतप्पियव्वं। (समरा पृ. १०१) तू संताप करू नयेस २) न पहरियव्वं तुब्भेहिं। (समरा पृ. ५३८) तुम्ही प्रहार करू नये।

अ) सकर्मक क्रियापदांच्या कर्तरि प्रयोजक रचनेत मूळ कर्ता तृतीयेत ठेवला जातो.

१) उदायणे राया : बहस्सइ दतं पुरोहियं पुरिसेहिं गिण्हावेइ । (विवाग पृ. ३५) उदायण राजा बहस्सइदतत्तं पुरोहिताला सेवकांकडून पकडवितो २) सिरिदामे

राया.. नंदिसेणं कुमारं पुरिसेहिं गिण्हावेइ । (विभाग पृ. ३९) सिरि दाम राजा नंदिसेण कुमाराला सेवकांकडून पकडवितो.

टीप : यावेळी अर्धमागधीत कधी मूळ कर्ता द्वितीयेत ठेवलेलाही आढळतो. (दस. ४ पहा) उदा. : १) नो वि अनंन वयावए। (एस ६.१२) २) नो वि गिण्हावए परं। (दस ६.१५) ३) सा विमलं वंदावइ ताण पायपउमं । (सुपास ६०४) तिने विमलाकडून त्यांचे पदकमलाला वंदन करविले.

२) क्रियेचे करण साधन-वाचक पद तृतीयेत ठेवतात.

१) जालेण मच्छए गेण्हइ । (कथा पृ. १०४) जाळ्याने मासे पकडतो २) नो तेसिमारभे दंडं मणसा वयस कायसाठ चेव । (उत्त. ८.१०) मनाने, वाचेने आणि देहाने त्यांची हिंसा करू नये.

३) त्याच क्रियापदाच्या नामाचीही तृतीया ठेवलेली आढळते.

१) निब्भच्छणाहीं निब्भच्छेइ । (निरया पृ. १४) निर्भर्त्सना करतो. २) केण वा मरणेण मरमाणे । (अंत ७४) आणि कोणत्या मरणाने मरणारा ३) जुज्झंति न अहमजुज्झेणं । (धर्मो पृ. १९६) अधर्मयुध्दाने युध्द करीत नाहीत.

४) सहतां, साहचर्य अभिप्रेत असतां तृतीयेचा उपयोग केला जातो.

१) चलिओ चउरंगबलेण (चउ पृ. २५) चतुर्विध सैन्यासह निघाला.

२) से कणिए राया... सव्वबलेणं .. णिग्गच्छइ। (ओव पृ. ४८) तो कूणिय राजा सर्व सैन्यासह बाहेर पडला.

५) बरोबर असणारी सामग्री दाखविणारे पद तृतीयेत आढळते.

१) एगरहेणं कुमरो संचलिओ निमपुराहत्तं। (अगड १९७) एका रथासह राजपुत्र आपल्या नगराकडे चालला २) निग्गओ सव्वसामग्गीए जिणयत्तो। (जिन पृ. ३७) सर्व सामग्रीसह जिनदतत्त बाहेर पडला.

६) सह, समं सध्दिं या सहता दाखविणाऱ्या अव्ययांना तृतीयेची अपेक्षा असते.

अ) सह : कीलए सह इत्थिहिं। (उत्त. १९.३) स्त्रियांसह खेळतो (रमतो.

आ) समं : नाहं परपुरिसेण समं वच्चामि । (नल पृ. १७) मी परपुरूषाबरोबर जात नाही.

इ) सध्दिं : १) भुंजसु भोए मए सध्दिं । (सुपास ४८७) माझ्याबरोबर (सह) भोग भोग २) बंधुमईए भारियाए सध्दिं। (अरी. पृ. २०) बंधुमई भार्ये सह.

७) क्रियेची रीत[१], पद्धत प्रकार दर्शविणारे पद तृतीयेत असते.

१) मोणेण ठिओ सिट्ठी। (सुपास ५१२) श्रेष्ठी मौन धरून राहिला.

२) विणएण पविसित्ता। (दस. ५.१.८८) विनयाने प्रवेश करून ३) भत्तीए गायइ। (कथा पृ. ४७) भक्तीने गातो.

८) क्रियेचे कारण, हेतु प्रयोजन दर्शक शब्द तृतीयेत असतो.

१) नाणेण मोक्खो । वसु पृ. ३६०) ज्ञानाने मोक्ष २) होहिंति गुरूभत्तीए मणोरहसिद्धीओ। (महा पृ. ८६ पृ. अ) गुरूभक्तीने मनोरथ पूर्ण होतात. ३) लोभेण अन्नो गच्छिहही । (अरी. पृ. ११) लोभामुळे दुसरा जाईल.

अ) प्रत्यक्ष हेतु, कारण, निमित्त इत्यादी शब्दांचा उपयोग असतां, द्वितीया, तृतीया, पंचमी वा सप्तमी वापरली जाते.

---

१ *तृतीयेच्या अशा उपयोगांतून पुढीलप्रकारचे वाक्यांश : सुहं सुहेणं मज्झं मज्झेणं, इत्यादी याबद्दल मलयगिरी (राय पृ. ४३) म्हणतो : गृहं गृहेणं मध्यं मध्येन परंपदेन सुखंसुखेन इत्यादयः शब्दाः चिरंतनव्याकरणे षु सुसाधवः प्रतिपादिता इति नायं अपप्रयोगः।*

१) द्वितीया : १) दुलहं माणुसजम्मं मा हारसु तुच्छ भोय सुहहेउं। (पाकमा पृ. ३५) तुच्छ भोगांच्या सुख कारणासाठी दुर्लभ मनुष्य जन्म गमावू नकोस. २) नो वत्थ स्स हेउं धम्मं आइक्खेज्जा। (सूय २.१.१५) वस्त्राच्या हेतूने धर्म सांगू नये.

२) तृतीया[१] : १) सामिणि मणे विसण्णा अज्जं तुमं हेउणा केण। (कुम्मा ५४) स्वामिनी, आज तू कोणत्या कारणाने मनांत विषण्ण झाली आहेस? २) जीयं पि यहु परहिकारणेण धारिंति सप्पुरिसा । (महा पृ. ७७ ब) सत्पुरूष हे जीवित सुध्दा परहिता कारणाने धारण करतात.

३) पंचमी : १) जइ मज्झ कारणा एए हम्मंति सुबहू जिया । (उत्त. २२.१९) जर माझ्यासाठी हे पुष्कळ जीव ठार केले जाणार असतील. २) जो तं जीवियकारणा वंतं इच्छसि आवाउं । (उत्त. २२.४२) जो तू जीवितासाठी ओकलेले चाटण्याची (श-पिण्याची) इच्छा करतोस.

४) सप्तमी : १) एयस्स कारणे चेव पयावइणा निम्मिया एसा। (कथा पृ. ४) याच्यासाठीच ही प्रजापतीने निर्माण केली आहे. २) जइ अवच्चस्स कारणे एस मम भत्ता अन्न परिणिस्सइ। ( महा पृ. ३०० अ) जर अपत्यासाठी हा माझा पति अन्य स्त्रीशी विवाह करील.

९) दिशावाचक शब्द स्थितीदर्शक असता तो तृतीयेत[२] ठेवतात. (तसेच इतर शब्दांच्या[३] बाबतीतही)

१) एएणं मग्गेणं अत्थि महंतं अईव कंतारं। (अगड. २०३) या मार्गावर फार मोठे अरण्य लागते. २) पच्छत्थिमेणं वरूणे महाराजा। (निरया पृ. ४२) पश्चिमेला वरूण महाराजा.

---

*१) म. - काय कारणाने गेला? कोणत्या हेतूने आला होता? इत्यादी*

*२) आणखी उदाहरण : इह भारहे वासे वेयड्ढदाहिणेणं लवणस्स उत्तरेणं गंगानईए य पच्चत्थिमेणं सिंधुनईए पुरत्थिमेणं... चक्कपुरं नाम नयरं। (कथा पृ. ११)*

*३) म. : त्या वाटेने कांटे फार आहेत. इत्यादी.*

१०) गेलेला काळ (lapse of time)[१] दर्शविताना तृतीयेचा उपयोग होतो. १) अचिरेणेव कालेण दुक्खस्संतमुवागया। (उत्र १४.५२) थोड्याच काळाने त्यांच्या दुःखाचा शेवट झाला २) पंचहिं दिणेहिं लंघिऊण जलनिहिं। (समरा पृ. ३६७) पांच दिवसांनी समुद्र ओलांडून ३) हत्थी दम्मइ संवच्छरेण मासेण दम्मइ तुरंगो । महिला पुण किर पुरिसं दमेइ इक्केण दिवसेणं।। धूर्ता ३.६७) एका वर्षात हत्तीचे दमन होते, महिन्यांत घोड्याचे, पण स्त्री मात्र एकाच दिवसांत पुरूषाचे दमन करते.

११) कधी अंतर दर्शविण्यास तृतीयेचा उपयोग केला जातो.

१) पुरी नक्खसिला अत्थि इओ दोहिं जोयणसएहिं। (नल पृ. ७) येथून दोनशे योजने (अंतरावर) तक्षशिला (नावाची) नगरी आहे. २) अत्थि इओ दसहिं जोयणेहिं । (समरा पृ. ३६३) येथून दहा योजने (अंतरावर) आहे.

१२) नक्षत्र निर्दिष्ट काल दर्शविताना नक्षत्रवाचक शब्द[२] तृतीयेत निक्खमई उ चित्ताहिं। (उत्र २२.२३) चित्रा नक्षत्रांत संन्यास घेतला.

१३) विशेष्याचे वैशिष्ट्ये दाखविणारा शब्द तृतीयेत ठेवला जातो.

१) आसे जवेण पवरे। (उत्त ११.१६) वेगाने उत्कृष्ट अश्व २) सक्को माहणरूवेण इमं वयणमब्बवी । (उत्त ९.६) ब्राह्मणरूपाने (येऊन) इंद्र हे वचन बोलला ३) ते चेव देवा सवरवेज्जरूवेण आगया।

(पाकमा पृ. ७५) तेच देव शबर वैद्यरूपाने आले.

१४) विशिष्ट स्थितिदर्शक शब्द तृतीयेत ठेवलेला आढळतो.

१) पुत्तत्तेण उववन्नो । (महा. पृ. २३ अ) पुत्र म्हणून जन्मला २) ठिया अणंसणेणं। (सुपास. १२३) उपवास करून राहिले ३) काउस्सग्गेण ठिओ। (सुपास ५१२) कायोत्सर्ग (आसन) करून राहिला.

१५) एखादी विशिष्ट स्थिति दर्शविणारे लक्षण तृतीयेत ठेवतात.

१) न वि. मुंडिएण समणो न ओंकारेण बंभणो। न मुणी रण्णवासेणं

---

*१) म. : पुष्कळ दिवसांनी भेटला, फार वर्षांनी आला, थोड्या वेळाने पळाला इत्यादी*

*२) येथे सप्तमीऐवजी तृतीया आहे, असेही म्हणता येईल.*

कुसचीरेण तावसो ।। (उत्त. २५.३१) मुंडनाने श्रमण होत नाही. ओंकाराने ब्राह्मण होत नाही. अरण्यवासाने मुनी नाही. कुश– (तृणाच्या वस्त्राने तापस होत नाही. २) नाणेण य मुणी होइ तवेणं होइ तावसो । (उत्त २५.३२) ज्ञानाने मुनि व तपाने तापस होतो.

१६) किं (काय उपयोग?) कज्ज, अट्ठ (अर्थ) गुण पज्जत्र (पर्याप्त) या शब्दांना तृतीयेची अपेक्षा असते.

१) किं : १) जइ चंदो किं बहुतारएहिं। (वज्जा २६६) चंद्र असेल तर पुष्कळ तारकांचा काय उपयोग? २) हत्थत्थे कंकणे किंदप्पणेणं। (पाइ पृ. ८९) हातच्या कंकणाला आरसा कशाला?

२) कज्ज (उपयोग आहे, काय उपयोग?) १) एएण मम कज्जं। (चउ पृ. २०) मला याचा उपयोग आहे.

२) न कज्जं मज्झ भिक्खेणं । (उत्तं २५.४०) मला भिक्षेचा उपयोग नाही.

३) किं रज्जेणं कज्जं। (सुपास ५०४) राज्याचा काय उपयोग?

३) अट्ठ (काम असणे, उपयोग असणे) : १) तेहिं नो अट्ठे । एएणं अट्ठो। (भग पृ. ३४) त्यांचे काम नाही, याचे काम आहे. २) अट्ठो भंते भोगेहिं। (नायास पृ. २१८) महाराज, भोगांचे काय (उपयोग) आहे?

४) गुण : १) को गुणो रज्जेणं। (समरा पृ. ५८१) राज्याचा काय उपयोग?

२) को गुणो तेण। (सुपास ६३०) त्याचा काय उपयोग ?

५) पज्जत्त (पुरे) : १) तुह सेवाए मज्झ पज्जत्तं। (महा पृ. १९६ ब) तुझी सेवा मला पुरे। २) दोहिं चिमय पज्जत्तं बहुएहि वि किं गुणेहि सुयणस्स। (वज्जा ४२) दोनच (गुण) पुरे आहेत. पुष्कळ गुणांचा सज्जनाला काय उपयोग?

१७) विणा, अलं, कयं, धी, धिरत्थु, अलाहि, नन्नत्थ (विना, सोडून) या अव्ययांना तृतीयेची अपेक्षा असते.

१) विणा : १) भावेण विणा दाणं न हु सिद्धि साहणं होइ। (सिरि १९) भावाविना दान सिद्धीचे साधन होत नाही. २) मेहेण विणा वुट्ठी न होइ। (पउम ४.२६) मेघाविना वृष्टि होत नाही.

२) अलं : १) अलं विसयसुहेहिं। (समरा पृ. ८४) विषय सुखे पुरे !

२) अलं अईयवत्थुचिंतणेणं। (समरा पृ. २१९) गत गोष्टींची चिंता पुरे !

३) कयं : **कयं विगप्पेहिं**। (महा पृ. १९७ ब) विकल्प पुरे !

४) धी : १) **धी इमिणा जम्मेणं** । (समरा पृ. १९०) या जन्माचा धिक्कार असो!

२) **धी मज्झजीविएण** । (सुर २.४९) माझ्या जीविताचा धिक्कार !

५) धिरत्थु : १) **धिरत्थु तो अम्ह जीएणं।** (पउम ३३.९६) आमच्या जाविताचा धिक्कार असो ! २) **धिरत्थु मे जीविएणं** । (कथा पृ. ८५) माझ्या जीविताचा धिक्कार असो !

६) अलाहि : १) **सोगेण** । (महा पृ. २९४ अ) शोक पुरे ! २) **अलाहि सेसोवएहिं**। (महा पृ. २३९ अ) बाकीचे उपाय पुरे !

७) नन्नत्थ : १) नन्नत्थ चउहिं वाहणेहिं। (उवा परि २१) चार वाहने सोडून २) **नन्नत्थ दिव्वेणं उवाएणं।** (नायासं पृ. १५) दिव्य (दैवी) उपाय सोडून.

१८) खालील (व तदर्थक) शब्दांना तृतीयेची अपेक्षा असते.

१) उत्कृष्ट : १) **रूवेण य जोव्वणेण य लावण्णेण य उक्किट्ठा।** (निरया पृ. ५.५) रूपाने, यौवनाने व लावण्याने उत्कृष्ट

२) हीन : १) **हीणे कंतीए ।** (नायास पृ. १३३) कांतिहीन २) करूणाए परिहीणो। (सुपास ५००) करूणारहित

३) ऊन : १) **पंच-दिवसेहिं ऊणं।** (महा पृ. २५० अ) पाच दिवसांनी कमी

४) सम : १) **मे कणगेण सरिसो वण्णो होउ।** (पाकमा पृ. ४१) माझा सोन्यासारख्या वर्ण होऊ दे. २) **जइ वि समो होइ भरहनाहेण।** (जिन पृ. २५) जरी भरतनाथा सारखा असला.

५) युक्त : १) **कम्मुणा तेण संजुत्तो।** (उत्त १८.१७) त्या कर्माने युक्त

३) **इत्थी कवडेण जुया।** (नाण ८.८०) कपटाने युक्त स्त्री ४) विणएण संपन्ना। (सिरि ६१) विनयाने संपन्न.

६) अंकित : **मुद्दाए अंकिओ ।** मुद्रांकित

७) सहित : १) **नियचेडीहि सहिया।** (जिन पृ. २६) आपल्या दासीसहित

२) **नियभज्जाहिं समेओ।** (सुमास ५५५) आपल्या भार्यांनी सहित

८) अधिक : **जो चेव बलेण अहिओ हवइ ।** (चउ पृ. ३६) जो बलाने

अधिक असतो.

९) रहित : १) **धणेण रहिओ।** (पउम ३३.२३) धनरहित २) **धम्माधम्मेण वज्जिया पुहई।** (पउम ३.११२) पृथ्वी धर्माधर्मरहित होती.

१९) खालील अर्थाच्या क्रियापदांना तृतीयेची अपेक्षा असते.

१) उपरम[1] : **कोडीहिं वि न उवरमइ मणोरहो।** (अरी पृ. ११) कोटींनी सुद्ध मनोरथ थांबत नाही.

२) आहुति देणे : **कयरेण होमेण हुणासि।** (उत्र १२.४३) कोणत्या होमाने आहुति देतोस?

३) निमंत्रण देणे : **अद्धासणेण उवनिमंतेइ।** (नायासं पृ. १४) अर्धासनाने (अर्धासन देऊन) निमंत्रिले

४) खाणे[2] : **दहिणा भुंजाहि।** (पाकमा पृ. ४८) दही खा

५) शपथ घेणे : **बंभणसच्चेण सावेऊण पुच्छइ।** (वसु पृ. ३२०) ब्राह्मण सत्याने शपथ घालून विचारतो.

२०) कधी द्वितीयेऐवजी तृतीयेचा उपयोग केलेला[3] आढळतो. **महया गंधद्धणिं मुंचंता ।** (राय पृ. १२) पुष्कळ वास सोडणारे)

२१) कधी तुलनेत पंचम्यर्थी तृतीया वापरली जाते.

१) **गारत्थेहि य सव्वेहिं साहवो संजमुत्तरा।** (उत्र ५.२०) सर्व गृहवासी जनांपेक्षा साधूंचा संयम अधिक चांगला असतो. २) **रण्णो तुब्भे पाणेहिं पिययरा असि।** (वसु पृ. २७०) राजाला तुम्ही प्राणपेक्षाही प्रिय होता.

अ) इतरत्रही पंचम्यर्थी[4] तृतीयेचा उपयोग केलेला आढळतो.

१) **जाहे तेहीं न भीओ[5]।** (जेव्हा त्यांना भ्याला नाही) २) **तव नियमेहि**

---

१) *एतदर्थक धातु प्रायः पंचमी घेतात.*

२) *असा उपयोग विरळ आहे.*

३) *महया इति प्राकृतत्वात् द्वितीयार्थे तृतीया, महतीं इत्यर्थः। मलयगिरी (राय पृ. १६)*

४) *पंचम्यास्तृतीया च। हेम ३.१३६*

५) *याकोबा Erza, पृ. ६०*

**भट्ठे।** (उत्त २०.४१) तप–नियम यापासून भ्रष्ट ३) **णिव्विण्णो जम्मणमरणेहिं।** (कथा पृ. १२२) जन्म मरणाने निर्वेद प्राप्त झालेला. ४) **झरेइ रोमकूवेहिं सेओ दुरभिगंधओ।** (बंभ पृ. ३७) घाण वासाचा घाम रंध्रांतून पाझरतो.

२२) कधी सप्तम्यर्थी तृतीयेचा उपयोग केलेला आढळतो.

अ) १) **जो न सज्जइ एएहिं।** (उत्त. २५.२९) जो यांत आसक्त होत नाही २) **रूवेण य जोवणेण य लावण्णेण मुच्छिए।** (विवाग. पृ. ३२) रूप, यौवन आणि लावण्य यांत आसक्त.

आ) १) **सासंको हियएणं।** (अगड २४१) हृदयात साशंक २) **सोमो चित्तेण आउलो जाओ।** (सुपास ५६७) सोम मनात आकुल झाला.

३) **स एहिं २ काएहिं ।** (नायासं पृ. ६५) आपापल्या देहात ४) **पुव्वणत्थेहिं भद्दासणेहिं निसीयंती।** (राय पृ. ८४) पूर्वी ठेवलेल्या भद्रासनावर बसले.

**इ) जेणेव चंपा नगरी .. तेणामेव उवागच्छइ**[1]**।** (नायासं पृ. १) जिकडे चंपा नगरी होती तिकडे गेला

ई) काल दर्शवितांना :

**तेणं कालेणं तेणं समएणं**[2]**।** (नायासं पृ. १) त्या काळी त्या समयी

उ) सत्सप्तमी रचनेत :– १) **तेहिं गएहि कमला कमेण पत्ता सुहेण उज्जेणिं।** (सिरि ३०८) ते गेले असतां (गेल्यावर) कमला क्रमाने सुखरूप उज्जयिनीला पोचली २) **सइ अन्नेण मग्गेण ।** (दस ५.१.६) दुसरा मार्ग असता ३) **नच्चमाणीहिं विलासिणीहिं पंढतेहिं मागहेहिं .. नगरे पविसिउं पवत्तो।** (धर्मो पृ. ११८) विलासिनी नाचत असतां. बंदीजन गात असता. नगरीत शिरू लागला.

---

*१) जेणेव इति प्राकृतत्वात् सप्तम्यर्थे तृतीया यास्मिन्नेव देशे.. तेणामेव इति तस्मिन्नेव देशे। मलयगिरी (राम पृ. २९)*

*२) काहींच्या मते येथे तृतीया नसून तेणं कालेणं अशी सप्तमीच आहे. पहा. ते णं कालेणं इत्यादी ते इति प्राकृत शैलीवशात् तस्मिन् इति द्रष्टव्यं.. णं इति वाक्याड्‌रे। राय (मलय) पृ. २३)*

## ४०९ चतुर्थी विभक्तीचे उपयोग

अर्धमागधीत आढळणाऱ्या चतुर्थीच्या एव. व. च्या रूपांचा वापर प्रायः अगदी कमी प्रमाणात आहे. सामान्यतः चतुर्थीचे कार्य षष्ठीने केले[१] जाते.

चतुर्थी ए. व. ची जी 'आए'[२] प्रत्ययान्त रूपे आढळतात. त्यांचा उपयोग प्रायः तुमन्ताप्रमाणे[३] होतो. उदा. १) **पहाटेरेत्थ गमणाए।** (नयांस. पृ. १२६) जायचे ठरविले २) **अणुजाणेसि मं गमणाए।** महा ३५ अ) मला जाण्यास अनुज्ञा दे.

१) ज्याच्यासाठी एखादी क्रिया वा वस्तु त्याची चतुर्थी वापरतात.

१) **चेलगोलं कुमारभूयाए।** (सूय १.४.२.१४) मुलासाठी चेंडू

२) **भोगाय दव्वं।** (नाण ४.५०) भोगासाठी द्रव्य ३) **मोक्खत्थं पव्वज्जा।** (कथा पृ. ८४) मोक्षासाठी संन्यास

२) क्रियेचा हेतु, उद्देश प्रयोजन दाखविणारा शब्द चतुर्थीत ठेवतात.

१) **नो हुंति ताणाय।** (महा. पृ. १०१ ब) रक्षण करण्यास (समर्थ) होत नाहीत २) **असुरो को वि हु पत्तो मज्झ विणासाय।** (नाण १०.९७) माझा नाश करण्यास कोणीतरी असुर आला आहे. ३) **गओ जलाणयणट्ठाए।** (कथा पृ. ८८) पाणी आणण्यास गेला.

३) परिणामवाचक शब्द चतुर्थीत ठेवला जातो.

१) **आयंके से वहाय होइ।** (दस ११.९) रोग त्याच्या वधाला (कारण)

---

*१) चतुर्थ्याः षष्ठी । हेम ३.१३१*

*२) कित्येकदा 'आए' प्रत्ययान्त रूपांचा उपयोग न करता, अट्ठं (अत्थं) अट्ठा, अट्ठाए, अट्ठयाए यांचा उपयोग केला जातो. उदा. भिक्खट्ठा। (बंभ पृ. २५) भिक्षेसाठी, अप्पणो अट्ठाए। (विवाग पृ. ५७) स्वतःसाठी, अत्तहियट्ठयाए। (अभ्यंकर पृ. २४) आत्महितासाठी, इमस्स देहस्स पोसणट्ठाए। (पउम ३३.३७) हा देह पोसण्यास, धम्मसवणत्थं। (सुपास ६२९) धर्म ऐकण्यास, वंदणत्थं। (महा पृ. १७२ अ) वंदन करण्यास*

*३) वैद्य पृ. ६१*

होतो. **२) संकप्पे से वहाय होइ ।** (दस ११.९) संकल्प त्याच्या नाशाला (कारण होतो) ३) **अप्पवहाए नूणं होइ बलं उत्तुन्तण भुवणंमि।** (पाकमा पृ. २०) जगात गर्विष्ठांचे बल खरोखर त्यांच्या नाशालाच (कारण) होते.

४) काही विशेषणांना चतुर्थीची अपेक्षा असते.

१) **दुल्लहे सवणयाए।** (पएसि परि पृ. २९) ऐकण्यास दुर्लभ २) **किं अहं एयमट्ठस्स नो अरिहे सवणंयाए।** (निरमा पृ. १०) ही गोष्ट ऐकण्यास मी योग्य नाही काय? ३) **ते पारगा दोण्ह वि मोयणाए।** (सूय १.१४.१८) दोघांच्याही मोचनाला ते समर्थ (आहेत.)

५) 'अलं' ला कधी चतुर्थीची अपेक्षा असते.

१) **नालं ते तव ताणाए।** (सूय १.९.५) तुझे रक्षण करण्यास ते समर्थ नाहीत. २) **नालं ते मम ताणाय।** (उत्र ६.३) माझे रक्षण करण्यास ते समर्थ नाहीत.

६) अगदी क्वचित् गंतव्याची चतुर्थी[१] आढळते.

**आगंता गब्भाय नंतसो** (सूत्र १.२.१.९) अनंतशः गर्भात येईल.

### ४१० पंचमी विभक्तीचे उपयोग

१) कडून, पासून, जेथून या अर्थी स्थल काल[२] वाचक शब्दांची पंचमी वापरतात.

अ) स्थल : १) **एस मे मित्तस्स पुत्तो कोसंबीओ विज्जत्थी आगओ**

---

*१ घाटगे पृ. १९२*

*२) अशा उपयोगांतून क्रिया सातत्य दर्शविताना पंचमीचा उपयोग केला जातो. उदा. १) सो पंचहिं धाईहि हत्था हत्थम्मि अंकओ अंक। गिण्हिज्जंतो कुमरो।। (कुम्मा. १२४) पांच दाईंकडून (मा) हातांतून (त्या) हातात, (या) मांडीवरून (त्या) मांडीवर घेतला जाणारा तो राजपुत्र २) **गब्भाओ गब्भं जम्माओ जम्मं नरगाओ नरगं।** (सूय २.२.१०) (या गर्भातून (त्या) गर्भात (या) जन्मातून) (त्या) जन्मात (या) नरकांतून (त्या) नरकात.*

(अरी पृ. १०) हा माझ्या मित्राचा मुलगा विद्यार्थी (म्हणून) कोसंबीहून आला आहे. २) **सलिलं च माणस सरवराओ तुह निमित्तं आणीय** (पाकमा पृ. ५५ः)

तुझ्यासाठी मानससरोवरातून पाणी आणले आहे.

क) पत्रांत ः) **सत्थि मलयामलाओ सुंदरि तुह माहवाणिलो लिहइ।** (लीला ५०८) स्वस्ति, सुंदरी, मलयपर्वतावरून माहवाणिल तुला (पत्र) लिहित आहे.

आ) काल ः १) बालभावाओ चेव मम नेहाणुरत्ता। (बंभ पृ. ६०) बालपणापासूनच माझ्यावर प्रेमाने अनुरक्त होती. २) **पंढमदंसणाओ आरब्भ।** (महा पृ. ८९ ब) प्रथमदर्शनापासून

२) वस्तूंचा वास्तविक वा लाक्षणिक उद्भव दाखविणारा शब्द पंचमीत ठेवला जातो.

१) बंभाणस्स मुहाओ विप्पा। (धूर्ता १.३७) ब्रह्मदेवाच्या मुखातून ब्राह्मण (उत्पन्न झाले) २) **न खलु इंधणेहिंतो चेव अवगमो सोयाणलस्स** । (समरा पृ. ३९८) शोकाग्नि हा खरोखर इंधनातून (निर्माण) होत नाही. ३) **न य सज्जणमुहाओ निंदा निग्गच्छइ।** (कथा पृ. ४१) सज्जनांचे मुखांतून निंदा बाहेर पडत नाही ४) **न य हिंसाओ हवइ धम्मो** (समरा पृ. ४४०) हिंसेने धर्म होत नाही.

३) हेतु कारण दर्शविणारे शब्द पंचमीत ठेवतात.

१) **तुज्झ सुयाइ पभावा मज्झ सुओ सुंदरो जाओ।** (सिरि २७९) तुझ्या मुलीच्या प्रभावाने माझा मुलगा सुंदर झाला. २) **अवच्चनेहाओ कओ गुरूणा अंसुवाओ।** (धर्मो पृ. १५४) अपत्य स्नेहामुळे गुरूने अश्रु ढाळले.

अ) प्रत्यक्ष हेतु, कारण इत्यादी शब्दांचा उपयोग असताही कधी पंचमीचा उपयोग होतो. (मागे परिच्छेद ४०७ पहा)

आ) वादविवादात कारणदर्शक शब्द पंचमीत असतात

१) **पुरिसवयणाणि अप्पमाणाणि, रागदोसाइससंभवाओ** (धर्मो १५२) राग, द्वेष इत्यादी संभवत असल्याने माणसांची वचने अप्रमाण (होत)

२) **जं भणसि नत्थि जीवो अन्नो देहाओ, अणुवलंभाओ, तमसंगयमच्च**

**त्थं।** (सुर १२.५५) अनुपलंभामुळे देहापेक्षा जीव भिन्न नाही, असे जे तू म्हणतोस  ते अतिशय असंगत आहे.

४) गेलेला काळ (lapse of time)  दर्शविताना पंचमीचा उपयोग होतो.

१) **किमेत्तियाओ वेलाओ तुम्हे समागया।** (बंभ पृ. ६३) तुम्ही इतक्या वेळाने का आला? २) **बुहकालाओ चउत्थपाओ लद्धो।** (धर्मो पृ. १३७) बऱ्याच काळाने चौथा पाय मिळाला.

५) तर-वाचक विशेषणांना पंचमीची अपेक्षा[१] असते.

१) **मूढतराए णं तुमं पएसी ताओ कट्ठहारयाओ।** (पएसि परि. २७) पएसी, तूं त्या काष्ठवाहकाये पेक्षाही अधिक मूर्ख आहे. २) **तुमं एयाओ पविट्ठतरो** । (कथा पृ. ११४) तू याच्यापेक्षा अधिक पापिष्ठ आहेस. ३) मम भत्तुणो वि निग्घिणयरो। (जिन पृ. ३२) माझ्या पतिपेक्षा सुद्धा अधिक निर्घृण

अ) तर वाचकाचा उपयोग नसूनही, जरी तुलना गर्भित वा अभिप्रेत असेल तरीही पंचमीचा[२] उपयोग केला जातो.

१) **सीलं वरं कुलाओ दालिद्दं भव्वयं च रोगाओ। विज्जा रज्जाउ वरं खमा वरं सुट्ठु वि तवाओ।।** (वज्जा. ८५) कुलापेक्षा शील चांगले, रोगापेक्षा दारिद्र्य बरे, राज्यापेक्षा विद्या चांगली, त्यापेक्षा क्षमा पुष्कळच चांगली २) **सीलाउ सुंदर किं पि ।** (सिरि १६९) शीलाहून दुसरे काहीहिं चांगले नाही

३) **सग्गो च्चिय लुहओ णिय जम्मभूमीए।** (लीला ३३८) स्वतःच्या जन्म भूमीपुढे स्वर्ग सुध्दा क्षुद्र.

६) तुलना वा भेद दाखविणाऱ्या ‘अन्य’ शब्दाला पंचमीची अपेक्षा असते.

१) **अण्णो न पुण्णवं ममाहिंतो।** (महा २.१४३) माझ्यापेक्षा दुसरा (कोणीही) पुण्यवान् नाही. २) **न मोक्खसोक्खाहिंतो अण्णं सुहमत्थि।** (धर्मो पृ. १६४) मोक्षसुखापेक्षा अन्य (चांगले) सुख नाही.

---

*१) कधी षष्ठी वापरली जाते. उदा. बहुदेसाणं पहाणयरो। (सुर १.४८) पुष्कळदेशाहून अधिक प्रधान*

*२) कधी षष्ठी वापरली जाते. उदा. १) पाषाण वि अब्भहिया। (सुर १.१०७) प्राणापेक्षा सुद्धा अधिक. २) जाया बालचंदा पाषाण वि वल्लहा। (कथा पृ. १६६) बालचंदा प्राणपेक्षाही प्रिय झाली.*

अ) 'अन्य' शब्द अध्याहृत असताही पंचमीचा उपयोग केला जातो.

१) **तुह पयसेवाए को परो धम्मो ।** (सुपास. ५२२) तुझ्या पदसेवेपेक्षा (दुसरा) कोणता श्रेष्ठ धर्म आहे? २) **परोवयारी तुमाओ ण य को. वि.** (लिला १०३९) तुझ्यापेक्षा (दुसरा) कोणीही परोपकारी नाही.

७) आरब्भ, अणंतरं, परं, आ (पासून, पर्यंत) या अव्ययांचा पंचमीची अपेक्षा असते.

१) आरब्भ : १) **तद्दिणाओ आरब्भ।** (महा पृ. १३३ ब) त्या दिवसापासून

२) **पवासदिवसाओ आरब्भ ।** (नल पृ. १७) प्रवास दिवसापासून

२) अणंतरं : अणंतरं थूलभद्दाओ। (संपइ १.९७) थूलभद्दानंतर

३) पर : १) **न नायपुत्ता परमत्थि नाणी।** (सूय १.६.२४) ज्ञातपुत्रा (महावीरा) पेक्षां अधिक ज्ञानी कोणी नाही २) **किं जीव नासाओ परं नु कुज्जा।** (दस ९.१.१५) जीवनाशापेक्षा अधिक काय बरे करेल?

४) आ : क) पासून : १) **आ जम्माओ।** (सुपास ५८८) जन्मापासून

२) **आ बालभावाओ चेव ।** (समरा पृ. २६) बालपणापासूनच

ख) पर्यंत : १) आ बालभावाओ चेव । (समरा पृ. २६) बालपणापासूनच

ख) पर्यंत : १) आ सत्तमकुलाओ अत्थि पज्जत्तमम्हं दव्वं। (अरी पृ. ६) सात पिढ्यापर्यंत पुरेसे द्रव्य आमच्याजवळ आहे. २) **आ सत्तमवंसाओ भोत्तुं दाउंच विलसिउं अत्थि धणसंचओ महंतो।** (कथा पृ. ६२) सात पिढ्यापर्यंत, भोगण्यास, देण्यास, विलास करण्यासं (पुरेसा) महान् धनसंचय आहे.

८) खालील अर्थाच्या धातूंना पंचमीची अपेक्षा असते.

१) अपादान[१], वियोग, विरह : (ज्यापासून अपादान त्याची पंचमी):

१) **धम्माओ भंसेज्जा ।** (उत्त १६.१) धर्मापासून भ्रष्ट होईल २) **चुयस्स धम्माओ।** (दस ११.१३) धर्मापासून भ्रष्ट होईल. २) **चुयस्स धम्माओ। धर्मापासून च्युत झालेल्याचे** ३) ओसर ओसर करिहाओ। (अगड५६) हत्तीच्या मार्गातून मागे हो ४) **करंडियाओ कड्ढित्तु हारं।** (बंभ पृ. ५९) करंडकांतून हार काढून

---

*१) बाहेर पडणे, दूर जाणे, पडणे, भ्रष्ट होणे, उतरणे, उठणे, पळणे, बाहेर काढणे, ओढणे, च्युत होणे, चलित होणे इत्याद्यर्थक धातु*

२) निवृत्ति, विराम : (ज्यापासून निवृत्ति त्याची पंचमी):-

१) **नियत्तसु इमाओ संगामाओ।** (चउ. पृ. ४७) या संग्रामांतून निवृत्त हो

२) विरम पूयाओ। सुपास ५१०) पूजा थांबव

३) भीति[1] :- (ज्याला भ्यायचे त्याची पंचमी) : १) **किं बोहसि न पावाओ।** (सुपास पृ. ५३२) पापाची भीति वाटत नाही काय? २) **मा बीहेसु कालक्खेवाओ ।** (नल पृ. ३३) कालक्षेत्र (होईल) म्हणून भिऊ नको.

४) उद्वेग : (ज्यापासून उद्वेग त्याची पंचमी) : उव्विग्गं मे चित्तं संसार-वासाओ। (जिन पृ. ७१) संसारवासातून माझे चित्त उद्विग्न झाले आहे.

५) विरक्ती : (ज्यातून विरक्ती त्याची पंचमीः : १) विरत्तं संसारसायराओ चित्तं। (समरा पृ. २८०) संसारसागरांतून चित विरक्त झाले आहे २) **बाढं विरत्तं मम रज्जादीहितो चित्तं।** (महा पृ. ८७ ब) राज्य वगैरे बद्दल माझे चित्त अगदी विटले आहे.

६) लज्जा : (ज्याला लाजायचे त्याची पंचमी) : १) **न लज्जसे लोआओ।** (नल पृ. ५) (तुला) लोकांची लाज वाटत नाही? २) हला दूइए, किं भाउणो वि न लज्जए राया। (धर्मो पृ. २१५) अगे दूती, भावाची सुद्धा राजाला लाज वाटत नाही काय?

७) सुटका[1] : (ज्यातून सुटका त्याची पंचमी) : १) **मुणी .. भवाओ परिमुच्चए।** (उत्त. ९.२२) मुनी संसारातून सुटतो २) **जाईमरणाउ मुच्चइ** (दस ९.४.१४) जन्ममरणांतून सुटतो ३) **इमाओ मेल्लावह ममं।** (सुद १२.११२) याच्यापासून मला सोडवा.

८) रक्षण : (ज्यापासून रक्षण त्याची पंचमी) : १) किं समत्थं इणं मच्चुणो रक्खेउं। (समरा पृ. २८८) मृत्यूपासून रक्षण करण्यास हे समर्थ आहे काय? २) रक्खेहि मं इमाओ अणंगाओ। (समरा पृ. ३१६) या मदनापासून माझे रक्षण कर.

९) पराभव : (ज्यापासून पराभव त्याची पंचमी) : भग्गो कुक्कुडो बीयकुक्कुडाओ। (बंभ पृ. ५७) दुसऱ्या कोंबड्याकडून (पहिला) कोंबडा पराभूत झाला.

---

*१) एतदर्शक धातु कधी षष्ठी घेतात.*

९) भीती, इत्याद्यर्थक शब्द व इतर काही शब्द यांनाही पंचमीची अपेक्षा असते.

१) भीति : **नत्थि तुह ममाहिंतो भयं।** (महा पृ. २३९ ब) तुला माझ्यापासून भय नाही.

२) रक्षण : **धम्मो च्चेवेत्थ सव्ववसणेहिंतो रक्खगो**[1]**।** (येथे धर्म हाच सर्व संकटातून रक्षण करणारा आहे)

३) सुटका : **मोक्खो दुक्खाओ।** (नाण पृ. ४.९८) दुःखातून सुटका

४) विडंबन : **विडंबणं दुज्जणजणाओ।** (समरा पृ. ९) दुर्जनाकडून उपहास

५) अपमान : **अवमाणणं लोगाओ ।** (समरा पृ. १०) लोकांकडून अवमान

६) वंचित : वंचिओ म्हि एत्रिय कालं... विसयसुहाओ। धर्मो पृ. १६१) इतका काळ मी विषय सुखाला आंचवलो

१०) प्रश्नोत्तरात स्थलदर्शक शब्द पंचमीत ठेवतात.

**१) भद्द कओ तुमं। तेण भणिय–सुसम्मनयराओ** (समरा पृ. २१०) 'भल्या माणसा, तू कोठून आलास?' त्याने म्हटले सुसम्म नगरांतून २) **भो कत्तो तुमं। तेण भणिय–रायगिहाओ।** (धर्मो पृ.१५३) अरे, कोठून आलास तू? त्याने म्हटले रायगिह नगरांतून.

### ४११ षष्ठी विभक्तीचे उपयोग

१) दोन पदार्थातील विविध संबंध दाखविण्यास षष्ठीचा उपयोग होतो.

१) कार्य–कारण : १) **कम्मं जाईमरणस्स मूलं।** (उत्त. ३२.७) कर्म हे जन्ममरणाचे मूळ २) **सुवण्णस्स पडिमा।** (सोन्याची प्रतिमा)

२) हेतु, प्रयोजन : १) अन्नस्स अट्ठा इहमागओ मि। (उत्त १२.९)

अन्नासाठी मी येथे आलो आहे. २) **सामिधेयस्स अट्ठाए।** (अंत ५६) समिधासाठी

---

*१) शार्पेटायर, पृ. ३६७*

३) आधार -आधेय १) **इमं सरीरं .. दुक्खकेसाण भायणं।** (उत्र १९.१२) हे शरीर दुःखक्लेशांचे आश्रयस्थान २) नाणाविह सावयाण आवासं। (पडम ३३.५) नानाविध श्वापदांचे वसतिस्थान.

४) अवयव-अवयवी १) **वडपायवस्स मूले गंतूण।** (अगड १३०) वटवृक्षाच्या मुळाशी जाऊन २) **तीए उदरे।** (बंभ पृ. ३९) तिच्या उदरात

५) वर्ण्यविषय-वर्णक - **पढमस्स अज्झयणस्स अयमट्ठे पन्नत्ते** । (विवाग पृ. १२) पहिल्या अध्ययनात हा भाग सांगितला आहे.

६) धर्म-धर्मी, गुण-गुणी : **तस्स रूवं तु पासित्ता।** (उत्त २०.५) त्यांचे रूप पाहून

७) नाते : मम पत्ती। (बंभ पृ. २७) माझी पत्नी

८) उत्पाद्य-उत्पादक : १) **भेरीए सद्दं सोच्चा।** भेदीचा शब्द ऐकून २) **तस्स वयणं।** (बंभ पृ. ३१) त्याचे वचन

९) भाग : १) **अंतो लयणस्स सा ठिया।** (उत्त. २२.२३) ती गुहेच्या आंत उभी राहिली २) **वाणारसीए बहिया।** (उत्र २५.३) वाणारसीच्या बाहेर

१०) कर्तृ-क्रिया : **भाउणो आगमणं।** (यर्मो पृ. ३०) भावाचे आगमन

११) स्वामित्व - (१) **तस्स मेहस्स जो पहू ।** (उत्त. १९.२२१) त्या घराचा जो प्रभु २) धणस्स मे नासो । (सुपास ५६७) माझ्या धनाचा नाश

१२) इतर सामान्य संबंध : १) **मोग्गर पाणिस्स पडिमा** (अंत १००) मोग्गरपाणींची प्रतिमा. २) **छिन्नो मे संसओ इमो।** (उत्त. २३.२८) हा माझा संशय नष्ट झाला. ३) **जाया तस्स जीवियासा।** (बंभ पृ. ४७) त्याला जगण्याची आशा आली. ४) **एयस्स दंसण पि।** (जिन पृ. २२) त्याचे दर्शनसुद्धा ५) **कम्माणं खएणं ।** (अंत ५७) कर्मांच्या क्षयाने ६) **परलोगस्स आराहगा।** (ओव पृ. ६१) परलोकाचे आराधक

२) षष्ठ्यन्त पद कधी विधेय म्हणून येऊ[१] शकते.

**किं नत्थि ममं जं अन्तराईणं अत्थि।** (चउ पृ. २४) इतर राजा जवळ आहे असे माझ्या जवळ काय नाही?

३) ला (साठी-करिता) या चतुर्थीच्या अर्थी षष्ठीचा उपयोग[२] होतो.

---

*१) घाटगे पृ. १९५*

*२) छट्ठीविभत्तीए भण्णइ चउत्थी। (राय, मलय पृ. २६६ वर उद्धृत)*

**१) जीवस्स उ सुहावहं।** (उत्त ३१.१) जीवाला सुखावह २) **सईण न हि दुक्करं किं पि।** (नर्ल पृ. १८७ अ) तू त्रिभुवनाला पूज्य आहेस.

४) संस्कृतमध्ये चतुर्थी घेणारी क्रियापदे अर्धमागधीत षष्ठी घेतात.

१) देणे, अर्पण करणे : (ज्याला द्यायचे त्याची षष्ठी)

१) **मम करं देह ।** (चउ पृ. १९) मला कर द्या. २) **राया नमुइस्स अप्पए रज्जं।** (संपइ. २.४९) राजाने नमुईला राज्य अर्पण केले.

२) सांगणे : ज्याला सांगायचे त्याची षष्ठी : १) **भयवं कहेह अम्हं ।** (कुम्मा. ३९) भगवन् आम्हाला सांगा २) **बुहजणो अन्नमन्नस्स एवमाइक्खइ।** (निरया पृ. १९) पुष्कळ लोकांनी एकमेकांना असे सांगितले.

३) रागावणे : (ज्यावर रागवयाचे त्याची षष्ठी) : **१) न वि ते कुप्पंति एक्कमेक्कस्स ।** (पउम ३.४०) आणि ते एकमेकांवर रागावत नसत. २) **सा वि कुविया बंभदत्तस्स ।** (समरा पृ. १३६) ती सुद्धा बंभदत्तावर रागावली

४) आवडणे : (ज्याला आवडते त्याची षष्ठी) : १) **तुज्झ रुच्चइ किमेसो।** (नल पृ. ४) तुला हा आवडला काय? २) **जं तुह पिउणो पडिहाइ तं करेज्जासि ।** (महा. पृ. १९९ ब) जे तुझ्या पित्याला आवडेल ते तू करावेस.

४) खालील अर्थाच्या क्रियापदांना षष्ठीची अपेक्षा असते.

१) ऐकणे[1] : (ज्याचे ऐकायचे त्याची षष्ठी) : १) **सुणेह मे।** (उत्त १.१) मी सांगतो ते ऐका २) **पंडियाण निसामिया ।** (आचारांग १.८.३) पंडितांचे ऐकून

२) भिणे[2] : पृ. (ज्याला भ्यायचे त्याची षष्ठी) : १) **बीहेमि निय कुलकलंकस्स ।** (महा पृ. ३६ अ) स्वतःच्या कुळाच्या कलंकाला मी भितो **२) नाहं मरणस्स बीहेमि ।** (समरा पृ. १३०) मी मरणाला भीत नाही.

३) योग्य असणे : (ज्याला योग्य त्याची षष्ठी) : १) **नायतत्तस्स तुज्झ नो जुज्जए इमो गव्वो** । (सिरि ९५) तत्त्व माहीत असणाऱ्या तुला हा गर्व योग्य नाही.

४) अनुज्ञा असणे : (ज्याला अनुज्ञा, त्याची षष्ठी) : १) **न मे कप्पइ**

---

*१) पुष्कळदां द्वितीया उदा. न सुणंति परममित्ताणं वयणं। (समरा पृ. ६७६)*

*२) बहुधा पंचमी लागते. 'पंचमीचे उपयोग' पहा*

**तारिसं।** (दस ५.१.२८) तशा प्रकारचे (घेण्याची मला अनुज्ञा नाही. २) **तंबोलो न कप्पइ बंभयारीणं।** (कथा पृ. ४२) तांबूलाची (खाण्याची) ब्रह्मचाऱ्यांना अनुज्ञा नाही

५) जाणविणे : (ज्याला जाणवावयाचे, त्याची षष्ठी) : १) **एसो रन्नो अन्नेसिंच जाणावेसइ** (बंभ पृ. ३२) राजाला आणि इतरांना हा माहीत करून देईल. २) **एयस्स रहसि जाणावेहि।** (बंभ पृ. ४१) ह्याला एकान्तात कळव.

६) आठवणे[१] : (ज्याची आठवण व्हायची, त्याची षष्ठी) :

१) **कस्स कयंतेण सुमरियं।** (महा पृ. ६४ अ) कृतान्ताने कुणाचे स्मरण केले?

२) **अज्ज मए बंधवाण सुयरियं।** (समरा पृ. ३४४) आज मला बांधवांची आठवण झाली.

७) क्षमा[२] करणे : (ज्याला क्षमा करायची, त्याची षष्ठी):

१) **अविणीयस्स मे खमसु।** (वसु[२अ] २५.२५) अविनीत अशा मला क्षमा कर

२) **खमसु मज्झ।** (महा. पृ. ३१८ ब) मला क्षमा कर.

८) भरणे[३] : (ज्याने भरायचे, त्याची षष्ठी) : १) **भरिऊण नीरस्स।** (सुपास ६४६) पाण्याने भरून २) **पायसघयदहियाणं भरिऊणं भंडए गरूए।** (अगड २१९) पायस, घृत दही यांनी मोठी भांडी भरून

९) त्याग करणे : (ज्याचा त्याग, त्याची षष्ठी) : **तस्स भंते पडिक्कमामि।** (दस४) महाराज, मी त्याचा त्याग करतो.

---

*१) पुष्कळदां द्वितीयाही वापरली जाते : सुमरेहि मम पत्थणं। (समरा पृ. ७३२) माझी प्रार्थना लक्षांत ठेव, नाहमप्पणो अवराहं संभरामि। (कथा पृ. २७) मला स्वतःचा अपराध आठवत नाही. (येथे द्वितीयार्थी षष्ठी असे म्हणता येईल)*

*२) कधी द्वितीया : खमह मम अवराह। (महा पृ. १५४ अ) माझा अपराध क्षमा करा.*

*२अ) घाटगे पृ. १७८*

*३) येथे तृतीयार्थी षष्ठी म्हणता येईल. पहा षष्ठी तृतीयार्थे। (राय, मलय, पृ. १४८)*

१०) **उपकार करणे** : (ज्याच्यावर उपकार त्याची षष्ठी) : १) **किं एएसिं उवयरामि।** जिन पृ. १०) मी यांच्यावर काय उपकार करूं? २) **निरूवयारिणो वि उवयारो कायव्वो उवयारिणो पुण विसेसेण।** (धर्मो ६८) निरूपकाऱ्यावर सुध्दा उपकार करावा. उपकाऱ्यावर प्रामुख्याने (उपकार करावा.)

११) **प्रसन्न होणे** : (ज्यावर प्रसन्नता त्याची षष्ठी) :

१) **जो पुण पुण्णविहूणो तस्स तुमं नो पसीएसि।** (सिरि. ९६) जो पुण्यहीन आहे त्याच्यावर तू प्रसन्न होत नाहीस २) पसीय मज्झ। (नल पृ. ९) माझ्यावर प्रसन्न हो.

१२) **दाखविणे** : पृ. (ज्याला दाखवायचे त्याची षष्ठी) : १) **मम ताव तं पएसं दंसेहि ।** (समरा पृ. १५२) मला आता तो प्रदेशा दाखव. २) **धम्मपहं दरिसिऊण लोगस्स।** (पउम ४.८८) लोकांना धर्म मार्ग दाखवून.

१३) **अन्न वाढणे** : (ज्याला वाढायचे त्याची षष्ठी) : **तस्स घरसामिणी परिवेसइ ।** (अरी पृ. ७) त्याला गृहस्वामिनीने जेवण्यास वाढले. (२) **तस्स परिवेसियं तं ।** (सुपास. ४९६) त्याला ते वाढले.

(१४) शोभणे : (ज्याला शोभायचे त्याची षष्ठी) **नीयकम्ममेयं छज्जइ नीयस्स लोयस्स।** (जिन पृ. १०) हे नीच कर्म नीच लोकांनाच शोभते

१५) **मिळणे,** एकत्र येणे : (ज्याच्याशीं मीलन त्याची षष्ठी) :

१) **सो मिलिओ : चारूदत्तस्स।** (महा पृ. २०१ ब) तो चारूदत्ताला मिळाला. (मीलन झाले) २) तहा काहामि जहा मिलसि नियपियमस्स। (महा पृ. १०४ ब) असे करीन की ज्यामुळे तुझे तुझ्या प्रियतमाशी मीलन होईल.

१६) **अपराध करणे** : (ज्याचा अपराध केला असेल त्याची षष्ठी) :

१) एयस्स किमवरद्धं। (महा पृ. १७७ ब) याचा काय अपराध केला होता?

२) **जइ वि बाढं अवरद्धं कुमारेही तुम्ह।** (महा पृ. ४६ अ) जरी कुमारांनी तुझा पुष्कळ अपराध केला आहे.

१७) **पाठविणे** : ज्याच्याकडे पाठवायचे त्याची षष्ठी :

१) **पेसिओ दीहेण कडगाईण दूओ ।** (बंभ पृ. ८०) दीहाने कडग इत्यादींच्याकडे दूत पाठविला. २) **पेसिओ भीमेण दहिवन्नस्स दूओ।** (नल पृ.

३१) भीमाने दहिवन्नाकडे दूत पाठविला.

१८) **सुटणे** [१] : (ज्यातून सुटका त्याची षष्ठी): १) **मुच्चंति दुक्खाणं।** पउम ३३.५५) दुःखातून सुटतात. २) **सव्वदुक्खाण मुच्चई।** (उत्त ६.८) सर्व दुःखातून मुक्त होतो.

१९) **प्रभावी असणे** : (ज्याचेवर प्रभाव त्याची षष्ठी) : १) **कस्स उण एसो न पहवइ।** (समरा पृ. ७२४) कुणावर बरे हा प्रभावी ठरत नाही? २) **न वि तस्स किंचि पहवइ।** (सुपास ५९२) त्याच्यावर कशाचाही प्रभाव चालत नाही.

२०) **ऋणी असणे** : तुज्झ पिया मम पिउणो धारेइ अणूणगं सयसहस्सं। (धर्मो. २०७) तुझा बाप माझ्या बापाचे बरोबर एक लाख देणे लागतो.

२१) **विश्वास**[२] **ठेवणे** : (ज्याचेवर विश्वास त्याची षष्ठी) : १) जइ पत्तियह न मज्झं। (सुपास. ५९४) जर माझ्यावर विश्वास नसेल. २) अओ न इत्थीण वीससियव्वं। (धर्मो. पृ. १४७) म्हणून स्त्रियांवर विश्वास ठेवू नये. ३) नियकलत्तस्स वि न वीससियव्वं। (कथा पृ. १७६) आपल्या बायकोवर सुध्दा विश्वास ठेवू नये.

२२) **संतुष्ट होणे** : (ज्वार संतुष्ट, त्याची षष्ठी) : तुह तुट्ठाहं। (नल पृ. ४९) तुझ्यावर मी संतुष्ट झाले आहे.

२३) **नमस्कार**[३] **करणे** : (ज्याला नमस्कार त्याची षष्ठी) : १) **सिद्धाण नमुक्कारं काऊण।** (पउम ३.१३६) सिद्धाना नमस्कार करून २) **जो कुणइ नमोक्कारं अरहंताणं।** (पउम ३५.३७) जो अरहंतांना नमस्कार करतो.

२४) **उपदेश करणे** : (ज्याला उपदेश त्याची षष्ठी) :

१) **उवइसइ तस्स मंतं**। (सुपास ५१२) त्याला मंत्र उपदेशिला २) **तेण एगं ते उवइट्ठो मम.. मंतो।** (महा पृ. ८६ अ) त्याने मला एकान्तात मंत्र उपदेशिला

५) खालील अर्थाच्या व तदर्थक नामांना व विशेषणांना षष्ठीची अपेक्षा असते.

---

*१) बहुधा पंचमी लागते. 'पंचमीचे उपयोग' पहा*

*२) कधी सप्तमी लागते. सप्तमीचे उपयोग पहा.*

*३) वंद, नमंस इत्यादी क्रियापदांना द्वितीया लागते. उदा. १) समणं भगवं तिक्खुत्तो आयाहिणपयाहिणं करेइ वंदइ नमंसइ। (नायासं पृ. २४) २) नमंसइ अउज्झनयरीजिणहराइं। (नल पृ. ३५)*

१) **तुल्य, सदृश :** १) **सरिसे णं तुमं तस्स अगडदद्दुरस्स** (नायांस पृ. १८५) तू त्या कूपमंडूकासारखा आहेस. २) **इंदगइंदस्स सारिच्छो।** (अगड पृ. ५७) इंद्राच्या ऐरावतासारखा ३) नत्थि मम समो पावो। (महा पृ. ११५ ब) माझ्यासारखा पापी नाही.

२) **प्रिय, अप्रिय, इष्ट अनिष्ट, वल्लभ :** १) **कुमरो सव्वेसिं वल्लहो जाओ ।** (कुम्मा १२४) राजपुत्र सर्वांना प्रिय झाला २) केसिं च पियं गज्जं । (जिन पृ. १) काहीना गद्य आवडते. ३) **निच्चं पि अहं जिणरक्खियस्स इट्ठा।** (नाया९) मी नेहमीच जिणरक्खियाला प्रिय होते. ४) **निच्चं पि अहं जिणपालियस्स अणिट्ठा।** (नायासं पृ. १२९) मी नेहमीच जिण पालियाला अप्रिय होते. ५) अवच्चरूवाणि कस्स वि न अप्पियाणि होंति। (अरी. पृ. ८) मुले  कुणालाही अप्रिय असत नाहीत.

३) **मीलन** १) तुमं मज्झ मिलिओ सि। (कुम्मा ३१) तुझे माझ्याशी मीलन झाले आहे. २) हवंति अवरस्स संजुत्ता। (पउम ५.१) दुसऱ्याशी संयुक्त होतात.

४) **भेद, अंतर, फरक :** १) सावगाणं साहूणं किं अंतरं[1]। श्रावक साधू यांतील भेद कोणता? २) को विसेसो तुम्हा णमेमाण य? (कथा पृ. ११५) तुमच्यात आणि यांच्यात फरक काय?

५) **योग्य, अनुरूप, प्रशस्त, उचित :** १) **तुह जोग्गा।** (वज्जा. २२४) तुला योग्य २) विवित्तवासो मुणिणं पसत्थो। (उत्त. ३२.१६) एकांतवास मुनींना प्रशस्त ३) **मज्झ अणुरूवं।** (सिरि. १३९) मला अनुरूप ४) **ममावि एवं चेव उचियं।** (जिन पृ. ५५) मला सुद्धा असेच उचित आहे.

६) **सुटका : कडाण कम्माण न मोक्खु अत्थि।** (उत्त. ४.३) केलेल्या कर्मांतून सुटका नाही.

७) **भीति :** १) **नत्थि मे मच्चुभयं।** (नल पृ. १७) मला मृत्युभय नाही. २) **पभीओ पर लोगस्स।** (उत्र ५.११) परलोकाला फार भ्यालेला ३) **नो भेयव्वं कस्स वि।** (सुपास. ५८४) कुणालाही भिऊ नये.

८) **स्वागत :** सागयं ते। (समरा पृ. १४) तुझे स्वागत असो ।

---

*१) शार्पें, पृ. २९९*

९) **कुशल : संपयं कुसलं सव्वेसिं।** (नल २४) आता सर्वांचे कुशल आहे.

१०) **वत्सल : दीणाणाहाण वच्छलो।** (धर्मो पृ. ३ः) दीन व अनाथ यांशी वत्सल

११) **उपकारी : उवयारी तुमं अम्हाणं।** (धर्मो पृ. ६८) तू आमचा उपकारी आहेस.

१२) **उत्कंठित : उक्कंठिय म्हि दढं जणयजणणीणं।** (जिन पृ. १२) मला आईबापांची फार उत्कंठा लागली आहे.

१३) **टाळणारा : १) गुणाणं च विवज्जओ।** (दस ५.२.४९) गुण टाळणारा २) अगुणाणं विवज्जओ। (दस ५.२.४४) अगुण टाळणारा.

१४) **संति य (स्वामित्वदर्शक) : १) मह संतिए म्साणमि।** (जिन पृ. २०) माझ्या मालकीच्या श्मशानात २) **तुह संति यमेव सव्वमेयं** (जिन पृ.२४) हे सर्व तुझेच आहे.

६) काल दर्शविताना षष्ठीचा उपयोग केला[१] जातो.

१) सा सत्तरत्तस्स कालगया। (वसु ९०.१[२]) ती सात दिवसांपूर्वी मेली. २) **राया पंचमदिणस्स तम्मि नगे वच्चइ।** (चउ पृ. ४६) राजा पाचव्या दिवशी त्या पर्वतावर जाई. ३) **चिरस्स विउद्धा** (कथा पृ. ४८) बऱ्याच वेळाने जागी झाली ४) **चिरकालस्स पत्ताओ।** (धर्मो पृ. १९९) बऱ्याच वेळाने आल्या.

७) अनेकांतून एक वा काही दर्शविणे असता. अनेकांची षष्ठी वापरली जाते.

१) **जो अम्हं समणो वा समणी वा।** (नायासं पृ. ६७) आपल्यातील जो श्रमण वा श्रमणी २) **जह पव्वयाण मेरू नईण गंगा मियाण पंचमुहो। पक्खीण जहा गरूडो सेसाही सयलभुयगाण।।** (महा पृ. १७४ अ) ज्याप्रमाणे पर्वतांत मेरू, नद्यांत गंगा, पशूंत सिंह, पक्ष्यांत गरूड, सर्व सर्पांत शेष सर्प

८) तमवाचके व श्रेष्ठत्व वाचकें यांना षष्ठीची अपेक्षा असते.

अ) **तमवाचके :** १) **इसीण सेट्ठे तह वद्धमाणे।** (सूय १.६.२२) तद्वत

---

*१) घाटगे पृ. १९७*

*२) घाटगे पृ. १७८*

ऋषींत वर्धमान श्रेष्ठ २) **दाणाण सेट्ठं अभयप्पयाणं।** (सूय १.६.२३) दानांत अभयदान श्रेष्ठ ३) **तेसिं जेट्ठो जण्हुकुमारो।** (पाकमा पृ. १७) त्यांच्यात जण्हकुमार हा ज्येष्ठ ४) **तिलुत्तमा उत्रमा सुरवहूणं।** (धूर्ता १.६५) देवस्त्रियांत तिलोत्तमा उत्तम

आ) **श्रेष्ठत्ववाचके** : १) **सीहे मियाण पवरे।** (उत्त. ११.२०) पशूंत सिंह श्रेष्ठ २) **पहाणो हं सेसराईणं।** (धर्मो. पृ. ७४) बाकीच्या राजांत मी प्रधान आहे[३] **अणायदुक्खा सुहीण ते पढमा।** (लीला ५७१) ज्यांना दुःखच ठाऊक नाही ते सुखीलोकांत श्रेष्ठ.

९) क. भू. धा. वि.[१] चा उपयोग नामाप्रमाणे असता. त्याला षष्ठीची अपेक्षा असते.

**१) तं पुव्वजम्मपावस्स विलसियं।** (सुपास ५१०) ते पूर्वजन्मीच्या पापाचे विलासित २) सोऊण जिणिंदस्स भासियं। (महा पृ. २५९ अ) जिनेंद्राचे भाषण ऐकून

१०) 'ओ' प्रत्ययान्त अव्यये, स्थलदर्शक अव्यये इत्यादींना षष्ठीची अपेक्षा असते.

अ) १) **तस्स पुरओ।** (बंभ पृ. ४८) त्याच्या पुढे

आ) १) **वडपायवस्स हेट्ठा।** (बंभ पृ. २६) वटवृक्षाखाली २) **तुम्ह उवरि।** बंभ पृ. २६) तुमच्यावर ३) **नयरीए बहिया।** (अंत६) नगरीच्या बाहेर

इ) १) **ताण समीवं।** (बंभ पृ. २८) त्यांच्याजवळ २) **मम सयासे।** (अरी १०) माझ्याजवळ ३) **रन्नो आसन्ने।** (नल पृ. २९) राजाच्या जवळ

११) समक्खं, पच्चक्खं, परोक्खे या शब्दांना व अलं, हद्धी धिरत्थु, नमो (नमोत्थु) कए या अव्ययांना षष्ठीची अपेक्षा असते.

१) समक्खं : **मम समक्खमेव** । (समरा पृ. ३८) माझ्या समक्षच

---

*१) क. भू. धा. वि. चा. उपयोग वर्तमानार्थी असता त्यालाही षष्ठीची अपेक्षा असते. (काळे पृ. ५०१) उदा. **संमओ पयइलोयस्स।** (महा. पृ. २८ ब) प्रजाजनांना संमत संमओ सामंतामच्चाणं। (कथा पृ. १२) सामंत, अमात्य यांना संमत*

२) **पच्चक्खं : सव्वजणस्स पच्चक्खं।** (नल पृ. ४१) सर्व जनांच्या देखत

३) **परोक्खे : मम परोक्खे।** (बंभ पृ. ५५) माझ्या परोक्ष

४) **अलं : १) अलं अप्पणो होइ अलं परेसिं।** (दस ८.६२) स्वतःचे व दुसऱ्यांचे रक्षण करण्यास समर्थ होतो. २) **अलं पासायखंभाण।** (दस ७.२७) प्रासाद स्तंभासाठी पुरेसे.

५) **हद्धी : हद्धी तह मज्झ भागधिज्जाण।** (सुपास ६०३) तसेच माझ्या नशिबाचा धिक्कार असो।

६) **धिरत्थु : १) धिरत्थु विज्जुरेहव्व चंचलाणं रिद्धीणं।** (चउ पृ. २६) वीजेच्या चमकीप्रमाणे चंचल असणाऱ्या रिध्दींचा धिक्कार असो।

२) **धिरत्थु ते जसोकामी।** (दस २.७) हे यशाची इच्छा करणाऱ्या, तुझा धिक्कार असो। ३) **धिरत्थु भोगाणं।** (कथा पृ. १००) भोगांचा धिक्कार असो।

७) **नमो : नमो अरिहंताण नमो सिद्धाणं नमो आयरियाणं नमो उवज्झायाणं नमो लोए सव्वसाहूणं।** अरहंतांना, सिद्धांना, आचार्यांना, उपाध्यायांना व जगांतील सर्व साधूंना नमस्कार असो।

नमोत्थु : **नमोत्थुणं समणस्स भगवओ महावीरस्स।** (ओव पृ. १४) श्रमण भगवान महावीराला नमस्कार असो ।

८) **कए : मह कए उवट्ठिओ एसो पलओ।** (नल पृ. ५) माझ्यासाठी (द मुळे) हा प्रलय निर्माण झाला.

१२) सत्षष्ठीचा[१] उपयोग सहचारी क्रिया दर्शविण्यास होतो.

**१) परहत्थं संपत्ता ताव पिया मज्झ नियंतस्स।** (सुर ४.२२६) मी पहात असतानाच प्रिया आत्ता दुसऱ्याच्या हाती गेली २) **एवं विचिंतयंतस्स तस्स हत्थी अदंसणी भूओ।** (सुर १०.१२०) तो असा विचार करीत असतानाच, हत्ती अदृश्य झाला.

अ) कधी सत्षष्ठीने अनादर दर्शविला जातो.

सो ताण रूमंतीणं नीओ सीहोयरो गुरूसमीवं । (पउम ३३.१२२) त्या रडत असतांही, तो सीहोयर (त्याने आपल्या) मोठ्या (भावा) जवळ नेला.

---

*१) सत्षष्ठी-रचनेच्या माहितीसाठी पुढे सति सप्तमी पहा.*

आ) सत्षष्ठीत कधी धातुसाधिता बरोबर एवं (तहा, इत्थं) इइ (इति) यांचा उपयोग केला जातो.

१) **इय तस्स भणंतस्स वि खणेण खयरो अद्दंसणं पत्तो।** (नल पृ. ४७) तो असे म्हणत असताना सुद्धा क्षणात खेचर अदृश्य झाला. २) **एवं जंपंताणं नयणपहं वज्जिऊण दिवसयरो अद्दंसणमावन्नो ।** (अगड १०९) ते असे बोलत असताना त्यांचा दृष्टीपथ टाळून सूर्य अदृश्य झाला. (अस्तास गेला)

इ) एव, मेत्त (मात्र) यांचा धातुसाधिता बरोबर उपयोग असता काही तोच तत्काळ असा अर्थ होतो.

तुह नीहरियमेत्तस्स गामंतराउ अहमागया। (धर्मो पृ. ६९) तू बाहेर पडला नाहीस तोच मी गावाहून आले.

१३) पुष्कळदा इतर विभक्तींऐवजी षष्ठीचा उपयोग केला[१] जातो.

अ) द्वितीयेऐवजी : **सीमंधरस्स वंदे।** (हेम ३.१३४) सीमंधराला वंदन करतो.

आ) तृतीयेऐवजी : १) **तेसिं एयं अणाइण्णं निग्गंथाण महेसिणं।** (दस ३.१) त्या निर्ग्रंथ महर्षीकडून अनाचरणीय २) **तस्स साहूणं दिन्नो जहोवएसो।** (पउम ३३.२९) साधूंनी त्याला योग्य उपदेश केला.

इ) पंचमीऐवजी : १) **विरत्तो भवदुहस्स।** (सुपास ६४०) संसारदुःखातून विरक्त २) **न विरमए कुसुमोच्चयस्स।** (समरा पृ. ३४९) फुले गोळा करण्याचे थांबविले नाही. ३) **इह पर लोग सुहाण चुक्कइ।** (धर्मो पृ. ७२) इहपरलोक सुखाला मुकतो

ई) सप्तमीऐवजी : १) सा य मूलदेवस्स रत्ता। (कथा पृ. ७२) आणि ती मूलदेवाचे ठायी आसक्त होती २) **संखाणं सिंगाणं**[२]। (राय पृ. ९६)

### ४१२ सप्तमी विभक्तीचे उपयोग

१) आत, वर, मध्ये या अर्थी मुख्य वा गौण स्थलकालवाचक शब्द

---

*१) क्वचिद् द्वितीयादेः। हेम ३.१३४*

*२) षष्ठी सप्तम्यर्थे। राय. (मलय.) पृ. १०९*

सप्तमीत ठेवले जातात.

अ) स्थळ : १) **न सरीरम्मि एयम्मि सुइत्तं किं पि विज्जए।** (बंभ पृ. ३७) या शरीरांत काहीही शुचित्व नाही. २) **सीहासणे निसीयइ।** (महा पृ. १३८अ) सिंहासनावर बसतो ३) **तुह धम्मे केत्तियाइं तत्ताइ।** (जिन पृ. ३०) तुझ्या धर्मामध्ये किती तत्त्वे आहेत?

आ) काळ : १) **आसाढे मासे** (उत्त. पृ. २६.१३) आषाढ महिन्यात २) **न लहइ सुक्खं दिणे निसाए वा।** (नल पृ. ४१) दिवसा वा रात्री सुख मिळाले नाही.

२) ज्या मुख्य वा गौण स्थानावर क्रिया घडते त्याची सप्तमी असते.

**१) तं तं सिरम्मि निवडइ।** (वज्जा १२०) ते ते डोकीवर पडते. २) **भोगी भमइ संसारे ।** (उत्त २५.४१) भोगी संसारात भ्रमण करतो ३) **दुत्तरदुक्खसमुद्दे निवडइ सो।** (अगड १४३) दुस्तर दुःखरूपी समुद्रात तो पडला.

३) जे पकडले जाते त्याची सप्तमी असते.

१) **रोसेण कंठे घेत्त्ण निद्धाडिओ दूओ अवद्दारेणं ।** (महा पृ. ११ ब) रागाने गळा पकडून दूताला अपद्वाराने हांकलले २) **पित्तूणं केसेसुं भणियं अयलेप।** (धर्मो पृ. १०३) केस पकडून अयलाने म्हटले.

४) गत्यर्थक धातूंच्या गंतव्याची[१] कधी कधी सप्तमी वापरतात[२].

१) जंति नरएसु। (कथा पृ. ९) नरकात जातात. २) **गओ गिरिसिहरे।** (पाकमा. पृ. ६७) पर्वत शिखरावर गेला. ३) नेसु उयहिंमि गंगं। (पाकमा पृ. २७) गंगेला समुद्राकडे ने.

५) अनेकांतून एक वा काही दर्शविताना सप्तमीचा उपयोग[३] करतात.

सं एसु जायए सूरो सहस्सेसु य पंडिओ। (वसु[४] १०५.८) शंभरात (एखादा) शूर, हजारात (एखादा) पंडित असतो.

---

*१) गंतव्याची प्रायः द्वितीया असते.*

*२) म. गावी गेला, घरी पोचला इत्यादी*

*३) प्रायः षष्ठीचा उपयोग असतो.*

*४) घाटगे पृ. १७९*

६) तमवाचकांना सप्तमीची अपेक्षा[१] असते.

१) गंधेसु वा चंदणमाहु सेट्ठंढ। (सूय १.६.१९) सुगंधी पदार्थांत चंदनाला श्रेष्ठ म्हणतात. २) **नागेसु वा धरणिंदमाहु सेट्ठं।** (सूय १.६.२०) नागांत धरणिंदाला श्रेष्ठ म्हणतात.

७) कोशांत 'या अर्थी' या अर्थाने सप्तमीचा उपयोग केला जातो.

१) **मोरे अल्लल्लो कुक्कुडे अलंपो।** (देनामा. १३) अल्लल्ल म्हणजे मोर, अलंप म्हणजे कोंबडा २) हालम्मि कुंतलो । (देनामा ३६) कुंतर म्हणजे हाल (सात वाहन)

८) कधी तुमन्तार्थी हेतु दर्शविण्यास सप्तमीचा उपयोग केला जातो.

१) **चिट्ठंति तत्थ पंच वि जोएंता मारणे छिद्दं।** (अगड ३०५) मारण्यास दोष (छिद्र) पहात पांचहि (जण) तेथेच राहिले २) **रक्खणपोसणे मणुस्सो सि।** (सूय १.४.१.१४) रक्षण-पोषण करण्यास (तूच एक) माणूस आहेस.

९) 'अलं' या अव्ययाला कधी सप्तमीची अपेक्षा असते. नाल दुक्खाउ मोयणे (उत्र ६.६) दुःखातून सोडविण्यास असमर्थ

१०) खालील अर्थाचे धातु (व नामे) यांना सप्तमीची अपेक्षा असते.

१) **रमणे**[२] : **१) न मे इमंमि रमइ मणं।** (नल पृ. ३) माझे मन याचे ठायी रमत नाही. २) **रमसु धम्ममि।** (सुपास ५१८) धर्मांत रत हो

२) **आसक्त असणे** : (ज्यांत आसक्त त्याची सप्त) : १) **रूवे मुच्छिए।** (नायांस पृ. १८५:) रूपांत आसक्त २) **नरीसु नोवगिज्झेज्जा।** (उत्त. ८.१९) हिंसेत का आसक्त होतोस? ४) उत्तिमपुरिसा... धम्मकहाए चेव अणुज्जंति। (समरा पृ. ४) उत्तम पुरूष फक्त धर्मकथेत आसक्त होतात. ५) **अजुत्तो भवे पडिबंधो।** (पाकमा पृ. ७४) संसारात आसक्ती अयोग्य आहे.

३) **साहचर्य, स्थिती** : १) **सुपुरिसमग्गम्मि ठिओ पुरिसो पावेइ कल्लाणं।** (नाण १०.७३) सत्पुरूषांच्या मार्गावर राहिलेला पुरूष कल्याण प्राप्त करून घेतो. २) **जोव्वणे वट्टमाणा ।** (ओव पृ. ३०) तारूण्यात असणारे ३)

---

*१) प्रायः षष्ठीची अपेक्षा आढळते.*

*२) ज्यांत रमायचे त्याची सप्तमी*

**ठिया अणसणे।** बंभ पृ. ३४) उपवास करू लागले.

४) **रागावणे**[१] : (ज्यावर रागवायचे त्याची सप्तमी) : १) **अवरद्धे वि न कुप्पइ।** (समरा पृ. ४८) अपराध्यावर सुद्धा रागावत नाही. २) **न तेसु कुज्झे।** (सूय १.१४.९) त्यांच्यावर रागावू नये.

५) **विश्वासाणे**[२] : (ज्यावर विश्वास त्याची सप्तमी) : १) **रमणीसु पत्तियसि।** (महा. २०१ ब) स्त्रियांवर विश्वास ठेवतोस २) **महिलियासु उ वीसंभो नये कायव्वो।** (धर्मो पृ. १४८) स्त्रियांवर विश्वास ठेवू नये २) **कहं वा खणमेत्तं पि वज्झवत्थूसु विस्सासो।** (महा. प. ६८ अ) बाह्य वस्तूंवर क्षणमात्र तरी कसा विश्वास (ठेवावा) बरे?

६) **(रंजणे) : मा रज्जह विसएसुं** (कथा पृ. १०) विषयात रजू (आसक्त होऊ) नका.

७) **प्रेम, अनुराग** : ज्यावर प्रेम त्याची सप्तमी) : १) **सयणेसु सिणेहो** (संपइ १.११६) स्वजनांवर स्नेह २) **जाया एयस्स अम्हेसु पीई।** (समरा पृ. २५२) त्याची आमच्यावर प्रीति झाली. ३) **अत्थि से धम्मचरणम्मि अणुराओ।** (समरा पृ. ३००) त्याचा धर्माचरणावर अनुराग आहे.

८) **प्रमाद करणे** : (ज्या बाबतीत प्रमाद त्याची सप्तमी) १) **जो धम्ममि पमायइ।** सुर ८.१५०) जो धर्माचे बाबतीत प्रमाद करतो. २) **को पमायइ जिणिंदधम्ममि सोक्खहेउम्मि।** (महा पृ. ६२ब) सौख्यहेतु अशा जिनेंद्राच्या धर्मांत कोण प्रमाद करतो?

९) **अपराध करणे** : (ज्याचा अपराध, त्याची सप्तमी) :

**जो अणगारे... अवरज्झइ।** (वसु पृ. २२७) जो अनगाराचा अपराध करतो.

१०) **मूढ होणे** : १) मुज्झंति हियाहिएसु। (समरा पृ. २७५) हित व अहित याबद्दल मूढ होतात. २) **मा माणुस्सएसु भोगेसु ... मुज्झह।** (नायासं

*१) पुष्कळदा षष्ठी असते.*

*२) पुष्कळदा षष्ठी असते. कधी 'सद्दह' धातु द्वितीया घेतो. : सद्दहामि तुम्ह वयणं (कथा पृ. १३८) सद्दहामि निग्गंयं पावयणं। (निरया पृ. ७१)*

पृ. ११४) मानवी भोगाविषयी (भोगांत) मूढ होऊ नका.

११) **प्रवृत्त होणे : भोगेसु को पयट्टेज्जा।** (महा. पृ-. ७३७ ब) भोगांच्या बाबतींत कोण प्रवृत्त होईल?

१२) **प्रयत्न करणे : १) जइयव्वं परोवयारे।** (समरा पृ. ७३२) परोपकाराच्या बाबतीत प्रयत्न करावा. २) **जत्तो गुणेसु कायव्वो।** (समरा पृ. २१) गुणांचे (प्राप्तीच्या) बाबतीत यत्न करावा. ३) तुम्हेहिं चित्तसुध्दीए जइयव्वं। (कथा पृ. १०७) तुम्ही चित्तशुध्दीच्या बाबतीत प्रयत्न करावा.

१३) **लोभ : जसंसि निम्मले लोहो** (समरा पृ. ७) निर्मळ यशाचे बाबतीत लोभ.

१४) **प्रभाव**[1] **: सुरासुरेसु वि पहवइ विही।** (नल पृ. २५) सुर व असुर यावर सुद्धा दैवाचा प्रभाव आहे.

१५) **प्रहार : १) को तुमं जो सुत्तेसु पहरसि।** (नल प. ५०) झोपलेल्यावर प्रहार करणारा असा तू कोण? २) **ते किवाणो कि न लज्जए इमेसु पसुपाएसु पहरंतो।** (नल पृ. १२) या पशुप्राय (जनांवर) प्रहार करताना तुझ्या कृपाणाला लाज वाटत नाही काय?

अ) पुढील काही नामांनाही सप्तमीची अपेक्षा असते.

१) **संसारे मे धिई नत्थि।** (जिन पृ. ३८) संसारात माझी आस्था नाही. २) **इमस्स विजए वि मज्झ संदेहो।** (महा. पृ. ९३ ब) याच्या विजयाच्या बाबतीतही मला संदेह आहे. ३) **सुहाभिमाणो तेसु।** (बंभ पृ. ३६) त्यांच्या ठिकाणी सुखाभिमान ४) **भत्ती जिणेसु मित्ती जिएसु।** (सुपास. ५६६) जिनांवर भक्ति जीवाच्या ठायी मैत्री ५) **को गुणेसु मच्छरो ।** (धर्मो पृ. १७८) गुणांच्या बाबतीत कसला मत्सर? ६) **पावेसु समा भीरूत्तणं।** (समरा. ७) पापांचे विषयी सहा भीरूत्व ७) **पुव्वदुक्कडेसु अच्चंतं अणुभावो।** (समरा पृ. २७४) पूर्व दुष्कृत्याबद्दल अत्यंत अनुताप ८) जइ पुत्त तुज्झ रज्जे नत्थि रूई। (कथा पृ. १२४) मुला, तुझी जर राज्याच्या ठिकाणी रूची नसेल.

११) खालील अर्थाच्या विशेषणांना सप्तमीची अपेक्षा असते.

---

*१) पुष्कळदा षष्ठी असते.*

१) **व्यापृत : गुरूजणणि जणयकज्जम्मि वावडत्रणं ।** (धर्मो पृ. ३) गुरू, आई, बाप यांच्या कार्याच्या बाबतीत व्यापृतत्त्व

२) **आसक्त : १) आसत्तो जिणधम्मे** (सुपास ५४१) जिनधर्मात आसक्त २) **जे गिध्दे कामभोगेसु।** (उत्त. ५.५) कामभोगात जे आसक्त ३) **जे विसएसु पसत्ता।** (पउम ३३.३६) विषयांत जे आसक्त.

३) **अनुरक्त : जिणवयणे गाढमणुरत्तो।** (सुर १.११३) जिनवचनाचे ठायी गाढ अनुरक्त.

४) **कुशल : जाओ एसो कलासु कुसलो।** (महा. पृ. ९० अ) हा कलामध्ये कुशल झाला.

५) **निपुण : मीयाइसु निउणा।** (सिरि ५९) गाणे, वगैरेमध्ये निपुण

६) **विचक्षण : वियक्खणो मणिपरिक्खाए।** (कुम्मा ७४) रत्न परीक्षेत विचक्षण

७) **रत : १) धम्ममि रओ।** (सुपास ५९०) धर्मात रत २) निरओ परोवयारे। (अगड१३) परोपपकरांत निरत

८) **लुब्ध : णवरं गुणेसु लुद्धा।** (धर्मो पृ. १०२) फक्त गुणांचे ठायी लुब्ध.

९) **प्रमत्त : जिणधम्ममि पमत्ता ।** (सुपास ६२९) जिनधर्माबद्दल प्रमाद करणारी.

१०) **उद्विग्न** : उव्विग्गा सयलकज्जेसु। (सुर १०.३१) सर्व कार्यात उद्विग्न

अ) पुढील विशेषणांनाही सप्तमीची अपेक्षा असते.

१) **समो निंदापसंसासु।** (उत्त १९.९०) निंदा-प्रशंसेचे बाबतीत सम. २) **छेओ परचित्त परिण्णाणे।** (महा पृ. २३ अ) दुसऱ्याचे चित्त जाणण्यांत हुशार ३) **तवोकम्मंसि उज्जत्तो।** (उत्र १९.८०) तपः कर्मात उद्युक्त ४) **मंदो सद्धम्मकज्जम्मि।** (सुपास ५०७) सद्धर्मकार्यात मंद ५) **परंमुहो परकलत्ते।** (समरा पृ. ४०६) परस्त्रीपासून पराङ्मुख ६) **असंतुट्ठो परोवयारे।** (समरा पृ. ४०६) परोपकार करण्यांत असंतुष्ट ७) **अणुकूला सव्वकज्जेसु।** (नाण १०.१५) सर्व कार्यात अनुकुल ८) **संजमम्मि य जुत्ताणं।** (दस ३.१०) संयमात युक्त असणाऱ्यांचे ९) **आयाण निक्खेवे संजओ।** (उत्त१२.२) आदान-निक्षेपांच्या बाबतीत संयत

१२) समकालीन क्रिया वा सहचारी स्थिती दर्शविताना सति सप्तमीचा[१] उपयोग केला जातो.

१) **संते पाइयकव्वे को सक्कद सक्कमं पढिडं।** (वज्जा २९) प्राकृत काव्य असताना संस्कृत काव्याचा भ्यास कोण करू शकेल? २) **थणियसद्द कुणमाणेसु सजलजलहरेसु मंदं मंदं निवडंतीसु वारिधारासु नियनियगेहं अणुवच्चंतेसु पहियजणेसु माणससरं सरंतेसु रायहंसेसु सामी पडिनियत्तिऊण समागओ तत्थेव।** (महा पृ. १४६ ब) जलपूर्ण मेघ गर्जना करीत असताना (पावसाच्या) पाण्याच्या दारा मंद मंद पडत असताना वाटसरू आपापल्या घरी (परत) चालले असताना, राजहंस मानस सरोवर आठवीत असतांना स्वामी मागे परतून त्याच ठिकाणी आला. (३०) तम्मि य गए भणियं जण्हुकुमारेण।

(पाकमा. पृ. २०) आणि तो गेल्यावर जण्हुकुमाराने म्हटले ४) **एवं च कए समाणे लोयवाओ वि परिहरिओ होइ।** (समरा पृ. १०६) आणि असे केले असता लोकापवाद सुद्धा दूर केला असे होईल.

अ) धातुसाधिताबरोबर कधी एवं, इत्थं, इह, तहा यांचा उपयोग केला जातो.

१) तहा कए खुब्भइ सामंतवग्गो (महा पृ. ३२ अ) तसे केले असता सामंतवर्ग क्षुब्ध होईल. २) इय भणिए सो चिंतेउ आरद्धो। (महा १.८२) असे म्हटले असता त्याने विचार करण्यास सुरवात केली.

आ) धातुसाधिताबरोबर एव, मेत्त (मात्र) यांचा उपयोग असता 'तत्क्षणी, नाही-तोच' असा अर्थ होतो.

**१) एवं च भणियमेत्ते गणहरवसहो कहेइ भूयत्थं।** (पउम ४.६७) असे

---

*१ सति सप्तमी : जेव्हा गौण घटना व क्रिया यांनी प्रधान घटनेच्या वा क्रियेच्या कालाचा-समकालीन वा किंचित उत्तरकालीन-बोध होतो, तेव्हा सति सप्तमी वापरतात. १) समकालीन घटना असता, गौण घटनेतील क्रियापदांचे व का. धा. वि. आणि घटना भिन्न कालीन असतां, धातूचे क. भू. धा. वि. यांचा उपयोग करतात २) कर्तरि धातु विशेषण व कर्ता हे दोन्हीही सप्तमीत ठेवले जातात, कर्मणि धातु विशेषण असल्यास त्याचे कर्म व ते धातुसाधित यांची सप्तमी ३) या सप्तम्यन्त शब्दाबरोबर 'अस' चे सप्तम्यन्त व का. धा. वि. कधी उक्त वा अनुक्त असते.*
*सत्षष्ठीच्या रचनेत सप्तमीऐवजी षष्ठी वापरावयाची.*

म्हणताच श्रेष्ठ गणधाराने खरा अर्थ सांगितला २) **कुमारे दिट्ठमेत्ते चेव तीए महंतो अणुबंधो आसि।** (कथा पृ. १४८) कुमाराला पहाताच तिच्या ठायी खूप प्रेम निर्माण झाले.

१३) कधी इतर काही विभक्तींऐवजी सप्तमीचा उपयोग केलेला आढळतो.

अ) द्वितीयेऐवजी[1] :- तिलजंतम्मि वहंतो अहोनिसिं दुब्बलो जाओ। (सुर १६.१९०) अहर्निश तिल-यंत्र वाहून दुर्बळ झाला.

आ) तृतीयेऐवजी[1] : १) **तिसु तेसु अलंकिया पुहवी।** (वज्जा ८७) त्या तिघांकडून पृथ्वी अलंकृत होते. २) जइ विय गएसु अंगं पेल्लिज्जइ। (पउम २.१०९) आणि जरी हत्तींकडून अंग पीडिले जाई ३) **पुप्फेसु होज्ज उम्मीसं बीएसु हरिएसु वा।** (दस ५.१.५७) फुले वा बी अथवा हरित यांशी मिश्र होईल.

इ) पंचमी ऐवजी :- १) **चंदेसु निम्मलयरा आइच्चेसु अहियं पयासमरा सिद्धा ।** (सामा पृ. १३) चंद्रापेक्षा अधिक निर्मल, सूर्यापेक्षा अधिक प्रकाश देणारे सिद्धं २) **विणिमहंति भोगेसु।** (दस २.११) भोगांतून निवृत्त होतात. ३) **विरमह विसएसुं।** (कथा पृ. १५५) विषयांतून निवृत्त व्हा. ४) **पाणेसु पियतरी** (वसु पृ. २३६) प्राणापेक्षा अधिक प्रिय.

ई) षष्ठीऐवजी : **अज्ज सुहम्मे थेरे तिक्खुत्रो आयहिण पयाहिणं करेइ[2]।** (नायासं पृ. २) माननीय वृद्ध आर्य सुहम्माला तीनदा प्रदक्षिणा करतो.

## ४१३ संबोधन विभक्तीचे उपयोग

१) **हाक मारतांना : १) पुत्तय तुह साहसेण तुट्ठ म्हि।** (महा पृ. १६३ ब) मुला तुझ्या साहसाने मी संतुष्ट झाले आहे. २) **भयवइ कुलदेवए।** (समरा पृ. २४९) भगवती कुलदेवते।

२) कधी 'धी' या अव्ययाबरोबर संबोधनाचा उपयोग केला जातो. १) धी धी पुरोहियाहम। (महा पृ. ५८ ब) अधम पुरोहिता। धिक्कार (तुझा)। २) धि धि उज्जहकारिए। (धर्मो पृ. ८६) मालिन्य आणणाऱ्या स्त्रिये, धिक्कार (तुझा)।

---

१ *द्वितीयातृतीययोः सप्तमी। हेम ३.१३५*

२ *अज्ज सुहम्मे थेरे इत्यत्र षष्ठ्यर्थे सप्तमी । अभयदेव नाया पोथी पृ. १० ब.*

प्रकरण २५

# काळ व अर्थ यांचे उपयोग

### ४१४ वर्तमानकाळाचे उपयोग

१) वर्तमानकालीन क्रिया दर्शविण्यास वर्तमानकाळाचा उपयोग होतो.

१) एसो सुमिणो सुपुत्र लाभं फुडं कहइ। (सुपास ५३५) हे स्वप्न चांगल्या ज्याचा लाभ स्पष्टपणे दर्शविते २) एयं पि नो वियाण इ। (महा पृ. १४७ अ) हे सुद्धा जाणत नाही.

अ) वर्तमानकालीन चालू (अपूर्ण) क्रिया दर्शविण्यास :

१) संख उरे वच्चामि तित्थाणं दंसणनिमित्तं। (अगड २१०) तीर्थें पहाण्यासाठी मी संखपुरास जात आहे. २) सो एसो आगच्छइ। (सिरि ११९) तो हा येत आहे.

२) सवयीची क्रिया दर्शविताना वर्तमानकाळाचा उपयोग करतात.

१) फरूसं न भणसि। (वज्जा ४०) कठोर बोलत नाहीस २) परवसणंमि सुहेणं संसारानिच्चयं कहइ लोओ। (पाकमा पृ. २६) दुसऱ्याच्या संकटकाली संसाराची अनित्यता लोक सुखाने सांगतात.

३) निसर्गाचे नियम व रचना, सजीव प्राण्यांची वैशिष्टये, सवयी इत्यादि व जे काही नित्य, नियमित एकरूप आहे ते दर्शविण्यास तसेच सामान्य सत्य सांगताना वर्तमानकाळाचा उपयोग केला जातो.

अ) १) संति पंच महब्भूया। (सूय १.१.१७) पांच महाभूते आहेत. २) निसाविरामे दिअहो समेइ दिणावसाणे च उवेइ राई। (पाइ पृ. ७७) रात्र संपल्यावर दिवस येतो, दिवसाचे शेवटी रात्र येते. ३) कालस्सद्ध हरई दिवायरो सव्वरी वि तस्सद्धं। (सुपास ४९१) काळाच अर्धा भाग सूर्य व अर्धा भाग रात्र हरण करतात.

आ) १) सव्वे सत्ता सुहं अहिलसंति न दुक्खं। (समरा पृ. ४०३) सर्व

प्राणी सुखाची इच्छा करतात, दुःखाची नाही. २) नियपक्खबलेणं चिय पडइ पयंगो पइवंगि। (पाकमा पृ. २०) स्वतःच्या पंखाच्या बळानेच पतंग दिव्यावर पडतो (झडप घालतो).

इ) १) सोक्खं न होइ कस्स वि निरंतर एत्थ संसारे। (वज्जा १९३) या संसारात कुणालाही कायमचे सुख मिळत नाही. २) कोहो पीइ पणासेइ। (दस ८.३८) क्रोध प्रीति नष्ट करतो.

४) कथनात भूतकाळार्थी वर्तमानकाळाचा उपयोग होतो.

१) रायगिहे नयरे सुदंसणो नाम गाहावई परिवसइ। (निरमा पृ. ६४) रायगिह नगरात सुदंसण नावाचा गृहस्थ रहात होता. २) जाब पुराओ बाहि निद्दच्छइ नरवरो सपरिवारो। (सिरि १११) जेव्हा राजा परिवारासह नगराबाहेर पडला.

अ) अपूर्ण वा रीति भूतकाळ दर्शविण्यासहि वर्तमानकाळाचा उपयोग होतो. १) दिवसे कीलइ पमयाजणेण। (सुपास ४९२) दिवसां स्त्रियांशी खेळी २) पश्वरिस सो गच्छइ उज्जेणिनिवस्स सेवाए। (सिरि ७९) प्रतिवर्षी तो उज्जेणीच्या राजाच्या सेवेस जात असे.

५) भविष्यकालीन क्रिया दाखविण्यासहि वर्तमानकाळाचा उपयोग होतो.

अ) विचार वा इच्छा गर्भित असतां प्रश्नार्थक सर्वनामा बरोबर वर्तमानाचा उपयोग भविष्यार्थी होतो. उदा. १) किं. करेमि कत्थ गच्छामि। (चउ पृ. १८) काय करावे? कोठे जावे? २) को तुह सासणं अइक्कमइ। (महा पृ. १६५ अ) तुझी आज्ञा कोण उल्लंघील?

आ) संदर्भाने : १) वच्च तुमं एस आगच्छामि। (समरा पृ. ५१७) जा तू हा मी येतोच (येईन) २) मोत्तूण इमं ठाणं देसंतर वच्चामि। (महा पृ. २४ अ) हे स्थान सोडून देशांतरी जाईन.

इ) भविष्यकालीन संकेत वाक्यातही वर्तमानाचा उपयोग आढळतो.

१) जइ अत्थि मज्झ पुन्न ता होही निग्गुणो वि गुणी। (सिरि १०६) जर माझे पुण्य असेल तर गुणरहित सुद्धा गुणी होईल. २) ह धणवंत जइ कमवि गंतु मग्गोसि सो वि धुवं एयं कज्ज पसाहइस्सइ। (महा पृ. १५९ ब) जर कोणा श्रीमंताकडे जाऊन मागशील तर तो सुध्दा तुझे हे कार्य खरोखर सिद्धीला नेईल.

ई) संकेत वाक्यांत वर्तमानकाळाचा अर्थ भविष्यार्थी[१] होतो.

१) जइ मम जं मग्गियं देह तो अहमवि मउडं देमि। (चउ पृ. २५) मी जे मागीन ते जर द्याल तर मी सुद्धां मुकुट देईन २) जइ तुमं पितत्थ वच्चासि ता पावेसि कणगदक्खिणं। (महा पृ. १६०ब) तू सुद्धा जर तेथे जाशील तर तुला सुवर्णदक्षिणा मिळेल.

५) कधी आज्ञार्थाने दाखविली जाणारी इच्छा दर्शविण्यास वर्तमानकाळाचा उपयोग होतो.

१) सा जयई सरस्सई देवी। (सुर १.१५) ती सरस्वती देवी विजयी असो। २) जयइ जयपसिध्दो वध्दमाणो जिणिंदो। (महा पृ. ३४०ब) जगप्रसिध्द जिनेंद्र वर्धमान विजयी असो।

६) निषेध दर्शविण्यास कधी 'मा' शी वर्तमानकाळाचा उपयोग केला[२] जातो. मा भायसि। (वसु पृ. २२१) भिऊ नकोस.

७) वर्तमानकाळाचा असंबंधित (paranthetical) उपयोग होतो.

१) तिलोक्कंमि वि मन्ने एरिसरूवा न इत्थिया अत्थि। (सुर १.९२) मला वाटते – त्रैलोक्यांत सुद्धां अशा रूपाची स्त्री नाही. २) मे मन्ने पुव्वभवे दिट्ठपुव्वो त्रि। (सुपास ५७२) मला वाटते (याला) मी पूर्वजन्मापूर्वी पाहिले होते.

**४१५ भूतकाळाचे उपयोग**

१) संस्कृतमधील तीन भूतकाळांपैकी अद्यतन भूतांतून (Arrist) अर्धमागधींतील भूतकाळ उद्भूत झालेला आहे. अनद्यतन व परोक्ष या प्रकारांची अगदी तुरळक रूपे अर्धमागधीत आढळतात.

प्रत्यक्ष अप्रत्यक्ष धातूंच्या भूतकालीन रूपांचा उपयोग अर्धमागधींत फार कमी प्रमाणांत आहे. वर्तमानकाळ व क. भू. धा. वि. यांच्या योगेंच भूतकाळाचे बहुतेक कार्य केले जाते.

---

*१ आपटे, पृ. १२९*

*२ घाटगे, पृ. २०४ पहा*

भूतकाळाचे[१] उपयोग पुढीलप्रमाणे :-

१) भूतकालीन क्रिया दर्शविण्यास भूतकाळाचा उपयोग होतो.

१) अहं एयं अकासि। (सूय २.१.१२) मी हे केले २) से पुरिसे एवं वयासी। (सूय २.१.२) तो पुरूष असे म्हणला. ३) तत्थ आसी पिया मज्झ। (उत्र २०१८) तेथे माझा पिता होता ४) अहोत्था विउलो डाहो। (उत्र २०.१९) फार दाह झाला. ५) इमाइ वयणाइ मुदा हरित्था। (उत्र १२.८) ही वचने बोलला.

२) कधी भविष्यकाळार्थी भूतकाळाचा उपयोग होतो[२].

१) तं किं णं देवाणुप्पिया विउलं असणं ४ पुप्फवत्थमल्लालंकारं ते इहं हव्वमाणिज्जड उदाह सयमेव गच्छित्था। (विवाग पृ. २७) तेव्हा हे भल्या माणसा!, विपुल अन्न (वगैरे, तसेच) फुले, वस्त्रे, माळा, अलंकार तुझ्यासाठी लवकर इकडे आणले जाऊ देत की (तूंच तिकडे) स्वतः जाशील?

२) अहं पि दूय आगओ एसो। (नल पृ. ८) दूता!, हा मी सुध्दा आलोच (येईन)

३) 'मा' या निषेधदर्शकाबरोबर उपयोग असतां भूतकाळाचा अर्थ आज्ञार्थी होतो. उदा. १) मा य चंडालियं कासि। (उत्त १.१०) दुष्ट कृत्य करू नकोस २) मा काासि कम्माइं महालयाइं। (उत्र १३.२६) वाईट (भयंकर) कर्मे करू नकोस.

४) संकेतात संकेताचा परिणाम दर्शविण्यास कधी भूतकाळाचा उपयोग केलेला आढळतो.

दगस्स फासेण सिया या सिद्धी सिज्झिंसु पापा बहवे दगंसि। (सूय १.७.१४) उदकाच्या स्पर्शाने जर सिद्धी (प्राप्त होणार असेल) तर पाण्यांतील पुष्कळ प्राण्यांना सिद्धि प्राप्त झाली असती.

---

*१ क्वचित् वर्तमानकालार्थी भूतकाळाचा उपयोग आढळतो. १) इच्चाहंसु पुढो जणा। (सूय १.३.१.६.) सामान्य जन असे म्हणतात. २) एस मए तुज्झ अप्पिओ अप्पा । (नल पृ. १७) हा मी माझा देह तुला अर्पण करते.*

*२ म. तुम्ही पुढे व्हा. हा मी आलोच (येईन)*

**४१६ भविष्यकाळाचे उपयोग**

१) भविष्यकालीन क्रिया दर्शविण्यास भविष्यकाळाचा उपयोग होतो.

१) को करिस्सइ उज्जोयं। (उत्र २३.७५) प्रकाश कोण करील?

२) समणो होहामि तुह अणुन्नाए। (सुमास ५८९) तुझी आज्ञा (अनुज्ञा) घेऊन मी श्रमण होईन.

२) कधी संशय, अनिश्चितता दर्शविण्यास भविष्यकाळाच उपयोग[1] करतात किं नाम काहामि सुएण भंते। (उत्र १७.२) महाराज विद्वत्तेने मी काय करू?

३) विनयाने आज्ञा, अनुज्ञा, उपदेश करतांना भविष्यकाळाचा उपयोग होतो. १) मं तुमं खाहिसि सुहेण। (नल पृ. १७) तू मला सुखाने खा. २) पच्छा धम्मं चरिस्ससि। (उत्र १९.४३) नंतर धर्म आचरण कर. ३) पच्छा अगाराओ अणगारियं पव्वइस्सासि। (नायासं पृ. २६) मग घर सोडून संन्यास घे.

४) क. भू. धा. वि. बरोबर भविष्यकालीन क्रियापदाचा उपयोग केलेला आढळतो.

१) अहवा पहाए मह, वयण सुध्दि सलिलाणयत्थं कत्थ विजलासए गओ भविस्सइ पिययमो। (नल पृ.१४) अथवा पहाटे मला तोंड धुण्यासाठी पाणी आणण्यास कोठेतरी सरोवरावर (माझा) प्रियतम गेला असेल २) एएहिं चोरेहिं निहयचेमणा कमा भविस्संति। (महा पृ. २४ अ) ह्या चोरांनो (त्यांना) बेशुध्द केले असेल.

५) 'मा' या निषेधदर्शकाबरोबर आज्ञार्थाचे अर्थी भविष्यकाळाचा पुष्कळदा उपयोग केलेला आढळतो.

१) मा. भमिहिसि घोरे संसार सागरे। (उत्त २५.४०) घोर संसार सागरांत भ्रमण करू नकोस २) मा हु तुब्भं सरीरस्स वावत्ती भविस्सइ। (पृ. १२१) तुमच्या शरीराचा नाश होऊ दे नको. ३) एयंमि मा पमायं काहिसि (महा. १.९२) या बाबतीत प्रमाद करूं नकोस.

६) संकेताच्या दोन्ही वाक्यांत भविष्यकाळाचा उपयोग होतो.

---

*१ घाटगे, पृ. २०५*

१) जइ मम जाउयाओ जाणिस्संति तो मम खिंसिस्संति (प्रयांस पृ. १६२) माझ्या जावांना कळेल तर त्या माझी निंदा करतील. २) जइ तुम्होवरि राओ भविस्सइ एयासिं तो हं पासाओ वरिं रत्तं पडागं चालिस्सामि । (बंभ पृ. ५२) जर तुझ्यावर यांचे प्रेम असेल तर मी प्रासादावर लाल ध्वज हलवीन.

**४१७ आज्ञार्थाचे उपयोग**

१) तीन पुरूषात आज्ञार्थाचे पुढीलप्रमाणे विविध अर्थ होतात.

अ) प्रथम पुरूषांत प्रश्नपूर्वक अनुज्ञा (वानुमती अनुज्ञा), इच्छा, हेतु, आवश्यकता इत्यादींचा बोध होतो.

१) किं पच्छाहुत्तं नियत्तामो उयाहु तत्थेव अत्ताणं खिवामो । (महा. पृ. २७७ अ) मागे परतू या की तेथेच स्वतःला फेकू या? २) एहि नरवइसमीवं गच्छम्ह। (समरा पृ. २९७) चल, राजाजवळ जाऊ या ३) भद्दे! एहि भुंजाओ ताव भोगे। (धर्मो पृ. २०) भद्रे! ये, प्रथम भोग तर भोगू या.

आ) द्वितीय पुरुषांत आज्ञा, विनंती, आशिर्वाद, उपदेश इत्यादींचा बोध होतो.

१) आज्ञा : १) भिक्खू जायाहि अन्नओ । (उत्त २५.६) भिक्षु, दुसरीकडे याचना कर. २) अन्नत्थ कुणसु गमणं। (अगड ८) दुसरीकडे गमन कर.

२) विनंति : १) निसुणसु नरंवर! अक्खाणयं इमं रम्मं। (सिरि ३६) राजा! हे रम्य आख्यान ऐक २) सामिय कुणसु पसाय। (पइम ३४.११) स्वामी प्रसाद करा.

३) आशिर्वाद : १) चिरंजीव। (समरा पृ. २४५) चिरकाळ जग २) वच्छ जीव नंद चिर कालं। (सिरि २६१) बाळा चिरकाळ जग व सुखी रहा.

४) उपदेश : करेह जिणिंदपणीयं साहुधम्मं। (बंभ पृ. ३१) जिनेंद्रप्रणीत साधुधर्म आचरा

५) जयजयकार : १) जय तिहुयणनाह! सणंकुमार । (पाकमा पृ. ५२) हे त्रिभुवननाथ सणंकुमारा!, विजयी हो २) जय सयलजीव वच्छल। (समरा पृ. २४७) हे सकल जीवावुर वत्सल असणाऱ्या, विजयी हो.

इ) तृतीय[१] पुरूषांत विनयपूर्वक आज्ञा, अनुज्ञा, विनंति, आशिर्वाद, आशा, प्रार्थना इत्यादींचा बोध होतो.

१) आज्ञा : १) जक्खो मम अंगरक्खओ होउ। (सुपास ४९३) यक्ष माझा अंगरक्षक होऊ दे २) जो विज्जा बलेण गंतुं समत्थो सो वच्चउ। (धर्मो पृ. १७३) जो विद्याबलाने जाण्यास समर्थ आहे तो जाऊ दे.

२) अनुज्ञा : दोसग्गहणेण खलो जइ तूसइ तू उ वराओ। (जिन१) दोष काढून जर खल संतुष्ट होत असेल तर होऊ दे बिचारा।

३) विनंति : १) संदिसंतु णं देवाणुप्पिया किं आगमणप्प ओयणं। (विवाग पृ. ५३) महाराजांनी आगमनाचे प्रयोजन काय ते सांगावे २) निउणबुध्दीए परिचिंतउ सामी। (महा पृ. २३६ ब) निपुणबुध्दीने स्वामी विचार करू दे.

४) प्रार्थना : १) सिद्धा सिद्धी मम दिसंतु। (सामा पृ. १३) मला सिद्धांनी सिद्दी द्यावी. २) तित्थयरा मे पसीयंतु। (सामा पृ. १३) तीर्थंकर माझ्यावर प्रसन्न होवोत.

५) आशिर्वाद : १) दिसउ जिणसुपासो मंगलं वो सया सो। (सुपास ६५७) तो सुपास जिन तुम्हाला सदा मंगल देवो. २) रक्खंतु वो सेसस्स फणमणिभअहा। (लीला ५) शेषाच्या फणीचे मणिकिरण तुमचे रक्षण करोत.

६) इच्छा : एयं सच्चं तुह भासियं होउ। (सुपास ५३५) हे तुझे बोलणे खरे होऊ दे.

७) (शक्यता, संशय) इत्यादि इतर १) रमउ थोवदिवसे। (जिन १०) थोडे दिवस रमूंदे २) एवं होउ। (संपइ २.७२) असे होऊ दे.

३) होऊ कोवि। (जिन ३२) कोणीही असू दे

४) वच्छे! तुज्झ वरो केरिसो होउ। (सिरि ८२) मुली!, तुझा पति कसला असू दे?

---

*१ धातूच्या कर्मणि रूपाचा आज्ञार्थांत तृ. पु. त उपयोग असतां तो एक उपचार होतो. उदा. अओ पढमं दूयपेसणेण से मुणिज्ज उमणं। पच्छाजहाजुत्रं किज्जउ। (नल पृ. ७-८); कीरड अम्हाणं समीहिय। (बंभ पृ. ७२) पसाओ कीरड आसणगहणेण। (बंभ पृ. ६९)*

२) 'मा' बरोबर आज्ञार्थाचा उपयोग असतां निषेध दर्शविला जातो.

अ) प्र. पु. : मा कुले गंधणा होमो। (दस २.८) कुळांत गंधण (सापा) प्रमाणे आपण होऊ या नको.

आ) द्वि. पु. : १) मा लज्ज मुद्धे ! (उसा १.२१) मुग्धे, लाजू नकोस २० मा एऐण पहेण वच्चह । (महा पृ. १५९ ) या मार्गाने जाऊ नका.

इ) तृ. पु. : १) मा होउ सुयमरण। (पाइ पृ. ६१) मुलाचा मृत्यू होऊ दे नको. २) मा वहउ कोइ गव्वं। (सिरि ३२९) कोणीहि गर्व करू दे नको.

टीप : क्वचित् 'मा' ऐवजी 'अलाहि' चा उपयोग आढळतो अलाहि चा उपयोग आढळतो. अलाहि जूरावसु तवस्सिं। (मार्क ८.३) तपस्व्याला ठकवू नकोस.

३) कधी कधी संकेत वाक्यांतहि आज्ञार्थाचा उपयोग केलेला आढळतो.

१) सुणसु जइ अत्थि कोऊहलं। (महा. पृ. २३ ब) जर कुतूहल असेल तर ऐक.

२) एयं सरणं उवेह ... जइ इच्छह जीवियं वा धणं वा। (उत्र १२.२८) जर जिविताची वाधवाची इच्छा असेल तर मला शरण या.

**४१८ विध्यर्थाचे[१] उपयोग :**

१) विधि (कर्तव्य, आज्ञा), विनयपूर्वक आज्ञा, प्रार्थना, इच्छा, आशिर्वाद, विनंति इत्यादींचा बोध विध्यर्थाने होतो.

२) विधि (आज्ञा, कर्तव्य): १) मुसं परिहरे भिक्खू। (उत्र १.२४) भिक्षूने खोटे टाळावे. २) नाणी नो परिदेवए। (उत्र २.१३) ज्ञान्याने शोक करू नये.

२) नम्र आज्ञा : १) तुमं पुण एयस्स सोहणं परिरक्खणं करेज्जासि। (अरी पृ. ५) तू मात्र याचे चांगले रक्षण कर २) अणाहओ य मा पयमवि चलेज्जासि। (महा पृ. ७५ ब) बोलावले नसतां एक पाऊलहि हलू नकोस.

३) प्रार्थना १) सुमरिज्जासि मं। (महा पृ. १७० ब) माझी आठवण

---

१ *संदर्भानुरूप विध्यर्थाचे अर्थ काही ठिकाणी आज्ञार्थाप्रमाणे होतात.*

ठेवावीस (,) नियजणणिं च सरिज्जसु ... मं. पि नियदासिं । (सिरि ३५७) आपल्या आईची व माझी आपल्या दासीची - हि आठवण ठेवावीस.

४) इच्छा : अन्नजम्मंमि वि महं तुमं चेव नाहो होज्जसु। (पाकमा पृ. ५९) दुसऱ्या जन्मातहि तूच माझा नाथ (पति) व्हावेस.

५) आशिर्वाद : भद्दस्स वो भत्तिगुणल्लिआणं भवेज्ज णिच्चं भअवं गणेसो। (उसा १.१) भक्तिगुणलिलिआणं भवेज्ज णिच्चं भअवं गणेसो । (उसा १.१) भक्तिगुणांनी युक्त अशा तुमचे भगवान गणेश नेहमी चांगले करो।

६) विनंति : तुब्भे पएसिस्स रन्नो धम्ममाइक्खेज्जाह। (पएसि परि १८) तुम्ही पएसि राजाला धर्म सांगावात.

२) कर्तृरहित विध्यर्थाचा उपयोग प्रायः विधि, नियम दर्शविण्यास केला जातो. उदा. नापुट्ठो वागरे किंचि पुट्ठो वा नालियं वए। (उत्र १.१४) विचारले नसतां बोलू नये, विचारले असतां खोटे बोलू नये.

३) शक्यता, शक्तता, संभवात, अशक्यता, असंभवना, शंका, संशय इत्यादींचाही बोध विध्यर्थाने होतो.

१) शक्यता : १) एवंविह रूवेणं हविज्ज एसो फुडं चोरो। (अगड १०४) अशा रूपांत हा चोर असण्याची स्पष्ट शक्यता आहे. २) गामाणुगामं रीयंतं अणगारं... अरई अणुप्पवेसेज्जा। (उत्तर २.१४) गावोगांव हिंडणाऱ्या अणगाराच्या ठिकाणी नावड प्रवेश करील.

२) संभरता : १) नूणं होज्ज विलुक्को कत्थइ परिहासकज्जेण। (जिन पृ. १५) गंमत करण्यास कोठे तरी दडला असेल. २) एयंमि घेप्पमाणे कयाइ नरवई अवगच्छे। (समरा पृ. १५२) हे घेतले असता कदाचित् राजाला कळेल.

३) शक्तता : लोगं पि एसो कुविओ डहेज्जा। (उत्त १२.२८) रागावला तर हा जगसुध्दा जाळील.

४) अशक्यता : ता कि ससिबिंबाओ अंगाराण पि होज्ज इह वुट्ठी। (सुपास ६००) चंद्रबिंबातून अंगारांची वृष्टी होईल काय?

५) असंभवता : १) किंकरनारीण को तस्स करेज्ज परिसंखा। (पउम. ४.६०) त्याच्या सेवक-सेविकांची मोजदाद कोण करेल? २) को किर मच्चूए रक्खिज्जा। (सुपास ६४०) मृत्यूपासून कोण रक्षील?

६) शंका, संशय : १) किमेयं मंगलगेण ववसियं भवे। (समरा पृ. १४७) हे मंगलगाणे केले असेल काय? २) को अम्हं दिज्ज भत्तं। (धूर्ता १.११) आम्हाला कोण अन्न देईल?

७) एकवेळ अशक्य गोष्ट शक्य होईल, असे गृहीत विधान सांगतानाहि विध्यर्थाचा उपयोग केला जातो.

१) सुवण्णरूप्पस्स उ पव्वया भवे। (उत्र ९य४८) सोन्या रूप्याचे पर्वत होतील. २) होज्जा खीरं पि गोविसाणाओ। (समरा पृ. ४००) गाईच्या शिंगातूनही दूध मिळेल.

४) परस्परावलंबी वाक्यांतील परिणामदर्शक वाक्य कधी विध्यर्थांत ठेवले[1] जाते.

किं नाम होज्ज तं कम्मयं जेणाहं न दोग्गइं गच्छेज्जा। (उत्त ८.१) ते काय बरे कर्म असेल की ज्यामुळे मी दुर्गतीला जाणार नाही?

५) संकेतवाक्यांत विध्यर्थाचा उपयोग केला जातो.

१) जइ अरिट्ठणेमी ... नंदणवणे विहरेज्जा तएणं अहं अरिट्ठणे मि वदिज्जा। (निरया पृ. ७३) जर अरिष्टनेमी नंदनवनात विहार करील तर (नंतर) मी त्याला वंदन करीन. २) को व ण लभेज्ज मोक्खं रागद्दोसा जइ न होज्जा। (वसु पृ. ३२२) रागद्वेष। जर नसते तर कुणाला बरे मोक्ष मिळाला नसता?

६) क. भू. धा. वि. बरोबर विध्यर्थाचा उपयोग केलेला आढळतो.

१) सट्ठाणं गओ होज्जा। (महा पृ. २३० अ) स्वस्थानी गेला असेल २) केण पुण होज्ज छिण्णा एस रज्जू। (जिन पृ. २७) ही रज्जू कोणी बरे तोडली असेल?

७) कधी विध्यर्थाचा उपयोग भविष्यकाळार्थी होतो.

१) नो खलु अहं सागरदत्तस्स गिहं गच्छेज्जा। (नामास पृ. १७१) मुळीच सागरदत्ताच्या घरी जाणार नाही. २) न हविज्ज धम्मबुद्धी मूढस्स उ लोभमोहेणं। (पउम. २.७८) लोभ-मोहामुळे मूढाला धर्मबुद्धी होणार नाही.

८) निषेध दर्शविण्यास पुष्कळदा ‘मा’ बरोबर विध्यर्थाचा उपयोग केलेला

---

१ *आपटे पृ. १३६*

आढळतो.

१) मा णं तुब्भे दक्खिणिल्लं वणसंडं गच्छेज्जाह (नामासं पृ. १२५) दक्षिणेकडील वनाच्या वृक्षराजींत तुम्ही जाऊ नका २) मा पुण एवं करेज्जासु । (महा पृ. २९९ ब) पुनः असे करू नकोस

**४१९ संकेतार्थाचे उपयोग**

'जर-तर' हा अर्थ दाखविण्यास संकेतार्थाचा उपयोग होतो. गरूआवईए तं नाह निवडंतो ।। (सुर ८.१७) जर तेव्हा मी प्राणत्याग केला असतां तर, हे नाथ! तू आतां असल्या महासंकटांत पड़ला. असतास काय? २) जइ एस विज्जासिद्धो मम भइणी चंदकंताए न बंभचेर भंग करेंतो ता इमीए सयंपभा नाम महाविज्जा साहिया हुंता। (महा पृ. १६४ अ) जर या विद्यासिद्धाने माझ्या बहिणीचा - चंदकांतेचा-ब्रह्मचर्यभंग केला नसता तर तिने सयंपभा नावाची महाविद्या साधली असती.

प्रकरण २६

# काही धातुसाधित विशेषणांचे उपयोग

## ४२० प्रारंभिक

येथे सर्वच धातुसाधित विशेषणांच्या उपयोगांचा विचार केलेला नाही. धातू विशेषणांतील मुख्य म्हणजे कर्तरि व कर्मणि व का. धा. वि., कर्तरि भूत. धा. वि. व क. भू. धा. वि. आणि वि. क. धा. वि. यांच्या उपयोगांचा विचार पुढे क्रमाने केला आहे.

## ४२१ कर्तरि व. का. धा. वि. चे[1] उपयोग

१) एक मुख्य क्रिया कर्ता करीत असतां, तो जर त्याचवेळी दुसरी गौण क्रियाहि करीत असेल, तर ती गौण क्रिया कर्तरि व का. धा. वि. ने. निर्दिष्ट होते.

१) उट्ठिओ वियंभमाणो। (बंभ. पृ. ६६) जांभई देत उठला २) हसंतो नाभिगच्छेज्जा। (दस. ५.१.१४) हसत जाऊ नये. ३) गज्जंतो उट्ठिओ केसरी। (महा. पृ. ४८ अ) गर्जना करीत सिंह उठला ४) वेवमाणी निसीमई। (उत्त २२.३५) कांपत (खाली) बसली.

२) सवय, रीत स्वभाव, स्थिती दर्शविण्यास व का. धा. वि. चा उपयोग होतो.

१) दुक्खाणी अणुहवंता अणंतकालं परिभमंति। (पउम ४.२८) दुःखे

---

१ *अर्धमागधीत क्रियापद व त्यांचेच व का.। धा. वि. यांचा एकदम उपयोग केलेला आढळतो. अडमाणे अडइ। (विवाह १९१), फुसमाणे फुसइ (विवाह ३५४) , हणमाणे हणइ (विवाह ८४९), पेइह पेहमाणे (पण्णवणा ४३५), सुणमाणे सुणेइ (आचारंग १.१.५.३) (पिशेल पृ. ३८२-३८३)*

अनुभव अनंत काळ हिंडतात २) तत्थ देवसुहं निसेवमाणा गमेंति कालं । (चउ पृ. ३२) तेथे देवसुखे सेवीत काळ घालवितात.

अ) व. का. धा. वि. बरोबर चिट्ठ (स्था) (वा अस) चा उपयोग असतां क्रियासातत्य निर्दिष्ट होते.

१) जग्गंतो ठिओ राया। (नल पृ. ५०) राजा जागत राहिला २) अमरिसेणं पलोयंतो अच्छइ। (महा पृ. १७५ अ) रागाने पहात राहिला.

३) व. का. धा.वि. चा उपयोग विशेषणांप्रमाणे[२] होतो.

१) अत्थं गच्छंतस्स वि रविणो। (वज्जा १०२) अस्ताला जाणाऱ्या सूर्याचे सुद्धा २) तं रुयमाणिं दट्ठुं। (सिरि ३०१) रडणाऱ्या तिला पाहून

४) क. भू. धा. वि. सह 'अस' च्या व. का. धा. वि. चा उपयोग, 'असतां' या अर्थी होतो. उदा. १) पडिबुध्दा समाणी। (नल पृ. १४) जागी झाली असतां. २) बंधेहिं पीडिओ संतो। (सुपास ५९६) बंधनांनी पीडित झाला असता.

५) क्वचित् क्रियाविशेषण अव्ययाप्रमाणे व. का. धा. वि. चा उपयोग केला जातो.

१) जयं चरे जयं चिट्ठे जयं आसे जयं सए। (दस. ४.८) काळजीपूर्वक हिंडावे, उभे रहावे, बसावे, निजावे २) ते जाणमजाणं वा न हणे नो व घायए। (दस ६.१०) जाणतां वा अजाणतां त्यांना ठार मारू नये वा मारवू नये.

६) संकेतवाक्यांत व का. धा. वि. चा उपयोग होतो.

जइ जिणधम्मं सेविज्ज हं तया तो सुही होंतो। (जिन पृ. २१) तेव्हां जर मी जिनधर्म आचरिला असतां तर मी सुखी झालो असतो.

७) संकेतार्थ करण्यास व. का. धा. वि. चा उपयोग केला जातो.

१) नूणमियाणिं गच्छंतओ सि जइ मं न पेच्छंतो। (महा पृ. १४४ अ) जर मला पाहिले नसतेस तर तू आतां खरंच गेला असतास २) जइ तुहाभिप्पायं मुणिंतो ता अहं पि बंभचेर करिंतो। (महा प–. १६५ अ) जर तुझा अभिप्राय कळला असतां तर मी हि ब्रह्मचर्य पाळले असते.

८) सत्षष्ठी व सती सप्तमी रचनेत व. का. धा. वि. चा. उपयोग होतो.

अ) सत्षष्ठी : मंतसाहणं मम कुणंतस्स एगो महापिसाओ सहस च्चिय

उट्ठिओ भीमो। (महा. २.२५७) मी मंत्रसाधन करीत असतां एक भयंकर महापिशाच आचनक उठले.

आ) सति सप्तमी : मइ विज्जमाणे मा उव्वेव-भायणं होसु। (जिन पृ. १०) मी असताना उव्देग करू नकोस.

९) संबंधी गौणवाक्य१ व. का. धा. वि. च्या उपयोगाने संक्षिप्त करता येते.

१) जग्गंतस्स भयं नत्थि। (नल पृ. ५०) जागणाऱ्याला भय असत नाही.

२) अहम्मं कुणमाणस्स अफला जंति राइओ। धम्मं च कुणमाणस्स सफला जति राइओ। (उत्त १४.२४-२५) अधर्म करणाऱ्याच्या रात्री निष्फळ होतात; धर्म करणाऱ्याच्या रात्री सफळ होतात.

१०) क्वचित् व का. धि. वि. चा उपयोग प्रत्यक्ष क्रियापदाऐवजी[१] केलेला आढळतो. उदा. मा हं परेहिं दम्मंतो। (उत्र १.१६) मी दुसऱ्याकडून दमन केला जाऊ देऊ नको २) मम ताओ कहं जीवंतो। (धर्मो पृ. १५९) माझा बाप कसा जगत होता? ३) सो सव्वो तुह गुणनिवहं मह कहिंतो। (सुर ११.१४८) ते सर्व तुझ्या गुणगणाबद्दल मला सांगीत.

## ४२२ कर्मणि व. का. धा. वि. चे उपयोग

१) कर्मणि व. का. धा. वि. चा. विशेषणाप्रमाणे[२] उपयोग होतो.

१) ते डज्झमाणा कलुणं थणंति। (सूय १.५.१.७) जाळले जाणारे ते करूणपणे ओरडतात. २) काले च्चिय कीरंतो ववसाओ कज्जसाहगो होइ। (महा. पृ. २८८ ब) (योग्य) वेळी केला जाणारा व्यवसायच कार्यसाधक होतो.

२) सत्सप्तमी रचनेत कर्मणि व का. धा. वि. चा उपयोग होतो.

१) मिहिलाए डज्झमाणीए न मे डज्झइ किंचण। (उत्र ९.१४) मिथिला जाळली जात असता माझे काहीहि जाळले जात नाही. २) एवं पि कीरमाणे कयावि गुणो होज्जा। (महा पृ. १२९ ब) असे केले असतां कदाचित् गुण येईल.

---

१ *घाटगे पृ. २०९*

२ *समासांत : छिज्जमाणहियओ (नल पृ. ४१) दूमिज्जमाण माणसेण (कथा पृ. १०७) इ.*

## ४२३ क. भू. धा. वि. चे उपयोग

१) (क्रियापदाऐवजी) भूतकाळ दर्शविण्यास : अ) सकर्मक क्रियापदाच्या क. भू. धा. वि. चा उपयोग करताना (कर्म उक्त असल्यास)[1] कर्मणि प्रयोग होतो[2].

कर्तृपद तृतीयेत जाते, कर्म प्रथमेत येते आणि या प्रथमान्त कर्माच्या लिंग, वचन विभक्ती प्रमाणे क. भू. धा. वि. चे लिंग, वचन विभक्ति असते.

१) को इत्थीहिं न खुहिओ। (धूर्ता १.६२) स्त्रियांनी कुणाला क्षुब्ध केलेले नाही? २) दिट्ठा निवेण सा बाला। (सिरि ८२) राजाने ती बाला पाहिली. ३) पवणेण वत्थाइं हियाइं सव्वाइं। (धूर्ता ५.४६) वाऱ्याने सर्व वस्त्रे हरण केली.

आ) वाऱ्यांत सकर्मक क्रियापदाचे पुढील वाक्य हे कर्म असेल तर क. भू. धा. वि. चा उपयोग करताना भावे प्रयोग होतो. कर्तृपद तृतीयेत जाते व क. भू. धा. वि. हे नेहमी नपुं. द्वि. ए. व. त असते.

१) गुरुणा वत्तं-सुण। (नल पृ. १) गुरूने म्हटले 'ऐक' २) चिंतियं राइणा उत्तम पुरिसो एसो। (अगड पृ. २९) राजाने विचार केला हा उत्तम पुरूष आहे.

इ) गत्यर्थक व अकर्मक धातूंच्या क. भू. धा. वि. चा उपयोग कर्तरि[3] होतो. कर्तृपद प्रथमेंत व कर्त्याच्या लिंग, वचन, विभक्तीप्रमाणे क. भू.धा. वि. चे लिंग, वचन, विभक्ति असते.

१) निसण्णो राया (चउ पृ. १९) राजा बसला २) संतत्था लोया। (नल. पृ. १६) लोक संत्रस्त झाले ३) पणट्ठं तिमिरं। (धर्मो पृ. ३०) तिमिर नष्ट झाले

---

*१ प्रयोगविचार पहा*

*२ कधी कर्मणि प्रयोगाऐवजी कर्तरि प्रयोगच आढळतो. १) भुत्तो दिव्वाहारं सभारिओ राया। (चउ पृ ४६) २) राया ... एयं भणिउं आढन्तो । (अगड ७) ३) सीहोयरो पउत्तो। (पउम ३३.१४०) तेव्हा लक्ष्मण म्हणाला*

*३ अशा वेळी कधी भावे प्रयोग वापरलेला आढळतो. १) वियसिग लोयणेहिं। पणट्ठं पावेणं। ऊससियं अंगेहिं। (समरा पृ. ८३) २) गज्जिमं मेहेहि। (समरा पृ. ३७०) ३) रोइयं नगरनारीहिं। (नल पृ. ११) नगरांतील स्त्रिया रडल्या ४) हसियं राइणा। (धर्मो पृ. २०४) ५) चलिं महचित्तेणं। (नल पृ. २३) ६) मए चिरं रूण्णं । (लीला ६४३) मी बराच वेळ रडले.*

४) बोलीणाइं बहूइं वरिसाइं। (महा. पृ. १२ ब) पुष्कळ वर्षे निघून गेली.

२) क. भू. धा. वि. बरोबर अस् [ वा भू (भवा हव ] चा उपयोग असतां पूर्ण भूतकाळ निर्दिष्ट होतो.

१) आगओ आसि अहं। (चउ पृ. ३१) मी आलो आहे. २) जं तए पुच्छियं पुरा आसि। (महा पृ. ८६ ब ) जे तू मागे विचारले होतेस.३) क. भू. धा. वि. बरोबर 'चिट्ठ' (स्था) च्या उपयोगाने क्रियासातत्य निर्दिष्ट होते.

१) मउरा य पंजरंसि संनिरुध्दा चिट्ठंति। (विवाग पृ. ४६) आणि पिंजऱ्यात मोर अडकवून ठेवलेले आहेत. २) सो ... आगओ दुवारंमि चिट्ठइ। (सुर २.१०८) तो दारांत येऊन उभा राहिला आहे.

४) कधी 'अस्' च्या व का. धा. वि. बरोबर क. भू. धा. वि. चा उपयोग केला जातो.

१) कह कह वि पट्ठविया संती। (धर्मो पृ. ४८) कशीतरी पाठविली असता. २) मओ समाणो। (धर्मो पृ. ८१) मृत झाला असता.

५) कधी क. भू. धा. वि. ने भविष्यकाळ[१] निर्दिष्ट होतो.

१) एसो अहं आगओ। (समरा पृ. ३८१) हा मी आलो (येईन) २) एसो हं आगओ सिग्घं। (नाण ४.७२) हा मी शीघ्र आलोच (येईन)

६) मन्न (मन्) व तदर्थक धातूंच्या क. भू. धा. वि. चा उपयोग२ वर्तमानार्थी होतो. बहुमओ नरवइस्स। (महा पृ. १७८ ब) राजाला फार मान्य.

७) क. भू. धा. वि. चा उपयोग विशेषणाप्रमाणे[३] होतो.

१) एवं भुत्ताण भोगाणं परिणामो न सुंदरो। (उत्र १९.१७) अशाप्रकारे भोगलेल्या भोगांचा परिणाम चांगला होत नाही. २) वग्घो दिट्ठो मए सुत्तो। (सुपास ५९३) झोपलेला वाघ मी पाहिला ३) जायस्स जंतुणो धुवो मच्चु। (नल पृ. १७) जन्माला आलेल्या जंतूचा मृत्यु निश्चित आहे.

८) क. भू. धा. वि. चा उपयोग नामाप्रमाणे[४] होतो.

---

*१ म. हा मी आलोच (येई) २) आपटे, पृ. १०५*

*३ समासांत : कुवियमणो (संपइ २.१३), भत्तितुट्ठेण (बंभ पृ. ६४) इत्यादि*

*४ समासांत : जिणवरकहियं (पउम ४.३१) सुभासिय (पउम ३३.३५) इ.*

१) छज्जइ पहुस्स ललियं। जाणंतस्स य भणियं। (वज्जा १४७) प्रभूचे ललिन व जाणत्याचे बोलणे शोभते २) अइसुंदर पि भणियं कोवं.

वड्ढेइ मूढपुरिसस्स। (धर्मो. पृ. १७३) फार चांगले बोलणे हि मूर्ख माणसाचा कोप वाढविते.

९) क्वचित् क्रियाविशेषण अव्ययाप्रमाणे क. भू. धा. वि. चा उपयोग[1] होतो.

मए नायं अनायं वा सा बाला नेव भुंजइ। (उत्त २०.२९) मला कळत वा न कळत ती बाला जेवत नाही.

१०) सत्षष्ठी व सत्सप्तमी रचनेत क. भू. धा. वि. चा उपयोग होतो.

१) अन्नया सव्वेसिं पि भीमसहाए ठियाणं पत्रो... अत्तोरो। (नल पृ. ३४) एकदा भीमराजाच्या सभेत सर्व बसले असतां (एक) देव (तेथें) आला २) सव्व अप्पे जिए जियं। (उत्त ९.३६) स्वतःला जिंकले असता सर्व जिंकले (असे होते)

११) संकेत वाक्यांत क. भू. धा. वि. चा उपयोग केलेला आढळतो.

जइ तुमं न वरिओ दमयंतीए ता किं दूमिओ सि। (नल. पृ. ५) जर दमयंतीने तुला वरले नाही, तर दुःखी कां होतोस

### ४२४ कर्तरि भूत. धातु. विशेषणाचे उपयोग

अर्धमागधीत, कर्तरि भूत. धा. वि. चा उपयोग नाही म्हणण्या इतका विरळ आहे.

काहींच्या मते, प्रयोग बदलताना या विशेषणांचा उपयोग करावा; तर काहींच्या मते, असा उपयोग करणे हे अर्धमागधीभाषेच्या प्रकृतीला धरून होणार नाही.

प्रयोग बदलताना या विशेषणांचा उपयोग करावायाचा म्हटल्यास तो पुढीलप्रमाणे होईल. क. भू. धा. वि. चा उपयोग असलेल्या कर्मणीचा कर्तरि

---

१ *घाटगे पृ. २१०*

करतांना या विशेषणांचा उपयोग होईल. त्यावेळी तृतीयान्त कर्ता प्रथमेत, प्रथमान्त कर्म द्वितीयेंत व प्रथमान्त कर्त्यांच्या लिंग, वचन, विभक्तीप्रमाणे कर्तरि भूत धा. वि. चे लिंग, वचन, विभक्तिप्रमाणे कर्तरि भूत धा. वि. चे लिंग, वचन, विभक्ति होते. उदा.

१) लज्जा मए चत्ता। (जिन. पृ. २५) – लज्जं अहं चत्तवंतो।

२) देवीए पेसियाइं फलाइं । (सुपास. ५१८) – देवी पेसियवंती फलाइं।

३) अम्हेहिं सुया निवस्स कित्ती । (सिरि. १२८) – अम्हे सुयवंता निवस्स कित्ती।

४) सा वग्घेण हया। (सुवास ५९५) – तं वग्घो हयवंतो।

## ४२५ वि. क. धा. वि. चे उपयोग

१) वि. क. धा. वि. चा उपयोग विशेषणा[१]प्रमाणे होतो.

बहुपुन्नपावणिज्जो मणी। (सुर ९.१४२) पुष्कळ पुण्याने प्राप्य असा मणी

२) वि. क. धा.वि. चा उपयोग नामाप्रमाणे होतो.

१) सुणह सोयव्वाइं। (समरा. पृ. १) ऐकण्यास योग्य गोष्टी ऐका. २) अखमो समहिग भासियव्वे वि। (महा. पृ. १४८ ब) अधिक बोलण्यास सुद्धा असमर्थ ३) जेण रूसियव्वं जुत्तं। (कथा पृ. ११५) ज्यामुळे रागावणे योग्य आहे.

३) क्रियापदाप्रमाणे विध्यर्थाचे अर्थी वि. क. धा. वि. चा उपयोग होतो.

अ) वाक्यांत सकर्मक क्रियापदाचे कर्म उक्त असतां, वि. क. धा. वि. चा उपयोग करताना कर्मणि प्रयोग होतो. कर्तृपद तृतीयेत जाते. कर्म प्रथमेत येते व वि. क. धा. वि. हे प्रथमान्त कर्माच्या लिंग, वचन विभक्तीप्रमाणे असते.

१) सीलं रक्खियव्वं मए । (चउ पृ. ३१) मला शीलाचे रक्षण केले पाहिजे

---

१ *अ) विशेषणाप्रमाणे समासांत : असं भावणी दंसणं (बंभ पृ. ५५), माण णेज्जजणं (सुर १.२३७)*

*आ) विशेषणाप्रमाणे पूरक : माया इव वंदणिज्जासि। (नाण ७.६०) मातेप्रमाणे वंदनीय आहेस.*

२) वयाइयारो कायव्वो नेय बुध्दिमंतेहि । (सुपास ६३४) बुध्दिवंतांनी व्रतातिविचार करू नये.

आ) इतरत्र सर्वत्र भावे प्रयोग होतो.

१) तुम्हेहि वि जिणधम्मे जइयव्वं। (सुपास. ५६६) तुम्ही सुद्धां जिन धर्म आचरण्याचा प्रयत्न करावा २) तुमए कत्थ गंतव्वं। (सुपास ६१०) तुम्हाला कोठे जावयाचे आहे?

४) विध्यर्थाने दर्शविले जाणारे सर्व अर्थ दाखविण्यास वि. क. धा. वि. चा उपयोग होतो.

१) आवश्यकतां : १) साहेयव्वा नरेण पुरिसत्था। (अरी पृ. ६) माणसाने पुरुषार्थ साधावे, २) एसो खुमज्झ वइरी विणासियव्वो मएऽवस्सं। (महा. पृ. ८० अ) हा खरोखर माझा वैरी आहे. त्याचा नाश मला अवश्य केला पाहिजे.

२) कर्तव्य : मुणिणा सच्चं भणेयव्वं। (सुपास. ६०८) मुनीने सत्य बोलावे.

३) विनंति : १) न रूसियव्वं बुहजणेणं । (पडम. १.११) शहाण्यांनी रागावू नये. २) तेसि वयणं न सोयव्वं। (धर्मो. पृ. १५५) त्यांचे वचन ऐकू नये.

४) विनयपूर्वक प्रश्न : किमेत्थ कायव्वं। (चउ पृ. ३१) आतां या बाबतींत काय करावे?

५) नम्र आज्ञा : १) तुम्हेहिं तत्थ मोणेण ठायव्वं। (संप ३.२.९) तुम्ही तेथे मौन धरून रहावे. २) न हु एयं भोत्तव्वं एएण सगाणियं भत्तं। (अगड. २२२) याने आणलेले अन्न मुळीच खाऊ नये.

६) प्रार्थना : खमियव्वं तुमए दुच्चिट्ठियं इमं। (चउ पृ. ४५) या वाईट कृत्याला आपण क्षमा करावी.

७) उपदेश : दमियव्वो साहुणा णिओ देहो। (धर्मो. पृ. ५३) साधूने आपल्या देहाचे दमन करावे.

५) काय असावे काय करावे, हे दर्शविण्यासहि वि. क. धा. वि.चा उपयोग होतो.

१) भासियव्वं हियं सच्चं । (उत्त १९.२६) हितकर सत्य बोलावे. २) पयंपियव्वं न दुव्वयणं। (सुपास. ५५२) दुर्वचन बोलू नये.

६) भावे प्रयोगांत 'भवियव्व' वा 'होयव्व' यांचा उपयोग असता (प्रायः)

‘असले पाहिजे’ असा अर्थ होतो.

१) विज्जासु पुरिसेण असंतुट्ठेण होयव्वं। (धर्मो. पृ. ४६) विद्येचे बाबतींत माणासने असंतुष्ट असले पाहिजे २) भवियंव्वं अणेण नरवइसुएणं। (समरा. पृ. ५४८) हा राजपुत्र असला पाहिजे.

७) भविष्यकाळ दर्शविण्यास वि. क. धा. वि. चा उपयोग होतो.

१) तुब्भेहिं कंमि नयरंमि गतव्वं। (सुपास. ५०१) तुम्हाला कोणत्या नगरीला जायचे आहे। २) अज्ज मए एत्थेव वसियत्वं। (समरा पृ. ५३३) आज मी येथेच राहणार आहे.

अ) भविष्यकाळांतील निश्चितता दाखविण्यास वि. क. धा. वि. चा उपयोग होतो.

१) भुत्तव्वा तए नलेण सह भोगा । (नल. पृ. २०) तुला नलासह भोग भोगावयाचे आहेत. २) जाएण जीवलोएण मरियव्वं ताव। (सुपास. ५०१) जन्माला आलेल्या जीवांना मरायचे आहेच.

८) संकेतवाक्यांत वि. क. धा. वि. चा उपयोग होतो.

१) अह अवस्सं मारेयव्वा ता पढमं ममं मारेह। (धर्मो. पृ. ४०) जर (हिला) नक्कीच मारायचे असेल तर प्रथम मला मारा. २) जइ अवस्सं सोयव्वं ता गंतूण पुच्छह। (महा. पृ. १५७ अ) जर अवश्य ऐकायचे असेल तर (तुम्हीच) जाऊन विचारा.

प्रकरण २७

# ल्यबन्त व तुमन्त यांचे उपयोग

## ४२६ ल्यबन्ताचे उपयोग

१) एक[१]कर्तृक अनेक क्रिया एका[२]मागोमाग असतांना, पूर्वक्रिया दर्शक धातूंचे ल्यबन्त वापरले जाते.

१) गंतूण पणमिऊण य भणइ। (पडम ३४.४) जाऊन व प्रणाम करून म्हणतो. २) खवित्तु कम्मं गइमुत्तमं गया। (दस. ९.२.२३) कर्माचा क्षम्मं करून उत्तम गतीला गेले.

२) काही ल्यबन्तांचा उपयोग क्रियाविशेषण अव्ययाप्रमाणे केलेला आढळतो. पेच्च (परलोकी), पसज्झ (बलात्काराने), आरुस्स (रागाने), आहच्च (एकाएकी) इत्यादि.

३) काही ल्यबन्ताचा उपयोग शब्दयोगी अव्ययाप्रमाणे केलेला आढळतो.

उद्दिस्स (उद्देशून), पडुच्च (बद्दल, संबंधी इ.) मोत्तूण (खेरीज, विना) इत्यादि.

४) संस्कृतप्रमाणे अर्धमागधीतहि कधी 'णमुल' चा उपयोग केला जातो.

१) अभग्गसेणं चोरसेणावइं जीवग्गाहं गिण्हाहि। (विवाग. पृ. २५) अभग्गसेण चोरसेनापतीला जिवंत पकड २) अभग्गसेणं चोदसेणावइं जीवग्गाहं गिण्हंति।

---

१ *क्वचित् भिन्नकर्तृक क्रिया दर्शविण्यास ल्यबन्ताचा उपयोग केलेला आढळतो. सिद्धाण नमो किच्चा अत्थधम्मगइं सुणेह मे। (उत्त २०.१) सिद्धांना नमस्कार करून, अर्थ व धर्म यांची गति मी सांगतो. ते ऐका.*

२ *क्वचित् समकालीन क्रिया दर्शविण्यास ल्यबन्ताचा उपयोग केलेला आढळतो. दारं अवलंबिया न चिट्ठेज्जा। दस. ५.२.९) दाराला टेकून उभे राहू नये. (मराठीत : दाराला टेकून उभा रहातो)*

(विवाग पृ. २८) अभग्गसेण चोरसेनापतीला जिवंत पकडतात.

५) ल्यबन्ताचा कधी तुमन्ताप्रमाणे उपयोग केला जातो.

१) इंदो अहिसिंचिऊण आढत्तो। (पउम. ३.९४) इंद्राने अभिषेक करण्यास सुरुवात केली. २) न हु सी पभू तुमं पुत्ता सामण्णमणुलिया। (उत्त १९.३४) पुत्रा, श्रामण्याचे पालन करण्यास तू खरोखर समर्थ नाहीस ३) चिंतेऊण पवत्तो। (पउम. २.१०४) विचार करू लागला.

६) कधी कधी 'सुद्धा' या अर्थी असंगति दर्शविण्यास ल्यबन्ताचा उपयोग केलेला आढळतो.

१) तुमं विज्जाहरो होऊण केण कारणेण भूमिगोयरधूयं उव्वोढुमिच्छसि। (महा पृ. ६० अ) तू विद्याधर असूनहि काय कारणाने पृथ्वीवरील मुलीशी लग्न करण्याची इच्छा करतोस? २) जो होइ दुट्ठचित्तो एयस्साराहगो वि होऊण। तस्स न सिज्झइ एयं। (सिरि २१४) याचा आराधक असूनहि जो दुष्टचित्त होतो, त्याच्या बाबातीत हे सिद्ध होत नाही.

७) कर्मण्यर्थी : कर्मणि प्रयोगात कर्तृपद तृतीयेत गेले तरी त्याशी संबंधित असणारे ल्यबंत तसेच रहाते.

१) अग्गओ गंतूण भणियं तीए। (नल. पृ. ३) पुढे जाऊन तिने म्हटले ३) हसिऊण तेहिं भणियं। (नल. पृ. ४२) त्यांनी हसून म्हटले ३) भीमेणावि नलो नाऊण निवेसिओ, नियसिंहासणे। (नल. पृ. ३४) भीमाने सुद्धा ओळखून नळाला आपल्या सिंहासनावर बसविले

८) 'इति' पुढे येऊन 'कर' च्या ल्यबन्ताचा एक विशिष्ट वाक्यांश होतो. त्ति (ति) किच्चा, ति (ति) कट्टु.

९) क्रियापदापुढे त्याचेच ल्यबन्त लगेच येऊन अर्धमागधी आगमात एक विशिष्ट वाक्प्रयोग होतो. (यावेळी पुष्कळदा क्रियापदापुढे २ हा अंक असतो.)

१) पयाहिणं करेइ २ त्ता वंदइ। (उवा. परि. १०) प्रदक्षिणा करतो. प्रदक्षिणा करून वंदन करतो. २) जेट्ठ पुत्तं सद्दावेइ २ त्ता एवं वयासी। (उवा. परि. ६६) ज्येष्ठपुत्राला बोलावतो. त्याला बोलावून असे म्हणतो.

## ४२७ तुमन्ताचे उपयोग

१) क्रियेचा हेतु, उद्देश, प्रयोजन दर्शविण्यास तुमन्ताचा उपयोग होतो.

१) जिमिउं उवविट्ठो। (अरी. पृ. ७) जेवायला बसला २) सो वच्चउ तमाणेउं। (संपइ २.५८) त्याला आणण्यास तो जाऊ दे. ३) तुमं दट्ठुं आगओ हं। (नल. पृ. १९) तुला भेटण्यास (पहाण्यास) मी आलो आहे.

२) कधी तुमन्ताचा ल्यबन्ताप्रमाणे उपयोग केला जातो.

१) सुणसु तुमं अवहिओ होउं। (सुपास. ४८८) एकचित्त होऊन तू ऐक.

२) को दट्ठुं परलोगमागए। (सूय. १.२.३.१०) परलोक पाहून कोण (परत) आला आहे?

३) कर्मण्यर्थी : (कर्मणि प्रयोगांत तुमन्त तसेच रहाते)

१) न हि तक्करो रक्खिउं जुज्जइ। (नल. पृ. २२) चोराचे रक्षण करणे योग्य नाही २) न य सक्किया बोहिउं मए समणा। (सपइ. १.१०) स्वजनांना बोध करणे मला शक्य झाले नाही.

४) 'अलं' या अव्ययाला[१] कधी तुमन्तांची अपेक्षा असते.

१) नालं तण्हं विणेत्तए। (दस. ५.१.७८) तृष्णा दूर करण्यास पुरेसे (समर्थ) नाही. २) तं दुट्ठं विसविगारं अवि हणिउं अलं। (महा. पृ. ३१७ ब) विषाच्या त्या दुष्ट परिणामाला सुद्धां नाहीसे करण्यास पुरेसे (समर्थ) आहे.

५) पुढील काही क्रियापदांना अर्थपूर्तीसाठी तुमन्ताची अपेक्षा असेत.

१) इच्छिणे : १) जइ गंगं महसि दट्ठुं। (नल पृ. ३) जर गंगा (नदी) पहाण्याची इच्छा असेल २) नेच्छान्ति वंतयं भोत्तुं। (दम २.६) ओकलेले (पुनः खाण्याची इच्छा करीत नाहीत.

२) उत्सुक असणे : अन्नत्थ गंतुं न उच्छहइ मे मणं। (नल पृ. १४) दुसरीकडे जाण्यास माझे मन उत्सुक नाही.

३) सुरू करणे. : १) कहिउ पारद्धो सूरिणा धम्मो। (महा. पृ. ७१ ब) सुरीने धर्म सांगण्यास सुरवात केली. २) रोगो वड्ढि उमारद्धो। (पाकमा. पृ. ४९)

---

१ *कधी 'अलाहि' या अव्ययाला तुमन्ताची अपेक्षा असते. पहिआ अलाहि गंतुं। (कुमार ४.८) पथिका, जाऊ नको.*

रोग वाढू लागला.

४) प्रवृत्त होणे : १) वरिसिउं पयट्टो मेहो। (नल. पृ. १८) मेघ वर्षू लागला २) अह वाइड पवत्तो वाओ । (पउम. ४.१३) मग वारा वाहू लागला.

५) त्वरा करणे : अभितुर पारं गमित्तए (उत्त १०.३४) पार जाण्यास त्वरा कर.

६) लागणे : सो पुव्वभवं साहिउं लग्गो। (सुपास. ४९४) तो पूर्वजन्म सांगू लागाला.

७) असणे : जइ उत्तममग्गेण विहरिउं विज्जए इच्छा। (महा. पृ. १६९ अ) जर उत्तम मार्गाने जाण्याची इच्छा असेल.

८) योग्य असणे : १) तम्हा न जुज्जइ इह निवसिउं। (महा. पृ. ३१० अ) म्हणून येथे रहाणे योग्य नाही. २) न य दिट्ठं सुयं सव्वं भिक्खू अक्खाउमरिहइ। (दस. ८.२०) पाहिलेले वा ऐकलेले सर्व भिक्षूने सांगणे योग्य नाही.

९) शक्य असणे, समर्थ असणे : १) न सक्केमो ते मग्गं दंसिउं। (नल. पृ. २१) तुला मार्ग दाखविण्यास आम्ही समर्थ नाही. २) को सक्कइ मं मारेउं। (अगड. १४८) मला कोण मारु शकेल.

६) पुढील काही शब्दाबरोबरहि तुमन्ताचा उपयोग केला जातो.

१) सेयं : सेयं पव्वइउं मम। (उत्त २२.२९) मी संन्यास घेणे चांगले

२) पकामं : नो संचाएमि सम्मं पकामं वियरित्तए । (पएसि परि १९) योग्य प्रकारे भरपूर हिंडणे मला शक्य होत नाही.

३) समर्थ, शक्त, प्रभु : १) तुब्भे समत्था उद्धतु परमप्पाणमेव य। (उत्त २५.३९) स्वतःचा व दुसऱ्याचा उद्धार करण्यास तुम्ही समर्थ आहात २) पंचाणणो न सक्को समीवदेसं पि अक्कमिउं। (नल. पृ. १५) जवळ जाण्यास सिंह सुद्धा समर्थ झाला नाही. ३) पह कण्हे वासुदेवे गंगं महानइं बाहाहिं उत्तरित्तए उदाहु नो। (नामा,स १९५-१९६) गंगा महानदी बाहूंनी तरून जाण्यास कृष्ण वासुदेव समर्थ आहे की नाही?

४) युक्त : ता न जुत्तं मे इह अत्थिउं। (समरा. पृ. १३६)) तेव्हा मी येथे रहाणे रहाणे योग्य नाही.

५) सज्ज : सज्जो होहि जुज्झिउं। (वसु. पृ. २४२) युद्ध करण्यास सज्ज हो.

७) क्रियादर्शक कालवाचक शब्दाबरोबर तुमन्ताचा उपयोग केला जातो.

१) कालो य मे... अत्थं उवज्जिउं। (समरा पृ. १९६) पैसा मिळविण्याचा (हा) माझा काल आहे. २) साहूणं विहरिउं कालो। (धर्मो पृ. ६८) साधूंचा हिंडण्याचा काळ

८) संस्कृतप्रमाणे 'काम' व 'मण' या शब्दाबरोबर समासांत पूर्वपदी तुमन्ताचा उपयोग होतो.

अ) १) परमपयं गंतुकामेहि। (सुपास ६४९) श्रेष्ठपदीं जाण्याची इच्छा करणाऱ्यांनी २) नियत्तिड कामो हं इयाणि। (महा. पृ. १७० अ) आत्ता माझी परत जाण्याची इच्छा आहे.

आ) १) दइयं दट्ठुमणा देइ दाणं। (नल पृ. २२) प्रियकराला पाहू इच्छिणारी ती दान देऊ लागली. २) वेगेणं उसि उमणो पहाविओ। (महा पृ. १७५ अ) चावण्याची इच्छा धरून वेगाने धावला.

प्रकरण २८

# संवादित्व

## ४२८ संवादित्व

वाक्यात जेव्हां विकारी शब्दांचा उपयोग केला जातो. तेव्हा त्यांच्या परस्पर संबंधात विशिष्ट प्रकारचे संवादित्व (Agreement Concor) असणे आवश्यक असते. उदा. नाम जर ए. व. त. वापरले असेल तर त्याचे गुण विशेषणही ए. व. त. असणे आवश्यक आहे. कर्ता प्रथमपुरुषी असतांना क्रियापदही प्रथम पुरूषीच असणे जरूर आहे. इत्यादी अशा प्रकारच्या संवादित्वाचा आता विचार करावयाचा आहे.

विकारी शब्दांच्या संवादित्वाचा विचार करताना, लिंग, वचन, विभक्ती व पुरुष यांना अनुलक्षून विचार करावा लागतो.

संवादित्वाचा विचार पुढीलप्रमाणे तीन मुख्य विभाग पाडून केलेला आहे. **अ) उद्देश्य–विधेय–संवाद** १) उद्देश्य–क्रियापद संवाद २) उद्देश्य–विधिविशेषण संवाद (साधे– तसेच धातुसाधित विशेषण) ३) उद्देश्य संवाद विधिनाम **आ) विशेषण–विशेष्य संवाद** १) गुणविशेषण– विशेष्य संवाद २) संख्याविशेषण–विशेष्य संवाद इ) **नाम–सर्वनाम संवाद** १) नाम–संबंधी सर्वनाम संवाद २) नाम व इतर सर्वनामे यांचा संवाद

---

१ *कधी हे संवादित्व पाळले न गेलेले आढळते. उदा. १) अहं पुण गिहत्थधम्मे अभिरमामो। (पउम.३३.४८) २) स इमीए सह विसयसुहं अणुहविंसु। (समरा. पृ. ६००)*
*३) संपज्जलिया घोरा अग्गी चिट्ठइ गोयमा। (उत्त २३.५०) गोयमा, पेटलेले अग्नी आहेत. ४) अभू जिणा अत्थि जिणा अदुवा वि भविस्सई। (उत्त. २.४५)*

**अ) उद्देश्य -विधेय-संवाद**

**४२९ उद्देश-क्रियापद-संवाद**

१) विधेय क्रियापद असतां उद्देश्याच्या पुरूष[१] वचनाप्रमाणे क्रियापदाचे पुरुष व वचन असते.

**१) अहमवि तं कन्न जीवावेमि।** (अरी पृ.८) मी ही त्या कन्येला जिवंत करीन **२) जइ न कुप्पह तुब्भे।** (बंभ पृ. ५७) जर तुम्ही रागावणार नसाल ३) रक्खिंसु नराहिवा। (महा. पृ. ४७ ब) राजांनी रक्षण केले.

अ) द्विवचनाऐवजी अ. व. चा उपयोग केला जातो.

**१) कंपंति दो वि हत्था।** (जिन पृ. ५१) दोन्ही हात कांपत आहेत **२) दो वि गच्छति सोग्गइ।** (दस. ५.१.१००) दोघही सद्गतीला जातात.

आ) उद्देश आदरार्थी अ. व. त. असताना क्रियापदही अ. व. त असते.

**१) देव वीसत्था होह।** (महा पृ. ३२ अ) महाराज ! स्वस्थ व्हा. **२) तुब्भे नो मुणह देव किं एयं।** (महा. पृ. १९८ ब) महाराज! हे तुम्हाला माहीत नाही काय ?

**क) उद्देश्य-क्रियापद-वचनसंवाद :**

१) अनेक उद्देश्ये 'च' (इत्यादी)[१] समुच्चयार्थक अव्ययाने जोडलेली असता क्रियापद अ. व. त. असते.

**१) विज्जा मंता य सिज्झंति।** (महा. पृ. १७२ ब) विद्या व मंत्र सिध्द होतात.

**२) से पंडूराया कोंती य देवी पंच य पांडवा कच्छुल्लनारयं आढंति** (नायासं पृ. १८४) तो पंडु राजा, राणी कुंती आणि पांच पांडव यांनी कच्छुल्ल नारदाचा आदर केला

---

*१ च अध्याहृत असताही क्रियापद अ. व. त. असते. धम्मो अत्थो कामो मोक्खो चत्तारि होति पुरसित्था। (धर्मो पृ. १७) धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ आहेत.*

*२ च अध्याहृत असतां क्रियापद ए. व. त. : विहवो जिणवर धम्मो रोगाभावो पिएण संजोगो। अंते समाहिमरणं पाविज्ज इ परमपुन्नेहिं। (ना ७.१५७)*

अ) अनेक उद्देश्ये 'च' ने जोडलेली असूनही क्रियापद कधी संनिधच्या उद्दैश्याप्रमाणे वचन घेते.

**जाण फलाण नामं तुमं अन्नो य न जाणइ।** (धर्मो पृ. ६८) ज्या फळांचे नाव तू व इतर कोणी जाणीत नाही.

आ) अनेक उद्देश्ये 'च' ने जोडलेली[2] असून, प्रत्येक उद्देश्य स्वतंत्रपणे विचारांत घेतलेले असेल किंवा सर्व मिळून एक संयुक्त कल्पना होत असले तर क्रियापद ए. व. त येऊ शकते.

**१) छारो धूली उदगाइयं च खिप्पइ।** (धर्मो पृ. १५९) माती (श-राख) धूळ, पाणी वगैरे फेकले जाते **२) वज्जं नट्टं गेयं अइरम्मं तह य गंधमाईयं हरइ मणं।** (नाण. १०.२९३) वाद्य, नृत्य (नाट्य), गाणे व अतिरम्य गंध इत्यादी मन हरण करते.

**इ) अनेक उद्देश्ये** - प्रत्येक उद्देश्य स्वतः ए. व. त. - 'च' ने जोडलेली असतां[1] क्रियापद कधी ए. व. त. तर कधी अ. व. त. असते.

**यं) १) हाणी वुड्ढी य होइ ।** (पउम. ३.३३) हानी आणि वृद्धी होते. **२) थुई निंदा य पयट्टइ ।** (कथा पृ. ४१) स्तुती व निंदा सुरू होते.

**र) तओ नलो दमयंती य कयाइ जलकीलं कुणंति।** (नल पृ. ७) नंतर नल व दमयंती कधी जलक्रीडा करीत.

ई) 'च' ने जोडलेली अनेक उद्देश्ये अ. व. त. असल्यास क्रियापद साहजिकच अ. व. त. असते.

**समणं भगवं महावीरं निग्गंथा य निग्गंथीओ य वदंति।** (सूय. २.१.७) श्रमण भगवान् महावीराला भिक्षु व भिक्षुणी वंदन करतात.

उ) अनेक उद्देश्ये भिन्न वचनी असून 'च' ने जोडलेली असता, क्रियापद

---

१ *'च' अध्याहृत असताहि क्रियापद ए. व. त. : १) महिला पुत्तो सुही होऊ। (धर्मो पृ. २०८) पत्नी व पुत्र सुखी होऊ देत. २) वड्ढइ तेओ कित्ती माहप्पं सयलसत्थविण्णाणं।*

२ *कधी अपवाद : न तस्स माया व पिया व भाया कालम्मि (धर्मो पृ. १७३) तम्मं सहरा भवंति। (उत्त १३.२२) मरणकाळी त्याची आई वा पिता वा भाऊ त्याच्या (कर्माचा) भाग घेत नाहीत*

प्रायः अ. व. त. असते. (क्वचित् ए. व. त. असते.)

**देवा मंता नंता बंधुजणो तह य मित्र वग्गो य/लोयाणं कज्जेसु निमित्तमित्तं चिय हवंति।।** (नाण. ३.६६) लोकांचे कार्यसिध्दीचे बाबतींत देव, मंत्र, तंत्र, बंधुजन व मित्रवर्ग हे फक्त निमित्त होतात.

२) अनेक उद्देश्ये-प्रत्येक उद्देश्य- स्वतः ए. व. त. - विकल्पदर्शक अव्ययाने जोडलेली असता. क्रियापद ए. व. त.[२] असते.

**१) कहं णं पुत्ता ममं तुट्ठी वा हरिसे वा आणंदे वा भविस्सइ।** (निरया पृ. १६) बाळा ! मला कशी बरे तुष्टि । वा हर्ष वा आनंद होईल? **२) कोवो-पसादो वा भवइ।** (वसु. पृ. २५३) कोप वा प्रसाद होतो.

अ) अनेक उद्देश्ये - प्रत्येक स्वतः अ. व. त. - 'वा' ने जोडलेली असतां, क्रियापद अ. व. त आढळते.

**एयं महाणुभावं ... नो धम्मज्झाणाओ खमंति संखोहिउं केई। देविंदा तियसा वा जक्खा रक्खा व खयरवग्गा वा। भूया महोरगा वा।** (महा. पृ. ३३६ ब) देवश्रेष्ठ, देव, यक्ष, राक्षस, खेचरवर्ग, भूते अथवा महासर्प हे कोणीही या मोठ्या माणसाला धर्मध्यानातून विचलित करण्यास समर्थ नाहीत.

आ) अनेक उद्देश्ये भिन्न वचनी असून 'वा' ने जोडलेली असता, क्रियापद संनिधच्या उद्देश्याप्रमाणे असते.

**१) भवियव्वया सहावो, दव्वाईया सहाइणो वा वि।** पायं पुव्वो-वज्जियकम्माणुगया फलं दिंति (सिरि. ९७) पूर्वी केलेल्या कर्माला धरूनच भवितव्यता, स्वभाव, द्रव्य वगैरे अथवा मित्र प्रायः फळ देतात. **२) नं तस्स माया व पिया व भाया भज्जा व पुत्ता न हु हुंति सरणं।** (कथा पृ. १५९) त्याची आई, बाप, भाऊ, भार्या वा पुत्र त्याला आश्रयस्थान होत नाहीत.

**ख) उद्देश्य-क्रियापद-पुरूष-संवादित्व :-**

१) भिन्न पुरुषी उद्देश्य 'च' ने जोडलेली असता, क्रियापद, द्वितीय (व तृतीय पुरुष सोडून) प्रथम पुरुषांत (आणि तृ. पु. सोडून द्वितीय पुरुषात) असते.

**१) अहं च तुमं च दो वि जुज्झामो।** (नल. पृ. ९) तू व मी दोघेही युध्द करू या। २) वच्चामो चंपाउरिं। (जिन पृ. १२) (तू व मी) चंपा नगरीला जाऊं.

२) भिन्न पुरुषी उद्देश्ये 'वा' ने जोडलेली असता, क्रियापद संनिधच्या

उद्देश्याप्रमाणे पुरुष घेते.

किं भणिही रुट्ठो जणो अहं वा भइणी वा मज्झ जणणी वा। (कथा पृ. १०१) रागावलेले लोक किंवा मी अथवा बहीण वा माझी आई काय म्हणेल?

**४३० २) उद्देश्य–विधिविशेषण–संवाद**

१) उद्देश्य–गुणविशेषण :

१) उद्देश्याच्या लिंग, वचन, विभक्तीप्रमाणे गुणविशेषण असते.

**१) सव्वतिहुयणसाहारणं इमं मरणं।** (पाक. पृ. २३) हे मरण सर्व त्रिभुवनाला साधारण आहे. **२) उत्तमधम्मसुई हु दुल्लहा।** (उत्त १०.१८) उत्तम धर्म ऐकण्यास मिळणे हे खरोखर दुलर्भ आहे.

**३) नूणं मियभासिणो गरुया।** (महा. पृ. १४५ अ) हे मोठे लोक खरोखर मितभाषी असतात.

अ) अनेक उद्देश्ये 'च' ने जोडलेली असता विधिविशेषण संनिधच्या उद्देश्याप्रमाणे असते.

१) जेसिं पिओ तवो संजमो य ती य बंभचेरं च। (दस. ४.२८) ज्यांना तप, संयम, शांती व ब्रह्मचर्य प्रिय आहे

**२) संसग्गी संभासो य सुहयरो पुन्नपुरिसाण।** (सुपास ५४६) पुण्य पुरुषाशी सहवास व संभाषण सुखकर असते.

२) उद्देश–धातुसाधितविशेषण–संवाद

१) उद्देश्याच्या लिंग, वचन[१] विभक्तीप्रमाणे धातुसाधितविशेषण[२] असते.

१) मए भोगा भुत्ता। (उत्त १९.११) मी भोग भोगले

**२) चलिय सेन्नं समत्थं पि।** (अगड पृ. १८०) सर्व सैन्य सुद्धा चालले

**३) तओ सा किंचि सत्था जाया।** (बंभ. पृ. ६१) मग ती किंचित् स्वस्थ झाली

---

१ *द्विवचनाऐवजी अ. व. असते : १) परिसुक्काओ भुयाओ... मिलाणाइं लोयणाइं। (समरा पृ. ४८०) २) दो वि केवलिणो जाया। (धर्मो पृ. २१)*

२ *कधी लिंग–भिन्नता आढळते : मह मणो उव्विग्गं संसाराओ । (कथा पृ. १७६) माझे मन संसारात उद्विग्न झाले आहे; वाऊ चित्तमंत अक्खाया। (दस ४) वायु सजीव आहे असे म्हटले जाते.*

**४) अलंघणीया आणा तायस्स।** (सुर. ११.१४१) बापाची आज्ञा अलंघ्य आहे.

अ) धातुसाधितविशेषण हे कधी उद्देशाच्या एकविभक्तिक नामाप्रमाणे असते : **छज्जीवणिया नाम अज्झयणं पवेइया।** (दस. ४) 'सहा जीवसमूह' नावाचे अध्ययन सांगितले आहे.

आ) धातुसाधितविशेषण कधी उद्देश्याच्या एकविभक्तिक पूरकाप्रमाणे असते.

१) मुच्छा परिग्गहो वुत्तो। (दस ६.२१) आसक्तीला परिग्रह म्हणतात.

**२) सूरसेणा जाओ देवो।** (कथा पृ. ३३) सुरसेणा देव झाली.

**क) उद्देश्य–धातुसाधितविशेषण वचन संवाद :**

१) अनेक उद्देश्ये 'च' ने जोडलेली असता धातु साधित विशेषण अ. व. त. [1] असते.

**१) हक्कारिया रायाणो रायपुत्ता य** (नल. पृ. २) राजे व राजपुत्र यांना बोलावले. २) मए सोढाणि भीमाणि जम्माणि मरणाणि य। (उत्त १९.४६) मी भयंकर असे जन्म व मृत्यु सहन केले.

अ) अनेक उद्देश्ये 'च' ने जोडलेली असतां ही धातु. विशेषण कधी संनिधच्या उद्देश्याप्रमाणे असते.

**१) गहियं उयगं नारंगफलाणि य।** (समरा पृ. ३५६) पाणी आणि नारंगफळे घेतली. **२) आणंदिओ मुणिचंदो देवीओ सामंता य।** (समरा पृ. ७९०) मुणिचंद, राण्या आणि सामंत आनंदित झाले.

**ख) उद्देश्य–धातुसाधितविशेषण लिंग संवाद :**

उदा. **१) अणुवेहणिज्जा खलु रोगा सत्तुणो य।** (महा पृ. २०३ अ) रोग व शत्रु हे खरोखर अनुपेक्षणीय आहेत. **२) पत्ता देवा णरा सट्ठाणे।** (धर्मो पृ. १५) देव व माणसे आपापल्या स्थानी गेले.

२) अनेक उद्देश्ये स्त्रीलिंगी असता, धातुसाधितविशेषण स्त्रीलिंगात असते.

**आगयाओ साहुणीओ कंतिमई य।** (समरा पृ. ११२) साधु स्त्रिया व कांतिमती आल्या.

---

१ *अपवाद : संपयं च दव्वहरणं परिमोसो य केण विकयं। (घाटगे, पृ. १६१ पहा) आताच कोणीतरी द्रव्यहरण व चोरी केली.*

३) उद्देश्ये पुल्लिंगी व स्त्रीलिंगी असता धातु. विशेषण हे प्रायः पुल्लिंगात आढळते.

**१) उट्ठिओ कुमारो संतिमई य।** (समरा पृ. ५३३) कुमार व शांतिमती उठले **२) ताहे राया य सा य जयहत्थि म्मि आरूढा।** (चउ पृ. १७) नंतर राजा व ती जयावह हत्थीवर बसले. ३) अणुरूवो ते विवेगो अलुद्धया य। (समरा पृ. ४६५) तुझा विवेक व अलुब्धता अनुरूप आहेत.

अ) कधी संनिधता उद्देश्याप्रमाणे धातसाधित विशेषण आढळते.

**एवंविहा य देवा देवीओ कत्थ दिट्ठाओ।** (सुर ६.१३१) अशा प्रकारचे देव व देवी कोठे बरे पाहिले होते?

आ) नंतरच्या प्राकृतांत धातुसाधितविशेषण प्रायः नपुंसकलिंगात[१] आढळते.

**१) समाइट्ठाणि वज्झाणि मेंठो देवी करी य ।** (धर्मो पृ. ५०) माहूत, हत्ती व राणी हे वध्य अशी आज्ञा केली. **२) तत्थ वसुदेवो रोहिणी देवई य आरोवियाणि।** (कथा. पृ. ८६) तेथे वसुदेव रोहिणी व देवकी यांना बसविले.

**४३१ ३) उद्देश्य–विधिनाम–संवाद**

१) विधेय–नामाच्या स्वरूपाप्रमाणे हा संवाद भिन्नरूपी असतो. विभक्ति तीच असते. लिंग–वचनाचे बाबतीत मात्र

अ) कधी लिंग–वचन–संवाद असतो.

**१) सव्वे आभरणा भारा।** (उत्त १३.१६) सर्व अलंकार (म्हणजे) भार.

**२) जम्मं दुक्खं।** (उत्त १९.१५) जन्म म्हणजे दुःख **३) महिला जोणी अणत्थाणं।** (बंभ. पृ. ४२) स्त्री ही अनर्थांचे मूळ आहे. **४) मोक्खो पहाणपुरिसत्थो।** (कथा पृ. १६९) मोक्ष हा प्रधान पुरुषार्थ.

आ) कधी लिंगभिन्नता असते; पण वचनसंवाद असतो.

**१) धम्मो मंगलमुक्कट्ठं।** (दस १.१) धर्म हे उत्कृष्ट मंगल **२) संपयं दमयंती चेव तुह भज्जा मंती मित्त पाइक्को य।** (नल पृ. ११) आता दमयंती हीच तुझी भार्या, मंत्री, मित्र व पायदळ **३) धम्मो दीवो पइट्ठा य गई सरणमुत्तमं।** (उत्त २३.६८) धर्म हाच दीप, प्रतिष्ठा, गति व उत्तम आश्रयस्थान.

---

*१ म. : राजा व राणी आली, इत्यादी*

इ) कधी लिंग व वचन यांचा संवाद नसतो.

**१) सल्लं कामा विसं कामा।** (उत्त ९.५३) काम हे शल्य आणि विष आहेत.

**२) सम्मदंसणनाणचरित्राणि निव्वाणमग्गो।** (धर्मो पृ. १४२) सम्यग् दर्शन, सम्यग् ज्ञान आणि सम्यक् चारित्र हा मोक्षमार्ग.

२) अनेक उद्देश्ये 'च' ने जोडलेली असता विधिनाम अ. व. त. आढळते.

१) माया अलियं लोहो मूढत्तं साहसं असोयत्तं।

निस्संसया तह च्चिय महिलाण सहावया दोसा।। (अगड. १४०)

कपट, असत्य, लोभ, मूढत्व, साहस, अशुचिता व क्रुरता हे स्त्रियांचे स्वाभाविक दोष. २) ताणं च दो पहाणसीसा धम्मघोसो धम्मजसो य । (धर्मो पृ. २१५) त्यांचे धर्मघोष व धर्मयश हे दोन मुख्य शिष्य.

अ) अनेक उद्देश्ये 'च' ने जोडली असून जर एखादी (समूहवाचक) संयुक्त कल्पना निर्दिष्ट होत असेल तर विधिनाम ए.व.त. येते.

**सच्चं सोयं आकिंचणं च बभं च जइधम्मो ।** (समरा पृ. ४६) सत्य, शौच अकिंचनता व ब्रह्मचर्य हा यतिधर्म.

३) प्रमाण, भाजन, स्थान, पद, शरण ही नामे विधेय असता ती नेहमी नपुं. प्रथमा ए. व. त. असतात मग उद्देश्याचे लिंग-वचन कोणतही[१] असो;

**१) गिहेसु महिलाओ पमाणं।** (पाइ. पृ. २८) घरांत महिला प्रमाण. **२) भायणं तुमं कल्लाणाणं।** (समरा. पृ. ७३२) तू (म्हणजे) कल्याणस्थान. **३) जीवो जोइट्ठाणं।** (उत्त १२.४४) जीव हा वेदी (अग्नीचे स्थान) **४) अवमाणपयं तओ जाओ।** (सुपास ५०९) मग तो अपमानस्थान झाला. **५) धम्मो च्चिय संसारे सरणं।** (सुपास. ५७४) संसारात धर्म हाच आश्रयस्थान.

**क) विभक्तिसंवाद :**

१) असणे, होणे, वाटणे, इत्यादी अकर्मक क्रियापदांचे पूरक म्हणून येणारे विधिनाम हे उद्देश्याप्रमाणे प्रथमा विभक्तीत असते.

**जाया सव्वे वि केवलिणो।** (महा पृ. २.७१) सर्वचा केवली झाले.

---

१ *येथे असणे क्रियापद योजिले-ते मात्र उद्देश्याप्रमाणे असते :*
*अहमेव दुहभायणं होमि। (नल पृ. १४) मीच दुःखाचे आश्रयस्थान होईन.*

२) म्हणणे, करणे, समजणे इत्यादी सकर्मक पण अपुरे विधेय असणाऱ्या क्रियापदांच्या कर्मणि प्रयोगात पूरक-कर्म उद्देश्याप्रमाणे प्रथमा विभक्तित असते.

**१) भवतण्हा लया वुत्ता।** (उत्त २३ .४८) संसार-तृष्णा लका म्हटली जाते.

**२) कया जिणयंत्रण साविगा सिरिमई।** (जिन. २४) जिनदत्ताने श्रीमंतीला श्राविका केले.

३) जेव्हा अनेक उद्देश्ये एकाद्या नामाशी वा सर्वनामाशी एकविभक्तिक असतात, तेव्हा विधिनाम हे या नाम वा सर्वनामाप्रमाणे असते.

१) तं गेहं सो विभवो सा लीला सो य वल्लहो कंतो। सव्वं खणेण नट्ठं। (नाण १.३१८) ते घर, ते वैभव, ती लीला , तो प्रियपती, हे सर्व क्षणांत नष्ट झाले. २) दुकलत्तं रालिद्दं वाही तह कन्नयाण बाहुल्लं पच्चक्खं नरयमिणं। (नाण. ७.६) वाईट पत्नी, दारिद्र्य, व्याधी व कन्यांचे बाहुल्य हे म्हणजे प्रत्यक्ष नरक.

## ४३२ आ) विशेषण-विशेष्य-संवाद

**अ) गुणविशेषण[१]-विशेष्य-संवाद** :

१) विशेषणाच्या[२] लिंग-वचन-विभक्तिप्रमाणे गुणविशेषण[३]असते.

१) ईइसो चेव असारो संसारो। (पाकमा. पृ. २१) असार संसार हा असाच आहे. **२) महावीरस्स भगवओ सीसे।** (उत्त. २१.१) भगवान् महावीराचा शिष्य. ३) एयारिसे सरीरम्मि। (बंभ पृ. ३८) अशा प्रकारच्या देहात.

**क) वचन-संवाद** :-

१) अनेक विशेष्यांना विशेषण एकच असल्यास ते अ. व. त. असते.

---

१ *समासांत विशेषणे आपल्या मूळरूपात असतात.: तिव्वोवसग्ग, दिव्वाभरण, दीहकाल, परमसंतोस इत्यादी.*

२ *यल्लिंगं यद्वचनं या च विभक्तिर्भवेद् विशेष्यस्य।*
*तल्लिंगं तद्वचन सा च विभक्तिर्विशेषणस्यापि।*

३ *अर्धमागधीत क्वचित् लिंगभिन्नता (उदा. बहवे (पुं.) वावीओ। व विभक्तिभिन्नता (उदा. सइ अन्नेण मग्गेण (दस ५.१.६) दुसरा मार्ग असता) आढळते.*

४ *'वा' ने जोडलेली असताः केरिसो सुद्दो माहणो वा भवइ। (कथा पृ. १७४)*

१) राया समणो मंती दूओ तह चेव धम्म-अहिगारी।

नियसत्थेण विहीणा कयं पि कज्जं विणासेंति (नाण ९.१०९) स्वशास्त्र विहीन असा राजा, श्रमण, मंत्री, दूत तसेच धर्माधिकारी हे केलेल्या कार्याचा ही नाश करतात.

२) बहवे वेज्जा य वेज्जपत्ता य। (विवाग पृ. ८) पुष्कळ वैद्य व वैद्यपुत्र

२) अनेक विशेष्ये 'च' ने जोडलेली[४] असतां त्याचे विशेषण कधी विधि विशेषणाप्रमाणे संनिधच्या विशेष्याप्रमाणे असते.

**१) पाइओ मि जलंतीओ वसाओ रुहिराणि य।** (उत्त १९.७०) ज्वलंत वसा व रक्त मला पाजण्यात आले. २) अन्ने देवा य देवीओ य। (महा पृ. १३७ इतर देव आणि देवी.

**आ) संख्याविशेषण[१]-विशेष्य-संवाद :-**

१) 'एग' हे विशेष्याच्या लिंग-वचन विभक्तीप्रमाणे असते.

**१) मम एगो भाया।** ( कथा पृ. ६०) माझा एक भाऊ **२) संपाएहि ... मे एगं पत्थणं।** (समरा. पृ. १६४) माझी एक प्रार्थना पुरी कर **३) एगेण साहुणा।** (समरा पृ. १८५) **एका साधूने.**

२) दोन ते अठरा ही संख्याविशेषणे नेहमी अ. व. त. असतात. तीनही लिंगी त्यांची रूपे समान आहेत. विभक्ति तेवढी विशेष्याप्रमाणे असेत.

१) चोद्दस महारयणा नव निहओ। (पउम ४.६१) चौदा महारत्ने, नऊ निधी.

**२) दस अज्झयणा।** (विवाग पृ २) दहा अध्ययने ३) अट्ठेव य कम्माइं एगारस पडिमाओ बारस वयाइं। (सिरि ६४) आठच कर्मे, अकरा प्रतिमा बारा व्रते **४) सोलस वरवावीओ।** (पउम. २.५२) सोळा सुंदर वापी.

---

*१ संख्यावाचकांच्या समासांत होणाऱ्या फरकासाठी प्रकरण १२, पुरवणी २ पहा.*

*२ वीसच्या पुढील संख्यावाचके ही विशेष्यासारखीच असल्याने ती कधी विशेष्याची षष्ठी घेतात. उदा. वरगामाण सहस्सं सयं गइंदाण पाइक्काणं लक्खं तुरयाणं दस सहस्साइं। (अगड .१५३) एक हजार सुंदर गांवे, शंभर उत्कृष्ट हत्ती, एक लक्ष पायदळ, दहा हजार घोडे*

३) एकोणीस ते[२] अट्ठेचाळीस– ही नेहमी ए. व. त. असतात. त्यांची विभक्ति मात्र विशेष्याप्रमाणे असते.

**१) एगूणवीसं अज्झयणा।** (नायास पृ. २) १९ अध्ययने **२) वीसं वासाइं।** वीस वर्षे **३) छव्वीसं वासाइं।** (निरमा पृ. १०) २६ वर्षे **४) तीसं महासुमिणा।** ३० महास्वप्ने ५) सत्ततीसं वासइं। (विवाग. पृ. २८) ३७ वर्षे **६) बायालीसं सुमिणा।** ४२ स्वप्ने **७) अ उणतीसं दिणाणि** (कथा पृ. १२०) २९ दिवस.

४) एकूण पन्नास ते अट्ठावन्न : ही फक्त ए. व. त. असतात. त्यांची विभक्ति विशेष्याप्रमाणे असते.

१) एगूणपन्नासं पुत्तजुयलगाणि । (महा पृ. ८ अ) ४९ पुत्रांची जुळी

**२) चउपन्नं अज्झयणा।** (नायासं. पृ. २२७) ५४ अध्ययने ३) सत्तावन्नाए दंतिसहस्सही। (निरया पृ. २७) ५७ हस्तिसहस्रांनी.

५) ५९ ते ९९ : ही फक्त ए. व. त. असतात. त्यांची विभक्ती विशेष्याप्रमाणे असते.

**१) सट्ठिं वासाइं।** (विवाग पृ. ३९) ६० वर्षे २१ बात्तरिं वासाइं । (विवाग. पृ. ४५) ७२ वर्षे ३) उसीइं वासाइं (विवाग पृ. ५६) ८० वर्षे ४) नउइ वासाइं। (विवाग पृ. ५८) ९० वर्षे.

६) सय, सहस्स इत्यादी विशेष्याप्रमाणेच असल्याने ती ए. व. त. तसेच अ. व. त. वापरली[१] जातात विभक्ति[२] विशेष्याप्रमाणे असते.

## ४३३ इ) नाम–सर्वनाम–संवाद

१) नामाच्या लिंग[३]–वचन–विभक्तीप्रमाणे सर्वनाम असते.

---

*१ मागे 'मोठ्या संख्या साधणे' प्रकरण १२, पुरवणी १ पहा*

*२ अ) कधी ही विशेषणे विशेष्याची षष्ठी घेतात. १) पुत्ताणं सट्ठीसहस्सा। ६० हजार पुत्र २) अट्ठसयं खत्रियदारगाणं । ८०० क्षत्रिय मुले इत्यादी*
*आ) क्वचित् या विशेषणांचा विशेष्याशी समासच होतो.*
*अट्ठसहस्सलक्खणधरो। (उत्त. २२.५) आठ हजार लक्षणे धारण करणारा*

*३ कधी लिंगभिन्नता आढळते. : जावंति (नपुं) लोए पाणा (पु.)। (दस ६.१०)*

**१) न सामन्नपुरिसो एसो।** (नल पृ. ५) हा सामान्य पुरूष नाही. **२) तम्मि चेव जम्मे।** (समरा पृ. ४५) त्याच जन्मांत **३) इमस्स सत्तंगरज्जस्स।** (नल. पृ. ८) या सप्तांग राज्याचे

अ) भिन्नलिंगी अनेक नामांबद्दल सर्वनाम येत असल्यास ते कधी पुल्लिगांत तर कधी नपुंसकलिंगात आढळते.[1]

**क) १) कसाया इंदियाणि य ते जिणित्तु।** (उत्त. २३.३८) कषाय व इंद्रिये त्यांचे दमन करून **२) नाणं च दसणं चेव चरित्तं च तवो तहा। एस मग्गो।** (उत्तं २८.२) ज्ञान, दर्शन, चारित्र व तप हा मार्ग

**ख) नाणं च दंसणं चेव चारित्तं च तवो तहा।**

वीरियं उवओगो य एयं जीवस्स लक्खणं ।। (उत्त २८.११)

ज्ञान, दर्शन, चारित्र, तप वीर्य, उपयोग हे जीवाचे लक्षण.

**नाम–संबंधी सर्वनाम संवाद :–**

१) पूर्वगामी नामाप्रमाणे सर्वनामाचा पुरूष, लिंग व वचन[2] असते.

अ) विभक्ति कधी तीच असते :

**१) ते धन्ना कयपुण्णा जे जिणधम्मं धरंति नियहियए।** (कुम्मा ८९) जे जिनधर्म ह्दयात धरतात ते धन्य व पुण्यवान **२) जा निरस्साविणी नावा सा उ पारस्स गामिणी।** (उत्त. २३.७१) जी नाव गळकी नाही तीच पलीकडे जाते.

आ) कधी पुढील वाक्यांत संबंधी सर्वनामाची जी विभक्ती असते तीच :

**१) मुसं न वयई जो उं तं वयं बूम माहणं।** (उत्त. २५.२४) जो खोटे बोलत नाही त्याला आम्ही ब्राम्हण म्हणतो. **२) जीवइया पयत्था जाणिज्जंति इह जेणतं नाणं** (सुपास. ५५१) ज्याचे योगाने येथे जीव इत्यादी पदार्थ जाणले जातात, ते ज्ञान.

---

१ *भिन्नलिंगी नामे 'च' ने अथवा 'वा' ने जोडलेली असल्यास सर्वनाम कधी संनिधच्या नामाप्रमाणे असते. १) सव्वे देवा देवीओ य उव्विग्गा अच्छंति। (महा. पृ. २३० ब) २) सो पुरसो इत्थिया वा। (समरा पृ. २०४) ३) जो पुरिसो इत्थी वा। (कथा पृ. ४०)*

२ *अपवाद : अच्छंदा जेन भुंजंति न से चाइ त्ति वुच्चइ। (दस २.२)*

२) संपूर्ण वाक्याबद्दल संबंधी सर्वनाम येत असेल तर ते नेहमी नपुं द्वितीया ए. व. त. असते.

**१) अजुत्तं कयं इमीए जं तुमं वरिओ।** (नल. पृ. ५) तुला वरिले, हे हिने अयोग्य केले. २) जुत्तं तुमए कयं जं पारद्धीं मंसंच परिचत्ताणि। (नल., टीपा, पृ. १) मृगया व मांस वर्ज्य केलेस, हे तू चांगले केलेस.

३) ज्या वाक्यात संबंधी सर्वनाम आहे त्याचे विधेय नाम असून त्याचे लिंग पूर्वगामी नामापेक्षा भिन्न असेल, तर संबंधी सर्वनाम प्रायः संनिधच्या नामाप्रमाणे असते.

जे माहणा जाइविज्जाविहूणा ताइं तु खेत्ताइं सुपाव याइं। (उत्त. १२.१४) जे जाति-विद्या-हीन ब्राम्हण आहेत ते पापी क्षेत्रे होत.

प्रकरण २९

# वाक्ये जोडणे

### ४३४ वाक्ये जाडणे

एका वाक्यातून प्राय: जरी पूर्ण अर्थबोध होत असला तरी कित्येकदा वाक्ये परस्परावलंबी असतात; त्यातील एक वाक्य प्रधान व इतर वाक्ये गौण असतात. पुष्कळदां दोन स्वतंत्र वाक्येहि काही विशिष्ट कारणास्तव जोडली जातात; येथे गौण प्रधान-भाव मात्र असत नाही. पहिल्या प्रकाराला मिश्र वाक्ये, व दुसऱ्या प्रकाराला संयुक्त वाक्ये, असे म्हटले जाते.

मिश्र वाक्यांतील गौण वाक्ये ज्या प्रकारचे कार्य करत असतील त्यानुसार त्यांना नामवाक्य, विशेषणवाक्य, क्रियाविशेषणवाक्य, इत्यादी संज्ञा दिल्या जातात.

खालील शब्दांच्या साहाय्याने ही वाक्ये जोडली जातात.

**(१) नामवाक्य :-** ति (इति), जहा, जं (यद्) (कीं), (तं जहा (तद् यथा), जइ (यदि))

**(२) विशेषणवाक्य :-** ज (यद्) (त (तद्)), जारिस (यादृश) (तारिस (तादृश))

**(३) क्रियाविशेषण वाक्य :-**

(१) स्थळदर्शक :- जत्थ (-तत्थ), जत्थजत्थ (-तत्थ तत्थ), जहिं (-तहिं), जहिं जहिं (-तहिं तहिं) ,जत्तो (जेथून) (-तत्तो) (तेथून)

(२) काळदर्शक :- जया, जइया, जाहे (-तया, तइया, ताहे), जया जया (-तया तया), जाव (-ताव), जाव न (-ताव), जप्पभिंइ (-तप्पभिइं).

(३) रीतिदर्शक :- इव, जहा (-तहा), हि, जेण-णं (-तेण णं), ति (इति), जाव (म्हणजे)

(५) संकेत :- जइ, अह (-तो, ता, तओ), चे[१] (चेत्) (तरिहि[२] (तर्हि))

संयुक्तवाक्यें पुढील प्रमाणे जोडली जातात :-

**(१) समुच्चय :-** च, य; न च, न य; तदणु, तयणु; इओ य, तहा य, अवि (अपि), अवि य, केवलं - अवि, किं पुण, अह (अथ), पुव्वं - तओ; अणंतरं, अणंतरं च, तओ य (ततःच), अन्नं च, अवरं च, किंच, यावि (चापि), तयणंतरं, पढमं-पच्छा, तओ परं (ततःपर), ताव (प्रथम) तओ.

**(२) विकल्प :-** वर, व; वा वा; किंवा, अहवा, न वा; उय (उत), उदाहु, उयाहु, उदाहो; अन्नहा; इयरहा, इहरा.

**(३) विरोध :-** तु, उ; किंतु, परंतु; परं, पुण, केवलं, तहवि

**(४) कार्यकारण :-** ता, तो, तओ; अओ (अतः) तम्हा (तस्मात्)

या सर्वांचीच उदाहरणे येथे ग्रंथविस्तार भयास्तव दिलेली[३] नाहीत. पुढे मात्र काही उदाहरणे दिली आहेत.

**४३५ नामवाक्य जोडणें**

(१) 'इति' ने अपरोक्ष[४]विधान, एखादा विचार किंवा (एखाद्या शब्दाचें) स्पष्टीकरण दर्शविले जाते.

(१) अहो मम सामत्थं एस न मुणइ त्ति विगप्पिऊण। (महा. पृ.१७५अ) अहो! हा माझे सामर्थ्य जाणत नाही, असा विचार करुन. (२) अज्जेयव्वं धणं ति मह इच्छा। (जिन. पृ. १४) धन मिळवावे अशी माझी इच्छा आहे. (३) मम साहुवादो होइ त्ति बुद्धीए निग्गओ। (कथा. पृ.१०९) मला साधु म्हणतील, या बुद्धीने निघाला.

(२) 'जहा' ने अपरोक्ष[५]विधान, एखाद्या शब्दाचे स्पष्टीकरण, तसेच ऐकणे, जाणणे, इत्यादि क्रियापदांची वाक्यरूप कर्में निर्दिष्ट होतात.

---

१ *'चे' चा उपयोग अर्धमागधीत क्वचित् आढळतो.*

२ *सुर. १.१३२ 'तरिहि' चा उपायोग हि तुरळक आहे.*

३ *'अव्ययांचे उपयोग' या प्रकरणांत पुष्कळ उदाहरणे सापडतील*

४ *'इति' हे अपरोक्ष विधान, इत्यादीनंतर येते.*

५ *'जहा' हें अपरोक्ष विधान, इत्यादीपूर्वी येते.*

(१) तेण भणिया सा जहा–मयच्छि भगिणी तुमं मेहोसि। (महा. पृ.१६२ अ) त्याने तिला असे म्हटले 'मृगाक्षी! तूं माझी बहीण आहेस' (२) जाणामि जहा सो धुत्तो। (पाकमा पृ.४५) मला माहीत आहे की तो धूर्त आहे. (३) जायाय पसिद्धी जहा– चंडकोसिओ उववणं अवलोइउं, पि न देइ। (महा. पृ.१७४अ) आणि प्रसिद्धी झाली की चंडकोसिय उपवन पाहूं सुध्दां देत नाही. (३) जं :- मा भणह जं न भणियं। (सुर. २.१४) (असे) म्हणू नका की सांगितले नव्हते. (४) जइ[1] :- पेच्छ जइ मम पासे संति। (कथा. पृ.१११) माझ्याजवळ आहेत की नाहीत ते पहा.

(अ) कधी पूर्ववाक्यात पुढील वाक्याबद्दल एखादा शब्द येऊन वाक्ये जोडली जातात.

(१) सच्चं खु एयं – जो खीरं पाएइ सो वि डसिज्जइ तुह जाईए। (नल. पृ.२७) हे अगदी खरे की जो दूध पाजतो तो सुद्धा तुझ्या जातीकडून चावला जातो. (२) ताहे तुब्भे एवं वयह–अम्हे तारयाहि। (नामासं, पृ.१२७) तेव्हा तुम्ही असे म्हणा – 'आम्हाला तार'.

**४३६ विशेषणवाक्य जोडणें**

**(१) ज:–** (१) तं नत्थि जं न कुव्वंति पाणिणो साहसं दविणकज्जे। (सुपास. ५२३) पैशासाठी प्राणी जे करणार नाहीत असे कोणतेहि साहस नाही. (२) आणेह दव्वाणि जाणि अहं उवदिसामि। (वसु. पृ.२१८) मी सांगतो ती द्रव्ये आणा.

**(२) जारिस :–** (१) मूलदेवेण वि एरिसो सुमिणो दिट्ठो जारिसो मए[2]। जसले स्वप्न मी पाहिले तसले मूलदेवाने हि पाहिले (२) जारिसं कल्ले परिविट्ठं तारिसं अणुदिणं दायव्वं। (धर्मो. पृ.२००) काल जसले वाढले तसले रोज द्यावे (३) जारिसए मम ओरोहे तारिसए तो अन्नस्स। (नायासं, पृ.११०) जसले माझे अंत:पुर आहे तसले दुसऱ्याचे नाही.

---

१ *इंग्लिश मधील* if, whether *प्रमाणे*

२ *घाटगे, पृ.२१६*

## ४३७ क्रियाविशेषण वाक्य जोडणे

**(अ) कालदर्शक :–**

(१) जया, जाहे, जइया :– (१) जया अहं अगारवासं वसामि तया अहं अप्पवसा। (निरमा पृ.५३) जेव्हा मी घरी होते तेव्हा मी स्वतंत्र होते. (२) सव्वे वि निवा जइया आयत्ता होंति एगनरवइणो। तदणुन्नाएण तया सयंवरो होइ कायव्वो।। (सुर. १.१२८) जेव्हा सर्व राजे एका राजाच्या आयत्त होतात वा असतात तेव्हा तदनुज्ञेने स्वयंवर करायचे असते. (३) जाहे से जक्खे एवं वएज्जा ताहे तुब्भे एवं वयह। (नामासं पृ.१२७) जेव्हा तो यक्ष असे म्हणेल तेव्हा तुम्ही असे म्हणा.

**(आ) स्थलदर्शक :–**

(१) जत्थ[1] :– (१) वच्चामि तत्थ कत्थ य जत्थ न पेच्छामि नियलोयं। (जिन. पृ.३) जेथे आपले लोक दिसणार नाहीत अशा कोठे तरी जाईन. (२) जत्थ वच्चसि अणुगंतव्वं मए वि तत्थेव। (सुर. ७.१७६) जेथे तू जाशील तेथे मी हि मागोमाग येणार.

(२) जत्थ जत्थ :– जत्थ जत्थ आयरिओ ठायइ तत्थ तत्थ नावा जले बुड्ड –इ। (धर्मो. पृ.४६) जेथे जेथे आचार्य उभा राही तेथे तेथे नाव बुडू लागे.

**(इ) रीतिदर्शक :–**

(१) इव :– कोवो जलणो व्व वणं दहइ तवं। (संप इ. २.७९) अग्नि जसे वन जाळतो तसा कोप तप जाळतो.

(२) जहा :– जं जह भवियव्वं होइ तं तहा देव्वजोएण। (लीला. ३११) जे जसे होणार असेल ते दैवयोगाने तसेच होते.

(३) जहाजहा :– जह जह वड्ढइ गब्भो तह तह सुंदरिमणंमि संतावो। (नाण. १.६३) जस जसा गर्भ वाढू लागला तसतसा सुंदरीचा मन:संताप वाढू लागला.

**(ई) कार्यकारण :–**

(१) जं :– (१) एत्तियकालं णणु वंचिउ म्हि जं सेविओ ण मे धम्मो। (धर्मो. पृ.२६) इतका काळ मी वंचित झालो, कारण मी धर्म आचरिला नाही.

---

१ *कधी विशेषणवाक्य :– पत्तो तमुद्देसं जत्थ निहाणं। (समरा पृ.१४४) जेथे ठेवा होता त्या प्रदेशात पोचला.*

(२) फलिअं सुकएण अुरिणा --- चलणा तुह जं णिभालिआ। (उसा. २.४) ज्या अर्थीं तुझे चरणदर्शन झाले त्याअर्थीं पुष्कळ सुकृत फळाला आले असले पाहिजे.

(२) जेण-णं :- (१) एसा जणणीतुल्ला जेणं जिट्ठस्स बंधुणो भज्जा। (सुपास. ४८७) ही मातृवत् आहे, कारण ती ज्येष्ठ बंधूची भार्या आहे. (२) जेणं चिय उद्दामो हिंडइ एसो जयंमि अक्खलिओ। तेणं चिय सप्पुरिसा लग्गा परलोगमग्गं-मि।। (समरा. पृ.१८६) कारण हा उद्दाम अस्खलितपणे जगात हिंडतो; म्हणूनच सत्‌पुरुष परलोक मार्गाला लागले आहेत.

(३) इति :- (१) अलाभो त्ति न सोयए। (आचारांग १.२.५.३) लाभ झाला नाहीं म्हणून शोक करू नये. (२) तुमं भणसि त्ति वच्चामो। (वसु. पृ.२४३) तूं म्हणतोस म्हणून जाऊ या.

(४) जाव :- विसज्जेह मं जाव णं जाणामि।[1] (वसु. ९.१२) मला जाऊं द्या म्हणजे मी जाणून घेईन.

**(उ) संकेत :-**

(१) अह :- अह जाणासि तो भण। (उत्त. २५.१२) जर माहीत असेल तर सांग. (२) चे :- तं कहं इतिचे। (उत्त. १६.२) ते कसे असे जर (म्हणशील तर ऐक) (३) तरिहि :- जइ एवं तरिहि सुंदरतरं। (सुर. ११.७१) जर असे असेल तर फारच चांगले.

**४३८ समुच्चयदर्शक वाक्यें जोडणें**

**(१) अवि (अपि) :-** न वि रुट्ठो न वि तुट्ठो। (उत्त. २५.९) रागावला हि नाहीं आणि संतुष्ट हि झाला नाही.

**(२) किंपुण :-** एएसिं एक्केक्कं पि नूण वेरग्गकारणं गरुयं। किं पुण सव्वेसिं समवाओ।। (महा. पृ.६९ ब) यातील एकेकहि वैराग्याचे मोठे कारण आहे; मग सगळी एकत्र आल्यावर काय सांगावे?

**(३) किंच :-** किं च पंचवीसहि वि तत्ते हि एगं जीवतत्रं न सिज्झइ। (जिन. पृ.३०) आणि असें की पंचवीस तत्त्वांनी हि एक जीवतत्त्व सिद्ध होत

१ *घाटगे, पृ. १९६*

नाही.

**(४) न य :–** न य हाणी न य वुड्ढी होइ। (पएम. ३.४१) हानी हि होत नाही व वृद्धीहि होत नाही.

**(५) तयणु :–** अइकोउहल्लेणं गहिया मंजरी राइणा तयणु समत्थखंधावारेण वि। (धर्मो. पृ.१२१) अति कुतूहलाने राजाने मंजरी घेतली, नंतर सर्व सैन्याने सुद्धा.

**(६) तओपरं :–** तओपरं सोगमुवगओ कालसेणो। (समरा. पृ.४२२) त्यावर कालसेण फार शोक करु लागला.

**(७) तयणंतरं :–** परिचत्तो म्हि तीए। तयणंतरं निग्गओ हं वेसाघराओ। (महा. पृ.२६अ) तिने माझा त्याग केला; तदनंतर मी वेश्यागृहांतून बाहेर पडलो.

**(८) पढमं–पच्छा :–** अओ पढमं दूयपेसणेण से मुणिज्जउ मणं। पच्छा जहाजुत्तं किज्जउ त्ति। (नल. पृ.७) म्हणून, प्रथम दूत पाठवून त्याचे मन जाणून घ्यावे; नंतर योग्य ते करावे.

**(९) अन्नं च, अवरं :–** एगं हीणजाईओ अण्णंच दारिद्दं अवरं पुण एरिसं सरीरं। (कथा. पृ.१७५) एक (मी) हीनजातीय आनखी दारिद्र्य, आणि असले शरीर.

**(१०) ताव (प्रथम) तओ :–** ताव राया निद्दाए सुवउ तओ कहिस्सं। (चउ. पृ४१) प्रथम राजा झोपी जाऊ दे; मग सांगेन.

**४३९ विकल्पदर्शक वाक्यें जोडणें**

**(१) अन्नहा :–** ता देह मह करं इण्हिं अन्नह मह भूमिं सिग्घं परिच्चयह। (सुपास. ४९३) तेव्हा आत्तां मला कर द्या; नाही तर लगेच माझी भूमि सोडा.

**(२) इहरा, इयरहा :–** (१) वयं चरह। इहरा इहलोए वि हु पाविस्सह तिक्खदुक्खाइं।। (सुपास. ६२८) व्रत आचरा; नाहींतर इहलोकींहि तीक्ष्णदु:खे मिळतील. (२) मरणं चिय मज्झ होइ सेयं तु। इयरह लोयावाओ आजम्मो दूसहो नियमा।। (नाण. १.९१) मरणच मला श्रेयस्कर आहे; नाहींतर जन्मभर दु:सह असा लोकापवाद नक्की होईल. (३) जइ रहियं जीवेहिं तो भुंजइ इयरहा वज्जं। (सुपास. ४९१) जर (अन्न) निर्जीव असेल तर तो खाई, नाहीं तर (तें) वर्ज्य.

**(३) अहव, अहवा :–** वेहल्लं कुमारं पेसेहि अहव जुध्द सज्जो चिट्ठाहि।

(निरया पृ.२४) वेहल्ल कुमाराला पाठव, अथवा युध्दसज्ज होऊन रहा.

**(४) उदाहु :–** तं दारगं एगंते उज्झामि उदाहु मा। (विवाग. पृ.१०) त्या मुलाला एकान्तांत टाकू की नको.

**(५) वा :–** दारयमाणेहि ममं वा तत्थ नेहि। (चउ. पृ.३१) मुलाला आण वा मला तेथे ने.

**(६) न वा :–** इच्छइ वा न वा अन्नं पुरिसं। (सुर. ४.१२३) (ही) दुसऱ्या पुरुषाची इच्छा करते किंवा नाहीं.

## ४४० विरोधदर्शक वाक्यें जोडणे

**(१) परं :** (१) अच्छसु एत्थं परमत्तणो य गुज्झं कस्स वि मा पयडेसु। (अगड. १७) येथे रहा; पण आपले गुह्य कुणाजवळ हि प्रगट करू नकोस (२) अप्पवहो वि न जुत्तो देसच्चाओ परं जुत्तो। (सुर. २.१९६) आत्महत्याहि योग्य नाही; पण देशत्याग योग्य आहे.

**(२) तु, उ :–** (१) तुमं तु परत्थीपरंमुहो। (नल. पृ.५०) पण तू परस्त्री पराङ्मुख आहेस. (२) चइज्ज देहं न उ धम्मसासणं। (दस. ११.१७) देहत्याग करीन, पण धर्माज्ञा त्यागणार नाही.

**(३) किंतु :–** न देवया किंतु माणुसी एस :। (नल. पृ.४२) ही देवता नाही, पण मानुषी आहे.

**(४) पुण :–** पुन्नक्खएण झिज्जइ रिद्धी न उण चाएण। (नल. पृ.४५) रिद्धी पुण्यक्षयाने कमी होते, पण त्यागाने नाही.

## ४४१ कार्य–कारण दर्शक वाक्यें जोडणे

**(१) ता, तो, तओ :–** (१) एत्थ आसमें दिट्ठीविसो सप्पो अभिद्दवेइ ता मा एएण पहेण वच्चह। (महा. पृ.१५९अ) येथे आश्रमात दृष्टिविष असा सर्प त्रास देतो; म्हणून या मार्गाने जाऊ नका. (२) न सोहणं सरीरं कणगमईए तओ अहं पेसिया। (कथा. पृ.१४४) कणगमतीची प्रकृति बरी नाही; म्हणून मला पाठविले आहे.

**(२) अओ :–** (१) एसो खु रायाहिरायस्स पहाणदूओ अओ सामिव्व

दट्ठव्वो। (महा. ४५अ) हा राजाधिराजाचा प्रधान दूत आहे; म्हणून त्याला स्वामीप्रमाणे मानावयाचे (२) सुहुमो---- य सो वत्तए अओ न दीसइ। (समरा. पृ.१६८) तो सूक्ष्म आहे; म्हणून दिसत नाही.

**(३) तम्हा :–** सूसइ कंठो महं अइनिसाए... तम्हा उदयं समाणेह। (पउम. ३५.३) फार तहानेने माझा घसा शुष्क झाला आहे; म्हणून पाणी आणा.

**४४२ एकत्र ठेवून वाक्यें जोडणे**

पुष्कळदा जोडणाऱ्या शब्दाविना वाक्यें फक्त एकत्र ठेवून त्यांचा परस्पर संबंध सूचित केला जातो.

**(अ) मित्रवाक्य :–**

**(१) कारण :–** अलं बालस्स संगेण वेरं वड्ढइ अप्पणो। (आचारांग १.१.२.४) ज्यामुळे स्वत:चे वैर वाढते असा मूर्खांचा संग पुरे ।

**(२) संकेत :–** निमधूयं मे नरवर न देसि पविसामि जलणंमि। (चउ. पृ.२६) हे राजा! जर तूं आपली मुलगी मला दिली नाहीस तर मी अग्नीत प्रवेश करीन.

**(३) नामवाक्य :–** को जाणइ परे लोए अत्थि वा नत्थि वा पुणो। (उत्त. ५.६) पर लोक आहे की नाही हे कुणास माहीत आहे?

**(४) विशेषणवाक्य :–** धी संसारसहावो, पुत्तो वि हु दारुणो हवइ वइरी। (सुर १६.१५८) पुत्रहि जेथे दारुण वैरी होतो अशा संसार स्वभावाचा धिक्कार।

**(आ) संयुक्त वाक्ये :–**

**(१) समुच्चय :–** (क) राया वडरुक्खं पेच्छइ देविं भणइ। (चउ. पृ.१७) राजा वटवृक्ष पहातो (व) राणीला म्हणतो.

**(ख) (दोन आज्ञार्थी वाक्ये) :–** एह भुंजह। (बंभ. पृ.४५) या (व) जेवा.

**(ग) (वस्तुस्थिति वर्णितांना) :–** घोरा मुहुत्ता अबलं सरीरं। (उत्त. ४.६) मुहूर्त (वेळ) भयंकर आहे; शरीर दुबळे आहे.

**(घ) (क्रियासंतति सांगतांना) :–** पाडियाइं फोलाइं भग्गा कलसगा फोडिया कमंडलु (महा. पृ.१७४ व) फळे पाडली, कलश मंगिले, (व) कमंडलू

फोडले.

**(२) विकल्प :–** (१) किमेत्थ उदगं अत्थि नत्थि। (समरा. पृ.१००) येथे पाणी आहे किंवा नाही? (२) समणो वज्झो अवज्झो। (वसु. पृ.२७२) श्रमण वध्य की अवध्य?

**(३) विरोध :–** देवो उदायणं बोहेइ न संबुज्झइ। (पाकमा. पृ.४०) देवाने उदायणाला बोध केला, (पण) तो जागृत झाला नाही.

**(४) कार्यकारण :–** (१) बीहेमि एहि तुरयं। (जिन. पृ.३१) मला भीति वाटते, (म्हणून) लौकर ये. (२) पेसह कुमारं नत्थि भयं। (कथा. पृ.३०) कुमाराला पाठवा, (कारण) भय नाही.

प्रकरण ३०

# वाक्यातील शब्दक्रम व वाक्यक्रम

## ४४३ वाक्यातील शब्दक्रम

अर्धमागधीत खरे म्हणजे वाक्यातील शब्दक्रमाला फारसे महत्त्व नाही. याचे मुख्य कारण असे की वाक्यातील शब्दांचा परस्पर संबंध हा त्यांच्या विशिष्ट रूपांनी ठरलेलाच असतो; त्यामुळे जरी शब्दक्रम बदलला तरी अर्थ बदलण्याची भीति नसते.

तथापि याचा अर्थ असा नव्हे की वाक्यात हवे तसे शब्द ठेवून द्यावेत. उलट, कित्येकदा काही विशिष्ट[१] क्रमानेच वाक्यांत शब्दांचा, उपयोग करणे अगत्याचे असते अर्धमागधीवाक्यातील शब्दक्रम हा थोड्याफार प्रमाणात संस्कृतसारखाच आहे, कधी तो जरा अनिर्बंध आहे. त्यामुळे शब्दक्रमाबद्दलचे अगदी ढोबळ[२] नियम सांगता येतील.[३]

(१) वाक्यारंभी उद्देश्य, वाक्यान्ती क्रियापद; मध्ये इतर शब्द असतात.

**(१) सो य मुणिय वइयरो तुम्हमम्हंच समागमणं सुंदर मन्निस्सइ।**

---

१ *पद्यांतील शब्दक्रम हा वृत्तनियंत्रणामुळे जवळ जवळ अनिर्बंध असतो. त्यामुळे येथे उल्लेखिलेला विशिष्ट शब्दक्रम हा गद्यांतील वाक्यांना उद्देशून आहे, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.*

२ *वक्त्याच्या वा लेखकाच्या मर्जीप्रमाणे किंवा वाक्यातील एखाद्या भागावर जोर द्यायचा असल्यास, या ढोबळ नियमांना सुद्धा कित्येकदां बाजूला सारण्यात येते.*

३ *अगदी सामान्यपणे वाक्यातील शब्दक्रम असा :– स्थलकालदर्शक क्रियाविशेषणे वा क्रियाविशेषणात्मक वाक्यांश आरंभी; नंतर विशेषणे वा विशेषणात्मक वाक्यांश अथवा उद्देश्यावलंबी संबंधी वाक्यें यासह उद्देश्य; मग विशेषणे वा विशेषणात्मक वाक्यांश अगर कर्मावलंबी संबंधी वाक्यें यासह कर्म; त्यानंतर क्रियाविशेषण अव्यये; शेवटी क्रियापद.*

(बंभ. पृ.६५) व हकिकत कळल्यावर तो तुमचे व आमचे मीलन दर समजेल.

(२) एसा लज्जंती न किं वि तुज्झ साहिउं सक्कइ। (बंभ.पृ.६१) ही लाजेने तुला काहीही सांगू शकत नाही.

(अ) कधी जोर देण्यास क्रियापद वाक्यारंभी रेवतात.

(१) सद्‌दहामि णं भंते निग्गंथं पावयणं (पएसि परि.९) महाराज व निर्ग्रंथ प्रवचनावर मी विश्वास ठेवतो.

(२) इच्छामि... तुज्झं अंतिए... धम्मं निसामित्तए। (अंत ८०) तुमच्याकडून धर्म ऐकण्याची माझी इच्छा आहे.

(आ) कथनात 'अत्थि' हे क्रियापद कित्येकदा वाक्यारंभी ठेवतात. अत्थि कंचणपुरं नाम नयरं। (पाकमा. पृ.६३) कंचणपुर नावाचे नगर होते.

(२) विशेषणे प्राय: त्यांच्या विशेष्यापूर्वी ठेवली जातात.

(१) चडव्विहा देवा आगया। (अंत. १०) चार प्रकारचे देव आले (२) चंपाए नयरीए तओ माहणा भायरो परिवसंति चंपा नगरीत तीन ब्राह्मण बंधु रहात होते.

(अ) सर्वनामात्मक व इतर विशेषणे असता, सर्वनामात्मक विशेषणे प्राय: प्रथम असतात (१) एसा वि मम जेट्ठा भइणी। (महा. पृ.१६३अ) ही हि माझी ज्येष्ठ भगिनी (२) एस एक्को चेव मे सुओ। (पाकमा पृ.२३) हा माझा एकच पुत्र.

(आ) एखाद्या विशेष्याला पुष्कळ विशेषणे असल्यास ती विशेष्यानंतर ठेवली तरी चालते.

(१) एक्कं पुरिसं पासइ जुण्णं जराजज्जरियदे हं। (अंत. ५९) एका वृद्ध, जराजर्जरित देही पुरुषाला पहातो. (२) एगं गोवच्छं थोरगत्तं सेयं पेच्छइ। (चउ पृ.२२) एक पांढरे, भरदार अंगाचे गाईचे वासरू पाहिले.

(इ) विधिविशेषण हे प्राय: उद्देश्यानंतर येते.

सव्व चेव संसारियं वत्थुं विवागदारुणं। (समरा. १७६) संसारातील सर्वच वस्तु परिणामी दारुण आहेत.

टीप :- कधी जोर देण्यास विधिविशेषण अगोदर ठेवतात.

(१) विचित्ताणि खु विहिणो विलसियाणि। (समरा. पृ.२०३) दैवाचे खेळ खरोखर विचित्र असतात. (२) सोहणो एक अवसरो। (चउ. पृ.२८) ही वेळ

चांगली आहे.

(३) एकविभक्तिक शब्द आपल्या विशेष्यापूर्वी असतात.

एयाओ तस्स तुह वइरिणो नट्ठमत्तस्स भगिणीओ। (बंभ. पृ.२) त्या तुझ्या नट्ठमत्त (नावाच्या) शत्रूच्या ह्या बहिणी.

(अ) विशेषनाम हे प्राय: सामान्य नामापूर्वी येते.

**(१) चंपाए नयरीए।** (नायासं, पृ.१६२) चंपा नगरीत **(२) मोग्गरपाणिस्स जक्खस्स।** (अंत. परि.१००) मोग्गरपाणि (नावाच्या) यक्षाचे.

(आ) 'नामं' चा उपयोग असता, विशेषनाम हे सामान्य नामापूर्वी असते **नंदणवणे नामं उज्जाणे होत्था।** (अंत. ६) नंदणवण नावाचे उद्यान होते.

(इ) विधिनाम हे प्राय: उद्देश्यानंतर येते.

**इह परलोए विज्जा कल्लाणहेऊ।** (अरी. पृ.१०) इह परलोकांत विद्या ही कल्याणाचा हेतु आहे.

टीप :- जोर देण्यास विधिनाम कधी उद्देश्यापूर्वी ठेवतात.

**(१) दुक्खहेयवो विसया।** (समरा. पृ.१६०) विषय म्हणजे दु:खहेतु. **(२) उवाओ य एस।** (समरा. पृ.१६३) आणि हा उपाय आहे.

(४) प्राय: सर्वनामाचे रूप वाक्यारंभी असते.

**तस्स रन्नो धारिणी नामं देवी होत्था।** (अंत. ८) त्या राजाची धारिणी नावाची राणी होती.

(अ) प्रश्नार्थक सर्वनाम वाक्यारंभी असते.

**केहिं पुण कम्मेहिं पाणिणो णरएसु वच्चंति।** (धर्मो. पृ.४४) कोणत्या बरे कर्मांनी प्राणी नरकाला जातात?

(आ) दर्शक सर्वनाम हे विशेषनामापूर्वी असते.

**से अज्जुणए अणगारे।** (अंत. १२०) तो अज्जुणय भिक्षु.

(५) (क) द्वितीयान्त, कर्म प्राय: क्रियापदापूर्वी असते.

**(१) अन्नं न गच्छावेज्जा।** (दस ४) दुसऱ्याला जाण्यास सांगू नये.

**(२) सो जत्थ सुरूवं दारियं पासइ।** (पाकमा पृ.३१) तो जेथे सुरूप मुलगी पाही. (अ) कधी जोर देण्यास क्रियापद अगोदर ठेवतात.

**(१) जिणेमि रज्जं नलं।** (नल पृ.९) नळ व राज्य जिंकीन **(२)**

**सगरोवि पालेइ रज्जं।** (पाकमा पृ.१७) सगर सुद्धा राज्य पाळू लागला.

(ख) दोन द्वितीयान्त कर्मांतील व्यक्तिवाचक कर्म प्रथम असते.

**एयं कन्नगं इयाणिं न किं पि भणिस्सामि।** (महा. पृ.२४३ ब) या कन्येला मी आता काहीहि बोलणार नाही.

(अ) कधी व्यक्तिवाचक कर्म नंतर ठेवतात.

**तं नियमायरं मग्गेइ।** (कथा. पृ.२५) ते आपल्या आईला मागी.

(६) (क) तृतीयान्त साधनवाचक पद उद्देश्य व विधेय यामध्ये असते.

**(१) तेसिं च एगो मंततंत भूइकरणेहिं जीवइ।** (महा पृ.१५५व) त्यातील एक मंत्र, तंत्र, भूति करून जगे **(२) आहओ दढं निसियरवग्गेण कंधराए।** (चउ. पृ.२८) मानेवर तीक्ष्ण खड्गाने जोरांत प्रहार केला.

(ख) कारणदर्शक तृतीयान्त पद प्रथम येते.

**रुहिरनिवहनिग्गमेण धवलीहूयं सरीरं।** (चउ. पृ.२९) रक्ताचा प्रवाह बाहेर पडल्याने शरीर पांढरे पडले.

(ग) तृतीयान्त उद्देश्य विधेयापूर्वी असते.

**(१) ता अप्पमत्तेण मया अप्पा रक्खियव्वो।** (जिना. पृ.५३) म्हणून काळजी-पूर्वक मला स्वतःचे रक्षण केले पाहिजे. (२) तुमे निच्चं रायकुले समागंतव्वं। (कथा पृ.१०३) तू रोज राजवाङ्मयात यावेस.

(अ) तृतीयान्त उद्देश्य कधी विधेयानंतर ठेवतात.

**(१) तओ मुक्को तक्करो रन्ना।** (नल. पृ.२३) मग राजाने चोराला सोडले.

**(२) तत्थ इमं चिंतियव्वं साहुणा।** (कथा. पृ.१३२) तेथे साधूने असा विचार करावा.

(७) (क) हेतु-प्रयोजन-दर्शक चतुर्थ्यन्त पद अर्धमागधी आगमांत प्रायः वाक्यान्ती आढळते.

**त्तए णं अहं गोयमा कुम्मगामं नयरं संपइट्ठिए विहाराए।** (भग पृ.८) गोयमा, नंतर मी विहारासाठी कुम्मगाम नगराकडे निघालो.

(अ) हें चतुर्थ्यन्त पद कधी मध्येच आढळते.

**महावीरस्स वहाए सरीरगंसि तेयं निसिरइ।** (भग. पृ.२४) महावीराच्या वधासाठी शरीरात तेज सोडले.

(ख) स्थितिदर्शक चतुर्थ्यन्त पदानंतर लगेच विधेय असते.

(१) देवत्ताए उववन्ने। (भग पृ.१९) देव म्हणून जन्मला (२) पुत्तत्ताए उववज्जिही। (समरा पृ.४४) पुत्र म्हणून जन्माला येईल.

(अ) हें चतुर्थ्यन्त पद कधी वाक्यान्ती आढळते.

समुप्पण्णो तीसे गब्भंमि पुत्तत्ताए। (महा. पृ.२८ब) पुत्रत्वाने तिच्या गर्भात गेला.

(८) तुलनेतील पंचम्यंन्त पद हे प्रथम असते.

विम्हिया सक्कवण्णिय रूवसिरीओ वि अहिययरं रूवाइसंपयं दट्ठुं। (पाकमा. पृ.७२) इंद्राने वर्णिलेल्या रूपशोभे पेक्षा अधिक रूपातिशय पाहून विस्मिन झाले.

(अ) जोर देण्यास हे पंचम्यन्त पद कधी नंतर ठेवतात

मूढतराए णं तुमं पएसी ताओ कट्ठहारयाओ। (पएसि. परि२८) हे पएसी! त्या काष्ठवाहकापेक्षा तू अधिक मूर्ख आहेस.

(९) (क) षष्ठयन्त पद विशेष्यापूर्वी असते.

रन्नो जेट्ठे पुत्ते। (पएसि. परि३) राजाचा ज्येष्ठ पुत्र.

(अ) जोर देण्यास कधी षष्ठ्यन्त पद नंतर ठेवतात.

**खण भंगुरयाए सरीरस्स चंचलयाए जीवियस्स।** (जिन पृ.२) शरीराच्या क्षणभंगुरतेने (व) जीविताच्या चंचलतेने.

(आ) संख्यावाचक संबंधी षष्ठ्यन्त पदहि कधी विशेष्यानंतर येते. सहस्सं सहस्सं काहावणाणं। (अरी. पृ.६) हजार हजार कार्षापण.

(इ) एखाद्या विशेष्याला इतर सर्वनामात्मक विशेषण असल्यास प्रथम ते येते, मग विशेषणात्मक षष्ठ्यन्त पद येते.

**इमो मम तणओ। (चउ. पृ.४४)** हा माझा मुलगा.

(ख) सत्षष्ठी प्राय: उद्देश्यापूर्वी येते.

(१) नलस्स वच्चंतस्स अत्थंगओ गमयमणी। (नल. पृ.६) नल जात असता सूय अस्तास गेला. (२) तत्थ तथा तुम्ह नियंताण चेव अस्सेणावहरिओ कुमारो। (पाकमा. पृ.५४) त्यावेळी तेथे तुम्ही पहात असतांनाच घोड्याने कुमाराला दूर नेले. (अ) कधी सत्षष्ठी उद्देश्यानंतर येते.

जं कुमारा एक्कपए चेव पेच्छंताण चेव अम्ह दड्ढा। (पाकमा. पृ.२२) की

आम्ही एक्कपए चेन पेच्छंताण चेव अम्ह दड्ढा। (पाकमा पृ.२२) की आम्ही पहात असतांनाच कुमार एकदम दग्ध झाले.

(१०) (क) स्थलकालदर्शक सप्तम्यन्त पद वाक्यारंभी येते.

(१) चरिमजामंमि य विउद्धा लच्छी। (समरा. पृ.४२६) शेवटच्या प्रहरी लक्ष्मी जागी झाली. (२) **अवंती जणवए उज्जेणी नाम नयरी।** (कथा. पृ.११७) अवंती देशांत उज्जेणी नांवाची नगरी होती.

(ख) सत्सप्तमी प्राय : उद्देश्यापूर्वी असते.

**अरण्णपरिसरे गच्छंतेसु नावसकुमारेसु सो वि कोऊहलेण... गओ रण्णं।** (बंभ. पृ.४८) अरण्य परिसरात तापसकुमार जात असता कुतूहलाने तोहि अरण्यात गेला.

(अ) कधी सत्सप्तमी उद्देश्यानंतर ठेवतात

(१) अहं पि पत्थिओ दक्खिणामुहो तासु गयासु। (वसु. पृ.२६५) त्या गेल्यावर मी दक्षिणेकडे निघालो. (२) न एसा जुगबाहुंमि जीवमाणे अन्नं पुरिसमिच्छेइ। (चउ. पृ.२७) जुगबाहु जिवंत असतां ही अन्य पुरुषाची इच्छा करीत नाही.

(११) संबोधनाची रूपे प्राय: वाक्यारंभी येतात.

(१) पुत्ति मा रुयसु। (नल. पृ.२५) मुली! रडू नकोस (२) सामिणि किंवा एत्थ असंबध्द। (समरा. पृ.७०) आणि स्वामिनी, येथे काय असंबद्ध आहे.

(अ) संबोधनाची रूपे कधी मध्येहि ठेवतात.

तए णं अहं गोयमा --- (भग. पृ.८) गोयमा, त्यानंतर मी.

(आ) 'देवाणुप्पिया' व 'भंते' हीं संबोधनाची रूपे कधी वाक्यारंभी तर कधी मध्ये आढळतात.

मध्ये :- (१) से णं भंते पुरिसे पुव्वभवे के आसी। (विवाग पृ.६) महाराज, पूर्वजन्मी तो पुरुष कोण होता? (२) अहं णं देवाणुप्पिए तव पुत्तं पासिउं हव्वमागए। (विवाग. पृ.४) देवानुप्रिये, तुझ्या पुत्राला पहाण्यास मी येथे आलो आहे.

वाक्यारंभी :- (१) भंते को देवो तुम्ह। (कथा पृ.३८) महाराज! तुमचा देव कोणता? (२) भंते विरत्तो हं विसयाणु संगाओ। (कथा पृ.४९) महाराज, मी

विषय संगांतून विरक्त झालो आहे. (३) भगवया भणिंय – देवाणुप्पिया एगपत्ती। (धर्मो. पृ.१४४) भगवंताने म्हटले 'देवानुप्रिया, (ती) पतिवता आहे.'

(१२) विधेय धातु साधित विशेषणे प्राय: आपापल्या वाक्यान्ती असतात.

नंदे धम्मं सोच्चा समणोवासए जाए। (नायास. पृ.१४१) धर्म ऐकून नंद श्रमणोपासक झाला.

(अ) जोर देण्यास धातुसाधित विशेषण वाक्यारंभी ठेवतात.

(१) चिंतियं च चेणं (समरा. पृ.२६) त्याने विचार केला.

(२) परिकुविओ रवु एसो तावसो। (समरा. पृ.३१) हा तापस खरचं फार रागावला आहे.

(आ) कधी मध्येही आढळतात.

राया गओ तमुज्जाणं (समरा.पृ.३६) राजा त्या उद्यानात गेला.

(१३) ल्यबन्त प्राय: वाक्याशांती असते.

ताण संलावं सोऊण संपत्ता तत्थ कोवि तावसा (नल. पृ.१७) त्यांचा संवाद ऐकून काही तापस तेथे गेले.

(अ) जोर देण्यास ल्यबन्त आपल्या वाक्यांशारंभी ठेवतात. पणमिऊण कुलवइं पयट्टो नयरिं। (समरा. पृ.३४) कुलपतीला प्रणाम करून नगरीकडे निघाला.

(१४) तुमन्त प्राय: आपल्या वाक्यांशान्ती असते.

एत्थंतरे भूलधाराहिं वरिसिउं पयट्टो मेहो। (नल. पृ.१८) तेवढ्यात मेघ स्थूल धारांनी वर्षाव करू लागला.

(अ) तुमन्त कधी वाक्यान्ती ठेवतात.

(१) तं सेयं खलु अम्हं चेउगस्स रन्नो जत्तं गिण्हित्तए। (निरया. पृ.२५) तेव्हा चेडग राजावर स्वारी करणे हे आपणास श्रेयस्कर आहे. (२) असमत्थाय अम्हे... भवओ मरणं निवारेउं। (समरा. पृ.५५) आणि तुझे मरण निवारण्यास आम्ही असमर्थ आहोत.

(आ) जोर देण्यास तुमन्त कधी विधेयापूर्वी ठेवतात.

काउमारद्धं नियाणं संभूएणं। (बंभ. पृ.३५) संभूयाने निदान करण्यास आरंभ केला.

(इ) कधी विधेयापूर्वी लगेच तुमन्त असते.

तं सुणिय सोयनिब्भराओ रोविउं पयत्ताओ। (बंभ. पृ.७१) ते ऐकून शोकनिर्भर अशा त्या रडू लागल्या.

(१५) स्थलकालदर्शक क्रियाविशेषणे वा वाक्यांश हे वाक्यारंभी असतात.

(१) तत्थ विक्कमजसो नाम राया। (पाकमा. पृ.६३) तेथे विक्कमजस नावाचा राजा होता. (२) अज्जवि तं लोए विक्खायं। (पाकमा. पृ.२८) अजूनहि ते जगात विख्यात आहे. (३) अन्नया तीए नयरीए उच्छवो जाओ। (कथा. पृ.९४) एकदा त्या नगरीत उत्सव झाला.

(अ) उभयान्वयी अव्ययाचा उपयोग असल्यास, ही अव्यये त्या उभायान्वयी अव्ययानंतर ठेवतात.

निवन्नाय तत्थ कुसुमावली। (समरा. पृ.६७) आणि कुसुमावली तेथे बसली.

(१६) प्रश्नार्थक अव्ययें वाक्यारंभी असतात.

कत्थ संपयं सो महावसभो। (धर्मो. पृ.१२०) आता तो मोठा बैल कुठे आहे?

(१७) स्थल-काल-रीति-दर्शक क्रियाविशेषणे विधेयापूर्वी असतात.

(१) अहं तत्थेव चिट्ठामि। (समरा. पृ.३८) मी तेथेच रहात होतो. (२) ता लहुं आगंतव्वं। (समरा. पृ.६५) तेव्हा लौकर यावे. (३) दयापरवसमणाए मए एवं कयं। (नल. पृ.२३) दयापर मन झाल्याने मी असे केले.

(अ) जोर असल्यास ही अव्यये विधेयापूर्वी ठेवतात.

**(१) दढं दहइ मं संतावाणलो।** (समरा. पृ.२३) संतापरूपी अग्नि मला फार जाळत आहे. **(२) सिग्धं निव्विसओ गच्छसु।** (कथा. पृ.१११) ताबडतोब देश सोडून जा.

(१८) च,वा,तु,हि,चे (चेत्) ही अव्यये वाक्यारंभी येऊ शकत नाहीत; पण अह, एवं, अवि, अहवा, अविय, किंच ही अव्यये वाक्यारंभी येऊ शकतात.

**(१) एवं च तत्थ सायंदिणं अभिरममाणस्स सरंति वासरा।** (महा. पृ.३० ब) आणि अशा प्रकारे तेथे सकाळ संध्याकाळ रमणाऱ्या त्याचे दिवस जाऊ लागले. (२) एत्थंतरंमि य गलिओ कम्म संघाओ। (समरा. ९७) आणि दरम्यान कर्मसमूह नष्ट झाला.

(१९) केवल प्रयोगी व संबोधनार्थी अव्यये वाक्यारंभी असतात.

(१) अहो दारुणया संसारस्स। (समरा. पृ.७५८) काय ही संसाराची दारुणता। (२) भो महाराय! सागयंते। (समरा. पृ.१५) अहो महाराज, तुमचे स्वागत असो।

(२०) 'ज्याच्या सह' तन्निदर्शक शब्दानंतर सहार्थी अव्यये असतात.

(१) रन्ना सह। (कथा. पृ.१६०) राजासह (२) तीए सह। (कथा पृ.१६०) तिच्यासह (अ) कधी त्या शग्दापूर्वी सहार्थी अव्यय ठेवतात.

(१) सह तेहिं तिहिं सीसेहिं। (कथा. पृ.१४१) त्या तीन शिष्यासह.

(२१) औपम्यदर्शक इव हे उपमानानंतर असते.

(१) सीहो इव। मेरु व्व। (कथा. पृ.१५१) सिंहाप्रमाणे मेरू प्रमाणे (२) नरगवास पिव। (कथा. पृ.१७६) नरक वासा प्रमाणे.

(२२) जोर दर्शक अव्यये ज्यावर जोर द्यायचा त्या शब्दानंतर येतात.

(१) नलो चेव भविस्सइ। (नल. पृ.१२) नलच होईल (२) जाणह च्चिय तुब्भे। (कथा पृ.२०) तुम्ही जाणताच. (३) सहस च्चिय आगओ। (बंभ. पृ.५१) अचानकच आला.

(२३) ज्या नामाला वा सर्वनामाला शब्दयोगी अव्यय जोडून येते, त्या नाम वा सर्वनामानंतर शब्दयोगी अव्यय येते.

कीइसो तेण विणा आणंदो। (समरा. पृ.५२८) त्याच्या विना कसला आनंद?

(२४) जहा-तहा, जाव-ताव, जओ-तओ, इत्यादि अव्ययें आपापल्या वाक्यारंभी येतात.

मा मा एवं जंपसु जओ वेरपरंपरा न कोसल्लं आवहइ। (महा. पृ.१६८अ) असे म्हणू नकोस; कारण वैरपरंपरा कौशल्य आणू शकत नाही.

(२५) 'मा' हें निषेध दर्शक अव्यय वाक्यारंभी येते. मा मा एवं भणह। (कथा. पृ.११२) (कथा. पृ.११२) असे म्हणून नका.

(२६) (क) ज्याचे अकरणरूप करावयाचे तत्पूर्वी 'न' हे अव्यय येते.

(१) न कहिंचि हिंडियव्वं। (बंभ. पृ.५६) कोठेहि हिंडू नये. (२) देहमित्तेण न चित्तेण। (नल. पृ.१५) फक्त देहाने, मनाने नाही.

(अ) क्रियापदापूर्वी 'न' ठेवून वाक्य नकारार्थी केले जाते.

(१) तुमं अन्नस्स दिज्जंति न सहिस्सइ। (नल. पृ.३१) तुला दुसऱ्याला दिलेले तो सहन करणार नाही. (२) तस्स वत्तावि न कया। (नल. पृ१९) त्याची वार्तासुद्धा विचारली (केली) नाही.

(आ) जोर देण्यास 'न' प्रथम ठेवतात.

निच्छइ णं विजए खत्तिए मम नामं गिण्हित्तए। (विवाग. पृ.९) विजय क्षत्रिय माझे नाव घेण्याचीहि इच्छा करीत नाही.

(ख) करणात्मक वा अकरणात्मक वाक्य दुसऱ्या अकरणात्मक वाक्याशी जोडतांना, उभयान्वयी अव्यय 'न' नंतर येते.

(१) न माणुसीए एरिसं रूवं। न वा एरिसी सत्ती। (नल. पृ.१८) मानवी स्त्रीचे रूप असे असत नाही अथवा शक्तीहि अशी असत नाही. (२) आसि य अहं एत्तियं कालं रइविरहिओ न उण संपयं। (समरा. पृ.६४) इतका काळ मी रतिविना होतो, पण आता मात्र नाही.

(२७) (क) क्रियापद वाक्यान्ती असते.

(१) वच्छे धीरा होहि। (बंभ पृ.६१) मुली, धीर धर: (२) तं च पज्जोयस्स वि दिज्जइ। (पाक मा. पृ.४४) व ते पज्जोयालाहि दिले जाते.

(अ) जोर देण्यास क्रियापद वाक्यारंभी ठेवतात.

(१) जाणामि अहं एयं। (पाकमा. पृ.२४) ओळखतो मी याला. (२) वेवइ मे हिययं। (वल. पृ.४) माझो हृदय कापते आहे.

(आ) कधी क्रियापद मध्ये आढळते.

अहं साहेमि राइणो इमं वइयरं। (पाकमा. पृ.२२) राजाला मी ही हकीकत सांगीन.

(ख) आज्ञार्थी क्रियापद कधी वाक्यारंभी तर कधी वाक्यान्ती असते. वाक्यारंभी :- (१) वच्च तुमं सट्ठाणे। (नल. पृ.१७) तुं स्वस्थानी जा.

(२) पालेह पुव्वपडिवन्नं सावयव्वयं। (नल. पृ.१९) पूर्वीं स्वीकारलेले श्रावकव्रत पाळा.

वाक्यान्तीं :- (१) एयं मउउरयणं मम पेसेहि। (चउ. पृ.२५) हे मुकुटरत्न! माझ्याकडे पाठव. (२) मम करं देह। (चउ. पृ.१९) मला कर द्या.

(अ) कधी आज्ञार्थी क्रियापद मध्ये आढळते.

ता तुमं निब्भया गच्छ एयंमि नयरे। (चउ. पृ.१८) तेव्हा तू निर्भयपणे या नगरांत जा.

(आ) दोन आज्ञार्थी क्रियापदातील एक आरंभी व एक अंती असते; तर कधी दोन्ही आपापल्या वाक्यारंभी असतात.

(१) गच्छह तुमं एयं दारगं एगंते उकुरुडियाए उज्झाहि। (निरया. पृ.१३) जा तूं; या मुलाला एके ठिकाणी उकिरड्यावर टाक.

(२) परिच्चयसु सोगं करेसु परलोगहिंय। (पाकमा. पृ.२४) शोक टाक, परलोक हित कर.

**४४४ वाक्यक्रम**

वाक्यक्रमाबाबत हि शब्द क्रमाप्रमाणे खालील ढोबळ नियम सांगतां येतील.

(अ) मिश्रवाक्य :-

मिश्रवाक्यांत प्राय: गौण वाक्य प्रथम, नंतर प्रधान वाक्य असते.

(१) 'ज' या संबंधी सर्वनामाने आरंभी होणारे वाक्य प्रथम असते.

(१) जो मे सह जलणंमि पविसइ तस्साहं भारिया हवामि। (धर्मो. पृ.१३८) जो माझ्या बरोबर अग्नीत प्रवेश करील त्याची मी भार्या होईन. (२) जं भे रुच्चइ तं करेसु। (कथा. पृ.१७८) जे तुला आवडेल ते कर.

(अ) जोर देण्यास कधी 'ज' चे वाक्य नंतर ठेवतात.

सो वि धन्नो जो तस्स अन्नपाणाइगं देइ। (जिन. पृ.३) जो त्याला अन्न पाणी, इत्यादि देतो तोहि धन्य होय.

(२) 'इति' ने निर्दिष्ट होणारे अपरोक्ष कथनात्मक वाक्य प्राय: प्रथम असते. एसो वि न मे मणमाणंदइ त्ति कहियं कुमरीए। (नल. पृ.४) हा सुद्धा माझ्या मनाला आनंद देत नाही, असे राजकन्येने सांगितले.

(अ) कधीं 'इति' ने निर्दिष्ट होणारे वाक्य नंतर ठेवतात. जंपिय मए - भाग धेयाणि मे पुच्छह त्ति। (समरा. पृ.५१०) माझ्या नशिबाला विचारा असे मी म्हटले.

(३) 'जहा' व 'एवं' हे शब्द असणाऱ्या वाक्यानंतर अपरोक्ष कथनात्मक वाक्य येते :- (१) वत्तव्वं च तए जहा - महाराय सक्को तुम्हं वत्तं पुच्छइ।

(पाकमा. पृ.७०) तू असे म्हणावेस– महाराज, इंद्र तुमची वार्ता विचारत आहे.' (२) भणंति धीवरा वि एवं अम्हं वित्ती परिकप्पिया पयावइणा, नत्थि अम्हाण दोसो। (कथा. पृ.१३६) धीवर सुध्दां असे म्हणतात प्रजापतीने आमची वृत्ति ठरवली आहे; आमचा दोष नाही.

(४) 'जं' ने सुरु होणारे वाक्य प्राय: नंतर असते.

अहो सुंदरं जायं जं मे जणओ पव्वइओ। (धर्मो. पृ.१५३) माझा पिता संन्यासी झाला, हे चांगले झाले.

(५) जत्थ, जत्थ–जत्थ ने आरंभ होणारी वाक्ये प्रथम असतात.

(१) जत्थ य सागरे मिलिया गंगा तत्थ गंगासागरतित्थं जायं। (पाकमा. पृ.२८) जेथे गंगा सागराला मिळाली तेथे गांगासागरतीर्थ झाले. (२) जत्थ जत्थ वच्चामि तत्थ तत्थ एयाइं आणेयव्वाइं। (समरा. पृ. २६५) जेथे जेथे मी जाईन तेथे तेथे ही आणावीत.

(अ) जोर देण्यास ही वाक्ये कधी नंतर ठेवली जातात.

तत्थ वच्चामि जत्थ न कोइ जाणइ। (धर्मो. पृ.२१७) जेथे कोणी ओळखणार नाही तेथे मी जाईन.

(६) 'जया' नें प्रारंभी होणारे वाक्य प्रथम असते.

(१) जया महावीरो इहं आगच्छेज्जा तया ममं एयमट्ठं निवेदिज्जासि। (ओव. पृ.१४) जेव्हा महावीर येथे येईल तेव्हा ती गोष्ट मला सांग. (२) जया अवरज्झिही तया अणुसासिस्सामि। (कथा. पृ.१०७) जेव्हा अपराध करील तेव्हा मी शिक्षा करीन.

(अ) जोर देण्यास 'जया' चे वाक्य कधी नंतर ठेवतात.

(१) जाणिहिसि एवमुल्लवंती जाहे रायकुले ढोइज्जसि। (कथा. पृ.१०८) असे बोलणाऱ्या तुला जेव्हा राजदरबारात नेले जाईल तेव्हा तुला कळेल (२) कहिस्सामो जया तुमं सपसाया भविस्ससि। (धर्मो. पृ.३४) जेव्हा तू प्रसन्न होशील तेव्हा सांगीन.

(७) 'जाव' ने आरंभ होणारी वाक्ये प्रथम असतात.

एवं च जाव... चिट्ठंति ताव आगया उज्जाणवाली पल्लविया। (समरा.पृ.७०) अशा प्रकारे ज्यावेळी होते त्यावेळी --- उद्यानपालिका पल्लविया आली.

(अ) जोर देतांना 'जाव' चे वाक्य कधी नंतर ठेवतात.

(१) तीए समं ताव अच्छियव्वं जाव मह रज्जलाभो होइ। (बंभ. पृ.७२) मला राज्यलाभ होईपर्यंत तिच्यासह रहावे. (२) अच्छाहि ताव जाव अम्हे जीवामो। (कथा. पृ.१५३) आम्ही जिवंत आहो तो पर्यंत रहा.

(८) 'जइ' ने प्रारंभ होणारी वाक्ये प्रथम असतात.

जइ पुण अम्हेहिं सह आगच्छसि ता तुमं किं पि पट्टणं पराणेमो। (नल. पृ.२१) जर तु आमच्याबरोबर येशील तर तुला कोणत्यातरी नगरी नेऊ.

(अ) जोर देण्यास 'जइ' चे वाक्य कधी नंतर ठेवतात.

अहं तुमं जीवावेमि जइ मे वयणं सुणेसि। (समरा. पृ.५२७) जर माझे वचन ऐकशील तर मी तुला जगवीन.

(९) 'जहा', 'जहा जहा' ने आरंभी होणारी वाक्ये प्रथम असतात.

(१) जहा तुमं भणिहिसि तहा करिस्सामि। (महा. पृ२४९ अ) जसे तू म्हणशील तसे करीन. (२) जहा जहा य अयगरो कुररं गसइ तहा तहा सो वि जुण्णभुयंगमं। (समरा. पृ.१२१) आणि जस जसा अजगर कुरर (पक्ष्या) ला गिळू लागला तस तसा तोहि जीर्ण सर्पाला (गिळू लागला)

(अ) जोर देण्यास ही वाक्ये कधी नंतर ठेवतात.

(१) भंते तहा काहं जहा भे वयबाहर न होइ। (कमा. पृ.९९) महाराज, असे करीन कीं ज्यामुळे तुमची व्रतबाधा होणार नाही. (२) तहा करेह जहा पुणरवि तं दुक्खं न लहामि। (कथा. पृ.१७८) असे करा की ज्यामुळे मला पुनरपि तें दुःख होणार नाही.

(१०) 'जेण' चे वाक्य प्रथम असते.

अम्हे वि सुया कावि पउत्ती तेण पुच्छामो। (कथा. पृ.११२) आम्ही हि काही बातमी (हकीकत) ऐकली आहे, म्हणून विचारतो.

(अ) जोर देण्यास 'जेण' चे वाक्य कधी नंतर ठेवतात.

अओ मंदपुण्णा वयं जेण दीणारा इंगाला जाया। (धर्मो. पृ.२०६) म्हणून आम्ही कमी पुण्यवान आहोत, कारण दीनार कोळसे झाले.

(आ) संयुक्त वाक्य :-

जओ, उयाहु, किंतु, यांनी आरंभी होणारी वाक्ये नंतर असतात.

(१) न जुत्तो सयमारंभो कुमारस्स। जओ सो नीयतरो। (कथा. पृ.१६१) कुमाराने स्वत:च प्रयत्न करणे योग्य नाही; कारण तो फार नीच आहे. (२) किमेयं तीरं उयाहु दीवं। (कथा. पृ.१४५) हा किनारा आहे की द्वीप आहे? (३) सद्दहामि तुम्ह वयणं। किंतु एयं न सक्कुणोमि काउं। (कथा. पृ.१३८). माझा तुमच्या वचनावर विश्वास आहे; परंतु हे करणे मला शक्य नाही.

**प्रकरण ३१**

# विरामचिह्ने व लेखन वैशिष्ट्ये

## ४४५ विरामचिह्ने

वाक्याची समाप्ती दाखविणारे दंड[१] (एक लहान उभी रेघ) हे एकच विरामचिह्न अर्धमागधीत[२] आहे. तसेच एका दंडाने श्लोकार्ध समाप्ती व दोन दंडांनी श्लोकसमाप्ती दर्शविली[३] जाते.

खेरीज, अर्धमागधीत काही शब्दच विरामचिह्नांचे कार्य करतात.

१) 'इति' ने अपरोक्ष विधानाची समाप्ती दर्शविली जाते. तर 'जहा' व 'एवं' हे शब्द अपरोक्ष विधानाचा आरंभ निर्दिष्ट करतात. २) 'किं' या प्रश्नार्थक सर्वनामाच्या एखाद्या[४] रूपाने व प्रश्नार्थक अव्ययांनी वाक्य प्रश्नार्थक आहे, हे दर्शविले जाते. ३) केवलप्रयोगी अव्ययांच्या उपयोगाने वाक्य उद्गारवाची आहे, हे सूचित होते.

## ४४६ लेखन वैशिष्ट्ये :

अ) अर्धमागधी वाङ्ममयात शब्दांची काटकसर करण्यास पुढील मार्गांचा अवलंब केलेला आढळतो.

१) वण्णओ : दीर्घ ठराविक साच्याचे – राजा, राणी, नगर, उद्यान,

---

१ *हिंदी ही भाषा अशा दंडाचा उपयोग करते.*

२ *छापील पुस्तकांत आधुनिक संपादक आतां सर्रास इंग्रजीतून आलेल्या विरामचिह्नांचा उपयोग करताना आढळतात.*

३ *जुन्या मराठी पद्यांत दंडाचा उपयोग आढळतो.*

४ *वाक्यांत 'किं' चा उपयोग नसता वक्त्याच्या उच्चार पध्दतीवरूनहि वाक्य प्रश्नार्थक आहे, हे ठरविता येते.*

इत्यादींचे – वर्णनात्मक परिच्छेद ‘वण्णओ। (विवाग. पृ. २) (२) चंदणपायवे नामं उज्जाणे होत्था । वण्णओ (विवाग. पृ. २)

२) जाव : पूर्वी येऊन गेलेले परिच्छेद पुनः एखाद्या पुढील स्थळी अभिप्रेत आहेत, हे दर्शविण्यास ‘जाव’ चा उपयोग केला जातो. उदा.

परिसा निग्गया जाव पडिगया। (अंत २)

३) दोन ते सहा पर्यंतची संख्यावाचके : शब्दांची पुनरावृत्ती टाळण्यास दोन ते सहा पर्यंतच्या संख्यावाचकांचा पुढे सांगितल्याप्रमाणे उपयोग करण्यांत येतो.

क) दोन : १) क्रियापदांच्या रूपानंतर २ आल्यास त्याच क्रियापदाचे ल्यबन्त निर्दिष्ट होते. कधी २ ता असेहि लिहिले जाते.

१) आपुच्छइ२। (विवाग. पृ. ६) (२) गिण्हाहि २ ममं उवणेहि। (विवाग पृ. ९५)

२) विशेषणापुढे वा क्रियाविशेषण अव्ययापुढे २ आल्यास दोनदा पुनरावृत्ती सूचित होते. १) पडिजागरमाणी २ (विवाग. पृ. ३) २) अईव २। (भग. ८) (३) उद्दाइत्ता२। (विवाग. पृ.११) (जन्मास येऊन)

३) कधी २ ने दोन समानार्थक वाक्यांश निर्दिष्ट होतात.

तेणं कालेणं २। (= तेणं कालेणं तेणं समएणं।)

ख) तीन : ३ ने तीन समानार्थक शब्द वा तीन विशिष्ट शब्द निर्दिष्ट होतात. १) संताइ। (संता, तंता परितंता २) समणेणं ३।

(समणेणं भगवया महावीरेणं।)

ग) चार : ४ ने चार समानार्थक[1] अथवा विशिष्ट शब्द सूचित होतात.

१) असणं ४। (असणं पाणं, खाइमं साइमं) २) आसाएमाणी ४। (आसा एमाणी, विसाएमाणी, परिभुंजेमाणी, परिभाएमाणी) ३) सडइ ४। (सडइ, पडइ, गलइ, विद्धंसइ) ४) साडित्तए ४। (साडित्तए, पाडित्तए, गालित्तए, विद्धंसित्तए)

घ) पाच : १) ५ ने पांच समानार्थक१ किंवा विशिष्ट शब्द निर्दिष्ट होतात.

१) भीए५। (भीए, तत्थे, तसिए, उव्विग्गे, संजायभए) २) सिज्झिहिइ ५।(सिज्झिहिइ, बुज्झिहिइ, मुच्चिहिइ, परिनिव्वहिइ, सव्वदुक्खाणं भंत करे हिइ)

---

१ *ज्यांचा नेहमीच असा वापर आढळतो असे.*

२) ५ ने पाच विशिष्ट[१] शब्द वा वाक्यांश सूचित होतात.

१) पुप्फ ५। (पुप्फ, वत्थ, गंध, मल्ल, अलंकार) २) सुमुहे गाहावई ५। (धन्ने णं सुमुहे गाहावई, पुण्णेणं सुमुहे गाहावई, कयत्थेणं सुमुहे गाहावई, कयलक्खणेणं सुमुहे गाहावई, सुलध्देणं सुमुहस्स गाहावइस्स जम्मजीवियफले।)

ड) सहा : (१) ६ ने सहा समानार्थक[१] शब्द निर्दिष्ट होतात.

इट्ठा ६। (इट्ठा, कंता, पिया, अभिरामा, मणुन्ना, मणामा)

२) ६ ने सहा विशिष्ट शब्द सूचित होतात. इट्ठी ६। (इड्ढी, जुई, जसो, बलं, वीरियं, पुरिसक्कारपरक्कमे)

आ) इतर वैशिष्ट्ये :

१) एकाच वाक्यांत स्वतंत्रपणे वा समासात समानार्थक शब्दांची आवृत्ति केलेली आढळते.

१) सक्कारेइ सम्माणेइ। (विवाग. पृ. २८) २) सिग्धं तुरियं। (भग. १७) ३) पुव्वावरण्ह काल[१]समयंसि।

२) णं तए[२]णं यांचा वारंवार व भरपूर उपयोग आढळतो.

१) से णं तत्थ सीहे भविस्सइ। (विवाग. ११) तो तेथे सिंह होईल. २) तए णं से भगवं गोयमें। (विवाग. पृ. ४) नंतर तो भगवान गोयम.

३) ज्याप्रमाणे, जसे या अर्थी[३] जहानामए या शब्दाचा उपयोग केलेला आढळतो[४].

जहा नामए सप्पकडेवरे। (विवाग. पृ. ५) जसें सापाचे कलेवर

---

१ *म. : काळवेळ, कामधंदा, बाजारहाट*

२ *तए णं– ततः (णं) (राय. पृ.५४), णं इनि अलंकारे। (अभय, नाया पोथी पृ. ९ ब)*

३ *वैद्य, नायाए, टीपा पृ. ७*

४ *से जहानामए याची फोड मलयगिरी व अभयदेव पुढीलप्रमाणे करतात. तत् सकललोक प्रसिद्धं, यथा इति दृष्टान्तोपदर्शने, नाम इति शिष्यामन्त्रणे, ए इति वाक्यालङ्कारे। मलम. राय. पृ. ६५, से इति अथार्थ : अथ शब्दश्च वाक्योपक्षेपार्थ : यथा दृष्टान्तार्थः, नामेति सम्भावनायां, एवेति वाक्यालङ्कारे। (अभय, नाया पोथी पृ. ८१ ब)*

४) विधेय क. भू. धा. वि. नंतर 'यावि होत्था' या शब्द समूहाचा उपयोग केलेला आढळतो. जुवराया जाए यावि होत्था। (विवाग. पृ. ३८)

५) गत्यर्थक क्रियापदाचा गंतव्याची द्वितीया (वा सप्तमी) न वापरता 'जेणेव-तेणेव, जेणामेव-तेणामेव यांच्या उपयोगाने विश्लेषणात्मक वाक्यरचना केलेली आढळते.

जेणेव सेणिए तया तेणेव उवागच्छंति। (निरया. पृ. ९) जिकडे सेणिय राजा होता तिकडे गेले.

६) जिकडून ज्या ठिकाणाहून-तिकडे, त्या ठिकाणाकडे या अर्थी 'जामेव दिसिं-तामेव दिसि' असा वाक्यांश वापरला जातो.

जामेव दिसिं पाउब्भूया तामेव दिसिं पडिगया[१]।

(निरया. पृ. ७) जिकडून आली तिकडे परत गेली.

१ *यस्या दिशः सकाशात् प्रादुर्भूता (आविर्भूता) तामेव दिशं प्रतिगता। (अभयदेव नामा पोथी पृ. ९ ब)*

# पुरवणी

अर्धमागधी वाङ्मयात काही विशिष्ट असे वाक्यांश व वाक्प्रयोग इत्यादी आढळतात. त्यातील काही पुढे दिले आहेत. तसेच काही विशिष्ट प्रकारची वाक्ये पुढे दिलेली आहेत व त्यानंतर काही सुभाषितेही दिलेली आहेत.

१) वाक्यांश, वाक्प्रयोग इत्यादी

अ) कालदर्शक :-

१) प्रभात:- जाए पभाए। जाए पभायसमए। पत्ते पभायसमए। पहायाए रयणीए। पाउप्पभायाए रयणीए। पहाया रयणी। जायम्मि पभायसमए। पभायसमए। पभायकाले। अरुणवेलाए। पच्चूसकालसमयंसि। उइए रविम्मि। अणुट्ठिए चेव सूरे। सूरो आरूढो उदयगिरिसिहरं उग्गओ सूरो।

२) दुपार, मध्याहन इत्यादी : मज्झण्णस्स समए। पुव्वा वरण्हकालसमयंसि। पच्चावरण्हकालसमयंसि। अवरण्हसमए।

३) संध्याकाळ इत्यादी :- संझाकालसमयंसि। समागया संझा। विगालसमयम्मि वियालवेलाए। वोलीणम्मि दिवसे।

४) सूर्यास्त :- अत्थमिए दिणनाहे। अत्थंगयम्मि आइच्चे। एत्थंतरे अत्थंगओ सूरिओ।

५) सकाळ - संध्याकाळ :- सायं च पायं च।

६) दिवस :- तम्मि चेव दियहे। कल्लदिणे अज्ज वा। इओ दिणाओ तइज्जदिवसम्मि। अइक्कंते बारसाहे। कइवयदिवसेहिं। जंति दियहा। अइक्कंतेसु कइसु वि दिवसेसु। अइक्कंता कइ वि दियहा। एवं गच्छंति वासरा। एवं वच्चंति वासरा। कल्लाकल्लिं। एव वच्चंति दिवसाइं।

७) शुभ दिवस इत्यादी :- सोहणम्मि दियहे। सोहणवेलामुहुत्तम्मि पसत्थे तिहिकरणमुहुत्तजोगे। सोहणम्मि तिहिकरणदिवसनक्खत्तमुहुत्तंसि।

८) रात्र :- पत्ताए रयणीए। समागमा रयणी। आगया रयणी। रयणीए पढमजामम्मि। पुव्वरत्तावरत्तकालसमयंसि। मज्झरत्ते। अद्धरत्तकालसमयंसि। अड्ढ रत्तसमए। रयणीए पच्छिमे जामे। रयणीचरिमजामे। रयणीए चरिमजामम्मि। निसाचरमसमयंसि। वीइक्कंता रयणी। वोलिया कह वि राई। कह कह वि वोलीया रयणी।

९) दिवस-रात्र :- रत्तिं दिवा य। अहोरत्तं। राइंदियं। राओ दिवसं। अहोणिसं। अहोनिसिं। सायं दिणं। दिया वा राओ वा।

१०) महिना :- अद्धमासं-अद्धमासेणं। मासं मासेणं। मासं मासाउ। दिवड्ढ मासे वोलीणे। छम्मासा वोलीणा। कइ वि मासा वोलीणा।

११) ऋतु :- पढमसरयकालसमयंसि। गिम्हकालम्मि। गिण्हकालसमयंसि। पत्ते पाउसकाले।

१२) वर्ष :- एवं गयाणि बारस संवच्छराणि। वरिसवरिसं।

१३) जीवन :- इह भवे। जावज्जीवं। जावज्जीवाए। आमरणं।

१४) मरण :- मरणकालसमयंसि। मरणे उवट्ठिए वि। कालं किच्चा। कालं काऊण। कालमासे कालं किच्चा। कालधम्मुणा संजुत्ते। कालगओ। पंचत्तं गओ। पंचत्तं उवगओ। पंचत्तं संपत्तो। निहणं गओ।

१५) सामान्यपणे :-

१) खणमेत्तेण। तक्खणं चिय।

२) थेववेलाए। थेवकालेण। कालेण अप्पेण।

३) उचियसमयंसि। उचियम्मि समयम्मि।

४) अन्नया कयाइ। अह अन्नया कयाइ।

५) दोहलकालसमयंसि।

६) पत्ते भिक्खाकाले।

७) तेणं कालेणं तेणं समएणं। अईयसमयम्मि।

८) इय काले वच्चंते। एवं च काले वच्चंतम्मि। एवं च वोलंतम्मि काले। वोलीणो बहु कालो। एवं पभूयकालो बोलीया। अउक्कंतो कोइ कालो। गओ कोइ कालो। एवं च अइक्कंतो कोइ कालो। एवं कालो वच्चइ। कालक्कमेण।

(आ) स्थलदर्शक :-

१) नासन्ने नाइदूरम्मि। नच्चासन्ने नाइदूरे।

२) विसमे पएसे। कत्थ वि विसए। अन्नत्थ कत्थ वि।

३) इहेव जंबुद्दीवे दीवे भारहे वासे।

४) अस्सिं लोए। इह परलोए। अस्सिं लोए परत्थ य। घोरे संसारे।

५) नयरीए बहिना। नयरस्स बहिना। पुरस्स बाहिं।

६) उत्तरपुरत्थिमे दिसीभाए। दाहिणपुरत्थिमे दिसीभाए। पुव्वुत्तरदिसाभाए।

७) सव्वओ समंतेणं। सव्वओ समंता। सव्वओ समंताओ।

८) उभओ पासिं।

९) चउदिसिं। दससु वि दिसासु। दिसोदिसं। दिसोदिसिं। दिसि दिसि।

इ) रीतिदर्शक :-

१) जहिच्छं। जहिच्छाए। २) अवरोप्परपीईए। ३) तुरियतुरियं।

४) मणसा वयसा कायसा। मणेण वायाए काएणं।

५) जहाविहीए। जहोचिएण विहिया। जहुत्तविहिणा।

६) महया इड्ढीसक्कारसमुदएणं।

७) केणइ उवाएण।

८) पायाविहारचारेण।

९) सुहं सुहेणं।। दुहं दुहेणं।। जीवं जीवेणं।। उग्गं उग्गेणं।। वारं वारेणं।। मज्झं मज्झेणं।। उरं उरेणं।। तिलं तिलेणं।।

ई) नमस्कार, प्रणाम इत्यादी :-

काऊण सिरपणामं। नमिऊण पायकमले। चलणपणामं काऊण। करमलपरिग्गहियं सिरसावत्तं मत्थए अंजलिं कट्टु। पणमइ अंजलिमउलं सिरे काउं। तिपयाहिणी काऊण। कयाओ तिण्णि पयाहिणाओ। तिक्खुत्तो आयाहिणपयाहिणं करेइ। आलोए पणामं करेइ। काऊण जिणपणामं। काऊम नमोक्कारं सिद्धाण।

उ) इतर काही :

क) १) अंतेउरस्स पढमा। २) सुहभोगकारणनिमित्तं। ३) अप्पाणं भावेमाणे। ४) पुव्वाणुपुव्विं चरमाणे। ५) गामाणुगामं दूइज्जमाणे। ६) आहेवच्चं कुणमाणे। ७) उरालाइं माणुस्सगाइं भोगभोगाइं भुंजमाणे। ८) कयत्थं अप्पाणं मण्णमाणे। ९) कुडुंबजागरियं जागरमाणे। १०) धम्मजागरियं जागरमाणे। ११) सवणपरंपरेण। सवणपरंपराए। कण्णपरंपराए। १२) भवियव्वयावसेणं। १७) एवं वुत्ते समाणे। इमीसे कहाए लद्धट्ठे समाणे। इमीसे कहाए लद्धट्ठस्स समाणस्स। १८) उच्चट्ठाणट्ठिएसु गहेसु।

ख) पूर्वकालवाचक धातू अव्ययाचा उपयोग असणारे :-

१) चयं चइऊण। २) एवं संपेहेत्ता। ३) करे करेऊण पहरणं। ४) ति कट्टु। त्ति कट्टु। ति किच्च। ति किच्चा। ५) अगारवासमज्झे वसित्ता। ६) कवडकलहं काऊण। ७) इमं वइयरं ओहिणा आभोइऊण। ८) तिवलियं भिउडिं निडाले साहट्टु। ९) अहापडिरूवं उग्गहं उग्गिण्हित्ता। १०) रज्जम्मि ठविऊण। अहिसिंचिय रज्जे। रज्जे ठविऊण नियपुत्तं। ११) मासियाए संलेहणाए अप्पाणं झूसित्ता सट्ठिं भत्ताइं अणसणाए छेइत्ता।

२) म्हणी इत्यादी :

१) मा दिट्ठं परिच्चइय अदिट्ठे रइं करेहि। (समरा ८४)

(हातचे सोडून पळत्याच्या मागे लागू नकोस)

२) इत्थट्ठियं कंकणयं को भण जोएइ आरिसए (नाण ३.९०);

अहवा हत्थट्ठियकंकणस्स किं दप्पणेण परिमिणणं? (महा १२५अ);

हत्थत्थे कंकणे किं दप्पणेणं? (पाइ ८१)

(हातच्या कांकणाला आरसा कशाला?)

३) खयम्मि मा खिवसु खारयं। (नाण ९.११७)

(जखमेवर मीठ चोळू नको)

४) न हु सक्करसित्तो वि चयइ कडुयत्तणं निंबो। (सुर १.२४)

(कडू कारले, साखरेत घोळले---तरी कडू ते कडूच)

५) जहा राया तहा पया। (कथा १३०) (यथा राजा तथा प्रजा)

६) बहुरयणा वसुंधरा। (जिन १६) (बहुरत्ना वसुंधरा)

७) एत्थ तडी एत्थ वग्घो (सुर २.११५); एगत्तो किल वग्घो अण्णत्तो दुत्तडीओ। (कथा १०१)

(इकडे आड तिकडे विहीर)

८) बड्डुंताण तणाइँ वि हत्थावलंबत्तणमुवेंति। (लीला १९३)

(बुडत्याला काडीचा आधार)

९) जारिसओ होइ गुरू तारिसओ होइ सीसगुणजोगो। (सिरि ६०)

(जसा गुरु तसा चेला)

१०) जीवो जं किर कम्मं करइ हसंतो ---तं वेयइ रोयंतो। (नाण३.५५)

(हासत कर्म करावे परिणामी रडतचि भोगावे)

११) जीवंतो नरो कल्लाणं पावइ। (धर्मो १८९)

(शीर सलामत तर पगडी पचास)

वाक्ये :-

१) एवं होऊ।। २) जं होइ तं होउ।। ३) इण्हिं जं होउ तं होउ।। पच्छा जं होउ तं होउ।। ४) गओ थेरं भूमिभागं। ५) सामित्तं कुणइ सव्वेसिं। ६) उट्ठाए उट्ठेइ। ७) सयमेव पंचमुट्ठियं लोयं करेइ ८) सरणं उवेइ। ९) सो तुह आणं न मन्नेइ।। वट्टंति आणाए।। आणं करेंति।। १०) अज्ज वि न हु किंचि वि विणट्ठं।। तह वि न किं पि विणट्ठं अज्ज वि।। ११) न किंचि अवरज्झइ। १२) अंगुलिं गलए दाऊण वमियमणेण। १३) किमित्थ अइक्कंतत्थसोयणे। १४) सत्तट्ठ पयाइं अणुगच्छइ। १५) जहागया पडिगमा सव्वे। १६) जुवईण न गुज्झं साहियव्वं। १७) जइस्समहं जहासत्तीए। १८) महया महया सद्देणं आरसइ। १९) जएणं विजएणं वद्धावेइ। २०) आगया तस्स निद्दा। २१) चिंतिउं पयत्तो हं।। लग्गो परिभाविउं।। २२) तह वि न को वि गुणो जाओ।। न उणो (पुन:) को वि गुणो ताण संजाओ।। बहुएहिं पि कएहिं उवयारो हं गुणो न से जाओ।। २३) मे समुप्पन्नो पमोओ।। गरुयपमोओ मणम्मि संजाओ।। बहुएहिं पि कएहिं उवयारो हं गुणो न से जाओ।। २३) मे समुप्पन्नो पमोओ।। गरुयपमोओ मणम्मि संजाओ।। जाओ हिययस्स आणंदो।। २४) बहुजणो अन्नमन्नस्स एवमाइक्खइ।। परोप्परं एवं जंपंति।। मा एवं भण।। सुणसु मह वयणं।। २५) न भूयं एयं नो भवइ न भावि कइया वि। २) मा वहउ को वि गव्वं एत्थ जए (जगात) पंडिओ अहं चेव। २८) बहूइं वासाइं सामण्णपरियागं पाउणइ। २९) एयमट्ठं नो आढाइ नो परियाणाइ तुसिणीया संचिट्ठइ। ३०) पत्ता ते जोव्वणं।। कमेण पत्ता जोव्वणं।। ३१) को दोसो एत्थ तुम्हाणं।। को ममावराहो।। ३२) धस त्ति धरणीयलम्मि सो पडिओ।। निबद्धं दंतसंपुडं।। ३३) लोए अववाओ जायइ। ३४)तेण असमंजसं विहियं। ३५) अंगे न मायंति। ३६) खंडाखंडिं करेइ।। पाणेहिं कड्ढावेइ। जीवियाओ ववरोवेइ।। ३७) तेण सुओ नियरज्जे ठविओ।। ठाविओ जुवरायपए पिउणा।। ३८) पविट्ठो भिक्खट्ठा तत्थ नयरम्मि। ३९) अगाराओ अणगारियं पव्वयइ। ४०) गवेसिउं आरद्धो। ४१) सासंकं मह हिययं। ४२) न एत्थ संदेहो। ४३) वत्तं पाणिग्गहणं महाविभूईए। ४४) न एत्थ अच्छरियं। ४५) उवविट्ठा

सव्वे वि उचियठाणेसु। ४६) धम्मलाभो दिण्णो। ४७) ईहापोहं करेंतस्स जायं जाईसरणं। ४८) जाओ कालेण गयसोगो। ४९) न हु जुत्तं मज्झ एरिसयं। ५०) एसो च्चिय निच्छओ मज्झ। ५१) कुणसु मा चिंतं। ५२) को वि हु दोसो। ३) कहेमि कोऊहलं जइ ते। ४) सव्वो वुत्तंतो साहिओ। ५५) अज्ज वि वइरी पट्ठिं न छड्डेइ। ५६) वामकरयलंसि कवोलं निवेसिऊण ठिया अहोमुही। ५७) लग्गो अग्गी चउसु वि दिसासु। ५८) कओ मे हवइ निद्दा। (मला निद्रा कोठून येणार?) ५९) किं मओ जीवइ कोइ।

**४) सुभाषिते :–**

१) सव्वपणासम्मि अद्धं पि हु जुज्जए लेउं। (नाण. १.२४५) २) अप्पेण समं सव्वो वि हु मन्नए अन्नं। (नाण. १०.२३५) ३) जूयाभएण परिहणविमोयणं हंदि न हु जुत्तं। (सुर. १.२५) ४) सवणरमणीया खलु दूरदेसवत्ता। (महा.पृ.१६०ब) ५) मडहो वि मइंदो करिवराण कुंभत्थलं दलइ। (जिन.पृ.६१) ६) सूरस्स पुरो खज्जोयगाण का होइ देहपहा। (महा.पृ.१३५ब) ७) वायाए जो विवज्जइ विसेण किं तस्स दिण्णेण। (लीला. १५५) ८) भिच्चवराहे सामिणो दंडो। (महा.पृ.४६ अ) ९) कम्माणि बलवंति। (उत्त.२५.३०) १०) उच्चाराओ वि कणयं गिण्हेयव्वं। (सुपास. ६१) ११) को कणयरयणमालं बंधइ कागस्स कंठम्मि। (सिरि.१३७) १२) जस्स वणो (व्रण) वेयणा हवइ तस्स। (महा.पृ.२४८ ब) १३) दुक्खेण विणा न सोक्खाइं। (कथा.पृ.१४५) १४) को जुन्नमज्जरिं कंजिएण पवियरिउं तरइ। (सुर.१३३) १५) जं जह भवियव्वं होइ तं तहा देव्वजोएण। (लीला.३११) १६) दिव्वम्मि विहडियम्मि विग्घसहस्साइं जायंति। (कथा.पृ.८८) १७) वल्लीसमं हि पिम्मं जं आसन्नं तहिं चडइ। (सुर.२.१७२) १८) सव्वहा अच्चंततण्हाणुगओ वि ण रमए एरावणो अच्चंतसुंदरे व गामतलायम्मि। (धर्मो.पृ.१५) १९) चिरकालाउ वि पावइ भद्दाइं जणो हि जीवंतो। (नल.पृ.२६) २०) नियकज्जसिद्धिहेउं कुणंति लोगा पराण कज्जाइं। (धर्मो.पृ.३९) २१) सओ नत्थि विणासो असओ नत्थि संभवो। (सूय.२.१.१०) २२) जो जेत्ति यस्स जोग्गो स लहइ तत्तियं अत्थं। (सुपास.४९६) २३) न देइ कोइ कस्स वि सुक्खं दुक्खं च निच्छओ एसो। (सिरि.३२८) २४) को देइ हरइ को वा सुहासुहं जस्स जं विहियं। (लीला.५७३) २५) निक्कारणा पवित्ती (प्रवृत्ति) न होइ। (सुर.७.२२६) २६) नत्थि अकरणिज्जं

विसियाउराणं। (समरा.पृ.३१७) २७) न सव्वे वि एगसहावा भवंति। (कथा.पृ.१११) २८) विचित्तसहावा पाणिणो। (कथा.पृ.१११) २९) महिलाणुरागरत्तो किं न कुणइ साहसं पुरिसो। (पउम.३३.६९) ३०) किं कुणइ पुरिसयारो पुरिसयारो पुरिसस्स विहिम्मि विवरीए। (नल.पृ.१२) ३१) आवयाए वज्जकढिणहियया चेव महापुरिसा हवंति। (समरा.पृ.२०८) ३२) पुव्वकयं सुकयं चिय जीवाणं सुक्खकारणं होइ। दुकयं च कयं दुक्खाण कारणं होइ निब्भंतं।। (सिरि.१००) ३३) जस्सत्थो तस्स सुहं जस्सत्थो पंडिओ य सो लोए। जस्सत्थो सो गुरुओ अत्थविहूणो य लहुओ उ।। (पउम.३५.६६) ३४) न य परलोए निव्वाहो धम्मं विणा। (कथा.९६) ३७) संसारे रे सुहं कत्तो। (अगड.३२८) ३८) कण्णकडुयं पि सच्चं हियं परिणामसुंदरं भासियव्वं। (कथा.पृ.१६३) ३९) नियहिययनिम्मलाइं सुयणा पेच्छंति सव्वहिययाइं। (जिना.पृ.२०) ४०) सप्पुरिससंगाउ णरो इह परलोए य लहइ कल्लाणं। (धर्मो.पृ.६६)

**परिशिष्ट १**

# इतर काही प्राकृतांची काही वैशिष्ट्ये

**शौरसेनी :-**

(अ) वर्ण :- (१) मध्य असंयुक्त त्, थ् चा अनुक्रमे द्, ध् होतो. उदा- रजत-रजद, नाथ-नाध, (२) र्य चा विकल्पाने य्य होतो. उदा - आर्य-अय्य, अज्ज.

(आ) रूपविचार :- (१) अकारान्त शब्दांना पंचमी ए व.त दो, दु हे प्रत्यय लागतात. उदा. :- जिणादो, जिणादु

(२) वर्तमानकाली तृ. पु. ए. व. चे दि, दे हे प्रत्यय :- हसदि, हसदे

(३) भविष्यकाळाचे चिह्न 'स्सि' आहे. उदा. - हसिस्सिदि.

(४) इअ, त्ता, दूण हे ल्यबन्ताचे प्रत्यय आहे: पढिअ, पढित्ता, पढिदूण कृ व गम् ची ल्यबन्ते कडुअ, गडुअ अशीही होतात.

(इ) संधी :- अन्त्य मकारापुढे इ वा ए आला असता मध्ये विकल्पाने ण् येतो. उदा- युक्तम् इदम्- जुत्तं णिमं, जुत्त मिमं।

(ई) अव्यये :- (१) इह-इध, इदानीम्-दाणिं, एव-य्येव असे विकार होतात. (२) हंजे - चेटीला हाक मारण्यास; अम्महे - आनंद दर्शविण्यास; ही ही विदूषकाचा आनंद दर्शविण्यास.

**मागधी :-**

**(अ) वर्ण :-** (१) र् बद्दल ल्, आणि ष्, स् बद्दल श् होतो. उदा कर-कल, पुरुष-पुलिश, सारस-सालश. (२) ष्ट, ष्ठ, ट्ट यांचा स्ट होतो. उदा - कष्ट-कस्ट, सुष्ठु-शुस्टु, पट्ट-पस्ट. (३) स्त व र्थ यांचा स्त होतो. उदा. सार्थ-शस्त, उपस्थित-उवस्तिद (४) च्छ बद्दल श्च येतो. उदा-गच्छ-गश्च (५) ज चा य होतो. उदा- जानाति-याणदि. (६) र्ज, द्य यांचा य्य होतो. उदा. दुर्जन-दुय्यण, मद्य-मय्य. (७) न्य, ण्य, ज्ञ,ञ्ज यांचा ञ्ञ होतो. उदा. अन्य-अञ्ञ, पुण्य-

पुञ्ञ, प्रज्ञा- पञ्ञा, अंजलि-अञ्ञलि.

**(आ) रूपविचार :-** (१) अकारान्त शब्दांचे प्रथमा ए. व. एकारान्त असते. उदा- पुलिशे (२) अकारान्त शब्दांना षष्ठी ए.व.त स्स, आहे व षष्ठी अ.व.त. आण, आहँ हे प्रत्यय लागतात. उदा. यिणस्स, यिणाह; यिणाण, यिणाहं. (३) प्रथम पुरुषी सर्वनामाचे प्रथमा ए.व. आणि अ.व. 'हगे' असे होते.

**पैशाची :-**

**(अ) वर्ण :-** (१) ण् चा न्, द् चा त्, श्, ष् चा स् होतो. उदा. गुण-गुन, मदन-मतन, शशरी-ससी, कृष्ण-किसान. (२) ट् चा त् होतो. उदा. कुटुंबक - कुतुंबक, (कुटुंबक) (३) 'हृदय' चे हितप, हितपक असे होते. (४) आद्दश, इत्यादि शब्दांत 'ह' चा ति होतो. उदा-याद्दश-यानिस (५) ल चाळ होतो: कुल-कुळ (६) ज्ञ, न्य, ण्य यांचा ञ्ञ होतो प्रज्ञा-पञ्ञा, कन्यका-कञ्ञाका, पुण्य-पुञ्ञ.

**(आ) रूपविचार :-** (१) अकारान्त शब्दांना पंचमी ए.व.त आतो, आतु हे प्रत्यय लागतात. : जिनातो, जिनातु (२) वर्तमान तृ.पु.ए.व. चे ति,ते हे प्रत्यय आहेत : रमति, रमते. (३) भविष्यकाळात 'सि' बद्दल 'एय': हुवेय्य. (४) कर्मणि अंग करण्याचा प्रत्यय 'इय्य' आहे. पठिय्यते। (५) ल्यबन्ताचे तून, त्थून, द्धून हे प्रत्यय आहेत. पठितून, नत्थून, तद्धून.

**अपभ्रंश :-**

**(अ) वर्ण :-** (१) मध्य असंयुक्त क् ख् त् थ् प् फ् बद्दल ग् घ् द् ध् ब् भ् येतात. (२) मध्य असंयुक्त म् बद्दल विकल्पाने वँ येतो. कमल-कमल, कवँल. (३) संयुक्त व्यंजनांतील र् चा विकल्पाने लोप होतो. चंद्र-चंद्र, चंद.

**(आ) रूपविचार :-** (१) प्राय: पुढील प्रत्यय लागतात :-

| | | |
|---|---|---|
| **प्र.** | उ, हो | ० |
| **द्वि.** | उ,हो | ० |
| **तृ.** | एं | हिं |
| **पं.** | हे, हु | हुं |
| **ष.** | सु, हो, स्सु | हं, ० |

(२) वर्तमानकाळाचे प्रत्यय पुढील प्रमाणे :-

| | | |
|---|---|---|
| **प्र.पु.** | उं | हुं |
| **व्दि.पु.** | हि | हु |
| **तृ.पु.** | इ,ए | हिं |

(३) अज्ञार्थात द्वि.पु.ए.व.त 'इ,उ,ए' हे प्रत्यय आहेत. उदा :- करि, करु, करे.

(४) भविष्यकाळाचे 'स' हे चिन्ह आहे. उदा- होसइ

**(इ) धातुसाधिते :-**

(१) वि.क.धा.वि. चे इएव्वउं, एव्वउं, एवा असे प्रत्यय आहेत. उदा-करिएव्वउं, करेव्वउं, करेवा.

(२) ल्यबन्ताचे इ,इउ,इवि,अवि,एप्पि,एप्पिणु,एवि,एविणु,असे प्रत्यय आहेत.

(३) तुमन्ताचे एवं,अण,अणहं,अणहिं, असे प्रत्यय आहेत.

(४) कर्तृवाचक तृ प्रत्ययाचा अणअ होतो. उदा कर्तृ-करणअ

**(ई) तध्दिते. :-**

(१) भाववाचक नाम करण्यास प्पण हा प्रत्यय :- देवत्व - देवप्पण.

**(उ) काही अव्यये अशी :-** एत्थु (अत्र), जणु (इव), पुणु (पुनः), एम्वहि (इदानीम्), ध्रुवु (ध्रुवम्), जि, ज (एव), एम्व, एम्वइ (एवं), नाही (न हि), केत्थु (कुत्र) इत्यादी.

## संक्षेप

| | |
|---|---|
| अ.व. | अनेक वचन |
| इ. | इत्यादी |
| ए.व. | एकवचन |
| क.भू.धा.वि. | कर्मणि भूतकालवाचक धातुसाधित विशेषण |
| च. | चतुर्थी विभक्ती |
| तृ. | तृतीया विभक्ती |
| तृ.पु. | तृतीय पुरुष |
| द्वि | द्वितीया विभक्ती |
| द्वि.पु. | व्दितीय पुरुष |
| द्वि.व. | द्विवचन |
| धातु | धातुसाधित |
| पं. | पंचमी विभक्ती |
| परि | परिच्छेद |
| पृ. | पृष्ठ |
| प्र. | प्रथमा विभक्ति |
| प्र.पृ. | प्रथम पुरुष |
| प्रस्ता | प्रस्तावना |
| भू. | भूतकाळ/भूतकाळवाचक |
| भूत | भूतकाळ/भूतकाळवाचक |
| म | मराठी |
| व.का.धा.वि. | वर्तमानकालवाचक धातुसाधित विशेषण |
| वि | विशेषण |
| वि.क.धा.वि. | विध्यार्थी कर्मणि धातुसाधित विशेषण |
| विशे | विशेषण |
| ष. | षष्ठी विभक्ती |
| स. | सप्तमी विभक्ती |
| सं. | संबोधन विभक्ती |

## संदर्भ ग्रंथ व त्यांचे संक्षेप


**(अ)**

| नाव | संक्षेप |
|---|---|
| १) आपटे वा.वें.<br>पाठ्यव्याकरणदीपिका, सांगली, १९३२ | वा.वें. आपटे |
| २) उपाध्ये ए.टी.<br>प्राकृतभाषाप्रवेश, बेळगाव, १९४६ | उपाध्ये |
| ३) त्रिविक्रम<br>प्राकृत व्याकरण (सं-वैद्य पी.एल्.), सोलापूर, १९५४ | त्रिवि |
| ४) पावणी<br>भारतीय साम्राज्य, उत्तरार्ध, प्राकृत व मराठी भाषेचा इतिहास, पुणे (शके १८२३) | पावणी |
| ५) पुप्फभिक्खु<br>सुत्तागम (खंड १-२), गुडगाव (पूर्व पंजाब), १९५३-५४ | सुत्ता |
| ६) बेचरदास दोशी<br>प्राकृत व्याकरण, अहमदाबाद, १९२५ | बेचर |
| ७) मार्कंडेय प्राकृत सर्वस्व | मार्कं |
| ८) वररूचि प्राकृतप्रकाश प्राकृतमंजरी सह,<br>निर्णयसागर, मुंबई | प्रामं |
| ९) हेमचंद्र<br>प्राकृत व्याकरण (सं-वैद्य पी.एल्.), पुणे, १९५८ | हेम |

**(आ)**

| | |
|---|---|
| 1) Apte V.S.<br>Student's Guide to Sanskrit Composition, Poona, 1945 | आपटे |
| 2) Bhandarkar<br>Wilson Philoogical Leetures, Bombay, 1914 | भांडार |
| 3) Charpentier<br>Uttarādhyayana - Sūtra, Uppsala, 1922 | शार्पे |

4) Chokshi चोक्षी
A Comparative Prakrit Grammar, Ahemdabad, 1934
5) Gandhi Hiralal गांधी
A Study of Ardhamagadhi Grammar, Surat, 1938
6) Gune P.D. गुणे
Introduction to Comparative Philology
7) Ghatage A.M. घाटगे
Introdunction to Ardhamagadhi, Kolhapur, 1941
8) Hoernle चंड
Prākṛta- Lakṣaṇa of Canda, Calcutta, 1880
9) Jacobi Erja, 1886 याकोबी
10) Jacobi याकोबी
Kulpasūtra, Leipjig, 1879
11) Jain Banarasidas जैन
Ardhamagadhi Reader, Lahore, 1923
12) Kale M.R. काळे
A Higher Sanskrit Grammar, Bombay, 1922
13) P.Kumar पी. कुमार
A Way to Ardhamagadhi Grammar, Bombay
14) Nesfield नेसफील्ड
Idiom, Grammer and Synthesis, 1909
15) Patwardhan M.V. पटवर्धन
Daśavaikālikasūtra (I - VI) : A Study, sangli, 1933
16) Pischel, Grammatik der पिशेल
Prakrit Sprachen, Strassburg, 1900
17) Pischel, Comparative Grammar of the पिशेल (इं)
Prakrit Languages (English translation), Delhi, 1957

18) Sen A comparative Grammar of Middle Indo- Aryan सेन

19) Seth पासम
Pāia - sadda - mahannava, calcutta, 1924

20) Vaidya P.L. वैद्य
A Mannal of Ardhamagadhi Grammer, Poona, 1933

21) Vaidya P.L. प्राप्र
Prākṛta prakāśa of Vararuci, Poona, 1931

22) Woolner वूल्नर
Introduction to Prākṛta, Culcutta, 1928

## ग्रंथनामे व त्यांचे संक्षेप

| नाव | संक्षेप |
| --- | --- |
| १) अगडदत्तचरिय<br>सं-उपाध्ये ए.टी., बेळगाव, १९४० | अगड |
| २) अंतगडदसाओ<br>सं- वैद्य पी.एल्. | अंत |
| ४) आचारांगसूत्र<br>सुत्तागम, खंड १, सं-पुप्फभिक्खु, गुडगाव (पूर्व पंजाब), १९५३ | आचारांग |
| ५) उत्तराध्ययनसूत्र<br>सं- वैद्य-वाडेकर, पुणे, १९५९ | उत्त |
| ६) उवासगदसाओ<br>सं- वैद्य पी.एल्., पुणे, १९३० | उवा |
| ७) उवासगदसाओ<br>सं- होएर्न्ले | उवा |
| ८) उसाणिरुद्ध (सर्ग १-२)<br>सं-वैद्य एन्.व्ही., पुणे, १९५४ | उसा |
| ९) ओववाइयसुत्त | ओव |

सं- सुरु एन्.जी., पुणे, १९३१

१०) कथाकोशप्रकरण — कथा

जिनेश्वरकृत, भारतीय विद्याभवन, मंबई, १९४९

११) कुमारपालचरित — कुमार

सं - वैद्य पी.एल्., पुणे, १९३०

१२) कुम्मापुत्तचरिय — कुम्मा

सं-वैद्य पी.एल्., पुणे, १९३०

१३) चउपत्तेगबुद्धचरियाणि — चउ

(पाइयकहामाला, द्वितीय भाग)

सं - उपाध्ये ए.टी., बेळगाव, १९३९.

१४) जिनदत्ताख्यानद्वय — जिन

भारतीय विद्याभवन, मुंबई

१५) दसवेयालियसुत्त — दस

सं- अभ्यंकर के.व्ही., अहमदाबाद, १९३२

१६) देशीनाममाला — देनामा

हेमचंद्रकृत, द्वितीय आवृत्ति, पुणे, १९३८

१७) धर्मोपदेशमालाविवरण — धर्मो

जयसिंहकृत, भारतीय विद्याभवन, मुंबई, १९४९

१८) धूर्ताख्यान — धूर्ता

हरिभद्रकृत, भारतीय विद्याभवन, मुंबई, १९४४

१९) नलकहा वरुणकहा य — नल

सं-गोरे एन्.ए., पुणे

२०) नाणपंचमीकहाओ — नाण

महेश्वरकृत, भारतीय विद्याभवन, मुंबई, १९४९

२१) नायाधम्मकहाओ (९ व १६) (भाग२) — नाया

(प्रस्तावना, इंग्रजी भाषांतर, टीपा)

सं- वैद्य एन्. व्ही., पुणे १९४०

२२) नायाधम्मकहाओ — नाया

अभयदेवकृत टीकेसह
२३) नायाधम्मकहाओ (४-८) नायाए
(इंग्रजी भाषांतर, टीपा) सं-वैद्य एन्.व्ही., सांगली
२४) नायाधम्मकहाओ (संपूर्ण) नायासं
सं-वैद्य एन्.व्ही, पुणे, १९४०
२५) निरयावलियाओ निरया
सं-वैद्य पी. एल्., पुणे, १९३२
२६) पउमचरिय (१-४) पउम
सं-चौगुले-वैद्य, बेळगाव, १९३६
२७) पउमचरिय (३३-३५) पउम
सं-चौगुले, बेळगाव, १९४१
२८) पएसि कहाणय (भाग१) पएसि
सं - वैद्य पी.एल्., पुणे
२९) पाइयकहामाला (भाग १) पाकमा
सं- उपाध्ये ए.टी., बेळगाव, १९४९
३०) पाइयगज्जपज्जसंगह पाइ
सं-गांधी हिरालाल, मुंबई, १९४०
३१) बंभदत्तचरिय बंभ
सं-उपाध्ये ए.टी., बेळगाव, १९४०
३२) भगवतीसूत्र (प्र.१५) भग
सं-वैद्य पी.एल्.
३३) महावीरचरिय महा
गुणचंद्रकृत, देवचंद लालभाई जैन पुस्तकोध्दार ग्रंथांक ७५
३४) रायपसेणइज्ज (मलयगिरिकृत विवृतिसहित) राय
सं-वैद्य एन्. व्ही., अहमदाबाद.
३५) लीलावई लीला
सं-उपाध्ये ए.एन्., भारतीय विद्याभवन, मुंबई, १९४९
३६) वज्जालग्ग (१-३००) वज्जा

सं-गोरे एन्.ए., पुणे, १९४५
३७) वसुदेवहिंडि (प्रथम खंड, द्वितीय अंश) वसु
संघदासगणिकृत, जैन आत्मानंद सभा, भावनगर, १९३१
३८) विवागसुय विवाग
सं-उपाध्ये ए.टी., सातारा, १९३५
३९) समराइच्चकहा समरा
सं-याकोबी, कलकत्ता, १९२६
४०) संपइनिवकहा विण्हुकुमारकहा य संपइ
सं-दीक्षित, बेळगाव, १९५३
४१) सामायिकसूत्र सामा
सेठिया जैन ग्रंथालय क्रमांक ३३
४२) सिरिसिरिवालकहा (भाग१, १-३७७) सिरि
सं-सुरु एज्.जी., पुणे, १९३२
४३) सुपासनाहचरिअ (खंड ३) सुपास
लक्ष्मणगणिकृत, सं-सेठ ह.गो., बनारस
४४) सुरसुंदरीचरिय सुर
धनेश्वरकृत, वाराणसी, १९१६
४५) सूयगड सूय
सं - वैद्य पी.एल्.

# मुखपृष्ठ परिचय

प्रकृतीची प्रसिद्ध पाच मूळ तत्त्वे आहेत. पृथ्वी, जल, अग्नी, वायू, आकाश. भारतातील प्रत्येक दर्शन किंवा धर्म यांपैकी एका तत्त्वाला मध्यवर्ती ठेवून विकसित झाला आहे. जैनधर्माचे मध्यवर्ती तत्त्व अग्नी आहे. अग्नीतत्त्व ऊर्ध्वगामी, विशोधक, लघु आणि प्रकाशक आहे.

श्रुतज्ञान अग्नीप्रमाणे अज्ञानाचे विशोधक आणि प्रकाशक आहे. अग्नीच्या या दोन गुणधर्मांना मध्यवर्ती ठेवून मुखपृष्ठाची पृष्ठभूमी (Theme) तयार केली आहे.

काळा रंग अज्ञान व अशुद्धीचे प्रतीक आहे. अग्नीचे तेज अशुद्धींचे भस्म करत शुद्ध ज्ञानाकडे अग्रेसर करते. विशुद्धीची ही प्रक्रिया श्रुतभवनची मध्यवर्ती संकल्पना (Core Value) आहे.

अग्नी प्राण आहे. अग्नी जीवनाचे प्रतीक आहे. जीवनाची उत्पत्ती व निर्वाह अग्नीमुळे होतात. श्रुताच्या तेजामुळेच ज्ञानरूपी कमळ सर्वदा विकसित राहते आणि विश्वाला सौंदर्य, शांती व सुगंध देते. चित्रामध्ये पांढऱ्या रंगाचे कमळ याचे प्रतीक आहे.

श्रुतभवनामध्ये अप्रकट, अशुद्ध आणि अस्पष्ट शास्त्रांचे शुद्धीकरण होते. शुद्धीकरणाच्या फलस्वरूप श्रुततेजाच्या प्रकाशामध्ये ज्ञानरूपी कमळाचा उदय होतो.



।। सुयं मे आउसं ।।

श्रुतभवन संशोधन केन्द्र